# निवडक लोकहितवादी

(लोकहितवादींच्या विविध साहित्यकृतींतील वैशिष्टयपूर्ण विचारांचे दर्शन)

संपादक

**डॉ. निर्मलकुमार फडकुले**

प्रमुख, मराठी विभाग, संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर.

**डॉ. ल. रा. नसिराबादकर**

प्रपाठक, मराठी विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**फडके बुकसेलर्स, कोल्हापूर-४१६ ०१२**

निबंध

REFBK-0024721

प्रथमावृत्ती, १९८४

●

किंमत २५ रुपये

V. PHADKE & CO.
REVISED
PRICE- 30/-
KOLHAPUR.

●

प्रकाशक :

मोरेश्वर फडके

एम. व्ही. फडके आणि कंपनी

महाद्वार रोड

कोल्हापूर–४१६ ०१२

●

मुद्रक :

दि. गं. कुलकर्णी

राजहंस प्रिंटिंग प्रेस

नागाळा

कोल्हापूर–४१६ ००३

# निवडक लोकहितवादी

# अनुक्रम


प्रस्तावना / एक ते छत्तीस

१. हिंदु लोकांचा आळशी स्वभाव / १

२. इंग्रजी विद्या / ३

३. संस्कृत विद्या / ७

४. विद्वान कोणास म्हणावे ? / ११

५. ग्रंथ / १५

६. नवीन ग्रंथांची आवश्यकता / १७

७. भ्रांतिनिरास / २०

८. शिमग्याचा दुराचार / २३

९. वैराग्य / २५

१०. मानास व दानास पात्र / २८

११. निरूद्योगीपणाच्या चाली / ३०

१२. धर्मसुधारणा / ३३

१३. कलियुग / ३६

१४. स्त्रियांची स्थिती / ३९

१५. पुनर्विवाह / ४३

१६. पुनर्विवाह / ४५

१७. आर्जवीपणा व डौलीपणा / ४७

१८. हिंदु लोकांचा व्यापार / ५०

१९. निर्भयपणाविषयीं / ५३

२०. 'द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदु लोकांपेक्षा अधिक आहे' / ५६

२१. हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणें / ६१

२२. राज्यसुधारणा / ६९
२३. हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणें / ७१
२४. इंग्रजी राज्यापासून लाभ / ७४
२५. इंग्लिश राज्यापासून फळ / ७७
२६. उद्देश / ७९
२७. कोणाच्या पाठीं पडावें असें एकही स्थल राहिलें नाहीं ! / ८३
२८. राज्यतुलना / ८८
२९. लांच / ११३
३०. वेळेचा व्यर्थ खर्च / ११७
३१. ब्राह्मण लोकांचा स्वभाव / ११९
३२. सरदार लोक / १२२
३३. युरोपखंडात प्रवास / १२५
३४. हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाहीं ? / १२७
३५. महाराष्ट्र भाषा / १३१
३६. शत्रूंस शरण जाऊन कुलास बाटविणें कालत्रयीही होणें नाही ! / १३५
३७. पृथ्वीराजाचा इतिहास / १४७
३८. अंगारे, मंत्र, तंत्र वगैरे या लोकांची ढोंगें होत ! / १५४
३९. ऐतिहासिक गोष्टी / १५७
४०. पंडित स्वामी श्रीमद्दयानंदसरस्वती / १६४
४१. शतपत्रांचा इत्यर्थ / १७७
टीपा / १८३–२०७

# प्रस्तावना

## समाजप्रबोधनाचे प्रणेते लोकहितवादी

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाराष्ट्राला आधुनिक जीवनाची प्रगत दृष्टी देणारे, प्रबोधनाचे अेक उद्‌गाते म्हणून लोकहितवादींचा–गोपाळराव हरी देशमुख यांचा–अग्रक्रमाने उल्लेख करावा लागतो. नव्या युगाची चाहूल या पुरोगामी विचारवंताला प्रथम लागली. पाश्चिमात्य ज्ञानविज्ञानाचे अत्यंत निर्भरशील स्वागत व समर्थन या लेखकाने केले. इंग्रजी सत्ता बद्धमूल झाल्यानंतर तिचा अन्वयार्थ ओळखून जनतेला मार्गदर्शन करताना राष्ट्रीय ध्येयवाद तिच्यासमोर ठेवण्याचे कार्यही या समाजचिंतकाने केले. नव्या काळाचे व परिस्थितीचे आकलन ज्यांनी प्रथमच वस्तुनिष्ठ दृष्टीने करून घेतले अशा विचारवंतांत लोकहितवादींचे स्थान विशेष महत्त्वपूर्ण आहे. जुनाट, पारंपरिक व गतार्थ झालेल्या श्रद्धा उराशी कवटाळून बसलेल्या समाजात बुद्धिवादी, पुरुषार्थ विचार रुजावेत म्हणून त्यांनी अखंड धडपड केली. आपल्या साहित्याच्या माध्यमातून त्यांनी एका उद्यमी, साहसी व नवरचनात्मक प्रवृत्तीचे उद्‌गान केले. लोकहितवादींच्या पूर्वीचे मराठी साहित्य बहुतांशी अध्यात्माचे, प्रारब्धाचे आणि निवृत्तीचे तुणतुणे वाजवीत बसले होते. शतकानुशतके हिंदू समाजमनात निवृत्तीचा व अुदासीनपणाचा सूर भरलेला होता. पण आपल्या साहित्यातून आपण नवे बंडखोर ओजस्वी सूर आळविले पाहिजेत आणि नव्या विचारांची भूमिका तयार केली पाहिजे, हे उद्दिष्ट समोर ठेवून लोकहितवादींनी नवनवीन विषयांवर सातत्याने ग्रंथलेखन केले. साहित्यात आणि समाजमनात बलशाली प्रेरणा निर्माण करणाऱ्या या विचारवंताच्या विचारधारेचा अभ्यास होण्याची आवश्यकता आहे. कारण त्यांच्या विचारामागे जुने मोडून टाकण्याची आणि नवे प्रयत्नपूर्वक मांडण्याची जिद्द आहे.

अव्वल इंग्रजी कालखंडात बलिष्ठ समाजसुधारकांची जी पहिली पिढी उदयाला आली तिचे प्रवक्ते आणि प्रतिनिधी म्हणून लोकहितवादींचा उल्लेख करावा लागतो. लोकहितवादी हे नाव महाराष्ट्रातल्या समाजपरिवर्तनाच्या विचारांशी आणि चळवळीशी कायमचे निगडित झाले आहे. त्यांच्या विचारधनाचा समृद्ध वारसा आजच्या अभ्यासकांनी केवळ जपला पाहिजे असे नव्हे, तर त्याचा सांगोपांग अभ्यास करून आजच्या परिस्थितीतही तो कसा प्रेरक व मार्गदर्शक ठरतो ते पाहिले पाहिजे. कोणत्याही ध्येयवादी विचारवंताची उपेक्षा करणे हा एक अक्षम्य ऐतिहासिक गुन्हा आहे असेच म्हणावेसे वाटते.

बुद्धिवादी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्रात विचारवंत लेखक, क्रांतिकारक उपेक्षित राहातात, किंवा ते केवळ पूजेचे विषय होतात, याची खंत वाटते. ते चिंतनाचे, साधक-बाधक चिकित्सेचें, अभ्यासाचे व इष्ट वाटल्यास अनुकरणाचे विषय व्हावेत. कारण त्यांच्या कर्तृत्वातून आपल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला आकार आलेला असतो. काही नव्या मूल्यांची त्यांनी नव्याने उभारणी केलेली असते.

लोकहितवादींनी विपुल व विविध पण वैशिष्टयसंपन्न लेखन केले आहे. सर्वसाधारण सुशिक्षितांत 'शतपत्रां'च्या' पलीकडे लोकहितवादींच्या साहित्यनिर्मितीची माहिती नाही. 'शतपत्रां'तील त्यांच्या लेखनाइतकेच मौलिक व महत्त्वपूर्ण लेखन त्यांच्या अन्य ग्रंथांतून आलेले आहे. त्यांच्या साहित्यात समाज, धर्म, अर्थ, राज्य, इतिहास, ग्रामजीवन, स्थानिक स्वराज्य, वाङ्मयचिंतन इत्यादी अनेक विषय आलेले आहेत. सुमारे चाळीस लहान मोठी पुस्तके लिहून समाजमनावर नवीन विचारांचा संस्कार करणारा हा साहित्यिक योग्य त्या संदर्भात समजून घेतल्याशिवाय महाराष्ट्रातील समाजसुधारणांचा व एकोणिसाव्या शतकांतील परिस्थितीचा, विविध चळवळींचा खरा अर्थ समजणार नाही. ज्ञाननिष्ठा आणि समाजनिष्ठा यांच्या संयोगातून हे 'लोकहितवादी' व्यक्तिमत्त्व व वाङ्मय आकाराला आले. मध्यंतरीच्या कालखंडात लोकहितवादींची प्रतिमा बरीचशी धूसर राहिली. त्यांच्या प्रतिमेवर जाणीवपूर्वक किंवा अज्ञानाने धूळफेक झाली. पण काही व्यासंगी अभ्यासकांनी ही धूसर झालेली प्रतिमा स्वच्छ स्वरूपात अलीकडच्या काळात मांडण्याचा प्रयत्न केला. जो लोकांचे पूर्वग्रह कुरवाळतो व त्यांच्या पारंपरिक कल्पनांना खतपाणी घालतो तो लोकप्रिय ठरतो. पण लोकहितवाद हे ज्याच्या विचारांचे मध्यवर्ती सूत्र असते तो लोकाराधनासाठी लिहित नाही.'वरं जनहितं ध्येयम । न केवला जनस्तुतिः ।' जे इष्ट वाटेल तेच लिहिणार व जे अनिष्ट वाटेल त्यावर प्रहार करणार असा आग्रह धरून लोकहितवादींचे लेखन झाले आहे. लोकजागृतीची ओढ लागलेल्या सुधारणावादी विचारवंताला लोकांच्या तात्कालिक रागालोभाची क्षिती बाळगून चालत नाही. लोकहितवादी हे या प्रकृतीचे लेखक आहेत. बाळशास्त्री जांभेकरांपासून डॉ. आंबेडकरांपर्यंत जे निष्ठावंत समाज-सुधारक हातात प्रबोधनाचा झेंडा घेऊन झुंजत राहिले त्या साऱ्याच विचारवंतांनी केलेल्या कार्यांचा व त्यांच्या विचारसरणीचा तटस्थपणाने अभ्यास झाला पाहिजे. आजच्या महाराष्ट्र संस्कृतीचे, जीवनदृष्टीचे ते रचनाकार आहेत. लोकहितवादींच्या साहित्याचा याच दृष्टीने अभ्यास व्हावा. त्या साहित्याची वैशिष्टये काय आहेत, याची स्थूल चर्चा व्हावी, हाच या प्रास्ताविक लेखनाचा हेतू आहे.

इ. स. १८१८ मध्ये शनिवार वाड्यावर इंग्रजी राज्याचे निशाण फडकू लागले. पेशवाईची इतिश्री झाली. काही हितसंबंधी लोक सोडले तर बहुसंख्य लोकांनी इंग्रजी राज्याचे स्वागत केले. मराठी राज्याचा अखेरचा प्रतिनिधी – दुसरा बाजीराव पेशवा पळून गेला व या घटनेचे लोकांनी स्वागत केले. याचा अर्थच पेशवाईत जनतेच्या आशा-आकांक्षांना काही स्थान उरले नव्हते. मूठभर लोकांच्या स्वार्थाचे पोषण करणारी ही

सत्ता होती. ती अंतर्बाह्य खिळखिळीच झाली होती. इंग्रजांनी धक्का दिल्याबरोबर ती कोसळून पडली. इंग्रजी सत्तेने आता सारे हिंदुस्थान व्यापले. या सत्तेच्या मागे नव्या ज्ञानविज्ञानाचे सामर्थ्य उभे होते. इंग्रजी राजवटीमुळे हिंदुस्थानच्या व महाराष्ट्राच्या जीवनात काही महत्त्वपूर्ण फेरबदल घडून येण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली. खरे तर, साऱ्या देशात राजकीय सत्तांतरे यापूर्वी काही वेळा झाली होती. पण त्यांचा परिणाम सामाजिक जीवनावर, शिक्षणावर, जीवनदृष्टीवर कधी फारसा झालाच नाही. इंग्रजी सत्ता मात्र राजकीय स्थित्यंतरापुरतीच मर्यादित राहिली नाही. या सत्तेबरोबर नवी संस्कृती, नवी मूल्ये, नव्या जाणिवा यांचा प्रभाव येथील जीवनावर पडत गेला. पाश्चि-मात्य संस्कृती वेगाने पुढे सरसावत निघाली आणि जुनी भारतीय संस्कृती माघार घेऊ लागली, असे दृष्य दिसू लागले. नव्या पश्चिमी ज्ञानाच्या अध्ययनातून लोकहितवादी, म. जोतीबा फुले, न्या. मू. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, भांडारकर, इत्यादी विचार-वंत उदयाला आले. आपल्या समाजव्यवस्थेचे, धर्मकल्पनांचे त्यांनी कठोर परीक्षण करायला सुरुवात केली. आपली संस्कृती आता आपले पूर्वीचे चैतन्य आणि तेज हरवून बसली आहे, याची त्यांना जाणीव झाली. या संस्कृतीच्या सर्वांगांची वास्तविक चिकित्सा करून तिला नवी जीवनसत्वे ( Vitamins) दिल्याशिवाय गत्यंतर नाही असा निष्कर्ष या विद्वानांनी काढला. ही भूमिका घेणाऱ्या समाजपंडितांत लोकहितवादींचे पहिले स्थान आहे यात शंका नाही. कारण या भूमिकेचा तर्ककठोर, उत्कट पाठपुरावा त्यांनी इ. स. १८४८ मध्येच भाऊ महाजन यांच्या 'प्रभाकर' पत्रातून लिहिलेल्या 'शतपत्रां'त केला आहे. हिंदू समाजजीवनाच्या विविधांगांचा इतका स्पष्ट, फटकळ पण वास्तव परामर्श घेणारा ग्रंथ त्यापूर्वी मराठीत प्रकाशित झाला नाही.

## लोकाभिमुख व्यक्तिमत्त्व

लोकहितवादी – गोपाळराव हरी देशमुख–यांचा जन्म १८–२–१८२३ मध्ये पुण्याला झाला. यावेळी पेशवाई संपुष्टात येऊन पाच वर्षे झाली होती. देशमुखांचे मूळ नाव सिद्धये देशमुख हे वतनावरून मिळालेले नाव आहे. गोपाळरावांचे वडील हरिपंत हे दुसऱ्या बाजीरावाचे सेनापती बापू गोखले यांचे फडणीस होते. पेशवाईबद्दल निष्ठा असलेल्या हरिपंतांचा इंग्रज गव्हर्नर एल्फिन्स्टनवर कमालीचा राग होता. ते पेशवाईचे समर्थक असले तरी गोपाळरावांनी मात्र पुढे आपल्या लेखनातून दुसऱ्या बाजीरावाचे आणि पेशवाईचे वाभाडे काढले आहेत. गोपाळराव तेरा वर्षांचे असतानाच इंग्रज सरकारने त्यांचा सरंजाम खालसा करून टाकला. देशमुख घराण्याची आर्थिक स्थिती त्यामुळे ढासळत गेली. इंग्रजांनी आपला सरंजाम काढून घेतला या घटनेची कसलीच कडवट प्रतिक्रिया लोकहितवादींच्या लेखनात दिसत नाही. उलट इंग्रजी राज्याचे त्यांनी आपल्या लेखनातून तर्कशुद्ध समर्थन करून स्वतःवर टीका ओढवून घेतली. इ. स. १८४१ मध्ये, म्हणजे वयाच्या अठराव्या वर्षी, ते इंग्रजी शाळेत दाखल झाले. तीन वर्षांच्या अध्ययनानंतर त्यांनी शाळा सोडली. इंग्रजी व इतिहास या विषयांत त्यांनी उत्तम प्रावीण्य संपादन केले. शालेय

शिक्षण १८४४ मध्ये संपले. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम इत्यादी संतांच्या वाङ्मयाचा आणि अन्य जुन्या मराठी साहित्याचा त्यांनी उत्तम परिचय करून घेतला. साहित्याच्या या वाचनातून त्यांची अभिरुची प्रगल्भ झाली. संतकाव्याने त्यांच्या मनावर मानवतावादी विचारांचा प्रभाव पडला. त्यांच्या सर्व लेखनात प्राचीन साहित्याभ्यासाच्या खुणा अनेक स्थळी जाणवतात. इंग्रजी साहित्याचे व इतिहासग्रंथांचे त्यांनी आवडीने वाचन केले. पोहणे, घोड्यावर बसणे, बंदुक चालविणे या कलांतही ते प्रवीण झाले. संस्कृत, पर्शियन आणि गुजराथी या भाषांचाही त्यांनी अभ्यास केला व तो त्यांच्या लेखनाला उपयुक्त ठरला असे दिसते. १८४४ मध्ये 'दि एजंट फॉर सरदारस् इन् दि डेक्कन' यांच्या कार्यालयात ट्रान्सलेटर म्हणून त्यांना नोकरी मिळाली. आपल्या कार्यक्षमतेने ते पुढे जॉइंट जज्ज, व सेशन्स जज्ज झाले. अहमदाबादला ते दहा वर्षे स्मॉल कॉज कोर्टाचे मुख्य न्यायाधीश होते. इ. स. १८७४ मध्ये मुंबई विद्यापीठाची फेलोशिप त्यांना मिळाली. इ. स. १८८० ते ८२ पर्यंत तीन वर्षे ते मुंबईच्या कायदे कौन्सिलचे सभासद होते. रतलाम संस्थानचे दिवाण, आर्य समाजाचे विश्वस्त वगैरे अनेक पदे त्यांनी भूषविली. १८९२ मध्ये त्यांचे निधन झाले.

व्यवसायाच्या निमित्ताने लोकहितवादी महाराष्ट्रात आणि गुजराथेत अनेक ठिकाणीं गेले. सार्वजनिक जीवनाशी समरस होणाऱ्या या समाजसेवकाने शाळांची आणि वाचनाल-यांची कित्येक ठिकाणी स्थापना केली. पुण्याच्या नगरवाचनमंदिराच्या संस्थापनेत त्यांनी पुढाकार घेतला होता. पहिले मराठी साहित्यसंमेलन भरविण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा होता. 'ज्ञानप्रकाश', 'इंदुप्रकाश' इत्यादी वृत्तपत्रांमागे त्यांची प्रेरणा होती. अनेक शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांना त्यांनी चालना दिली. ते सरकारी नोकरीत होते व रावबहादुर झाले या घटनेचा काही टीकाकारांनी विपर्यस्त स्वरूपात उल्लेख केला. पण नोकरीत रममाण झालेल्या नोकरशाही प्रवृत्तीच्या अधिकाऱ्याला सामाजिक परिवर्तनासाठी वैचारिक बंडखोरीने ओथंबलेले क्रांतिप्रद लेखन करण्याची काहीच आवश्यकता नसते. व्यापक दृष्टीने लोकजीवनाचे निरीक्षण केल्यानंतर लोकजागृतीची ललकारी मारल्याशिवाय त्यांना राहावेना. शालेय वयातच त्यांना जे जग दिसले त्यामुळे ते अस्वस्थ झाले. अंतर्मुख झाले. पाश्चात्त्य विद्येने त्यांना शोधक दृष्टी दिली. या लोकाभिमुख अभ्यासकाला तीव्रतेने असे वाटले की लोकांची उदासीनता आणि अज्ञान दूर करून त्यांना आपल्या स्थितीगतीची स्पष्ट जाणीव करून दिल्याशिवाय लोकस्थिती सुधारणार नाही. 'लोकहितवादी' हे नाव धारण करून त्यांनी अखंड लेखणी चालविली. लोकहितवादींचे साहित्य हे त्यांच्या समाजनिष्ठ, परिवर्तनवादी प्रवृत्तीतून उचंबळून आले आहे. त्याचा हेतू पांडित्यप्रदर्शनाचा नाही. नव्या जाणिवा देण्यासाठीच ते लिहिले गेले. नानाविध विषयांवर अभ्यास करून, माहिती मिळवून ती लोकांसाठी ग्रंथरूपाने प्रसिद्ध करावी ही जबरदस्त हौस त्यांच्या ठायी होती. आजुबाजूच्या परिस्थितीतूनही त्यांना लिहिण्याच्या, विचार करण्याच्या प्रेरणा मिळाल्या. सर्व प्रकारची अप्रियता आणि उपेक्षा पत्करून लोकशिक्षकाची आपली भूमिका

प्रामाणिकपणे वठवणाऱ्या या विचारवंताच्या विचारांची वास्तववादी दृष्टीने ओळख करून घेतली पाहिजे.

## वैचारिक धक्के देणारी ' शतपत्रे '

लोकहितवादींची ' शतपत्रे ' इ. स. १८४८ ते १८५० या दोन वर्षांत ' प्रभाकर ' मधून प्रकाशित झाली. शतपत्रे आणि लोकहितवादी यांचे एक दृढ समीकरण झाले आहे. ' पण लक्ष्यांत कोण घेतो ? ' ही कादंबरी हरिभाऊ आपटे यांच्याशिवाय दुसऱ्या कोणा लेखकाने लिहिली असती असे मानायला आपण तयार होत नाही. ' एकच प्याला ' ही नाटयकृती राम गणेशाशिवाय कोण लिहिणार ? या कृती म्हणजे त्या लेखकांच्या हृदयस्थ प्रतिभेचा अनन्यसाधारण आविष्कार आहे. ' शतपत्रां'च्या संदर्भात असेच विधान करावे लागेल. लोकहितवादींच्या चिकित्सक प्रवृत्तीचा, वस्तुनिष्ठ दृष्टीचा आणि त्यांच्या लोकहितवादित्वाचा प्रमत्त, प्रभावी आविष्कार शतपत्रांच्या शब्दांशब्दांतून झालेला आढळतो. महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासात व मराठी निबंधवाङ्मयात या ' शतपत्रां'ना एक स्वतंत्र, महत्त्वपूर्ण स्थान आहे. या लेखनाने हिंदू समाजाला जबरदस्त वैचारिक धक्के दिले. धक्का देणारे विचार लोकांना एकदम आवडत नाहीत. आत्मसंतुष्टतेच्या कोषात रममाण झालेल्या निष्क्रिय समाजाला शतपत्रांच्या रूपाने आलेल्या एका वादळाला तोंड देणे अशक्य झाले. मग या अस्वस्थ झालेल्या लोकांनीं आपल्या मनाची दारे, खिडक्या बंद करून घेतल्या.पण या विचारांचा वेग विलक्षण असल्यामुळे दारे फोडून ते आत घुसले. एका नव्या बलोद्धत , बुद्धिवादी विचाराची दीक्षा देण्यासाठी ही ' शतपत्रे ' लिहिली गेली. यामुळे मराठी वैचारिक साहित्यात एका नव्या युगाचे प्रवर्तन झाले असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. लोकहितवादींनी या लेखनाच्या द्वारे महाराष्ट्रात नवजीवनवादी ( Renaissance )चळवळ सुरू केली व ती रुजवण्याचा प्रयत्न केला. शतपत्रांची निर्मिती होऊन आता दीड शतक होत आले. पण हे साहित्य अद्यापि जुने झाले असे दिसत नाही. जो समाजविचार, क्रांतिविचार त्यातून प्रकट झाला आहे, त्याची आजही – विसाव्या शतकाच्या शेवटच्या चरणातही -- पूर्वीइतकीच गरज आहे. स्त्री शिक्षण, बालविवाह पुनर्विवाह, इंग्रजी शिक्षण या संदर्भातल्या विचारांना आज फारसे स्थान नाही हे खरे. ज्ञानोपासनेतून, नव्या संशोधनातून, उद्योगधंदे आणि कारखानदारीच्या उभारणीतून, राष्ट्रावरील निष्ठेतून, अंधःश्रद्धा व रूढीवाद यांच्या त्यागातून राष्ट्रजीवन आपल्याला घडवायचे आहे हा तेजस्वी संदेश आजही नवरचनेसाठी आपल्याला हवा आहे. त्याकडे दुर्लक्ष करणे शक्यच नाही. शतपत्रांना नकार देता येणार नाही. कारण तो प्रवृत्तीला व पुरुषार्थाला नकार ठरेल.

## क्रांतिकारकाचे स्वप्न

' शतपत्रे ' लोकहितवादींनी आपल्या वयाच्या ऐन पंचविशीत लिहिली. एका तरुण आक्रमक, निर्मितिशील मनाचा आवेग त्यातून व्यक्त होतो. काहीसे अलंकारिक विधान

करायचे झाले तर असे म्हणता येईल की ,' शतपत्रां'तून एका क्रांतिकारकाची काही भव्य स्वप्ने साकार झाली आहेत. कोणताही क्रांतिकारक आपले स्वप्न साकार करण्यासाठी स्वतःशी , परिस्थितीशी झगडत असतो. केशवसुतांनी रंगवलेला ' नवा शिपाई ' म्हणजे त्या कवीच्या प्रतिभेला पडलेले एक स्वप्नच नव्हते काय ? ज्या कालखंडात त्यांनी ही कविता लिहिली त्या कालखंडात लोकहितवादी , महात्मा फुले , आगरकर , न्यायमूर्ती रानडे विरोधी शक्तींशी सामना देत आपले कार्य करण्यासाठी धडपडत होते. एका अर्थाने या व्यक्ती म्हणजे केशवसुतांचे ' नवे शिपाई'च होते. लोकहितवादींच्या विचारात ' नव्या शिपाया'चा उद्दाम आवेश कसा होतो हे शतपत्रांतील प्रत्येक निबंधांतून जाणवत राहते. 'नवा शिपाई' म्हणतो,

खादाड असे माझी भूक
चतकोराने मला न सूख
कूपांतिल मी नच मंडूक
मळ्यास माझ्या कुंपण पडणे अगदी न मला साहे
कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे.

लोकहितवादींच्या समग्र साहित्यातून याच प्रकारचे विचार आविष्कृत होतात. आपला देश म्हणजे आपली मातोश्री आहे अशी शुद्ध राष्ट्रवादी भूमिका घेऊन समाजातल्या सर्व जातीधर्मांच्या, सर्व स्तरांतल्या लोकांसाठी ते आपले विचार प्रकट करतात. हे साहित्य मध्यमवर्गीय जाणिवांच्या पलीकडे गेले नाही अशी टीका जे लोक करतात त्यांनी ते साहित्य वाचण्याचे श्रम घेतलेले नसतात. केवळ 'शतपत्रां'ची साक्ष काढली तर असे दिसते की, नानाप्रकारचे विषय त्यांत आले असून सामाजिक उपयुक्ततेच्या दृष्टिकोणातून, समाजबांधणी करण्यासाठीच हे लेखन आहे. त्यात स्वदेशीचा विचार आहे. आर्थिक अभ्युदयाचा मार्ग सांगितला आहे. लोकशाही स्वातंत्र्याची भूमिका मांडली आहे. इंग्रजी ज्ञानाचा, आधुनिक विज्ञानाचा व संशोधनवृत्तीचा पुरस्कार आहे. गतार्थ झालेल्या रूढींचा धिक्कार आहे. स्त्रीपुरुष समानतेची घोषणा आहे. बुद्धिवादाचा डिंडिम वाजवला आहे. भटांभिक्षुकांवर कोरडे ओढले आहेत. सारांश, समाजसुधारणेसाठी ज्या ज्या विषयांची चर्चा करणे आवश्यक होते ते सारे विषय धिटाईने, सडेतोडपणाने मांडून आपली भूमिका त्यांनी स्पष्ट केली. ' शतपत्रा'तील जाणिवा जर केवळ मध्यमवर्गीय असत्या तर डॉ. आंबेडकरांसारख्या श्रेष्ठ क्रांतिकारकाने आपल्या 'बहिष्कृत भारत 'या साप्ताहिकातून ही ' शतपत्रे ' पुन्हा का प्रसिद्ध केली असती ? त्यापूर्वीही ' सुबोधपत्रिके ' तून त्यांना प्रसिद्धी मिळाली होती. ज्यांना लोकहितवादींची भूमिकाच नीट समजली नाही त्यांनी त्यांच्या साहित्यावर काही उथळ आक्षेप घेतले तर आपण त्यांची कीव करावी. ज्यांना विपर्यासच करायचा आहे त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे. यापेक्षा आपण काय करणार ?

## विचारांची मुख्य वैशिष्टये

'शतपत्रे' आणि 'निबंधसंग्रह' या पुस्तकांतील काही लेखांचा 'निवडक लोकहितवादी' मध्ये समावेश केला आहे. लोकहितवादींचे अन्य महत्त्वाचे ग्रंथ, 'स्वाध्याय' 'लक्ष्मीज्ञान', 'ग्रामरचना', 'गुजरात देशाचा इतिहास', 'आगमप्रकाश', 'हिंदुस्थानला दरिद्रता येण्याची कारणे' वगैरे पुस्तकांतूनही यात काही महत्त्वाचे लेखन घेतले आहे. या व त्यांच्या अन्य साहित्यातून प्रकट झालेल्या विचारांचे स्वरूप व विश्लेषण येथे संक्षेपाने करायचे आहे.

लोकहितवादींच्या विचारांची व जीवनदृष्टीची काही ठळक वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१. प्रारब्धवादी विचारसरणीला बाजूला सारून पुरुषार्थप्रवण विचारांचा रसरशीत पुरस्कार त्यांनी केला. इहलौकिक जीवन महत्त्वाचे असून ते जिवंतपणे जगले पाहिजे ही भूमिका विवरून सांगितली. सारे जीवन नियतीच्या हातातले आहे ही रूढ कल्पना झटकून टाकली.

२. नाना प्रकारच्या अंधःश्रद्धा व रूढी यांच्यावर प्रहार केले. परमार्थाभोवतीच पिंगा घालीत बसलेल्या धर्मकल्पना निरुपयोगी आहेत असे प्रतिपादन केले.

३. धर्म हा इहलोकातले जीवन घडविण्यासाठी आवश्यक आहे. पण कर्मकांडप्रधान धर्मात अर्थ नाही. तो नीतिप्रधान असावा. समाजजीवन आणि धर्म यांची सुव्यवस्थित सांगड घालण्यासाठी धर्माला बुद्धिवादाचा आधार दिला पाहिजे.

४. निरर्थक कर्मकांडाचे व शुष्क, अतार्किक विधींचे स्तोम माजल्यामुळे भटांभिक्षुकांनी सामान्य माणसाचे शतकानुशतके शोषण चालविले. एक ऐतखाऊ ब्राह्मणवर्ग यातून निर्माण झाला. धर्म हा त्यांच्या धंद्याचा भाग होऊन बसला. पुरोहित वर्गावर लोकहितवादींनी त्यामुळे प्रहार केले.

५. जुन्या, कालबाह्य झालेल्या शास्त्रपुराणांचा धाक आता न मानता 'युगपरत्वे शास्त्रही फिरवले पाहिजे' असे सांगून ग्रंथप्रामाण्याला विरोध केला.

६. पाश्चात्त्य विद्येच्या अध्ययनातून विज्ञाननिष्ठा लोकमनात रुजावी, भौतिक शास्त्रे अभ्यासिली जावीत, कालपक्व झालेल्या जुन्या विद्या अभ्यासण्यात अर्थ नाही, ही भूमिका आग्रहाने मांडली.

७. आर्थिक व औद्योगिक उत्कर्ष व्हावा म्हणून नवनवीन उद्योगधंद्यांची कास धरावी व राष्ट्रोन्नती घडवून आणावी ही राष्ट्रीय जाणीव जोपासली.

८. व्यक्तीची मूलभूत प्रतिष्ठा, स्वातंत्र्य आणि बुद्धिवाद या मूल्यांच्या आधारावर समाजाची बांधणी व्हावी. लोक शहाणे व ज्ञाननिष्ठ झाले म्हणजे त्यांनी इंग्रजांकडे स्वातंत्र्याची मागणी करावी. आवश्यकता पडल्यास क्रांती करून स्वातंत्र्याची प्राप्ती करून घ्यावी.

९. हिंदुस्थानच्या दरिद्रतेची मीमांसा करून इंग्रजांनी चालविलेले या देशाचे आर्थिक शोषण थांबविले पाहिजे, असे सांगितले.

१०. स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत हा सिद्धांत सांगून सामाजिक न्यायाच्या व व्यक्तीच्या जन्मसिद्ध स्वातंत्र्याच्या दृष्टीतून स्त्रीजीवनविषयक समस्यांचा विचार मांडला.

ही मुख्य वैशिष्टचे संक्षेपाने उल्लेखिली. पण यांतील काहींचे आणखी अधिक स्पष्टीकरण करणे संयुक्तिक ठरेल.

## पाश्चात्य ज्ञानविज्ञानाचे स्वागत

पश्चिमेकडे उगवलेल्या ज्ञानसूर्याचे स्वागत लोकहितवादींनी उत्कटतेने केले. पाश्चात्त्य विद्या विज्ञानावर आधारलेली आहे. भौतिक शास्त्रांच्या अध्ययनातूनच युरोपची प्रगती झाली हे त्यांना दिसत होते. विज्ञानातून नव्या सामर्थ्याची निर्मिती होऊ शकते. इहजीवनाला समृद्धी लाभते याची जाणीव साऱ्याच विचारवंतांना त्या काळात झाली आहे. पाश्चात्त्य विद्येचा पुरस्कार राजा राममोहन रॉयपासून साऱ्याच आधुनिक सुधारणावाद्यांनी केला आहे. लोकहितवादींचे कट्टर टीकाकार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी निबंधमालेतून इंग्रजी विद्येचे माहात्म्य गायिले आहे. इंग्रजी विद्या हे वाघिणीचे दूध आहे असे म्हणून 'एक इंग्रजी विद्येचे वज्र हाती असले म्हणजे झाले' अशी तिची प्रशस्ती त्यांनी केली आहे. पाश्चात्त्य विद्येच्या प्रसाराने विचारक्रांतीला अनुकूल वातावरण तयार केले. भौतिक शास्त्रांनी भौतिक स्वरूपाचा दृष्टिकोण दिला. घटनांच्या मागे असलेला कार्यकारणभाव शोधण्याची प्रवृत्ती या ज्ञानामुळे निर्माण झाली. पूर्वी साऱ्याच गोष्टींचा विचार तथाकथित धार्मिक दृष्टीने करण्याची सवय जडलेली होती. या देशात मुसलमान आले, इंग्रज आले, त्यांनी आपल्या बळावर सत्ता संपादन केली. पण हे लोक कोण व ते कोठून आले, त्यांचे सामर्थ्य कशात सामावले आहे, याची साधी चिकित्साही कधी केली नाही. अज्ञान आणि औदासीन्य यांच्या विळख्यात सापडलेल्या हिंदू लोकांना आपल्यापलीकडे कोणते जग आहे, ते किती सुधारलेले आहे याची जाण नव्हती व त्याबद्दल त्यांना खंतही नव्हती.पण इंग्रजी ज्ञानातून शोधकता, जिज्ञासा, विचारशीलता, प्रायोगिकता, चिकित्सकता यांचे संस्कार होत जातात. कारण वैज्ञानिक दृष्टीवर ही विद्या आधारलेली आहे. आधुनिक ज्ञानाचा लाभ झाल्याबरोबर अव्वल इंग्रजी कालखंडातली पहिलीच पिढी मानसिक दृष्ट्या बदलून गेली. आपल्या साऱ्या जुन्या श्रद्धा, सांस्कृतिक मूल्ये यांची आमूलाग्र फेरतपासणी केलीच पाहिजे असे या सुशिक्षितांना वाटू लागले. जीवनमूल्यांची

समीक्षा करावी असे त्यांना पूर्वी वाटले नव्हते. पूर्वीच्या अवस्थेबद्दल लोकहितवादी आपल्या घणाघाती भाषेत म्हणतात,

'ब्राह्मण लोक कारकुनीचा धंदा फार करितात आणि गृहस्थ म्हणवितात. परंतु वास्तविक पाहिले तर त्यांस काय कळते? संध्येची अक्षरे साळुंखीसारखी किंवा राघूसारखी पाठ करितात, मोडीचे लिहितात, वाचतात. साधारण कामकाज कारकुनीचे करता येते. परंतु हे मोठे प्रतीचे मजूरदार, जसे सुतार, न्हावी, धोबी तसेच ब्राह्मण कारकून, यात त्यांचा विद्वानपणा काहीच नाही. . . मूळ हिंदू लोकांमध्ये विद्येचे मान इतके कमी आहे की त्यांस विद्या म्हणजे काय हे अश्रुत आहे . . इंग्रजी विद्या वृद्धिगत झाली म्हणजे हिंदू लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाही.'

'सांप्रतचे ब्राह्मण विद्येविषयी केवळ जनावरे आहेत. त्यांस अर्थज्ञान नाही . . ब्राह्मणांची पढणी आमचे कानी पडतात त्यांचा अर्थ म्हणणारास कळत नाहीं व ऐकणारांस कळत नाही. '

'जी औषधे पाच हजार वर्षांचे पाठीमागे लिहून ठेवली आहेत तीच आज घ्यावयाची. याचे कारण कोणी पुसले तर शास्त्रात आहे म्हणून सांगतात. जे एकदा ग्रंथांत मागील काळी ऋषींनी शोध करून ठरविले आहेत तितकेच. त्याजवर काही एक नाही. सर्व विद्येचा ओघ अटकावला आहे. कोणी विचार करीत नाहीत. '

'या देशातील लोकांनी विलायतेस जावे. विद्या शिकावी जे श्रीमान आहेत त्यांणी या कामात द्रव्य खर्चावे. तिकडील ज्ञानाची वृद्धी करावी. तिकडील कलाकौशल्य इकडे आणावे. आपल्या दुष्ट चाली सोडाव्यात. हेच शहाणपण आहे. या शहाणपणाने या लोकांस समर्थता येईल. आणि समर्थतेनंतर दरिद्र जाईल. मुख्य ज्ञानापासून सर्व पराक्रम आहेत. '

'ज्यांची मने फार विस्तीर्ण झाली आहेत, ज्यांचे मनात अनेक कल्पनांचा संग्रह झाला आहे, ज्यांचे मनास संस्कार होऊन सर्व विषयांची थोडी फार माहिती झाली आहे, त्यांसच विद्वान म्हणावे. केवळ इंग्रजी शाळेत जाऊन नक्कल करण्यास शिकला तो विद्वान नव्हे. '

लोकहितवादींची ही अवतरणे वाचली म्हणजे पाश्चात्य ज्ञानाकडे ते साऱ्या समाजाला का ओढून नेत होते, हे समजते. हे ज्ञान अभिवृद्धीसाठी, सामर्थ्यासाठी, नवनिर्मितीसाठी उपयुक्त आहे, हे त्यांना तीव्रतेने जाणवले. व्यक्तिस्वातंत्र्य आणि बुद्धिवाद ही नवी मूलभूत मूल्ये पश्चिमी विद्येने दिली यात संशय नाही. त्याचप्रमाणे पारमार्थिक व पारलौकिक जीवनाच्या विचारापेक्षा ऐहिक जीवन महत्त्वाचे आहे व ते समर्थपणे जगले पाहिजे, अशी प्रेरणा या विद्येतून मिळाली. भौतिक शास्त्रांच्या ज्ञानातून विश्वातल्या अनेक घटनांमागील रहस्ये उलगडली. यंत्रतंत्राच्या माहितगारीतून उद्योग व्यापाराला चालना मिळाली. जुने

ग्रंथ व त्यातील कालबाह्य झालेली माहिती यांचे चर्वितचर्वण करून कसलीच रसनिष्पत्ती होऊ शकत नाही. हे त्यांनी जाणले. 'ज्या ज्ञानाने आपल्यावर इतर लोकांनी सरशी केली ते ज्ञान आपण धिक्कारू नये. कारण की त्याचा आपल्याला अनुभवच आला आहे; असेही त्यांनी म्हटले. सामाजिक दृष्टचा उपयुक्त असलेल्या पाश्चिमात्य विद्या आणि भौतिक शास्त्रे यांचे समर्थन याच विचारातून त्यांनी केले.'शतपत्रांत'त्र एका ठिकाणी ते म्हणतात, 'चार ब्राह्मण लावून अभिषेक करण्यापेक्षा चार मजूर लावून रस्ता नीट करणे समाजाच्या अधिक हिताचे असते.' जुन्या पठडीतल्या पढिक पंडितांकडून योग्य ज्ञानाच्या पायावर समाजाची घडण होणे शक्य नाही हा निष्कर्ष त्यांनी काढला होता. आणि संयुक्तिकच होता.

## इंग्रजी राज्याचे समर्थन

इंग्रजी विद्येप्रमाणेच इंग्रजी राज्याचे आवेशाने लोकहितवादी समर्थन करतात. या समर्थनामागे 'स्वजनद्रोह' व 'इंग्रजधार्जिणेपणा' आहे अशी अविचारी, निराधार टीका काही टीकाकारांनी केली. इंग्रजी राज्याचे समर्थन म्हणजे पारतंत्र्याचे समर्थन नव्हे. इंग्रजी राज्याने काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या. या संदर्भात लोकहितवादींनी मांडलेले विचार मननीय आहेत.

'इंग्रज लोकांनी हिंदु लोकांस स्थितीवर आणण्याचा बहुत प्रयत्न चालविला आहे व देशात स्वस्थता केली. चोर लुटारू नाहीसे केले. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. किती काळ जरी ब्राह्मणी राज्य चालते तरी सती बंद होती ना; पेंढार मोडते ना व बालहत्या बुडती ना. पाहा बरे, पोरे बेलाशक मारीत होते. कोणी नवसाची पोरे टाकीत होते. कोणी मारून टाकीत होते. या प्रकारच्या चाली होत्या. कोणी स्त्रिया जाळून टाकीत, कोणी जिवंत पुरीत, कोणी गळचात दगड बांधून बुडवीत, हे सर्व मूर्खपण कधीतरी लोकांच्याने बंद करवले असते काय?'

सामाजिक आणि शैक्षणिक सुधारणांना इंग्रजांच्या राज्यात अत्यंत वेगाने चालना मिळाली. राज्यकर्ते उदारमतवादी होते. इंग्रजी राज्याचे समर्थन म्हणजे या राज्याच्या मुळाशी जी उदारमतवादी विचारधारा आहे, तिचे समर्थन होय. लोकांच्या अनेकांगी जागृतीला या राज्यात चेतना मिळाली. धार्मिक व सामाजिक आंदोलने निर्माण झाली. लोकहितवादी म्हणतात, 'इंग्रज सरकारचा या देशात मोठा धर्म हाच आहे की, त्यांनी विद्या वाढवून या लोकांस शहाणे करावे. आणि जेव्हा स्वदेशाचे राज्य करण्याचे व्यावहारिक ज्ञान यास येईल आणि हे पृथ्वीवरची हकीगत सर्व जाणतील आणि दुर्गुण सोडतील तेव्हा हे राज्य त्यांनी यांचे हवाली करावे. परंतु जर हल्ली या लोकांचे आधीन राज्य होईल तर पहिल्यापेक्षा अनर्थ फार होतील.' याच विषयावर आणखी एका ठिकाणी त्यांनी प्रकट केलेले मत असे आहे, ' आमचे लोकांच्या रीती अगदी बदलल्याशिवाय या

देशाचे हित होणार नाही. व या लोकांस स्वत: राज्य चालविण्याचे सामर्थ्य असल्याखेरीज इंग्रज लोक या देशातून गेले तरी उपयोग होणार नाही. पुन्हा गर्दी होईल व बेबंदी, अंधाधुंदी, भालेराई, होळकरी गर्दी व पेंढारी अशा गोष्टी पुनरपि होतील.'

इंग्रजांच्या साहचर्यातून राज्यविषयक, अर्थविषयक, शास्त्रविषयक नवीन ज्ञानाचा लाभ हिंदी जनतेला होत राहील. हिंदी लोक सुजाण बनल्याशिवाय, स्वाभिमानी व विज्ञाननिष्ठ बनल्याशिवाय स्वातंत्र्याला पात्र कसे ठरतील ? आजच्या अवस्थेत स्वातंत्र्य म्हणजे नवी बेबंदशाही. पुन्हा अनेक अनर्थ. काही काळ या इंग्रजी राज्याचा व त्यांच्या शिस्तबद्ध प्रशासनाचा लाभ हिंदी जनतेला मिळावा अशी ही विचारसरणी आहे. व्यक्ति-स्वातंत्र्याला आणि उदारमतवादाला अवसर देणाऱ्या इंग्रजी राज्याचे समर्थन लोकहित-वादींनी करावे हे स्वाभाविक वाटते. ते पारतंत्र्याचे कधीच उद्गायक नव्हते. इंग्रजी विद्या व इंग्रजी राज्य यांच्या मुळाशी जी शास्त्रीय दृष्टी होती ती या विचारवंताला नितान्त अनुकरणीय वाटली.

'गुजराथ देशाचा इतिहास' या ग्रंथाला लोकहितवादींनी एक विस्तृत परिशिष्ट जोडून इंग्रजी राज्य व संस्थानी एतद्देशीय राज्ये यांची अत्यंत बारकाईने तुलना केली आहे. ही तुलना त्यांच्या सूक्ष्म, सर्वांगीण दृष्टिकोणाचा एक उत्तम नमुना आहे. प्रस्तुत पुस्तकात 'राज्यतुलना' या शीर्षकाखाली ते परिशिष्टात्मक लेखन दिले आहे. प्रजेच्या विविधस्वरूपी प्रगतीसाठी इंग्रज सरकार कसे व किती प्रयत्नशील आहे, याचा मागोवा या लेखनातून घेतलेला आहे. या राज्याची प्रशस्ती महात्मा फुले, न्या. मू. रानडे यांनीही केली आहे. उत्तम न्याय, सर्वांना समान कायदा, लोकरक्षणाची योग्य व्यवस्था; चोर, दरोडेखोर इत्यादींचा पक्का बंदोबस्त, व्यापार-उद्योगधंद्यांची वाढ, शिक्षणसंस्था, मुद्रणालये, ग्रंथप्रकाशन इत्यादींची वाढ, ही सर्व इंग्रजी राज्याची गुणवैशिष्टये सांगून लोकहितवादींनी या राज्यातील काही ठळक दोषांवरही नेमके बोट ठेवले आहे. वाढलेला शेतसारा, त्रासदायक कर, आर्थिक शोषण वगैरे वैगुण्यांचा उल्लेख केला आहे. पण हिंदी जनतेच्या विविधांगी प्रगतीला इंग्रजी राज्य कारण होत आहे, या जाणिवेतून त्यांनी त्याचे तर्कशुद्ध समर्थन केले. राज्यकर्त्यांपुढे लाचार होणारी स्वाभिमानशून्य वृत्ती या विचारवंतात असती तर त्याने 'हिंदुस्थानास दरिद्रता येण्याची कारणे' हे पुस्तक लिहून इंग्रजांच्या शोषणप्रधान अर्थनीतीवर आपल्या भेदक टीकेचे कुठाराघात केले असते काय? इंग्रजी राज्याकडे भाबडया भक्तिभावाने पाहून भाटासारखी त्यांची निरर्थक स्तुती करणाऱ्यांच्या मालिकेत लोकहितवादी असते तर त्यांनी 'शतपत्रां' तून इंग्लंडसारखी सांसदीय लोकशाही पद्धती या देशात स्थापन झाली पाहिजे, असे सांगून इंग्रजांनी हा देश सोडून गेले पाहिजे, असे स्पष्ट विचारप्रदर्शन केले असते काय ? चिपळूणकर आणि माडखोलकर यांनी या संदर्भात लोकहितवादींवर घेतलेले आक्षेप अप्रस्तुत व उथळ आहेत, इतकेच म्हटले पाहिजे. नि:पक्षपाती वृत्तीने लोकहितवादी इंग्रजी राज्याच्या गुणावगुणांची तटस्थ चिकित्सा करतात, हे लक्षात घेतले म्हणजे अपसमजुतीला जागा उरत नाही. या पुस्तकात

समाविष्ट केलेला ' हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणे ' हा लेख जिज्ञासूंनी वाचून पाहावा. लोकहितवादी हे एक वास्तवाचे भान ठेवणारे व आदर्शाचे चित्र रेखाटणारे समाजप्रेमी विचारवंत आहेत. त्यांची भूमिका सत्याचा शोध घेण्याची आहे, याची जाणीव त्यांच्या साहित्यातून होत राहाते.

इंग्रजी राज्याचा कैवार घेताना या लेखकाची वैचारिक दृष्टी नीटपणे समजून घेतली जात नाही. ' इंग्रजी राज्य हे ईश्वरी वरदान आहे ' अशा अर्थाचे विधान करताना ते चिरकाल टिकले पाहिजे, असे त्याला केव्हाच वाटले नाही. असले अतिरेकी, तर्कशून्य समर्थन करणारी व्यक्ती विचारवंत असूच शकणार नाही. विष्णुशास्त्री चिपळूणकर जसे राष्ट्रवादी होते तसेच लोकहितवादीही एक राष्ट्रवादी विचारवंत सुधारक होते, याबद्दल संदेह नाही. सामाजिक बाबतीत ते जसे प्रगमनशील, तसेच राजकीय संदर्भातही त्यांच्या विचारांना प्रगत, महत्त्वाकांक्षी जाणिवेचा आधार आहे.

## सांसदीय लोकशाहीचा निःसंदिग्ध पुरस्कार

ज्या कालखंडात राजेशाहीचा पुरस्कार होत होता त्या काळात राजेशाहीत प्रजेची दुरवस्था होते असे स्पष्ट प्रतिपादन करून लोकहितवादींनी सांसदीय लोकशाही हीच आदर्श राज्यपद्धती आहे, असे सांगून ही पद्धती आपल्या देशात आली पाहिजे, अशी मागणी केली आहे. इ. स. १८५७ च्या बंडापर्यंत अनेकांना राजेशाहीचीच स्वप्ने पडत होती. पण इ. स. १८४८ मध्ये लोकसत्तात्मक राज्यपद्धतीचा सर्वार्थाने पुरस्कार करणारा विचारवंत म्हणून लोकहितवादींचाच उल्लेख करावा लागेल. आज आपण जातिधर्मनिरपेक्ष, संप्रदाय मुक्त अशा उदार, समावेशक, लोकसत्तेचे समर्थन करतो. पण या प्रकारची लोकशाही लोकहितवादींच्या दृष्टीसमोर मागील शतकातच तरळत होती व तिचे चित्र ते आत्मीयतेने रेखाटतात, हे पाहिले म्हणजे मनाला विस्मय व आनंद वाटतो. लोकहितवादी म्हणतात, राज्य करण्यास गरीब व मातबर, नीच जातीचे व उंच जातीचे लोक समान मानावेत हे सर्वांस कळू लागेल अशा सभेत (पार्लमेंटमध्ये) जातीविषयी निवड नको हे वर सांगितले आहेच. जे फार विद्वान व चांगले चालीचे लोक आहेत तेच नेमले पाहिजेत; मग त्यांची जात कोणतीही असो. ' जातीय व धर्मीय आकुंचित निष्ठा बाजूला ठेवून लोकसत्तात्मक राज्य अस्तित्वात यावे हे या विचारवंताचे उज्ज्वल स्वप्न आहे. त्याला अभिप्रेत असलेली पार्लमेंटरी डेमॉक्रसी आज तरी सर्वार्थांनी अस्तित्वात आली आहे काय, याचा विचार प्रत्येकाने स्वतंत्रपणे करावा. आपली भूमिका विशद करताना लोकहितवादींनी जे म्हटले ते त्यांच्याच शब्दांतून येथे देणे उचित होईल.

' आजपासून सर्व गरिबांनी व श्रीमतांनी एकत्र होऊन विलायतेतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा की हल्ली, राज्यपद्धती आहे तीपासून आमचा फायदा नाही. व आमचे राज्यासंबंधी हक्क चालत नाहीत व हिंदू लोक जसे तसेच इंग्रज लोक

मनुष्ये आहेत, याजकरिता इन्साफ बरोबर होण्याकरिता सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्ये सांप्रत मोठा भेद आहे तो मोडून एकसारखे होण्याकरिता हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावे. व ही मोठी सभा मुंबईस भरावी. आणि तेथे दर एक शहरातून व दर एक जिल्ह्यातून दोन दोन असामी घेऊन त्या सर्वांस कौंसलात बसवून गवरनराने त्यात मुख्य असावे. व जे लोक दर जिल्ह्यातून आणावयाचे ते सर्व जातीतील सारखे असावे. दर जिल्ह्याचे मॅजिस्ट्रेट साहेबांकडून दवंडी पिटवावी की राज्याचा विचार चांगले रीतीने होण्याकरिता संपूर्ण लोकांनी विचार करून दोन शहाणे मुखत्यार नेमावे. व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनी हजर व्हावे. हे लोक बोलणारे, चतुर, मुत्सदगिरी केलेले असावे. कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हेत. व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादी जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनीं राज्य चालवावे म्हणजे लोकांचा फार फायदा होईल.'

या अवतरणावर भाष्य करण्याचे आता काहीच कारण नाही, इतका हा उतारा बोलका आहे. एकोणिसाव्या शतकातला एक प्रगल्भ विचारांचा, पुरोगामी दृष्टीचा राजकीय विचारवंत आपल्याला वर दिलेल्या अवतरणातून भेटतो. लोकहितवादींच्या राजकीय विचारांची चिकित्सक समीक्षा करताना प्रा. गं. बा. सरदार यांनी व्यक्त केलेले मत महत्त्वाचे आहे. ते म्हणतात. 'लोकहितवादींची अशा तऱ्हेची पायाशुद्ध विचारप्रणाली पाहिली म्हणजे त्यांना महाराष्ट्रातील राष्ट्रवादाचे आद्य प्रवर्तक म्हणून संबोधण्यास हरकत वाटत नाही.' प्रा. न. र. फाटकांचा अभिप्रायही असाच आहे. 'इंग्रजी राज्यातील भारतीय राष्ट्रवादाचा इतिहास पाहणाराला अगदी आरंभीच लोकहितवादींची मूर्ती दिसल्याशिवाय राहाणार नाही.'

## हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे

समाजजीवनाची चिकित्सा करताना स्वच्छ दृष्टीची, तटस्थपणाची आवश्यकता असते. पण कित्येक अभ्यासक परिस्थितिनिष्ठ मीमांसा करीत नाहीत. काही आग्रह व पूर्वग्रह यांच्या चष्म्यातून ते समाजविचार करतात. त्यांचे निदान व निष्कर्ष त्यामुळे चुकीचेच ठरतात. हिंदुस्थानचे स्वातंत्र्य लयाला का गेले याची चर्चा अनेकांनी केली. मराठी राज्य कोसळल्यानंतर साऱ्या हिंदुस्थानावर इंग्रजी राज्य प्रस्थापित झाले. पण हे स्वातंत्र्य का व कसे नष्ट झाले याबद्दल विचारवंतांत मतभेद आहेत. मराठ्यांचे राज्य पाहता इंग्रजांनी आपल्या हाती घेतले. या दारूण पराभवाची कारणमीमांसा लोकहितवादींना वस्तुनिष्ठ दृष्टीने केली. इंग्रजांनी भारतीयांचा पराभव केवळ रणांगणावरच केला असे नव्हे, तर सांस्कृतिक संघर्षात आणि जीवनाच्या अन्य क्षेत्रांत भारताला इंग्रजांकडून हार खावी लागली. स्वातंत्र्यनाशाची परखड चर्चा करताना लोकहितवादींनी जी विविध कारणे दिली त्यात हिंदू समाजाची धार्मिक व सामाजिक अवनती झाली होती, हे महत्त्वाचे कारण दिले आहे. एकीचा आत्यंतिक अभाव, आळस, औदासीन्य, अज्ञान, प्रारब्धवाद व सामाजिक आणि

राष्ट्रीय दृष्टीचा अभाव इ. कारणांचा त्यांनी उल्लेख केला आहे. 'शतपत्रां' तून आणि आपल्या इतिहासविषयक ग्रंथांना लिहिलेल्या प्रस्तावनांतून हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे त्यांनी विवरून सांगितली.या विषयाच्या संदर्भात शालेय वयातच त्यांनी सखोल विचार केला होता असे दिसते. पुण्यात संगमावर एकदा शालेय वयात फिरायला गेले असताना तेथे नेमबाजीचे शिक्षण एक अधिकारी सैनिकांना देत होता. सैनिकांचे नेम चुकत होते. अधिकाऱ्यालाही जेव्हा त्यात अपयश आले तेव्हा पुढे होऊन लोकहितवादींनी बंदुक हाती घेऊन अचूक नेमबाजी केली. चकित झालेला अधिकारी वरिष्ठ सेनाधिकाऱ्याकडे त्यांना घेऊन गेला. 'ब्राह्मण लोक निशाण मारण्यात जर इतके हुषार होते तर त्यांनी आपले राज्य कसे गमावले ? ' हा प्रश्न वरिष्ठ अधिकाऱ्याने विचारताच लोकहितवादींनी उत्तर दिले, 'ब्राह्मणांचे राज्य ते बंदुक मारण्यात कसबी नव्हते म्हणून गेले नाही. त्यांच्यात ऐक्य नव्हते म्हणून त्यांचे राज्य गेले. ' स्वातंत्र्यलयाची ही उपपत्ती संयुक्तिक वाटते. विष्णुशास्त्री चिपळूणकरांनी मात्र चक्रनेमिक्रमवादी विचारसरणी स्वीकारून प्रारब्धवादाचीच कास धरली आहे. राष्ट्रीय जीवनावर आघात करणाऱ्या व्यापक घटना केवळ नशिबाने घडत नाहीत. हा सारा सट्टीचा खेळ आहे, असे मानणे म्हणजे इतिहासाबद्दलचे अज्ञान प्रकट करणे आहे. स्वातंत्र्य नष्ट होणे ही कोणत्या प्रकारची आपत्ती आहे, याचीही जाणीव सर्वसामान्य भारतीयाला पुरेशी होऊ शकली नाही, इतकी उदासीनता आपल्या देशात आहे, याची एक विलक्षण खंत लोकहितवादींच्या मनात आहे. पराधीनतेची कारणे देताना त्यांनी आठ गोष्टींचा निर्देश केला आहे व त्याला 'हिंदुनाशाष्टक ' असे संबोधिले आहे. यात केवळ राजकीय स्वातंत्र्याच्या नाशाचीच नव्हे, तर हिंदूंच्या चौफेर अधःपतनाची, परागतीची आणि पराभवाची विदारक चिकित्सा केली आहे.

## आर्थिक अधोगतीची मीमांसा

सामाजिक व राष्ट्रीय प्रगतीचा विचार अनेक पातळ्यांवरून करावा लागतो. समाज केवळ शैक्षणिक दृष्ट्या प्रगत होऊन चालत नाही. त्याला आर्थिक मजबुती नसेल तर त्याचा विकास अडून राहतो. लोकहितवादींनी आर्थिक अंगाची पाहणी आधुनिक दृष्टिकोणातून केली. यंत्रविद्या व कारखानदारीचे स्वागत, स्वदेशी आणि स्वावलंबनाचा आग्रह, परकीय स्पर्धेला विरोध ही त्यांच्या अर्थविचाराची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत. यंत्रविद्येचे व नवनवीन कारखान्यांचे त्यांनी उत्साहाने स्वागत केले. यासाठी आपला व्यापार आणि उद्योग व्यवसाय यांची पद्धतशीरपणे वाढ व्हावी म्हणून ते म्हणतात,

' आपले लोकांस सुखी होण्याची युक्ती कोणती म्हणाल, तर अशी आहे की, जितके इंग्रज लोकांचे व्यापार व रोजगार इकडे कमी होतील तितके या लोकांस जास्ती सुख आहे.' स्वदेशीचा मंत्र त्यांनी राष्ट्रवादी दृष्टिकोणातूनच दिला. त्यांची राष्ट्रीय वृत्ती कशी उत्कट आहे याची कित्येक उदाहरणे दिली आहेत. ते म्हणतात, ' याजकरिता सर्वांनी असा कट करावा की, जे आपल्या देशात पिकेल तेच नेसू, तेच वापरू, कसेही असो आणि

तितक्याच चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास शिकू. आम्हांस मिळेल तसेच घेऊन आम्ही काळ काढू. मग हजारो खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल ? कापूस विकणारांनी असा बेत करावा की, इंग्रेजांस इकडे तयार केलेली कापडे द्यावी ; परंतु कापूस देऊ नये. येणे करून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठीस लागतात आणि भुलतात तसे या लोकांचे झाले. '

हिंदुस्थानच्या आर्थिक शोषणाबद्दल लोकहितवादींनी इंग्रजी राजवटीवर कित्येक स्थळी टीका करून या शोषणामुळेच देश दरिद्री होत आहे असे स्पष्टपणे म्हटले. परकीयांकडून होणारे शोषण जसे अन्यायकारक आहे त्याप्रमाणेच स्वकीयांनीही आळसात व अज्ञानात राहून शोषण करणाऱ्याला उत्तेजन द्यावे हेंहीं अन्यायाचेच आहे, असे मत त्यांनी मांडले आहे. आर्थिक उत्कर्षाचा शास्त्रपूत विचार या अर्थतज्ज्ञांनी करून ठेवला आहे. जे उपाय त्यांनी सुचविले ते महत्त्वपूर्ण आहेत. देशात जे द्रव्य राहिलेले आहे त्यातून अधिक द्रव्यवृद्धी झाली पाहिजे. आपल्याला दरिद्री करणाऱ्या ज्या चाली असतील त्या सोडून द्याव्यात. दोन रुपयात मुंज, पाच रुपयांत लग्नेही करावीत. पण द्रव्य रक्षावे. सामर्थ्यवान भिकाऱ्याला भिक्षा देऊ नये. म्हणजे तो स्वत: उद्योगधंद्यात पडेल आणि देशाची संपत्ती वाचेल. परदेशाचा माल वापरण्याची खोड अगदी सोडून द्यावी म्हणजे द्रव्य देशातच राहील व देशी उद्योगांना चालना मिळेल. तरुणांनी वैद्यक, इंजिनियरिंग वगैरे विद्या शिकून सरकारी नोकरीत प्रवेश करावा म्हणजे आपले द्रव्य परदेशात जाणार नाही. आजही हे सारेच उपाय आवश्यक वाटत नाहीत काय ? आमचा देश गरीब आहे. पण तरीही मुंज, लग्न व अन्य समारंभ यातून प्रचंड पैसा ओतला जातो. एखाद्या उत्पादक कार्यात ही संपत्ती गुंतवणे आणि लोकांना रोजगार उत्पन्न करून देणे ही कामे त्यातून सहज होऊ शकतील. भोजनसमारंभ आणि वराती यांत लक्षावधी रुपये एका दिवसात उडवणारी ' उदार ' मनोवृत्ती केवळ पेशवाईतच नव्हती. ती आजही आमच्या देशात आहे. एकीकडे बेकारांची प्रचंड संख्या आणि दुसरीकडे समारंभात, मिरवणुकीत उधळला जाणारा पैसा, ही दृश्ये पाहिली म्हणजे सुशिक्षितांनासुद्धा राष्ट्रीय जाणीव नाही याचा खेद वाटतो. इंग्रजांना आर्थिक शोषणाबद्दल त्यावेळी जबाबदार धरणे शक्य होते. आज होत असलेले शोषण व उधळणूक याची जबाबदार कोणावर ? हे अस्वस्थ करणारे प्रश्न आहेत. पण यांची उत्तरे द्यावी लागतील. एकोणिसाव्या शतकात आर्थिक पुनर्रचनेचा विचार राष्ट्रवादी दृष्टीतून या लेखकाने आपल्या समोर ठेवला. विशेषत: स्वदेशी वस्तूच वापरण्यात. जे येथील भूमीत पिकेल तेच खावे. परदेशातील माल वापरू नये हा अत्यंत मौलिक विचार प्रथम विवरून सांगण्याची भूमिका लोकहितवादींनी पार पाडली. पुढे साऱ्याच राष्ट्रीय नेत्यांना या विचाराचा पाठपुरावा करावा लागला. इंग्लंडमधील माल आपल्या बाजारपेठेत येऊ नये असे उत्कटपणे सांगणारा समाजसेवक ' इंग्रजांचा स्तुतिपाठक ' असणे कधी तरी शक्य आहे काय ?

## बुद्धिरेव बलीयसी

या समाजचिंतक लेखकाला लोकजीवन सुजाण, सुसंस्कृत व्हावे, लोकमन मुक्त, ज्ञाननिष्ठ व्हावे असे तीव्रतेने वाटत होते. लोकहितवादींच्या व्यक्तिमत्त्वात आणि विचारात सामर्थ्य येण्याची जी कारणे आहेत त्यांत त्यांची विलक्षण ज्ञानलालसा हे मुख्यतः सांगावे लागेल. नवनवीन ज्ञानाच्या क्षितिजांचा शोध हे या विचारवंताचे व्यसन. ज्ञाननिष्ठा आणि समाजक्रांती यांचा जवळचा संबंध असतो. जुने नष्ट करून नव्याचा उदय घडवून आणण्याची शक्ती विचारातच सामावलेली असते. Knowledge is power हा साक्षात्कार ज्यांना सर्वार्थांनी झाला त्यांत हा साहित्यसेवक आहे. ज्ञानाच्या शक्तीतून आपल्याला हा सारा समाज नव्या बलिष्ठ पायावर उभारायचा आहे, या आकांक्षेने लोकहितवादी झपाटून निघाले. त्यांनी हताश व निष्क्रिय व्हावे असे अनेक अनुभव येत असतानाही त्यांची चिवट वृत्ती ओसरली नाही. पुनरुक्तीचा व पाल्हाळाचा दोष पत्करूनही आपली विचारसरणी ते मांडीतच राहिले. कारण त्यांचा ज्ञानावर व पुरुषार्थावर विश्वास होता. बुद्धिवादाची अपरिचित साद त्यांनी उत्कटतेने समाजाला घातली. जुन्या ग्रंथांना, पोथ्यापुराणांना आणि शास्त्रवचनाला आत्यंतिक प्रतिष्ठा दिली जात होती. पोथ्यापुराणांतील भाकडकथांवर संपूर्णपणे विश्वास टाकण्याचा भाबडेपणा सर्वत्र पसरलेला होता. जुन्या शास्त्रातले वचन म्हटले की माणसे, भलेभले बुद्धिमंतसुद्धा अवनत होऊन त्या वचनाच्या गुलामगिरीत राहाणे आनंदाने पसंत करीत. कोणे एके काळी लिहिले गेलेले व अशास्त्रीय कल्पनांनी भरलेले निर्जीव हास्यास्पद ग्रंथ जिवंत लोकांच्या मनावर अधिराज्य गाजवीत राहिले, हा केवढा चमत्कार आहे. लहानपणीच मुलींचे लग्न करावे असे कोण्या एका पोथीत किंवा पुराणात म्हटले गेले म्हणून बालविवाहाची घातकी चाल समाजात सर्वमान्य झाली. पतीचा मृत्यू झाल्यानंतर पत्नीने त्याच्या प्रेताबरोबर स्वतःला जाळून घ्यावे असा परमदयाळू संदेश कोण्या एका जीर्ण झालेल्या पोथीत सापडला. आणि विधवांना बिनदिक्कत जाळून टाकण्याची एक 'महान धार्मिक' रूढी निर्माण झाली. पुनर्विवाहाला बंदी, स्त्रीशिक्षणाला बंदी, वगैरेंसारख्या स्त्रियांवर आणि एकंदरीत साऱ्या समाजावरच अन्याय करणाऱ्या परंपरा ग्रंथप्रामाण्यातून उदयाला आल्या. इ. स. १८७० मध्ये पुण्यात शंकराचार्यांच्या नेतृत्वाखाली एक अविस्मरणीय वादविवाद झाला. 'पुर्नविवाह सशास्त्र की अशास्त्र ? ' याचा निर्णय या वादात होणार होता. लोकहितवादी, न्या. मू. रानडे, विष्णुशास्त्री पंडित यांनी विधवांना पुर्नविवाह करण्याची संमती असलीच असलीच पाहिजे ही भूमिका घेतली होती. पण सुधारणावादी पक्षाचा त्यात पराभव झाला. कारण जुन्या शास्त्रवचनांची आज्ञा झुगारून देण्याचे धैर्य अनेक विद्वानांत आणि धर्माचे ठेकेदार असलेल्या शास्त्रीपंडितांत नव्हते. आपला सारा जन्म वैधव्याच्या आगीत होरपळत काढण्यातच विधवांचे अंतिम कल्याण आहे, असा न्याय त्यावेळच्या शास्त्र जाणणाऱ्या पंडितांनी व शंकराचार्यांनी दिला. व्यक्तीच्या स्वातंत्र्याची व सुखाची गळचेपी करणारी जुनाट शास्त्रे निर्धाराने बाजूला सारल्याशिवाय खऱ्या अर्थाने समाज स्वतंत्र होऊ शकत नाही. सारासार बुद्धीच्या कसावर घासून पाहाताना जुने ग्रंथ जर हिणकस ठरले तर ते

बुद्धिवादी लोकांनी धैर्याने दूर लोटले पाहिजेत. ही बंडखोर भूमिका लोकहितवादींनी घेतली. पोथ्यापुराणांवरील भाबड्या श्रद्धेच्या विरुद्ध पहिली आरोळी लोकहितवादींनी 'शतपत्रां'तून ठोकली. ते म्हणाले, 'मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, ब्रह्मदेवाचे कां असेना, ' बुद्धिरेव बलीयसी ' असे आहे. – – – – शास्त्रास एकीकडे ठेवा. आपली बुद्धी चालवा. विचार करून पहा. घातक वचनावर हरताळ लावा. '

पोथ्या पुराणांचे आणि त्यातील अशास्त्रीय वचनांचे एक फार दाट असे सावट आजही आपल्या जीवनपद्धतीवर आणि विचारसरणीवर पडलेले दिसते. लोकहितवादी बुद्धिप्रामाण्याच्या आग्रह धरतात व बुद्धीच्या आधाराने साऱ्या संस्कृतीचीच चिकित्सा करण्याची आकांक्षा धरून हिंदू संस्कृतीचा अंतर्बाह्य विचार आपल्या साहित्यातून करतात. या घटनेला आता किती तरी वर्षे उलटून गेली. लोकहितवादींना हवा असलेला सुशिक्षितांचा–अर्थशास्त्र समाजशास्त्र, भौतिकशास्त्र वगैरे शास्त्रांची परीक्षा देऊन विद्यापीठाची पदवी धारण केलेल्या पदवीधरांचा–वर्ग आज उत्पन्न झाला आहे. पण तरीही ज्या बुद्धिवादाची साद त्यांनी घातली त्याला प्रतिसाद देण्याइतकी बुद्धिनिष्ठा आजच्या सुशिक्षितांत निर्माण झाली आहे काय? अजूनही अंधश्रद्धेची वाट बुजलेली नाही. उलट ती रुंद होते की काय असा प्रश्न पडला आहे.

स्वतंत्र बुद्धीशी वैर करणारी आंधळी श्रद्धा जेव्हा प्रबळ होते तेव्हा साऱ्या जीवनपद्धतीलाच ती वेढून बसते. आपल्या सामाजिक संस्था, जुने ग्रंथ यांना मग 'ईश्वरी', 'पावित्र्याचे' अधिष्ठान मिळते. माणसे जुनी झाली म्हणजे ती दुबळी होतात. पण पोथ्या, ग्रंथ जुने झाले की ते प्रबळ होतात. मानवी प्रगतीची वाट अडवून ठेवण्याचा प्रयत्न जेवढा पोथ्या पुराणांनी केला तेवढा इतर कुणी केला नसेल. लोकहितवादी म्हणतात, 'शब्दप्रमाण कोठे कोठे मानू? जेथे विचार व युक्ती बसत नाही, तेथे मानणार नाही. याप्रमाणेच शास्त्री पंडितांचे वाद आहेत. भलतेच आकाशाचे टोक पाताळास मेळवितात. आणि म्हणतात की आम्ही मोठी कोटी केली. परंतु विचार केला तर केवळ मूर्खपणा होय– – – – शास्त्र म्हणजे लोकांस सुख होण्याकरिता रीती घातली आहे. त्यातून जर विपरीत काही असेल तर एकीकडे ठेवल्यास चिंता काय? – – – – शास्त्र हे कायदे आहेत व जे अनहितकारक कायदे असतील ते सोडून दुसरे करण्यास काही चिंता नाही.'

ग्रंथ अधिक महत्त्वाचा की ग्रंथ निर्माण करणारा मनुष्य अधिक महत्त्वाचा? पण मनुष्यालाच प्राचीन ग्रंथांच्या हुकुमशाहीत राहावे लागते हा काय चमत्कार आहे? ज्या काळात ग्रंथ लिहिला जातो त्याच्या पुढे गेलेल्या काळात, परिस्थिती बदललेली असते. ज्ञान व माहिती वाढलेली असते. आचार विचारात बदल झालेला असतो. याचाच अर्थ जुने ग्रंथ आणि पोथ्या जुन्या काळाच्या प्रतिनिधी असतात. नव्या काळाशी त्यांचे काहीच नाते उरत नाही. भूतकाळात काय घडले इतकेच मर्यादित अर्थाने सांगण्याचा त्यांचा अधिकार असतो. पण जेव्हा वर्तमानकालीन जीवनावरही हे जुनाट झालेले, कालबाह्य ग्रंथ आपली सत्ता

गाजवू लागतात तेव्हा त्यांचा अनिष्ट परिणाम साऱ्या जीवितावर होऊ लागतो. हिंदुस्थान हा गतानुगतिक संकेतांच्या ढोलीत दीर्घकाळ बसून राहिलेला एक देश. त्याला जुन्या शास्त्रवचनांच्याभोवती दैवी आज्ञेचे वलय आहे असे वाटत राहिले. जुन्या झालेल्या मूल्यांना कवटाळून बसण्याच्या दुराराध्य प्रवृत्तीमुळे अखेर ज्यांची संस्कृती नवी व अद्ययावत् होती त्या इंग्रजांनी हिंदी लोकांना आपल्या बुद्धिबळाखाली दडपून ठेवावे यात आश्चर्य कसले?

जुन्या शास्त्र वचनांच्या भोवती असलेल्या 'दैवी' वलयाला छेदून टाकण्याचा प्रयत्न बहुतेक समाजसुधारकांनी केला आहे. लोकहितवादी यांच्यानंतर महात्मा फुले आणखी पुढे गेले. आणि त्यांनी सारे धर्मग्रंथ मनुष्यानेच निर्माण केले आहेत, त्यांच्या निर्मितीशी ईश्वराचा संबंध नाही असे ठासून सांगितले. आगरकर आणि सावरकर यांनी ही विचार-सरणी जोमदारपणे मांडली. डॉ. आंबेडकरांनी जुने झालेले ग्रंथ मानवी स्वातंत्र्य आणि समता या तत्त्वांच्या विरोधी कसे आहेत हे दाखवून दिले. समाजाची रचना नव्या मूल्यांच्या आधाराने करायची असेल तर बुद्धिवादी बंडखोरपणा स्वीकारल्याशिवाय गत्यंतर नाही. लोकहितवादींची हीच भूमिका आहे. त्यांच्या साहित्यात हा विचार आग्रहपूर्वक आला आहे. याच दृष्टिकोणातून त्यांनी स्त्रीसमस्येचा विचार करून स्त्री आणि पुरुष दोघेही समान आहेत व दोघांनाही समान अधिकार असले पाहिजेत असे म्हटले. याच बुद्धिवादी विचारातून सामाजिक व धार्मिक प्रश्नांचा त्यांनी खल केला आणि निर्णय घेतले. परिवर्तनाला गती केवळ बुद्धिनिष्ठेतूनच मिळते. जे परिवर्तन ज्ञानातून होत नाही, ते समाजहिताचे असत नाही. काळ आणि परिस्थिती यांच्या संदर्भात बदलत राहाण्याची ज्या समाजात वृत्ती असते तोच समाज आपली प्रगती करून घेऊ शकतो. सर्वांगीण प्रगतीसाठी बुद्धिवादी विचारसरणीची आवश्यकता असते. हे लोकहितवादींच्या विचारांचे सार आहे.

## धर्मविषयक प्रगत दृष्टी

धर्म ही जीवनाला व समाजाला घडविणारी एक शक्ती आहे असा विश्वास लोकहितवादींच्या वाङ्मयातून प्रकट झाला आहे. पण त्यांना अभिप्रेत असलेला धर्म उदार, व्यापक आहे.कोणत्याही प्रकारच्या क्षुद्रतेला किंवा संकीर्णतेला कारण होतो तो धर्मच नव्हे, असे त्यांचे मत आहे. धर्माचे चिंतन—सखोल चिंतन—लोकहितवादींनी केले. ऐहिकतावादी दृष्टिकोण घेऊन त्याचे स्वरूप त्यांनी सांगितले. महाराष्ट्रात प्रार्थनासमाज, सत्यशोधक समाज, आर्यसमाज यांच्या माध्यमातून धार्मिक आंदोलने झाली या समाजांच्या पाठीशी ते उभे राहिले. त्यांनी मांडलेल्या धर्मविचारातही त्यांची बंडखोरी स्पष्ट होते. रूढ झालेल्या कित्येक आचारविचारांना धर्म म्हणणे म्हणजे धर्माची कुचेष्टा करणेच आहे याची त्यांना जाणीव झाली. 'परंपरागत धर्माचे वेड माजून आमचा अध:पात झाला आहे. आम्ही आर्यावर्तातील लोक पूर्वी फार प्रगत झालो होतो. परंतु कालांतराने निद्रावश झालो. आमच्या धर्मसमजुतीला विकृत वळण लागले. लोकभ्रमांवर आधारलेले क्रियाकांड वाढत गेले आणि अखेरीस आमचा पूर्ण नैतिक अध:पात झाला. लोकहितवादींचा हा निष्कर्ष आहे. राजस्थानचा इतिहास या ग्रंथाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ' धर्माचे वेड तर

विलक्षण माजून त्याखाली अनेक अनन्वित कृत्ये बेलाशक गेवून, त्याला हे धर्मवेडे लोक बेधडक अनुसरून त्यातच आपली, आपल्या कुलाची आणि आपल्या देशाची धन्यता मानू लागले. सारांश, खरा पुरुषार्थ आणि खरे तप ही जाणण्याविषयी येथून तेथवर सर्वत्र अज्ञानपणाचे अभ्र पसरले व सर्वांस भुरळ पडून दिशाभूल झाली.'

राजा राममोहन रॉयपासून ते डॉ. आंबेडकरांपर्यंत भारतात झालेल्या प्रत्येक सुधारणावादी विचारवंताला समाजाच्या मानसिक घडणीत धर्मशक्तीचा केवढा प्रबल वाटा आहे याचा विचार करावा लागला होता. धर्मांचे स्वरूप, त्याच्यापासून व्यक्तीला व समूहाला मिळणारी प्रेरणा, जीवनाला वळण लावण्याची व जीवितात अनिष्ट प्रवृत्तीला आधार देण्याची त्याच्याठायी असलेली क्षमता यांचा साधकबाधक विचार केल्याशिवाय सामाजिक सुधारणेला हात घालणे कोणत्याच सुधारकाला शक्य नाही. भारतातील बहुतेक समाजसुधारक आणि विचारवंत धर्मावर, ईश्वरावर नितांत श्रद्धा ठेवणारे होते. महात्मा फुले, छ. शाहू महाराज, महर्षी वि. रा. शिंदे या सुधारकांच्या आचारविचारांत धर्मभावनेला महत्त्वाचे स्थान होते. लोकहितवादींचीही ईश्वरावर आणि धर्मावर श्रद्धा होती. पण ही श्रद्धा डोळस होती, विवेकातून ती परिणत झालेली होती. धर्मशक्तीच्या वास्तविकतेचे त्यांनी आयुष्यभर चिंतन केले होते. समाजाच्या निकोप घडणीसाठी, त्याच्या सामर्थ्याचा परिपोष व्हावा यासाठी या शक्तीची सुयोग्य जाणीव लोकांना व्हावी असा त्यांनी प्रयत्न केला धर्म ही प्रेरक शक्ती असली तरी मानवी प्रगतीला ती काही वेळा प्रतिबंध करू शकते. भारताची अनेक शतके होत गेलेली परागती आणि त्याने आपल्या हृदयाशी कवटाळलेली धर्मकल्पना यांचा काही परस्परसंबंध आहे काय, याची विदारक चिकित्सा लोकहितवादींनी केली. अशी स्पष्ट मीमांसा आणि भेदक टीका करण्याशिवाय आता गती नाही अशी त्यांची खात्री पटली. कित्येक शतके आंधळ्या, तर्कदुष्ट संकेतांची काठी हातात घेऊन हिंदू समाज ठेचकाळत चालला होता. प्रमाण मानलेले पूर्वापार आचार-विचार म्हणजेच ईश्वरप्रणीत धर्म ही त्याची ठाम समजूत झालेली होती. पूर्वजांनी उचललेल्या या कल्पना आपण प्राणपणाने जपल्या पाहिजेत असा हट्ट तथाकथित धार्मिक लोकांच्या रक्तातून वाहताना आढळायचा. धर्मरक्षणासाठी मानवी मूल्यांची विटंबना झाली तरी सनातन धार्मिकतेचे पालन केल्याचा आनंद या लोकांना होत असे. आजही धर्मनिरपेक्षतावादाच्या वातावरणात गतानुगतिक वृत्तीने अशास्त्रीय रूढींचे जतन करण्यातच धर्म सामावला आहे अशी बहुसंख्य लोकांची समजूत कायम आहे. खरे तर, धर्माधर्माचा विचार सूक्ष्म व गहन आहे. काळ आणि परिस्थिती यांना अनुसरून धर्माच्या बाह्यदर्शनात बदल होणे अगदी स्वाभाविक आहे. पण आपली धर्मकल्पना अनेक शतकांपासून जशीच्या तशी, फेरफार न करता अभंग राखणे हेच खरे धर्मकार्य आहे अशी श्रद्धा जोपर्यंत समाजात रुजलेली असते तोपर्यंत सामाजिक सुधारणेला चालना देणे शक्य नसते. राममोहन रॉय-पासून सर्वच समाजचिंतकांना ही जाणीव झालेली दिसते. त्यांच्यापूर्वीच्या चक्रधर, ज्ञानेश्वर, तुकाराम यांसारख्या धर्मसुधारकांनाही धर्माचा विचार वेगवेगळ्या परिस्थितीच्या संदर्भात वेगवेगळ्या पद्धतीने विवरून सांगावा लागला होता. मानवी जीविताचे नियमन आणि

नियंत्रण करणारी, त्याला गती देऊन प्रगत करणारी व त्यांच्या विकासाला कारणीभूत होणारी एक शक्ती म्हणजे धर्म ही जाणीव जेव्हा मागे पडते व रूढी म्हणजेच धर्म, संकेत म्हणजेच धर्म, एखादा आचार म्हणजेच धर्म, अशी वृत्ती जेव्हा बळावते तेव्हा समाज-जीवनाच्या सर्वच दालनांत पडझड सुरू होते. हिंदू समाज लोकहितवादींना अनेक अंगांनी उद्ध्वस्त झालेला दिसत होता. एखाद्या रोग्याच्या शरीरात दुर्धर रोगाने ठाण मांडून त्याचे सर्व बाजूंनी शोषण करून त्याचीं जरत्कारूसारखी अवस्था करावी तशीच चमत्कारिक अवस्था हिंदू समाजाची झालेली जाणवण्याइतकी लोकहितवादींची संवेदना तल्लख होती. पाश्चात्य ज्ञानविज्ञानाचे पौष्टिक अन्न त्याला देण्याच्या आधी त्याच्या धर्मविषयक दृष्टीत इष्ट परिवर्तन झाले पाहिजे असा त्यांचा निष्कर्ष होता. कारण नवे ज्ञान, नवा विचार आणि नवी प्रगमनशील संस्कृती यांच्या स्वीकारासाठी उत्सुक असलेली मनोवृत्ती तयार करण्यासाठी प्रथम मनातील जुनी बांडगुळे नाहीशी करणे आवश्यक होते. नव्या जीवनाचा गर्भ धारण करण्याइतकी क्षमता जीर्ण झालेल्या समाजाच्या कुशीत आज घटकेला मुळीच नाही हे कटुसत्य त्यांना जाणवले. नवी पेरणी करण्यापूर्वी जमिनीतील तण काढून टाकणे जरुरीचे होते. लोकहितवादींसारखा खराखुरा धर्मनिष्ठ विज्ञानप्रेमी समाजचिंतक, आपल्या समाजाच्या सांकेतिक धर्मकल्पनांना त्यामुळेच जबरदस्त आव्हाने देऊ लागला. तर्ककठोर प्रहार करू लागला. हे प्रहार इतके अचूक, इतके मर्मभेदक होते की कर्मठपणाची धाबळी गुंडाळून बसलेल्या धार्मिकांना ते असह्य झाले. त्यांच्यापाशी उत्तर नव्हते.

लोकहितवादींचे धर्मचिंतन हा त्यांचा समाजविचाराचाच एक अंगभूत भाग आहे.सामाजिक जाणिवेचाच तो एक उत्तम आविष्कार आहे. त्यांना ' स्वजनद्रोही ', ' धर्मद्रोही ', ' संस्कृति-निंदक ' अशी बिरुदे बहाल करणाऱ्या टीकाकारांनी लोकहितवादींच्या धर्मचिंतनाची कक्षा किती व्यापक व दिशा कशी मार्गदर्शक आहे याचा कधीच विचार केलेला दिसत नाही. ' शतपत्रा'तून प्रथम त्यांचे धर्मविषयक विचार प्रकाशात आले. त्यांचे हे चिंतन उत्तरोत्तर विकसित होत गेलेले जाणवते. त्यांची धर्मदृष्टी उथळ असती तर त्यांच्या मतांचे साधार खंडन केव्हाच झाले असते. पण त्यांच्या दृष्टिकोणातली विधायकता, विचारातली तर्क-सिद्धता व वृत्तीतली सात्त्विकता यांमुळे त्यांचे धर्मासंबंधीचे विचार निश्चितच चिंतनीय वाटतात. न्या. रानडे आणि डॉ. भांडारकर यांचे धर्मचिंतन सर्वंकष आणि अत्यंत मूलभूत असून धर्माच्या सर्व बाजूंचा मूलग्राही विचार त्यांनी मांडला आहे. लोकहितवादींची तुलना या दोन थोर धर्ममीमांसकांशी करता येणार नाही.सामाजिक जीवनाच्या विकासाचा हेतू ठेवून त्या मर्यादेतच त्यांनी धर्मचर्चा केली आहे. धर्माचा संबंध इहजीविताशी कसा प्राधान्याने येतो व हे जीवित सुखकर, समृद्ध बनविण्यासाठी धर्मभावना कशी उपयुक्त आहे याचा विचार त्यांनी मुख्यतः मांडला. 'शतपत्रां' नंतर 'स्वाध्याय', 'सार्थ आश्वलायन गृह्यसूत्र' व 'आगमप्रकाश' या ग्रंथांतून धर्माची सर्व बाजूंनी चिकित्सा करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रार्थनासमाज आणि स्वामी दयानंद यांचा आर्यसमाज यांच्याशीही त्यांचा संबंध होता. या घटना हेच दर्शवितात की धर्मविषयक प्रश्नांसंबंधी त्यांच्या मनात सदैव

आस्था होती. इतिहास, समाजशास्त्र व कायदा यांच्या मूलतत्त्वांचे त्यांनी केलेले अध्ययन त्यांच्या धर्मचिंतनाला सहायक झाले.

इंग्रजी राजवटीमुळे आपल्या जुन्यापुराण्या धर्मकल्पनांना धक्के बसत होते. विज्ञानाचा प्रभाव जसजसा वाढू लागला तसतसा अंधश्रद्धेतून पोसला गेलेला धर्मविचार दुबळा ठराव अशी परिस्थिती उत्पन्न होऊ लागली. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनी हिंदू धर्मातील चालीरीतींवर निर्दय टीका करून विचारवंतांना धर्मशोधनाची काही प्रमाणात प्रेरणा दिली. बदलत्या काळाशी सुसंगत असा धर्मविचार अस्तित्वात आल्याशिवाय विसंगती दूर होणे अशक्य आहे, हे जाणवू लागले. त्यामुळेच लोकहितवादींनी धर्माचा संबंध पारलौकिक मूल्यांशी नसून आपल्या दैनंदिन जगण्याशी आहे, असे सांगितले. ते म्हणतात, 'आता जो धर्म चालला आहे, हा धर्म नव्हे; हा बेबंद, गोंधळ आहे. यात काही नाही. नीति नाहीशी झाली व धर्म बुडाला, मला तर धर्म कोठे दिसत नाही. म्हणून धर्माची स्थापना करण्याचा माझा यत्न आहे. व असे झाले असता पुष्कळ नीतिवान पुरुष होतील, व जे गैरनीतीने चालतील तेच भ्रष्ट म्हणावे. केवळ आचारांत जपून वागले, तर उपयोग नाही. आचार हे केवळ सोंग आहे. नीतीचे ज्ञान व्हावे, म्हणून आचार सांगितला आहे, हे तुम्हांस क्षणभर विचार केला तर कळेल '

कर्मकांडात, शुष्क आचारांत आणि विधीत, केवळ पूजाअर्चेत, होमहवनात आणि नानाप्रकारच्या व्रतवैकल्यांत गढून गेलेल्या भाबडया अज्ञानी लोकांचा त्यांनी अनेक ठिकाणी उपहास करावा हे स्वाभाविक वाटते. शेकडो वर्षे हे कर्मकांड चालूच आहे. उपयुक्ततेच्या दृष्टीनेही निरर्थक आचारपद्धतींचा त्यांना तिटकारा वाटत होता. धर्मसंस्था मनुष्यकृत असून तिचे उद्दिष्ट माणूस सुखी, समाधानी राहावा हेच असल्यामुळे या संस्थेत काळाच्या संदर्भात परिवर्तन झालेच पाहिजे असे त्यांनी स्पष्टपणे सांगितले आहे. 'कालेकरून शास्त्रास चालन पाहिजे.' हा त्यांच्या धर्मविचाराचा गाभा आहे असे समजण्यास प्रत्यवाय नाही. शंकराचार्यांनी ज्याप्रमाणे काही शास्त्रमते रद्द केली व काही चालू केली तसे करण्याचा अधिकार आपल्यालाही आहे असे म्हणून 'शास्त्रातील कायदे जरुर वरचेवर फिरले पाहिजेत' असे ते म्हणतात. जो धर्म विशिष्ट काळाची दखल घेत नाही, ज्याच्यात परिवर्तन पावण्याची क्षमता असत नाही. असा धर्म समाजाच्या प्रगतीला कसा सहायक होऊ शकेल? प्राचीन ऋषींना जर धर्मविषयक बदल करण्याचा अधिकार होता तर आजच्या विचारवंताला तो का असू नये अशांसारखे परखड सवाल त्यांनी अनेक स्थळी विचारले आहेत. धर्मकल्पना सामाजिक अभ्युदयाशी निगडित केल्यामुळे हा अभ्युदय प्रत्येक कालात भिन्नभिन्न मार्गांनी होऊ शकेल हे ओघानेच येते. समाजाच्या उत्कर्षासाठी, स्थैर्यासाठी आणि प्रगतीसाठी धर्माचे साहाय्य होणार नसेल तर असल्या धर्माला काहीच अर्थ नाही. 'धारणात्‌धर्म' ही कल्पना पूर्वीही होतीच. समाजाच्या धारणेचे, त्याच्या पोषणाचे कार्य धर्माने प्रत्येक काळात केलेच पाहिजे. केवळ परमार्थाशी गुजगोष्टी करून लौकिकाकडे पाठ फिरविणाऱ्या धर्माला कसलेच मूल्य नाही. जो बदलायला तयार नाही त्याच्यातली लोकाभिमुखता मावळून जाते

पण माणसे सनातन संकेतांना घट्ट चिकटून बसतात. जे जुने तेच सोने, तेच स्वीकार्य, तेच वंदनीय अशा भ्रमांमुळे धर्म म्हणजे जुनाट कल्पनांचे, निरुपयोगी उपचार विचारांनी भरलेल्या चमत्कारिक चिजांचे एक गाठोडे होऊन बसते. असले अर्थशून्य गाठोडे मानवी कल्याणासाठी उपयोगी पडण्याच्याऐवजी माणसाच्या प्रगतीला खीळ घालू लागले तर त्यात कसले नवल आहे ? जिवंत समाज हा आवश्यकतेनुसार बदलत असतो. बदल होतो याचाच अर्थ तो जिवंत असतो. बदलण्याची, गती घेण्याची प्रक्रिया थांबली आणि स्थैर्य लाभले की त्याच्या नष्ट होण्याच्या प्रक्रियेला सुरुवात झाली असेच समजावे. ज्या समाजांना ज्ञानाचा व संस्कृतीचा स्पर्श झालेला नसतो असे समाज पिढयान्‌पिढ्या केवळ स्थिर राहातात. पण सुसंस्कृत समाज नवनवीन ज्ञानाच्या संसर्गाने बदलत राहातात. याचा अर्थ ते चंचल असतात असा मात्र नव्हे. पण प्रगती आणि संक्रमण यांचा एक विशिष्ट संबंध असतो याची त्यांना जाणीव असते. लोकहितवादींनी जडमूढ झालेल्या निर्जीव धार्मिक आचारांवर बेगुमान हल्ले चढविले. या आचारातच धर्म सामावला आहे अशी समजूत असलेल्या व निरुपयोगी ग्रंथांतील शब्दांची पोपटपंची करीत बसलेल्या शास्त्री–पंडितांवर त्यांनी टीकेची धार धरली. लोकहितवादी खऱ्या धर्माचे उपासक असल्यामुळेच अशी स्पष्ट टीका करणे त्यांना आवश्यक वाटले. त्यांना अभिप्रेत असलेला धर्म व्यक्ती व समाज यांच्यातील उत्तम प्रवृत्तींना जोपासून त्यांचा विकास करणारा होता. लोकहितवादींनी भटीधर्मावर आणि कर्मावर यथेच्छ तोंडसुख घेतले हे खरे आहे. कारण कसलेही संशोधन न करणाऱ्या,कोणत्याही ग्रंथात वा शास्त्रात खऱ्या अर्थाने पारंगत नसणाऱ्या आणि आपल्या अर्थशून्य पाठांतराचा उपयोग भोळ्याभाबड्या यायकांना फसविण्यासाठीच ज्यांनी चालविला होता अशा भटाभिक्षुकांचे आणि तथाकथित धर्मपंडितांचे यथास्थित मुंडन करण्यावाचून लोकहितवादींना गत्यंतर नव्हते. खरे तर अशा प्रकारची टीका समाजातील अपप्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी जरूर असते. धर्म आणि समाज यांचा अविभाज्य संबंध ओळखणारा विवेकवंतच अशी टीका निस्पृहपणे करू शकतो. ही खडखडीत टीका कित्येकांच्या अंगावर उतली याचे कारण त्यांचे हितसंबंध त्या प्रकारच्या अन्यायी धर्मव्यवस्थेत गुंतलेले असावेत किंवा जुनाट ठरलेल्या पोथ्या पुराणांतील भाकड गोष्टींत आणि क्रियाकांडात त्यांची बुद्धी अडकून पडली असावी. लोकहितवादींच्या दृष्टीसमोर जो धर्म होता तो माणसाच्या शक्तीतून व बुद्धीतून उदयाला येऊ शकणाऱ्या नव्या युगाचा तेजस्वी धर्म होता.

धर्म म्हणजे निर्बुद्ध आचारांचा किंवा रिकामटेकड्या बुद्धीचा खेळ नव्हे. लोकहितवादी विकृत अशा धार्मिक संकेतांवर आवेगाने तुटून पडले हे बरोबरच होते. जे शास्त्रीयदृष्ट्या चुकीचे आहे व ज्याचा धर्माशी तिळमात्रही संबंध नाही, जे भ्रष्ट झाले आहे ते मोडून टाकण्यासाठी लोकहितवादींनी प्रयत्न करावा हे अत्यंत स्वाभाविक आहे. आजच्या काळातही शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झालेला असूनसुद्धा भ्रांतिष्ट धर्मविचारात बहुसंख्य माणसे आकंठ बुडालेली दिसतात. मनुष्याने चंद्रावरच्या भूमीवर आपल्या पराक्रमी पाऊलखुणा उमटविल्या. पण दुसरीकडे प्रचंड कुंभमेळे आजही भरतात. तीर्थांच्या ठिकाणी

स्नान करावे म्हणून लक्षावधी लोक घाणेरड्या पाण्यात बुचकळ्या मारतात. विश्व शांतीसाठी होमहवन करतात. यज्ञात हजारो मण धान्य जाळून टाकणारे धार्मिक लो दृष्टीस पडतात. एखाद्या फकिराच्या किंवा बाबाच्या नादी लागून गंडे, ताईत, दोरे यांच्य गळफासात अडकलेल्या लोकांची संख्या नगण्य नाही. हे चित्र विसाव्या शतकाचे आहे विज्ञान आता सुप्रतिष्ठित झालेले आहे असे आपण समजतो. शिक्षण आज खेड्यापाड्यांतू पोहोचलेले दिसते. एकोणिसाव्या शतकात लोकहितवादींना जे चित्र दिसले असेल किती धक्कादायक असेल याची आजच्या परिस्थितीवरून कल्पना केलेली बरी. सामाजिक आणि राष्ट्रीय प्रगतीचा सूक्ष्म विचार अखंडपणे करीत राहिलेल्या लोकहितवादींना दृश्य बदलायचे होते. त्यासाठी ते चिडत होते. आदळ आपट करीत होते. पण सामाजिक विकासाचा ध्यास लागलेले त्यांचे मन किती उत्कट भावनेने ओथंबलेले आहे याचे दर्श त्यांच्या धर्मविषयक लेखनातून होते.

## भिक्षुकांवरील टीकेचे रहस्य

लोकहितवादींनी भिक्षुकांवर आपल्या पुस्तकांतून ठिकठिकाणी जे कोरडे ओढले आहेत ते नीटपणे समजून घेतले गेले नाहीत. त्यांच्या टीकेचा रोख मुख्यतः कशावर आहे मूळ भूमिका कोणती आहे याचा विचार न करता, विपरीत दृष्टीने अनेकांनी लोकहित-वादींना अपराधी ठरविण्याचा विनोद केला आहे. भिक्षुकवर्गावर त्यांचा मुख्य आरोप हा आहे की हा वर्ग समाजाला उपयुक्त असे कोणतेही कार्य करीत नाही. अज्ञानी जनतेच्या अज्ञानाचा फायदा घेऊन स्वार्थ साधतो. धर्माचे मर्म त्याला समजले नाही. ते समजावून घेण्यासाठी आवश्यक असलेली बौद्धिक कुवत त्याच्यात नाही. चरितार्थासाठी तो आपला भार समाजावर टाकतो. ज्ञानविज्ञानाच्या किमयेतून नव्या समाजाची घडण होत असलेली पाहून तिला अपशकून करण्यासाठी तो आपले प्रतिगामी सामर्थ्य एकवटून उभा आहे. जुन्यापुराण्या रूढींचे, संकेतांचे पालूपद पुन्हा पुन्हा घोळवण्यापलीकडे त्याच्यात काहीच उरलेले नाही. खऱ्या धर्मभावना अखेर समाजहिताशी निगडित असतात याची जाणीव या वर्गाला नाही. या प्रकारचे कित्येक आक्षेप लोकहितवादींनी भिक्षुकवर्गावर घेतले आहेत. या वर्गाच्या जीवनक्रमाचे व विचारसरणीचे सूक्ष्म, सर्वांगदर्शन त्यांना बालपणापासून घडलेले असल्यामुळे त्यांची या वर्गावरील टीका अतिशयोक्त होती असे म्हणता येणार नाही. उलट ही टीका अत्यंत अचूक, नेमकी आहे.

## इतिहासदृष्टी आणि सुधारणा

भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि राजकीय इतिहासाचे चिंतन लोकहितवादींनी सातत्याने केले. इतिहासाच्या अभ्यासातून प्राचीन समाजरचनेची तत्त्वे, तत्कालीन विद्या, कला, राज्यव्यवस्था आणि लोकस्थिती यांचे आकलन होऊ शकते, हे जाणून ते इतिहासाच्या अभ्यासाकडे विशेषत्वाने वळले. भारतासारख्या एके काळी प्रगत झालेल्या देशाचा वास्तविक

दृष्टीने इतिहासच लिहिला गेला नाही, याची त्यांना विलक्षण खंत वाटली. इतिहासासंबंधी प्राथमिक आस्थाही भारतीयांत नाही असे त्यांना जाणवले. इतिहास लिहून ठेवणे आणि त्याची मीमांसा करणे राष्ट्रीय उत्कर्षाच्या दृष्टीने आवश्यक असते. लोकहितवादींना अव्वल इंग्रजीतला पहिला इतिहासचिंतक लेखक असे संबोधता येईल. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथात इतिहासग्रंथांची संख्या अधिक आहे. ' ऐतिहासिक गोष्टी भाग ३ रा ' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत ते म्हणतात, ' प्रत्येक पदार्थास व मनुष्यास इतिहास व आयुष्य ही आहेतच. त्यात जे पदार्थ व जी मनुष्ये चांगली त्यांचा इतिहास जाणण्यापासून आपले ज्ञान व आपले सद्गुण वृद्धिंगत होतात. परंतु आपल्या या देशांत बहुत काळापासून सर्व उत्तम व उपयुक्त गोष्टींचे विषयी अत्यंत औदासीन्य असलेले दिसते. व त्यापासून अल्पज्ञता, आलस्य व अविचार ह्या दुर्गुणांचे मनस्वी प्राबल्य झाले आहे.'

इतिहासज्ञानाचा व सुधारणेचा संबंध दृढ आहे असे मत त्यांनी मांडले. आपल्या देशाच्या पूर्वेतिहासाची जाणीव जनतेला व्हावी म्हणून त्यांनी सुमारे दहा इतिहास ग्रंथ लिहिले. लेखनाची साधने परिश्रमाने गोळा केली. त्यांच्या या लेखनात ' गुजराथ देशाचा इतिहास ', 'उदेपूरचा इतिहास' आणि ऐतिहासिक गोष्टींचे तीन भाग महत्त्वाचे आहेत. सर्वसाधारण वाचक आणि सुशिक्षित यांच्या ठायी इतिहासाविषयी आस्था व अभिरुची उत्पन्न व्हावी, ती वाढीला लागावी यासाठी लोकहितवादींनी केलेले हे प्रयत्न लक्षणीय आहेत. भारतातील निरनिराळ्या प्रांतांचा इतिहास त्यांनी लिहिला. ते ' इतिहासकार ' या संज्ञेला कदाचित पात्र ठरणार नाहीत पण इतिहासाचे अभ्यासक आणि चिंतक या नात्याने त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

## लोकहितवादींची शैली

स्वतंत्र विचार अभिनिवेशाने व्यक्त करण्याची ज्या लेखकाला ऊर्मी असते. त्याची शैली काही वैशिष्ट्यांनी संपन्न असते. ज्याचे विचार स्वतंत्र नसतात, परभृत असतात व ज्याला ते उत्कटपणाने सांगावेसे वाटत नाहीत अशा लेखकाला लिहिण्याची एक पद्धती असते. पण तिला ' शैली ' असे मात्र म्हणता येणार नाही. केवळ शब्दांच्या रचनेला शैली म्हणण्यात स्वारस्य नाही. त्या रचनेतून अर्थ आणि भावना, विचार व कल्पना यांचा स्पष्ट, प्रभावी परिणाम व्हावा. वाचकांना विचारानुभव देण्याची, अपेक्षित परिणाम साधण्याची शक्ती शब्दांत असावी लागते. जो भाव लेखकाच्या मनात आहे तो शब्दांतून संपूर्णपणे, यथार्थपणे प्रकट व्हावा लागतो. लिहिणारे लेखक अनेक आहेत. पण शैली असलेले लेखक मात्र कमी. ललितलेखनाची शैली व विचारप्रधान अशा निबंधलेखनाची शैली यात पुष्कळच अंतर आहे. ललित लेखकाला वाचकांच्या भावनेला आवाहन करायचे असते. पण विशिष्ट विचारांचे खंडन अथवा प्रतिपादन करणाऱ्या लेखकाचे आवाहन वाचकांच्या बुद्धीला असते. विचारप्रतिपादन सुसूत्र व सुव्यवस्थित करावे लागते. पुष्कळांची अशी समजूत आहे की ललित साहित्य हेच केवळ शैलीशी निगडित असते. कथा, कादंबरीला, काव्य, नाटकाला भाषेच्या विशिष्ट रचनेमुळे आकर्षकत्व प्राप्त होते. शैलीचा विचार

ललित साहित्याच्या संदर्भातच केला जाणे चुकीचे आहे. विचारप्रधान वाङ्मय लिहिणारे काही लेखक मराठीत 'शैलीकार' म्हणून प्रसिद्ध आहेत. वस्तुनिष्ठ स्वरूपाचे विचार मांडतानाही लेखकाच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव त्याच्या अभिव्यक्तीतून जाणवत राहतो. लोकहितवादींच्या आग्रही, आक्रमक, तर्कशुद्ध विचारांनी त्यांचे व्यक्तिमत्त्व आणि वाङ्मय बनले आहे.या विशिष्ट व्यक्तिमत्वाचे दर्शन त्यांच्या साहित्यातून व्हावे हे साहजिकच आहे. विष्णुशास्त्री चिपळूणकर, आगरकर, फुले, शि. म. परांजपे, टिळक, सावरकर वगैरे प्रत्येक निबंधकाराच्या लेखनातून त्याचे स्वतःचे असे आगळे दर्शन घडत असते.

## आद्य निबंधकार

अव्वल इंग्रजीत गद्यलेखनाला वेगवान चालना मिळाली. काव्याचे माध्यम भावनांच्या अभिव्यक्तीसाठी सोयीचे असले तरी गद्य मात्र नानाविध विषयांवरील विचारप्रकटनासाठी अधिक सुकर व समर्थ असते.एकोणिसाव्या शतकात नवनवीन विचार,संकल्पना आणि ज्ञान यांचा प्रवाह पश्चिमेकडून जोराने वाहत आला. नव्या विचारांचे वितरण करण्यासाठी कित्येक लेखकांनी गद्यलेखनाला हात घातला. इ. स. १८३२ च्या सुमारास बाळशास्त्री जांभेकरांचे 'दर्पण' पत्र निघाले. त्यापाठोपाठ इतर अनेक नियतकालिके निर्माण झाली. सामाजिक स्थित्यंतराची जाणीव झालेला नवीन लेखकांचा वर्ग निबंधासारखे गद्यलेखन उत्साहाने करू लागला. त्यातूनच निबंध नावाचा वाङ्मयप्रकार मराठीत उदयाला आला असे म्हणता येईल. दादोबा पांडुरंग, हरी केशवजी आणि बाबा पद्मनजी यांनी काही प्रमाणात निबंध-सदृश लेखन केले आहे. पण निबंधाचे सर्व घटक त्यांच्या लेखनात दिसत नाहीत. एखाद्या विषयाचे सुव्यवस्थित, साधकबाधक विवेचन करून त्यातील मध्यवर्ती विचाराचे स्वतंत्र दृष्टीने समर्थन अथवा प्रतिपादन करणे हा निबंधाचा प्रमुख हेतू असतो. प्रतिपादनाशी एक सूत्रबद्ध विचार असायला हवा. या दृष्टिकोणातून विचार केला तर 'आद्य निबंधकार' अशी संज्ञा लोकहितवादींना देता येईल. ते केवळ आद्य निबंधकारच आहेत असे नव्हे, तर मराठी गद्यशैलीचे आधुनिक काळातील ( अव्वल इंग्रजीतील ) प्रवर्तक आहेत असे विधान करण्यात औचित्य आहे. मराठी निबंधाला व गद्य वाङ्मयाला ओज आणि तेज देऊन त्याला विशिष्ट वळण लावायला लोकहितवादींची लेखणी कारणीभूत झाली. पण ज्या टीकाकारांना या लेखकाचे सामर्थ्य यथार्थपणे जाणवले नाही त्यांनी विष्णुशास्त्री चिपळूण-कर हेच मराठी गद्याचे पहिले शिल्पकार, मराठी निबंधाचे आद्य जनक वगैरे विधाने केली आहेत. चिपळूणकरांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादी विचारांनी दिपलेल्या टीकाकारांची ही विधाने वस्तुस्थितीला मात्र सोडून आहेत. चिपळूणकरांनी निबंधाचा विकास घडवून आणला. तो अधिक सुप्रतिष्ठित केला यात वाद नाही. पण निबंधाचे जनकत्व त्यांच्याकडे जाऊ शकत नाही, हे वाङ्मयाचा इतिहास समजून घेणाऱ्या अभ्यासकाला मान्य करावे लागेल. या संदर्भात व्यासंगी समीक्षक प्रा. श्री. के. क्षीरसागरांचे मत उल्लेखनीय आहे. ते म्हणतात,

'वाङ्मयामागे जो प्रशस्त व प्रौढ हेतू असायला हवा तो हेतू धरून लिहिलेले गद्य लोकहितवादींनीच अर्वाचीन काळात प्रथम लिहिले म्हणून लोकहितवादी हे अर्वाचीन गद्याचे जनक व मराठी निबंधाचे जनक होत.' समाज व राष्ट्रजीवनाशी संबंधित असलेल्या अनेक महत्त्वपूर्ण विषयांवर उत्कटतेने लिहून परिवर्तनाची चळवळ सुरु करणारा, नवयुगाचा अर्थ समजून घेणारा, नवी दृष्टी देणारा हा आद्य 'विचारवंत निबंधकार आहे, हे विधान ऐतिहासिक दृष्ट्या निर्दोष आहे. लोकहितवादींच्या कोणत्याही निबंधाचा हेतू मनोरंजन हा नाही. लालित्याच्या मोहाने किंवा केवळ कोटीक्रम करण्यासाठी, अथवा बुद्धिविलासासाठी त्यांनी काही लिहिले नाही. विचारांचे घणाघाती प्रतिपादन आणि लोकजागृती ही त्यांच्या साहित्याची प्रधान वैशिष्टचे. चिपळूणकरांची 'निबंधमाला' इ. स. १८७४ मध्ये उदयाला आली. पण इ. स. १८४८ ते १८५० या दोन वर्षांत 'शतपत्रे' प्रकाशित झाली. त्यानंतर 'इंदुप्रकाश' 'वृत्तवैभव' इत्यादी नियतकालिकांतून लोकहितवादींचे निबंधलेखन सतत चालू होते. १८६६ मध्ये 'निबंधसंग्रह' हा त्यांचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या घटना लक्षात घेतल्यावर मराठी निबंधाची जडणघडण करणाऱ्या लेखकांत लोकहितवादी हे अग्रगण्य ठरतात यात संदेह नाही.

लोकहितवादींची एक स्वतंत्र शैली आहे. प्रत्येक विचारवंत आणि लेखक आपल्या स्वतःच्या विशिष्ट शैलीने लिहीत असतो. 'विशिष्टा पदरचना रीतिः' अशी रीतीची म्हणजे शैलीची एक व्याख्या. पण ही व्याख्या मर्यादित आहे. शैली किंवा रीती केवळ शब्दसंबद्ध असत नाही. तिच्यात शब्दरचनेपेक्षा अधिक महत्त्वाचे गुणधर्म असतात.एखादा लेखक विशिष्ट शब्द विशिष्ट अशा पद्धतीनेच का योजतो याचा संबंध त्याच्या मनोवृत्तीशी, अभिरुचीशी व व्यक्तिमत्वाशी असतो. लेखकाच्या भावविचारांचा गंध घेऊन त्याचे शब्द प्रकट झालेले असतात. तशा प्रकारची शब्दरचना इतर लेखकांना साधणार नाही व साधली तरी ती कृत्रिम आहे हे जाणवल्याशिवाय राहाणार नाही. आगरकर, टिळक, परांजपे व सावरकर या निबंधकारांच्या शैलीचे अनुकरण होऊनसुद्धा त्यांच्यासारखे जिवंत, जोमदार, काव्यात्म, ओजस्वी लेखन इतरांना करता आले नाही. लोकहितवादींची नक्कल दुसरा लेखक वठवू शकला नाही. चिपळूणकरांच्या 'निबंधमाले'त जो शब्दांचा थाटदारपणा आहे तसा अन्य निबंधकाराला जमला नाही. याचाच अर्थ लेखनशैलींचे सूत्र शब्दरचनेशी नव्हे, तर भाववृत्तीशी जोडलेले असते. साऱ्याच वृत्तिवैशिष्टचांतून शब्दकळा उदयाला येते. आशय समान असला तरी प्रत्येक लेखकाच्या अभिव्यक्तीची निरनिराळी वैशिष्टचे व्यक्त होतात. आशयाकडे जाणाऱ्या शब्दवाटा वेगवेगळ्या वळणाच्या असतात. त्यामुळेच लेखक आपला विचार 'आपल्याच' पद्धतीने मांडीत असतो. ज्या शब्दरचनेवर जिवंत मनाची प्रभावी मुद्रा उमटते ती रचना म्हणजे शैली, अशी व्याख्या करण्यास प्रत्यवाय नाही. अनेक वर्षे लिहीत असलेल्या लेखकाच्या विचारभावनांत आणि लेखनशैलीतही बदल घडून येणे स्वाभाविकच असते. काही लेखक आपल्या लेखनाच्या पूर्वकाळात अलंकारप्रचुर, नाटकी किंवा आडंबरयुक्त शब्दांतून लिहितात. पण पुढे विचारांना स्थिरता व पक्वता आल्यावर लेखनातले अकारण नाट्य नाहीसे होते. जीवनातल्या

अनुभवाशी व्यक्तिमत्त्वाचा संबंध येतो.आणि व्यक्तिमत्त्व हेच आशय व अभिव्यक्ती यांच्या मुळाशी असते. ' The style is the man ' ही इंग्रजी साहित्यशास्त्रातली शैलीविषयक कल्पना या दृष्टीने संयुक्तिक वाटते. शैलीवरून लेखक-कवीच्या व्यक्तिमत्त्वाचा शोध घेणे शक्य होते.

' शतपत्रे ' म्हणजे लोकहितवादींच्या आक्रमक विचारांचा स्फोटक आविष्कार आहे. समाजाला त्याची स्थितीगती स्पष्टपणे समजावून सांगण्यासाठी, त्याची कानउघाडणी करून त्याला नवजीवनाचा विचार विवरून सांगण्यासाठी हे पत्रात्मक निबंध लिहिले गेले. कोणताही विचार लेखकाने सरळपणे निःसंदिग्ध शब्दांतून ठासून सांगितला आहे. मुख्य विषयाला एकदम हात घालून तो विषय संक्षेपाने पण परिपूर्णतेने मांडला आहे. आडवळणाने लक्षणेने सांगण्यापेक्षा वाच्यार्थानेच लिहिले आहे. ' शतपत्रा ' तल्या भाषेचे स्वरूप ग्रांथिक नाही. वाक्यरचना मुद्दाम केली असे कुठेच वाटत नाही. ही शैली अंतर्बाह्य सहज वाटते. काही लेखक शब्दांची आणि वाक्यांची जुळणी करून लिहितात असे वाटते. ' शतपत्रां ' तील निबंध मात्र पूर्णपणे विचारनिष्ठ आहेत. हा विचार कल्पनांच्या व प्रतीकांच्या साहाय्याने फुलवावा आणि तो अधिक आकर्षक पद्धतीने वाचकांपुढे ठेवावा असे लोकहितवादींना वाटत नाही. अधिक विस्ताराची, कल्पना फुलवण्याची आवश्यकताच त्यांना वाटली नाही. उत्कट विचाराचे उचंबळते रूप प्रकट झाले की आपल्या लेखनाचे मूळ उद्दिष्ट साध्य झाले असे लेखकाला वाटते. लोकहितवादींना हिंदुसमाजाच्या वैचारिक गुलामगिरीचा, अज्ञानाचा, भ्रांतिष्ट कल्पनांचा आणि औदासीन्याचा कमालीचा राग आला आहे. या समाजाचे वर्तमान सुधारावे आणि त्याचे भविष्य उत्तम असावे ही तीव्र आत्मीय भावना त्यांच्या मनात उचंबळत होती. त्यामुळेच लोकांच्या अज्ञानाचा व लोकाग्रणी म्हणविणाऱ्या तथाकथित पंडितांचा ' शतपत्रां ' तून त्यांनी फटकळपणे धिक्कार केला आहे. यावेळी त्यांची भाषाशैली एक प्रकारच्या दाहक सामर्थ्याने कडाडणाऱ्या विजेसारखी उद्दीपक झालेली दिसते. जे वाटते ते सडेतोडपणे झडझडून सांगणे हा या शैलीचा एक विशेष आहे. लेखकाच्या दृष्टीने शब्दाचा अर्थ हा सर्वाधिक महत्त्वाचा आहे. ते म्हणतात, ' अर्थ म्हणजे शब्दांमध्ये जसा जीव. तो जर नाही तर ते शब्द प्रेतवत आहेत. ' जो अर्थ आणि विचार लोकांना आपण देणार आहोत तो त्यांना रुचण्यासारखा नाही म्हणूनच तो त्यांच्या माथी मारलाच पाहिजे अशी त्यांची भूमिका असल्यामुळे ' शतपत्रा ' तल्या भाषेला आक्रमक, काहीसे उद्धट वळण लागले आहे. लोकांचा अनुनय करणारी सौम्य, आर्जवी, मवाळ भाषा लोकहितवादी लिहू शकत नाहीत. कारण ते समाजाच्या थंड, संथ प्रवृत्तीवर चिडलेले आहेत. ज्याला बंडखोरीचा विचार मांडायचा असतो तो सौम्य शैलीतून कसा लिहिणार ? शब्दांतला जळजळीतपणा बंडखोरीची उष्णता निर्माण करतो. पेटलेले मन संयत शब्दांतून कसे प्रकट होईल ? लोकहितवादींची भाषा फटकळ व कठोर आहे ही टीका करण्यात काही अर्थ नाही. त्यांची भाषा आर्जवी नाही हे त्यांच्या उद्दिष्टाशी सुसंगत आहे. विचारहीनता, रूढीशरणता, ध्येयशून्यता, निष्क्रियता वगैरे अपप्रवृत्तींनी बुजबुजलेल्या समाजावर तुटून पडताना भाषेत उग्रता व आक्रमकता येणे अपरिहार्य आहे. आगरकर

आणि फुले यांचीही भाषा अशीच आहे. शैलीतली तीव्रता अखेर त्यांच्या विचाराशी निगडित आहे. त्यामुळेच लोकहितवादींची शैली ओबडधोबड आहे, ती सफाईदार नाही, शब्दसौंदर्याचे तिला भानच नसते, या टीकेत अर्थ नाही. आपले लेखन शब्द दृष्टचा आकर्षक व्हावे असा विचार लोकहितवादींच्या मनात येणेच शक्य नव्हते. तसा विचार आला असता, तर उलट त्यांच्या प्रांजल, उत्कट अर्थपूर्ण शैलीची घडी बिघडली असती आणि ती कृत्रिम बनली असती. आपल्या लेखनाच्या मूळ हेतूशी विसंगत अशी त्यांची भाषा नसल्यामुळे या शैलीला एक प्रकारचे नैसर्गिक सौष्ठव आहे. उदाहरणार्थ, पुढील उतारा पाहावा. प्रस्तुत उतारा याच 'निवडक लोकहितवादी' या संग्रहातील आहे. विधवा स्त्रियांच्या दु:स्थितीबद्दल व त्यांच्यावर होणाऱ्या अन्यायाबद्दल लेखक म्हणतो,

'मला वाटते की, असे निर्दय, मूर्ख आणि आंधळे लोक या चारी खंड पृथ्वीत नसतील आणि कोणत्या तरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेत झाला नसेल! बायका अगदी गरीब; त्यांस अबला असे म्हणतात आणि त्यांची अवस्था अशी करतात. हे कोठे फेडतील? आजपर्यंत बायका किती जाळिल्या आहेत? आणि अजून जिवंत किती जाळितात? याविषयी कोणी दुष्टाभिमान धरून एकदम सर्वजण एकत्र होऊन हे कार्य करावे. तुम्ही न कराल तर सर्व लोक कधी तरी करतीलच; यात संशय नाही. परंतु यश घ्याल तर बरे आहे. इतके दिवस तुम्ही स्त्रियांस या देशांत दु:खांत घातल्या; अजून तरी त्यांस तुमच्या ब्राह्मणी पाशापासून सोडवावे'.

'निर्दय','मूर्ख','आंधळे' वगैरे शब्द मनातली चीड व्यक्त करण्यासाठी लोकहितवादींनी योजले. पुनर्विवाह नावाच्या लेखात 'बोडकी' 'हजामत' असेही शब्द आलेले आहेत. यापेक्षा त्याच अर्थांचे सौम्य व शिष्ट शब्द लेखकाला माहीत नव्हते काय? पण शिष्ट शब्द मनातला क्षोभ विदारकपणाने व्यक्त करू शकत नाहीत. या काहीशा ग्राम्य वाटणाऱ्या शब्दांना एक प्रकारचा भाजून काढणारा गुणधर्म आहे. बोडकीऐवजी विधवा आणि हजामतऐवजी क्षौर हे शब्द अर्थ दृष्टचा भिन्न नसले तरी जो परिणाम लेखकाला साधायचा आहे तो वरील संकृतप्रचुर शब्दांतून मुळीच साधला नसता. अन्यायावर चिडून उठलेल्या लेखकाने अपेक्षित उद्दिष्टाला अनुसरून सार्थ भाषा योजणे आवश्यक असते. मिळमिळीत शब्दांपेक्षा जळजळीत शब्द हृदयाला भिडतात. बुद्धीला केवळ सुखद गुदगुदल्या करणारे गुळगुळीत शब्द क्रांतिकारकाच्या कामाचे नसतात. जुनाट स्थिती उखडून टाकण्यासाठी त्याला रस्त्यावरच यावे लागते.अशा वेळी शालशिष्टांच्या दिवाणखान्यातले शोभिवंत शब्द कसे चालतील ? लोकहितवादींच्या भाषेतला जिवंतपणा हा त्यांच्या जिवंत, क्रांतिकारक विचारांचा स्पष्ट व निधडा आविष्कार आहे. ठाशीव शब्दांतून आपला आशय ते प्रभावाने प्रकट करतात. 'शतपत्रा'त आलेल्या लोकहितवादींच्या काही ग्राम्य शब्दांवर ज्या महाभागांनी टीका केली त्यांच्या वाङ्मयाभिरुचीबद्दलच शंका घ्यावी लागेल. तुकाराम आणि रामदास या शब्दप्रभू कवींच्या भाषेतून काही ठिकाणी जाणवणारा शिवराळपणा हा त्यांच्या

सामाजिक हितबुद्धीचाच उमाळा आहे. आणि तेथील ग्राम्य वाटणारे शब्दही अपरिहार्य आहेत, हे लक्षात घेतले पाहिजे.

भावना आणि विचार यथार्थतेने प्रकट करण्याची एक रीती म्हणजे शैली. शब्द जेव्हा अर्थाचा आणि भावनेचा पाठलाग करीत व्यक्त होतात तेव्हा ते शब्द सार्थ, प्रत्ययपूर्ण आहेत की नाही हेच महत्त्वाचे असते. Proper words in proper places makes the true definition of style हे मत सत्मुक्तिक वाटते.

लोकहितवादींच्या शैलीचे पुढील गुणविशेष लक्षणीय आहेत.

१. ही अर्थानुगामी शैली आहे. शब्दानुगामी किंवा शब्दप्रधान नाही. शब्द-सौष्ठवापेक्षा अर्थ निर्दोष व प्रत्ययकारी असावा ही मुख्य भूमिका.

२. बोली भाषेची सहजता आणि प्रसाद यांचा आढळ अधिकांशाने होतो. वाचकांशी लेखक मनःपूर्वक ' संवाद ' करीत आहे याची जाणीव होते. तो कधी रागावतो, केव्हा चिडतो पण समाजाविषयी त्यांच्या अंतःकरणात गाढ सहानुभूती आहे, हे स्पष्ट होते.

३. पंडिताच्या भाषेतला क्लिष्टपणा आणि आलंकारिकता यांचा येथे अभाव आहे. साधारण शिक्षिताला समजेल अशी दैनंदिन व्यवहारातलीच ही भाषा आहे.

४. ही भाषा वक्तृत्वगुणांनी युक्त आहे. पण तिचे आवाहन वाचकांच्या भावने-पेक्षा विचारांनाच मुख्यतः आहे.

५. लेखकाच्या मनातील नानाविध विचार व भावना पेलून धरण्याची, प्रकट करण्याची एक अभिजात शक्ती तिच्यात सामावलेली आहे.

६. क्रोध, क्षोभ, आपुलकी, अभिमान, आदर वगैरे भावनांचे दर्शनही या शैलीने अनेक स्थळी उत्तम रीतीने घडविले आहे. भावदर्शनासाठी उपहास, उपरोध, संबोधने वगैरेचा वापर केला आहे.

७. लोकहितवादींच्या विशिष्ट व्यक्तिमत्त्वाचे चित्र या शैलीतून स्पष्ट दिसते. वस्तुनिष्ठ विचार मांडतानाही त्यांचे व्यक्तिमत्त्व जाणवत राहते.

८. विद्यापीठपूर्व युगातली ही भाषा सरळ आहे. मराठी वळणाची आहे. ' शतपत्रे ' आणि 'निबंधसंग्रह' यांतील भाषेवर संस्कृताचा प्रभाव नाही. मराठी वळणाने लिहिणारा निबंधकार असे लोकहितवादींविषयी म्हणता येते. चिपळूणकर, आगरकर,

परांजपे, सावरकर यांच्या भाषाशैलीवर संस्कृत भाषेचा विशेषच प्रभाव पडला. मराठी वळण त्यामुळे सुटले.

९. लोकहितवादी दीर्घकाल लिहीत राहिलेले लेखक. त्यांच्या शैलीवर काळ आणि परिस्थिती व समकालीन निबंधकार, ग्रंथकार यांचा परिणाम होत गेला. त्यांच्याही भाषेवर पुढील काळात संस्कृतचा काही अंशी प्रभाव जाणवतो. 'शतपत्रे' व 'निबंधसंग्रह' यांतली बोलीभाषा पुढे अन्य ग्रंथ लिहिताना ग्रांथिकी वळणाची झाली.

१०. स्फुट निबंधाची व ग्रंथांची शैली यांत फरक पडणे अपरिहार्यच आहे. 'स्वाध्याय', 'आगमप्रकाश' व इतिहासग्रंथ यांचे लेखन लोकहितवादींनी केले, त्यांची शैली निबंधांहून निराळी आहे. निबंध आणि प्रबंध यांच्यातले अंतर लक्षात घेता दोहोंची अभिव्यक्ती एकाच पद्धतीची असणे शक्य नाही. प्रस्तुत संग्रहात 'ग्रामरचना' या प्रबंधातील उतारा घेतला आहे. तो वाचल्यावर लोकहितवादींच्या शतपत्रांची व त्यांच्या प्रबंधांची धाटणी कशी भिन्न आहे ते लक्षात येईल.

शतपत्रांचे लेखन करताना साधी, सरळ, मराठी वळणाची रचना करणारे लोकहितवादी पुढील कालखंडात आपल्या ग्रंथांतून संस्कृतनिष्ठ शब्दरचना करू लागले. समासप्रचुर शब्द योजू लागले. भाषा अधिक प्रौढपणाने लिहू लागले याचे आश्चर्य वाटते. पण १८४८ ते ५० या काळातली साधी शैली पुढे अधिक भरघोस झाली याचे कारण पुढील काळात अनेक सुशिक्षित ग्रंथकारांनी नवनवीन ग्रंथांची निर्मिती करून मराठी गद्य शैलीला वेगळे वळण लावण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादी हे त्यांतीलच प्रमुख ग्रंथकार आहेत.पण तरीही असे वाटते की 'निबंधसंग्रह' प्रसिद्ध होईपर्यंत म्हणजे इ.स. १८६६ पर्यंत लोकहितवादींची लेखनशैली जितकी सुबोध, ठसकेबाज, वक्तृत्वपूर्ण व परिणामकारक होती तितकी त्यांच्या नंतरच्या लेखनात दिसत नाही. 'शतपत्रां'तून जितक्या आक्रमक वृत्तीने आणि जळजळीतपणे आपले विचार व्यक्त केले तसे त्यांनी नंतर लिहिलेल्या साहित्यात तितक्या उग्रतेने व्यक्त झाले नाहीत. अभिव्यक्तीतली आक्रमकता कमी झाली याचा अर्थ त्यांच्या ठायी असलेली नवरचनेची रग ओसरली असे मात्र म्हणता येणार नाही. पण एक प्रकारचा आव्हान देणारा, तुटून पडणारा, शाब्दिक अभिनिवेश लोकहितवादींच्या अन्य लेखनात आढळत नाही.संस्कृत शब्दांचा भरणा १८६६ पूर्वीच्या लेखनात दिसत नाही. पुढे मात्र संस्कृत शब्द अधिकांशाने येऊ लागले. 'ग्रामरचना' या पुस्तकाची प्रस्तावना हे याचे एक उदाहरण.'नीचोच्यावस्था, 'भगवतपूजन', 'निःस्तोष','संज्ञानोदय', 'पुनरागमनप्रसंग' 'सिद्धिप्रद'असे पंडिती वळणाचे जाडजूड सामासिक शब्द लोकहितवादींच्या लिहिण्यात येऊ लागले. पूर्वीची प्रत्ययकारिता मात्र कमी झाली. असे असूनही लोकहितवादींची शैली दुर्बोध कृत्रिम कधीच झाली नाही. पूर्वीचा आवेग उरला नाही. पण वैचारिक सामर्थ्य प्रकट करण्यात त्यांची शब्दकळा कधीही अपुरी पडली नाही. 'ऐतिहासिक गोष्टी' लिहिताना आणि इतिहासग्रंथ लिहिताना प्रसंगविशेषी ही शैली लालित्याकडे विशेष झुकली असेही दिसते.

लेखकाच्या वयाचा आणि शैलीचा काही संबंध असू शकतो काय, असा प्रश्न उपस्थित करता येईल. तारुण्यातली शब्दभरारी कदाचित प्रौढावस्थेत व वार्धक्यात पूर्वीइतकी दमदार राहणार नाही. विचारांना परिपक्वता आल्यानंतर आपले मनोगत उत्कट शब्दांतून व्यक्त करण्यापेक्षा संयमित रीतीनेच व्यक्त करावे, असेही लेखकाला वाटणे शक्य आहे. शैलीत होणारे फेरबदल हे लेखकाच्या वृत्तीतलेच केवळ असतात असे नसून, वाचकवर्गात होणाऱ्या बदलाचाही तो एक भाग असतो.

लोकहितवादींच्या शैलीचा विचार करताना मराठी गद्यशैलीचे प्रवर्तन त्यांनी केले, हा निष्कर्ष महत्त्वाचा आहे. इ. स. १८४८ ते १८९२ पर्यंत सातत्याने, नानाविध विषयांवर चिंतन आणि लेखन करीत राहिलेला दुसरा ग्रंथकार एकोणिसाव्या शतकात लोकहितवादींशिवाय कोणी नाही. 'शतपत्रां'नी सामाजिक क्रांतीबरोबरच वाङ्मयीन क्रांतीही घडवून आणली. 'शब्दालंकार', 'पुष्पवन', 'सुभाषिते आणि बोधवचने' यांसारखी साहित्यरसिकांना वाङ्मयीन आनंद देणारी पुस्तकेही त्यांनी मनःपूर्वक लिहिली. साहित्याच्या क्षेत्रातील या लेखकाचे कार्य अविस्मरणीय स्वरूपाचे आहे.

## लोकहितवादींचे टीकाकार

क्रांतिकारक विचारांचा पुरस्कार करून सामाजिक जीवन बदलू इच्छिणाऱ्या विचारवंताला नेहमीच वादळी टीकेला तोंड द्यावे लागते. सर्वच समाजसुधारक विरोधी टीकेचे लक्ष्य बनतात. लोकहितवादींनाही या अग्निदिव्यातून अर्थातच जावे लागले. आपल्या कालखंडात ज्या जाणिवा आणि प्रेरणा ते लोकांना देत होते त्या नवीन, क्रांतिकारक होत्या. ज्या निष्ठा लोकांनी आपल्या हृदयाशी पिढ्यान्‌पिढ्या आपुलकीने आणि अज्ञानाने कवटाळल्या होत्या त्यांच्यावर लोकहितवादी मुक्तपणे प्रहार करीत राहिले. नव्या मूल्यांची वाट चोखाळीत राहिले. अशा परिस्थितीत परंपरावाद्यांनी त्यांच्याविरुद्ध टीकेचे व निंदेचे मोहोळ उठविले तर त्यात आश्चर्य कसले? आजसुद्धा लोकहितवादींच्या विचारातील मर्म ज्यांना कळत नाही असे महाभाग त्या विचारावर आणि लोकहितवादींवर चुकीची टीका-टिप्पणी करताना आढळतात. विचारावर टीका होणे ही एक स्वागतार्ह घटना आहे. कोणाचेही विचार निमूटपणाने मान्य करणे हे खरे तर बुद्धिहीनतेचेच द्योतक आहे. या दृष्टीने पाहिल्यास कोणत्याही समाजसुधारकाच्या विचाराला विरोध करणारा वर्ग निर्माण होणे ही घटना विचारमंथनास पोषक अशी आहे. एकोणिसाव्या शतकातील कित्येक लेखक आणि नवजीवनवादी विचारवंत आजही अनेकांना वादग्रस्त वाटतात. लोकहितवादींप्रमाणेच महात्मा फुले, आगरकर यांच्यावरही भरपूर टीका झाली. दुःख टीकेचे नाही. टीकेचे मूळ जेव्हा प्रामाणिक, तात्त्विक शंकेत असते; तेव्हा ती टीका सहायक होते. पण आपल्याकडे अशा प्रकारची टीका जवळ जवळ दुर्मिळ आहे. विचारांचे खंडन करण्याऐवजी व्यक्तीलाच खंडित करण्याची व तिचे चारित्र्यहनन करण्याची, निंदेत रस घेण्याची, चिखलफेक करण्याची

प्रवृत्ती विशेषत्वाने आढळते. वैचारिक स्वरूपाची तत्त्वशोधक टीका 'बुद्धिवादी' महाराष्ट्रात कमी आढळते. लोकहितवादींचे टीकाकार मराठीतले मान्यवर लेखक आहेत. पण त्यांची टीका मात्र फारशी संयुक्तिक, अभ्यासपूर्ण वाटत नाही, याचा खेद होतो.

'निबंधमाला 'कार विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी लोकहितवादींवर अत्यंत प्रखर टीका केली. हे टीकासत्र सुमारे वर्षभर चालू होते. मालेच्या ६४ व्या अंकापासून ७६ व्या अंका–पर्यंत या एकाच विषयावर चिपळूणकरांनी लिहिले आहे. याचा अर्थ लोकहितवादींची विचारधारा खंडित केलीच पाहिजे, अशी आकांक्षा त्यांच्या मनात तीव्रपणे निर्माण झाली. होती. विष्णुशास्त्री चिपळूणकर आणि त्यांची ' निबंधमाला ' यांना मराठी साहित्यात विशेष महत्त्वाचे स्थान असून त्यांच्यामुळे महाराष्ट्रात अभिमानी, आक्रमक संस्कृतिनिष्ठ राष्ट्रवाद पोसला गेला. चिपळूणकर हे स्वधर्म, स्वभाषा व स्वसंस्कृती यांचे आत्यंतिक अभिमानी. त्यामुळे त्यांच्या लेखनाला अभिनिवेशाचे, आत्मगौरवाचे, भावनात्मकतेचे मुख्य अधिष्ठान लाभले आहे. ते लढाऊ वृत्तीचे पत्रकार होते. त्यांची लेखणी ज्वलंत होती. विरोधी व्यक्तींचे व विचारांचे विदारक वाभाडे काढणारा त्यांच्यासारखा दुसरा भाषाप्रभू टीकाकार त्या काळात नव्हता. पण ते काही बाबतीत दुराग्रही होते. त्यांच्या-टीकेचा विषय झालेल्या विचारधारेचे सूक्ष्म दर्शन त्यांनी कधीच घेतले नाही. वरवर वाचताना जे मत बनले अथवा बनविले ते कायम त्यांच्या मनात रुजून गेले. त्यांच्या विषयी आत्यंतिक आदर असलेल्या ग. त्र्यं माडखोलकरांनी म्हटले आहे, '– – – – भांडारकर, रानडे, सार्वजनिक काका, दयानंद सरस्वती, ज्योतिराव फुले प्रभृती त्या काळातल्या थोर कार्यकर्त्यांनी धर्म आणि समाज यांच्या शोधनाचे आणि सुधारणेचे जे उपक्रम मोठ्या धैर्याने केले, त्यांचे मर्म आणि महत्त्व त्यांच्या बुद्धीला फारसे आकलन होऊ शकले नाही, माडखोलकर हे चिपळूणकरसंप्रदायी लेखक आहेत. पण त्यांनाही असे जाणवते की चिपळूणकर हे 'स्थूलबुद्धी' (त्यांचा शब्द) आहेत. 'विचाराच्या विकासाचे नाविन्य किंवा नवनव्या प्रमेयाच्या चिंतनाने प्रतिपादनाला येणारी गाढता, विशालता आणि प्रगतिपरता' चिपळूणकरांत विशेष आढळत नाही असे माडखोलकरांनीच म्हटले आहे, ते खरे आहे. चिपळूणकर राष्ट्रवादी असले तरी सुधारणावादी नव्हते. आपली संस्कृती सर्वश्रेष्ठ आहे, आपली परंपरा सर्वथैव गौरवास्पद आहे, अशी त्यांची दृढ समजूत झाली होती. आपली मते नव्या काळाच्या पार्श्वभूमीवर तपासून घ्यावीत असे त्यांना वाटले नाही. उलट 'आमच्या देशाची स्थिती' या आपल्या दीर्घ निबंधात 'देशस्थिती उत्तम आहे देशाच्या प्रकृतीत कोणताही बिघाड झालेला नाही' अशा अर्थाची भोंगळ विधाने केली आहेत. आपल्या विचारसरणीशी लोकहितवादी, म. फुले, स्वामी दयानंद यांचे विचार विरोधी आहेत, असे पाहिल्यावर त्या विरोधी विचारांची आमूलाग्र चिकित्सा करण्याच्या ऐवजी केवळ उपहासप्रचुर, वक्रोक्तिपूर्ण, विपर्यस्त विधाने करून ते लोकहितवादी वगैरेंची केवळ कुचाळी करण्यात धन्यता मानतात. त्यामुळेच चिपळूणकरांची टीका म्हणजे त्यांच्या निंदाप्रिय लेखणीचा चुरचुरीत आणि चटकदार आविष्कार आहे. यापलीकडे त्या टीकेत फारसा अर्थ नाही. चिपळूणकरांनी घेतलेल्या आक्षेपांचे स्वरुप संक्षेपाने असे आहे.

१. लोकहितवादींचे लेखन व त्यातील विचार कालबाह्य आहेत.त्यात नावीन्य नाही. म्हणून ते प्रेरणा देऊ शकत नाहीत.

२. लोकहितवादींनी आपल्या देशाच्या अवनतीबद्दल केलेली कारणमीमांसा संपूर्णतया चुकीची आहे.

३. लोकहितवादी इंग्रजांचे स्तुतिपाठक आहेत. व आपल्या संस्कृतीचे निंदक आहेत. त्यांची विचारसरणी पराभूत वृत्तीची आहे. ते स्वकीयांचा तेजोभंग करतात.

चिपळूणकरांच्या या सर्व आक्षेपांची साधार मीमांसा लोकहितवादींच्या प्रगतिवादी विचारधारेची प्रमुख वैशिष्टये विवरून सांगताना झालेली असल्यामुळे या चिपळूणकरी आक्षेपांना पुन्हा येथे उत्तर देण्याचे कारण नाही. शेकडो वर्षे अज्ञानाच्या कोशात गुरफटलेल्या दुराग्रही, परंपरावाद्यांवर प्रहार करून त्यांच्या मनात नवे विचार पेरण्यासाठी लोकहितवादींनी जी उत्कट आणि काहीशी उद्धत धडपड केली ती आवश्यकच होती. तेजोभंग झाला अशी ओरड करणे हास्यास्पद आहे. तेजच अस्तित्वात नसल्यावर त्याचा भंग कसा होणार ? लोकहितवादींचे वाङ्मय व त्यातील विचार नवजीवनासाठी आजही आवश्यक आहेत. ते कालबाह्य झालेले नाहीत.कारण ते विचार बुद्धिवादाला पोषक, प्रयत्न आणि पुरुषार्थ जागवणारे, व्यक्तिस्वातंत्र्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचा पुरस्कार करणारे असल्यामुळे त्यांच्यावर कालपक्व असा शिक्का ठोकण्यात काहीच स्वारस्य नाही. चिपळूणकरांची लोकहितवादींवरील टीका मूळ मुद्याला सोडून केवळ कुचेष्टेच्या वाटेने गेलेली आहे. मराठी वृत्तपत्रीय टीकेला व्यक्तिनिंदात्मक. विकृत वळण लावण्याचे श्रेय विष्णुशास्त्री चिपळूणकरांना म्हणजेच 'मराठी भाषेच्या शिवाजी'ला द्यावे लागेल यात संशय नाही.

ग. त्र्यं. माडखोलकरांनीही असे विधान केले आहे की, "चिपळूणकरांचा विनोद ---- कुचाळीवरच बहुधा फोफावत गेलेला असल्यामुळे प्रथम जरी तो कितीही हास्यमधुर वाटला तरी पुढे त्यांत मौज वाटेनाशी होते. ----- तत्कालीन काही व्यक्तींचा, संस्थांचा व वर्गांचा दंभस्फोट करताना चिपळूणकरांनी जाणूनबुजून कठोर आणि निंदाव्यंजक टीकेचे गरळ 'माले'त ओतलेले आहे.

श्री. के. क्षीरसागरांनीही या संदर्भात आपले मत व्यक्त करताना म्हटले आहे, 'दयानंद व लोकहितवादी यांच्यावर विष्णुशास्त्रींनी केलेली टीका त्यांच्या सर्व टीकांत अधिक अन्यायाची आहे.'

डॉ. पु. ग. सहस्त्रबुद्धे, डॉ. अ. ना. देशपांडे या अभ्यासकांनी 'शतपत्रां'तील भाषापद्धतीवर टीका केली आहे. ही भाषा शिवराळ आहे व अशा भाषेमुळे लोक सुधारणार

माहीत,असे आपले मत त्यांनी मांडले आहे. या प्रकारच्या आक्षेपाला याच प्रस्तावनेत उत्तर दिले आहे. पुनरूक्ती करण्याचे कारण नाही. ल. रा. पांगारकर, ग. त्र्यं. माडखोलकर वगैरे परंपरानिष्ठ, राष्ट्रवादी लेखकांनी अशाच प्रकारचे काही आक्षेप लोकहितवादींच्या विचारप्रणालीवर घेतले आहेत.

चिपळूणकरांसारख्या मातबर निबंधकाराने वर्षभर अखंड टीकासत्र चालू ठेवून लोकहितवादींची प्रतिमा धूसर बनविली. ज्यांच्या वाचनात केवळ 'निबंधमाला'च आली अशा बहुसंख्य वाचकांनी लोकहितवादींच्या स्वतंत्र वाङ्मयाची आणि त्यातून व्यक्त होणाऱ्या प्रागतिक विचारांची दखल घेतली नाही. सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या मनात, लोकहितवादींची जी मूर्ती आकाराला आली, तिचे रूपरंग 'निबंधमाले' तील टीकेनेच निश्चित केले होते. महाराष्ट्राचा हा मानकरी दीर्घकाळ उपेक्षेच्या अंधारातच राहिला. प्रा. गं. बा. सरदार, प्रा. श्री. के. क्षीरसागर वगैरे समीक्षकांनी लोकहितवादींचे नवे मूल्यमापन केले. नवनिर्मितीसाठी आवश्यक असलेली तात्त्विक भूमिका सिद्ध करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या एकोणिसाव्या शतकातील या लेखकाच्या विचारांचा तटस्थपणाने अभ्यास केला पाहिजे.

## आचार-विचारातील विसंगती ?

लोकहितवादींचे विचार ज्वलंत बुद्धिवादी असले, तरी त्यांचे दैनंदिन आचार मात्र कर्मकांडात गुरफटलेले होते, अशी एक टीका त्यांच्यावर करण्यात येते. एका विधवाविवाहाला उपस्थित राहाण्याचे त्यांनी धैर्य दाखवले नाही म्हणून त्यांच्यावर 'विविधज्ञानविस्तार'पत्राने कडक टीका केली होती. ज्या क्रियाकांडाचा, शुष्क आचारांचा त्यांनी अनेकवेळां उपहास केला त्या आचारात ते स्वतःच रमले होते, असाही एक आक्षेप आहे. म. फुल्यांची ध्येयनिष्ठा प्रखर व निष्कलंक होती आणि त्यांचे आचार सर्वस्वी त्यांच्या विचारांशी सुसंगत होते. तशी सुसंगती लोकहितवादींच्या जीवनात दिसत नाही, अशा अर्थाचे आक्षेप घेण्यात आले आहेत. लोकहितवादींच्या साहित्यातून व्यक्त होणाऱ्या विचारांचा अभ्यास करताना त्यांचे वैयक्तिक जीवन लक्षात घेण्याचे कारण नाही. पण ते लक्षात घ्यायचे म्हटले, तरी ते संपूर्णपणाने ज्ञात असले पाहिजे. विश्वसनीय माहिती मिळाली पाहिजे. एका विधवाविवाहाची निमंत्रणपत्रिका त्यांच्या सहीने निघाली, पण त्या विवाहाला ते उपस्थित राहू शकले नाहीत, याचे कारण त्यांच्या चरित्रकारांनी दिले आहे. लोकहितवादींच्या व्याह्यांनी धमकी देऊन सांगितले की, तुम्ही त्या लग्नाला हजर राहिलात तर तुमची मुलगी कायमची माहेरी पाठवून देईन, सासरी परत घेणार नाही. या प्रसंगी ' To be or not to be ' अशी विलक्षण द्विधा स्थिती झाली असणे शक्य आहे. या भयाने जर लोकहितवादी त्या विवाह समारंभाला उपस्थित राहिले नसतील तर ते 'क्षम्य' ठरेल. पण 'समर्थनीय' ठरणार नाही. आपल्या विचारांसाठी सर्व प्रकारचा स्वार्थत्याग करण्याची अदम्य प्रवृत्ती क्रांतिकारकात असावी लागते. कृतीच्या पातळीवर

लोकहितवादींना सर्वार्थांनी उतरता आले नाही इतकाच या घटनेचा अर्थ आहे. विरोधकांनी नेमक्या मर्मावर बोट ठेवून त्यांच्यावर अतिशयोक्त आक्षेप घेतला. लोकहितवादी तत्वद्रोही किंवा दांभिक आहेत, असा यातून कोणी अर्थ काढला, तर तो निखालस अन्यायाचा ठरेल. इंग्लंडला फायनान्स कमिटीसमोर साक्ष देण्यासाठी बोलावले असताना 'धर्मांच्या अडचणी'चे कारण देऊन ते गेले नाहीत, असाही एक आक्षेप घेतला जातो. या संदर्भात लोकहितवादींचे वर्तन अपेक्षाभंग करणारे आहे, असेच म्हणावे लागेल. ''त्यांचे आचरण शंभर नंबरी तत्त्वनिष्ठेच्या कसोटीला उतरत नाही म्हणून बुद्ध, ख्रिस्त, मार्क्स, लेनिन, गांधी, यांच्यासारख्या युगप्रवर्तक महापुरूषांच्या मालिकेत त्यांना स्थान नाही. परंतु त्यांना जे सत्य व हितावह वाटले ते त्यांनी स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीशी प्रतारणा न करता निर्भीडपणे बोलून दाखविले आणि तदनुसार आचरण ठेवण्याचा कसोशीने प्रयत्न केला. दोन वेळां बहिष्कार सोसला. लोकनिंदेचे आघात सहन केले,तरी देखील आपला मतप्रचार अव्याहत चालू ठेवला.

'The spirit indeed is willing, but the flesh is weak' हा न्याय थोरामोठ्यांच्या चरित्रालाही लागू आहेच. तेव्हा एखाददुसऱ्या प्रसंगी मनुष्य तत्त्वच्युत झाला म्हणजे तेवढ्यावरूनच त्याची सर्व मते अप्रामाणिकपणाची आहेत असे मानणे हे मनुष्यस्वभावाच्या अज्ञानाचेच निदर्शक होय.'' प्रा. गं. बा. सरदार यांनी व्यक्त केलेले हे मत चिंतनीय आहे. व्यक्तिगत जीवनातील आचारांची चिकित्सा करीत बसण्यापेक्षा लोकहितवादींच्या प्रत्यक्ष साहित्यातून कोणते विचार प्रकट झाले आहेत,हे पाहाणेच अधिक महत्त्वाचे आहे. एखाद्दुसऱ्या अपवादभूत प्रसंगाचे भांडवल करून एखाद्या विचारवंताला बदनाम करण्याचा प्रयत्न करणे अप्रस्तुत आहे. ध्येयवादी समाजसुधारक अखेर एक माणूसच असतो. त्याचेही पाय मातीचेच असतात, हे लक्षात ठेवले पाहिजे. व्यक्तीच्या काही मर्यादा असतात तर परिस्थितीच्याही काही मर्यादा असतात. विशिष्ट प्रसंगी लोकहितवादी धैर्याने वागले नाहीत अशी टीका करताना काळ आणि परिस्थिती यांचे स्वरूप समजून घेतले पाहिजे. लोकहितवादींच्या व्यक्तिमत्वाचे आणि कार्याचे मूल्यमापन त्यांच्या समग्र साहित्याचा व जीवनाचा संदर्भ ध्यानात घेऊनच करणे संयुक्तिक आहे.

## आजच्या संदर्भात लोकहितवादी

गेल्या शतकात लोकहितवादींनी आपले झंझावाती विचार मांडले. पण आजही ते प्रेरक आहेत. समाज प्रबोधनाची चळवळ त्यांनी गतिमान केली. त्यांची दृष्टी त्यांच्या काळापुरतीच मर्यादित नव्हती. पुरोहितशाहीविरूद्ध बंड, बुद्धिवादाचा पुरस्कार विज्ञान निष्ठा रूजविण्याची धडपड, धर्म आणि ऐहिक जीवन यांचा सांधा जोडण्याचा प्रयत्न, स्त्रीस्वातंत्र्याची व शिक्षणाची केलेली घोषणा, स्वदेशी आणि स्वावलंबनाचा प्रचार, पुरोगामी मूल्यांच्या स्वीकाराचा आग्रह राष्ट्रजीवन पुरुषार्थवादी प्रवृत्तीने आकाराला आणण्याचा दमदार विचार ही लोकहितवादींच्या साहित्याची प्रधान वैशिष्टये लक्षात

घेतली म्हणजे त्यांची विचारधारा आजही आपल्याला कित्येक समस्या सोडविण्यासाठी मार्गदर्शन करू शकते यात शंका नाही. जेथे लोकहितवादी जुने वाटत असतील तेथे त्यांना अवश्य बाजूला सारावे. पण त्यांच्या काळातील काही प्रश्न कालबाह्य झाले असले, तरी ते प्रश्न सोडविण्यासाठी ज्या दृष्टिकोणाचा आणि विचारधारेचा त्यांनी अंगीकार केला होता त्यांची आपल्याला कोणत्याही काळात आवश्यकता पडेल. सामाजिक उत्थानाच्या सर्वांगीण विचारसरणीचा एकोणिसाव्या शतकातला जिवंत, उत्कट आविष्कार म्हणजे लोकहितवादींचे विविध स्वरूपाचे साहित्य आहे. आजच्या अभ्यासकाला हे साहित्य अनेक अर्थांनी स्फुरण देऊ शकेल असा विश्वास वाटतो.

● ●

# हिंदु लोकांचा आळशी स्वभाव

पूर्वी इंग्रज लोक रूमचे बादशहाचे अमलांत होते, त्या वेळेस हे फार दरिद्री व हल्लीं हिंदु लोक दिसतात याहूनही मूर्ख होते. यांस राज्यनीति, कायदा, शास्त्र, नेमधर्म कांही चांगले नव्हते. व ते रूमचे लोक इंग्रजांची बेटें घेऊन जेव्हा तेथें राज्य करीत होते, तेव्हां गुलाम खरेदी करण्याची चाल होती; परंतु रूम शहरांत गुलाम विकावयास आणले म्हणजे लोकांनीं पुसावें कीं, ‘ हा मुलगा कोणाचा आहे ?’ आणि जर विकणारानें सांगितलें कीं, हा इंग्रजांचे बेटांतील, तर घेणार म्हणत, ‘ अरे छीः ! फुकट दिला तरी नको. ’ कारण इंग्रज लोक जसे मूर्ख व कुबुद्ध आहेत, तसे कोणत्याही देशांतील लोक नाहींत, असें ते लोक म्हणत होते. अशा गोष्टी ग्रंथांतरीं वाचितों.

परंतु आतां इंग्रज लोकांकडे पाहिलें, म्हणजे ईश्वराचा मोठा चमत्कारिक खेळ आहे, असें वाटतें. दोन हजार वर्षांपूर्वी इतक्या मूर्खपणाचे स्थितींत जे लोक होते, ते हल्लीं केवढे शहाणपणाचे स्थितींत आहेत ? व हिंदुस्थानांतील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते, त्यांची अवस्था काय झाली आहे ? तेव्हां या दोन्ही गोष्टींचा शोध करणें अवश्य आहे. असें असून आपले लोक किती भ्रांतींत आहेत ?

दिवसेंदिवस आपले लोकांतील थोरपणा जात चालला आहे. शहाणपण पूर्वीच गेलें; नंतर द्रव्यही गेलें. म्हण आहे कीं, ‘ आधीं शहाणपण जातें, मग भांडवल जातें. ’ तसेंच या लोकांचें झालें आहे. अद्यापि या लोकांस कोण कोठें आहे, पृथ्वीवर रचना कशी आहे, किती प्रकारचे लोक आहेत व राष्ट्रें किती आहेत, याविषयीं कांहीं कळत नाहीं. लिहिणें आणि वाचणें झालें म्हणजे मोठी विद्या झाली, असा सांप्रत काळचा घाट आहे; परंतु लिहिणें व वाचणें हें विद्येचें द्वार मात्र आहे, विद्या नव्हे, विद्या पुढेंच आहे. परंतु लोकांच्या समजुती इतक्या आखूड झाल्या आहेत की, ते अंधेरांत गर्क आहेत.

इंग्रज लोक इकडे येऊन राज्य करितात व त्यांजकडे आमचे लोक तोडांत बोटें घालून चमत्कारानें पहात राहतात. आणि खावयास मिळत नाहीं, म्हणून चरफडतात. ऐश्वर्य गेलें, असें त्यास वाटतें; परंतु याचें कारण काय ? आपले देशाची अवस्था अशी कशानें झाली ? इंग्रज कोठून आले ? त्यांचें राज्य कसें आहे व आपण चांगलें होण्यास

काय उपाय करावा ? या गोष्टींचा विचार कोणी करीत नाहींत. केवळ जनावरांप्रमाणें मारले तर लागतें, परंतु पुढें बुद्धि चालत नाहीं. तद्वत् हे लोक शुद्ध बैल व विचारशून्य आहेत, गर्वानें आपले ब्राह्मण लोक जळतात व इतर लोकांस तर ज्ञानच नाहीं. व हें असें होणें, तरी ब्राह्मणांचेंच कपट आहे, तेव्हां आतां इतकाच उपाय आहे कीं, यांणीं आपले राजे इंग्रज यांचा शोध करावा व त्यांचे देशांत जावयाचें नाहीं, वगैरे ज्या समजुती आहेत, त्या सोडाव्या, म्हणजे त्यांचें शहाणपण यांस येईल.

एक गोष्ट आठवली आहे, ती अशी – कोणी एक ब्राह्मण आतांचे मूर्ख ब्राह्मणां-सारिखा होता. त्याचे घरांत एक चोर शिरून दागिने उचलून घेऊन चालला; तों ब्राह्मणाचे बायकोनें त्यास पाहून, नवऱ्यास हाक मारून सांगितलें कीं, ' चोरास धरा. ' तेव्हां तो म्हणू लागला कीं, " मी ब्राह्मण आहें, व चोराची जात कोण आहे, याचा मला ठिकाण नाहीं. तेव्हां मी त्यास शिवूं कसा ? त्याणे कांहीं नेलें तरी चिंता नाही. " असे म्हणून त्या ब्राह्मणाने आपले सर्वस्व गमावलें, व चोराने तें भाषण ऐकून सावधगिरीनें अधिक लाभ करून घेतला.

आतां पहा, या भटाप्रमाणे आमचे लोकांची अवस्था आहे. परदेशचे लोक येऊन इकडे राज्य करितात. आणि हिंदु लोकांचे सारथी ब्राह्मण लोक, ते म्हणतात कीं, आमचा धर्म अरबांचे व इंग्रजांचे देशांत जावयाचा नाहीं; व त्याविषयीं आम्ही मनांत आणणार नाहीं. सारांश, ते अपवित्र असें म्हणून परकी लोकांस मात्र स्वस्थ-पणें राज्य करावयास सांपडतें व आमचा सर्व व्यापार त्यांचे हस्तगत झाला आहे. जर आपले लोक विलायतेंत जाऊन तेथील माहितगारी करून घेते, तर आतां जसें इंग्रजांस भितात तसें, न भिते. सामान्यत: इंग्रज लोक इकडे आले, म्हणजे स्वर्गाहून इंद्र खालीं आल्याप्रमाणें लोकांस वाटून, त्यांजविषयीं भय उत्पन्न होतें. असा हिंदु लोकांचा गरीब स्वभाव; यामुळें ते हतवीर्य झाले आहेत. त्यांच्यामध्यें सामर्थ्य नाहीं व मूर्खपणा फार वाढला आहे.

सगळे लोक आपले ठिकाणीं शहाणें म्हणवितात; परंतु यांस इंजिनिअर इंग्रज पाहिजेत, प्रोफेसर इंग्रज पाहिजेत, डॉक्टर इंग्रजच पाहिजेत, जड्ज व बारिस्टर तेच पाहिजेत, सर्व कारखाने त्यांचेच हातीं. आमचे लोक त्यांचे दास्यत्व करण्यास देखील योग्य नाहीत. हें काय ? पांचशें वर्षे मुसलमानांची गुलामगिरी केली व आतां शंभर-दीडशें वर्षे इंग्रजांची गुलामगिरी करितात, परंतु अद्यापि आमचे लोकांस कांहीं ठाऊक झालें नाहीं.

तथापि इंग्रजांनीं आपली विद्या प्रगट केली, हा त्यांचा मोठा उपकार आहे. व येणेंकरून लोक शहाणे होतील. हिंदु लोक इतके मूर्ख आहेत कीं, इराण, तुर्कस्तान व अरबस्तान येथून मुसलमान लोक हिंदुस्थानांत येऊन घरें बांधून राहिले, परंतु हिंदु लोकांस त्यांचें कांही वर्तमान ठाऊक नाहीं व हिंदु दुसरे एखादे मुलखांत गेले आहेत,

असें कधीं आढळणार नाहीं. परमुलखाचे लोक येऊन हिंदु लोकांचें हातचें हिसकावून घेऊन खातात व मानेवर जोखड ठेवून राज्य करितात; पण हे इतकें सर्व सहन करून आहेत. यांच्यामध्यें बळ, शूरत्व किंवा शक्ति कमी आहे असें नाहीं; पहिल्यानें याणीं सर्व हिंदुस्थान जिंकले होतें; परंतु यांस राखावयाचें शहाणपण नाहीं; याजमुळे हे गमावून बसले.

शास्त्रांत अटक, गंड व पापनाशी इतक्या नद्यांविषयीं असें लिहिलें आहे कीं, पापनाशी नदीस स्पर्श करूं नये; गंडकींत चालूं नये; व अटक नदी उतरून पलीकडे जाऊं नये व याचा हेतु इतकाच दिसतो की, त्या नद्या अवघड व जरा भयंकर आहेत. याजमुळे कोणी धीर करून त्यांत जाईल आणि मरेल, तर तें न व्हावे. यास्तव त्याणीं हे शास्त्रार्थ लिहिले; परंतु दुसरे मुलखांत जाऊं नये, असा त्याचा अर्थ नसेल असें वाटतें. आणि जर कदाचित असला, तर ती शास्त्राज्ञा मानण्याची कांहीं जरूर नाहीं. जा वेळेस तें शास्त्र झालें, त्या वेळेस दुसरे लोक इकडे आले नवतें. याजमुळें तें शास्त्र योग्य, पण आतांचे अवस्थेंत तें मानून मूर्खाप्रमाणें उगेच बसणे, याचें कारण काय?

जेव्हां हीं मतें मोडून हिंदु लोक परदेशांत जाण्यास सिद्ध होऊन मूर्खपणाचे कायद्यांतून खुले होतील, तेव्हांच त्यांचे हातून कांहीं पराक्रम होईल. युगपरत्वें करून शास्त्रही फिरलें,असें समजलें पाहिजे. आणि सर्व शास्त्रांचा मतलब हाच कीं, धर्म रक्षावा. सिंधु नदीपलीकडे जाऊं नये, हें कशाकरितां ? धर्म रक्षावा आणि म्लेंच्छांचा स्पर्श होऊं नये म्हणून; परंतु म्लेंच्छच इकडे आले, तेव्हां आपण पलीकडे जाण्याचे कामीं शास्त्र एकीकडे ठेवलें, तरी चिंता नाही, असें मला वाटतें.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. १९२/जुलाई १८४८ )

२

# इंग्रजी विद्या

पुणें शहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली, तेव्हां लोकांची अशी समजूत होती कीं, इंग्रजांचा स्पर्श झाला तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली,

तर ब्राह्मणपणा जातो. याजमुळें त्या समई रॉबर्टसनसाहेब कलेक्टर यांनीं आर्जवानें गृहस्थांची मुलें थोडींशी जमविलीं. नंतर कांहीं दिवसांनीं पुष्कळ लोकांच्या समजुती बदलल्या आणि खुषीनें मुलें पाठवूं लागले; परंतु पहिल्या समजुतीचे ब्राह्मण अद्यापि बहुत आहेत. त्यांच्यानें लोकांस इंग्रजी शिकण्यापासून तर बंद करवत नाही; परंतु आपल्या मंडळींत ते असें बोलतात कीं, जे इंग्रजी शिकले आहेत, ते नास्तिक, निर्दय, अधर्मी, अमर्याद आहेत. परंतु त्यांची योग्यता पाहिली, तर केवळ मूर्खांचे शिरोमणि आहेत. जरी त्यांस लिहितां वाचतां येतें, तरी ते पंडित नाहींत. त्यांची समजूत इतकी क्षुद्र आहे कीं, लिहिणे आणि वाचणें ही तमाम विद्या, यापुढें त्यांस कांहीं कळत नाहीं. तत्रापि त्यांस वाटतें कीं, आम्ही सर्वज्ञ आहों. आतां असे गर्विष्ठ मूर्ख लोक आहेत, त्यांना उत्तर देणें योग्य नाहीं. कारण कीं, शुद्ध वेडयांशीं वाद करणें निष्फळ आहे. जरी माझें म्हणणें असें नाहीं कीं, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान्, असें मी म्हणत नाहीं. कारण कीं, जे कुलकर्णी असतात ते लिहितात. त्यांस पंडित कोणीं म्हणावें ? तसेंच जे केवळ ' रायटर ' च आहेत त्यांस विद्वान् म्हणणें अयोग्य आहे; परतु जांनीं विद्येचें रहस्य जाणलें आहे व बहुश्रुत आहेत, त्यांचा मात्र पक्ष आम्ही घेतों. आणि आम्हांस ठाऊक आहे कीं, एक इंग्रजींतील विद्वान् आणि शंभर संस्कृतांतील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित् होणार नाहींत. भटांचें वर्णन आम्हीं एके ठिकाणीं केलें आहे. हल्लीं कारकुनांचें थोडेंसें करितो.

ब्राह्मण लोक कारकुनीचा धंदा फार करितात, आणि गृहस्थ म्हणवितात. परंतु वास्तविक पाहिलें, तर त्यांस कळतें काय ? संध्येचीं अक्षरें साळुंखीसारखी किंवा राघूसारखीं पाठ करितात. मोडीचें लिहितात, वाचतात. साधारण कामकाज कारकुनीचें करतां येतें. परंतु हे मोठे प्रतीचे मजूरदार, जसे सुतार, न्हावी, धोबी तसेच ब्राह्मण कारकून; यांत त्यांचा विद्वानपणा कांहींच नाहीं. हजारों कारकून आहेत; परंतु एकानें एक ग्रंथ तरी जन्मादारभ्य रचला आहे ? शहाणपणाची गोष्ट बोलण्यास एक क्षण घालविला आहे ? असे शुंभ जे आहेत, त्यांची योग्यता किती ? जानें चार शास्त्रें अध्ययन केलीं आहेत, त्यांचीदेखील योग्यता इंग्रजींतील पंडिताशीं बरोबर नाहीं. कारण कीं, मुळीं आधीं संस्कृत भाषेत ग्रंथ आहेत किती ? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते, हा नेम आहे. सर्व पुस्तकें जर जमा केलीं, तर फार झालें तर एक कोठडी भरेल. तेव्हां तितकीं वाचलीं किंवा अवलोकन केलीं, त्याचें शहाणपण सारखें कसें होईल ? जितकें बीज तितकें पीक. जानें पायलीभर दाणे पेरले आणि जानें खंडीभर पेरले, त्याचें उत्पन्न सारखें कसें होईल ?

इंग्रजीमध्यें तर कोटयवधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतांत नाहींत. चौदा विद्या आणि चौसष्ट कला इतकी संख्या जेव्हां हिंदु लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हां व्यासवाल्मीकि होते, तेव्हां इतकी गणना झाली आहे; परंतु इंग्रजींत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारोंच

ग्रंथ आहेत. संस्कृतांत कांहीं विद्या इतक्या सूक्ष्म आहेत कीं, एक विद्येवर एक ग्रंथ, जसा युद्धविद्येवर धनुर्वेद. दुसरा ग्रंथ नाहीं व धनुर्वेदही नाहींसा झाला. कोणी वाचीन म्हणेल, तर मिळावयाचा नाहीं. आणि इंग्रजींत जसें म्हटलें तसे आहेत.

याचें कारण संस्कृतांतील विद्येचे चाहाणारे ब्राह्मण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षे झाली. तेव्हांपासून ब्राह्मण मूर्ख झाले. विद्या म्हणजे काय, हें देखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाहीं आणि जसे हिंदु लोक व्यासाचे वेळीं विद्याप्रवीण होते, तद्वत् इंग्रज आतां आहेत. त्यांचें चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले. व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदु लोकांचे ग्रंथ जेवणावळीचे आहेत. तर इंग्रजी पंडित तो संस्कृतांतील पंडितांशीं सारखा कसा होईल ? अशी जेव्हां पंडितांची गति, तेव्हां कारकून आणि भट हे काय पदार्थ ? हे तर कसपटें दिसतात. जो इंग्रजींतील पंडित आहे, त्यास किती विद्येचें ज्ञान असतें ? त्याची समजूत केवढी विस्तीर्ण ? आणि त्याचा विद्वानपणा केवढा ? त्याची योग्यता लोक समजत नाहींत. त्यास दूषण लावितात. इंग्रजींतील विद्वानांची अशी योग्यता आहे की, त्यास कोणताही विषय सांगा, त्याविशीं तो ग्रंथ लिहूं शकेल. कोणत्याही विषयावर बोलूं शकेल. जें जें या पृथ्वीत आणि आकाशांत आहे, तें सर्व त्यांस ठाकठीक दिसतें. आणि चंद्र फिरतो, याचें आश्चर्य त्यांस वाटत नाहीं. दगड वरती उडविला, म्हणजे खालीं पडतो, याचेंदेखील कारण त्यांस माहीत आहे. तात्पर्य त्यांस कोणत्याही विषयीं आश्चर्य वाटत नाहीं.

कारकून हे भटाचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदु लोकांमध्ये विद्येचें मान इतकें कमी आहे कीं, यांस विद्या म्हणजे काय, हें अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणें झाल्यास म्हणतात कीं, अमका केवढा शहाणा ! पत्र लिहितो ! मजकूर जुळून लिहितो. अक्षर चांगलें सुंदर. आतां हें कांहीं विद्वानाचें वर्णन झालें नाहीं, विद्वान् म्हणजे काय, जाची बुद्धी विशाल, जानें नवीन ग्रंथ ऋषींसारखे लिहावे, ते विद्वान्. हल्लीं गृहस्थास यांतील कांहीं ज्ञान नाहीं. त्यांस धर्म म्हणजे काय, याचा अर्थ पांच हजार कारकून गोळा केले आणि पुसला तर सांगू शकणार नाहींत व संध्या कशाकरितां करितात, हेंही कोणास ठाऊक नाहीं असे अंधारांत जे लोक आहेत, त्यांस विद्येचें मूळ काय ठाऊक ?

इंग्रजी विद्वान् पूर्वी हिंदुस्थानांत एक असता, तर राज्य न जातें. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले, म्हणूनच हें राज्य बुडालें. जर विद्या पहिल्यासारखी असती, तर हिंदु लोकांची अशी अवस्था न होती; परंतु हीं जनावरें पाहिजे तेथें दोरीनें बांधावीं अशीं गरीब, म्हणून असें झालें. पुढें जरी हिंदु लोकांचें कल्याण झालें, तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल, यांत संशय नाहीं. कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिगत झाली म्हणजे हिंदु लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाहीं. हल्लींचे गृहस्थ व इंग्रजी शिकणारे विद्वान यांचें वैमनस्य असण्याचें कारण असें आहे कीं, त्यांचीं यांचीं मतें मिळत नाहींत. कारकुनास असें वाटतें कीं, अंगरखा घालणें व गंध लावणें व आणीचा जोडा घालणें, हाच आमचा धर्म. तसें इंग्रजी विद्वानास वाटत नाहीं. कारण कीं, हे ज्ञानी

आहेत. तेव्हां त्यांचीं मतें वास्तविक आहेत. ते म्हणतील डावे हातानें गरिबास पैसा दिला, तरी सारखाच, उजवे हातानें दिला तरी सारखाच; परंतु कारकुनास वाटतें कीं, जा हल्लीं चाली आहेत, तोच धर्म. चाली व रीति आणि धर्म यांचा भेद त्यांस कळत नाहीं. चालीस व रीतीस व धर्मास सारखेंच मानतात; कारण ते अक्षरशत्रु आहेत. व चालीविरुद्ध कोणी बोलेल, तर त्यास नास्तिक म्हणतात. नास्तिक म्हणजे काय, हेंही त्यांस कळत नाहीं; परंतु ऐकीव शब्द माहीत आहेत. तसेंच निर्दय म्हणण्याचें कारण असें आहे कीं, गरिबास व विद्वानास धर्म करावा, तें जाऊन दुसऱ्यास देणें यास धर्म समजतात. शहाणे आहेत ते तसें करीत नाहींत. म्हणून त्यांस असें वाटतें कीं, हे निर्दय आहेत. जो विद्वान् आहे, तो गरिबास धर्म करितो; परंतु ब्राह्मण, कारकून व भट यांच्या अशा समजुती आहेत कीं, दांडग्या व मूर्ख भटास धर्म करावा. अधर्मी म्हणतात कीं, यांचें कारण असें आहे कीं, धर्म म्हणजे काय, हें यांस ठाऊक नाहीं, म्हणून असें म्हणतात.

वास्तविक पाहिलें, तर इंग्रजी विद्वानाप्रमाणें मला धार्मिष्ट कोणीच दिसत नाहीं. तो अनुभवेंकरून व ज्ञानेंकरून ईश्वराचें प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे असें त्यांस वाटतें. त्यास सर्वत्र ईश्वर दिसतो. ते त्याचे भजनांत तत्पर असतात, व जें कर्म करितात, तें सर्व ईश्वरार्पण करितात व त्याची स्तुति करून कायावाचामनेंकरून ईश्वरास भजतात. कारण कीं, इंग्रजींत ईश्वराविषयीं अनेक ग्रंथ आहेत. व इतर देशांतील जें सर्व ईश्वरी ज्ञान आहे तें सर्व इंग्रजींत आहे, व त्या ग्रंथांचे तर्जुमे त्या भाषेंत आहेत. याजमुळें शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजींत आहे. आणि अमर्याद म्हणण्याचें कारण असें आहे कीं, हिंदु लोकांची त्यांत कारकून व भट यांची मुख्यत्वेंकरून अशी चाल आहे कीं, गुलामगिरी करावी. तोंडदेखलें बोलावें. खुशामत करावी दुसऱ्यास बुडवावें. उगाच या–बसा इत्यादि फसविण्याकरितां मानपान करितात, आणि त्यास मर्यादा असें म्हणतात; परंतु ही मर्यादा नव्हे. वास्तविक ज्ञानी आहेत, ते लबाडीचा व्यवहार करणार नाहींत, व गुलामाप्रमाणें कोणाची मर्यादा करणार नाहींत. ते खरेपणानेंच चालणारे. त्यांस हें कपट कशास पाहिजे?

कारकून हे बहुधा भडवेपणांत असतात. जसा वरिष्ठ असेल व बोलेल तसें बोलावें. कोणीकडून तरी आपलें पोट भरावें. लाज राहूं न राहूं ! ईश्वराचें नांव तर त्याचे मनांत मुळींच नाहीं. ईश्वर आहे याची खात्री असेल, तर त्याचें भय मानतील. बहुधा हिंदु लोकांमध्ये मर्यादा हा गुण नाहींच. कपटाशिवाय कोणाची कोणी मर्यादा करीत नाहींत. एखादा मोठे कामावर असला, म्हणजे त्यास पुष्कळ लोक चांगले म्हणतात. मेजवान्या करितात; परंतु तें सर्व मायावी. मनापासून नाहीं; परंतु जे विद्वान् आहेत, त्यांचा स्नेह, मर्यादा आणि मायाही अशी नसते. ते निष्कपटानें, निर्मळ अंतःकरणाने वागणारे असतात. यामुळे लोकांस अमर्यादा वाटते. त्यांची अशी समजूत आहे कीं, कोणी लबाडलुच्चा असला, तर त्याचा मान करावा, त्यास थोर म्हणावें; परंतु विद्वान् हें कसें करील ? तसल्या थोरास तर लाथ मारणार, म्हणून अमर्याद म्हणतात, परंतु तसें नाहीं. आपण गर्दभ असलें तरी घोड्यास ओळखावें, हें चांगले.

तात्पर्य, पुण्यांतील व बाहेर ठिकाणच्या ब्राह्मणाच्या मूढपणाच्या समजुती लवकर जातील, तर बरें होईल. सारांश, इंग्रजी विद्वान् यांचा पक्ष आम्हीं सिद्ध केला आहे. आणि तो वास्तविक आहे, परंतु ब्राह्मणांच्या मूर्ख समजुती याजमुळें तें भलतेंच समजतात.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ३१/१५ ऑगस्ट १८४८ )

३

# संस्कृत विद्या

संस्कृत विद्या मोठी गहन आहे, व तिचा उपयोग मोठा आहे, असे लोकांस वाटतें. याजमुळे शास्त्री, पंडित वगैरे संस्कृतचे विद्वान यांस लोक मानतात व वैदिक हे जरी ग्रंथ नुसते पाठ करितात, तरी निदान पक्ष ते ग्रंथाचे रक्षण तरी करतात म्हणून त्यांस लोक मानतात.

परंतु संस्कृत विद्येचे तात्पर्य पाहिलें तर त्यांत व्यावहारिक उपयोग कांहीच नाहीं, संस्कृत भाषा फार प्राचीन आहे; आणि देव म्हणजे जुने हिंदु त्यांची ती भाषा आहे. व तिजला बहुतांनी शोधून संस्कार देऊन सुधारली आहे, म्हणून तीस संस्कृत म्हणतात, हे खरे; परंतु तिजमध्ये जें ज्ञान वाढलें, तें कोणाचेही उपयोगी नसोन तिचा विद्यार्थी केवळ भट होईल किंवा विलक्षण तऱ्हेचा मनुष्य होईल. याचे कारण त्यांतील ग्रंथांत फारसें ज्ञान मुळीच नाहीं. जें आहे तें केवळ जुन्या काळचें. त्याचा आता उपयोग कांहीहीं नाही.

प्रथम या भाषेतील ग्रंथांचें अनुक्रमानें निवेदन करूं. प्रथम वेदांतील मंत्रसंहिता आहेत. त्यांत पाहिले तर अग्नि, मित्र, वरुण यांच्या प्रार्थनेची सूक्तें म्हणजे प्रबंध आहेत. ते नानाप्रकारचे छंदांनीं रचले आहेत. पुढे ब्राह्मणे म्हणून बखरीसारखे ग्रंथ आहेत, त्यांत या मंत्राचा उपयोग कसा करावा, या मंत्रानें जनावरें मारून यज्ञ कसे करावे, कोणता मंत्र म्हटला तर काय फळ होतें, हें सांगितलें आहे. या ग्रंथाचे आधारानें ब्राह्मण हे मोठे योग्यतेस पावले. किती एक काळपर्यंत त्यांचे आशीर्वाद, त्यांचे शाप, त्यांची अनुष्ठाने ही मोठी सामर्थ्यवान् आहेत, असे लोकांत प्रसिद्ध झाले होतें. याजमुळे ब्राह्मण हे हल्लीं जसे पंचाक्षरी, औसर अंगास आणणारे, देवाचे साक्षात्कारी, मंत्री, जादूगार,

करामती करणारे, अवलिया वगैरे ढोंगी यास लोक मानतात व भितात, त्याप्रमाणें सर्व लोक ब्राह्मणास भीत आहेत.

राजे राज्य घेण्याकरितां, निपुत्रिक पुत्र होण्याकरितां, गरीब धनप्राप्तीकरितां, रोगनाशनार्थ, शत्रुनाशार्थ, ब्राह्मणास बोलावून त्यांस अनुष्ठानें, जप, तप, मंत्रसाधनें करावयास सांगत. 'लोकांस असें वाटत होतें कीं, ब्राह्मणाचे हातीं सर्व आहे व वेदांचे मंत्रास सामर्थ्य आहे. देवांपेक्षां ब्राह्मणांचे मंत्र जबरदस्त. ब्राह्मण हाक मारतील, तेव्हां देव हात जोडून येतात; राक्षस मंत्रांनी पळतात. ही समजूत अद्यापि लोकांमध्यें आहे.

परंतु ब्राह्मणांनीं पूर्वीचे तापसस्वरूप व जटा, व्याघ्रांबरें, दाढ्या, भस्म, दर्भ वनवास इत्यादि भयंकर प्रकरणें सोडल्यामुळें त्यांचे तेज कमी झालें. लोकांस असें वाटूं लागलें कीं, हे आपल्यासारखेच आहेत; परंतु पहिले हे मोठे उग्र होते. आतांही असे उग्र कोणी आहेत, त्यांस अडाणी लोक भितात. याप्रमाणें हें जादू प्रकरण माजलें. पुढें तो काळ जाऊन शास्त्रें, उत्पन्न झालीं. त्यांत वेदान्त मत निघालें. त्याणें हें पूर्वीचें ढोंग सर्व खोटें असे ठरविलें. अनेक देवांचीं अनुष्ठानें खोटीं, असें प्रसिद्ध केलें. एकच परमेश्वर व त्याचें मनन करणें हेंच श्रेयस्कर, असें सांगितलें.

त्याजवर बौद्ध मत झालें, त्याणें तर वेदाचा अगदींच उपहास केला. व त्यांतील उग्र म्हणजे हिंसा, वपा, याग इत्यादिक कर्मांची निर्भर्त्सना करून दयाधर्माची प्रसिद्धि केली. त्यानंतर तें मत रद्द होऊन पुनः ब्राह्मण-मत उभारलें. तें पूर्वीप्रमाणें तर कोठून होईल ? त्यास जखमा फार लागल्या म्हणून थोडेंसें उभे राहिलें. त्याची भर जवानी गेली. नंतर पुराणें म्हणून ग्रंथ झाले. त्यांत कांहीं वेदान्त, कांहीं वैदिक कर्म, कांहीं नवीन देवता, नवीन व्रतें, दानें वगैरे लिहिलीं. या पुराणकर्त्यांचा हेतु असा होता कीं, सर्व वाद तोडून कोणी कोणत्याही मतानें वागला, तरी चिंता नाहीं. यास्तव सर्व मतांचा संग्रह त्याणीं केला.

त्यानंतर कांहीं काळ गेल्यावर निबंधग्रंथ झाले. त्यानें पूर्वीचे सर्वच ग्रंथ ईश्वरी असें मानून, सर्व ओझें डोकीवर घेतलें. तेव्हां आतां संस्कृत शिकणाऱ्याचे हातीं कोणतें ज्ञान येतें, हें पाहिलें पाहिजे. तर हा बिचारा या ज्ञानानें तीनचार हजार वर्षांचा जुना होतो, त्याचा हल्लींचे काळांत जन्मलेलेपणा जातो. कसा म्हणाल तर त्यास म्हटलें कीं, लंकेंत कोलंबो शहर आहे, तर हा म्हणतो की, लंका कोणास सांपडावयाची नाहीं. तिच्या सभोंवतें सुदर्शन फिरत आहे. त्यास विचारलें कीं तापी नदीचा उगम कोठें आहे ? तर तो म्हणतो कीं, ती यमाची बहीण असें पुराणांत लिहिलेंच आहे. याप्रमाणे पुराणें वाचून त्याचे मनांत अनेक कल्पित कादंबऱ्या भरून, त्यास हल्लीं सृष्टी आहे त्यांहून वेगळी दिसते. संक्रान्त हें सूर्याचें राशिक्रमण हें तो जाणतच नाहीं. एक म्हणतो ती रेड्यावर बसून दक्षिणेस जाते आहे. आणि ती दीडशें कोस लांब आहे. आणि तिच्या पाठीमागें एक दुसरी बाई किंकरान्त आहे. तेव्हां या मनुष्यास असे वाटतें कीं, अलौकिक ज्ञान जें कोणास

ठाऊक नाहीं, तें मला या पुराणामुळे ठाऊक झालें आहे. या अभिमानांत तो असतो. वास्तविक पाहिलें, तर त्याचें ज्ञान एक कपर्दिकेच्या किमतीचें नसोन त्यांचे व इतर लोकांच्या नाशास कारण झालें.

त्यानंतर दुसरा भाग म्हणजे मंत्रशास्त्र. हें जर त्याणें पाहिलें, तर नाना प्रकारचीं अनुष्ठानें, नरसिंह, शरभ, वेताळ, योगेश्वरी इत्यादि देवता, व त्यांस बोलावण्याची रीत व त्यांस प्रसन्न करण्याचे जप, त्यांस माहीत होतात. आणि तो आपले अंगीं असा ताठा आणितो कीं, मी काय तो मोठा, मजमध्यें मोठें सामर्थ्य आहे. मी पाहिजे त्यास पुत्र देईन, दौलत देईन, शत्रु मारीन; पण त्याचे हातीं कांहीं नसतें. हा स्वप्नासारखा भ्रमात असतो. ते ग्रंथ वाचून त्यास भ्रम पडतो, करावयास जातो, तों त्यांत कांही नाहीं ! बरें, आणखी संस्कृतविद्येच्या दुसऱ्या भागांत जाऊं. जर तिचा अभ्यासी याज्ञिक झाला तर त्यास असें वाटतें कीं, मला अमुक शास्त्र म्हणतां येतें, तमुक शास्त्र म्हणतां येतें, पशु मारावे कसे, त्यांचीं अंगें कशीं काढावीं, हा खाटिकपणा येतो. यज्ञाचे मंडप कसे घाळावे, त्यांचे मागेंपुढें मंत्र कसे ओरडून म्हणावे, हें ठाऊक आहे. त्याचे प्रमाणास हा ग्रंथ, तो ग्रंथ, प्रत्यक्ष श्रुति, स्मृति अशा तो काढून दाखवितो व यज्ञ करणारास थेट स्वर्गांत नेऊन पोचविणारा तो मीच; असें मानतो.

बरें, आतां संस्कृताचे चौथे भागांत जाऊं. कोणी धर्मशास्त्र पढला, तर त्यांत शंभर ग्रंथ श्राद्धाबद्दल, पन्नास ग्रंथ शौचनिर्णयाबद्दल, पंचवीस ग्रंथ संस्काराबद्दल, असे अनेक निरुपयोगी विषयांविषयीं वादविवाद पाहून, त्यांत तो आपणांस मोठा धन्य मानितो. श्राद्धास पदार्थ किती असावे नसावे, कोणते भट किती असावे. दक्षणा किती असावी, तीथ कोणती, काळ कोणता, तीळ किंवा तांदूळ असावे, दर्भ किंवा दूर्वा, द्रोण पालथा ठेवावा कीं उताणा, कोणत्या दिशेस बसावें अधीं देवास कीं आधीं पितरांस गंध लावावें, ही सर्व कवाईत त्यांस पाठ होते. आणि त्यांतील वाद त्यांस ठाऊक होतात त्याविषयीं बोलण्यास तो मोठा उत्सुक होतो. त्याची त्यास मोठी हौस येते. कोठें श्राद्ध असलें, तर तेथें आपली तो शेखी मिरवितो, आणि दोनचार आणे मिळवून घरास आणितो.

बरें, संस्कृतविद्येच्या पांचवे भागांत आपण शिरूं. विद्यार्थी न्याय, व्याकरण, मीमांसा पढला, तर मग हें जग दिसतें हें खरें किंवा खोटें, याचीच भ्रांति त्यांस पडून त्याविषयीं तो वाद घालीत बसतो. कोणी म्हणतो, दहा पदार्थांनीं सृष्टि घडली, तर कोणी म्हणतो चोवीस, कोणी म्हणतो सात; कोणी म्हणतो मी आणि ईश्वर एकच जातीचे, मध्यें भाषा मात्र आहे. कोणी म्हणतो सुखदुःख हें मनांतही आणूं नये, आळसांत बसावें. प्रारब्धीं आहे तें घडतच आहे. या मानसिक कल्पनेच्या जालांत तो सांपडून वेडा होतो.

बरें, सहावे भागांत पाहूं. जर तो ज्योतिष शिकला, तर म्हणूं लागतो, अमुक ग्रह आला तो पीडा करील. मंगळास अमुक दान पाहिजे. शनि सूर्याचा मुलगा, परंतु मोठा द्वाड ग्रह, त्याचा जप केला असतां शांति होते. त्याचे डोकीवर तेल ओतावें किंवा

ब्राह्मणास लोखंड द्यावें; परंतु हें मोठें उग्र दान आहे. कोणी घेणार नाहीं. प्रश्न सांगतो, पुढलें भविष्य, आयुष्य, रोग, शत्रुसंप्रदायाविषयीं, नाना प्रकारचे भ्रम लावितो.

याप्रमाणें कोणतेही भागांत जरी पाहिलें, तरी संस्कृतविद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी, व संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी, निरुपयोगी कर्मे करणारी आहे. सांप्रत काळीं जें ज्ञान पाहिजे, तें त्यांत मुळींच नाहीं. सांप्रत काळचे देश, तेथील राज्यें व फौजा व व्यापारी इत्यादिकांची माहिती, यंत्राची उत्पत्ति, कायदेकानू कसे असावे, गैरचाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या, हें त्यांस माहित नसतें. दोनचार हजार वर्षांपाठीमागें पिकलेलें वेड वगैरे समजुती व वाकडे तर्क हेच आतां काढून त्यांची वाटाघाट करीत आयुष्य घालवितात. जोपर्यंत बाहेरचे देशांतील वर्तमान लोकांस ठाऊक नवतें, तोपर्यंत याच ज्ञानाचा थोरपणा होता व हें ज्ञान जापाशीं होतें, त्यास थोर मानून त्याचे पायाचें तीर्थ घ्यावें, येथपर्यंत मजल आली.

परंतु आतां बाहेरचें ज्ञान या देशांत शिरलें. त्याचे पुरानें हें जुनें ज्ञान वाहून गेलें. तुच्छता अगदीं स्पष्ट झाली. पाठीमागून हें पोकळ ढोंग चालत आलें. त्याचा पोकळपणा उघडकीस येऊन त्या ढोंगावर पोट भरणारे त्यांचें महात्म्य कमी झालें.तर आता जांस थोर-पणा पाहिजे असेल, त्याणीं सांप्रत काळचे ज्ञानाची संपदा मिळविण्याचा प्रयत्न करावा. जा ज्ञानानें आपल्यावर इतर लोकांनी सरशी केली, तें ज्ञान आपण धिक्कारूं नये; कारण कीं, त्याचा आपणांस अनुभवच आला आहे याजकरितां सावधगिरीचें लक्षण हेंच कीं, काळास ओळखून त्याप्रमाणें चालावें. असें न केलें तर फार फजीत होऊन दुर्दशा झाली आहे, त्यापेक्षां अधिक होण्याचा संभव आहे. पूर्वी जुन्या काळचे ब्राह्मण म्हणजे ऋषि वगैरे यांनी अपुरतीं कामें ठेविली तीं आपण पुरतीं करावीं. त्यांनीं वैद्यकत्व पूर्णत्वास आणलें नाहीं. तर आपण अनेक देशच्या कल्पना एके ठाई करून तें सुधारावें म्हणजे खरा थोरपणा मिळेल. व लोकांचें हित होईल. असें न होईल तर लोक वैद्यास सोडून नवे डॉक्टर व नवीन इस्पितळें यांचा आश्रय करतील; आणि पुराणे वैद्य बिचारे उपाशी मरतील. याप्रमाणें सर्व विद्येचें आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ८४/१ डिसेंबर १८४९ )

४

# विद्वान कोणास म्हणावें ?

या देशांत विद्वान हें नांव चालविणारे बहुत लोक आहेत. वैदिक ब्राह्मण हे आपल्यास विद्वान म्हणवितात. कारण कीं, वेद जे हिंदुस्थानांतील आर्यधर्माचें मूळ पुस्तक, तें घोकून मुखपाठ करितात. आणि तें राखण्याकरितां जन्मपर्यंत त्यांस घोकणी करावी लागते; यास्तव ते असें म्हणतात कीं, या वेदराशीचें संरक्षण करणारे आम्हीं, यास्तव आम्हांस विद्वानच समजावें. दुसरे पुराणीक; ते म्हणतात कीं, आम्हीं भारत, भागवत, संस्कृत भाषेंत असतां त्यांचा अर्थ लोकांस सांगतो, तेव्हां आम्हीही विद्वानच आहों. यानंतर व्याकरणशास्त्री, न्यायशास्त्री, वेदांतशास्त्री, धर्मशास्त्री, हेही म्हणतात की, पूर्वी ऋषी व मोठाले विद्वान झाले, त्यांणी वादशास्त्रे उभी केलीं. यास्तव त्यांचे वेत्ते आम्हींही विद्वानच आहों. श्रोत्री, याज्ञीक व पुरोहित म्हणतात कीं, आम्ही मंत्रांचे विनियोग कर्माचे ठाईं कसे करावे, तें जाणतों आम्हांवाचून वैदिकांचा उपयोग नाहीं व पंडितांचाही नाहीं. मुंज, लग्न, याग, होम आम्ही करितों. त्यापेक्षां आम्हींही विद्वानच आहों. कायदे शिकणारे म्हणतात, आम्हांस किती बुकें पढावीं लागतात; जुने कायदे व आक्ट व समजूतपत्रे व सरकुलरें इत्यादी ध्यानांत ठेवून दरबारांत काम करावें लागतें. तेव्हां आम्हींही विद्वानच आहों. याचप्रमाणें वैद्य, ज्योतिषी हेही आपल्यास विद्वानच समजतात. वैद्य म्हणतात, आम्ही रसायनें व वनस्पत्यांचे गूण जाणतो. जोशी म्हणतात, आम्ही ग्रहणें, अस्त व उदय सांगतो; तेव्हां हें काम कुणबी, माळी, वाणी, यांच्यानें होईल कीं काय ? तस्मात आम्हींही विद्वानच. यानंतर इंग्रजी शिकलेले म्हणतात कीं, आम्ही दहा दहा वर्षे अभ्यास करून सरकारनें ठरविलेल्या पदव्या जिंकण्याकरिता परिक्षा दिल्या. अनेक ग्रंथ पाहिले तेव्हां आम्ही विद्वानच आहों. परंतु इतकेही वर्ग लक्षांत आणिले तरी विद्वान कोणास म्हणावें हे समजणें कठीण आहे.

मनुष्यांचे मन हा पदार्थ अव्यक्त आहे. तें उत्पन्न कसें झालें, हें समजण्यास मनुष्यास सामर्थ्य नाहीं, तत्रापि मनाचा स्वभाव व मनाचे गूण याचें निदान करितां येतें. मनुष्यांचें मन हा असा चमत्कारिक पदार्थ आहे कीं, त्यात जर कल्पना सांठवीत गेलें, तर त्यांचा विस्तार होतो. व सांठविल्या तरी, हें लहानांचें लहान राहातें. लहान मुलाचे ठाईं मन असतें. पण तें वृद्धी पावलेलें नसतें. याजमुळें त्यांत शेंपन्नास कल्पनांचा मात्र सांठा असतो. खेडेगांवचा शेतकरी किंवा धनगर याचें मन लहान मुलासारखेंच थोडे कल्पनांनी भरलेलें असतें. याजमुळें तो शरिरानें भव्य असतो; पण मनानें लहान दिसतो. लहानपणापासून मनुष्य अभ्यास करावयास लागतो. म्हणजे कल्पना सांठविण्यास लागतो. इतकाच त्याचा अर्थ. नवीन कल्पनांनीं आपलें मन भरित असतो. व्याकरण, भूगोल, गणित व

इतिहास हीं पुस्तकें त्यांस नव्या नव्या कल्पना देतात. आणि शिकणारा त्या आपल्या मनाच्या ठायीं सांठवीत जातो. कायद्याचें बूक पढतो; त्याचा तरी अर्थ इतकाच कीं, त्यांतील कल्पना मनांत सांठवितो. इंग्रजी शिकतो; त्याचा तरी भाव असाच कीं, त्या भाषेंत विद्वानांनीं जो कल्पनेचा संग्रह केला आहे तो आपले मनांत सांठविणें. जो संस्कृत शिकतो तो त्यांतील कल्पना घेतो. प्रत्येक ग्रंथ जो आहे तो कल्पनेचा व प्रमाणांचा व नियमांचा ढीगच आहे. असे ढीग मागून लोकांनीं घालून ठेविले आहेत. ते उपसित उपसित जाता जातां कल्पनेचा सांठा शिकणारांचे मनांत फार मोठा होतो. सर्व ज्ञान जें आहे, तें कल्पनामय आहे. आता मनाचा विस्तार विस्तार किती आहे. हें प्रमाण कोणासही कळत नाही. कारण कीं, जन्मपर्यंत कल्पनेचा सांठा करीत गेलें तरी, मनांत त्या सर्व सांठऊन पुन्हा मन रिकामेंच दिसेल. पोट भरेल, परंतु मन भरावयाचें नाहीं. त्यांत कितीही कल्पना व प्रमाणगोष्टी व नियम सांठविले तरी तें रिकामेंच असतें. लहान मूल जन्मास येतें, तेव्हां त्याजबरोबर कांही कल्पना असतात किंवा नाहीं, याचा शोध लागणें अशक्य आहे. परंतु पुढील क्रमावरून असें दिसतें कीं, उपजल्यापासून कल्पना सांठविण्याचा प्रयत्न चालू होतो. प्रथम त्यांस कांहीं बोलतां येत नाहीं. मग कांही नांवें घेऊं लागतें. मग पदार्थांची ओळख पडते. नंतर जसजसा अभ्यास वाढेल तसतसा सांठा वाढतो. या जगांत कित्येक विलक्षण मनुष्यें झाली आहेत; त्यांचें मन इतकें वाढलें आहे कीं, त्यांची बरोबरी बहुत लोकांस होऊं शकत नाहीं. व अशा विद्वानांचे ग्रंथ अद्याप लोक वाचून त्यांचे कल्पनांचा संग्रह करीत आहेत. वंशपरंपरेनें कल्पनेचा संग्रह करण्याचा अधिकार माणसाखेरीज दुसरे जिवास नाहीं. याजकरितां मनुष्यांमध्यें ग्रंथांचा संग्रह वाढून ते ग्रंथ मनाचे वृद्धीस उपयोगी पडतात व हे ग्रंथ ज्या ज्या देशामध्यें अधिक किंवा कमी असतात, त्याप्रमाणें त्यांची स्थिती आहे, असें ओळखतां येतें.

ब्राह्मण लोक मुळापासून विद्येचे शोकी यांत संशय नाहीं. जेव्हां छापखाने नवते, पुस्तकांची फार वृध्धी होण्यास साधन नवतें, त्या काळच्या अडचणी एकीकडे ठेऊन ते संहिता, ब्राह्मण, पुराणें, इत्यादिक मोठे ग्रंथ तोंडानें पाठ करून ठेऊं लागले. हे ग्रंथ एवढाले मोठे आहेत कीं, ते आजचे उठवणीचे काळांत वाचण्यास देखील सामर्थ्य नाहीं. परंतु तसले ग्रंथ पाठ करून, घोकून, ताडपत्रावर किंवा कापडावर लिहून संरक्षण केलें. पुस्तकें लिहिणारी एक कायस्थ जात वेगळीच झाली. घोकणारी एक जात वेगळीच झाली. अशी मेहेनत करून त्यांणीं तट्टाचे ओझ्याइतकें एकएक पुस्तक जें घरांत बाळगण्यास देखील अडचण अशीं भारतें, रामायणें, तयार केलीं; त्यांच्या नकला केल्या, असे यत्न करून ग्रंथांची बरीच राशी उत्पन्न झाली, हें संस्कृत भाषेस भूषण आहे.

कल्पनामय ज्ञान आहे; याविषयीं विचार करतां करतां वेदांती यांस असें वाटलें कीं, हें सर्व जग कल्पनामय आहे. वास्तविक पदार्थ कांहींच नाहीं. मनाचे आणि मायेचे तरंग आहेत, असें समजून त्यांणीं असल्या जगास नाहींच असें म्हटलें.

आतां संस्कृताची भरभर ज्या काळीं झाली, त्या काळीं अन्य देशांत कोठें कांहींच नवतें. याजमुळें देशावरची गोष्ट संस्कृतांत आली नाहीं. भरतखंडाहून पलीकडे ऋषींस पत्ता होता, असें क्वचित् दिसतें. आणि पत्ता लावण्याजोगें पलीकडे कांहीं नवतें, हेंही खरें. परंतु आलीकडे अनेक राष्ट्रें हिंदुलोकांचे नजरेपुढें मोंगल, इंग्लिश, फ्रेंच, पोर्टुगाल, इत्यादि रूपानें आलीं. तेव्हां हिंदुलोक आपलें जुने पोथींत पाहूं लागले, तों कशास कांहीं मिळेना. त्यांत येऊनजाऊन म्लेंछ आणि यवन हे दोन शब्द. यांची ओळख कोठेंच राहिली नाहीं. तेव्हां जन्मांधास जसें डोळे आले म्हणजे जग विचित्र दिसूं लागतें, आणि पुन्हा जन्मलों की काय असें वाटतें, तसें सांप्रतचे हिंदुस्थानांतील लोकांस विचित्र भावना झाली आहे.

आतां जे व्यवहार चालू झाले आहेत, त्यांतील कांहीं भाग पुराणाचे पोथींत नाहींत. याजकरितां मोठे पंडितास एक वर्तमानपत्र वाचण्यास दिलें तर तो जागोजाग आठकुळतो. आणि नवीं नांवें, नवे लोक, नवे देश पाहातों. तेव्हां तीं त्याच्या तोंडानें देखील येण्यास मुषकील. आतांची अमेरिका, इंग्लंड, रुसिया, लेफ्टेनेंट, गवरनर, लेजीस्लेटीव, कौन्सल हे पदार्थ सर्व नवे. भीम, अर्जुन, दशरथ, यांचे कारभारांत जो वाकब, त्यास हल्लींचे कारभार पाहून नवी सृष्टी दिसते. याजकरिता वैदिक, पुराणीक, शास्त्री व श्रौत्री हल्लींचे वर्तमानपत्रांकडे पाहात देखील नाहींत. जर पाहावें तर अज्ञानपणा व मूर्खपणा दिसून येईल. कारण कीं, त्यांतील एक ओळ देखील समजावयाची नाहीं. भटभिक्षुक तर वाचण्यास पराङ्.मुख, मग अर्थाकडे कोठून पाहाणार ?

जुने विद्वानांची सदर्हुप्रमाणें अवस्था आहे. व हल्लींचें एक वर्तमानपत्र हातीं घेऊन शेवटपर्यंत वाचलें असतां अर्थ समजतील असे जीव थोडेच निघतील. तरी मराठी वर्तमानपत्रें हीं इंग्रजी वर्तमानपत्रांचा शंभरावा हिस्सा आहे, असें समजलें पाहिजे. वर्तमानपत्रें बहुधा विद्वान असतात तेच लिहितात. याजकरितां त्यांत अनेक विषय येतात. ते समजण्यास जगांतील बहुत कारभार ठाऊक पाहिजेत. प्रथम जगांत राष्ट्रें किती आहेत हें ठाऊक पाहिजे. हल्लीं पृथ्वीवर काय चाललें आहे याची बरीच माहिती ज्यास असेल तोच वर्तमानपत्र समजेल, बाकी कोणी १० ओळी, कोणी पांच ओळी वाचून खालीं ठेवितील अशींच माणसें बहुत.

आतां आमचा प्रकृत विषय असा आहे कीं, विद्वान कोणास म्हणावें ? तर आम्हांस असें वाटतें कीं ज्यांचीं मनें फार विस्तीर्ण झालीं आहेत, ज्यांचे मनांत अनेक कल्पनांचा संग्रह झाला आहे, ज्यांचे मनास संस्कार होऊन सर्व विषयांची थोडीफार माहिती झाली आहे, त्यांसच विद्वान म्हणावें हा नियम सर्वांस सारखा लागेल. तो असा कीं, केवळ इंग्रजी शाळेंत जाऊन नक्कल करण्यास शिकला तर तो विद्वान नव्हे, तर इंग्लिश भाषेंत ग्रंथ काय आहेत, त्यांतील मुख्य मुख्य ग्रंथांची ज्यास ओळख झाली, त्यांतील कल्पना ज्यास ठाऊक ते इंग्रजींतील विद्वान म्हणावे. तसेंच संस्कृत ग्रंथ किती, त्यांचा मुळापासून

ओघ कसा आला आहे. त्यांत विद्वान लोक कोण कोण झाले, ग्रंथकार ऋषी कोण कोण झाले व त्या ग्रंथांत आहे काय याचा सारांश, इतके ज्यांस ठाऊक असेल ते संस्कृतांतील विद्वान म्हणावे. या दृष्टीनें पाहिलें म्हणजे घोकणारे भट व लिहिणारे कारकून यांस कोठें स्थळ राहात नाहीं. सामान्यत: फक्त लिहिणेंवाचणें ही विद्या मुळींच नव्हे, हें केवळ कसब आहे. याची गणना कलेंत आहे. विद्येंत हें मुळींच येत नाहीं. विद्या म्हणजे जेणेंकरून मन मोठें होतें, वाईट गुण जातात; शांती, निर्लोभ साधुता, इत्यादि गुण प्राप्त होतात; बारीकसारीक द्वेष, दुर्बुद्धी, लोभ व क्रोध हे जातात; जगाचा विस्तीर्ण व्यवहार व कारभार ज्यांस समजतो, तेच विद्वानांत गणले पाहिजेत. यांखेरीज बाकी सर्व लहान मुलें किंवा अडाणी धनगर याचप्रमाणे समजावयाचे. मग ते राजे असोत अथवा सरदार असोत अथवा सावकार असोत; तरी ते मनानें लहान मुलांसारिखेच समजावे. त्यांची वर्तणूकही बहुतकरून मुलांमारखीच असते. परंतु त्यांत इतका फरक असतो कीं, मुलें अज्ञान, त्यांस कल्पना थोड्या व सामर्थ्यही थोडें, याजमुळे फारशीं उपद्रवास कारण होत नाहींत ? परंतु मोठीं माणसें अज्ञान असलीं तरी ती उपद्रवीक होतात. कारण कीं तीं जरी अज्ञान असली तरीं त्यांचे मनास अन्य कारणानें म्हणजे अधिकार, वंश व द्रव्य इत्यादि योगानें अभिमान होऊन आपण मूर्ख आहों असें न वाटतां आम्हीं शाहाणे हा गर्व त्यांस असतो. याजमुळें त्यांपासून इतरांस उपद्रव होतो. याजकरितां देशांत जितके अधिक विद्वान होतील, तितके पाहिजे आहेत. त्यांचे गंभीर व थोरपणाचे उदाहरण दुसरे लोकांस लागतें. आणि परस्परांचे सहवासानें विद्यावृद्धी होते.

विद्या म्हणजे अनेक विषयांची माहिती असणें, व्यवहारातील बहुतेक गोष्टी ठाऊक असणें, भाषणाचें व लेखनाचें चातुर्य असणें हे गुण फार उपयोगी आहेत. आणि ज्याचें मन मोठें होईल त्याचे ठिकाणी हे गुण सहज येतील. मन ही पोकळ पिशवी आहे, तींत जितकें जितकें भरावें तितकी तितकी ती अधिक होत जाते. आणि जन्मपर्यंत भरीत गेलें तरी ती पूर्ण होत नाहीं. हा एक ईश्वरी चमत्कार आहे. याजकरितां साधारण इंग्रजी शिकलेले किंवा साधारण संस्कृत शिकलेले या उभयतांसही आम्ही विद्वान म्हणत नाहीं. ज्यांचें मन फार कल्पनांनीं भरलें असेल, त्यांस मात्र विद्वान म्हणूं. जसें शरीर मेहेनतीनें वाढऊन बलाढ्य होतें आणि रोडक्याचा पैलवान होतो, तसेंच मनास कमाऊन मोठें करितां येतें. देशावरावर फिरणें, राज्यदरबारात जाणें, विद्वानांचे संगतीत बसणें, अनेक ग्रंथांचे अवलोकन करणें हे मनाचे तालीमखाने आहेत शरिरास जसें अन्न पोसतें, तसें मनास ज्ञान पोसतें, आणि जरी आपल्याला फुरसत थोडी असली तरी ज्याला नवीन कल्पना मिळविण्याचा छंद आहे तो अधिक संग्रह केल्यावांचून राहणार नाहीं. आणि असे मनुष्यास विद्वान म्हणणें योग्य आहे.

आतां हल्लीं जे थोडे ज्ञानांत आपणांस विद्वान म्हणविणारे आहेत, त्यांणीं असें मनांत आणावें कीं. आपल्याला ठाऊक नाहींत अशीं पुस्तके अद्यापि किती आहेत; आपणांस मिळाल्या नाहींत अशा कल्पना अद्याप किती आहेत; आपल्यास ठाऊक नाहींत

असे व्यवहार जगांत किती आहेत ? यापेक्षां आपण जें जाणतों हें अगदीं अल्प आहे, ही गोष्ट ते स्मरतील तर त्यांचा लहानपणा त्यांसच दिसून येईल. आम्हांस असें वाटतें कीं, सांप्रत काळीं वर्तमानपत्राइतकें ज्ञान होण्याचें दुसरें मोठें साधन नाहीं. तें वाचून त्यांतील विषय कितीकांस समजतात, हें ज्याचें त्यांणीं पाहिलें तर विद्वान कोण, अविद्वान कोण, हें समजेल. वाचणें हें समजणें नव्हे. समजणें म्हणजे असें आहे कीं, अमेरिकेचें नांव आलें तर अमेरिका कोठें आहे ? त्यांत लोक कोण ? धर्म काय ? राज्य काय ? इतकी माहिती असेल तर त्या खंडांतील गोष्ट समजूं शकेल. तसेच युरप म्हणजे काय ? तेथें देश किती आहेत ? लोक कोणे प्रकारचे आहेत ? तर युरोपांतील वर्तमान ध्यानांत येईल. जगाची माहिती असल्यावांचून वर्तमानपत्र वाचण्याची योग्यता येत नाहीं. कितीएक तर सरकारी नेमणुका पाहातात, आणि खालीं ठेवितात. बाकीचे विषय त्यांस व्यक्त नसतात व त्याविषयीं त्यांस माहिती नसते. म्हणून रुचीही नसते. तर असे लोकांस कोण विद्वान म्हणेल ?

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. १४२/ता. १० जून १८६४ )

५

# ग्रंथ

विद्वान आणि ज्ञानी पुरुषांच्या बुध्धीची जीं प्रतिबिंबें ते ग्रंथ होत. ग्रंथांपासून पुढील लोकांस फार उपयोग होतो. कारण मनुष्याचें ज्ञान परंपरेनें वाढतें. आणि इतर पशूंचें वाढत नाहीं; तथापि मनुष्यानें पशूहून श्रेष्ठ होण्यास बहुत उद्योग केला पाहिजे. हा उद्योग म्हटलें असतां संस्कृत भाषेंत पुष्कळ झाला आहे. तींत काव्यें, अलंकार, व्याकरण, कथा, इत्यादिकांवर चांगले ग्रंथ रचलेले आहेत; व भाषाही पुष्कळ सुधारली आहे. आणि जुने ब्राम्हण म्हणजे ऋषी यांनीं ज्ञानसंपादनाच्या आवडीनें ज्योतिष व वैद्यक यांतही बराच शोध केला आहे. व हा शोध ज्यांनी केला, त्यांस बक्षिसें किंवा इनामें कोणीं दिलीं होतीं, असें दिसत नाहीं. साधारणतः मनुष्यास ज्ञानाची आवड आहे; या स्वभावाचे प्रवृत्तीनें तो

बाहेरच्या ज्ञानाचें पूज्य पडून कूपमंडूकत्व प्राप्त झालें. आणि मतलबी लोकांनीं भलभलतें ग्रंथ लिहून भोळ्या लोकांचीं मनें कायमचीं भ्रांत केलीं. याचे प्रत्यंतरास फार लांब जाणें नको. षड्दर्शनें व स्मृती इत्यादि प्राचीन ग्रंथांचें अवलोकन करून नंतर पुराणासारख्या ग्रंथांकडे पाहिलें असतां पुराणांतील मतलबसिद्धु व व्यर्थ लेख हीं तेव्हांच लक्ष्यांत येतात. त्यापेक्षां तंत्रांकडे वळावें म्हणजे त्याहूनही मूर्खता दिसते; आणि त्याचे आलीकडे इंद्रजाल वगैरे अत्यंत मूर्खतेचे ग्रंथ झाले आहेत ते पहावे तों लोकांच्या अज्ञानाचा निबिड अंधःकार दृष्टीस पडतो ! ह्याप्रमाणें निरुपयोगी व खोट्या गोष्टींचे प्रतिपादनाच्या ग्रंथांचे ढीग करून ठेविले आहेत. परंतु हा व्यर्थ शीण करून आपल्या कालाचा असद्व्यय केला हा त्या ग्रंथकारांवर सहज मोठा दोष येतो; व ह्याप्रमाणे हीं जीं दोन हजार वर्षें गेलीं, तीं निरर्थक गेलीं. तरी आतां हल्लींचे काळीं लोकांस सत्यासत्यविवेचनाचें ज्ञान व स्वातंत्र्य प्राप्त होऊन ते पूर्वीच्या सर्व भ्रांतींचा निरास करीत आहेत व पुढेंही करून सर्वत्र सत्य-प्रकाशन करतील अशी आशा आहे.

द्रव्यमदाचीं पटलें दरिद्रांजनाने दूर होतात असा सृष्टिनियम आहे. प्रथम दरिद्र, दरिद्रापासून उद्योग, उद्योगापासून लक्ष्मी, लक्ष्मीपासून मद आणि मदापासून पुनः दरिद्र, ह्याप्रमाणे, 'पुनर्दरिद्री पुनरेवयत्नी' हे रहाटगाडगें चालू आहे. म्हणून सांप्रतचा विचार करून ज्यांस खऱ्या स्थितीचे ज्ञान झाले आहे त्यांणीं, उत्तमावस्थेकडे प्रवृत्ति होईल अशा वळणाकडे लोकांस लावावें हें योग्य आहे. स्वाध्यायाने पूर्वीचे व आली-कडील ज्ञान पाहून त्याजवर सुदृढ ज्ञानमंदिराची उभारणी करावी व त्यामध्यें सुखेंकरून सकुटुंब परंपरा नांदावी. कारण, परदेशीय ज्ञानसंपन्नतेपुढें आतां आपल्या अल्प ज्ञानास कांहीं भाव राहिला नसून भग्न मूर्तीप्रमाणे आपणांस अपूज्यता आली आहे ती उक्त ज्ञानमंदिराच्या उभारणीनें जाऊन त्या श्रेष्ठ राष्ट्रांचे तुलनेस आपण सहज येऊन पोहोंचू. आपलेकडील विद्येचे दर्शक काय ते वैदिक, श्रौती, याज्ञिक, पुराणीक, शास्त्री, वैद्य, जोशी हरिदास, हें सर्व विद्वन्मंडल घेऊन पाश्चात्त्य विद्वन्मंडलाशीं तोलून पाहिलें तर सहस्रांशही भरणार नाहीं हें कांही अत्युक्तीचें नाहीं. म्हणून पाश्चात्यांस कांहीं हजार हात नाहींत किंवा हजार डोळे नाहींत; तर तेही आमच्यासारखेच मानव आहेत. परंतु त्यांचे श्रैष्ठय उद्योगावर असून आमच्या लोकांचें श्रैष्ठय उद्योग नष्ट करणाऱ्या अनेक प्रकारच्या छंदफंदांत आहे ! यामुळें येथील सर्वच प्रजा निरुपयोगी होऊन उद्योग व विद्या यांची दिशाभूल झाली. धनिक असतील त्यांणीं भिकारी पोसावे, आणि भिका-ऱ्यांनीं भांग, अफू इत्यादी दुर्व्यसनांत मग्न रहावें असा उलट प्रकार सुरू होऊन विद्वानांची बूज व परामर्ष शून्यवत् झाला. परंतु हें सर्व आलीकडील विद्याप्रभावांशी परिचित झालेल्या सर्व विद्याविलासी जनांस ज्ञात होऊन त्यांजमध्यें सद्बुद्धीचा अंकुर फुटल्याचे दृग्गोचर होत आहे ही एक आनंदाची गोष्ट आहे. आतां त्या अंकुराचें पोषण करण्याची मात्र सर्वांनीं आस्था बाळगणें हेंच आपलें कर्तव्य व हाच भ्रांतिनिरास होय.

( स्वाध्याय/परिशिष्ट सतरावे )

८

# शिमग्याचा दुराचार

लोकांत वाईट गोष्टींचा परिचार त्वरित पडतो, व चांगले गोष्टींचें ग्रहण होण्यास बहुत उशीर लागतो, हा एक साधारण नियम आहे. व दुसरा एक नियम असा आहे कीं, जी एखादी चाल कांहीं कारणांवरून एक वेळ पडते, तीच पुढें कांहीं काळानें अंधपरंपरा चालू लागते. तसेंच हें होळीचें माहात्म्य आम्हांस दिसतें. हल्लीं हे पांच दिवस होळीचे आहेत, हे प्रत्येक ठिकाणी लोक अधर्मानें क्रमीत आहेत. व त्यांत मूर्ख आणि उनाड लोकच आहेत असें नाहीं. बहुत संभावित, शहाणे व थोर लोक अंशत: त्यांत मिसळून आपला अपमान करिताहेत. तेव्हां त्यांस संभावित हें नांव शोभतें काय ? नाही; सगळे सारखेच योग्यतेचे असें म्हटलें पाहिजे.

परंतु हा दोष त्यांजकडेस आहे असेंच केवळ नाहीं. हा संगतिदोष लहानपणापासून आसमंतात भागीं हीं दुष्कृत्यें पाहिल्यानें प्राप्त होतो. आणि एकदां निर्लज्जपणाच्या भावना मनांत ठसल्या म्हणजे त्या जात नाहींत. उलटच्या इतक्या सुदृढ होतात कीं, आम्ही आतां लिहितों आहों, हें किती थोडयांस आवडेल आणि किती बहुतांस आवडणार नाहीं, हें आमच्यानें सांगवत नाहीं; परंतु जर त्यांनीं विचार केला तर त्यांस आम्ही म्हणतों, हें खरें वाटेल यांत संशय नाहीं. वाचणारानें असें म्हणू नये कीं, माझा बाप, माझा आजा, माझे शेजारी, हे सर्व असें कर्म प्राचीन काळापासून करीत आले व मीही लहानपणापासून त्यांतच वाढलों; तेव्हां त्यांचे विरुद्ध जें हें भाषण तें उपयोगी काय ? तर आमची त्यांस अशी प्रार्थना आहे कीं, तुम्हांस ईश्वरानें विचारशक्ति दिली आहे. तेणेंकरून सारासार पहा. यद्यपि शास्त्राचा आधार थोडासा असेल तरी शास्त्रांत आणखी बहुत सत्कर्में लिहिलीं आहेत ती सर्व तुम्ही करतां काय ? आणि जर करीत नाही, तर मग भ्रष्टपणास मात्र शास्त्राचा आधार तुम्ही कशाकशाकरितां धरतां ? सार कोणतें व असार कोणतें, हें पहाणें तुम्हांकडे आहे.

ईश्वरानें तुम्हांस जिव्हा दिली आहे. तिचे योगानें कुत्सित, बीभत्स व निंदायुक्त भाषणें करितां आणि लज्जास्पद मूर्खपणाचे स्वर काढितां हा थोरपणा काय ? आम्ही तर याला मनुष्यपणाही म्हणणार नाहीं. मग थोरपणा म्हणू कोठून ? रानांत जनावरें फिरतात व त्यासारखे हे लोक फिरतात. त्यांस लज्जा कशी वाटत नाहीं ? बापाचें श्राद्ध किंवा कपिलाषष्ठीचा पुण्यकाल आला तर आनंदानें गरिबांस त्यांच्यानें दोन पैसे धर्म करवत नाहीं. आणि शिमग्यांत दुष्ट स्त्रियांचे पोषणाकरितां उल्हासानें हें द्रव्य देतात. तेव्हां साजिंदे व भडवे हे पूर्वजन्मींचे ऋणी असतील असें वाटतें. जितकें देऊळ पवित्र

तितकेंच हें व्यभिचारगृह अपवित्र; असें असून त्यांत पापाचा सांठा करितात, हें नरकाचें साधन करितात कीं नाहीं बरें ?

आमचें हें पुणें शहर मोडलें आहे, तत्रापि आपल्या लग्नाच्या स्त्रिया व सख्ख्या आया यांस पोटास घालावयाची किती एकास भ्रांति असली, तरी त्यांनी कर्ज काढून कसबिणीच्या हातांत दोन रुपये दिले नाहींत तर त्यांस असें वाटतें कीं, आमची मंडळी (ज्यांचे सोबतींत फिरतो ती) आम्हांस हसेल. ही लज्जा बाळगून हरेक प्रकारें करून चार रुपये ते मिळवितात आणि त्यांचा पातकांत व्यय करितात. जे भले मनुष्य असतात, त्यांसही ते पिशाच्चरूप स्नेही नरकांत ओढितात. आणि आपल्यास शाबास मानून असें समजतात कीं, यंदाचा शिमगा चांगला केला आम्ही धन्य आहों. चोरांचे मंडळींत जो चोरी शिताफीनें करितो, त्यास इतर चोर वाहवा म्हणतात, तशीच हीं अवस्था आहे.

याप्रमाणें पुणें शहरांत आमचे पाहण्यांत पुष्कळ आहे. पुणें द्रव्यानें हलकें आहे खरें, परंतु दुष्कर्मांत तेथील लोक द्रव्यवान शहरापेक्षां अधिक आहेत. व बहुत लोक आपले सामर्थ्याची पराकाष्ठा करून रांडांचे ताफे बाळगण्याचा खर्च जीवादारम्य करितात. त्यांत लहान मुलें पाहून त्यांची मला फार करुणा येते. कारण कीं, हे भ्रष्ट झालेले लोक आपलें उदाहरण त्यांस देऊन त्यांसही आपले शाळेंत विद्वान करितात. नंतर ते वाढल्यावर कसे होतील, याचें लक्षण सहज ध्यानांत येईल. मला वाटतें कीं, पांच दिवस हे लोक नर्कवास करितात. कारण कीं, त्यांचे कानीं, मुखीं, मनीं व चित्तीं पातकाशिवाय दुसरें कांहींही नसतें. ‘कुरीयर’ नामक इंग्रजी पत्रांत असें लिहिलें आहे कीं, सरकारनें हा सण बंद करण्याचा बेत करावा. तो असा कीं, दरबारांत या सणाबद्दल सुटचा आहेत. त्या बंद कराव्या व पुण्यास रात्रींच्या तोफा बंद करतात त्या करूं नयेत. व माजिस्त्रेट साहेब यांणी कोणीं दांडगाई किंवा वाईट भाषण अगर दंगा करील त्यास मोठें शासन करावें.

हे सर्व बेत सरकारने केले तर चांगले आहेत. लोकांस वाईट मार्गांतून काढल्यासारखें होईल. परंतु सरकार प्रस्तुत असे करीलसें दिसत नाहीं. कारण सरकार स्वतंत्र नाहीं. त्यांस विलायतेहून अधिकाऱ्यांचीं पत्रें वारंवार येतात कीं, हिंदु लोकांचे रिवाजास व चालींस व धर्मास अगदीं अटकाव करूं नये. आमचे लोकांचें माहात्म्य इकडे कांहीं नाहीं, तरी विलायतेस मोठें आहे असें दिसतें. व ही मसलतीची व राज्यकारणी गोष्ट आहे. इंग्रजांस असें वाटतें कीं, जर आपण लोकांचे चालीविरुद्ध कांहीं केलें,तर हिंदुस्थानचें आपलें राज्य बुडेल व लोक आपल्यास हाकून देतील. यास्तव ते जपून चालतात. अशी त्यांची मसलत आहे.

परंतु तें कसेंही असो, दुसऱ्यांनीं करूं नको म्हटल्यावर मग करूं नये, हें शहाणपण नव्हे. चांगली गोष्ट असेल ती स्वयमेव अंगीकारावी. होळी अगदीं बंद झाली तर फार चांगलें आहे. व या दुराचारास शास्त्राची आज्ञा आहे, असें आम्हांस वाटत नाहीं. येविषयीं आमचें मत खरें आहे किंवा नाहीं, हें कोणी विद्वान् मनुष्य आम्हांस लिहून उत्तरीं कळवि-

तील तर आम्ही फार खुशी आहों. परंतु तें कसेंही असो. होळीचा मूर्खपणा इतका उघड आहे कीं, त्याविषयीं लिहिणें हे वृथा श्रम आहेत. परंतु लोकांस मूर्खपणा फार, याजमुळें त्यांचे ध्यानांत येत नाहीं. व दुसरें असें आहे कीं, मूर्ख लोक यांचे हातीं द्रव्य व अधिकार फार आहेत. याजमुळें त्यांचें उत्तेजन दुष्कर्मास फार आहे. म्हणून ते सुधारणा करण्यास तुच्छ मानतात. परंतु आम्हांस धीर पुष्कळ आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. ४ / ९ एप्रिल १८४८ )

## ९

# वैराग्य

मनुष्यमात्रानें आपले परलोकांचा विचार करावा, हें सर्व गोष्टींहून उत्तम आहे; असें असतां किती एक सांसारिक जन लौकिक विचार मात्र करितात. एक क्षणभरदेखील ईश्वराचें स्मरण करीत नाहींत. याहून मोठें आश्चर्य काय आहे ? मनुष्यास ईश्वरानें बुद्धि दिली आहे, तिचा उपयोग इतकाच कीं, इतर सर्व जनावरांपेक्षां हें जनावर श्रेष्ठत्व पावून आपले कर्त्याचे उपकार जाणून त्याची कीर्ति आणि दया वर्णन करील; परंतु हा सन्मार्ग सोडून किती एक गैर रस्त्यानें जात आहेत. आणि क्षणभंगुर देहाचे पोषणाकडे सर्व लक्ष देऊन आपलें जें महत्कल्याण तें करून घेत नाहींत.

पहा, कित्येक मेहनतीचे कामांत पडले आहेत. किती एक चाबूकस्वार, किती एक कारकून, कित्येक मजूर, किती एक शास्त्री व कित्येक वैदिक आहेत. कित्येक सूर्योदयादारभ्य नाचतात आणि संत म्हणवितात; परंतु हे सव देवास जाणत नाहीत. केवळ पोटाकरितां उद्योग संपादून असतात. याचा दाखला असा आहे की, गोसावीबोवास जर विदागी कमी पोचली, तर त्यास राग येतो. पुराणिकास तांदूळ मिळाले नाहींत, तर त्यास संताप येतो. भटास दक्षणा मिळाली नाहीं, तर तो रागावतो असेच बहुतेक लोक आहेत. तेव्हां कोणी धर्मसंबंधीं किंवा प्रपंचासंबंधी द्रव्याचे आशेवांचून काम करीत नाहींत, हें स्पष्ट आहे यास्तव यांपैकी कोणी साधूचें अभिधान पावण्यास योग्य नाहींत.

मला असें वाटतें कीं, संसार आणि परमार्थ हीं दोन कामें पृथक् आहेत. त्याची मिसळ करूं नये. परंतु किती एक लोक फक्त संसाराकरितां कांही कामें करितात आणि तीं देवाकरितां केली, असें म्हणतात. मला एक साधु असा ठाऊक आहे कीं, त्याची पूजा व भजन किंचित् होतें; तत्रापि त्याजकडे लोक फार येऊं लागले, तेव्हां त्याची पूजा वाढली. म्हणजे दांभिकपणानें तो चार घटिका अधिक बसूं लागला. व तेच लोक कमी होतांच पुनः मूळचेप्रमाणें झाला. हा केवढा नीचपणा आहे !

देवानें सर्वदा माझें भजन करा, म्हणून मनुष्यावर ओझें घातलें नाहीं. तो इतकेंच भजन मागतो कीं, जें आपलें आणि आपले कुटुंबाचें व इतर जनांचें काम आहे, तें सर्व चांगलें रीतीनें करून नंतर जी वेळ सांपडेल, ती क्षणभर असो अगर घटकाभर असो, स्नानसंध्येत किंवा प्रार्थनेंत आणि नामस्मरणांत घालवा. म्हणजे त्यांतच अनंत वर्षे तपश्चर्या केल्याचें पुण्य आहे. संपूर्ण जग ईश्वरानें निर्माण केलें आहे व त्याची व्यवस्था होण्याकरितां सूर्य-चंद्र, रात्र-दिवस, प्रत्येक जिवाचा भक्ष, रोगास औषध व मनुष्यास विचार आणि थोरपणा इतकीं दिलीं आहेत. त्यांचें कारण असें आहे कीं, ज्या ज्या ठिकाणीं जें जें व्हावयाचे; तें यथास्थित होऊन मनुष्यांनीं सर्वदा ईश्वराचे उपकार, शहाणपण, नेम व रचना यांची आश्चर्यकारक स्तुति करून रमत असावें. सूर्य उगवला असतां निद्रा करावी किंवा रोग झाला असतां औषध घेऊं नये, अगर मनुष्य झाला असतां विचार टाकून देऊन जनावरांसारखें फिरावें, असें विचारास योग्य दिसत नाहीं. यास्तव उत्तम हेंच कीं मनुष्यानें आपलें कर्म करावें.

श्रीकृष्णानें गीतेचा ठाईं हाच अभिप्राय अर्जुनास सांगितला आहे. अर्जुन विषाद पावून वैराग्य घेत होता. तेव्हां कृष्णानें त्याची समजूत केली कीं, ' अरे षंढा, तू भितऱ्यासारखा वैराग्य काय घेतोस ? जें आपलें कर्तव्य आहे, तें कधींही टाकूं नको. त्याचें आचरण कर. आणि सुखदुःख मात्र मानूं नको. वैराग्य हें मूर्खपण आहे. आशा व दुःख जें लाभालाभापासून होतें, तें मात्र सोडावें, परंतु संसारीं जें आपलें कर्म लोकांस प्रगट होऊन चालत आलें आहे, तें टाकूं नये. ' या उपदेशावरून जन्माचें सार्थक कसें होईल, याचें उत्तर सहज निघत आहे. आपण काय करितों, वस्त्रप्रावर्ण नेसतों, खातों, पितों व कुटुंबाचें पोषण करितों. हें सर्व व्यर्थ आहे, येणेंकरून ईश्वरप्रीति होत नाहीं, असें जे म्हणतात, त्यांचें मत ईश्वरी वचनास विरुद्ध व विचारासही विपरीत आहे, कारण पृथ्वीवर अनेक मनुष्यें निर्माण झालीं आहेत, अनेक देश आहेत, त्यांत आपण एक मनुष्य आहों. तेव्हां या जगत्-समुदायांत आपल्यास अनेक प्रकारचे संबंध प्राप्त झाले आहेत. त्यांचा त्याग करणें ठीक नाहीं, व हा केवळ भित्रेपणाच होय, जास संसार चालवावयास धैर्य नाहीं, तो पुढें काय करणार ? संसार म्हणजे यत्किंचित् गोष्ट आहे व या आयुष्यांत थोड्याचा विचार जास होत नाहीं, त्यास अगम्य ईश्वराचा विचार कसा समजेल ? जा देशांत ईश्वरानें आपणास घातलें आहे, त्या देशांत आपली योग्यता व बुद्धि येणें करून आपण काय करावें, याचा विचार करावा आणि योग्य असेल, तें करावें.

वैराग्यापेक्षां संसार सुयुक्त रीतीनें चालविला असतां बरा. कारण जर ईश्वराचे मनांत आपल्यास रानटी व अविचारी करण्याचें असतें, तर त्यानें वाघाच्या किंवा दुसऱ्या कांही रानवट जनावराच्या जन्मास घालून डोंगरांत राहणारें केलें असतें.

परंतु जापेक्षां मनुष्याचे जन्मास घातलें आहे, त्यापेक्षा असें दिसतें की, आपण विवाह करावा, स्त्री करावी व स्त्री असली, तर तिनें भ्रतार करावा. प्रजा होईल, तिचें संरक्षण करावें. अतिगरीब यांचें पोषण करावें. मनुष्यासारखें वागावें. विचारानें चालावें. जें उत्तम आहे, तें करावें इतर लोकांस उपकारांनी मैत्र करावें. जे आपलें हातून यथाशक्ति होईल तें कल्याण करावें. लोकांचें व आपलें कुटुंबाचें हित करावें. सदाचरणानें वागावें. अनीतीनें वागूं नये, नम्रता धरावी. राग, लोभ, मूर्खपणा करूं नये विनाकारण कोणाला उपद्रव करूं नये. प्रपंचसंबंधीं नानाप्रकारचीं दुःखें व सुखें आलीं, तर तेणेंकरून प्रसाद किंवा ग्लानि होऊं नये. अशा रीतीनें वागून यथाशास्त्र सुख अनुभवावें. अशा मनुष्यास आम्हांस वाटतें कीं, वैराग्यापेक्षां अधिक श्रेय आहे.

वैराग्य हें मूर्खपणा आणि ईश्वरानें जें दिलें व जाकरितां मनुष्य-देह केला, त्यास टाकून जनावरांप्रमाणे रानांत फिरणें आहे; कारण जें कर्म आपणांस सांगितलें आहे, तें न केलें तर आपले जन्माचें सार्थक होत नाहीं. जन्माचे सार्थक म्हणजे जाकरितां जन्म घेतला, त्याचे सर्व अर्थ म्हणजे हेतु परिपूर्ण करणें. आतां प्रथम प्रथम हेतु हाच कीं; ज्ञानेंद्रियें व कर्मेंद्रियें या सर्वांचे यथास्थित व्यापार करणें व शास्त्रयुक्त चालणें व आश्रमाप्रमाणें व वर्णाप्रमाणें वागणूक करणें. थंडी लागूं नये, म्हणून ईश्वरानें कापूस निर्माण केला आहे. आणि आम्ही जर आपले शेतांत पिकवून, त्याचें वस्त्र करून, त्यास अनुभविलें, तर आम्हीं कांही पातक केलें, असें होईल काय ? इतके खरें आहे कीं, चोरी करून दुसऱ्याचा कापूस आणूं नये व लोभानें कोणाचें वस्त्र हरण करूं नये; कारण जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा आहे. जशी तुम्हांस तुमचे मालाची चोरी आवडत नाहीं. तशी दुसऱ्यास आवडत नाहीं. दुसऱ्यास काय आवडत नाहीं, हें आपल्यावरून ओळखावें आणि त्याचा त्याग करावा. जें कांहीं दुःखकारक असेल, तें करूं नये. जमिनीची चाकरी करून जें मिळेल, तें खाण्यास आपल्यास सर्वोपरी अधिकार आहे. आणि त्यांत दोषही नाहीं. यांत जे दोष मानतात, ते आपल्या विचाराचा उपयोग करीत नाहींत; म्हणून त्यांस मूर्खपणानें 'जर तुम्हांस मी पाहिजे असेन, तर तुम्हीं सर्व सोडा' अशी ईश्वराची आज्ञा आहे, असें वाटतें.

जा नवऱ्यानें आपले स्त्रीस दागिने दिले आहेत, तो नवरा तिला असें म्हणणार कीं नाहीं, 'जर तुला माझी आवड असेल, तर आपले हातांतील बांगड्यादेखील फोडून टाक.' शहाणा नवरा असें म्हणेल काय ? नाहीं. तिला जे दागिने आपण दिले, ते घालतांना पाहून तो फार संतोष पावेल. कारण दागिने देण्याचें कारण तेंच होतें. तद्वत् मनुष्यास आपले कर्माचे व नीतीचे ठाई निष्ठा पाहून ईश्वर आनंद पावेल, यांत संशय नाहीं. त्यानें जी पदवी आपल्यास दिली आहे. तिचा त्याग करण्याचा हेतु काय ? ईश्वर असा क्रूरपणा

आपण निर्माण केलेल्या प्राण्याजवळ करणार नाहीं. कारण असें जर असतें, तर मनुष्यास इतकी जास्ती अक्कल त्यानें कशास दिली असती ? सर्व सारखेंच केलें असतें. परंतु त्याचा हेतु हाच कीं, त्या अकलेचा उपयोग कसा करतो, आणि जीं जीं कर्मे मीं त्याच्या वृत्तीवरून व बुद्धीवरून त्यास सुचविलीं आहेत, तीं तीं तो यथास्थित करतो कीं नाहीं ? हेंच ईश्वर पहात असेल, असें अनुमान सिद्ध आहे.

वैराग्यास कांहीं आधार नाहीं. आणि तेणेकरून ईश्वरप्राप्तिही नाही, किंबहुना ईश्वरक्षोभ मात्र होईल, असें दिसतें. याप्रमाणें बुद्धीकरून परलोकसंबंधीं जो विचार झाला आहे, तो लिहिला आहे.

(लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. २६ / १३ ऑगस्ट १८४८)

१०

## मानास व दानास पात्र

एक मनुष्य दुसरे मनुष्याचा मान करतो, यास दोन कारणें आहेत. एक त्याचें आर्जव म्हणजे लाभदृष्टि व दुसरा कृतोपकार. आतां इंग्रज लोकांस हिंदु लोक मानितात. आणि ज्यांचें त्यांजवळ काम नाहीं, ते देखील त्यांस नरमतात. याचें कारण पाहूं गेलें तर मला वाटतें कीं, अज्ञानी जर दोन इंग्रज लहान मोठे पदवीचेही एका जागीं मिळाले तरी ते इतके लवणभंजन करीत नाहींत. पण हिंदु म्हटला म्हणजे फारच करितो. एकादा साहेब आला म्हणजे रस्त्यांतील माणसें पैस होतात. मामलेदार व मुनसफ यांचे घशास कोरड पडते व किती एक घेरी येऊन डोळे पांढरे करितात, अशाही गोष्टी ऐकण्यांत आहेत. याचें कारण काय? जर हिंदु लोक विलायतेस जाऊन त्यांचीं सर्व प्रकरणें ध्यानांत आणतील, तर मग मला वाटतें कीं, इतकें अज्ञान, मोह आणि अतिशय मान रहाणार नाहीं.

मागे एलफिन्स्तन साहेब वगैरे यांनीं आपले ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं, जोंपर्यंत हिंदु लोक आमचा मान देवाप्रमाणे अज्ञानानें करितात, तोंपर्यंत आम्ही त्यांचे मुलखांत राहूं. पुढें राहणें कठीण आहे. जसें एखादें मोठें जनावर एखाद्याचे दृष्टीस पडलें म्हणजे चपापतात, तसेंच इंग्रज लोकांपुढें हिंदु लोकांचें होतें. त्यांचें स्थान, कर्म, रीत, व्यवहार

कांहीं एक हे लोक जाणत नाहींत. याजमुळें इंग्रजांचा फार नफा आहे. या अवस्थेंत हिंदु लोक जितके दिवस राहतील तितके दिवस त्यांची येथें वस्ती होईल, हा नेम आहे. जोंपर्यंत जुने लोक आहेत, तोंपर्यंत ही व्यवस्था अशीच चालेल, पुढची उत्पत्ति ज्ञानांत श्रेष्ठ होईल, यांत संशय नाहीं.

पहा, इंग्रजांनीं आपले शहाणपणानें या लोकांस किती घेरले आहे ! व्यवहार व राज्य सर्व त्यांचे हातीं गेलें आहे. याचें कारण अक्कल आहे. अक्कल कशापासून ? तर विद्येची प्रसृति व विचार इंग्रजांमध्यें फार आहेत. हिंदु लोकांमध्ये एकही नाहीं. मोठा धर्म आणि दान करावयाचें झालें म्हणजे दोन हजार भटांस जेवण घालतात. कोणी पांच हजार खर्च लावून देऊळ बांधतात. कोणी मनास येईल तसा पैसा टाकतात. त्यास योजना नीट कळत नाहीं. आमचे लक्षांत एक गृहस्थ येतो. त्यानें दोन लक्ष रुपये धर्मादायास काढले. त्यांपैकी देवळास पन्नास हजार गेले. पंचवीस हजार ब्राह्मणभोजन, दहा हजार खर्च देऊन लग्नें केलीं, असा व्यय केला. हें पाहून मला वाटतें कीं, मूर्खपणाची हिंदु लोकांपुढें हद्द झाली. हे दोन लाख रुपये जर नीट खर्च केले असते, तर किती उपयोगाचीं कामें झाली असतीं बरें ? किती दरिद्राचा ऱ्हास होता. किती ज्ञान व शहाणपण पढवायास येतें ?

परंतु मातींत पैसा कितीही घातला तरी त्याचा काहीं फायदा आहे काय ? माणसें ही जिवंत माती. त्यास काहीं सुखाचा उपयोग व्हावा, तें टाकून मातीचा शोभेंत द्रव्य खर्च करून काय उपयोग ? जर हिंदु लोकांस वास्तविक धर्म करावयाचा असेल तर इतकाच करावा कीं, जेणें करून लोकांचे अज्ञान दूर होईल. पुस्तकें व विद्या वाढतील व जेव्हां हे लोक आपले मूर्खपणाच्या मार्गातून सुटतील, तेव्हांच सुखवृद्धि होईल.

किती एक लोकांस हा चमत्कार वाटला आहे की, आम्ही शहाणेसुरते लोक आहों आणि आम्हांस ' लोकहितवादी ' वेडे व मूर्ख म्हणतात, यांचे कारण काय? आम्ही त्यांस सांगतों की, जेव्हां आम्ही तुम्हास ज्ञानी इंग्रजांशीं मिळवून पहातों तेव्हां खरेच वेडे व शहाणे लोकांमध्यें जितका फरक दिसतो, तितका फरक तुम्हांमध्ये दिसतो. रोगापासून तुम्ही वेडे नाहीत, परंतु ज्ञानाचे तुळणेंत वेडेच आहांत. आयुष्याचा उपयोग कसा करावा? आपला जन्म लोकांस कोणत्या प्रकारानें उपयोगी करावा ? आपण पृथ्वीवर होतों याची मागें स्मृती रहावी, याविषयीं उपाय करावा, सारासार विचार करून ईश्वराचें भय बाळगावें व खरेपणा धरावा, हें कोणी पहात नाही.

धर्मात्मे लोक पुष्कळ आहेत व आम्ही धर्म फार केला, असें ते म्हणतात. परंतु आंधळ्यास त्यांनीं जेवावयास घातलें काय ? दीनगरिबांस वस्त्रें दिलीं काय ? अज्ञानास ज्ञानी केले काय ? दुर्जनास सुजन केलें काय ? कोणता परोपकार आपले लोकांमध्यें त्यांनी केला ?

हल्ली इंग्रज लोक सर्व जिन्नस विलायतेतून आणतात व इकडील व्यापारी कोष्टी वगैरे उपाशी मरतात. तर त्या विद्या इकडे आणून लक्षावधि जिवांचें हित करण्याचा उद्योग कोणी केला आहे काय ? नाही.

कोणी म्हणतो, मीं कार्तिकमासी निरांजनें दिली; कोणी म्हणतो, मीं वैशाखांत मडकीं दिली, आवळे दिले, हा धर्म कशाचा ? हा मूर्खपणा आहे. भटांनी वेड लावावें आणि गृहस्थांनीं त्याचप्रमाणें नाचावें, यजमानास सांगावें कीं, उष्णकाळीं क्षीरभोजन करावें, म्हणजे यजमान पुण्य जाणून तसें करितो. पण वास्तविक यामध्ये पुण्य कशाचे ? आळशी लोक द्रव्य खाऊन जातात. आणि मालकास पुण्य पुण्य म्हणून ठकवितात, इतकेंच आहे. वास्तविक पुण्य हेंच की, यथायोग्य पात्र पाहून धर्म करावा. तान्हेला आहे त्यास पाणी द्यावें. कुंभ भरून ब्राह्मणास दिला व त्यांने तो जातांना टाकून दिला, कारण त्याचे घरीं हौद आहे व विहीर आहे.मग त्याला यजमानाचा कुंभांतील पाण्याचें काय करावयाचें आहे? अर्थातच तो तें मडकें ओतून टाकतो. तेव्हां हा धर्म कसा? परंतु हाच धर्म आहे; असें जे म्हणतात ते मूर्ख नव्हेंत काय?

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ३५/१९ नोव्हेंबर १८४८ )

११

# निरुद्योगीपणाच्या चाली

जा काळीं लोकांस कांहीं उद्योग नव्हता, पीक फार येत होतें व खावयास लोक कमी होते, त्या काळीं वेळ जाण्याचा किती एक युक्ति काढल्या आहेत. जसे आतां इंग्रज लोक सक्त मजुरीची शिक्षा देतात, याचें कारण असें आहे कीं, जे आळशी लोक असतात, ते चोऱ्या करून उपजीवन करितात, त्यांस मेहनत करण्याची संवय लागावी, म्हणून अशी शिक्षा देतात.

तद्वत् हिंदुशास्त्रांत किती एक कलमें आहेत, त्यांचा उपयोग पाहिला असतां कांहीं एक नाहीं व त्यांत नीति किंवा विद्याही नाहीं. फक्त काळ मात्र जावा अशीं कामें त्यांत कित्येक आहेत. तीं कोणतीं तें ऐका. पुराणांत असें आहे कीं, एक एक तांदूळ निवडावा

आणि लक्ष तांदूळ मोजून देवावर घालावे. माझे पहाण्यांत कित्येक धर्मशील अशा स्त्रिया आल्या आहेत कीं, त्यांनीं चातुर्मासांत चार महिने आपले डोळयांत रक्त उतरून घेऊन पांच लाख तांदूळ आणि गहू मोजले व त्यांच्या पुड्या बांधून मोठ्या प्रयत्नानें त्या देवास वाहिल्या. किती एक स्त्रिया अशा आहेत कीं, पांच वर्षेपर्यंत वाती करतात, रुद्रवाती, दगडवाती, धोंडेवाती अशा प्रकारचा कापसाचा वाती सगळा दिवस त्यांत घालून तयार करतात आणि एका दिवशीं त्याजवर दहा रुपयांचें तूप घालून देवळांत जाऊन त्या जाळतात, यापलीकडे कांहीं मूर्खपणा राहिला नाहीं. त्यांस पुसलें तर म्हणतात कीं, उपाध्येबावांनीं असें करावयास सांगितलें आहे व यामध्यें फार पुण्य आहे !

अहाहा ! काय हें पुण्य ! इतकीं वर्षे जर उपयोगी विद्या वगैरे शिकण्यांत खर्च केलीं तर केवढा लाभ होईल ? व केवढी योग्यता होईल ? परंतु पुराणिक देवळांत बसून ऐकणारास फार वेड लावतात कीं, मीं एक स्त्री पाहिली, तिचा नेम तर फारच विलक्षण होता तिनें गाईस दाणे घालावे आणि तिचे शेणांत जे दाणे पडतील तें शेण घेऊन गोमूत्रांत धुवावे, आणि ते दाणे निवडून दळून त्याची भाकरी करून खावी. याप्रमाणें चार महिने तिनें शेणांतील दाण्यांवर उपजीविका केली. कधीं पसाभर व कधीं चार पैसे भार सांपडत, तितकेच खाऊन ती राही. आणि भटजीबावा तिचें व्रत मोठें व ती मोठी पुण्यवान् बायको म्हणून स्तुति करीत. आणखी अशीच कित्येक व्रतें आहेत. त्यांचा अर्थ पाहिला तर दुसरा कांहीं नाहीं परंतु बायकांचा वेळ जात नाहीं, तो सुलभपणें जावा आणि त्यांस कांहीं उद्योग, सुख सांपडावें, म्हणून या युक्ति केल्या आहेत.

परंतु भोळसर लोक हेतु जाणत नाहींत. दुसरें असें आहे कीं, कार्तिकमासीं लोक दीपदान करितात व करंड्याफण्याचीं वायनें देतात. हा धर्म अगदीं उलटा आहे. कारण दोन पैशांचें टिवळें, त्यांत दमडीचें तूप घालून ब्राह्मणास देतात. त्यापासून जो दान घेतो त्याला कांहीं उपयोग नाहीं. आणि निरुपयोगी पदार्थ करण्यांत कारीगरांचा वेळ मात्र जातो. तसेच भटाचे करंड्याफण्या करतात, त्यांत काय अर्थ आहे ? ते जिन्नस कोणाचेही उपयोगी नाहींत. व्यर्थ पैसा जातो. दान घेणारास त्याचा उपयोग नाहीं, लोकासही नाहीं आणि देणाराचें मात्र नुकसान. तेव्हां असलीं मूर्खपणाचीं दानें हे लोक कशाकरितां करितात ? दान करण्याचा हेतु न जाणून शास्त्रांत लिहिलें आहे कीं, दीपदान करावें, म्हणून करितात. परंतु शास्त्रकारांचा हेतु जाणून दान करीत नाहीत. मला वाटतें एक समई गरिबास दिली आणि टिवळी पन्नास वर्षे दिली तरी फळ सारखेंच आहे. परंतु लोक मूर्खपणानें जांवयाचे गोष्टीसारखें शास्त्र चालवितात.

एक जांवई घरून निघून सासऱ्याचे घरीं जाऊं लागला. तेव्हां त्याचे बापानें त्यास सांगितलें कीं, सासरा कांहीं गोष्टी पुसेल तर कांहींस होय म्हणावें, व कांहींस नाहीं म्हणावें. जांवयानें तेवढीच गोष्ट ध्यानांत ठेवली आणि हेतु सोडून व आपली बुद्धि चालविण्याची सोडून दिली. पुढें सासऱ्याची गांठ पडली तेव्हां प्रथम प्रश्न त्यानें केला कीं,

" केव्हां आतांच आला ? " त्यानें " होय " म्हटलें. दुसरा प्रश्न " व्याह्याची प्रकृति बरी आहे ? " त्यानें " नाहीं " म्हणून उत्तर दिलें. तेव्हां सासऱ्यानें पुसलें " अहो; फार प्रकृति बिघडली आहे काय ? " जांवयानें उत्तर दिलें की, " होय. " " आम्ही भेटीस गेलों तर भेट होईल कीं नाहीं ? " त्यानें " नाही " म्हणून जबाब दिला. तेव्हां व्याही घाबरा झाला आणि जांवयास घेऊन व्याह्याचे घरीं आला, तों तो यथास्थित आहे. मग चौकशी केली तों जांवयानें असें सांगण्याचें कारण समजलें.

जसा हा मूर्ख जांवई सांगितल्या शब्दाप्रमाणें वागला आणि बुद्धि चालविली नाहीं, विचार केला नाहीं. तसे हिंदु लोक सांगितल्या शब्दाचे आहेत. त्यांस हेतु समजणें हें ठाऊक नाहीं. याप्रमाणेंच पाठ करणारे लोक आहेत. कोणी गीता पाठ करितो, कोणी विष्णु–सहस्त्रनामाचा पाठ करितो, कोणी सप्तशती वाचतो, कोणी वेद पाठ करितो. परंतु त्याचा अर्थ त्यास समजत नाहीं. पाठ करणारे लोक भारवाहक व वेडे आहेत. पण लोक ते अगदीं विसरले आणि पाठ करणाऱ्या लोकांचे फार दंभ वाढले. मला वाटतें कीं, एक अष्टकच संहिता सार्थ म्हणेल व शास्त्र जाणेल तर तो घनपाठ्यांपेक्षां श्रेष्ठ. परंतु पाठ करणारे हे अगदीं मूर्ख आणि मुख्य हिंदु लोक या स्थितीवर येण्याचें कारण व विद्या बुडण्याचें कारण मला हेंच दिसतें कीं, लोक नुसते पाठ करण्यावर फार प्रीति करूं लागले. तेणेंकरून अर्थ सुटतांच अनर्थ झाला. पाठ करावें म्हणून कोठें वचनें सापडतील. परंतु तीं वचनें जांवयाचे बापानें सांगितलेले बोधाप्रमाणें आहेत. तो हेतु सोडला असतां काहीं उपयोग नाहीं.

यास्तव लोकांनीं या चाली सोडून द्याव्या आणि शास्त्राचे हेतु जाणावे, हेंच उत्तम. नाहीं तर आणखी विद्येचा संहार होऊन लोक अति नीच अवस्थेला पावतील. यास्तव जे जे लोक विद्येचे मित्र असतील त्यांनीं सार्थ शिकण्याची पद्धति सुरू करावी म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा उद्धार होईल. आणि ज्या पुष्कळ मूर्खपणाच्या चाली आहेत त्या पोकळ आहेत, असें समजून लोक टाकतील. अशा चालींतून लोकांस मुक्त करावें, हाच ब्राह्मणाचा मुख्य धर्म. परंतु ब्राह्मण पोटार्थी व परस्वाधीन झाले. याजमुळें धर्मसुधारणेस त्यांस तोंड राहिलें नाहीं व ते ताटाखालचीं मांजरें झालें.

विद्या पुढें व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यांणीं यास झटावें. कारण दोन हजार वर्षांत हिंदुस्थानांत विद्येचें शून्य झालें आणि फार फार वाईट चाली लोकांत पडल्या. त्यांचा उपमर्द झाला पाहिजे. आणि विद्येचा विचार करणें हिंदु लोकांमध्यें नाहींसें झालें, याजमुळें त्यास क्षीणपणा फार आला, रांडपणा फार आला, शूरत्वहीन झाले, अभिमान-रहित झाले, व विचारशून्य व मूर्ख झाले. मागें काय होतें, पुढें काय होईल, येविषयींचा तर्क बुडाला. आज आठशें वर्षांपासून हिंदु लोकांच्यानें स्वराज्य रक्षवलें नाहीं. आठशें वर्षांत मुसलमान, इंग्रज वगैरे पाळीपाळीनें येऊन येथें राज्य करितात. व आपलेच लोकांचें सैन्य ठेवून आपलेच लोकांस मारतात याचें कारण " ज्ञानशून्यता. "

आपले लोकांस राज्यकुशलता असती तर मुसलमान हिंदुस्थानांत शिरून हस्तिनापूर व अयोध्या, येथें नबाब बादशहा कशास स्थापन झाले असते ? तसेंच कित्येक अनर्थपात

मुसलमान लोकांनीं केले ते झाले नसते. परंतु हिंदु लोक अज्ञानांत बुडाले, याजमुळें त्यांचे घरचें त्यांस पहावयाची शक्ति नाहींशी झाली. हे राजेरजवाडे आहेत, त्यांचेकडे पाहिलें म्हणजे समजतें. त्यात मुख्य तर ब्राम्हण हे पढतमूर्ख झाले आहेत. त्यांणीं सर्व लोकांच्या विद्या बुडविल्या आणि आपलीही हानि केली.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ४३/१४ जानेवारी १८४९ )

१२

# धर्मसुधारणा

कालमाहात्म्येंकरून हिंदु धर्माची सुधारणा करणें जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाही. चार लोक त्यांचें मनांत स्वदेशाचें कल्याण आहे. त्यांणीं एकत्र होऊन धर्मसुधारणा करावयास आरंभ करावा, हें मला बरें वाटतें. व असें करण्यांत एक मोठा लाभ आहे तो हा कीं, सरकार अनुकूल आहे. तेव्हां चार टोणपे शास्त्री पंडित यांस कशास आपण भ्यावें? यांचे हातून फार झालें, तर त्यांचे विपरीत जे करतील त्यांस जातीबाहेर ठेवण्याचें होणार; तर जात म्हणजे काय? जा समुदायामध्यें लोक पुष्कळ जमतात, ती जात होते व एकटा असला म्हणजे तो बहिष्कृत होतो, पहिल्यानें शीख लोक झाले, तेव्हां ते बहिष्कृत होते, व पुढें पुष्कळ झाले तशी तीच स्वतंत्र एक जात झाली.

त्याचप्रमाणें पहिल्यानें किरिस्ताव धर्म सुरू झाला. तेव्हां पूर्वीचे धर्मांचे जे पंडित होते त्यांणीं कांहीं दिवस त्यास भ्रष्ट म्हणून ठरविलें व पुढें ते पुष्कळ जमले तेव्हां जे भ्रष्ट म्हणत होते तेच उलटे भ्रष्ट झाले. इंग्रजांनीं किरिस्ताव धर्म घेतला तेव्हांपासून पुढें तो धर्म पुष्कळ भ्रष्ट झाला. याजकरितां त्यांतील कोणी एका पंडितानें धर्मसुधारणा केली, तेव्हां त्यांस लोकांनीं पुष्कळ वाईट म्हटलें. परंतु चार लोक एक जागीं जमले व लग्नसोयरीक आपसांत होईल इतका समुदाय असला म्हणजे कोणी या शास्त्री लोकांस पुसत नाहीं व असें करण्यास आधार आहे. शंकराचार्यांनीं किती एक शास्त्रमते रद्द केलीं; किती एक चालू केलीं. असें कालकरून शास्त्रास चालन पाहिजे. ईश्वरासंबंधी धर्म आहे तो मात्र अचल आहे. परंतु शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत. यास्तव

" केव्हां आतांच आला ? " त्यानें " होय " म्हटलें. दुसरा प्रश्न " व्याह्याची प्रकृति बरी आहे ? " त्यानें " नाहीं " म्हणून उत्तर दिलें. तेव्हां सासऱ्यानें पुसलें " अहो; फार प्रकृति बिघडली आहे काय ? " जांवयानें उत्तर दिलें की, " होय. " " आम्ही भेटीस गेलों तर भेट होईल कीं नाहीं ? " त्यानें " नाही " म्हणून जबाब दिला. तेव्हां व्याही घाबरा झाला आणि जांवयास घेऊन व्याह्याचे घरीं आला, तों तो यथास्थित आहे. मग चौकशी केली तों जांवयानें असें सांगण्याचें कारण समजलें.

जसा हा मूर्ख जांवई सांगितल्या शब्दाप्रमाणें वागला आणि बुद्धि चालविली नाहीं, विचार केला नाहीं. तसे हिंदु लोक सांगितल्या शब्दाचे आहेत. त्यांस हेतु समजणें हें ठाऊक नाहीं. याप्रमाणेंच पाठ करणारे लोक आहेत. कोणी गीता पाठ करितो, कोणी विष्णु-सहस्रनामाचा पाठ करितो, कोणी सप्तशती वाचतो, कोणी वेद पाठ करितो. परंतु त्याचा अर्थ त्यास समजत नाहीं. पाठ करणारे लोक भारवाहक व वेडे आहेत. पण लोक ते अगदीं विसरले आणि पाठ करणाऱ्या लोकांचे फार दंभ वाढले. मला वाटतें कीं, एक अष्टकच संहिता सार्थ म्हणेल व शास्त्र जाणेल तर तो घनपाठ्यांपेक्षां श्रेष्ठ. परंतु पाठ करणारे हे अगदीं मूर्ख आणि मुख्य हिंदु लोक या स्थितीवर येण्याचें कारण व विद्या बुडण्याचें कारण मला हेंच दिसतें कीं, लोक नुसते पाठ करण्यावर फार प्रीति करूं लागले. तेणेंकरून अर्थ सुटतांच अनर्थ झाला. पाठ करावें म्हणून कोठें वचनें सापडतील. परंतु तीं वचनें जांवयाचे बापानें सांगितलेले बोधाप्रमाणें आहेत. तो हेतु सोडला असतां काहीं उपयोग नाहीं.

यास्तव लोकांनीं या चाली सोडून द्याव्या आणि शास्त्राचे हेतु जाणावे, हेंच उत्तम. नाहीं तर आणखी विद्येचा संहार होऊन लोक अति नीच अवस्थेला पावतील. यास्तव जे जे लोक विद्येचे मित्र असतील त्यांनीं सार्थ शिकण्याची पद्धति सुरू करावी म्हणजे विद्येचा व ज्ञानाचा उद्धार होईल. आणि ज्या पुष्कळ मूर्खपणाच्या चाली आहेत त्या पोकळ आहेत, असें समजून लोक टाकतील. अशा चालींतून लोकांस मुक्त करावें, हाच ब्राह्मणाचा मुख्य धर्म. परंतु ब्राह्मण पोटार्थी व परस्वाधीन झाले. याजमुळें धर्मसुधारणेस त्यांस तोंड राहिलें नाहीं व ते ताटाखालचीं मांजरें झालें.

विद्या पुढें व्हावी, अशी ज्याची इच्छा असेल, त्यांणीं यास झटावें. कारण दोन हजार वर्षांत हिंदुस्थानांत विद्येचें शून्य झालें आणि फार फार वाईट चाली लोकांत पडल्या. त्यांचा उपमर्द झाला पाहिजे. आणि विद्येचा विचार करणें हिंदु लोकांमध्ये नाहींसें झालें, याजमुळें त्यास क्षीणपणा फार आला, रांडपणा फार आला, शूरत्वहीन झाले, अभिमान-रहित झाले, व विचारशून्य व मूर्ख झाले. मागे काय होतें, पुढें काय होईल, येविषयींचा तर्क बुडाला. आज आठशें वर्षांपासून हिंदु लोकांच्यानें स्वराज्य रक्षवलें नाहीं. आठशें वर्षांत मुसलमान, इंग्रज वगैरे पाळीपाळीनें येऊन येथें राज्य करितात. व आपलेच लोकांचें सैन्य ठेवून आपलेच लोकांस मारतात याचें कारण " ज्ञानशून्यता. "

आपले लोकांस राज्यकुशलता असती तर मुसलमान हिंदुस्थानांत शिरून हस्तिनापूर व अयोध्या, येथें नबाब बादशहा कशास स्थापन झाले असते ? तसेंच कित्येक अनर्थपात

मुसलमान लोकांनीं केले ते झाले नसते. परंतु हिंदु लोक अज्ञानांत बुडाले, याजमुळें त्यांचे घरचें त्यांस पहावयाची शक्ति नाहीशी झाली. हे राजेरजवाडे आहेत, त्यांचेकडे पाहिलें म्हणजे समजतें. त्यात मुख्य तर ब्राम्हण हे पढतमूर्ख झाले आहेत. त्यांणीं सर्व लोकांच्या विद्या बुडविल्या आणि आपलीही हानि केली.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ४३/१४ जानेवारी १८४९ )

## १२

# धर्मसुधारणा

कालमाहात्म्येंकरून हिंदु धर्माची सुधारणा करणें जरूर आहे. त्याशिवाय या लोकांचा परिणाम लागणार नाही. चार लोक त्यांचें मनांत स्वदेशाचें कल्याण आहे. त्यांणीं एकत्र होऊन धर्मसुधारणा करावयास आरंभ करावा, हें मला बरें वाटतें. व असें करण्यांत एक मोठा लाभ आहे तो हा कीं, सरकार अनुकूल आहे. तेव्हां चार टोणपे शास्त्री पंडित यांस कशास आपण भ्यावें? यांचे हातून फार झालें, तर त्यांचे विपरीत जे करतील त्यांस जातीबाहेर ठेवण्याचें होणार; तर जात म्हणजे काय ? जा समुदायामध्यें लोक पुष्कळ जमतात, ती जात होते व एकटा असला म्हणजे तो बहिष्कृत होतो, पहिल्यानें शीख लोक झाले, तेव्हां ते बहिष्कृत होते, व पुढें पुष्कळ झाले तशी तीच स्वतंत्र एक जात झाली.

त्याचप्रमाणें पहिल्यानें किरिस्ताव धर्म सुरू झाला. तेव्हां पूर्वीचे धर्मांचे जे पंडित होते त्यांणीं कांहीं दिवस त्यास भ्रष्ट म्हणून ठरविलें व पुढें ते पुष्कळ जमले तेव्हां जे भ्रष्ट म्हणत होते तेच उलटे भ्रष्ट झाले. इंग्रजांनीं किरिस्ताव धर्म घेतला तेव्हांपासून पुढें तो धर्म पुष्कळ भ्रष्ट झाला. याजकरितां त्यांतील कोणी एका पंडितानें धर्मसुधारणा केली, तेव्हां त्यांस लोकांनीं पुष्कळ वाईट म्हटलें. परंतु चार लोक एक जागीं जमले व लग्नसोयरीक आपसांत होईल इतका समुदाय असला म्हणजे कोणी या शास्त्री लोकांस पुसत नाहीं व असें करण्यास आधार आहे. शंकराचार्यांनीं किती एक शास्त्रमते रद्द केलीं; किती एक चालू केलीं. असें कालकरून शास्त्रास चालन पाहिजे. ईश्वरासंबंधी धर्म आहे तो मात्र अचल आहे. परंतु शास्त्रांतील कायदे जरूर वरचेवर फिरले पाहिजेत. यास्तव

स्वदेशाचे हितकर्ते यांणी इतका विचार करावा कीं, आपले पक्षांत पुष्कळ लोक येतील कीं नाहीं? मला वाटतें कीं, या गोष्टीची काळजी नको धर्मसुधारणा प्रसिद्धपणें चालू केल्यास बहुत लोक आपल्यास येऊन मिळतील. पुष्कळ लोकांच्या मनांत आहे, परंतु संधि नाहीं. यास उपाय नाही. मुख्य धर्मसुधारण्याचीं कलमें अशीं आहेत.

( प्रथम ) सर्वांनी ईश्वराचें भजन अंतःकरणापासून करीत जावे. ( दुसरें ) जसा आपला जीव तसा दुसऱ्याचा जीव मानावा. ( तिसरें ) मुंज, लग्न, प्रेतक्रिया हे तीन संस्कार ठेवून बाकीचे सर्व रद्द करावे. ( चवथें ) जें कर्म करणें तें स्वभाषेंत अर्थ समजेल असें करावें. भजन, पूजन संस्कार सर्व जांचे त्यांचे भाषेंत करावें. संस्कृत भाषा पाहिजे ते शिकतील; परंतु जांस येत नाहीं त्यांणीं संस्कृत भाषेंत कोणतें कर्म करणें जरूर नाहीं. (पांचवें) प्रत्येकास आपले विचाराप्रमाणें आचार व बोलण्या-लिहिण्याची मोकळीक असावी. त्यांस प्रतिबंध असू नये.

(सहावें) स्त्रीपुरुषांचे अधिकार धर्मसंबंधी कामांत व संसारांत एकसारखें असावे. येणेंकरून पुनर्विवाह व मोठेपणीं लग्न झाले. (सातवें) आचारांपेक्षां नीति प्रमुख असावी. आचाराचें महत्त्व हल्लीं आहे तसें असूं नये. आतां किती एक बायका लबाड असतात; परंतु पिंपळाच्या प्रदक्षिणा अंतरीत नाहींत; हें कांहीं उपयोगी नाहीं. (आठवें) अर्थाशिवाय कांहीं एक म्हणूं नये. ( नववे ) मनुष्यमात्रास तुच्छ मानू नये. जाति–अभिमान नसावा. सर्वांशीं सारखें दयापूर्वक वर्तावें. सर्वांचें कल्याण करावें. (दहावें) स्वदेशाची प्रीति व त्याचें कल्याण विशेषेंकरून मनांत बागवावे ( अकरावें ) जांस जो पाहिजे तो त्याणें रोजगार करावा. (बारावें) गुणेंकरून व योग्यतेकरून जातिभेद मानावा. कुलेंकरून मांनू नयें. (तेरावें) सरकाराहून प्रजेचे अधिकार अधिक असावे, म्हणजे जे जे रयतेच्या हिताचे, कायदे आहेत, ते सरकारशीं भांडून घेत जावे. (चवदावें) राजानें जे नियम केले असतील. ते व जे ईश्वरी बुद्धिसूचित नेम आहेत ते मानावे.

(पंधरावें) विद्यावृद्धीकरितां सर्वांनी मेहनत करावी. दुःखितास सुख, रोग्यास औषध, मूर्खास ज्ञान, व दारिद्र्यास द्रव्य शक्त्यनुसार देण्यास अंतर करूं नये. (सोळावें) शेवटचें कलम असें आहे कीं, सत्यानें सर्वांनीं चालावें. सत्याचे विरुद्ध वर्तणूक करूं नये. विद्येमध्यें जा जा सत्य गोष्टी आहेत, त्यांचाच शोध करण्यास आळस करूं नये आणि सापडतील त्या सर्व प्रसिद्ध कराव्या. व विद्या व ज्ञान संपादन करण्यास सर्व सारखे, अशी मोकळीक असावी.

या दर एक कलमाविषयीं एक ग्रंथ उदाहरणेंसहित करावा, असें माझे मनात फार आहे. व इतक्या गोष्टी मीं लिहिल्या आहेत. त्यांस कांहीं शास्त्र व हिंदु धर्म प्रतिकूल नाहीं. सर्व हिंदु धर्मांतीलच आहे; परंतु त्याचा शोध मात्र केला पाहिजे. एके ठिकाणीं सांपडणार नाहीं. परंतु चहोंकडून मिळविलें म्हणजे सांपडेल.

जसा गीतेंत एक ईश्वर आहे; इतर देवता भजूं नयेत, अशीं स्पष्ट वाक्यें पुष्कळ आहेत; तीं घ्यावीं. जरी तीं पुराणांस विरुद्ध असतील तरी पुराणें सोडावीं. जे चांगलें तें घ्यावें. कारण कीं, संस्कृत भाषेंत अनंत ग्रंथ आहेत. जा जा ऋषींच्या जसें मनांत आलें तसें त्यांणीं लिहिलें आहे. तेव्हां त्यांत एकच पुस्तक आपल्या उपयोगी सांपडणार नाहीं. परंतु सर्वांचे ऐक्य केलें तर करतां येईल. याप्रमाणें एक ग्रंथ करून त्यांत शुद्ध नीति प्रतिपादन करावी.आणि हिंदु लोकांचें विशेष नांव ठेवावें. आणि त्यांणीं कसें वागावें त्याचे नियम त्यांत ल्याहावे. आणि तेंच पुस्तक आपलें शास्त्र समजून त्याप्रमाणें चालावें.

खचित एकटचा ऋषीनें आपल्या अकलेनें लिहिलेले शास्त्रापेक्षां चार मतें पाहून जें शास्त्र आपण तयार करूं, ते सर्वांपेक्षां उत्तम होईल, यांत संशय नाही. शें–दोनशें लोकांनीं याप्रमाणें नांव धारण करून वेगळी फळी पाडावी. मग आपलेमध्यें हा धर्म चांगला असें पाहून पुष्कळ लोक येतील. जा मुलीचा नवरा मरेल ती एखाद्या सोद्याबरोबर जाते, त्यापेक्षां आपले धर्मांत येऊन एकाद्याशीं लग्न करणार नाहीं काय ? हजारों करतील. हिंदु धर्मांत सांप्रत जा जांस अडचणी पडतील ते सर्व तोटा करून या शुद्ध धर्मांत मिळतील. मग आपली मंडळी प्रबळ झाली म्हणजे जें पाहिजे तें कार्य करता येईल.

सांप्रत एकमेकांचे विरोध व विभक्तपणे फार आहेत. कोकणस्थ देशस्थांशी सोयरीक करीत नाहींत या अडचणी मोडून लोक गंगाजळ-निर्मळ होतील आणि त्यांचें एक मत व एक धर्म होईल. आणि जें पाहिजे तें करतां येईल. असें केल्यावांचून सांप्रतकाळीं हिंदु धर्म भ्रष्ट झाला, त्याचे हातून आम्ही सुटणार नाहीं. हा धर्म सुधारला पाहिजे. माझें सुधारण्याचें तात्पर्य असें नाहीं कीं, सर्वांनीं एकजात व्हावें. कारण कीं हल्लीं नीच जातीचे लोक मोठेपणांत आले नाहींत. याजकरितां त्यांची सोयरीक कोणी अर्थातच करणार नाही. जास पांच रुपये महिना आहे, तो आपले योग्यतेचा गृहस्थ पाहील. केवळ गांवा-बाहेरच्या महाराशीं अथवा भिकाऱ्यांशीं लग्न करणार नाहीं, हें उघड आहे.

परंतु माझा हेतु इतकाच कीं, विरोध मोडावे आणि लोकांनीं परस्पर ममतेनें वागावें. व जसे जसे कालेंकरून हे अज्ञानपाश सुटतील तसे तसे सोडवावे, परंतु या कार्यास आरंभ करावा म्हणजे बरें पडेल. बहुत लोक वाट पाहतात. ब्राह्मण महाराची निंदा करतात. त्यास शिवत नाहींत व इंग्रजांजवळ प्रीतीनें बसतात. हें पाहून मला आश्चर्य वाटतें. शास्त्राप्रमाणें पाहिलें असतां महार बरे; परंतु इंग्रजांचें मंडळींत ब्राह्मण असूं नयेत. तत्रापि हे ब्राह्मण मूर्ख. त्यांस समजत नाहीं; म्हणून मीं हा उपाय योजिला आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ६४/१७ जून १८४९ )

## १३

# कलियुग

पूर्वी उद्योगावर लोकांची फार दृष्टी होती. भिक्षा मागणारे अशक्त, दुर्बल किंवा विद्वान आहेत कीं नाहीं हें पाहात होते. निरुद्योगी लोकांस भिक्षा देत नव्हते. काम देऊन दान देत असत. ही बुद्धि कलियुगांत नाहींशी झाली. आतां दान करणार म्हणतात कीं, काम घेतलें तर तो धर्म कशाचा ? ती तर चाकरी झाली. फुकट विनाकरण निरुपयोगानें जें देणें त्याचें नांव दानधर्म असें समजतात. याजमुळें मागे ज्या विद्यादिकांचे आरंभ झाले होते ते तितकेच राहिले. मर्जीप्रमाणे वर्षासन, मर्जीप्रमाणे इनाम राजे देऊ लागले. तेव्हां मेहनत कोणी करावी ? शालजोडया पांघरून दरबारास जावें, राजास नारळ द्यावा आणि आशीर्वाद द्यावा, इतक्यावर धोरण राहिलें. पूर्वी चरकसुश्रुतादिकांनीं वैद्यक पाहून अनेक वनस्पतींचें गुणपाठ लिहिले, रसायन कल्पना केली; परंतु पुढें त्यांचा तपास कोणी केला नाहीं. उलट वैद्यांनी ब्राह्मण म्हणून कर्मठपणा वाढवून शरीर व शस्त्रविद्या यांचा अभ्यास सोडून दिला. तें ब्राह्मणांचे कर्म नाहीं असें म्हणूं लागले. बाळंतिणीस शिवलें तरी वैद्यास धर्मशास्त्राप्रमाणें दोष नाहीं. तो त्याणीं बळेंच अंगावर घेऊन सोंवळें वाढविलें. त्याचा परिणाम असा झाला कीं, वैद्यांची हल्लीं एक पैशाची किंमत नाहीं आणि सर्व औषधी उपाय इतकेंच आहे. सर्व विद्येवर पाणी घातलें, तेव्हां लोक डाक्टराकडे जातील यांत नवल काय ?

आपले राजे प्रजाभक्षक झाले, रयतेस चैन पडूं देईनात; तेव्हां ईश्वरानें परदेशस्थ लोक आणून त्यांस सार्वभौम केलें. त्यांचे स्वाधीन रयत झाली व स्वराज्यास कंटाळले यांत नवल काय? पहिले राजे यांणीं अनीति व अधर्म करून झेंडे लाविले, परस्पर लुटूं लागले. पेंढारी उभे करून रयतेस लुटवूं लागले, मोठ्या फौजा ठेवून लोकांस त्रास दिल्हे. शिवाय खाजगी रीतीनें लोकांस नाराजी केलें, तेव्हां ईश्वरानें त्यांचे वंशक्षय केले यांत काय आश्चर्य ? लोक द्रव्यादिकांचे वृद्धीमुळे मदांध होऊन गेले तेव्हां ईश्वरी संकेतानें या देशास दरिद्र आले. कारण दरिद्रासारखी दुसरी शाळा नाहीं. दरिद्र जरी कठीण वाटतें तरी दरिद्राचे योगानें लोकांच्या भ्रांति जातात, उद्योगाची इच्छा होते, ज्ञान संपादनाची इच्छा होते, हीं, सर्व कार्यें दरिद्राशिवाय घडत नाहींत, व दौलतीचे परिणाम त्याचे विरुद्ध आहेत हें आपण या देशांत अद्यापि जे कोणी दौलतदार आहेत त्यांचे वर्तणुकीकडे, त्यांचे ज्ञानाकडे व त्यांचे उद्योगाकडे आणि भोळसरपणाकडे दृष्टी दिली तर चांगलें ध्यानांत येईल. जितक्या शास्त्रांस पूर्वी महर्षीचे काळीं आरंभ झाला होता, तीं सर्व शास्त्रें पुढें त्यांचे वंशजांनीं मातींत टाकिलीं. ज्योतिष, शिल्प, धनुर्वेद, धर्मशास्त्र इत्यादिक स्वाध्यायांतूनच गेलीं व त्यांच्या ठिकाणीं पोट भरण्याचीं ढोंगें उभीं झालीं.

लग्न वगैरे यांस सूत्रांत कोठें मुहूर्त लिहिला नाहीं तो बळेंच लावून घेतला, वैद्यकाचे ठिकाणीं अनुष्ठानें, मंत्रजप हीं आलीं; शिल्पास उत्तेजन नाहींसे झालें धनुर्वेद लयास गेला; रिकामे लोक पंडित म्हणून डौल मारूं लागले. ही ब्राह्मणांची स्थिति दुसऱ्या लोकांनीं पाहून असें मनांत आणिलें कीं आपणहीं या ढोंगांत शिरून पोट भरायचें साधन करावें. बाबालोक यांणीं भक्तपणाचे वेष काढून त्यांणीं आपली पोळी पिकविली. याहून कलि तो कोणता? साखरेतुपाचा सिधा घेऊन भांग फुंकण्यांत सर्व काळ काढावा आणि साधु म्हणवावें व आशीर्वादानें कल्याण करण्याचा बाणा राखावा; विद्येनें व ज्ञानानें पाहिलें तर अक्षरशत्रु, लोकांस उपयोग पाहिला तर तिळमात्र नाहीं सद्गुण, सदाचाराची वार्ता देखील नाही ? तत्रापि बाबा साधु गणले जातात तेव्हां हाच कलि नव्हे काय ? आतां एक प्रश्न असा आहे कीं, " यथा राजा तथा प्रजा ". परंतु ही चूक दिसते. आधीं प्रजा बिघडते नंतर राजे दुष्ट होतात. प्रजा जर बलाढ्य व जाणती असली तर राजाची दुष्ट होण्याची मगदूर नाहीं. कारण कीं राजे सर्वदा प्रजाधीन असतात. परंतु प्रजा सोसक, अज्ञान, दुर्बल, अशी झाली म्हणजे राजास निर्भय वाटून मनस्वीपणानें वागतां येतें हेंच सत्य आहे.

कलीमध्यें, दुसरें काय झालें त्याचा विचार करतां असें दिसतें कीं, जाती अनेक बाढल्या. चार जाती कर्मभेदाने आहेत असें प्राचीन ग्रंथांत आहे. त्या ठिकाणीं हल्लीं चार हजार भेद कसे झाले ? याचें कारण इतकेंच दिसतें कीं, देशाभिमान जाऊन कुलाभिमान वाढला. आग्रह, अज्ञान व बुद्धिहीनता इत्यादि वृद्धिगत होऊन आपसांतील तंटे सुरूं झाले त्यापासून लोकांत द्वेष, भेद, व छळ, हे उत्पन्न होऊन लोक कोणत्याही उपयोगी नाहींत असें झालें. पराक्रमी होण्यास जी एकी लागते ती नाहींशी झाली आणि घरांत एकमेकांचे शत्रु आणि परक्यास अतिशय वश असें झालें. याप्रमाणें अविद्येचा परिणाम जाहला. स्वदेशीय लोकांत भरंवसा ठेवण्यासारखा कोणी कोणास दिसेना. सोनार ब्राह्मणास वाईट म्हणतात; ब्राह्मण परभूंस; परभु पांचकळशांस; पांचकळशी जिनगरांस; जिनगर कुळंब्यांस वाईट म्हणतात असे घरचे तंटे फार माजले. सर्व लोक पसंत करतील असा कोणी प्राणी राहिला नाहीं. कारण, कीं ज्यास चांगला निवडावा त्यांस कांहीं तरी जात असेलच आणि ती असली म्हणजे त्यास अभिमान आलाच, तेव्हां, ज्यास जातीं नाहीं म्हणजे परदेशी असा धनी बरा वाटूं लागला. जातीचा असल्यास उंच नीचपणे तंटे सुरूं करून उपद्रव होतो असें सर्वांस वाटतें. याचें प्रमाण पहा, कीं, सांगली, अक्कलकोट या ठिकाणीं ब्राह्मण कारभारी असताना लोकांनी युरोपियनच असावे असें मागून घेतलें. कारण जातीवाला येईल तर त्याच्या अदावती फार, व अभिमान फार. ते लोकांस सहन होत नाहीं हें कलियुगांत एक विचित्र दिसून येतें. ज्ञातीचे जुलुम दर एक शहरीं आहेत. दक्षिणेंत व गुजराथेत व इतर ठिकाणीं इतके फाजील आहेत कीं, ज्ञातीचा अधिकारी लोकांस नकोसा होतो. असें बहुत ठिकाणीं पाहण्यात आलें आहे.

कलीमध्यें भजन हें मुख्य धरलें आहे. यामुळें बहुत लोक भजनास लागले.

शास्त्राभ्यास किंवा नवीन ग्रंथ करणे व जुने पहाणें ही सर्व बुद्धी जाऊन कोणी माळा घेऊन, कोणी चाळ बांधून, कोणी वारी करून भक्त होतात. येणेंकरून विद्या बुडाली. विद्या हें परमार्थाचें साधन नव्हे असें ठरलें. आणि भजन करणें हें परमार्थाचें साधन असें मत चालविणारे साधु, संत बाबा वगैरे बहुत झाले आहेत. तेणेंकरून विद्येचे शोध बुडाले. तसेच वेदांतीं हे विरक्तपणा दाखवून उदासीनपणानें कांहींच करीत नाहींत. कोणताही उद्योग आपले हिताचा असेल तर करितात. परंतु दुसऱ्याच्या हिताचा उद्योग असला तर तेथें सर्व वेदांत लागू करतात. याजमुळे अशा मताचे पुरूष केवळ स्वार्थी व निरुपयोगी होतात. अपूर्व वेदभाष्य, वेदार्थयत्न षड्दर्शनचिंतनिका नवीन पंचांग इत्यादि नवीन ग्रंथ हल्लीचे काळात चालले आहेत. याजवरून चांगलें चिन्ह दिसतें. कलि म्हणजे मूर्खपणा व अज्ञान हीं हटविण्याचे यत्न चालू आहेत. परंतु लोक त्यास राजी नाहींत, लोकांस अज्ञानच पाहिजे. अशा ग्रंथास राजादिकांची मदत असावी तशी नाहीं. याजमुळे हे ग्रंथ लौकर बाहेर पडतील असें नाहीं. परंतु लोकांमध्ये विचार प्रगट झाला याचे हें चिन्ह आहे. आता या काळीं प्राचीन ग्रंथांतून अथवा युरोपियन लोकांचे ग्रंथांतून विषय घेऊन ते प्रसिद्ध करणें हें फार जरूरीचें काम आहे. परंतु राजे लोक अशा कामात द्रव्य खर्चीत नाहींत. त्यांचा द्रव्य खरचण्याचा मार्ग वेगळाच आहे. त्याजमुळे कली हटविण्याचे कामास उत्तेजन असावें तितकें नाहीं. लोक गरीब आहेत त्यांच्याने होईल तितकें चाललें आहे.

मागील युगांपेक्षां कलीयुगात बौद्धाचे संबंधाने दयाधर्म जास्ती वाढला. अनुस्तरणी गवालंभादि क्रूरधर्म रद्द जाहाले. लोक सात्विक जाहले खरे परंतु श्रीमंताचे मुलांसारखे किंवा खेडेगावांतील अज्ञान कुणब्याप्रमाणें फसण्यास पात्र झाले आहेत. त्यांचे डोकीवरील पागोटीं नेलीं तरी ते स्वस्थ राहतात. कपाळाला हात लावून कलि झाला, कलि झाला म्हणतात. मुसलमानांनी स्वाऱ्या करून मुलतान, लाहोर, कनोज ही शहरें लुटून नेलीं तरी हे कोण कोठून येतात याचा त्यास ठिकाण नव्हतां. परदेशांतील लोकांस म्लेंच्छ म्लेंच्छ म्हणत व आपणास कर्मकांडामुळे श्रेष्ठ म्हणत.आर्बस्थानांत पैगंबराने धर्म चालविला.त्यांणी इराण घेतलें, काबूल घेतलें, हिंदुस्थानावर येऊं लागले तरी त्यांचीं बातमी किंवा वर्तमान आपले आर्य लोकांस मिळालें नाहीं. महाभट्टारकाचा (मुसलमानाचा) संचार होऊं लागला इतकें प्राचीन पंडितांनीं लिहिलें आहे. परंतु त्यास लोक आपलें काम करावयास लावितात त्याप्रमाणें आर्यांची स्थिती जाहाली. जें शहर लुटिलें तेथील लोकांनीं रडावें. शेजारच्यांनीं स्वस्थ बसावे अशी शांतता धरली. एकही आर्य ग्रंथकाराने मुसलमानाचा इतिहास लिहिला नाहीं. हालचाल नाहींशी झाली. हा उदासीनतेचा स्वभाव अद्यापहीं गेला नाहीं. कोणी भक्त, कोणी वेदांती कोणी स्वार्थी असे लोक जाहले. देशाचे संबंधाने कळवळा नाहींसा झाला. ज्ञातीच्या वृद्धीमुळे लोक फुटले. एकमेकांची काळजी सुटली. हा उदासीनपणा सुटण्यास ज्ञानवृद्धी बहुत जाहली पाहिजे. जेथें इंग्रजी राज्य आहे तेथे मात्र ज्ञानवृद्धि होण्यास आरंभ जाहला आहे. स्वदेशीय संस्थाने तशीच मागे पडली आहेत. स्वधर्म म्हणूनच विद्यावृद्धि करावी हा धर्म ब्राह्मणांनीं सोडला. ते असे म्हणतात कीं आम्हांस पोटभर देणार कोण आहे ? आम्हांस हजारों रुपये देणारा भेटेल तर आम्हीं

मेहेनत करूं असे म्हणून म्हणून आज पंधराशे वर्षे हिंदुस्थानची लेखणी बंद जाहली. मेहनत करणारे काय ते हेमाद्रि माधव इत्यादि प्रयोगकार.परंतु त्यांनीं ज्ञानवृद्धि न करितां उलटी करून निरुपयोगी ग्रंथ वाढविले.

मागील युगापेक्षां कलींत नवीन काय जाहले याचा विचार केला असतां असें दिसतें कीं अज्ञान वाढून लोकांमध्यें रीतिभाती वाईट पडल्या, ऐक्यता नाहीशी झाली, तंटे वाढले, अध्ययनक्रम बुडाला, बायकांवर जुलूम वाढला, सर्व शास्त्रविद्येची हयगय झाली. ढोंग, सोवळें, कर्मठपणा व नीचपणा वाढला, सद्धर्मास ग्लानी आली, सत्य गेलें. आर्जवी लोक, डोळयांत माती टाकणारे पुष्कळ झाले असा प्रकार दिसतो. आतां अशा काळीं आपला प्रयत्न काय असावा हेंही जाणलें पाहिजे. मागील ग्रंथकार तर असेच धरून बसले आहेत कीं, यांस कांहीं उपाय नाहीं, हें व्हावयाचेंच. लोक वाईट स्थितीत जावयाचेच असें लिहून स्वस्थ बसले आहेत. परंतु असे रडत बसल्यानें कली असे नाहीं. तो अजिक्य आहे, हे म्हणणेंही केवळ अधैर्याचें आहे. आपण सर्वांनी लक्षांत धरले पाहिजे कीं, असत्य, अधर्म, ढोंगीपणा, विद्याहीनता, बुद्धिहीनता, बलहीनता हीं सर्व हटण्याजोगी आहेत व याजविषयीं प्रयत्न करणें उचित आहे. आपली भ्रांति आपण टाकून जागृत होऊ तर दुसऱ्यास जागृत करू, आणि सत्याची व विद्येची वृद्धी करतां येईल. अनेक कलांचा हा कलंक धुवून टाकतां येईल आणि सत्ययुग म्हणजे आपली चांगली स्थिती आपणास पुनरपि ईश्वरकृपेने प्राप्त करून घेता येईल अशी उमेद धरावी आणि प्रयत्नास मागे पडू नये. कालेंकरून या देशातील राजे व बडेलोक हल्ली वाईट स्थितीत आहेत तेही बरे होतील आणि त्याकडून आपल्यास पाहिजे ती मदत मिळेल आणि ईश्वराचे आशीर्वादाने हे महत्कृत्य सिद्धीस जाईल असें लक्षून सर्वांनी चालावे. हे सार सर्वांपुढे ठेविले आहे.

( कलियुग )

१४

## स्त्रियांची स्थिती

सांप्रत काळी हिंदु लोकांचे स्त्रियांची अव्यवस्था व दुर्दशा फार आहे, स्त्रिया पुरुषांवर अमल करीत असतात, व त्यांचे स्वभावाप्रमाणे बहुत लोकांस वागावें लागतें.

त्यांचे गुण लहान मुलांस प्राप्त होतात. त्याजमुळें स्त्रिया शहाण्या असणें जरूर आहे. जा देशांत स्त्रियांचे अधिकार लोक मानीत नाहींत त्या देशांत लोकांची स्थिति वाईट असते. हिंदु लोकांत फारच मूर्खपणा आहे; यास्तव स्त्रियांची दुर्दशा फार आहे. प्राचीन काळीं असे नव्हतें.

कारण मागील काळचे कथेवरून पाहिले असतां असे दिसते कीं, पूर्वी हिंदु लोकांत स्त्रियांचा मान फार होता. हल्लीं लग्नात स्त्रिया पुढें चालतात व मागें पुरुष असतात, व पुण्याहवाचन वगैरे धर्मसंबंधी कांहीं एक कर्म स्त्री बरोबर बसल्यावांचून होत नाहीं. यांजवरून स्त्रियांचा प्रमुखपणा मानला आहे, असें दिसतें. राज्याभिषेकामध्येंही राणीस मान फार आहे.

आतां ब्राह्मणांच्या समजुती आहेत, त्या पूर्वी असत्या तर शास्त्रांत प्राचीन ब्राह्मण असें न लिहिते. तेव्हां आता स्त्रियांचा अपमान होण्यास कारण काय, याचा शोध लाविला असतां असें दिसतें कीं, हिंदुस्थानांत इंग्रज येण्याचे पूर्वी मुसलमान आले, त्यांस सांप्रत आठशें वर्षे झालीं. तेंव्हां त्या लोकांच्या रानटी चाली फार होत्या. त्या सर्व हिंदु लोकांस लागल्या. म्हटलें आहे कीं, " तथा राजा तथा प्रजा" व " राजा कालस्य कारणम्" असें भारतांत आहे. हिंदु लोकांच्या सुंदर स्त्रिया पाहून मुसलमान जबरीनें घेऊन जात, याजमुळें स्त्रियांस झाकून ठेवणें जरूर झालें व मुसलमान लोक फार मूर्ख आहेत; त्यांची चाल जनानखाना तुरुंगासारखा असावा अशी आहे, तीच चाल हिंदु लोकांस लागली आहे, मुसलमान लोक यांचें राज्य पांचशें वर्षे हिंदुस्थानांत चाललें. त्यामध्यें हिंदु लोकांची स्थिति फार बदलली, भाषा बदलली, फारशी शब्द चालू झाले. जमाखर्च, हिशेब, गाणें, रीतीभाती सर्व मुसलमानांच्या चालू झाल्या. पूर्वीं संस्कृत सनदा देण्याची चाल होती, ती जाऊन फारशी सनदा देऊ लागले. पेशव्यांचें राज्य होतें तरी त्या वेळीं हिंदु लोकांस मूळचे स्थितीस आणावयाचा प्रयत्न कोणीं केला नाहीं. जास्ती जास्ती घसरतच गेले. हिंदु लोक ताबूत करूं लागले. फकीर होऊं लागले. धर्मभ्रष्ट झाले. त्याजमुळें हिंदु लोक स्त्रियांचा अपमान करून त्यांस, जनावरांप्रमाणें मानूं लागले. पूर्वीं रामाबरोबर सीता सभेंत बसत होती. पांडव द्रौपदीसहित बसत होते. पण लोकांचीं मनें आता इतकीं बिघडलीं आहेत कीं, जर त्यांस हें सांगितलें, तर ते देव होते, असा जबाब देतात; परंतु असें लक्षांत आणीत नाहींत कीं, तीं माणसेंच होतीं. देवांनीं अवतार घेतले तरी माणसांचे चालीप्रमाणें ते वागले. तेव्हां त्या वेळच्या मनुष्याच्या चाली तशाच होत्या. त्याप्रमाणें आतांही चालावयास चिंता नाहीं. आणि हिंदु लोकांच्या मूळच्या चाली त्याच आहेत. परंतु हल्लीं त्यांस ही गोष्ट मोठी वाईट वाटते व इंग्रज लोकांत स्त्रियांचा मान ठेवण्याची चाल आहे, हें त्यांस मोठें आश्चर्य वाटतें, व ते म्हणतात कीं, हा फार निर्लज्जपणा व्यभिचारवृद्धीचें कारण आहे.

परंतु हिंदु लोकांस शहाणपण नाहीं. व त्यांचें मन हल्लीं मूर्खपणानें, दुष्ट बुद्धीनें व वाईटपणानें इतकें भरलें आहे कीं, तें शुद्ध होण्यास हिंदुस्थानांत ज्ञानाचीं फार प्रसृति

झाली पाहिजे व लोक सुधारले पाहिजत व पूर्वीचे मूर्ख वृद्ध लोक आहेत ते सर्व मेले पाहिजेत. जेव्हां नवीन प्रजा शहाणी व पुष्कळ होईल तेव्हां लोकांच्या रीतीभाती बदलून चांगल्या होतील यांत संशय नाहीं. परंतु त्यांस किती एक वर्षें पाहिजेत.

ज्ञान म्हणजे काय; हें लोकांस ठाऊक नाहीं. इंग्लंडांतील थोरली सनद, पार्लमेंट, फराशीस यांची राज्यक्रांती, रूमचे राज्याचा नाश अमेरिका खंडांत युरोपियन लोकांचीं वस्ती, लोकसत्तात्मक राज्य, या शब्दांचा अर्थही बहुत हिंदु मनुष्यांस ठाऊक नसेल. हे इतिहास इकडे प्रसिद्ध होण्यास बहुत दिवस पाहिजेत. हल्लीं जास लिहिता वाचतां येतें ते शहाणे, र, ट, फ करतां येतें ते बोलणारे, व दंगालूट झाली म्हणजे ती राज्यक्रांति, इतकें या देशांतील लोकांस ठाऊक आहे. पृथ्वीवर काय आहे व लोक कसे आहेत, याविषयीं त्यांस कांहीं कळत नाहीं. पुराणिक एक पोथी सोडून बसला म्हणजे सर्व आनंदानें डोलतात व रावणास दहा डोकीं व सहस्रार्जुनास हजार हात, पृथ्वीचा अंत नाहीं, उत्तर समुद्राचा ठिकाण नाहीं, दुधाचा व दह्याचा समुद्र आहे व पृथ्वीवरील कांहीं देशांत घोडमुखी माणसें आहेत, इत्यादि गोष्टी ऐकल्या म्हणजे सर्व आनंदानें डोलतात, बायका फार खुष होतात व पुरुष म्हणतात कीं, आम्हीं आज मोठें ज्ञान संपादन केलें. त्यांस असें ठाऊक नाहीं कीं, चमत्कारिक परंतु या खोडसाळ गोष्टी दहा–पांच हजार वर्षांपूर्वी लिहिले गेले आहेत. तर हल्लीं पृथ्वीची स्थिती कशी आहे व तिजवरील राजे कसे आहेत व समुद्र कसा आहे. व लोक कसे आहेत याचा विचार केला पाहिजे, म्हणजे खरें ज्ञान वाढेल. केवळ लहानपणाचा अंगरखा व मोठेपणाचा अंगरखा सारखा नाहीं. तेव्हां व्यास व वाल्मीक यांणीं ग्रंथ लिहिलें त्यापुढें अलीकडे कोणीं ग्रंथ लिहिले नाहींत व शोध केला नाहीं. तेव्हांपासून हिंदु लोक स्वस्थ निद्रेंत आहेत. त्यांची बुद्धि पुढें चालण्याची बंद झाली.

परंतु इंग्रज वगैरे लोक यांणीं उद्योग चालविला व त्यांणीं नवीन ग्रंथ पुष्कळ केलें. ते पाहिल्यावांचून हे लोक समजणार नाहींत. मागील पेशवाईंतील जे शहाणे आहेत, ते म्हणतात कीं, त्यांत आहे काय ? इंग्रजांचा लाभकाळ होता म्हणून हे इकडे आले. त्यांजजवळ आमच्यापेक्षा जास्ती शहाणपण कांहीं नाहीं. त्यांस जर कोणी वेडे म्हटलें तरी त्यास फार राग येतो आहे. हे उत्तर करतात कीं, आम्ही पेशवाईंत लाखों रुपये मिळविले व फौजा बाळगिल्या, त्या आम्हीं मूर्ख म्हणून बाळगल्या नाहींत आणि आतांचे लोक, नवीन जास कांहीं ठाऊक नाहीं, आम्हास वेडे म्हणतात, यास काय म्हणावें ? आमचें नशीब असतें तर आम्हांस कोणी वेडें म्हणतें ना. परंतु आमचें नशीब वाईट म्हणून आमचीं शहाणपणें अदृश्य झालीं आहेत, असें तें म्हणतात.

वास्तविक पाहिलें तर, पहिले जुने लोक आहेत ते शुद्ध बैल आहेत. त्यांस खाण्याचें व पिण्याचें मात्र ज्ञान आहे. व ते जनावरासारखें कर्म करितात. परंतु माणसासारखें कांहीं करीत नाहींत व त्यांस कांही ठाऊक नाहीं. मोठ्या प्रकरणांत तोंड घालावयाची देखील

त्यांस योग्यता नाहीं. व इंग्रज कोठले, हे कांहीं त्यांस ठाऊक नाहीं व इंग्रजांनीं अलीकडे ज्ञान किती वाढविले आहे. याची त्यांस खबर नाहीं. अन्नवस्त्र इतक्यापर्यंत त्यांची समजूत आहे. जास्ती कांहीं नाहीं. जेव्हा सगळे मूर्ख होते तेव्हां त्यांतच ते पराक्रमी झाले.

परंतु आतां नवीन मंडळींत ते मूर्खासारखे दिसतात. कारण कीं, इंग्रजांचे योगानें हिंदुस्थानांत बहुत प्रकारचें ज्ञान वाढलें आहे व तें जाणें संपादलें त्यासच त्याची गोडी; इतरांस नाहीं. तेव्हां या जुन्या मंडळींचा गर्व व्यर्थ आहे. त्यांणीं असें समजावें कीं, आम्हीं शहाणें, असें म्हणून नवीन लोकांची निंदा करू नये. कारण कीं, त्यांची अक्कल आतां सर्व उजेडांत आली. व ते पूर्वी लंगडया गाईंत वासरूं प्रधान म्हणून शहाणे होते, परंतु आतां नाहींत. त्यांजमध्यें पराक्रम, विद्या व शौर्य नाहीं. लिहिण्यावाचण्याची भ्रांति. प्रवास ठाऊक नाहीं. परदेश ठाऊक नाहीं. व लढाईची कला ठाऊक नाहीं; मग त्यांणीं गर्व कशास करावा ?

हल्लीं पुण्यास जे गृहस्थ आहेत. त्यांच्या अवस्थेचा विचार व त्यांचें शहाणपण पाहिलें म्हणजे सर्व हिंदु लोकांचा वृत्तान्त कळतो जसा कोणी मेला म्हणजे त्यांचें नांवें वृषोत्सर्ग सोडतात; तशी मराठयांची राजधानी गेली आणि बाजीरावाचे नांवाचे इंग्रजांनीं पोळ सोडले म्हणजे इंग्रजानीं कोणास जहागिरी व कोणास पेनशनें दिलीं आहेत तीं ते खातात आणि पोळासारखे फिरतात. याचप्रमाणें सर्व हिंदु लोकांची जा जा ठिकाणीं संस्थानें आहेत व जेथें ब्राह्मणांस खाण्याची सोई आहे, तेथें असेंच आहे, पहा ! लोक किती धुंदींत आहेत ? किती आपले ठिकाणीं गर्वांत आहेत ? राज्यात काय होतें याचा त्यांस ठिकाण नाहीं.

सांप्रत पुण्यांत पुस्तकगृह आहे. पण त्यांत कोणी जुन्या लोकांपैकीं किंवा जाजवळ खाण्यापुरता पैका आहे तो येत नाहीं. असे अलीकडील ब्राह्मण आहेत. कोणास ज्ञानाची आस्था आहे असें नाहीं. मग इतर लोकांची अवस्था काय पहावयाची आहे ? अशा समयीं स्त्रियांची अवस्था सुधारणें अवघड आहे. बहुतकरून आणखी दोनशें वर्षें, निदान शंभर वर्षें, तरी पाहिजेत, तेव्हां हे लोक जागृतींत येतील. आतां जे लोक आहेत त्यांचा दोन-चार पिढया झाल्या पाहिजेत व ज्ञान वाढलें पाहिजे. पुरुष शहाणे झाले म्हणजे अर्थातच स्त्रिया शहाण्या व ज्ञानी होतील. अल्पवयांत लग्न आणि जन्मपर्यंत विधवा रहाणें, या दुष्ट चाली मोडल्याखेरीज कांहीं एक सुधारणा व्हावयाची नाहीं.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ३०/ ८ आक्टोबर १८४८ )

# पुनर्विवाह

सांप्रत आपले लोकांमध्यें हा केवढा अनर्थ आहे कीं, स्त्रियांस पति वारल्यावर पुनरपि लग्नें करूं देत नाहींत ! ईश्वराने स्त्री व पुरुष सारखे उत्पन्न केले व उभयतांचे अधिकार समसमान आहेत. असें असतां पुरुषास पुन्हा विवाहाची आज्ञा आणि स्त्रियांस मात्र मनाई, हा केवढा जुलूम आहे?

चार शहाणे लोक मनावर घेऊन हें कार्य करतील, तर किती एक जीव विनाकारण दु:खांत व अपराधांत पडत आहेत, त्यांचें संरक्षण होईल, परंतु हें भाषण साधारण लोकांचे कर्णी पडलें, म्हणजे त्यांस असें वाटेल काय ? नाहीं. ते म्हणतील कीं, आम्ही भूदेव, आमचें शास्त्र ईश्वरोक्त आहे, त्याचें उल्लंघन आम्ही करणार नाहीं, व काशीपासून रामेश्वरापर्यंत ब्राह्मणांचा दबदबा आहे, तो जाऊन लोक थट्टा करतील; व जुने चालीस विरूद्ध येईल. आणखी ते म्हणतात कीं, ' त्यांत काय आहे ? जा स्त्रीच्या नशिबीं सुख नाहीं, तिचाच नवरा मरतो. ' अशी मूर्खपणाचीं प्रमाणें दाखवितात.

परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, आमच्या जा कन्या त्यांचें रक्षण करण्याचा आमचा धर्म असून त्यांचा असा घात करू नये व आमचे लोकांमध्यें पुष्कळ शास्त्र जाणते व ग्रंथ पहाणारे व विद्वान् म्हणून मिरविणारे आहेत; परंतु त्यांस खरे विद्वान् असें कोणी म्हणेल काय ? नाहीं. जांस आपण सुखी कोणच्या रीतीनें होऊं हें कळत नाहीं व जे आपले कन्यांचा सर्वस्वी घात करितात, ते विद्वान कशाचे ? हा एक चमत्कार आहे कीं, पांच वर्षांपासून पंधरा वर्षेपर्यंत कन्येचा पुनर्विवाह करावा, म्हणून शास्त्राज्ञा आहे तीदेखील मानीत नाहींत. शास्त्राज्ञा आहे ती झाकून ठेवितात, हा केवढा अनर्थ आहे ?

अहो लोकांनो ! तुम्ही आपले कन्यांचे वध करणारे आहांत. सांप्रतचे ब्राह्मणांस शिकविणें फार अवघड आहे. चालीविरुद्ध गोष्ट त्यांचे कानीं पडली, म्हणजे ते नाक मुरडितात आणि म्हणतात, 'छे:' हें काय ? त्यांत काय आहे ? पूर्वापार चालत आलेली चाल असून तीस विरूद्ध कसें बोलतां ? आमचे वडील तर लक्षावधी रुपये मिळवीत होते आतां आम्ही हलक्या अवस्थेप्रत पावलों, म्हणून अशी बुद्धि झाली.' जसा एखादा पहिलवान एक पल्ला ओझें उचलणारा असतो आणि त्यास क्षयरोग झाला म्हणजे तो औषध घेत नाहीं. तो म्हणतो कीं, 'अरे माझें पल्लाभर उचलावयाचें बळ होते, तेव्हां मीं औषध घेतलें नाहीं आतां मी थकलों, आतां औषध घेऊं काय ? मी कधीं घेणार नाहीं.' आणि तुच्छ मानून जर्जर होऊन मरण पावतो. तसे ब्राह्मण लोक मूर्ख होऊन विचार करितात आणि म्हणतात कीं, 'अहो, आमचे पूर्वज विश्वामित्र, त्यांनें नवी सृष्टि

केली; अगस्तीनें समुद्र प्राशन केला; दुर्वासाचे शापानें विष्णूनें दहा जन्म धारण केले व भृगूनें लक्ष्मीनारायणास लाथ मारली; असे आम्ही देवांचे देव आणि सर्वांहून वरिष्ठ; आम्हांस शहाणपण शिकवावयास कोणी समर्थ नाहीं.'

"अरे अरे!" फुकट हे ब्राह्मण लोक गर्वाने कशाला जळतात! मागील गोष्टी मनांत कशास आणतात? मी तुम्हांस पुसतों कीं, जेव्हां तुम्ही आपले जांवयाचे मरणाची खबर ऐकतां आणि तुमची कन्या तर लहान, तिचे आणि जांवयाचे अजून दर्शन झालं नाहीं; असें असतां त्या लहान अर्भक बालकाविषयीं तुम्ही आपले मनांत निष्ठुरपणा का आणिता? आणि आपले कन्यांस तुमचे तुम्हीच खाटीक कां होतां बरे ? अरे परकी लोक याणीं जर तुमच्या कन्या रस्त्यांतून जातांना पाहिल्या, तर त्यांची अवस्था पाहून अंत:करण चरचरा भाजतें आणि दया उत्पन्न होते; परंतु तुम्ही आईबाप, भाऊबंद, शहाणे व विचार करणारे व बरें-वाईट जाणणारे असे असून एवढा तुमच्या घरांतील अनर्थ तुमच्यानें दूर कसा होत नाहीं? तुम्ही आपल्या स्त्रिया व कन्या मूर्खपणाचे अवस्थेत जन्मापासून बाळगिल्या आहेत; म्हणूनच हा तुमचा जुलूम त्यांजवर चालतो व त्या सोसतात.

जर त्यास थोडेंसें ज्ञान असतें तर त्यांनी त्याचा विचार काढून जे पुनर्विवाह करूं नये म्हणतात, त्यांचे श्रीमुखांत दिली असती, यांत संशय नाहीं; परंतु अज्ञान आणि भोळसरपणामुळें सर्वत्र जुलूम चालतो, असा नेम आहे. त्याप्रमाणें हे झाले आहेत. जर आपल्या देशांत दहा स्त्रिया विद्वान् असल्या आणि त्या जर विधवा झाल्या असत्या तर त्यांनीं आपला पुनर्विवाह करण्याचें ठरविले असतें. आणि दुष्ट ब्राह्मणांचे तंत्रांत त्या कधीं राहिल्या नसत्या, यांत संशय नाहीं.

परंतु आजपर्यंत ब्राह्मणांनीं मोठी सावधगिरी केली कीं, कन्यांस विद्या शिकविली नाहीं. हे अनर्थ घरोघर आहेत. आईबाप शेकडों आहेत, किती एक दु:खानें विव्हळ आहेत; परंतु त्याचा उपाय त्यांस सुचत नाहीं. बरें, असें पहा कीं, पुनर्विवाह जे इतर लोक करितात ते काय ब्राह्मणांपेक्षां कमी आहेत? कन्येचें दुसरें लग्न केल्यांस ब्राह्मणांस काय लहानपणा येईल? व त्यांत काय लाज आहे ? ब्राह्मणांनीं सर्व धर्म कोठें चालविले आहेत? किती एक अधर्म करितात, त्यांतच त्यांची गणना करून हे दु:ख त्यांनीं दूर करावें. यांत काहीं अप्रतिष्ठा नाहीं, आणि यांत कांही अधर्म नाही, आणि असें केलें, तर कांही भ्रष्टाकार जाईल; परंतु हें त्यांचे मनात कधीं येईल न कळे.

आज काळीं तर वृद्ध लोक आहेत, त्यांची समजूत पडणें अवघड आहे. त्यांचें मन त्या दुष्ट बुद्धीशीं बहुत दिवस राहून तन्मयच झालें आहे व तसेंच अलीकडील जे लोक ते वृद्ध लोकांच्या समागमाने बसले आहेत. सांप्रत विद्या म्हणजे कागद लिहितां यावा व वाचतां यावा, दुसरें त्यास कांहीं ठाऊक नाहीं. असे जरी अविचारी आहेत, तरी ते नाक मुरडितात. त्यांचे कानीं अशी गोष्ट पडली तर त्यांचे अंत:करणास शस्त्र लागतें; त्याचें त्यांस कारण पुसलें तर सांगतां येत नाहीं. त्यांस 'चाल' इतका शब्द मात्र ठाऊक, बाकी

कांही विचार नाहीं. व ते सद्बोधास वाईट मानितात. तेव्हां जे गुजराथेंतील रजपूत कन्या उपजताक्षणीं मारतात, ते अधिक किंवा दक्षिणी ब्राह्मण जे आपले कन्यांस दुष्ट कर्मांत प्रवीण करतात आणि पुर्नविवाह करूं देत नाहींत, ते अधिक, याचा न्याय करणे लोकांकडे आहे.

(लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. १०/१४ मे १८४८)

## १६

# पुर्नविवाह

ब्राह्मण लोकांच्या विधवा पाहून फार हळहळ वाटते. त्यांस कोणता उपाय करावा? हे ब्राह्मण तर स्वहितास आंधळे, म्हणून पुर्नविवाह करूं देत नाहींत. प्रत्येकाचे घरीं विधवा नाहीं, असें नाहीं आणि किती एकांच्या कन्या अशा लहानपणी विधवा, झाल्या. आहेत कीं, त्यांस नवरा म्हणजे काय, तें ठाऊक देखील नाहीं. आणि त्यांचें पुन: लग्न नाहीं; हा केवढा जुलूम आहे !

हे सर्व शास्त्री, जुने लोक मेले म्हणजे हें लौकर होईल. सांप्रत अडचण आहे. किती एक पोरी व्यभिचारी निवतात; पोरें मारतात पण त्यांस लग्न करून नांदिवल्या तर फार चांगलें होईल. हजारों जीव मरतात आणि दु:खी होतात आणि बोडकी झाली म्हणजे तिचे हाल करतात. तिला जेवावयास कमी घालितात; सर्व प्रकारें तिचे हाल. तिला हजामत करविण्याची लज्जा. तात्पर्य, सर्व गोष्टी तिला प्रतिकूल होतात जी आज सुंदर सौभाग्यवती दिसते, तीच उद्यां केशरहित, अलंकाररहित होते. आणि तिचें तोंड पाहिलें तर देखील वाईट म्हणतात. तेव्हां विधवांचा अपमान केवढा होतो! त्यांजला असें वाटतें कीं, आमचा जीव व्यर्थ; जन्मास येऊन सुख नाहीं. आमचें तोंड पहात नाहींत. लग्नकार्यास आम्ही कामास नये बरें आम्हांस दुखणें लागलें तर सर्व इच्छितात कीं, मरतील तर बऱ्या. आम्हांला लुगडीं घ्यावयास कोणी नाहीं. स्त्रियांस नवरा म्हणजे त्यांचा भर्ता व सोबती. ईश्वरानें त्यांस निर्बल केल्या आहेत. त्यांस पुरुषांचा आश्रय असला म्हणजे त्यांस मोठें

बल असतें. परंतु तें बल त्यांचे दैवानें गेलें तर त्यांणीं काय करावें ? तथापि त्यांस पुन्हा नवरा करण्याची परवानगी नाही. हा शास्त्राचा अतिशय जुलूम आहे.

मला वाटतें कीं, असे निर्दय, मूर्ख आणि आंधळे लोक या चारी खंड पृथ्वींत नसतील आणि कोणत्या तरी शास्त्रावरून असा जुलूम दुनियेंत झाला नसेल! बायका अगदीं गरीब; त्यांस अबला असें म्हणतात आणि त्यांची अवस्था अशी करतात, हें कोठें फेडतील? आजपर्यंत बायका किती जाळिल्या आहेत? आणि अजून जिवंत किती जाळितात? याविषयीं कोणी दुष्टाभिमान धरून एकदम सर्वजण एकत्र होऊन हें कार्य करावें तुम्ही न कराल तर सर्व लोक कधीं तरी करतीलच; यांत संशय नाहीं. परंतु यश घ्याल तर बरें आहे. इतके दिवस तुम्ही स्त्रियांस या देशांत दुःखांत घातल्या; अजून तरी त्यांस तुमच्या ब्राह्मणी पाशापासून सोडवावे.

मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचें असो, कोणाचेंही असो, ब्रह्मदेवाचें का असेना; " बुद्धिरेव बलीयसी, " असें आहे. त्यापेक्षां तुम्ही जें उघड पहातां त्यांचा बंदोबस्त शास्त्रांत नाहीं,म्हणून करीत नाही हें योग्य नाहीं शास्त्रास एकीकडे ठेवा,आपली बुद्धि चालवा,विचार करून पहा. घातक वचनावर हरताळ लावा. हा प्रसंग तुम्ही कसा जाणत नाहीं ? मी तुम्हा सर्वांस असें म्हणतों कीं, तुम्ही आपल्या मुली व बहिणी विधवा पहातां, तेव्हां तुम्हांस लाज वाटत नाहीं काय ? त्यांस सुखी करण्यास तुम्हांस सामर्थ्य आहे. परंतु तुम्ही करीत नाही, हा मूर्खपणा आहे.

तुम्ही आजपर्यंत बायकांचे शाप घेतलेत. व पुढें घेतां, त्याचे झाडें कोठे घाल ? अहो, जिचा नवरा मरतो तिचा अधःपात होतो, ती दुःखी होते; आणि तुम्ही तशा अवस्थेंत निर्दयपणानें तिचे केश काढितां, आणि तिचे अंगावरचे दागिने काढून घेतां हा काय धर्म आहे ? आणि तुम्ही असें म्हणतां कीं, तिचें दैव वाईट म्हणून तिचा नवरा मेला; परंतु तुम्ही दुष्ट म्हणून तिला दुसरा नवरा करून देत नाहीं. दुर्दैवी मनुष्याशीं दुष्टपणा करणें हें फार नीचपणाचें काम आहे. बायकांचे नवरे प्रारब्धाने मरतात. त्यांस दुसरा करण्यास मना करतां, आणि हा धर्म आहे असें समजतां ! हा धर्म कशाचा बरें ? धर्मशास्त्र हा केवळ कायदा आहे. व्यावहारिक गोष्टी करतां त्यांतील एका वाक्यास हरताळ लावली म्हणून काय झालें ?

आणि लोक तरी कोठें आतां धर्मशास्त्राप्रमाणें चालतात ? किती एक चालत नाहींत अधर्म करितात. असें तुमच्या डोळ्यांपुढे असून तुम्ही आपल्या बहिणींचीं व पोरींचीं बुद्ध्या घरें बुडवितां, हें तुम्हांस कसें बरें वाटतें ? नाहीं. तुमच्या पोरींची दया तुम्हांस येत नाहीं. तुम्ही आपल्या पोटांत दगड कसें घालतां ? याजकरितां माझें ऐका, आणि स्त्रियांस पुरुषासारखे अधिकार आहेत असें ठरवा आणि हा धर्म चालू करा. स्त्रियांनीं विद्या करावी. जाणतेपणीं पुरुषाचें व स्त्रीचें लग्न व्हावें हें चांगलें. आणि जिचा नवरा मरेल तिनें खुशी असल्यास दुसरा नवरा करावा. म्हणजे तुम्ही फार सुखी व्हाल. लग्न लवकर करून पोरांचे आयुष्य संपवितां व प्रजा निर्बल व भिकारी करतां, आणि विधवांस दुःख

देऊन हाल करतां, यांचीं पारणीं कोठें फेडाल ?

आतां पुरें करा. आजपर्यंत विधवा जाळिल्या तितक्या पुरे करा. तुम्ही म्हणाल कीं, इंग्रज लोकांनीं जशी सती बंद केली, तसेंच हेंही करावें. परंतु विधवांचीं लग्ने करावयास इंग्रज इकडे आले नाहींत तुमची तुम्हांस खबर नाहीं. मग त्यांस कशास असावी ! ते दूरचे लोक. तुम्ही मेलेत तर त्यांस सुतक येणार नाहीं, हें ध्यानांत धरा.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ७०/६ ऑगस्ट १८४९ )

१७

# आर्जवीपणा व डौलीपणा

सांप्रत काळीं दोन दुर्गुण हिंदु लोकांत फार उत्पन्न झाले आहेत. एकाचें नांव दिवाळखोरी व दुसऱ्याचें नांव गुलामगिरी; अशीं आम्ही त्यांस नांवें ठेवितों. याहून दुसरे शब्द आम्हांस सुचत नाहींत व जे या दुर्गुणानुगामी आहेत त्यांनी कीर्ति किंवा धन संपादन केलें, असें लोकांस वाटून त्यांचा आचार अधिकाधिक वृद्धिंगत होत चालला आहे.

आम्हांस मोठा चमत्कार वाटतो कीं, जा पुरुषास एक महिन्याचे वीस रुपये मिळत आहेत त्यानें थोरांचे नादीं लागून तीस रुपयांचा खर्च करावा, यांत त्यांस काय कीर्ति आहे ? परंतु असें करणाराचे मनांत येतें कीं, ' साखरेचा खाणार, त्याला देव देणार, ' अशी म्हण लोकांत चालत आली आहे, परंतु मला तिचा खरेपणा कांहीं वाटत नाहीं. गरिबाचे मनांत येतें कीं, मी थोरासारखा वागून त्याचे मंडळींत मिरवेन; आणि तेणेंकरुन माझी मान्यता वाढेल. परंतु अशा डौलानें योग्यता चढत नाहीं. इतकेंच होतें कीं, तोंडावर कोणी मूर्ख म्हणत नाहींत. निष्पक्षपाती असेल, तो तोंडावरही म्हणतो. बाकी सामान्यत: पाठीमागें म्हणतात.

आतां बहुत लोक असेही पाहण्यांत येतात कीं, पांच रुपये महिन्याची मिळकत आणि पंधरा रुपयांचें त्यांच्या डोकीला पागोटें. एक म्हण आहे कीं, ' मिजाज बादशहाची आणि अवलाद भडबुंजांची ' अशी ते वहिवाट करितात आणि पैसा नाहींसा झाला म्हणजे कांहीं कामकाज वगैरे असेल तर लांच वगैरे घेऊन किंवा कोणास फसवून, बाता मारून,

लबाडद्या करून चार रुपये उपटतात. त्याजवर पोट भरावें व तें नाहीं तर बापआई यांजवळ कांही संपदा असली तर घरांत उचकाउचक करावी; व तेंही नाहीं तर शेवटीं बाहेर चोऱ्या कराव्या, मग अब्रू जाईल ती जाईल; राहील ती राहील.

परंतु त्यांचे लक्ष्यांत असें वागत नाहीं कीं, वस्त्रप्रावर्ण डौल आणि ढोंग यांत थोरपणा कांहीं नाहीं. आपले मिळकतीप्रमाणें आपण खर्च करावा. थोरांचे गुण घ्यावे. पण त्यांचा खर्च आपल्यास काय होय ? थोरांनीं विहिरींत उडी टाकली तर आपण कशास टाकावी ? हें त्यांस कळत नाहीं. ते थोरांची बरोबरी करण्यास जातात व थोरांनीं एके ठिकाणीं पांच रुपये खर्च केला, तर आपणही करितात. आणि असें मनांत आणितात कीं, यांचे बरोबरीनें खर्च केला, आतां आम्हांस यांची योग्यता आलीं, असें लोक समजतील. परंतु जाणणारे आहेत, तें आपल्या मनांत यास मूर्ख म्हणून समजून उगेच बसतात. इतकें हें दिवाळखोरीचें वर्णन झालें.

आतां गुलामगिरी हा तर दुर्गुण सर्व हिंदू लोकांचा आहे, असें मला वाटतें. यांतून, एकही मुक्त नाहीं. याजवर किती एक मूर्ख आपल्यास गोष्टी सांगणारे आर्जवी इत्यादि दुर्लौकिकाचे हुद्यावर मुकरर करितात. आणि त्यांचा बहुधा मतलब असा असतो कीं थोरांस दुर्गुण व नाना प्रकारच्या खोडी लावाव्या, अखेरीस त्यास बुडवावें. जोंपर्यंत त्याजजवळ अर्थ आहे तोपर्यंतत्यांस भुलवून पैसा घ्यावा व त्यांजकडे कामकाज असलें तर त्यांजवळ लोकांची मध्यस्थीं करून लांच देववावी व आपणही कांहीं खावी व नेहमीं स्तुतीं करावी व ते जें म्हणतील त्यास रुकार द्यावा. नेहमीं बरोबर फिरावें. असे लोक बहुत झाले आहेत व बहुधा द्रव्याचीं ठिकाणें अशा लोकांनींच वेष्टिली आहेत.

त्यांतच भटभिक्षुक यांस मानलें पाहिजे, कारण ते फारच आर्जवी लोक आहेत. ते कांही धर्मरक्षक नव्हत. परंतु त्यांचा व्यापार इतकाच कीं, यजमानाने चोरी व लबाडद्या इत्यादि गुन्हे करून द्रव्य आणिलें तरी चिंता नाहीं, भटास खावयास घातलें म्हणजे झालें. इतकाच त्यांचा हेतू. आणि द्रव्यवानाने कसेंही कर्म केलें तरी त्यांस शास्त्रार्थ काढून द्यावा. असें लबाड लोक बहुत धर्म म्हणून बाळगतात, परंतु ते उभयलोकीं अकल्याणकारक आहेत. कोणताही श्रीमंत पहा, त्याचे घरीं पंक्तीबारगीर फार असतात. परंतु त्याची निवड केली तर शेकडा दोनचार उपयोगी निघतील. बाकी सर्व गुलामगिरी करणारे होत; असें विचारीं आहेत त्यांचे मनांत येईल. अस्तु.

ही चाल या लोकांत बहुत आहे. आणि जे केवळ गरीब आहेत, जांस खावयास नाहीं, तेच असें नाहीं. जांस स्वार्थ आहे त्यांसही ही निर्लज्जपणाची गुलामगिरी करावी असें वाटतें. आणि आपल्याहून थोर म्हटलेले असतात, त्यांचे ते आर्जव करितात ? बहुत स्तुति करितात आणि आपले घरून त्याचे घरी जाऊन पायमळणी करितात. तेणेंकरून त्यांस असें वाटतें कीं, आम्ही त्याच्यासारखे होऊं आणि आमची प्रतिष्ठा अधिक होईल. परंतु लोक त्यांस मूर्ख मात्र म्हणतात. आणखी कांहीं होत नाहीं. पहिला थोरपणा आणि स्वतंत्रपणा असतो, तोही जातो.

आम्ही किती एक लोक असे पाहिले आहेत कीं, जोपर्यंत शिरस्तेदारी, नाझरी किंवा असा दुसरा कोणता मोठा हुद्दा कोणा माणसाकडे आहे तोंपर्यंत त्याजकडे हरवक्त लोक येतात. व मेजमान्यांचीं बोलावणीं येतात. जसें कोणी म्हणेल कीं, यांचा व त्यांचा परमस्नेह हरएक प्रकारें "जीवश्च कंठश्च" आहे; परंतु त्याजकडील काम गेलें म्हणजे तो जर मरावयास भूमीवर काढला असेल तर तो जिवंत आहे काय, असा समाचारही घेत नाहींत व पूर्वीं ज्यांचे बंधु असें म्हणवीत होते, त्यांचा मुलगा भीक मागूं लागला तरी त्यास एक दिवस देखील बोलावीत नाहींत. कामावरून दूर झाला म्हणजे बोलावण्याचे यादींतून त्याचें नांव निघतें. असे ते स्नेही. या प्रकारे करून आर्जवी लोक वेष घेऊन लोकांस बुडवितात. त्यांचा सर्व काळ हाच उद्योग. हे लोक "असतील शितें तर मिळतील भुतें" याप्रमाणें आहेत आणि इतकेंही करून काय? पोट मात्र भरतें आणि मेले तर पाठीमागें व जिवंत असतांना दुष्कीर्ति लोकांत होते. असे आयुष्य घालविण्यापेक्षां गरीब राहून मेहनत करावी व स्वतंत्रपणानें भाकर मिळाली तर ती आगंतुकीपेक्षा बरी परंतु हा स्वतंत्र्यपणाचा लाभ कोणास कळत नाहीं. मुळापासून हिंदुस्थानांत एकतंत्री राज्य. याजमुळें लोक इतकी गुलामगिरी करावयास शिकले. दुसरें कारण दिसत नाहीं.

नाना फडणीस याची गोष्ट सांगतात कीं, मराठे लोकांत नाना फडणीस शहाणा प्रधान होता. तो बाजीराव झाल्यावर बडतर्फ झाला व त्यास कांहीं कामकाजही नाहींसें झालें. तेव्हां कोणी त्याचे मित्रानें सुचविलें कीं, आतां तुमचा वृद्धापकाळ झाला, व बाजीरावाचें तुमचें नीट नाहीं, त्यापेक्षां सरकारांत विनंती करून कांहीं पोटापुरती नेमणूक करून घेऊन काशीस जावयाचा बेत करावा. त्यांजवर त्यांनी उत्तर दिलें कीं, स्वामींची सेवा मरणापर्यंत करावयाची; आपले कामावर मरावें, असें सांगितलें आणि, त्याप्रमाणें केलें. तात्पर्य, मराठे लोकांची चाल याप्रमाणें आहे कीं, जन्मपर्यंत चाकरी करावी, चाकरीसारखें दुसरें सुख मानीत नाहींत. हाही गुलामपणाच आहे.

चाकरी हें निंद्यकर्म होय. हें कामापुरतें करावें आणि सामर्थ्यानुसार लवकर सोडावें परंतु जे लबाड लोक आहेत ते नेहमीं नीटपणें चाकरी करीत नाहींत. यास्तव बहुत दिवस ते चाकरी करतात. सरकारी चाकरी हें लोकांचें धर्माप्रमाणेंच काम आहे. व हें नीट करण्याहून दुसरा सद्धर्म कोणता नाहीं असें मनांत न आणितां ते असें समजतात कीं, सरकार चाकरी चांगली मिळाली म्हणजे आपणास भूमींतील द्रव्य सांपडले; मग पाहिजे तसें करावें, लोकांस बुडवावें आणि आपलें घर भरावें. द्रव्य मिळविण्याचा हाच हंगाम आहे, असें जाणून त्याप्रमाणें ते जुलमाची वहिवाट करितात. म्हणूनच अशी लबाडी करावयाचें ठिकाण सोडून त्यांच्यानें जाववत नाहीं. इतकाच नेटीव लोकांचे स्वभावाचा अर्थ दिसतो आणि जो शोधून पाहील त्यास असेंच वाटेल कीं, हे लोक फार अप्रामाणिक व लोकांस बुडविण्याविषयीं धुरंधर आहेत. यांची म्हण अशी कीं, "सरकारचें खाऊ नये तर कोणाचें खावें?"

जर मनुष्यास स्वस्थतेचें सुख व व्यापार–शेतकी वगैरे धंदे यांतील थोरपणा समजेल तर ते चाकरी तुच्छ मानतील, परंतु तें कळत नाहीं. याजमुळें अशी दुराशा धरून लोक दुष्टपणा करितात. याजमुळें आपले लोक आपल्या राज्यास मुकले आहेत. कारण स्वदेशीय राजाचा जुलूम लोकांस सोसवत नाहीं. इंग्रज व परकी दुसरे बरे वाटतात. अस्तु. नेटीव लोकांनी आपला लुटारूपणाचा स्वभाव व गुलामगिरी आणि दिवाळखोरी ही सोडून स्वदेशी लोकांचे हिताविषयी विचार केला पाहिजे. गुलामगिरीपासून दिवाळखोरी होते. जर मनुष्य आपला स्वतंत्रपणा राखील तर त्यास दुसऱ्यासारखें करण्याची जरूर नाहीं. गुलामगिरी आणि दिवाळखोरीपासून लुटारूपणा वगैरे अनर्थ होतात.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क. १८ )

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ३९२९ २५६८२ ३१९९ २५९८१५
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

१८

# हिंदु लोकांचा व्यापार

सांप्रत हिंदु लोक भिकारी होत चालले आहेत व रोजगारधंदा नाहीं. याचें कारण मला असें दिसतें कीं, या लोकांचा व्यापार अगदीं बुडाला; इंग्रज व दुसरे देशचे लोक फार शहाणे होऊन या लोकांस सर्व जिनसा पुरवितात. आणि हे मुकाट्यांनीं स्वस्ताईमुळें खरिदी करतात.

यास्तव या लोकांनीं एकत्र होऊन जर असा कट केला की; आपले देशांत दुसरे मुलखाचा जिन्नस आला तरी घ्यावयाचा नाही; आपले देशांत पिकेल तेवढाच माल घ्यावा आपले लोक कापडें जाडीं वाईट करितात, परंतु तींच नेसावीं. इकडे छत्र्या करितात, त्याच घ्याव्या, म्हणजे या लोकांत व्यापार राहून इकडे सुख होईल. परंतु हे लोक असें करीत नाहींत, आणि थोडी किंमत म्हणून लोकांचा जिन्नस विकत घेतात. वास्तविक पाहिलें तर हल्लीं दाणे मात्र इकडे पिकवून हे लोक खातात. अजून दाणे परदेशांतील येऊं लागले नाहींत. बाकी सर्व पहावें तें परदेशचें आहे. आमचे कपडे, आमची छत्री, आमची चाकू–कात्री, आमचें घड्याळ, आमची गाडी, आमचीं बुकें. सर्व परदेशांतील

आहेत. आम्ही दाणे मात्र आपले खातों. यामुळें सर्व व्यापार बुडाला. उदमी, मजुरदार कसबी, कारागीर घरी बसले. आणखी तर काय सांगावें, परंतु आमचे रुपये, घरांस सनकाड्या देखील युरोपचा. इकडे लोक पैशाचा शंभर सनकाड्या देतात. त्या पेटवावयास विस्तव पाहिजे; ठेवावयास मोठी जागा पाहिजे; परंतु विलायतेचा सनकाड्या सुंदर पेटीमध्यें तयार करून भरलेल्या पैशाचा शंभर मिळतात. विस्तव पेटवावयास नको. अशी सोय पाहून आम्ही आपले देशचा लोकांचा सनकाड्या घेत नाहीं. परंतु याजमुळें आमचे लोक किती भिकारी झाले आहेत !

याजकरितां सर्वांही असा कट करावा कीं, जें आपल्या देशांत पिकेल तेंच नेसूं, तेंच वापरूं, कसेंही असो. आणि तितक्यांत चांगल्या विद्या व जिन्नस उत्कृष्ट करावयास विद्या शिकूं. आम्हांस मिळेल तसेंच घेऊन आम्ही काळ काढूं. मग हजारों खंडी कापूस इकडून विलायतेस कशास जाईल? कापूस विकणारांनीं असा बेत करावा कीं, इंग्रजांस इकडे तयार केलेलीं कापडें द्यावीं, परंतु कापूस देऊं नये येणेंकरून हे लोक सुखी होतील. सांप्रत आपलेच लोक आपल्या लोकांस मारीत आहेत. जशी बाहेरची चांगली स्त्री पाहून घरची लग्नाची स्त्री टाकून तिचे पाठीस लागतात आणि भुलतात, तसें या लोकांचें झालें. येणेंकरून हाहाकार झाला आहे आणि जो तो शेत करूं लागला. दुसरा व्यापार कांहीं नाहीं.

परंतु शेत करण्यांत तरी काय नफा? वर्षभर मजुरी मरेमरेतों करावी तरी लंगोटी आणि शिळी कोंड्याची भाकर देखील मिळावयाची भ्रांति. बहुत दाणे पिकवितात, परंतु घेतो कोण ? पैसा दुसऱ्या देशांत चालला. श्रीमंत लोक, जांजवळ लाखों रुपये आहेत, ते विलायती जिनसा घेतात आणि पैसा उडवितात, त्यांचे पोटास पावशेर दाणे पाहिजेत, त्याची मात्र किंमत रयतेकडे जाते. बाकी हजारों रुपये विलायतेस थेट जातात. याप्रमाणें हमेश चाललें आहे. असा कट करणें वगैरे उपयोगी गोष्टी आहेत, त्या टाकून दुसऱ्या गोष्टी सांगतात आणि याजकडे लक्ष्य देत नाहींत.

लोक भिकारी झाले, याचें कारण कोणी मनांत आणीत नाहीं. जर हरदास व कथेकरी यांनीं अशीं मतें घेतलीं आणि लोकांस जर भरविलीं, तर बहुत लोक एकत्र होतील. कारण कीं, ही गोष्ट उघड आहे. परंतु देव आधीं बुद्धि नेतो मग भांडवल नेतो. तशी या लोकांची बुद्धि पापाचरणाकडे गेली. नंतर या संकटांत ते आले, परंतु सर्व मागील पुराणांतील कथा एकीकडे ठेवून हल्लींचे लोकांची स्थिति सुधारण्याबद्दल लोकांस उपदेश केला, तर महान् पुण्य आहे. तसें हे हरदास करीत नाहींत. चांगल्या गोष्टी छापखान्यांतून निघाव्या, असेंच नाहीं. हरदासांनीही काढाव्या व त्यांस लोक एकत्र करण्याची फार शक्ति आहे, कारण कीं, ते चौघांत उभे राहून उपदेश करण्याचा आरंभ करितात. त्यांनीं असे उपयोगी विषय लोकांस शिकविले, तर सर्व आख्यानांहून हीं आख्यानें चांगलीं होतील.

आणखी लोकांस समजवावें कीं, तुम्ही मूर्ख आहां. विचार करीत नाहीं. यास्तव विचार करा. व विद्या करा. व विलायतेंतील लोकांप्रमाणें अक्कलवान् व्हा. म्हणजे तुम्हांस

लक्ष्मी अनुकूल होईल. छापखाने पुष्कळ ठेवा. पुष्कळ ग्रंथ वाचा, म्हणजे तुम्हांस सर्व बातम्या लागतील. लष्करच्या भाकऱ्या कोण भाजतो, असें म्हणूं नका. परदेशांत गेलें तर विटाळ होतो, ही कल्पना सोडा. म्लेंच्छांचा देशांत जाऊं नये, म्हणून अटकाव होता. पण आतां तुमचा देश म्लेंच्छांचा झाला, तेव्हां ते शास्त्रार्थ राहिला नाहीं. तात्पर्य विद्या करा. विद्वानांचें ऐका. मदोन्मत्त होऊं नका. अशा प्रकारचा कथा सांगितल्या तर फार फायदा होईल.

हे गोसावी कथा करितात, हे व्यर्थ लोकांस आणखी मूर्ख करितात. कारण कीं अमानुष गोष्टी त्यांस सांगतात. काळयवन आला आणि कृष्णानें त्याला मुचकुंदाचे हातून जाळिला. रामास संकट पडलें, तेव्हां मारुतीनें एक पाय लंकेंत आणि दुसरा अयोध्येंत ठेविला. भीष्म ऐकेना तेव्हां अर्जूनानें पाशुपतास्त्र व नारायणास्त्र सोडिलें, या गोष्टी सांगून कांहींतरी उपयोग आहे काय ? आतां लोक भिकारी आहेत यांजवर सोन्याची वृष्टि होत नाहीं व मागील गोष्टी झाल्या, तशा आतां होत नाहींत, यांत संशय नाहीं. तस्मात् अमानुष कथा लोकांस सांगितल्या, तर लोकांस कांहीं उपयोग नाहीं. त्यांस आळशी अधिक करण्याचा मात्र उपयोग आहे.

परंतु त्यांस कांहीं माणसासारख्या कथा सांगाव्या कीं, अमुक राज्य हें कशानें गेलें? दिल्लीचें राज्य, बाजीरावाचें राज्य, कां गेलें ? काय व्यंग त्यांत होतें हें काढावें. तसेंच विलायतेंत राज्य कसें आहे? परंतु या गोष्टी आपले लोक मूर्ख आहेत, त्यांस सांगितल्यावर ते म्हणतील कीं, राज्य कशानें गेलें ? तर सद्दी फिरली म्हणजे राज्य जातें. हें काळाचें माहात्म्य. इंग्रजांची सद्दी फिरेल तेव्हां त्यांचेंही राज्य जाईल. परंतु हें कांहीं उत्तर नाहीं. लोक अगदीं मूर्ख झाले आहेत. त्यांचीं चित्तें मागील अमानुष गोष्टींवर फार आहेत.

यांजमुळें त्यांस वाटतें कीं, अवतारी पुरुष होईल, तेव्हां आमचें कल्याण करील. हें मनुष्याचें कृत्य नव्हें. अशा मूर्खपणाचा समजुती आहेत. परंतु जरी ईश्वर सर्व गोष्टी घडवितो, तरी मनुष्यांनीं मूर्खासारखा नशिबावर भरंवसा ठेवून आळशीपणांत राहूं नये. जो उद्योग करतो, त्यांस ईश्वर साहाय्य होतो. म्हणून लोकांनीं उद्योग करावा व प्रयत्न करावा, हेंच उत्तम. सद्दी या शब्दाचा अर्थ पाहिला तर कांहीं नाहीं; लोकांचा मूर्खपणा आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ५७/२२ एप्रिल १८४९ )

# निर्भयपणाविषयीं

लक्ष्मी वाढण्यास मिळकतीस निर्भय असणें जरूर आहे. मागील चार प्रकरणांत लिहिलेल्या गोष्टी विशेषेकरून सर्काराचानें होंऊं सकत नाहीं त्या लोकानीच बहुधा केल्या पाहिजेत. परंतु मिळकत निर्भयपणाने राखणे हें काम केवळ सर्कारचें आहे. मनुष्यास जरी कळतें कीं. लोकांचे घेऊं नये व दुसऱ्यानें मेहेनत करून संपादन केलें तें हरण करू नये तत्रापि मनुष्याची बुद्धीस दुष्ट वासनानी भ्रंश होतो. याजकरितां लोकास सरकार नेमावें लागतें व सर्कारचे कायदे असतात तदनुसार लोकांचे मिळकतीचें संरक्षण होतें. मिळकतीचे रक्षणापासून असें होतें कीं येक श्रीमंत वाढतो आणि बहुत गरीबांचे श्रम तो येकटा आपले सुखाकरितां घेऊन लक्ष्मी उधळतो आणि गरीब लोक उपाशी मरतात. याजकरितां श्रीमंताचें घेऊन गरीब लोकांमध्यें वाटणी करून दिल्ही तर काय चिंता ? परंतु हें बरोबर नाहीं. त्याची कारणें खाली लिहिली आहेत.

लोक जेंव्हा अगदी रानट होते तेव्हां त्यांजवळ मिळकत नवती. परंतु जों जों लोक शाहणे जाहले, तों, तों मिळकतीचा संग्रह करू लागले, परंतु मनुष्यें स्वतां आळशीं आहेत, गरजेशिवाय मेहेनत अगदी करीत नाहीत. याजमुळें दुसऱ्यानें जमविलें, तें पाहून त्याचा लोभ धरितील आणि बळकट असेल त्याची सर्व मिळकत होईल. आणि जे निर्बळ बसले असतील त्याचे सर्व हरण होईल आणि सामर्थ्यवान लोक गरिबास खाऊ देणार नाहीं; याजकरितां सर्कार पाहिजे, नाहीं तर लोक फळ पिकण्याचादेखील अवकाश करीत नाहींत. रानांत बिनवारस झाडें असतात ती पाहा. त्यांजवर फळें पिकत नाहीं तोंच तोडतात. तीच अवस्था सर्कार नसलें तर गांवात होईल आणि पुढें जरीं पुष्कळ लाभ होईल असें असले तर नाश करतील.

जर मेहेनत करून पिकविले तें खावयास कोणी बसू देणार नाहीं, असें असलें तर कोण नांगरील, कोण पाणी घालील, कोण राखण करील-जर पदरीं पडेल अशी आशा राहिली नाहीं तर कोण मेहेनत करील. मेहेनतीस कारण भोगेच्छा आहे याजकरितां जमीन वाटून देतात मिरास करितात वतनदारी करितात याचें कारण हेंच आहे कीं ही जमीन इतकी अमक्याची आहे असें ठरलें आणि त्यांत घालमेल होणार नाहीं असें असलें म्हणजे तो मनुष्य ती सुधारून उपजऱ्यास आणून उत्पन्नास आणील. नाहीं तर इमारती जमीनी बागा कोण करितो. याजकरितां लोकांचे आबादीचें प्रथम कारण हें आहे कीं जें जाणे मिळविलें तें त्याजपासून कोणी अन्यायानें घेणार नाहीं असा निश्चय पाहिजे. अमेरिकेंतील लोक याजमध्यें जमीनीची वाटणी व मिळकतीस निर्भय नाहीं याजमुळें

मोटाल्या जमीनी येकयेकाकडें आहेत तरीं तेथे काहीं पिकत नाहीं व लोक दरिद्री आहेत–तुर्कस्थान, सिरिया, व आर्बस्थान येथे राज्यें फार वाईट आहेत. सबब शेतकऱ्यास देखील लढाईची तयारी करावी लागत्ये. नाहीं तर कोणी दांडगा येऊन सर्व हिसकाऊन नेईल –प्रत्येक मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं सर्व मला असावें दुसऱ्यास काहीं नसावें याजकरितां हा स्वभाव त्याचा दमन करण्याकरितां जबरदस्त सरकार पाहिजे

विश्वासही मुख्य पाहिजे. व्यापार विश्वासाखेरीज व पतीखेरीज चालत नाहीं. जर प्रत्येक मनुष्यानें आपले स्त्रियेचा, चाकराचा, यजमानाचा अविश्वास केला तर जगणे होणार नाहीं. मोटाले व्यापार तर दूरच आहेत. याजकरितां लोकानी इतबारानें वागणें जरूर आहे. कोणी कोणाचे मिळकतीवर जबरीनें हात घालू नये. जो घालील त्यास शासन करिवण्यास सर्कारानें मदत करावी. नाहीं तर सावकार भयानें पैसा बाहेर काढीत नाहींत व व्यापार उघडे मनानें चालत नाहीं. सर्व काम बंद होतें.

याजकरितां सर्कारास आपले मेहेनतीचा हिःसा घेऊन राखावें लागतें व ते जो कायदा हिताकरितां करितील तो लीनतेनें मानणें योग्य आहे. कारण कीं सर्वांचे चांगल्याकरितां जे करितात त्यास सर्वांनी मानण्यास असा मान देण्यांत अपमान नाहीं. लोकांचे सर्कार चाकर आहे व सर्कारचे लोक रयत आहेत. येकामेकांचा निर्वाह येकामेकांशिवाय चालणार नाहीं. सर्कार ह्मणजे काय कीं लोकांतून जे चांगले लोक विश्वासू आहेत त्यांस या कामावर मुकरर केले ह्मणजे त्या सर्वांचें नाव सर्कार असें पडतें. जशा कमीटया, पंचायती, सभा वगैरे आहेत तद्वत सरकार ही येक मोटी कमेटी आहे. परंतु पुष्कळ ठिकाणी सर्कार आपला धर्म सोडून लोकांची मिळकत राखावयाची व त्याची लक्ष्मी वाढवावयाची सोडून त्याचे मिळकतीचा नाश करितात. अंमल हाती आला आहे ते लोक अडाणी म्हणून जाणार नाहीं. याजकरितां पाहिजे तशी वर्तणूक करितात. नाना प्रकारचा लढायांत पैका व माणसें खर्च विनाकारण करितात. याजमुळें लोकांचें नुकसान फार होतें. परंतु सर्कारास असें समजत नाहीं कीं सर्कार ही किती माणसें व रयत ही किती माणसें आहेत ? तेव्हां लोकांचें सत्व घ्यावें हें नीट नाहीं.

जो मिळकत मिळवतो ती त्यास व त्याचे वंशाकडे चालेल हेहि सर्कारास ठरविणे जरूर आहे कारण कीं जर मरणापाठीमागें तें जाईल असें ठाऊक असलें तर त्याचें चित्त लागणार नाही. याजकरितां निरंतराची आशा त्यांची असली म्हणजे सुधारणा ठीक होत्ये, याच कारणावरून ज्याणी मोटाली कामें केलीं त्यांस बक्षीस व इनामें देतात.

श्रीमंताचे घरचें वर्णन पुष्कळ लोक करितात; कीं त्याचे येथे काय वाडे, वस्त्रें काय, जर काय, सुवास काय, सोनें परंतु हें उपयोग नाहीं, देशांत येकाचे घरी श्रीमंती असली म्हणून फळ काय ? त्याणे सर्वांस लुटून आणलें असतें तें तो उधळतो व वाईट राज्यांत बहुधा श्रीमंत लोक माहान अपराधी असतात व लोकांस अंन्यायेकरून लुटल्या–शिवाय श्रीमंत होण्याचा मार्ग विदित नसतो. आणि इकडील देशांत मागें राजे जाहले

त्यांची कर्मे ऐकिली तर अंगास शाहरे येतात. होळकराची लूट, गोखल्याची लूट, टिपूचा जुलूम इत्यादि फार अवघड स्मरणास देखिल आहेत मग त्या देशांची गती काय पुसावी. राजा मूर्ख असला म्हणजे देश खराब होतो. याजकरितां राज्यावर नेमणें त्यास चांगला, विद्वान, सुशील, योग्य, पृथ्वीचा मोलाचा, माणूस पाहून नेमावा म्हणजे वाकडें होत नाहीं.

सर्व मिळकतीपेक्षां मुख्य मिळकत मनुष्याचें हात पाय ही प्रथम मिळकत जन्मत: प्राप्त होत्ये, कोणापासून आणावी लागत नाहीं; परंतु ईश्वर पुरवितो. तीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची परवानगी असली पाहिजे. परंतु याचा प्रतिबंध सर्कार करितात अशी सर्कारें फार वाईट व जे मिळकतीचा उपयोग पाहिजे तसा करण्याची पर्वानगी देत नाहीत आणि गाद्या, मक्ते, देतात तेंहि ठीक नाहीं. परंतु इंग्लंडांतील चाल येक चांगली आहे कीं नवीन युक्ती किंवा बुक कोणी केलें तर त्याजवर कांहीं दिवसपर्यंत त्याचे हक ठेवितात. ती युक्ती किंवा ग्रंथ कर्त्याचे इछेशिवाय प्रगट करण्याचें सर्कार मना करितात. हें बरोबर आहे.

जसे आपले शरीराचा व मिळकतीचा तसाच आपले बुत्धींचा उपयोग करण्यास सर्वास सारखी आज्ञा असावी येविषयी हिंदूलोकांचा चाली व शास्त्रें कांहीं विपरीत आहेत. येणेंकरून त्यांचे असे जाहलें आहे कीं जसा येक हात बांधून येका हातानें खुषीनें येकादा मनुष्य काम करितो आणि हाल विनाकारण सोसतो. तद्वत इतर जातीनें ज्ञान मिळविण्याची बंदी व कितीयेक पृथ्वींत उत्पन्न पदार्थ होत असतां भक्षण्याचा निषेध व व्रतें, यात्रा, उपास, तपें वगैरे यांत काळ कितीयेक जातो. याचा उपयोग व लाभ लोकांस काय होतो याचा विचार पाहिला पाहिजे. दिसण्यांत तर कांहीं नाहीं.

जर निर्भयपणा देशांत नसेल तर कोणाचा परिणाम लागणार नाहीं. श्रीमंताचा नाश प्रथम होईल. परतु गरीबाचे श्रीमंत होणार नाहींत व जे ते आजचा विचार पाहूं लागेल उद्याचा पाहाणार नाहीं व संग्रह करणार नाहीं. उद्योग खुंटेल याजकरितां निर्भयपणा हा देशाचे अबादीचें लक्षण आहे. व सर्कारचें मुख्य काम आहे.

● ● ●

मुख्य आमचे लोकांस विचार करता येत नाहीं व देशांतील रीति स्थिती कांहीं पाह्यात नाहींत. सर्व आपुलपोटे आहेत. विलायतेंतून इकडे माल विकावयास येतो किती व इकडून जातो किती हें पाहावें व अणखी जाईल व तिकडचा कमी होईल असें करावें. या देशांत पैसा राखण्याकरितां सर्वांनी झटलें पाहिजे. इंग्रजासारखी कामें करण्याची लायखी संपादन केली पाहिजे. नंतर ते न देतील असें नाहीं. उद्योग करावा ह्मणजे सर्व प्राप्त होईल. परंतु जर जेवणाच्या गोष्टी सर्वांनीं सर्वकाळ सांगीतल्या तर कोणचे रीतीने हे मोटाले विचार घडून येतील हें लक्षांत आणावें. उद्योग व शाहाणपण याचा लोप जाहला म्हणजे तीच अवदशा व त्याची वृध्धी जाहली म्हणजे तीच लक्ष्मी.

हिंदू लोक मुख्यत्वेंकरून मराठे लोक यांची सांप्रत अवस्था आहे त्याहून चांगली

स्थिती होण्यास याणी शोध बहुत केले पाहिजेत.व विद्या वाढिवली पाहिजे व हल्लीच्या रीती व समजुती सोडल्या पाहिजेत जोंपर्यंत या कायम आहेत तोंपर्यंत बरें होण्याचें चिन्ह नाहीं. जसें रोगी पथ्य करीत नाहीं तोंपर्यंत रोग जाणार नाहीं तद्वत या देशचे लोकांची अवस्था आहे सर्वांस लक्ष्मी पहिजे. परंतु तिला प्राप्त करण्याचे मार्ग थोडे लोकांस ठाऊक असतात. उद्योग, विद्या, सुनीती हे लक्ष्मीस आणणारे आहेत म्हणून यांची वृद्धी होईल ते यत्न करावे. खरेपणा वाढला पाहिजे. बुद्धी सुधारली पाहिजे. भाषा सुधारली पाहिजे. ही जितकी व्यंगें आहेत तितकीं नीट ज्या काळीं होतील त्या काळीं हे लोक लक्ष्मीवान होतील.

( लक्ष्मीज्ञान

२०

## ‘ द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदुलोकांपेक्षां अधिक आहे ’

इंग्रज सरकारचा अंमल या देशांत झाल्यापासून रस्ते, पूल व जहाजें तयार होऊन चालू झालीं. याजमुळें देशांतील व्यापारास मदत पुष्कळ मिळाली; परंतु तो व्यापारही हल्ली थकला; अफिणीवर कर बसला व कापसावर अमेरिकेचा चढ झाला. लोखंड, कागद, काच वगैरेवर विलायतची सरशी झाली. मुलखांतील व्यापारी देशांत खेड्यापाड्यांनीं देण्याघेण्याचा व्यापार करीत होते तोही थकला; कारण त्याचा आधार शेतकरी लोक होते ते भिकारी झाले व साऱ्याइतकेंही शेतांत पीक होत नाहीं, तेव्हां त्यांणीं सावकारास काय द्यावें ? कसें तरी करून सरकारचा सारा रडतकढत भरतात; कारण कीं; सरकार जबरदस्त. तें लागलेंच घरदार, जमीन व भांडीकुंडी जप्त करील या भयानें त्याचें देणें अगोदर करतात. सावकार मागावयास आला म्हणजे हातपाय पसरून बसतात. जा, फिर्यादी करा असें म्हटले म्हणजे सावकार मनांत आणतो कीं, कुळें नादार, आणखी फिर्यादीस रुपये काढले पाहिजेत, कोडतांत फेरे घातले पाहिजेत, जितके रुपये मागावयाचे त्याच्या अर्धे खर्च केले तरी ते हातीं येणें मुष्कील असें समजून ते देतील तें घेऊन उगीच बसतात. ज्याच्या घरीं वर्षास हजार रुपयांची प्राप्ति होती त्याच्या घरीं दोनशें येत नाहींत,

व पैसा दिला तो पुनः येईल असा भरंवसा नाहीं. कारण कीं, शेतकींत व व्यापारांत कसर कोठेंच राहिली नाहीं. अदालतीचें कर लुटारूसारखे आहेत एक अदालतीचे सर्टिफिकिट घेणें तर मिळकतीप्रमाणें स्टांप घ्यावा लागतो. ज्या कामांत ते सर्टिफिकिट दाखल करावयाचें तें दहा रुपयांचे असतें. त्याकरितां पन्नास रुपये खर्च करावा लागतो हा कर दरपिढी लागला आहे. ही अवस्था पाहतां लोकांस आश्चर्य वाटतें कीं, लोक जगतात कसे? एका वैद्यानें मृतशरीर फाडून पाहिलें, त्यास असें वाटलें कीं, मनुष्य मरतो हें मुळींच आश्चर्य नाहीं. जगतो हे आश्चर्य आहे. कारण त्यांत इतकी बारीक बारीक यंत्रयोजना आहे कीं, आयुष्य चालतें हाच विस्मय आहे ही केवळ ईश्वरी कृपा आहे त्याप्रमाणें या देशांतील रयत वांचली आहे हेंच आश्चर्य वाटतें; परंतु ईश्वर कृपेने थोडयांत निर्वाह होतो व निर्वाहाचे पदार्थ पुष्कळ पिकतात. याजमुळें कसेंही करून जीवन होतें. त्यांत आतां दारूचें व्यसन अतिशय वाढत चाललें हें मात्र मोठें विघ्न आहे. हें जर वृद्धिंगत झालें तर दुर्दशेस फार नाहीं असें होईल विलायतेंत कोट रुपयांची दारू वर्षास खर्च होते आणि त्यापासून दरिद्र व निर्बलता वाढते. तोच प्रकार येथे होणार आहे. मनुष्यास निर्वाहाकरितां मद्यमांसाची कांहीं गरज नाहीं. असे बहुत करून हल्लीं विलायतेंतील वनस्पतींवर निर्वाह करणाऱ्या लोकांनी सिद्ध केलें आहे व हजारों डाक्टरांनीं त्यास अनुमोदन दिलें आहे. मनुष्य दीर्घायुषी व बळकट होण्यास चांगलें अन्न, निष्काळजी, ब्रह्मचर्य व व्यायाम यांची जरूर आहे. एक शेर तांदूळ किंवा गहूं, पावशेर डाळ व चार पैसे भार तूप इतकें मिळालें म्हणजे दुसऱ्या कोणत्याही खुराकाची जरूर नाहीं व याहून दुसरा बळ देणारा खुराक नाहीं असें हल्लींच्या रसायन–शास्त्राच्या योगानें सिद्ध झालें आहे. परंतु ती गोष्ट लोकांचे ध्यांनात येत नाहीं व दारूंत कांहीं अधिक गुण आहे असें ते समजतात ही भ्रांति आहे. " ढवळयाच्या शेजारी बांधला, पोवळा, वाण नाहीं पण गुण लागला. " याप्रमाणें इंग्रजांचें सहवासानें लोक असें समजतात कीं, त्यांच्यामध्ये बळ, शौर्य व वीर्य आहे तें त्यांच्या खुराकानें आहे म्हणून आपण त्यांचा खुराक घेऊं या. पण त्यांच्यामध्यें जें काय पशुत्व आहे तें मात्र त्यांच्या मद्यमांसाच्या आहाराचें फळ आहे. बाकी अन्नाचा आहार हाच योग्य आहे. पैसा थोडा खर्च होतो, हा एक यांत लाभ आहे, धर्म न्यायाचें रक्षण होतें आणि पशुत्व प्राप्त होत नाहीं पूर्वी हिंदू लोक हा आहार करीत होते, परंतु त्याचा वाईट परिणाम जाणून त्याचा त्याग होत आला आहे. याजकरितां आपल्या साध्या चाली जितक्या आहेत त्यांचे रक्षण करावें. हल्ली मद्यमांसाची घाण स्वीकारीत नाहींत असे इंग्रज लोक बहुत आहेत आणि त्याचा पुरा विचार करून तें त्यांणी टाकलें आहे. आणि टाकलेली पीडा आपण पुनः घेण्यास पाहत आहों याविषयीं सर्व आर्यहितेच्छूंनीं सावध राहावें.

कोडताचे कर भारी पडले म्हणून पंचाईत कोर्टें लोकांनी काढलीं आहेत तीं नीट चाललीं व लोकांनी त्याची वृद्धि केली तर त्यापासून बहुत नफा आहे, व सरकारही त्याविषयीं बंदोबस्त करील अशी आशा आहे त्याचप्रमाणें स्वदेशीय मालाचीं दुकानें जिकडे तिकडे झालीं आहेत. तेणें करून स्वदेशीय मालाचे उत्पत्तीस व खपास उत्तेजन येत

चालले आहे. स्वदेशांत पैसा राहील व उद्योग वाढेल हें मोठें काम आहे हल्लीं कोणास रोजगार धंदा नाहीं व आपलीं मुलें काय करतील हें कोणांस सुचत नाहीं. हाताचीं कामें पूर्वापार करीत आले त्यांची यंत्रांवर सरसी होत नाहीं. भाड्याच्या घोड्यावर बसून रेल्वेबरोबर चालेल म्हणून मोठा निश्चय केला तरी तो चालणार नाहीं हें लक्षांत ठेवून वागावें.

उद्योग हीच लक्ष्मी आहे. भूमिच केवळ फलद्रूप होत नाहीं. कारण कीं, द्रव्य घालावें तेव्हां मोठाले बागबगीचे व विहिरी होतात; पण त्यांत फायदा नसला म्हणजे हीं कोणी करीत नाहींत. त्यांत श्रीमंत लोक कमती झाले म्हणजे असले धंदे पडून राहतात. प्रजा निर्धन झाल्या यामुळें आकाशातून पाऊस पडून त्यांत पिकेल तितके खाऊन निर्वाह करितात. पूर्वीच्या केलेल्या विहिरी आहेत त्यांस कोणी मोट जोडीत नाहीं, कारण कीं खर्चाचा मेळ पडत नाहीं. सरकारचे कर असे आहेत कीं, ते वारून शेताकडे खर्च करण्यास कांहीं राहत नाहीं. उलटा सरकार सारा देण्यास सावकाराचें घर किंवा मुंबईचे बंदर पाहावें लागतें. उत्तम पीक आलें तर थोडी कसर राहील; परंतु नेहमी उत्तम पीक येत नाहीं.

केवळ लोक आकाशी शेती करितात त्यांतही विशेष कसर नाही. दोन पैसे तीन पैसे रोजची मजुरी पडते. शेण आणून गोंवऱ्या कराव्या. बांधावरचें गवत काढून भारे विकावे तरी पोट भरत नाहीं. मग पितर पाट, दुखणें, मरण वगैरे बद्दल खर्च आला कीं, वेळा गाहाण, नथ गाहाण, बैल एकादा असला तर त्यास बाजार दाखवावा अशी चोहोंकडून तारंबळ होते. बागाईतांत कांहींच नफा नसून उलटा खर्च मात्र अंगावर येतो. याजमुळें बागाईत फारसें कोणी करीत नाहीं. द्राक्षी, कौले, डाळिंबे वगैरे उंच्या मालास बाजार नाहीं. मुंबई लगत असेल तर मात्र कदाचित रमारमी होईल. याप्रमाणें शेतीची स्थिति आहे.

व्यापाराची स्थिति पाहिली तर बाजार विलायती व चिनी मालानें भरला आहे. कागद,शाई, लोखंडी सामान, काच व वस्त्रें सर्व बाहेरून येतात तेव्हां देशांत धंदा नाहींसा झाला. कागदाचे कारखाने उजाड पडले. हुंड्याचे ठिकाणीं नोट व मनीऑर्डर मिळतात. रेल्वेत माल घातला म्हणजे विम्याची गरज नाहीं. जिनगर, शिकलगर, लोहार घरीं बसले. सोनाराजवळ उंची धातु येईल तर पोट भरणार. ती धातु नाहींशी झाली. खेड्या-पाड्यांनीं ज्या सोई होत्या त्या सर्व गेल्या. वतनदार रयतेसारखे झाले. रयत भिकारी त्यामुळें कर्जवाम दिलें तर परत येत नाहीं. फौजेतील रोजगार सर्व गेले. कंट्राक्टावर चढ होऊं लागले त्यामुळे त्यांतही फायदा नाहीं. मोदीखाने वगैरे पहिले उदार मनाचे साहेब लोक होते निभावीत. आतां रुपयांचे चार आणे होत नाहींत.

रोजगाराकडे पाहिलें तर जेथें तेथें साहेब पुढें येतात. पोलिस व त्यात सिविलसर्विस तर राजवंशीच म्हटली पाहिजे. त्यांत नेटिवांचा प्रवेश न व्हावा याजबद्दल जितक्या युक्ति असतील तितक्या लागू केल्या आहेत. बाकी राहिलेल्या जाग्यांत मिलिटरी व डाक्टर

दाखल होतात. कांहीं कांहीं बारिस्टरही त्यांत येतात. नेटिव बारिस्टरांस कोणी पुसत नाहीं; परंतु विलायती व हिमायती असतील त्यांस हायकोर्टांत वगैरे ठिकाणीं अनेक जागा आहेत त्या मिळातात. विलायतेंतील थकून राहतील तर नेटिवाची पाळी येणार. या देशांत उमेदवार, व्यापारी व भिकारी यांची जशी गर्दी आहे त्यांहूनही विलायतेंत अधिक आहे. त्यामुळें द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदुलोकांपेक्षा अधिक आहे. असल न मिळतील तर कदाचित् टाकक्यास्ट लोक, पोर्तुगीज लोक, हे सर्व आश्रित थोडे आहेत असें नाहीं. इतके जवळचे लोक टाळून नेटिव जरी स्वभाषा शिकून परभाषा शिकला, त्यानें मोठ्या बिकट परीक्षा दिल्या, व लाखांत एक असा बुद्धिमान् असला तरी त्याची चीज होत नाहीं. लष्कर खात्यात रिघाव नाहीं, पोलिटिकल, इंजनेर, व्यापार, रेविन्यु, इत्यादि सर्व ठिकाणीं खरे करणारे तर नेटिवच; पण मानकरी मंडळी त्याजवरती आहेच. एक डेप्युटी कलेक्टर असला म्हणजे तिजोरी, फौज व किरकोळ सर्व कामें सदर जागीं राहून फैसल करितो. परंतु चार पांच असिस्टन कलेक्टर जिल्ह्यांत नजर ठेवण्यास फिरतात. त्यांची नजर इतकीच कीं, थंडोशाच्या ठिकाणीं तंबू लावून काळ काढावा आणि कलेक्टर होण्यास जो अनुभव पाहिजे तो मिळवावा. एकादी भाषा शिकावी मामलेदाराचें टपाल मागें पुढें पोंचवावें. सारांश खर्च बहुत आहे. परंतु हे म्हणण्यास नेटिवांस संकोच बहुत झाला आहे.

पोट भरण्याचे तीन मार्ग– उत्तम खेती, मध्यम व्यापार व कनिष्ट चाकरी; परंतु तिहींतही सोय राहिली नाहीं. तेव्हां लोकांनी उद्योगधंदा वाढेल याची तजवीज जरूर केली पाहिजे. आलीकडे नेटिव संस्थानांत कांहीं विद्वानांचा प्रवेश झाला आहे ही गोष्ट चांगली आहे. येणेकरून बचाव झाला आहे; परंतु दरसाल विद्याशाळेंतून लोक तयार होतात त्यांणीं कोठे जावे व तयार होण्यास पैसा कोठून आणावा. तयार झाल्यावर करावें काय हा विचार मोठा आहे या देशांतील लक्ष्मी वाढण्याचा यत्न सरकार कांहीं करीत नाहीं. कोळशांच्या खाणी, लोखंडादि धातूच्या खाणी वगैरे पुष्कळ आहेत; परंतु त्या कामीं मदत सरकारची नाहीं. सावकार व श्रीमंत यांस अक्कल नाहीं, ते अद्याप समजलें नाहींत, जुन्या भ्रांतीत व जुन्या वेडांतच अद्याप गर्क आहेत. सरकारास द्रव्याची गरज लागली तर दोन मार्ग काढितात, कर अधिक घाला किंवा कर्ज काढा. विलायतचें कर्ज कोट्यावधि रुपये या देशावर आहे त्याचे व्याज भरावे लागतें, परंतु या स्थितीचा पुढें परिणाम काय होईल हा एक प्रश्न मोठा आपल्या मनास विचार करण्याजोगा आहे. नेटिव राज्यापेक्षा इंग्रजी राज्य चांगलें व सुखकर अशी जी समजूत होती ती जाण्यास हीं बहुत कारणें उत्पन्न झालीं व मोंगलाई तऱ्हा जास्ती जास्ती दृष्टोत्पत्तीस येत चालली तेव्हां परमेश्वरानें काय योजना केली असेल ती खरी, असें म्हणून समाधान करणें भाग आहे.

हा देश मोंगलाई मराठी अमलापासून राजे व सरदार लोकांच्या अनीतीनें व दुष्टपणाच्या वर्तणुकीनें त्रासला होता. परगणें उजाड पडले. अधिकार, हक्क, सत्ता आणि स्वस्थता हीं नाहींशीं झालीं होतीं. अशा समयीं इंग्रज सरकार उत्तम रीतीने राज्य व्यवहार चालवितात, हें पाहून रयतेस असा धनी मिळाला म्हणून आनंद झाला. तेणेंकरून

सरकारचा अंमल चोहोंकडे सुलभ रीतीनें बसला. देशांत निर्भय झालें, न्यायादिकांची रीती फार चांगली चालूं लागली, प्रामाणिकपणा सरकारचा इतका वाढला कीं, त्याची कोटयवधींचीं खतें बाजारांत वर्तवळयानें चालतात. विद्यावृद्धि, चोहोंकडे शाळा वगैरे होत चालल्या आहेत. मोठया मोठया सुधारणा चालूं झाल्या. लोकांमध्यें विचार उत्पन्न झाला. आजपर्यंत लोक दबलेले होते, राजांची व भटांची अनेक प्रकारची जाचणी होती ती दूर होत चालली, अशा समयीं इंग्रज सरकारचें कर्तव्य येवढेंच आहे कीं, हा देश धनवान झाला पाहिजे, उद्योगी झाला पाहिजे आणि स्वतंत्रतेस आला पाहिजे. या देशांत पार्लमेंट स्थापन झालें पाहिजे. देशांतील लक्ष्मीचें शोधन झालें पाहिजे, आणि मोठाले अधिकार प्रजेस मिळाले पाहिजेत.इकडे नजर इंग्रज सरकारांनीं देऊन नेटिव राज्यापेक्षां इंग्रजी राज्य सर्वदा उत्तम आहे असें लोकांच्या मनांत राहावे अशा रीतीनें चाललें पाहिजे. तर इंग्रज सरकारच्या राज्यास दीर्घायुष्य येईल आणि नेटिव राज्याच्या तुलनेस जितक्या प्रमाणानें जवळ येईल तितक्या प्रमाणानें त्यांचें आयुष्य कमी असें पूर्वी इंग्रज सरकारचें उदार मनाचे अंमलदार बोलत आले हीच गोष्ट खरी आहे. नेटिव राज्याची लक्षणें कोणतीं तर तीं उघडच आहेत.

कोणत्याही नेटिव राज्यांत जाऊन पाहावीं. प्रजेस सत्ता नाहीं,मुलखांत शांती नाहीं, राजे मन मानेल तसे चालणार, मोकळीक कोणतेही प्रकारची नाहीं, प्रजा दरिद्री व कराच्या भारानें थकलेली,विद्या विचार शून्य झालेली.सरकारांत प्रामाणिकपणा नाहीं. न्याय मर्जीवर, कायदा मर्जीवर,नजराणे दर कचेरीत घेतात.या धोरणावर इंग्रज राज्य जितके वाढेल तितकी त्याची शक्ती कमी समजावयाची जीं जीं नेटिव राज्यें गेलीं तीं या दुर्गुणानेंच. पाहा पुण्यांत बाजीरावांची कारकीर्द,बडोद्यांत मल्हाररावांची कारकीर्द,लखनौंत वजीदअल्लींची कारकीर्द, पंजाबात महाराणीची कारकीर्द सातार्‍यांत आप्पासाहेब महाराजांची कारकीर्द व तारकसाचें चरित्र, तेव्हां त्यांचा दुष्टपणा त्यांच्या नाशास कारण झाला, असें इतिहासावरून दिसतें. याजकरितां इंग्रज सरकारची प्रजा बलवान; धनवान,विद्वान, संपत्तिमान, सत्तावान अशी होण्यास जें जे कायदे पाहिजेत ते ते करून राज्यरीती चालली तर प्रजा संतुष्ट होऊन दुवा देईल. त्यांच्या विरुद्ध जे जे मार्ग निघतील ते असंतोष उत्पन्न करून राज्याची बळकटी कमी करतील.इंग्रज सरकारचे उपकार या देशावर बहुत.आहेत.सबब त्याचें हित इच्छिणा-रांनीं यथार्थ आहे तेंच बोलावें अन्यथा जे मसलत देतील तेच शत्रु समजावे. यास्तव हल्लीं इंग्रज सरकारची प्रजा दरिद्री झाल्याचा जो बोभाट आहे तो दूर करण्याचे यत्न चालूं आहेत त्यास सरकारनें सहाय होऊन प्रजेची बहादारी करावी ही आमची सरकारास प्रार्थना आहे.

( हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याचे कारण

# हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणे

हल्लीं जिकडे तिकडे लोक असें बोलतात कीं, द्रव्य नाहींसें झालें व अधिकाधिक नाहींसें होत चाललें आहे, वीस हजारांची हवेली पांच सात रुपये महिन्यास भाडें दिलें तर मिळते. युरोपियन लोकांस राहाण्याजोग्या बंगल्यांचें मात्र भाडें बरें येतें; परंतु घराच्या भाड्याची मारामारच आहे. कुणबी लोक माल तयार करतात व ते म्हणतात कीं, माल खपत नाहीं. तो देऊं लागलें तर मातीच्या मोलानें जातो. ज्याला त्याला असें वाटतें कीं, पुढें दिवस कठीण येत चालले आहेत. लहान मोठे व्यापारी व शेतकरी या सर्वांचे एकच म्हणणें आहे, हलवाई, भडभुंजा, कोष्टी, कोळी, तेली व कुंभार या सर्वांचें म्हणणें असें आहे कीं, गिऱ्हाईक नाहीं. एक रुपयाचे डाळेचुरमुरे तयार केले आणि ते एक दिवसात खपले तर चार आणे नफा पदरीं पडेल; परंतु एक रुपयाचा माल खपविण्यास चार दिवस लागतात. बाजारांत, स्टेशनावर, जत्रेंत, चोहींकडे धाव घ्यावी तरी चार आण्यांचा माल खपत नाहीं आणि नफा अर्धा आणाच मिळतो लोकांस माल घेण्याची इच्छा आहे पण ताकद नाहीं. खाणेंपिणें सुख भोगणें हे पैशाच्या स्वाधीन आहे पैशाचा तोटा असला तर घरचें पीठ बांधून पंढरीची वारी करावी आणि जाऊन येण्यांत दोन आण्याचे पैसे खर्च केले नाहीं तरी म्युनिसिपालिटी चार आणे कर मागते तेव्हां मोठे संकट पडते. असा जिकडे तिकडे पैशाचा तोटा कां पडला याचे कारण काय याचा तपास करितां असें दिसतें कीं, जुन्या काळचीं अज्ञानी सरकारें जुलूम करीत होतीं व व्यर्थ पैसा खर्च करीत होती. परंतु तो सर्व पैसा देशांत राहात होता. दोन हजार वर्षांपूर्वी अशोक राजा झाला. त्यानें डोंगर कोरून लेणीं केली. दिल्लींच्या बादशहाने आग्र्यास ताजमहाल बांधला. मल्हारराव गायकवाड यांणीं लक्ष्मीबाईकरितां मोठी नजरबाग केली तीस लाख रुपये खर्च झाला. आतां अशा कामांत धर्मभोळेपणा किंवा सुखेच्छा यांखेरीज दुसरें कांहीं प्रजेच्या हिताचें धोरण नव्हतें, तरी जो पैसा खर्च झाला तो सर्व परत प्रजेकडे आला. कांही गवंड्यांनीं, कांहीं सुतारांनीं, कांहीं पाथरवटांनीं, कांहीं मजुरांनीं नेला व त्यांचे अंगत्वे वाणीं वगैरे सावकार यांचे हातीं तें द्रव्य परत आलें. परंतु हल्लीचें सरकारांत लक्ष्मी दर्यापार जाते असें म्हणतात व पुराणिक सांगतात कीं समुद्रमंथन करून देवांनी लक्ष्मी दर्यातून काढली. ती आतां आपले माहेरी चालली आहे. असें वाटण्याचें कारण कोणी सांगतात की, लोक निंदक आहेत व कोणी म्हणतात कीं, लोकांची परराज्यावर प्रीति नाहीं. कोणी म्हणतात कीं हल्लीं लोक श्रीमंत होत चालले आहेत. लोकांस उगीच दरिद्राची भ्रांति वाटते. जसें ज्याचे वळण तसें तें बोलतात. परंतु यांतील तथ्यांश काय आहे याचा आतां विचार करूं.

देशांतून माल बाहेर जातो त्यास रवानगी म्हणतात. व देशात येतो त्यास अमदानी म्हणतात. कोणत्याही देशांतून रवानगी होईल तर त्याची किंमत व त्याजवर नफा इतके परत आले तर तो व्यापार ठीक झाला असें समजावयाचें. आता किंमत नफा रोकड रुपयांनीं मिळो अथवा परदेशांतील मोबदल्याने मिळो त्यास चिंता नाहीं. आतां हिंदुस्थानच्या रवानगीचे हिशोब आहेत त्यांची दहा साली सन १८५८ पासून सन १८६७ पर्यंत तपासतां असें दिसतें कीं रवानगीची बेरीज रु. ४५६ कोटि. अमदानीची बेरीज (पैकीं ७२ कोट रु. चे रेल्वेकडून लोखंड वगैरे) रु. ४१९ कोटि. माल नव्हे. ती बेरीज वजा करितां बाकी रु ३४७ कोटि माल गेला. त्याचे मोबदला काही परत आला नाही. त्याची बेरीज १०९ कोटींची खोट हिंदुस्थानने खाल्ली. म्हणजे दरसाल दहा कोट नव्वद लाख रुपयांचा तोटा ऐन रवानगींत आहे. नफ्यांचे तर आम्हीं नांवच घेत नाहीं

दरसाल या देशास दहा कोटींची खंडणी भरावी लागते. या देशापाशीं रोकड पैसा भरण्यास नाही, तर तितक्या किंमतीचा माल द्यावा लागतो. म्हणजे इतकें उपयोगी द्रव्य अनेक रूपाने या देशांतून जातें व त्याचा मोबदला या देशांस कांहीं मिळत नाहीं. याप्रमाणे दादाभाई नवरोजी यांनीं पत्रक करून दाखविलें आहे.

आतां दुसरें पत्रक कर्नल म्यॉरियट यांनीं केलें आहे. त्यांत ते असें दाखवितात कीं सन १८६१ पासून सन १८७३ पर्यंत बारा वर्षांचा हिशोब तपासला त्याजवरून दिसतें कीं, रवानगी माल-- रु. ६५५ कोटि. अमदानी सोनेंरुपेंसुद्धा रु. ५२२ कोटि. तोटा-- रु १३३ कोटि. सन १८६१ पासून १८७३ पर्यंत बारा वर्षे त्यांनीं भागले तर दरसाल तोटा येतो रु. ११ कोटि. विलायतेहून रोकड नाणें किंवा नोटा इकडे येत नाहींत व इकडून तिकडे जात नाहींत. कारण या देशाचें नाणें त्या देशांत चालत नाही व तिकडील इकडे चालत नाहीं, जी काही घालमेल व्हावयाची ती मालाचे रवानगी अमदानीत होते. ती अशी की, निकल कंपनीनें पन्नास लाख रुपयांचा कापूस मुंबईहून रवाना केला आणि त्याचे पैसे विलायतेहून यावयाचे; परंतु तेथें महाराणी सरकारचे सेक्रेटरी आहेत ते त्या सावकारांस पन्नास लक्ष रुपयांची हुंडी देतात आणि सांगतात कीं, हा पैसा तुम्हांस मुंबईचे तिजोरीतून मिळेल तेव्हां ती हुंडी मुंबईत येते आणि हिंदुस्थानचे द्रव्यापैकींच निकल कंपनी आपला पैसा घेते, तेव्हां हिंदुस्थानच्या रयतेनें माल पिकविला, विलायतेस पाठविला, आणि त्याची किंमत हिंदुस्थानच्या रयतेच्या पैशांतून दिली. मालाचा उपयोग विलायतेच्या लोकांनीं एक पैसाही दिल्यावांचून केला. हुंड्या वगैरे कागद इकडून तिकडे जातात व येतात. त्यांत काही अर्थ नाहीं. परंतु माल जातो त्याचा पैसा तिकडच्या तिकडे वळून घेतल्यामुळें हिंदुस्थानच्या रयतेस ही खंडणी भरावी लागते. ही नगदी खंडणी नाहीं, परंतु ऐन जिनशी खंडणी आहे. तेणेंकरून अकरा कोटि किंमतीचे द्रव्याचा उपभोग या देशांतील लोकांस मिळत नाहीं, परदेशातील लोक घेतात. हिंदुस्थान सरकारचें ऑफिस विलायतेस आहे. त्या कारखान्याच्या फक्त खर्चाबद्दल सेक्रेटरी यांजकडून

दर महिना कोट रुपयाच्या हुंड्या येतात.

किती एक लोकांस असें वाटतें कीं या देशांतून माल रवानगी फार होतो व अमदानी थोडी आहे. यावरून देशाचे उत्कर्षाचे चिन्ह आहे, परंतु यांत मोठी भूल आहे. रवानगी होते त्याची बेरीज मोठी दिसते. परंतु त्याची किंमत या देशास मिळते किंवा नाहीं हें पाहिलें पाहिजे. किंमत मिळण्याचे द्वार त्या देशांतून जो माल इकडे येतो तेंच आहे. तो माल जर कमी येतो तर असें समजावयाचें कीं, आपला रवानगीचा माल फुकट गेला किंवा वळून घेतला आणि त्याची किंमत आपणांस मिळाली नाहीं. आतां कोणी म्हणतील कीं इंग्रजी राज्यापासून अनेक लाभ या देशास आहेत, तीच किंमत समजावी आणि ते लाभ कोणते म्हणाल तर ऐका-१) परदेशांतील शत्रूंस अडवून धरणें २) देशांत स्वस्थता राखणें ३) विद्यावृद्धि करणें ४) सती, कन्याहत्त्यां, आत्महत्त्या, दुर्दशेचे वैधव्य इ. बंद केली आहेत. ५) लेखी कायदा चालत आहे. मर्जी बंद झाली. ६) लिहिण्याची व बोलण्याची मोकळीक आहे.

हे लाभ मोठे नाहींत काय ? तुमची आई किंवा बहीण प्रारब्धानें विधवा झाली असती तर भटांनीं तिला जिवंत चितेत घातले असते. ती इंग्रज सरकारनें वाचवली. तेव्हां तुमचे आईबहिणीसारखें महातीर्थ तुम्हांस राहिलें, त्याची किंमत दर माणशी लाख रुपये धरण्यास काय चिंता आहे ? तसेच इंग्रज सरकारचे शाळेंत जे मोठाले विद्वान झाले आहेत त्यांनीं प्रत्यक्ष पैसा विद्येकडे खर्च केला असेल परंतु त्याची किंमत कोट रुपये धरण्यास काय चिंता आहे ? सर टी. माधवराव, भाऊ दाजी, दादोबा पांडुरंग, दादाभाई, व नवरोजी फरदूनजी अशीं माणसे इंग्रज सरकारमुळें या देशांत निर्माण झाली, त्यांची किंमत दर एकाची कोटि रुपये म्हणण्यास काय चिंता आहे ? तसेच एम्. ए; बी. ए. वगैरे पदव्या मिळविणारे लोकांची किंमत दहा दहा वीस वीस लक्ष नव्हे काय ? जर या देशास त्यांचे निष्पत्तीबद्दल इतका खर्च पडला आहे तर इंग्रज सरकार त्यांची किंमत न करोत परंतु या असाम्या कोटयावधीच्या आहेत असें समजण्यास आपणांस काय चिंता आहे ? या लोकांस पाठशाळेत महिना पांच रु. दहा रु. भरावे लागलें तरी ज्या सरकारनें पाठशाळा घातली त्या सरकारचे स्थितीकरीतां आपण यास जितके कोट रु. दरसाल भरावे लागतात त्यांच्रेबदला ह्याच असाम्या समजाव्या. दयानंद सरस्वतीसारखे उघडपणें बोलणारे उपदेशक फिरतात.याजमुळे लोकांस प्रबोध होतो त्याची किंमत क्रोड रु धरण्यास काय चिंता आहे ? जुनिया देशांतील जंगली सरकारें असती तर या स्वामीची धिंड काढली असती. परंतु आता ब्राह्मणांनीं मनांत चुरमुरावें इतकेंच राहिलें आहे; परंतु सर्व लोकांस राज्यावर व धर्मावर चर्चा करण्यास जी कायद्याने सत्ता मिळाली आहे ती कोणीही घेऊं शकत नाहीं. छापखानेवाले यांसही याचप्रमाणें अधिकार आहे तेव्हा या मोकळिकेची किंमत लाखों रुपये समजली पाहिजे.

दुसरें, विलायतेस किंवा चिनांत जाऊन कोणी लौकिक केला असतां एका आळीतील कुत्रा दुसऱ्या आळीत गेला तर ज्याप्रमाणें त्या आळींतील सर्व कुत्रीं त्याजवर तुटून पडतात

त्याप्रमाणें सर्व ब्राह्मणमंडळ त्याजवर तुटून पडत असे आणि दहा दहा वीस वीस वर्षे पैसे खाण्याचे इच्छेने भट हा रोजगार पिकवून बसत, ते आतां बहुतेक बंद झाले. ब्राह्मण लोभी आहेत असें सर्व नवीन गृहस्थ समजूं लागले. हा सर्व प्रताप इंग्रज सरकारचा आहे. याची किंमत किती समजावी ?

पाहा कीं, सर्व हिंदु लोक मुळापासून बकऱ्यासारखी जात. त्यांस कोणीही पोटास दिलें तर ते स्वदेश किंवा बापभाऊ यांची ओळख सोडितात. जर जातीचे लोक दुसऱ्या जातीशीं वैर करतात, आपण फितुर होऊन आपलेच लोकांस मारतात व आपणच पेंढारी होऊन आपणांसच लुटतात. अशा या देशाच्या गुणी लोकांस आवरणारा मोठा जबरदस्त राजा पाहिजे. नाहीं तर शिंद्यांनी होळकरास लुटावें, होळकरांनीं पुणे लुटावें असा प्रकार होणार याच कारणाने हिंदुस्थानच्या सभोंवताली काबूल, इराण वगैरे जीं राष्ट्रें आहेत तीं याचा दुर्बलपणा पाहून लांडग्यासारखी टपून बसली आहेत, तीं पुढें सरसावतील. हिंदु लोकांमध्यें युद्धसंबंधी वीरपणा मात्र आहे. परंतु युद्धांतील कलाकौशल्य यांस ठावूक नाहीं. यांजमुळे इंग्रज लोक यांचे संरक्षण करण्यास जरूर पाहिजेत; तेव्हां यांस सांभाळण्याची किंमत पांच कोट रुपये समजण्यास हरकत नाही. इंग्रज सरकारतर्फे गवर्नर जनरल या देशांत जबरदस्त अधिकारी आहेत. म्हणून शेर अल्लीखानासारखे काबूलचे राजे त्यांचा आश्रय इच्छितात आणि नेटिव लोकांसारखें पोकळ राज्य तेथे असतें तर पूर्वी जसें अबदल्ली व नादरशहा या देशावर आले तसे शेरअल्ली येणार नाहींत काय ? तर या सर्व शत्रूस दूर राखण्याजोगें सामर्थ्यवान सरकार पाहिजे कीं नको ?

सदरहूवर नजर देऊन आपण मोठे उदारपणानें आपले खंडणीबद्दल आपणांस कांहीं लाभ आहेत असें समजलों तरी यांजमुळें द्रव्य जातें तें जात नाहीं असें होत नाहीं या देशांतील माल बिन किंमतीनें जो आपणांस इंग्लंड देशास द्यावा लागतो तो तोटा भरण्याजोगा लाभ यांत एकही नाहीं. जें द्रव्य गेलें तें गेलें इतकी विद्यावृद्धि हल्लीं या देशांत होत आहे. तरी विद्येनें द्रव्यवृद्धि होईल असें नाहीं. हल्लीच्या विद्येनें जागा मागणारे उमेदवार व मोठ्या उमेदी राखणारे गृहस्थ पुष्कळ होतात.पण यांत या देशांतील द्रव्य वाढविणारा कोण आहे? जसें दुर्दैवानें आपणांवर काहीं निमित्त आलें तर त्यांतून बचावण्याकरितां मोठा बॅरिस्टर दहा हजार रुपये देऊन केला व घरांतील दागदागिने सर्व विकून त्याची भरती केली व पुढें दैववशात तें निमित्तही दूर झाले तरी जो ऐवज गेला त्याचेबद्दल लाभ झाला. परंतु द्रव्य गेलें तें उत्पन्न झालें नाहीं, तो धक्काच बसला.

याप्रमाणे या सर्व लाभांनी आबादानी आहे. परंतु; द्रव्य जातें त्याची वाट काय ? आपण साखर व कागद विकत घेतो, कांच, लोखंड, कोळसे विकत घेतो आणि लाखों रुपये देतो, ते बंद पाडणारा विद्वान कोणी तरी आहे काय ? वास्तविक म्हटलें म्हणजे पूर्वीपेक्षां हजारपट कागदांचा खर्च वाढला आहे, परंतु त्यांचा ऐवज सर्व विलायतेस द्यावा लागतो. आमचे देशी कागदाचें कारखाने सर्व ओसाड पडले. लोखंडाचे कारखाने रद्द झाले. विमा व हुंड्या यांचीं दुकानें बंद पडलीं याप्रमाणें या देशांतील सर्व उद्योग बुडाला.

जमीन नांगरण्याची मात्र राहिली; परंतु स्वताई व कर यांजमुळें त्या उद्योगांत पोट भरण्याची सोय नाहीं. फौजेसंबंधी सरंजाम, पोषाख, सामान, दारू, हत्यारें वगैरे सर्व विलायतेंत खरेदी होतात. यांजमुळें क्रोडों रुपये विलायतच्या सावकारांस व विलायतच्या कारागिरांस मिळतात; आणि त्याप्रमाणें सामान येथे पैदा होईल ही आशा नाहीं. व तें सामान इंग्रज सरकार येथें कारखाने करवून करील याचीही आशा नाहीं व जरी केलें तरी सरकार खरेदी करील याचीही आशा नाहीं.

हिंदुस्थानची लक्ष्मी दरसाल दहा कोट कमी होत आहे. यांजमुळें येथील रयतेमध्यें पैशाची तूट दिसून येते. या देशांत विलायतचा माल थोडा येतो आणि जातो पुष्कळ. त्याचे मोबदला या देशास इंग्रजी राज्याचा मात्र लाभ आहे. याशिवाय द्रव्यवृद्धीचा प्रत्यक्ष लाभ नाही. द्रव्यदृष्टीनें पाहिले तर तोटा आहे. ज्ञानदृष्टीनें पाहिलें तर सदरीं फायदे लिहिले आहेत ते मानून घ्यावे.

● ● ●

परदेशचे हुन्नराची चढाई या देशावर झाली आहे तशी पूर्वीं कधीच झाली नव्हती. पूर्वीं शिकंदर, महंमद गिझनी, तेमूर, अबदूल अल्ली व नादिरशाह इत्यादिकांची चढाई झाली होती त्यापेक्षां ही तीन कोट माणसांची चढाई झाली, याजमुळे आपण अगदी भिकारी होऊन लुटले गेलो. दिवसेंदिवस शिकणें पुष्कळ होत चाललें; परंतु उद्योग धंद्याच्या नांवे पूज्य पडलें. याजमुळे सरकार चाकरी काय ती मोठी दशा झाली आहे. याजकरितां आतां जे विद्वान व विचारी लोक असतील त्यांणीं यत्रज्ञान वाढवून वाफेचीं यंत्रे जितकीं आणवतील तितकीं या देशांत आणून टाकली पाहिजेत व कृतीचे किंवा खाणीचे कोळसे येथेच काढले पाहिजेत. येथें जंगलें बहुत आहेत त्यांतून लांकडाचे कोळसेही करिता येतील. तसेंच धातूच्या खाणीचे शोध केले पाहिजेत. मि ओलढाम म्हणून सरकारानें जिओलॉजिकल सर्वेयर नेमिला आहे, परंतु हीं सर्वे कोठे आहे व काय झालें त्याचा ठिकाणी नाहीं. मेजर फुल जेम्स पूर्वी रेवाकाठ्यांत पोलिटिकल एजंट होते. त्यांणीं पंचमहालावर रिपोर्ट केला.आहे. त्यांत बहुत ठिकाणीं लोखंड व सोने व कोळसे सापडतील असें लिहिलें आहे; परंतु त्याचा पुढें तपास कोणी केला नाही. पंचमहाल हल्ली इंग्रज सरकारांत वीस वर्षांपासून आहे, परंतु हा शोध वाढला नाहीं. माळव्यांत बढवाईस व दक्षिणेंत महाबळेश्वर व ग्वालेरीजवळ नखर वगैरे ठिकाणी लोखंडाच्या खाणी होत्या त्या बंद पडल्या.कारण कीं,तेथील लोखंड करणारे लोक धवड वगैरे विलायती मालाबरोबर लोखंड स्वस्त विकू शकत नाहींत व त्यास कारखाने सुधारण्याची शक्ति नाहीं व कोणी मदतही करीत नाहीं याचप्रमाणे कपडवंच येथील कानेची अवस्था आहे. पूर्वींपेक्षां हजारपट अधिक कागदांचा खप हाल्लीं आहे. छापखाने वगैरे कागद फार खातात; परंतु हा सर्व पैसा विलायतचे लोक नेतात. हल्लीं दोन तीन प्रकारचे लोखंड विलायतेहून येतें. त्यांत बीड, रूपाशाई व सकई असे प्रकार आहेत.

त्यांत उंच प्रकारचें लोखंड लाकडाच्या कोळशानें होत असतें. खाणीच्या कोळशाचें लोखंड नीच होतें. तेव्हा येथील जंगलांत कोळसे पाडले तर उंच जातीचें लोखंड होईल. तसेंच लाखो रुपयांची साखर देशावरची येते आणि येथें ऊस पुष्कळ पिकतो; परंतु हुन्नर नाहीं याजमुळें परदेशांत पैसा जातो. तसेंच रेशीम व उंच प्रतीचा कापूस उत्पन्न केला तर बाहेरचा घ्यावयास नको. त्यापासून पैसा येथे राहील व मेहनत मजुरी या देशाच्या माणसास मिळेल.

येथील राजे वगैरे गाढ निद्रेंत आहेत. त्यांस या चढाईची खबर अद्यापि लागली नाहीं. ग्वालेर, इंदूर, व बडोदें येथें वर्षांत वीस लाख रुपये धर्मादाय आहे; परंतु घनपाठी आले त्यांणी हजार रुपये नेले, जटापाठीं आले त्यांनी ५०० नेले या प्रमाणे बक्षिसें, बिदाग्या व दक्षिणा वांटतात; परंतु नारळी कांठी, आस्वली पदरी, माइफूल काठी जो विणतो त्यास कोणी पैसाही देत नाहीं त्याचें देणें असेल त्यांत उलटें कमी करितात. नवें हुन्नर काढणारास कांहीं मिळत नाहीं. वास्तविक पाहिलें तर देशास हितकारक घनपाठी बुवा कीं, साखर करण्याचा हुन्नर करणारा व कोणास बक्षिसें द्यावीं? पूर्वीं लाखों फौज घेऊन होळकर, शिन्दे, गाअिकवाड युद्धांस व लुटावयास निघत; परन्तु हल्ली त्यांणीं या चढाअीवर हल्ला केला तर कांहीं हरकत नाहीं. आपले खासगीचे दागिने विकून फौज अुभी करीत आहे आज सर्व जवाहीर विकून वाफेची यंत्रे आपल्या महालोंमहाली घालतील तर देशाचें मोठे कल्याण व त्यांचे वडील फौजा घेअून नाश करीत होते. त्यापेक्षां हल्लीच्या त्यांच्या वंशाचा अधिक प्रताप व कीर्ती होअील.

हल्लीच्या यंत्राच्या चढाईवर हल्ला करणें हें साधारण काम नाहीं आणि हे सिद्धीस गेले तर पंचवीस वर्षांत बहुत फेरफार होअील. या कामात सरकारची फारशी आशा धरूं नयें कारण सरकारच्या मनांत विलायतेचा व्यापार व बाजार गरम राखावा असें आहे. तेथील तेजी कमी होअू नये म्हणून त्यास जितकी त्यास मदत होअील तितकी करतात. अेक बंगला बांधणें तरी लोखंडी सामान विलायतेहून आणून बांधतात. तिकडे पैसा जाअील तितकें बरें ! परंतु हा सरकारचा विचार आहे तो अल्पदृष्टीचा आहे. कारण कीं जरी हिंन्दुस्थानांतील लोकांचें द्रव्य हरण केलें तरी एशिया अमेरिका वगैरे देशांत यंत्रज्ञान बहुत वसत आहे. व हल्ली अमेरिकेतील लोक कापूस व लोखंड विकून कोट्यावधी रुपये विलायतेंतून नेतात त्यांस हिंदुस्थानच्या शेजारी ठेवीत आहेत. कांहीं वर्षांनी विलायती मालावर त्यांची सरसी होअील यांत संशय नाहीं.

परंतु हा विचार सरकारास तूर्त सुचून तें सावध होअील असें दिसत नाहीं. जर या देशांत त्यांस संपत्ती वाढविली तरच शोभा आहे, कारण हिंन्दुस्थान हा देश मोठा आहे तो व चीन हे दोन देश मिळून अर्धे जग म्हणविते यास्तव अिंग्रजांनी या देशाची संपत्ति वाढविण्याचा प्रयत्न स्वदेशाप्रमाणें करावा, आणि विलायत व हिंदुस्थान अेक आहे असें समजले तर निभावणी होअील नाहीं तर फजिती होअील हा विचार सरकारास सुचेल

तेव्हां सुचो; पण स्वदेशीय लोकांनी तों करणें फार अवश्य आहे. विलायतेंत जी कामें चालू झालीं तीं लोकांनीच केली त्यास राजाची मदत होती असें नाहीं; परंतु या शोधाकरितां विलायत व पुर्तकाल वगैरेचे लोक हिंदुस्थानात येऊन वसले तसे येथील लोक तेथे बसले पाहिजेत, जातिसंबंधी हरकती अज्ञानी ब्राह्मण घालतात. त्याजमुळे देश जास्ती भिकारी झाला व होत आहे हें आंधळे पंडित समजतील असें नाहीं; परंतु लोकांनी याचा विचार केला पाहिजे. येथील कंपन्या हुन्नर शिकण्याकरितां विलायतेत बसल्या पाहिजेत व हें आवश्यक काम समजून सर्व ज्ञात्या लोकांनी याविषयीं आज्ञा दिली पाहिजे; मग पंडित बाजूस राहिले तर आपलें सौभाग्य घेऊन बसतील; परंतु राजे व बहुत लोक यांची समजूत या कामीं पडली म्हणजे पंडितांचा आग्रह फारसा चालणार नाहीं. पुणें सार्वजनिक सभा व मुंबईचीं स्वदेशीय मालाचीं दुकानें चालू झालीं हें चांगले आहे. परंतु हुन्नर आपल्या देशांत येऊन जो माल पाहिजे तो सर्व आपणच निर्माण केला पाहिजे व जास्ती केला असेल तो बाहेर पाठविला पाहिजे, म्हणजे या देशास नफा होईल व पंचवीस कोटि रुपये परदेशच्या राज्याचा लाभ घेण्याकरितां दंड द्यावा लागतो तो सहज देतां येईल. हल्लीं हा देश अमदानीचा झाला आहे पूर्वी रवानगीचा होता, तो पुनः रवानगीचा झाला पाहिजे ही मुख्य गोष्ट आहे.

परदेशच्या राज्याबद्दल खंडणी व व्यापाराचा नाश वगैरे एकदम या देशावर आल्यानें फारच दारिद्र्य उत्पन्न झालें आहे, त्याचा प्रतिकार कसा होईल याचा विचार सुज्ञांनीं रात्रंदिवस केला पाहिजे, आणि सर्व देशांतील लोकांस मुख्य साधनें पोट भरण्यां-करितां तीन आहेत तीं हीं कीं, उत्तम शेती, मध्यम व्यापार व कनिष्ठ चाकरी; त्यांपैकी शेतीवर जुलमी कर बसल्यामुळें शेती करणारे लोक अगदी भिकारी झाले, त्यांस जोडा, अंगरखा व धोतरही मिळत नाहीं, देण्याचे भाराखालीं दडपले तेव्हां उत्तम शेती असें कोणी समजत नाहीं, व्यापाराची दशा वर वर्णन केलीच आहे. कनिष्ट चाकरी ती सर्व इंग्रज लोकांनी आटपली. नामांकित रोजगार या देशांतील लोकांस मुळीच मिळत नाहींत. एकंदर वाळीत पडलें आहे. याजमुळे त्यांच्या आधाराने गरिबांचा निर्वाह होत होता व शेतकी वगैरे करण्यास मदत मिळत होती ते वेडे लोक मुळीच नाहींसें झाले; तेव्हां आतां लोकांनी उपजीविका कोणत्या रीतीनें करावीं याचा मार्ग दिसत नाहीं हजारों भिकारी, बैरागी व गोसावी यांच्या रूपानें फिरत आहे. पण ते सर्व घरप्रपंचास कटाळून पोटाकरितां वेष घेऊन फिरतात. जर धंदा मिळेल तर करणार नाहीं असें नाहीं.

हल्लींच्या मन्वंतरावर सर्वांनी लक्ष देऊन व्यापार वाढवून आपल्या निर्वाहाचे पदार्थ तरी या देशांत पिकवावे म्हणजे हल्लींची अवदसा कमी होईल. दिवसेंदिवस जों जों भिकारीपणा येईल तों तों स्वस्ताई होईल आणि पैसा दृष्टीस पडणार नाहीं. अशी स्थिती चारी प्रांतांत म्हणजे गुजराथ, दक्षिण, कोकण, कर्नाटकपर्यंत व्याप्त होण्यास पाहात आहे. उत्तर हिंदुस्थान तर व्याप्त होऊन गेलेंच आहे. याजकरितां विचाराची वेळ जाऊं

देऊं नये. या देशांतील लोकांचा निर्वाह थोडक्यांत होतो, मजुरी स्वस्त आहे, येथें अतिशय थंडी नाही, व कापडाची फारशी जरूर नाहीं व लोक दारू पिणारे व झिंगे नाहींत. याजमुळें यांच्या हातून काम पुष्कळ होतें व खर्च थोडा लागतो. यास्तव अद्यापि हे विलायतेवर चढ करूं शकतील; परंतु यंत्रें आली तर ही गोष्ट होणार आहे. इकडून माल बाहेर जातो. त्याजवर सरकारच्या जकाती फार आहेत. कारण विलायतचे सावकार स्टेट सेक्रेटरीशीं हिम्मायत करून नानाप्रकारचीं साधनें करून विलायतच्या मालाचा खप जास्ती होईल ती तजवीज करितात. याजमुळें हिंदुस्थानच्या व्यापाऱ्यांस उत्तेजन नाहीं. सरकार हे मोठे गिऱ्हाईक आहे; परंतु ते विलायतच्या सावकारांच्या स्वाधीन आहे. येथील मालास गिऱ्हाईक नाहींसे झालें. आपल्या लोकांची देखील अभिरुचि विलायतच्या पदार्थांवर झाली आहे असें कालमाहात्म्य आहे.

मुसलमानी राज्य पांचशें वर्षें चाललें, त्यांत आरंभी मोठी लुटालूट व गडबड झाली आणि पूर्वींची मोठाली शहरें कनोज, चंपानगर, अनहीलपूर, देवगिरी, विजयनगर इत्यादि उजाड झाली; परंतु क्षत्रिय राजे थकतांच लढाई बंद होऊन देश पुन्हा अबाद झाला. नवी शहरें दिल्ली, ब्ऱ्हाणपुर, अमदाबाद, औरंगाबाद, विजापुर वगैरे उत्पन्न झाली आणि मलिकंबर, तोडरमल्ल वगैरे यांणी पाहण्या करून रास्त जमाबंदी ठरविली. मुसलमानांच्या दरबारांत हिंदुलोक मोठाले मुत्सद्दी, सरदार मानकरी किल्लेदार झाले. त्यांतील बिरबल, अभयसिंग, चंदूलाल, शामजी भोंसले वगैरे प्रसिद्ध आहेत. हल्लीं लोक जसें इंग्रजी शिकतात बूट घालतात तसे पूर्वीं फारशी शिकत होते आणि मुसलमानी पोषाक करीत होते. परंतु हिंदुस्थानचे उद्योगधंदे व रोजगार सर्व कायम होते. याजमुळे मुसलमान लष्करी धंदा सोडून ताई, रंगारी, दरजी, मश्रुवाले असे नाना प्रकारचे धंदे करूं लागले. कागद, बंदुकीची दारू करण्याचा इलम मुसलमानांनी या देशांत आणला तो अद्याप मुसलमानांच्याच हातीं आहे. हिंदु लोक अद्यापी त्यांत शिरले नाहीत; परंतु जुन्या काळीं सोन्याचीं नाणीं मोहोर, होन, फलक वगैरे बहुत चालत होतीं व जुन्या काळचीं तळीं, विहिरी, घरें दारें पाहतां त्यावेळची संपत्ति अधिक होती. हल्लीं लोक अशक्त व दरिद्री झाले असें दोन्ही काळच्या निशाण्या तपासून पाहणाऱ्याच्या ध्यानांत येईल. इंग्रजीत चिनास अफीण पाठविण्याचा व विलायतेस रू वगैरे पाठविण्याचा धंदा नवीन आला तशीच रेल्वेची मजुरी नवी आली हें खरें; परंतु अफिणीवर कर मोठा आहे व रेल्वेच्या सर्व पैशाचे व्याज भरावें लागतें याजमुळें एकंदरीत देशांतील लोकांस कांहीं नफा होत नाहीं असें दिसतें.

( हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणे )

२२

# राज्यसुधारणा

सांप्रत हिंदुस्थानांतील लोकांस अज्ञानदशा आहे याजमुळें राजा कोण आहे व व्यवस्था कशी आहे, तें कळत नाहीं. जांस खावयास आहे त्यांस आपल्यासारखे सर्व श्रीमंत आहेत, असें वाटतें. पटवर्धन जहागीरदार यांचे प्रांतांत जे रहातात, त्यांस असें वाटतें कीं, पृथ्वीचे चक्रवर्ती राजे पटवर्धनच आहेत व ते चिरकाल नांदतील. शिंद्याचे राज्यांत आहेत, त्यांसही असेंच वाटतें. जें पेशव्यांचे अंमलांत पुण्यांत रहात होते, त्यांस असेंच वाटत होतें, आणि एक एक राज्य जात चाललें, त्याचा कोणास ठिकाण नाहीं. सर्व आपले ठिकाणीं धुंद आहेत.

इंग्रज कोठून आले आहेत. व ते आपल्यावर राज्य कोणत्या रीतीनें करतात व त्यांचे मुलखांत राज्य कसें चालतें, हें कोणास ठाऊक नाहीं. लोक मूर्खपणांत राहून भिकारीं होत चालले व अज्ञान-रोगानें ग्रस्त होऊन मरावयास टेकले. त्यांस औषधें कशाची ? स्वदेशीय राजधानींतील लोकांस आम्ही कांहीं म्हणत नाहीं, कारण त्यांची निद्रा कुंभकर्णासारखी आहे. जरी आम्ही त्यांचें कानाशीं नौबती वाजविल्या तरी ते जागृत होणार नाहींत, घोरत असतील व जेंव्हां त्यांस कोणी येऊन लाथ मारील, तेव्हां ते जागे होतील. असो. परंतु गतश्री जें लोक झाले आहेत, त्यांस सांप्रत काळचे राज्यामुळें अडचणी किती आहेत, याची माहिती असेल पुण्यासारखीं बुडतीं शहरें व तुच्छ मानलेली जात–ब्राह्मणासारखी, त्यांतील लोकांस माहिती असेल कीं आपला देश निर्धन होत चालला आहे. याचा विचार करणें सर्वांस उचित आहे. आणि मुलखाचें दरिद्र काढावयाचा उपाय करणें, तर आधी राज्य सुधारलें पाहिजे, उत्तम रीतीनें राज्य चालावें. अशी कांहीं तरी युक्ति निघाली पाहिजे.

मी जाणतों कीं, लोक मूर्ख आहेत याजमुळें त्यांस याचा विचार करण्यास शक्ति नाहीं, तत्रापि कांहीं उपाय मला सुचला आहे, तो मी लिहून प्रकट करितों. हल्लीं हिंदुस्थानांत बहुतेक राज्य कंपनी–सरकारकडे आहे व लोकांस राज्यांत कांही अखत्यार नाहीं. इंग्रजांचे स्वदेशीय राज्यांत पाहिलें तर तसें नाहीं. तेथील लोकांस राज्यांत हात घालण्याचा वा कायदे करण्याचा अधिकार आहे. विलायतेंतील राजा जडजाचे नाझराप्रमाणें आहे. जेव्हां लोकांची सभा म्हणजे पार्लिमेंट हे कायदे फर्मावितात, तेव्हां राजा त्याबरहुकूम वहिवाट करितो. दर वर्षास राजाचे खर्चास पैसा पाहिजे, तो लोकांस मागील सालचा हिशेब देऊन पुढें पैसा वसूल करण्याची परवानगी घेतल्यावर त्यांचे हुकमाप्रमाणें कर व धारे बसून वसूल होतो. येणेंकरून जसें लोकांस पाहिजे तसें राज्य चालतें. एक

राजा स्व-इच्छेनें राज्य करितो, त्यापेक्षा ही युक्ती बरी आहे व याप्रमाणें हिंदुस्थानांत राज्य चालेल, तर फार चांगलें होईल, जे सुज्ञ लोक असतील, त्यांस मोठे जाग्यावर व अधिका वर नेमतां येईल. असें इकडे राज्य असावें.

सन १८३४ साली कंपनीची सनद २० वर्षांची बाहाल झाली त्या समयीं या गोष्टीचा विचार पडला होता. किती एक विलायतेंतील दयाळू लोक यांनीं सांगितलें की, इंग्रज लोकांचे राज्य जा रीतीनें चालतें त्याप्रमाणें हिंदु लोकांचें चालावें. तेव्हां कंपनी सरकारनें अशी शाबिती केली कीं, हिंदु लोक मूर्ख आहेत, त्यांस पार्लमेंट म्हणजे काय हें ठाऊक नाहीं. याजमुळें तेथें असें राज्य बसविल्यानें बखेडा मात्र होईल आणि सर्व बेबंद होईल. पार्लमेंटांत बसणारे लोक मोठे शहाणे पाहिजेत. त्यांचे मनांत लोकांचें हित नेहमीं वागलें पाहिजे, तेव्हांच ती सभा नीट चालेल. त्याप्रमाणें पार्लमेंटांत बसावयास सर्व हिंदुस्थानांत एकही योग्य मनुष्य मिळावयाचा नाहीं, ही मोठी अडचण आहे. याजमुळें विलायतेंतील बादशहानें कंपनी–सरकारची सनद कबूल करून वीस वर्षेपर्यंत कमाविशी कायम केली.

तीं वीस वर्षे सन १८५४ त भरतात. तेव्हां अजून ६ वर्षांचा अवकाश आहे. इतक्यांत किती एक लोक शहाणे होतील व हल्लीं किती एक शहाणे सांपडतील; याजकरितां आजपासून सर्व गरिबांनीं व श्रीमंतांनीं एकत्र होऊन विलायतेंतील राणीसाहेबांस तपशीलवार एक अर्ज करावा कीं, हल्लीं राज्यपद्धति आहे, तीपासून आमचा फायदा नाहीं व आमचे राज्यासंबंधीं हक्क चालत नाहींत व हिंदु लोक जसे, तसे इंग्रज लोक मनुष्यें आहेत, याजकरितां इनसाफ बरोबर होण्याकरितां सर्व इंग्रज व नेटीव लोक यांमध्ये सांप्रत मोठा भेद आहे, तो मोडून एक सारखें होण्याकरितां हिंदुस्थानचे देशांत पार्लमेंट ठेवावें व ही मोठी सभा मुंबईस भरावी. आणि तेथें दरएक शहरातून व एकएक जिल्हयांतून दोन दोन आसामी घेऊन त्या सर्वांस कौंसलांत बसवून गवरनरानें त्यांत मुख्य असावें व जे लोक दर जिल्हयांतून आणावयाचे ते सर्व जातींतील सारखे असावे. दर जिल्हयाचे माजिस्ट्रेट साहेबांकडून दवंडी पिटवावी कीं, राज्याचा विचार चांगले रीतीनें होण्याकरितां सपूर्ण लोकांनीं विचार करून दोन शहाणे मुखत्यार नेमावे व त्याप्रमाणे नेमिलेले सर्व लोकांनीं हजर व्हावें. हे लोक बोलणारे, चतुर व मुच्छदगिरी केलेले असावे; कारण हे राज्याचे हिस्सेदार आहेत. केवळ शिरस्तेदार, मुनसफ व मामलेदार नव्हेत व या लोकांत भट, गृहस्थ, शास्त्री, परभू, कुळंबी, मुसलमान, इंग्रज इत्यादि जे शहाणे दिसतील, ते नेमावे व त्यांनीं राज्य चालवावें, म्हणजे लोकांचा फार फायदा होईल.

याप्रमाणे अर्ज करून, विलायतेस दहापांच आसामी प्रयत्न करण्याकरितां नेमून, त्यांजबरोबर ती पाठवावी म्हणजे आपले लोकांचा कांहीं उदयकाळ होईल. नाहीं तर हे असेच किती एक वर्षेपर्यंत रहातील, यास्तव जे लोकांचें हित पहाणारे आहेत, त्यांनीं हा

बेत केला पाहिजे. म्हणजे दरिद्र वगैरे बोभाट लोक सांगतात, हे त्वरित दूर होतील. आणि इंग्रज लोक इकडील लोकांस मूर्ख असें समजतात, तेंही मत मोडेल आणि राज्याची उत्तम प्रकारची सुधारणा होऊन एके राजाचे अंमलांत सुख काय व लोकसत्तात्मक राज्यांत सुख काय, हें सहज दृष्टोत्पत्तीस येईल. असें सरकार झाल्यानें मग शिंद्याचें किंवा हैदराबादचें राज्य चांगलें कीं काय हें त्वरित ध्यानांत येऊन चांगलें राज्य चालविण्याचे रीतीची माहितगिरी सर्व लोकांस होऊन बहुधा हें उदाहरण पाहून सर्व दुसरीं राज्येंही याचप्रमाणें होतील व येणेंकरून एका राजाचे ताब्यांत राहून त्याचा जुलूम सोसावयाची खोड हिंदु लोकांस लागली आहे, ती ते विसरून जातील. राज्य करण्यास गरीब व मातबर नीच जातीचे व उंच जातीचे लोक समान मानावे, हें सर्वांस कळूं लागेल. अशा सभेंत जातीविषयीं निवड नको, हें वर सांगितलेंच आहे. जे फार विद्वान् व चांगले चालीचे लोक आहेत, तेच नेमले पाहिजेत. मग त्यांची कोणतीही जात असो, परंतु ब्राह्मणांस गर्विष्ठपणा फार आहे, याजकरितां ती जात फार थोडी असली पाहिजे.

सदाशिवराव भाऊ पेशवे हे स्वारीस गेले, तेव्हां लढाईचा विचार करण्याकरितां मराठे, मुसलमान व ब्राह्मण सरदार बसत; परंतु ते इतरांस तुच्छ मानीत. शेवटीं त्यांचा गर्विष्ठपणाचा त्रास होऊन होळकर म्हणूं लागला कीं, या बामणाचा गर्व हरण झाला तर बरें होईल. शेवटीं अशानेंच सदाशिवराव भाऊंनीं सर्व फौज बुडविली व आपणही बुडाले.

याप्रमाणें नाना फडणीस यांचा स्वभाव सर्वांस माहीत असेलच, त्यांनीं आपले गर्विष्ठपणानेंच इतर लोकांस तुच्छ मानलें. यांचे पुराणांत वगैरे ब्राह्मण म्हणजे देव, असें म्हटलें आहे, त्या समजुतीवर ते जातात. त्यांस अद्याप इतर लोक व आपण सारखेच आहों, हें कळलें नाहीं. ईश्वरेच्छेनें लवकरच कळेल.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह । पत्र क्र. २५ )

२३

## हिंदुस्थानच्या पराधीनतेचीं कारणें

इंग्रज लोकांनीं हिंदुस्थानचें राज्य घेतलें, या गोष्टीविषयीं लोकांस भूगूळ वाटतें आणि ब्राह्मण लोक म्हणतात कीं, त्यांची सद्दी आहे. ब्राह्मणांहून कुळंबी वगैरे लोक यांस

तर राज्य कोण करितो, याची खबरच नाहीं. याविषयीं लोकांस कांहीं वर्तमान कळलें असतां फार उपयोग जाणून मी संक्षेपेंकरून लिहितों.

प्रथम मला हिंदुस्थानचे लोकांचे स्थितीचें वर्णन केलें पाहिजे, म्हणजे त्याजवरून इंग्रज लोकांचे इकडे पाय रोवले कसे, याचीं कारणें स्पष्ट होतील. मला वाटतें कीं, हिंदु लोकांचे माहात्म्य सृष्टि उत्पन्न जहाल्यापासून काय असेल तें असो; परंतु पांडवांचे वेळेस हिंदु लोक मोठे ऐश्वर्यास आले आणि विद्या वगैरे त्यांनीं फार चित्त लावून शोधून काढिल्या. मोठेमोठे विद्वान् व बुद्धिमान् म्हणजे व्यास, वाल्मीक हे कवि, नारदासारिखे गायनशास्त्री, कपिलासारिखे शास्त्रज्ञ, अर्जुनासारिखे युद्धकर्ते, धर्मासारखे सत्यवक्ते इत्यादि प्रकारचे उत्तम लोक त्या काळीं होऊन गेले आणि असे विद्वान् विचारशील लोक ज्या देशांत असतील, त्या देशांत कांही न्यून पडेल हेंही अशक्य आहे परंतु त्या समयीं संपूर्ण जगांत ऐश्वर्यवान् प्रदेश एवढाच होता. याजमुळें हिंदु लोकांनीं आपले देशचें व आपले भाषेचें व आपले विद्येचें पराकाष्ठेचें वर्णन केलें आणि हें कांहीं आश्चर्य नाहीं. सांप्रत इंग्रज लोक तसें करतात.

परंतु हिंदु लोकांनीं पृथ्वीचें स्वरूप त्या काळीं कसें आहे व देश कोणते कोठें आहेत, येविषयीं विशेष शोध केला नाहीं आणि करण्याचें कारणही नव्हतें, कारण हे लोक स्वस्थ बसून आपले देशांत जें निष्पन्न होईल, तें खाऊन स्वराज्य यथास्थित करीत होते. लोकही चांगले व राजेही चांगले होते, प्रजेस पीडा वगैरे कांहीं होत नव्हती. तेव्हां परदेशांत जाणें किंवा व्यापार करणें. समुद्रांतून नौकारूढ होणें हे विषय पहाण्याचा प्रसंग त्यांस नवता. येणेंकरून ते लोक जसें आईबापांचें द्रव्य पुष्कळ असतें आणि घरांत मुलगा तें खाऊन वाढतो, त्यास दरवाजाबाहेर काय आहे, हें ठाऊक नसतें, तसें ते लोक अभोवाळ वाढले. नंतर काळेंकरून त्यांनी विद्या जास्त वाढविण्याची सोडून दिली; कारण कीं, त्यांस आपले महत्त्वाचा आणि सुखाचा अनुभव फार आला.

तेव्हां पांडवांपासून अलीकडे दोन हजार वर्षे सुमारे तरी त्यांणीं विद्येवर चित्त बरेंच ठेविलें होतें, असें त्या वेळेस ज्योतिःशास्त्रावर व लीलावती वगैरे ग्रंथ जहाले त्यांजवरून दिसतें व कांही पुराणें व माहात्म्यही पुढें लिहिलीं गेलीं आहेत. पुढें काळेंकरून संस्कृत भाषा पुटोन प्राकृत भाषा जाहल्या. तेव्हां असा भ्रम पडला कीं, प्राकृत भाषण बोलावें आणि ज्यास विद्या पाहिजे, त्याणें संस्कृत पढून विद्या शिकाव्या; कारण कीं, प्राकृत भाषेंत ग्रंथ नाहींत, हें एक कारण.

दुसरें असें कीं, जों जों प्राकृत भाषा वाढत गेली, तों तों संस्कृताचा अंधार जहाला; विद्या जास्ती वाढविणें राहिलें आणि लोकांची अशी समजूत पडली कीं, ज्यांणीं संस्कृतांत ग्रंथ लिहिले ते देव होते आणि तसे ग्रंथ लिहिणें हें कांही मनुष्याचें काम नव्हे, हें दुसरें कारण बरें. तिसरे कारण असें आहे कीं, ब्राह्मणांचीं कुळें कायम जहालीं, येणेंकरून जो ब्राह्मण मूर्ख, विद्या शिकत नाहीं, त्यास असें भय राहिलें नाहींच कीं, मूर्खपणामुळें

नीचत्व येईल. त्यास असें वाटूं लागलें कीं, माझा जन्म ब्राह्मण कुळांत आहे, मग ती विद्या शिकलों काय, नाही काय ? एकच आहे. माझा ब्राह्मणपणा कोणी नेत नाहीं. मला इतर लोक कुळामुळें पूज्य म्हणतील आणि माझे पायाचें तीर्थ घेतील, यांत संशय नाहीं.

चवथें कारण असें दिसतें कीं, देशांत राहणें वगैरे जे प्रतिबंध पूर्वीचे शास्त्रकारांनीं केले; त्यांचे हेतु न जाणून त्यास धर्म म्हणूं लागले. पांचवें कारण असें दिसतें कीं, कलियुग निघालें आहे, याजमुळें लोकांचा नाश व दुर्गुणप्रवृत्ति व्हावी हा ईश्वरसंकेत आहे, असें भय शास्त्रकारानें लिहिलें आहे. तरी त्याचा हेतु न जाणून लोक तें यथातथ्य मानूं लागले. सहावें प्रारब्धवाद म्हणून जें घडतें तें पूर्वींच ईश्वर लिहितो, तें कोणत्याही उद्योगानें फिरावयाचें नाहीं, सातवें, पूर्वींचे लोक ऋषि व देव होते, मनुष्य नवते यास्तव जें वडील करीत आले, तेंच करावयाचें, नवीन मार्ग काढावयाचा नाहीं. आठवें कारण ज्या ज्या गोष्टी, चालीरीति लोकांमध्यें आहेत, त्या सर्व धर्मच. व्यवहार धर्म; ईश्वरभक्तीही धर्म, पागोटें, धोतर, अंगरखा घालावा, हें सर्व धर्मामध्यें मोडूं लागलें. ही समजूत विलक्षण लोकांची पडली.

या आठ कारणांचें नांव मी " हिंदुनाशाष्टक " ठेविलें आहे. या कारणांनीं लोकांनीं विद्या वगैरे सर्व सोडून देऊन स्वस्थ घरांत बसले आणि परकी लोक त्या काळीं अगदीं मूर्ख अवस्थेंत होते, याजमुळें त्यांचा शोध किंवा वार्ता यांणीं कांहीं काढली नाहीं. आणि त्या सर्वांस एक म्लेंच्छ म्हणून नांव देऊन टाकलें. याप्रमाणें या देशांत वर्तणूक जहाली. हिंदु लोकांत कांहीं किंचित् जागृति व्यासापर्यंत होती. त्यापुढें जी दृढ झोप लागली, ती आजपर्यंत तशी आहे. ती अशी कीं, या लोकांमध्यें एकचित्त नाहीं आपले देशांत कोण राज्य करतो, याची खबर नाहीं. जो कोणी राज्य करील तो विष्णूचा अवतार, ही एक मूर्खपणाची समजूत पडली. पिठोरा राजा हस्तिनापुरी क्षत्रियवंशी शेवटचा जहाला. त्यास मुसलमानांनी मारून राज्य घेतलें. त्यास आठशें वर्षें जहालीं; परंतु त्या गोष्टीचें वाईट कोणास वाटलें नाहीं. शास्त्री, पंडित भट हे मुसलमानांचेच आर्जवें करून पोट भरूं लागले, ब्राह्मण कारकूनपणा, शिलेदारी, सरदारी स्वीकारून चाकऱ्या करूं लागले. तेव्हां विद्येचा अंधकार फार माजला.

कारण कीं, ब्राह्मणांनी युक्तीनें आपले स्वाधीन विद्या ठेविली व इतरांस शिकवूं नये, असा धर्म लावून दिल्हा. आणि आपण शूद्राचें कर्म अंगिकारिलें. तेव्हां मग विद्या कशानें राहील? विद्येबरोबर सर्व ऐश्वर्य गेलें व शूरत्व गेलें. देशाभिमान नाहींसा जाहाला. जशीं पुष्ट बकरीं व्याघ्रास सापडतात, तसे हे लोक मुसलमानांस सांपडले. पूर्व काळीं यवनादिक मुसलमान म्हणजे यवन इकडे आले, असें ग्रंथांतरीं आहे; परंतु ते इकडे राहिले नाहीत, हा त्यांचा मूर्खपणा होय. अलीकडे यवन लोक पहिल्या मूर्खपणांतून निघाले आणि हुशार जहाले. त्यांनीं आतां केवळ स्वारी करून परत जावें, तसें केलें नाहीं व हस्तिनापुरीच सिंहासनारूढ होऊन बसले.

परंतु ब्राह्मण लोक हे आपले घरीं आले, म्हणजे सोवळें करितात व यवनांचा विटाळ जहाला म्हणून म्हणतात. तथापि त्यास राज्य करावयास त्यांणीं हरकत केली नाहीं व किती एक लोक मुसलमानांवर इतके फिदा जहाले कीं; राज्य करणें व शूरत्व करणें हे काम मुसलमानांचें होय, इतरांस यावयाचें नाहीं, असें म्हणू लागले; परंतु त्या मूर्खांस असें समजत नाहीं कीं, आठशें वर्षांपूर्वी हिंदु राजे जहालेले पांडव, राम, परशुराम हे मुसलमान होते कीं काय? आणि त्या मूर्खपणाचें बीज मनांत ठेवून त्याच स्थितींत हिंदु लोक राहिले. त्यांस परदेशाची किंवा स्वदेशाची लांबीरुंदीदेखील ठाऊक नाहीं. हिंदुस्थानचे लोकांस दक्षण ठाऊक नाहीं. दक्षणेंत 'नेपाळ' ठाऊक नाहीं. कोणी म्हणतात. ती पुण्यभूमि, कोणी म्हणतात ती राक्षसभूमी व त्या गोष्टीस शास्त्री मान डोलवितात त्याचा मूर्खपणा किती आहे? त्यांस असें कांहीं वाटत नाहीं कीं, आपले देशांत हे यवन लोक आले ते कोठले, यांस इकडे वस्ती करूं द्यावी कशाकरितां व यांस हाकून देण्यास आम्हांस कांहीं शक्ति नाहीं कीं काय ?

सर्व हिंदु लोक निर्बळ व अपौरुष आहेत कीं काय? परंतु ही गोष्ट विसरले आणि सोंवळें घरांत आलें. देश सोंवळा राखावयाचा विसरले व जो तो आपला स्वार्थ पाहूं लागला. अशा अवस्थेत असतां मुसलमानांनीं राज्य घेतलें. तें राज्य मुसलमान लोकांचें मूर्खपणानें बुडवावयाची संधि आली. तो इंग्रजांचा प्रवेश जहाला. त्यांणीं तर हेच लोक चाकरीस ठेवून याच लोकांच्या तोंडात मारल्या; परंतु हिंदु लोकांचा असा मूर्खपणा आहे कीं, इंग्रज आले कधीं, कोठले, कोण, हें त्यांस अद्याप माहीत नाहीं. पेशव्यांचे वेळेस कोणते राजानें याचा विचार केला नाहीं. आतां मात्र दक्षिणेंत इंग्रज ठाऊक जहाले. तसेंच आतां कोणत्याही हिंदु लोकांच्या संस्थानांत जाऊन पहावें तरीं हीच वृत्ति लोकांची आढळते. भट जेवणापुरती काळजी करितात, आणि सरदार गृहस्थ पैका मिळविण्यापुरती काळजी करतात आणि स्वस्थ बसतात. मग असें होईल हें काय आश्चर्य आहें?

( लोकहितवादिकृत निबंधसंग्रह । पत्र ४५ । २८ जानेवारी १८४९ )

२४

## इंग्रजी राज्यापासून लाभ

सांप्रत किती एक लोक असें म्हणतात कीं, इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानांतून जाईल तर चांगलें; परंतु आम्हांस वाटतें कीं, इंग्रजांचे राज्यापासून बहुत लाभ आहेत.

प्रथम लोकांचें मत असें आहे कीं, या सरकारांत कोणास बहुमानाची जागा मिळत नाहीं, हें तर सामान्यतः खरें आहे, परंतु ही गोष्ट स्वाभाविक उत्पन्न जहाली आहे. परकी लोकांवर भरंवसा कमी; परंतु उभयतांचे तर्फे अधिक माहिती होईल तेव्हां विश्वास पटेल. व्यापाराचे बाबतींत इंग्रज लोक इकडील लोकांपेक्षां विशेष शहाणे आहेत, तेव्हां पदार्थ करून ते इकडे स्वस्त विकावयास आणितात. तेव्हां याचा शब्द त्यांजकडे नाहीं; परंतु कांहीं दिवसांनीं हेच लोक त्यांच्या विद्या घेऊन त्यांचेप्रमाणें माल उत्पन्न करतील व काचा, घड्याळें, सुऱ्या, कातऱ्या, कापडें वगैरे जिन्नस इकडे न होतील, असें नाहीं.

परंतु प्रस्तुत लोक आळशी, यामुळें देश भिकारी जाहला हें खरें. दुसरा उपाय असा कीं, जर या लोकांस परदेशांत जाण्याचा अटकाव नसता, तर आजपर्यंत यांणीं किती एक देश व किती एक ठिकाणें पाहून येथील ज्ञान, शहाणपण, रीती, कलाकौशल्य इत्यादि इकडे आणलें असतें. परंतु लिहिणारे–वाचणारे जे ब्राह्मण त्यांची नजर उत्सव, समाराधना, जेवणावळी यांजवर; कारण " ब्राम्हणो भोजनप्रियः " तेव्हां घरांत आळस बाहेर मनाई, अशा दोहोंकडून यांस अडचणी, तेव्हां याचा दोष कोणावर बरें? बरें, मोठ्या मोठ्या जागा इकडील लोकांस आतां नाहींत. असा अभिप्राय बहुत लोकांचा आहे. त्यास पहा बरें, इंग्रज लोक इकडे आले, त्यांचे देशाचे हजारों लोक इकडे लढाईंत मेले.व इतके दुरून ते तेथें आले त्यांस लाभ कोणता असावा? जर त्यांणीं आपले लोकांचें महत्त्व राखूं नये, तर मग त्यांस लाभ काय ? कोणी कांहीं काम करतो, त्यांत लाभ पहातो. दुनयेची रीति अशीच आहे. जर हिंदु लोक शहाणे असून, धैर्य करून परकी देशांत राज्य संपादन करते, तर असेंच करते किंवा याहून अधिक करते, याचा विचार करावा. म्हणजे इंग्रजांची वर्तणूक कशी आहे, हें ध्यानांत येईल.

जेव्हां मराठे लोक शिंदे, होळकर, परमुलखांत ( म्हणजे त्यांचे समजुतीप्रमाणें परमुलूख, परंतु वास्तविक पाहिलें तर मुलूख एकच ) गेले, तेव्हां त्यांची वर्तणूक कशी होती ? किती गांव ते जाळीत होते? दरसाल ते खंडणी किती घेत होते ? शहरें व सावकार किती लुटीत होते ? या गोष्टींचें स्मरण ठेविलें, तर इंग्रज बरे आहेत असें लक्षांत येईल. हे लोक सुधारून मूर्खपणाचे, शृंखळेपासून मुक्त व्हावे, याजकरितां त्यांचा उद्योग बहुत चालला आहे. आपली विद्या ते पसरीत आहेत. शिकणारास उत्तेजन देतात.

जे लोक इंग्रजांशीं संबंध ठेवितात त्यांस बहुधा ठाऊक असेल कीं, इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षां अधिक काम करणारे, मेहनती, शहाणे, हुशार, खरे व प्रामाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणें नाहींत. शंभर इंग्रजांत पांच लबाड असतात; परंतु १०० हिंदु लोकांत पांच प्रामाणिक असतात. तेव्हां याजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिती नीट रहाणार नाहीं जे गुण राज्यकर्त्यांमध्यें असावे ते हिंदु लोकांमध्यें नाहींत. राज्याची पद्धति त्यांस ठाऊक नाहीं. आजपर्यंत ब्राह्मण लोकांनीं राज्य कधीं केलें

नाहीं. हा एवढाच १०० वर्षें पेशवाईंत काय तो दिवा लागला. तद्वत् मराठे यांनीं कधीं राज्य केलें नाहीं.

पूर्वीं क्षत्रिय लोक राज्य करीत होते. ते तर आतां नाहींत. तेव्हां राज्यकर्त्यांचीं शहाणपणें या लोकांस आल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं. हे लहान पदवीधर आहेत, हेंच बरें ! कारण जेव्हां शिंदे व होळकर लक्ष्मीचे अंधकारांत होते, तेव्हा त्यांणीं ५०,००० पेंढारी लुटायचे कामावर ठेविले होते. त्यांचें निर्मूळ इंग्रजांनीं केलें. जे राज्य करितात तेच लुटारू लोकांस बाळगतात. हें कधीं कोणीं ऐकलें होतें काय ? जे राजे चोरांचे रक्षण करितात आणि लुटारू लोकांस बाळगतात, त्यांचें वर्णन काय करावें ? तद्वत् दक्षणेंत रामोशी व भिल्ल वगैरे वाटपाडे लोक होते. त्यांस राजेच सामील होते व लोकांत लूट करण्यास त्यांस परवानगी देत होते; परंतु या राजांनीं त्या लोकांस सुधारावयाचा यत्न कधींच केला नाहीं. ब्राह्मणलोक हे स्वहिततत्पर, गर्विष्ठ व कृत्रिमी आहेत, असें दिसतें; कारण ते लोक नीच आहेत त्यांचे सुधारणेचा यत्न करीत नाहींत.

त्यास असें वाटतें कीं, आम्हांस ईश्वरानें थोर निर्माण केलें आणि दुसऱ्यांस ईश्वरानें नीच निर्माण केलें आहें; परंतु हें मत खोटें आहे; कारण ईश्वरानें सर्व मनुष्यें सारखीं निर्माण केलीं आहेत. तेव्हां ईश्वरकृपेनें किंवा काळगतीनें जे थोरपणास चढतील, त्यांणीं आपल्याहून जे नीच त्यांस सन्मार्गास लावण्याचा प्रयत्न करावा, हाच सद्धर्म आहे, परंतु ब्राह्मणांचे समजुतीस हें विरुद्ध आहे. जर ब्राह्मणांनीं कैकाडी, कामाठी, रामोशी इत्यादी लोक पाहिले, तर त्यांचा द्वेष करितात. हलालखोर पाहिला तर त्याची निंदा करितात; परंतु त्यांस असें वाटत नाहीं कीं, प्रत्येक माणूस आपला आपणच हलालखोर आहे कीं नाहीं? जेव्हां जें काम जो मनुष्य आपले आपण करतो, तेंच जो मनुष्य फार वेळ करतो, तर तेवढ्यातच तो त्यापेक्षां नीच कसा? वास्तविक विचार पाहिला तर हे अभिमान आहेत इतकेंच. वास्तविक पाहिलें तर कैकाडी लोक हे सुधारल्याचा अंगीं ब्राह्मणांसारखे शहाणे होतील, हें खचित आहे. परंतु त्यांस नीच मानून अगदीं टाकावें, त्यांची दया करूं नये, हें योग्य नाहीं. त्यांस मनुष्य समजून, ब्राह्मण आंधळा अथवा नीच जातीचा आंधळा असला, तरी धर्मास सारखाच आहे.

ब्राह्मण विद्येनें थोर तर त्याप्रमाणें जे ब्राह्मण वेद अर्थसहित पढतील, त्याचा मान करणें योग्य आहे; परंतु हे आतांसारखें 'पोपटभट' कैकाड्यासारखेच ज्ञानशून्य आहेत. यांत कांही संशय नाहीं. इंग्रज लोकांनीं हिंदु लोकांस स्थितीवर आणण्याचा बहुत यत्न चालविला आहे व देशांत स्वस्थता केली. चोर लुटारू नाहींसें केले. हे त्यांचे मोठे उपकार आहेत. किती काळ जरी ब्राह्मणी राज्य चालतें, तरी सती बंदी होतो ना, पेंढार मोडतें ना, व बालहत्या बुडती ना. पहा बरें, पोरें बेलाशक मारीत होते. कोणी नवसाची पोरें टाकीत होते. कोणी मारून टाकीत होते या प्रकारचा चाली होत्या. कोणी स्त्रियांस जाळून टाकीत, कोणी जिवंत पुरीत. कोणी गळ्यांत दगड बांधून बुडवीत. हें सर्व मूर्खपण कधीं तरी हिंदु लोकांचानें बंद करवलें असतें काय? नाहीं.

अद्यापि पुनर्विवाहाविषयी किती एक प्रयत्न करितात; परंतु पहा, कोणी त्याचा स्वीकार करीत नाहीं. जो तो भितो. ज्यांचा पोरी बुडतात त्यांचें जिवास खातें; परंतु धैर्यानें ही चाल बुडवून टाकण्यास कोणी उभे राहात नाहींत तर पोरें मारल्याप्रमाणेंच हें नव्हे काय ? रानांत पोर सोडल्याप्रमाणें पोरी सोडतात. त्यास कोणी त्राता नाहीं. हें जर सरकार मनावर घेईल तरच सिद्धीस जाईल. नाहीं तर कांहीं उपाय दिसत नाहीं. किंवा हिंदु लोक तरी काळेंकरून शहाणे होतील तेव्हां होईल. अशा वगैरे बहुत कामांस इंग्रजांचे राज्य हितावह आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह । पत्र क्र. ३८ । १० डिसेंबर १८४८ )

## २५

# इंग्लिश राज्यापासून फळ

सांप्रत हिंदु लोक एकत्र बसले, म्हणजे सहज गोष्टी निघतात कीं, हिंदुस्थानची पुढें गत कशी होईल ? लोक अगदीं भिकारी होत चालले. व्यापार, धंदा, रोजगार हीं कामें नाहींशीं झालीं. ब्राह्मणांस अन्न नाहीं घरें ओसाड पडत चाललीं. माणसें स्वस्थ झालीं. पदार्थाच्या किंमती उतरल्या. पैसा नाहींसा झाला इंग्रज लोक एका पाठीमागे एक आपलीं राज्यें, संस्थानें, जहागिरी, पेन्शनें घेत चालले. कोणी शिपाई राहिला नाही व लोक दरिद्र झाले. तेव्हा पुढे या प्रजेची गत कशी होईल ? याप्रमाणें, ब्राह्मणांचा हाहाकार ईश्वराचे कानांवर कधी जाईल?

अशा तऱ्हेचे विस्मययुक्त प्रश्न करितात. त्यांत मग कोणी बहुत शहाणा, जुने काळचा असला म्हणजे तो म्हणतो, " अहो बावा, मागें यादव कसे मेले ? रावणानें प्रळय थोडा केला होता का ? सर्व देव बंदिस्त घातले होते. नंतर रामाने वानराकडून लंका घेतली की नाहीं? पाण्यावर दगड तरले कीं नाही? तसेंच इंग्रज कधीं तरी बुडतील, धर्मसंस्थापना होईल. ब्राह्मण लोक सुखी होतील व इतर लोकही आपले वर्णाश्रमधर्मेंकरून वागूं लागतील. " अशा प्रकारचीं संभाषणें चार ब्राह्मण एकत्र बसले म्हणजे होतात.

आमचे ऐकण्यांत हें पुष्कळ आलें आहे. याविषयी आम्हांस काय वाटतें, तें लोकांस कळवावें म्हणून आम्ही आपलें मत लिहितों.

आहे कीं, जा गोष्टी ईश्वर घडून आणतो, त्या वाइटाकरितां नसतात. जरी त्या वाईट असा प्रथम मनुष्याचें ज्ञान थोडें म्हणून भास होतो, तरी शेवटीं त्याजपासून मोठा उपयोग असतो. ही गोष्ट खचित आहे. तेव्हां हिंदुस्तानचे लोक हे फार मूर्ख व धर्मकर्म सोडून अनाचारास प्रवर्तले. ते असें कीं, सती जाण्याची चाल, मुलें मारावयाची चाल, तीन वर्णांची नीच स्थिति, ब्राह्मणांचें माहात्म्य, विद्या क्षणिक, अतिशय गर्व, संपूर्ण देशचे लोक आम्हांपुढें तुच्छ व आम्ही श्रेष्ठ. तेव्हां हा भाव हिंदु लोकांचा मोडण्यास व त्यांस ताळचावर आणण्यास परदेशांतील सुधारलेले लोक यांची गांठ घालून देण्यापेक्षां उत्तम उपाय दुसरा कांहीं आहे, असें वाटत नाहीं. यास्तव ईश्वरानें या देशांत इंग्रजांची प्रेरणा केली आहे.

आतां हिंदु लोकांनीं उघड पहावें कीं, आम्ही श्रेष्ठ कीं दुसऱ्या देशचे लोक श्रेष्ठ. ग्रंथावरून पहावें आणि लोकांचे तोंडून ऐकावें. त्यापेक्षां समक्ष अशी भेट झाली तर चांगलें कीं नाहीं ? याचा विचार पहावा. तेव्हां या साक्षात् शाहाणे लोकांची गांठ पडून, हिंदु लोकांच्या वाईट चाली बहुत सुटल्या व आणखीही किती एक सुटतील. आणि यांची मनें शुद्ध होऊन यांस राज्यकारभार, व्यापारधंदा कसा कसा करावा, हे ज्ञान येईल. देशसुधारणा क्षणांत होत नाहीं. तीस पुष्कळ विलंब लागतो. लहान मुलास हुशार होण्यास दहावीस वर्षे लागतात, मग देश चांगला होण्यास अर्थातच दोनशें–चारशें वर्षे लागतील. तोपर्यंत या लोकांस दुःख आहे; परंतु त्यास उपाय नाहीं. जशी शाळेमध्यें मुलांनी शिक्षा घेतली पाहिजे, तद्वत् हें आहे यापासून उत्तम फळ पुढें होईल. या देशचे लोकांनी वर्णसंकर होईल व धर्म बुडेल, हें कांहीं भय बाळगूं नयें. वर्णसंकर होत नाहीं व धर्म बुडत नाहीं; परंतु मूर्खपणा मात्र बुडेल आणि धर्मामध्यें अधर्म मिसळ झाला आहे; त्यास लोक धर्म म्हणतात, तें मात्र ज्ञानचक्षु आल्यावर जाईल.

वर्ण जे आहेत ते स्वाभाविक सृष्टींत आहेत; म्हणजे कोणतेही देशांत वर्ण नाहींत असें नाहीं, वर्ण म्हणजे इतकेंच कीं, चार प्रकारचे व्यापार. जसे ब्राह्मण हे धर्म रक्षणारे व विद्या वाढविणारे, क्षत्रिय शिपाईगिरी करणारे, वैश्य व्यापार करणारे आणि क्षुद्र शेत करणारे. हे धर्म सर्वत्र आहेत व ते जलप्रलय होईपर्यंत पृथ्वीवर रहातील; परंतु लोकांच्या अडाणी समजुती म्हणजे ब्राह्मण विद्वान् चांगला असला तरी सिंधू नदी उतरून पलीकडे गेला म्हणजे किंवा त्यानें कांदा खाल्ला म्हणजे त्याचें ब्राह्मण्य गेलें. हें कसें गेलें? म्हणून म्हणाल तर त्याचें उत्तर कोणास देतां येणार नाहीं. त्यास जी विद्या येते, ती तो विसरत नाही. त्याचा धर्म आहे, तो त्यानें सोडला नाहीं. त्याचें कांहीं नुकसान झालें नाहीं. मग कांदा खातांच ब्राह्मणपणा गेला कसा? केवळ मनाची ही कल्पना आहे. वास्तविक कांहीं नाहीं. या मूर्ख समजुती जातील आणि हल्लीं जो वर्णसंकर आहे, म्हणजे वास्तविक ब्राह्मण नसतां ब्राह्मण म्हणवितात, व शूद्र असतां ब्राह्मण म्हणवितात व ब्राह्मण असतां ब्राह्मण म्हणत नाहीत हा वर्णसंकर मात्र जाईल आणि व्यवस्थित होतील.

या लोकांच्या पायांतील शृंखला सुटतील. हे चहों देशांत जाऊन व्यापार करूं लागतील, विद्वान् होतील व आपले देशांत कापड वगैरे जिन्नस तयार करावयास शिकतील तेव्हां सुखी होतील. लोक शहाणे झाले म्हणजे हळूच इंग्रजांजवळ म्हणतील कीं, आम्हांस तुमच्या देशांत आहे तसें पार्लमेंट द्या. नंतर आपले लोक त्यामध्यें बसूं लागले म्हणजे हळूच म्हणतील कीं, तुम्हासारखे आम्ही शहाणे आहों मग आम्हास अधिकार कां नसावे ? मग हिंदु लोकांचें बहुत मत असें पडलें, म्हणजे सरकारास देणें अगत्य आहे. इकडील लोक राज्याचे कारभार वगैरे चांगले करूं लागले, लाच खावयाचें सोडून दिलें, म्हणजे बहुतकरून मोठालीं, कामें गवरनरीचींसुद्धां यांचे हातीं येतील, आणि मग अर्थातच इंग्रज फक्त व्यापार मात्र करून रहातील. म्हणजे जसे हिंदुस्थानांत प्रथम इंग्रज आले, त्या स्थितीवर येतील आणि आपले लोक पार्लमेंट व स्वराज्य भोगतील, राज्यकारभारांत व व्यापारांत त्यांस महत्त्व प्राप्त होईल आणि मग परदेशांशीदेखील व्यापार करतील.

असे हे लोक प्रबळ झाले, म्हणजे इंग्रजांस काहीं दिवसपर्यंत आभारी मानतील; कारण कीं त्यांचे योगानें हे ज्ञानी झाले; परंतु जा काळीं इंग्रज गडबड करूं लागतील किंवा कांही नवीन कानू बसवावयाचा आग्रह करतील, त्या काळीं अमेरिकेंत झालें तसें होऊन हे लोक आपल्यास स्वतंत्र करून घेतील आणि इंग्रजांस सांगतील कीं, तुम्हीं आपले देशास जावें. आतां आमचे देशाचा कारभार आम्हांस चांगला करतां येतो तुमचें गुरुत्व नको. तुम्ही पाहिजे तर व्यापारापुरतें इकडे येत जा. आमचे प्रजेचें जसें आम्हीं रक्षण करितों, तद्वत् तुमचेंही करूं परंतु तुमचें वर्चस्व नको. याप्रमाणें या देशाची गति होईल आणि नवीन राज्यस्थिती चांगले रीतीची होईल, पहिलें अज्ञान अगदीं नाहींसें होईल. यांस दोनशें वर्षे तरी पाहिजेत. परंतु असें होईल यांत संशय नाहीं.अशी मागले इतिहासावरून कल्पना होते. आणि हें तथ्य आहे, अशी खातरजमा आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ५४/१ एप्रिल १८४९ )

२८

## उद्देश

राष्ट्राच्या नीचोच्चावस्थेचें दर्शक तेथील ग्रंथसंग्रह आहे असें कित्येक विद्वानांचे मत आहे व तें असत्य नाहीं. या अफाट पृथ्वीतलावर [illegible]

कांहीं राष्ट्रें वर्णमालेसच अपरिचित आहेत. कांहींमध्यें अजून ग्रंथ लिहिण्यास सुरूवात झाली नाहीं. कित्येक राष्ट्रांमध्ये ग्रंथ झाले आहेत पण ते तादृश अुपयोगी नाहींत, आणि कित्येक राष्ट्रांनीं अुपयुक्त व ज्ञानप्रसाराचे ग्रंथ लिहून आपले ज्ञानबल वाढविलें आहे असें दिसतें. आतां हे निरनिराळे प्रकार हिंदुस्थानाच्या संबधानें बघितले तर काय दिसतें हें पाहूं. प्राचीन काळापासून या देशांत जातिविभाग होऊन त्या प्रत्येक विभागांतील लोकांनीं आपलीं आपलीं संसाराचीं कामें करून चरितार्थ चालविले. त्या विभागात विद्येचें काम प्रथमपासून ब्राह्मणवर्गाकडेच असून त्याप्रमाणे त्यांनीं पहिल्यानें अीश्वरप्रार्थनेचे वेद म्हणून ग्रंथ अुपदेशिले. त्यानंतर कर्मकांड म्हणून भगवत्पूजनाचा पंथ निर्माण झाला. एतत्पंथीय आचार्यांनी यज्ञयागादि विधानांचें बहुत ग्रंथ लिहिले. त्यानंतर झालेल्या लोकांचे तर्क वाढून त्यांस मागील ग्रंथ निरर्थक वाटू लागले व त्यांनीं षड्दर्शनादि तर्कशास्त्राचे ग्रंथ लिहिण्यास प्रारंभ केला. त्यातच सूत्रादि वादविवादाचे ग्रंथ झाले. पुढें त्या ग्रंथांवरची ही रुचि उडून पुढल्या पिढ्यांनी सुलभ असा भक्तिमार्ग काढिला व तत्संबंधानें पुराणे तंत्रे, प्राचीन ग्रंथांवर अनेक टीका व अनेक प्राकृत ग्रंथ असे उत्पन्न झाले. त्याच प्रमाणे अनेक साधुसंत झाले. त्यांणी भक्तिपंथासच जोर देऊन तो विशेष दृढ केला, व तोच हल्लीं सर्व देशभर चालत आहे. याप्रमाणें या हिंदुस्थानराष्ट्राची ग्रंथपरंपरा दिसते. वरील सर्व प्रकारच्या परंपरागत ग्रंथश्रवणानें व त्यांच्या अभ्यासाने हिंदुलोक परम धार्मिक झाले ते इतके कीं, हिंदुस्थानांतील आबालवृद्ध व राजारंकांपर्यंत जी धर्मबुद्धि आणि श्रद्धालुता दिसते तितकी पृथ्वीवरील कोणत्याही देशांत दिसत नाहीं इतकी गोष्ट असून व धर्माचारांत इकडील लोक इतके पुढे असून त्यांच्या एकंदर ग्रंथसमुदायांत व्यावहारिक विषयांवर जसे व जितके ग्रंथ व्हावयास पाहिजे होते तसे तितके होण्याकडे मुळापासूनच ग्रंथकारांचें लक्ष्य कमी असल्याचे दिसून येतें. आता याचें कारण पाहिलें असतां हें उघड दिसेल की, ग्रंथकर्तृत्वाचें काम काय तें ब्राह्मणांकडेच असल्यामुळें व ते स्वभावत: धर्माचारप्रवृत्त असल्यामुळें विशेषेकरून त्यांच्या त्यांच्या व्यवसायास अनुकूल असा ग्रंथसमूहच त्यांनीं केला. निरनिराळ्या उपयुक्त विषयांवर जे ग्रंथ व्हावयाचे ते, त्या त्या विषयांत ग्रंथकार स्वत: माहितगार व जाणते असल्याखेरीज, व्हावयाचे नाहींत हा नियम आहे. त्याप्रमाणें पाहिलें असतां ब्राह्मण लोकांनीं जें सांसारिक व व्यावहारिक विषयांकडे फारसें लक्ष्य दिलें नाहीं ह्याचें कारण कळेल. आतां त्यांनीं व्यावहारिक ग्रंथ लिहिले आहेत; नाहींत असें नाहीं. परंतु त्यातही त्यांनीं आपलें धर्माचे सूत्र लावून ठेविलेंच आहे. औषधांचे संबंधाने व शारीरिक पीडांचे संबंधानें मंत्रतंत्र, जपतप, कर्मविषयक इत्यादि धार्मिक भाग सांगितले आहेत; ज्योतिषाचे संबंधानें ग्रहपीडा, त्यांच्या शांती, दानें इत्यादि लिहिली आहेत; शिल्पाचे संबंधानें चंद्र, दिशा, ग्रह इत्यादि साधून दिवस, नक्षत्र यांच्या शुभाशुभावर कोणत्याही शिल्पास हात घालावा असें ठरविलें आहे, आणि अैतिहासिक विषयांचे लेखांत अस्त्रें, तपे मंत्रसामर्थ्य इत्यादि गोष्टी समाविष्ट केल्या आहेत. येणेंकरून तोटा इतकाच झाला कीं, सत्यशास्त्रांचा खऱ्या शोधांचा पत्ता लागण्याचें एकीकडे राहून व्यावहारिक गोष्टींविषयीं परंपरेनें फारच

अज्ञान राहत गेले. त्याचप्रमाणें, प्रत्येक विषयांत धर्माचा समावेश केल्याने लोकांमध्यें संसारिक सुधारणांविषयीं उदासीनता वसत चालली. यामुळें राज्यव्यवहारांत लोकांचा संबंध नाहीसा होऊन आपले राष्ट्र उन्नत्यवस्थेस कधींच आले नाहीं असें एकंदर ग्रंथसमूहावरून अनुमान होतें. आपलें राष्ट्र कधींच उन्नत्यवस्थेस आलें नाहीं हें म्हणणे मोठें साहसाचें आहे असें म्हणण्याचें कारण नाहीं. सद्‌ग्रंथ संग्रहानें आलेली उन्नत्यवस्था बहुतकालपर्यंत टिकते. क्षणमात्र आलेली जी उन्नति ती उन्नति नसून तो तत्तत्कालीन राज्यवाहकाच्या बुद्धिकौशल्याचा व राज्यनीतीचा प्रभाव होय इतकेंच म्हणावें. अतएव, आमच्या राष्ट्राचा आजपर्यंतचा जो ग्रंथसमूह आपले समोर आहे त्यावरून तो राष्ट्राची उच्चावस्था दाखविणारा नाहीं हें सिद्ध होतें.

(आमच्या लक्षावधि ग्रंथश्रवणाचा सर्व हिंदुस्थानराष्ट्रांत हाच परिणाम दिसतो कीं; लोकांनी धर्मनिष्ठा धारण करून त्यांच्या झुंडी तीर्थस्नानें, तीर्थयात्रा, वाऱ्या, व्रतें, दानें वगैरे करण्यास फिराव्या. ते कापसाच्या वातींनीं आणि कापुराच्या आरत्यांनीं देवास ओंवाळतील; परंतु कापूर येतो कोठून, त्याची शुद्धी कशी होते, कापसाचा व त्याजपासून होणाऱ्या वस्त्रांचा इतर काय अुपयोग होतो, लोखंड कोठून येतें, कांच कशी व कोठून येते अित्यादीचे शोध कोणासही नकोत व तीं तीं ठिकाणेंही बघण्याची कोणास अिच्छा होत नसे. आता याचे कारणही स्पष्टच होते कीं पूर्वकालीं अिकडे सर्वत्र हल्लींसारखी पोटापाण्याची विवंचना नसल्यामुळें कोणाचेंच या गोष्टींकडे लक्ष्य लागलें नाहीं. व याकरितां त्यांस फारसे कोणी दूषणही देणार नाहीं. त्यांचा मोठा पुरुषार्थ काय तो धर्म, ईश्वरप्राप्ति व पारमार्थिक ज्ञान हीं संपादन करण्यांतच आहे असें ते मानीत असल्यामुळें, हल्लीं आपल्यास इतर सुधारलेल्या राष्ट्रांतून दिसत असलेल्या नानाप्रकारच्या सुधारणा, कला,कौशल्यें, शोधकता यांजविषयीं त्यांचें औदासिन्य दिसतें. यांतही फारसे आश्चर्य नाहीं. परंतु आतां तो काळ गेल्यामुळें व लोक उदरंभरणाविषयीं सचिंत असल्यामुळें सुधारलेल्या लोकांशीं होईल तितकी बरोबरी करून संसारिक सुखवृद्धीकडें आपलीं मनें लावण्याची आवश्यकता प्राप्त झाली आहे, तर हे काम कसें होईल ? याचा विचार केला असतां प्रारंभीच म्हटल्याप्रमाणें चांगल्या उपयुक्त ग्रंथाची वृद्धी या देशांत सर्वत्र झाली पाहिजे हेंच उत्कृष्ट साधन दिसतें.

पूर्वीच्या लोकांत विवेक, चिकित्सा, तर्क हे गुण नव्हते असें नाही. परंतु ऱ्हासकाळ डोकावून बघत होता; त्याची फेरी आली तसे सर्व गुण समाधिस्थ होऊन सत्यज्ञान, दयागुण आणि यत्नबुद्धि यांजविषयीं सर्वांशानीं लोकांस विस्मृति झाली आणि त्यांचें जागीं असत्य, पाखंड, मनस्विता आणि जडता येऊन तत्संबंधाने जो द्रव्यव्यय होतो तो अर्थात त्या त्या दुर्गुणांची वृद्धि करण्याकडेच होतो हें स्पष्ट दिसत आहे. येणेंकरून उत्तरोत्तर सरस्वती, लक्ष्मी आणि अन्नपूर्णा या तिघी बहिणी या देशाचा त्याग करून परदेशवासी होऊं लागल्या. कोणतीहि गोष्ट क्रमशुद्ध आणि शालाशुद्ध राहिली नाहीं. श्रेष्ठ लोकांनीं इतर लोकांस चांगलें वळण लावण्याचा यत्न केला असतां तो सिद्धिप्रद होतो. परंतु

श्रेष्ठ म्हणून मानलेल्यांची स्थितीच अशी आहे कीं, उपयुक्त कामांकडे त्यांची बुद्धीच वळत नाहीं. उपयुक्त गोष्टींत साह्य देण्यास सुदामदेवाच्या घरचें दारिद्र्य जणू काय त्यांच्या घरीं आले असतें. यांचे अनुमान देशांतील अनेक सभा मंडळचा, पुस्तकशाला, ग्रंथकार, उद्यम, व्यापार यांची कशी काय स्थिति आहे हें बघितलें म्हणजे सहज लक्ष्यांत येईल. तेव्हां यथार्थ ज्ञानाच्या प्राप्तीची लालसा जी शून्यवत झाली आहे तिचा पुनरागमनप्रसंग यावा हे इष्ट आहे. व तसा सुप्रसंग येण्याचीं सुचिन्हे भासूं लागून सज्ज्ञानोदयाचें दर्शक अशी ही चांगल्या राज्याधिकाऱ्यांच्या अमलांत सुप्रभात होऊं लागली आहे. तरी या देशावर फार दिवसांचा जो गाढ अज्ञानांधःकार पसरला आहे तो निस्तोष होऊन या सुप्रभातकालची स्वच्छ प्रभा सर्व भारतवर्षावर पसरण्यास कांहीं कालाची अपेक्षा आहे व त्याकरितां सर्व देशहितैषी लोकांकडून होतील तितके प्रयत्न चालून त्यांची विद्या, ज्ञान, बुद्धि व धन यांचा या कृत्याकडे विनियोग झाला पाहिजे. म्हणून, प्राचीन सत्य इतिहास व सत्यतर्क हे वाढले पाहिजेत. हल्लीं आपणास कापड, रेशिम, लोखंडांचे व तांबे पितळेचे जिन्नस, कागद, साखर, कांच, इत्यादि जे उपयोगी पडत आहेत ते निर्माण करण्याचे हुन्नर कोठें व कसे चालतात या शोधाचे मागें लागून जे शोधेकबुद्धीचे लोक, यात्रेकरी कावडचे प्रदक्षिणा करणारे व वैरागी यांचेप्रमाणें इतर सर्व विषयांचे संबंधानें विरक्ति धारण करून फिरण्यास उद्युक्त असतील त्या शोधक लोकांच्या जत्रा भरविल्या पाहिजेत. हरिद्वार, प्रयाग, नासिक, गया, वगैरे क्षेत्रीं जाऊन आत्मोद्धारार्थ व पितरांस सद्गति मिळावी म्हणून जसे लक्षावधी नैष्ठिक लोक घरें दारें व चीजवस्तु विकून श्राद्धें व पिंडपितृयज्ञ वगैरे करितात, तसे या प्रापंचिक व व्यावहारिक विद्येच्या शोधार्थ आपल्या सर्वस्वाचा विक्रय करून यत्न करणाऱ्या बैरागी, गोसावी व यात्रिक वगैऱ्यांच्या झुंडी या देशांत उभ्या राहिल्या पाहिजेत. वेदांचे मंत्रजागर व भजनें पुराणें कीर्तनें आणि तर्कव्याकरणांचे पूर्वोत्तर पक्ष करून 'असं घटः अयं पटः' म्हणून वादविवाद व कंठशोष करण्यास आजपर्यंत ठायीं ठायीं जमत आलेले व भरणारे समाज व सभा यांच्याप्रमाणें मोठमोठ्या वैद्यक, शरिक, यांत्रिक, राजकीय, व्यावहारिक, संसारीक, सामाजिक, शोधक आणि व्यापारवर्धक अशा नानाप्रकारच्या विषयांचे ऊहापोहार्थ सर्वदा व सर्वत्र समाज आणि सभा भरल्या पाहिजेत. आता पूर्वीच्या ढंगावर आणि भपकीवर जाऊन उपयोग नाहीं. आपले पूर्वीचें ग्रंथ व त्यातून निघालेलें ज्ञान व समजुती हीं गतार्थ झालीं असून त्यास आज कांहींच किमत राहिली नाहीं हें समजलें पाहिजे. व यास्तव उपयुक्त ज्ञान चोहोंकडे प्रसिद्ध करण्याकरितां जीं राष्ट्रे आज पुढें आहेत त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसृत झाले पाहिजेत. या उद्देशानेंच प्रस्तुतचे मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचा हेतु धारण केला आहे. यांत वर लिहिलेल्या उपयुक्त विषयापैकीं यथावकाश अनेक विषयांचे विवेचन करण्याचें योजिलें आहे. याप्रमाणें हा प्रयत्न जर निर्वेधपणें चालून कांहीं अंशीं लोकोपयोगी होईल तर आमच्या श्रमांचे साफल्य झाले असें मानावयास कारण होईल.

(ग्रामरचना)

# कोणाच्या पाठीं पडावें असें एकही स्थल राहिलें नाहीं !

हल्लीं इंग्रजी राज्यांत पूर्वीची व्यवस्था सुधारून चालू केल्यास सर्वांस इष्ट आहे असे लोकोद्‌गार निघतात. व याचें कारण बघितलें असतां अगदीं बरोबर आहे. इंग्रजी राज्यांत मोठी चूक ही आहे कीं, सरकार एत्तदेशीय लोकांचें मत म्हणून कांहींच घेत नाहीं. काळे लोकांवर म्हणून त्यांचा विश्वास नसून त्यांस तें हलकट समजतें ! आणि त्यांचें मत घेण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं, आपण जें करूं तेंच योग्य असून सर्वांनीं तें मान्य केलें पाहिजे असे सरकारास वाटते. आतां हा कोण न्याय बरें ? हा देश जिंकून त्यांणी आपल्या ताब्यांत घेतला हें एत्तदेशीयांच्या पापाचें फळ काय ? आणि त्या पापामुळें सरकारची अशी बुद्धि होते काय ? नकळे ! सरकारच्या या काळचा-गोऱ्याचे पक्षपातानें गोऱ्या कामदारांकडून अज्ञानानें अन्याय फार होतात. त्यांस काळचा लोकांत मिळून मिसळून राहण्याचें आवडत नाहीं; त्यामुळें काळचा लोकांच्या पूर्वापार रीतीभाती व आचारविचार हे कसे आहेत हें माहित नसते; आणि तेणें करून त्यांजकडून जे त्यांच्या वादांचे व कज्जांचे निकाल होतात ते भलतेच होतात असें अनेक प्रसंगीं सरकारास व रयतेस कळून आलें आहे. तथापि पहिल्यापासून जी सरकाराकडून डोळेझांक झाली तीच अद्यापि चालू आहे हें पाहून फार नवल वाटतें. दिवसेंदिवस सरकारास ज्यास्त ज्यास्त अनुभव येत जाऊन तें आपल्या कारभारांत आणि अंम्मलबजावणीत सुधारणा करील म्हणावें तर तसा प्रकार कांहीं दिसत नाहीं व लोकांची कुरकुर आणि ओरड कांहीं कमी होत नाहीं. सरकार आपल्या कारभारांत मुळींच सुधारणा करूं इच्छित नाहीं किंवा करीत नाहीं असें नाहीं. तें सुधारणा करूं इच्छितें व त्याप्रमाणें करूंही लागलें असेल; कबूल, परंतु ज्या गोष्टींविषयीं आणि ज्या कारभारांत पहिल्यानें आणि आवश्य सुधारणा व्हावी असें लोक इच्छितात व अपेक्षा करितात त्या गोष्टींत व त्या कारभारांत सरकारांकडून सुधारणेसारखा कांहींच फेरबदल होत नाहीं ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

ज्या गोष्टींत व ज्या कारभारांत सुधारणा व्हावी असें लोक इच्छितात त्या गोष्टी व ते कारभार म्हटले म्हणजे-जमीनीच्या बाबी, वसूल वासलाती आणि सर्व प्रकारचें दिवाणी फौजदारी न्याय. ह्याच गोष्टी आणि हेच कारभार अगोदर सुधारावे म्हणजे कोणाची कुरकुर आणि कागाळी ऐकूं येणार नाहीं. जमीनबाबींच्या चालू वहिवाटींनीं आणि दिवाणी फौजदारींतील विलक्षण खर्चानें रयत अगदीं रडकुंडीस आली आहे असें दिसतें ! न्यायमनसुबीची पूर्वीची रीति अगदीं साधी आणि बिनखर्चाची असे: गांवकरी

लोकांचे अनुमतानें पाटील कुळकर्णी वगैरे वतनदार नेमीत, व ते सभ्य लोकांना पंच नेमून त्यांजकडून पंचाइती करवीत. त्याप्रमाणें आतां केलें तर होणार नाहीं असें नाहीं. सरकारचीं मोठमोठीं कामें करून हल्लीं पेन्शनें ( बैठे पगार ) खात बसलेल्या सभ्य लोकांकडून जर असलीं पंचाइतींचीं कामें करविलीं तर होणार नाहींत असें नाहीं, व त्यांत अन्यायही होण्याचा संभव कमी दिसतो. परंतु सरकाराचा लोकांवर भरंवसा पाहिजे ना? तो तर मुळीं त्याजमधून अगदीं नाहींसा झाला आहे ! या बेभरंवशानेंच या देशाच्या लोकांचे असे हाल आणि अशा अपेष्टा मांडिल्या आहेत. हा भरंवसा जर आमच्या सरकारच्या मनांत असता तर मग काय पाहिजे होतें ? पण तें व्हावें कसें ? सरकारच्या मनांतून काळ्या लोकांविषयींचा विश्वास किंवा भरंवसा यांचें सांठवण अगदींच रितें झालें आहे असें दिसतें. त्याच्या मनांत काळ्यांच्या विश्वासाचा एक थेंबही वसत नाहीं; सरकारला त्याचे जेवढे काळे लोक कामावर आहेत तेवढे मात्र अंशत: अथवा कांहीं पर्यायानें किंवा बाताबेतानें विश्वसनीय वाटतात; परंतु सरकारच्या नौकरींत नसणारे लोक मूर्तिमंत बेभरवंशाचे वाटतात असें म्हणतात हें खरें काय ? पूर्वीच्या सरकारांचे आणि राजांचे सर्व विश्वास आणि भरंवसे, त्याचप्रमाणें सभ्य म्हणविलेल्या लोकांची अब्रू, साक, वजन, कीर्ति आणि मान हीं हल्लीं सारीं नाहींशीं होऊन ते जणू काय कवडीमोल झाले असें सरकारास वाटूं लागलें काय ? एल्फिन्स्टन साहेबांनीं पुणें घेतलें तेव्हां बाळाजीपंत नातु यांस आपले कौन्सिलदार नेमून त्यांच्या सल्ल्यानें त्यांणीं दहा वर्षे काम चालविलें होतें. आणि त्यांच्या मसलतीनेंच त्यांणीं सरंजाम, जाहगिरी, पेन्शने, बडे लोकांच्या यादी वगैरेंचे बंदोबस्त केले. याचप्रमाणें इंग्रजीच्या अव्वलीस दरएक कलेक्टरांजवळ एकेक दफ्तरदार नेमिलेला असून त्याचे मार्फत महालाचीं व जिल्ह्यांचीं कामें चालत होतीं. इतकेंच नव्हें, तर त्याचे सहीवांचून कलेक्टराचा हुकूम चालत नसे. यामुळें कलेक्टरांस सर्व प्रकारची माहिती व वर्तमानें स्वतः रास्त रीतीनें समजून घेण्याची संधी असे. परंतु आतां तसा प्रकार मुळींच राहिला नसून, सर्व साहेब लोक आपल्यास स्वत: सिद्ध समजतात व यामुळें त्यांस काळे लोकांचा सल्ला घेणें म्हणजे मोठी लज्जास्पद गोष्ट होय असें वाटतें, असें कां व्हावें हें कांहीं समजत नाहीं. हल्लीं सरकारनें पूर्वीच्या पंचाइती, लवाद, शिष्टमत वगैरे दरोबस्त एकीकडे सारून त्यांचे जागीं कोर्टें कचेऱ्या व वकील आणिले. परंतु त्यांच्या भाराखालीं रयत चिरडून जाऊं लागली तिकडे सरकारचें मुळींच लक्ष्य जात नाहीं हा चमत्कार नव्हे काय ?

पूर्वीं महजर होत होते. त्यांवरून असें दिसतें कीं कोणताही कज्जा असो, तो एका नियमित मुख्य कामदाराकडे येऊन, त्याचा निर्णय त्या गांवचे वतनदार व जमीनदार यांची सभा भरून होई. त्याचप्रमाणें कोणत्याहीं जिंदगीची, मालाची व चीजवस्तूची खरेदी विक्री वगैरे झाली तर त्याचे पत्रकावर गांवचे देशमुख, काजी यांच्या सह्या साक्षी होत म्हणजे झालें. असा सर्व शांततेचा सौम्यतेचा व बिनखर्चाचा व्यवहार असतां तो आतां जसा कांहीं एखादा मोठा बाऊ करून ठेविला आहे! हल्लींचीं कोर्टें, कचेऱ्या आणि वकील यांचें घोंटाळ्यांत बिचाऱ्या गरीबांची मुळींच दाद लागत नाहीं. तसेंच, एक पाटिलकी

किंवा कुळकर्णपणाचें वतन यांचा एक आण्याचे हिश्याचा वाद असून तक्रार पडली तर मामलेदार, कलेक्टर, कमिशनर व हायकोर्ट किंवा सरकार यांच्यापर्यंत त्याबद्दल कागदपत्रें चालून दहा रूमाल कागद होतात आणि कोणास समजूत पटत नाहीं. शिरस्तेदारापासून तों कौन्सिलदारांपर्यंत सारखा धुमाकूळ माजून सर्व थकतात; तरी निकाल होतच असतो. पैसेवाल्यांची मात्र चैन असते.

सरकारचे कामदार बहुतकरून आळशी किंवा पोस्ती फार असून त्यांना जिकिरीच्या कामाचा मनापासून तिटकारा असतो. दिखाऊ कामें सर्व करितात; परंतु जिकीरीचीं आणि घोटाळ्याचीं कामें करण्याचा भाग म्हणजे त्यांना कंटाळवाणा वाटतो. ते काळजीनें किंवा धास्तीनें आपल्या कामावर वेळेवारीं हजरही नसतात. सगळे आपल्याच ऐटींत दंग असून आपल्याकडे गरीब रयत आणि आपले देशबंधु हिसके खाऊन आणि खेपा घालून दाद मागत आहेत; तेव्हां काळजीने आणि उत्साहानें आपल्याकडे असलेल्या थोर अधिकाराचा त्यांस लाभ देऊन आपण त्यांना निश्चिंत करावे हें त्यांच्या स्वप्नींही वागत नसतें ! साहेब लोकांच्या कचेऱ्या आणि न्यायाधीशांची कोर्टें यांजमध्ये फेरे घालीत असावे, पैसे मोडीत जावे आणि वकील ब्यारिस्टरांची पायधरणी करावी तरी दाद लागत नाहीं !

अधिकाऱ्यांमध्यें चित्त देऊन काम करणारे अंमलदार फारच थोडे. ज्याचें त्याचें तारखा मोजण्याकडे लक्ष्य असतें. पहिली तारीख येते कधीं आणि पगार पदरांत पडतो कधीं याकडे ते चित्त देऊन बसले असतात. तेव्हां अर्थातच रयतेच्या दादीचें आणि न्यायाचें संकट होऊन प्रजेला दीन व लाचार होऊन बसावें लागतें ! खालच्या न्याया-धीशांनीं विरुद्ध न्याय केला तर त्यावर हायकोर्टापर्यंत अपीलें करण्यास आणि भांडण्यास मार्ग ठेविले आहेत. परंतु त्यांचा काय उपयोग ? या भांडण्यांत आणि न्याय मिळ-विण्यांत घरदार विकून कफल्लक व्हावे लागतें ! हायकोर्टांत अपील लागलें म्हणजे घर बसल्या बोलावणें येतें. परंतु हें समन्स लागलें म्हणजे त्या मनुष्याला पहिल्यानें काळजी ही पडते कीं, मुंबईस अपीलाच्या दिवशीं हजर राहण्यास जावयाचें, तर गाडीचे भाड्याच्या खर्चाला पैसे कोठून आणूं ? " बरें, मुंबईस गेल्यावर त्याला कळतें कीं, वकील पहिल्यानें पंचवीस रुपये मागतो व १०० चा बक्षीस रोखा लिहून दे म्हणतो. त्याचप्रमाणे हायकोर्टांत साक्षी आणण्याकरितां कोर्टाचा भत्ता, साक्षीदारांचा खुराक, स्टांपांचा खर्च त्याशिवाय कारकून शिपायांस चिरमिरी इत्यादि खर्चांची सदरें भरावयाला पैसे पाहिजेत. हे इतके पैसे आणूं कोठून ? ही त्याला आणखी काळजी उत्पन्न होऊन त्याची कंबर खचून जाते. दाद लावून न्याय मागावयाचा म्हणजे पैशांशीं उटावयाचे आणि पैशांशीं बसावयाचे असें त्याला आढळून येतें व हें सर्व पैशाचें गारूड व गौड बंगाल आहे असे कळून येऊन त्याची निराशा होते. मग तो बिचारा व्यग्रचित्त होऊन असें म्हणतो कीं, जळो तो कज्जा आणि दावा. या भानगडींत आणि खर्चात पडून आपल्याला आणखी खर्चांत बुडवून घेवू नयें ! असें म्हणून तो परत घरीं येऊन स्वस्थ बसतो. त्याला कोर्ट म्हणजे पैशाची अधळपट्टी

आणि धूळधाण करणारी अशी कालिकादेवीच्या बलिदानाची महावेदीच वाटते ! यामध्यें लक्षावधी रुपये घातले तरी स्वाहा होअुन न्याय मिळतच असतो ! काय हीं पैसा पिळून काढण्याचीं विलक्षण यंत्रें सरकारानें लावून दिली आहेत !

हे अनर्थ आणि व्याप टाळण्यास पूर्वीची पंचाअिती करण्याची रीति फारच सुख-सोयकर आणि व्यवस्थित आहे असें विचारांतीं आढळून येतें. जेथें तेथें माहितगार, लोकांच्या वागणुकी समजणारे आणि व्यवहारज्ञ असे पोक्त विचाराचे व केले सवरलेले लोक असतातच. त्यांजकडून ह्या देण्याघेण्याच्या पंचाअिती करविल्यास सत्य काय असेल त्याप्रमाणेंच न्याय होअील. ह्या लोकांस कायदाकानूंचे ज्ञान नसलें तरी सत्य समजण्यास कायदेकानू लागत नाहींत आणि पूर्वी हीच पंचायितीची रीति सर्वत्र प्रचारांत असून ती सर्वांस अनुकूल वाटत असे. आतांचीं कोर्टें, त्यांतील कायदे, त्यांच्या मुदती आणि त्यांज-मध्यें लागणारे हत्तीसारखे खर्च हीं लोकांस बिलकुल अनुकूल न पडतां ते अगदीं जेरीस येतात. तसेंच कायदेही फार अवघड असून त्यांचे अर्थ साधारण मनुष्यांस होत नाहीं। अशी पंचाईत असते. तेव्हां यांजविषयी जर सरकारनें योग्य-तजवीज केली तर लोकांचें पुष्कळ कल्याण झालें असें होअील. हा न्यायमनसुब्रीचा भाग झाला. आतां जमीनबाबींचा आणि वसूलवासलातीचा कसा काय प्रकार आहे आणि त्यांत काय व्यवस्था झाली पाहिजे ते बघूं.

जमीनींची व्यवस्था कशी असते, त्यांना लागणाऱ्या पर्जन्याची अनियमितता किती असते, कीड काजळी, टोळधाड, अुंदीर वगैरेचें त्यांना किती भय असतें, त्यांची मरामत आणि मशागत नसल्यामुळें पिकें कमी किती येतात, हा सर्व प्रकार बघून धारेबंदी झाली पाहिजे; व कायमचे धारे फार तोटयाचे असतात म्हणून सूट तगाअीची पूर्वीची रीति चालू झाली पाहिजे; वगैरे पूर्वी अनेक वेळां सांगण्यांत आलें आहे. हल्लीं शेतकरी गरीब, अन्नाला महाग आणि संसार हांकण्यास असमर्थ झाले असतात. सरकारचे कर, सारे व धारे अतिशय जरब असून ते भरण्याचें दीन कुळंब्यांना मोठें संकट पडतें. त्यांणीं जीवापाड मेहनत करावीं; परंतु त्यांचें फलभाक् सरकार आणि सावकार होअुन त्यांना आठ महिने मोलमजूरी किंवा नौकरी चाकरी करून पोट भरावें लागतें. त्यांचीं बायका पोरें वीस वीस कोसांवरून गवत, लांकडें, पानें वगैरे आणून बाजारांत विकतात; परंतु त्यांत त्यांस मजूरीपेक्षां ज्यास्त कांहीं मिळत नाहीं. माल फुकटच जातो. बिरवाडीहून गरीब लोक पानाचे भारे आणितात. त्यांचा हिशेब बघितला तर चार दिवस पानें काढावयास लागतात व त्यांचे भारे बांधून पुण्यास यावयाला दोन तीन दिवस लागतात. ह्याप्रमाणें अेक आठवडा अेक भारा आणण्यांत जातो. भाऱ्याची किंमत सुमारें बारा आणे किंवा फार तर अेक रुपया मोठ्या मारामारीनें मिळतें. तेव्हा अुन्हावनांत खपून व लांबचा प्रवास करून दोन आणे प्रमाणें रोजी त्यांस मोठ्या भाग्यानें मिळते असें म्हणावयाचें. मालाला किंमत नाहींच. मालाची किंमत म्हणजे त्यांची मजूरी दिली त्यांत झाली ! बरें ह्यांत तरी सुख आहे, काय? सरकारच्या जंगल संबंधी कायद्यानें सर्व अरण्यांस कुलपें

घातल्यामुळें रानावनांतला गवत काडी, लाकूडफाटी, पान पाला वगैरे माल मुबलक मिळण्याची मोठी पंचाअित झाली आहे. ह्याप्रमाणें चोहोंकडून गरीबांस दुर्दिन आले आहेत! गरीबांची सर्व प्रकारें अनास्था आणि दुर्दशा आहे ! काय करतील बिचारे? पोटाच्या पायीं नवऱ्याला बायकोची काळजी करितां येत नाहीं व आअीला मुलांचा ळळा पाळवत नाहीं. ही निकट संबंधाची स्थिती. मग दूरस्थ संबंध आणि नातें या दारिद्र्या–वस्थेमुळें कितीसें पाळलें जावें हें दिसतेंच आहे. दूर गांवीं झोपड्यांत आपलीं पोरें टाकून लांकडात्रे, गवताचे व पानांचे भारे नेअुन विकणाऱ्या लेंकुरवाळ्या बायांकडे पाहून कोणा पाषाणहृदयांस द्रव येणार नाहीं ? पण करावयाचें काय ? हा प्रकार केवळ अयोग्य कारभाराचा आणि प्रजाहिताविषयीं असणाऱ्या औदासिन्याचा होय. जमीनीपासून उत्पन्न होणार अेक रुपया आणि सरकार घेणार आठ आणे. या सरकारी धाऱ्यांशिवाय शेतकऱ्यांस लोकलफंड, स्टचांप, रजिस्टर ( नोंदणी ) वगैरें संबंधानेंही पुष्कळ खर्च सोसावा लागतो. सारांश, शेतीच्या कामांत त्यांस बरकत म्हणून राहिली नाहीं. शेती सोडून दुसरे धंदे करावे तरी बरकतीचें अनुष्टुपच. कसा बसा मजूरीनें निर्वाह व्हावयाचा. घरच्या गाड्या ठेवून भाडोत्र्याचा धंदा केला तरी त्याबद्दलचीही नाकेबंदी केलेली असून गाड्यांच्या मागें दस्तुऱ्या ठेविल्या आहेत; बैल गुरें चारण्याला रानें व कुरणें शिलक नाहींत; वेळेवर पैशा अडक्याची गरज करणारे व हंमेषा अुपयोगी पडणारे पैसेवाले कोणी राहिले नाहींत; आणि कोणत्याही धंद्यांत मालाचा खप म्हणून होत नाहीं. तेव्हा लोकांना बरकत यावी कशी ?

सर्व राज्यकर्त्यांमध्यें मुसलमानांसारखें रानटी, क्रूर, मनस्वी जुलमी, अपहारी परधर्मद्वेष्टे वगैरे जीं नाना निंद्य विशेषणें द्यावी तितकींही त्यांच्यांतील कित्येक बादशाहांस लागतील व त्यांच्यासारखे कोणी नसतील; परंतु त्यांणीं सातशे वर्षें हिंदुस्थानांत राज्य करून ही पूर्वीची नीतिच कायम ठेविली; जमिनबाबींमध्यें त्यांणीं बिलकुल हेरफेर न करितां रयतेची काळजी बाळगून सूट तगाअी वगैरे यथास्थित पाळिलीं. आणि ज्यांचा सर्व जुन्या व नव्या पृथ्वींतील राज्यकर्तृत्वकौशल्याविषयीं डंका वाजत आहे व जे धूर्त, चतुर, कार्यसाधु आणि सारासारविचारद्रष्टे म्हणून सर्वत्र प्रसिद्ध आहेत त्यांणीं, पूर्वीं कधीं कोणीं न दाखविलेली निर्दयता आणि अमानुषता दाखवावी हें हिंदुस्थानच्या प्रजेचें दुर्दैव होय यापेक्षां तें दुसरें काय म्हणावयाचें आहे ? सातशें वर्षेपर्यंत रयतेला सुखावह ज्या जमीनबाबी त्या मुसलमान राजांनीं पाळिल्या, आणि त्याच अिंग्रज सरकाराला दरोबस्त मोडून टाकाव्याशा वाटतात ! तेव्हां अशी विपरीत बुद्धि चांगल्या राजास होणें म्हणजे रयतेचें नष्टचर्यच समजलें पाहिजे दुसरें काय ? बिनसुटी हिशेबांत शेतावरच निर्वाह करणें हल्लीं अगदीं होत नाहीं हें अनेक अुदाहरणांनीं व अनुभवांनीं राजाप्रजेस कळून आलें आहे. शेतें आपली अुगाच निमित्ताला वतनदारी म्हणून सारे भरून ठेवावीं व कांहीं बांहीं जें अुत्पन्न होअील तेवढ्यानें सरकारचा सारा वारावा अेवढाच काय तो शेतकऱ्यांचा हेतु असतो. वस्तुतः शेतकऱ्यांना त्यांजकडे असलेल्या शेतापासून निर्वाहापुरता फायदा होत नाहीं. पूर्वी शेतकऱ्यांस आपलीं शेतें चांगल्या रीतीनें लागवडीस आणण्याला

अनेक साधनें असून अुमेद असे. ही अुमेद असण्याचें पहिलें कारण हेंच कीं, हल्लींपेक्षां त्यांजवर सरकार देणें फारच कमी असून त्यांना शेतांना खत, राब वगैरेंची हल्लींप्रमाणें दुर्मिलता नव्हती. पाहिजे तितकें व फुकट खत मिळवून आणून जमीनींची मशागत करावीं; माळीपणा, काछांचा धंदा, वगैरेंमध्ये शेतकऱ्यांना हात घालण्यास सांपडून त्यांचा पैसा चोहोंकडे फिरे व त्याजबद्दल त्यांस चांगली किफायत होअी; बडे लोकांच्या आश्रयानें शेतकऱ्यांस कोणत्याही गोष्टीचें संकट वाटत नसे; ते त्यांस लग्नाकार्यात मदत करीत व प्रसंगविशेषीं बक्षीस अिनाम देऊन त्यांस खुष करीत; आणि तेणेंकरून शेतांची आणि जमीनीची पोटच्या लेंकरांप्रमाणें ते काळजी बाळगत. परंतु आतांची स्थिति काय आहे ? बडेलोक, राजे, संस्थानिक, वगैरे सर्व बुडाले; श्रीमंतांच्या वस्त्या अुठल्या; जाहगिरी, सरंजाम वगैरे दरोबस्त लयास गेले; आणि तो सर्व पूर्वीचा आश्रय आणि अुत्तेजन तुटून, कोणाच्या पाठीं पडावें असें एकही स्थळ राहिलें नाहीं !

( ग्रामरचना )

२८

# राज्यतुलना

गुजराथचा इतिहास लिहिला गेला व तो वाचून, त्यांतून राज्यक्रांतीचीं चक्रें कशा रीतीनें आणि किती वेगानें फिरत आलीं हें समजून येईल. जुनीं राज्यें व जुने कारभार हळू हळू दरोबस्त मोडून चोहोंकडे इंग्रजी राज्याचा पगडा बसला. व जेथें जुनीं राज्यें आहेत तेथेंही इंग्रजी राज्यकारभाराचेंच अनुकरण निर्बाध रीतीनें चालू झालेलें आतां आपण पहातों. तेव्हां हा चमत्कारिक प्रकार आहे तरी काय ? अशी काय इंग्रजी राज्यकारभारांत मोहनी आहे काय कीं, त्याचेंच अनुकरण सर्वांनीं निरभिमानपणें आणि निर्मत्सरतेनें करावें ? यांमध्ये खचित कांहीं तरी अपूर्वाई आहे व ती अपूर्वाई सर्वांना हितकर व आवडती आहे; आणि म्हणूनच इंग्रजांच्या अनुकरणीय पद्धतीचें चोहोंकडे अवलंबन होऊन ज्या त्या संस्थानिकाचा इंग्रजी अमलांतील मुलखाच्या कारभाराशीं साम्य आणि बरोबरी करण्याचा विशेष कल दिसतो. आतां इंग्रजी मुलखांत जो राज्यकारभार चालतो तो सर्वांशींच निर्दोष आणि प्रजासुखावह असतो किंवा आहे

असें नसून, त्यांतही असमाधानकारक व हीनतादर्शक अशा कित्येक गोष्टी तशाच चालत आहेत, तें चांगलें नाहीं. त्याविषयीं पाहिलें असतां देशी राज्यांतील व संस्थानांतील प्रजा व लोक सुखी आहेतसे दिसतात. तथापि, इंग्रजी राज्यपद्धति एकंदरींत फार सुधारलेली, लोकांच्या स्वातंत्र्याकडे तिचें विशेष लक्ष आणि कोणत्याही रीतीनें प्रजेला संतुष्ट राखून आपल्या काबूंत ठेवण्याविषयीं तिचें विशेष धोरण, यांकडे पाहिलें म्हणजे इंग्रजांच्या व एतद्देशीय राज्यपद्धतींतील फरक तेव्हांच दृष्टीस पडतो. गुजराथेंत बडोद्याचें राज्य फार मोठें व त्या राज्याच्या योग्यायोग्य व्यवस्थेकडे बहुतांचें लक्ष असून, तिकडे कांहीं प्रशंसनीय सुधारणा होऊन, त्याविषयीं लोकमत अनुकूल मिळालें पाहिजे, असें सर्व लोक इच्छीत आहेत. आणि ज्याप्रमाणें बडोद्याचें राज्य सुधारलें जावें असें लोक इच्छितात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर देशी संस्थानें व त्यांचे राजेही सुधारले जावे, अशी सर्व देशहितेच्छूंनी इच्छा असणेंही साहजिकच आहे. आतां, ज्यांच्यांशीं आपल्याला साम्य व बरोबरी करावयाची आपण इच्छा करितों त्या इंग्रजी अमलांतील गुणावगुणांची व एतद्देशीय संस्थानांतून असलेल्या गुणावगुणांची आपण या खालीं एक यादी करून, त्यांवरून त्या परस्परांची तुलना बघूं व कोणत्या कमज्यास्ती गोष्टींत कोण कमी ज्यास्त आहे हें पाहून, त्याचा विचार करण्याचें काम, त्या दोन्ही भिन्न राष्ट्रांकडे व त्यांच्या अमलांतील लोकांकडे करण्याचें सोंपवूं, म्हणजे झालें. ही राज्यतुलनेची कल्पना ज्या सन्निकट असलेल्या बडोद्याचे राज्यावरून सुचली तेंच बडोद्याचें राज्य, सर्व देशी राज्यें व संस्थानें यांचें एक मुखत्यार समजूं, किंवा त्याच्या संबंधानें ज्या कांहीं गोष्टी आणि गुणावगुण आपण या राज्यतुलनेंत पाहूं त्या गोष्टी व ते गुणावगुण इतर राष्ट्रांचेही परीक्षिले गेले असें मानावयाचें, हें विशेष रीतीनें येथें सांगून ठेवावयाचें आहे. म्हणजे, एकटया बडोद्याचे राज्यकारभारावरून बहुशः एकंदर एतद्देशीय राज्यांच्या व संस्थानिकांच्या राज्यकारभारचें अनुमान बसवावयाचें आहे; व तसें अनुमान बसविण्यास फारशी हरकतही नाहीं. आतां ज्याअर्थी, हा राज्यतुलनाभाग गुजराथच्या इतिहासाचे एकंदर अवलोकनावरून लिहिण्याचें सुचलें आहे त्या अर्थी तो भाग त्याच इतिहासाला समालोचनेदाखल किंवा एकंदर परिक्षणासारखा जोडला गेल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

### (इंग्रजी राज्यांतील गुणावगुण.)

१. प्रजा अकलेनें प्रतिवर्षी जास्त जास्त सुधारत आहे. याचें कारण शाळा. छापखाने, ग्रंथप्रसार आणि देशावरचा व्यापार व प्रवास यांनीं लोकांची अक्कल व बुद्धि विशेष वाढत आहे.

### (देशी राज्यांतील गुणावगुण.)

१. पांचपांचशें किंवा दोनदोनशें वर्षे एकछत्री राज्य असलें व तें एकाच वंशाकडे चालत असलें तरी प्रजेची अक्कल आणि बुद्धि पहिल्या दिवसाप्रमाणेंच मंद आणि कर्तव्यशून्य असलेली दिसते याचें कारण उघड आहे कीं, अकलेचा व बुद्धीचा विकास होण्याचीं जीं उत्कृष्ट साधनें, व

अनेक साधनें असून अुमेद असे. ही अुमेद असण्याचें पहिलें कारण हेंच कीं, हल्लींपेक्षां त्यांजवर सरकार देणें फारच कमी असून त्यांना शेतांना खत, राब वगैरेंची हल्लींप्रमाणें दुर्मिलता नव्हती. पाहिजे तितकें व फुकट खत मिळवून आणून जमीनींची मशागत करावीं; माळीपणा, काछांचा धंदा, वगैरेंमध्ये शेतकऱ्यांना हात घालण्यास सांपडून त्यांचा पैसा चोहोंकडे फिरे व त्याजबद्दल त्यांस चांगली किफायत होअी; बडे लोकांच्या आश्रयानें शेतकऱ्यांस कोणत्याही गोष्टीचें संकट वाटत नसे; ते त्यांस लग्नाकार्यात मदत करीत व प्रसंगविशेषीं बक्षीस अिनाम देऊन त्यांस खुष करीत; आणि तेणेंकरून शेतांची आणि जमीनीची पोटच्या लेंकरांप्रमाणें ते काळजी बाळगत. परंतु आतांची स्थिति काय आहे? बडेलोक, राजे, संस्थानिक, वगैरे सर्व बुडाले; श्रीमंतांच्या वस्त्या अुठल्या; जाहगिरी, सरंजाम वगैरे दरोबस्त लयास गेले; आणि तो सर्व पूर्वीचा आश्रय आणि अुत्तेजन तुटून, कोणाच्या पाठीं पडावें असें एकही स्थळ राहिलें नाहीं!

(ग्रामरचना)

२८

# राज्यतुलना

गुजराथचा इतिहास लिहिला गेला व तो वाचून, त्यांतून राज्यक्रांतीचीं चक्रें कशा रीतीनें आणि किती वेगानें फिरत आलीं हें समजून येईल. जुनीं राज्यें व जुने कारभार हळू हळू दरोबस्त मोडून चोहोंकडे इंग्रजी राज्याचा पगडा बसला. व जेथें जुनीं राज्यें आहेत तेथेंही इंग्रजी राज्यकारभाराचेंच अनुकरण निर्बाध रीतीनें चालू झालेलें आतां आपण पहातों. तेव्हां हा चमत्कारिक प्रकार आहे तरी काय? अशी काय इंग्रजी राज्यकारभारांत मोहनी आहे काय कीं, त्याचेंच अनुकरण सर्वांनीं निरभिमानपणें आणि निर्मत्सरतेनें करावें? यांमध्ये खचित कांहीं तरी अपूर्वाई आहे व ती अपूर्वाई सर्वांना हितकर व आवडती आहे; आणि म्हणूनच इंग्रजांच्या अनुकरणीय पद्धतीचें चोहोंकडे अवलंबन होऊन ज्या त्या संस्थानिकाचा इंग्रजी अमलांतील मुलखाच्या कारभाराशीं साम्य आणि बरोबरी करण्याचा विशेष कल दिसतो. आतां इंग्रजी मुलखांत जो राज्यकारभार चालतो तो सर्वांशींच निर्दोष आणि प्रजासुखावह असतो किंवा आहे

असें नसून, त्यांतही असमाधानकारक व हीनतादर्शक अशा कित्येक गोष्टी तशाच चालत आहेत, तें चांगलें नाहीं. त्याविषयीं पाहिलें असतां देशी राज्यांतील व संस्थानांतील प्रजा व लोक सुखी आहेतसे दिसतात. तथापि, इंग्रजी राज्यपद्धति एकंदरींत फार सुधारलेली, लोकांच्या स्वातंत्र्याकडे तिचें विशेष लक्ष आणि कोणत्याही रीतीनें प्रजेला संतुष्ट राखून आपल्या काबूंत ठेवण्याविषयीं तिचें विशेष धोरण, यांकडे पाहिलें म्हणजे इंग्रजांच्या व एतद्देशीय राज्यपद्धतींतील फरक तेव्हांच दृष्टीस पडतो. गुजराथेंत बडोद्याचें राज्य फार मोठें व त्या राज्याच्या योग्यायोग्य व्यवस्थेकडे बहुतांचें लक्ष असून, तिकडे कांहीं प्रशंसनीय सुधारणा होऊन, त्याविषयीं लोकमत अनुकूल मिळालें पाहिजे, असें सर्व लोक इच्छीत आहेत. आणि ज्याप्रमाणें बडोद्याचें राज्य सुधारलें जावें असें लोक इच्छितात, त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील इतर देशी संस्थानें व त्यांचे राजेही सुधारले जावे, अशी सर्व देशहितेच्छूंनी इच्छा असणेंही साहजिकच आहे. आतां, ज्यांच्यांशीं आपल्याला साम्य व बरोबरी करावयाची आपण इच्छा करितों त्या इंग्रजी अमलांतील गुणावगुणांची व एतद्देशीय संस्थानांतून असलेल्या गुणावगुणांची आपण या खालीं एक यादी करून, त्यांवरून त्या परस्परांची तुलना बघूं व कोणत्या कमज्यास्ती गोष्टींत कोण कमी ज्यास्त आहे हें पाहून, त्याचा विचार करण्याचें काम, त्या दोन्ही भिन्न राष्ट्रांकडे व त्यांच्या अमलांतील लोकांकडे करण्याचें सोंपवूं, म्हणजे झालें. ही राज्यतुलनेची कल्पना ज्या सन्निकट असलेल्या बडोद्याचे राज्यावरून सुचली तेंच बडोद्याचें राज्य, सर्व देशी राज्यें व संस्थानें यांचें एक मुखत्यार समजूं, किंवा त्याच्या संबंधानें ज्या कांहीं गोष्टी आणि गुणावगुण आपण या राज्यतुलनेंत पाहूं त्या गोष्टी व ते गुणावगुण इतर राष्ट्रांचेही परीक्षिले गेले असें मानावयाचें, हें विशेष रीतीनें येथें सांगून ठेवावयाचें आहे. म्हणजे, एकट्या बडोद्याचे राज्यकारभारावरून बहुश: एकंदर एतद्देशीय राज्यांच्या व संस्थानिकांच्या राज्यकारभारचें अनुमान बसवावयाचें आहे; व तसें अनुमान बसविण्यास फारशी हरकतही नाहीं. आतां ज्याअर्थी, हा राज्यतुलनाभाग गुजराथच्या इतिहासाचे एकंदर अवलोकनावरून लिहिण्याचें सुचलें आहे त्या अर्थी तो भाग त्याच इतिहासाला समालोचनेदाखल किंवा एकंदर परिक्षणासारखा जोडला गेल्यास अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

**(इंग्रजी राज्यांतील गुणावगुण.)**

१. प्रजा अकलेनें प्रतिवर्षी जास्त जास्त सुधारत आहे. याचें कारण शाळा. छापखाने, ग्रंथप्रसार आणि देशावरचा व्यापार व प्रवास यांनीं लोकांची अक्कल व बुद्धि विशेष वाढत आहे.

**(देशी राज्यांतील गुणावगुण.)**

१. पांचपांचशें किंवा दोनदोनशें वर्षे एकछत्री राज्य असलें व तें एकाच वंशाकडे चालत असलें तरी प्रजेची अक्कल आणि बुद्धि पहिल्या दिवसाप्रमाणेंच मंद आणि कर्तव्यशून्य असलेली दिसते याचें कारण उघड आहे कीं, अकलेचा व बुद्धीचा विकास होण्याचीं जीं उत्कृष्ट साधनें, व

ज्यांचा इंग्रजी राज्यांत उत्तम रीतीनें प्रसार झाला आहे व होत आहे त्या शाळा, छापखाने, ग्रंथप्रसार, व्यापार आणि प्रवास, या गोष्टींचा अभाव; या अभावामुळें अकलेचें व बुद्धीचें दार लागून आंत औदुंबरकीटवत् देशी राज्यांतील प्रजा इंग्रजी राज्यांतील प्रजेपेक्षां मलिन आणि मतिमंद राहिली !

२. विद्वान् व बुद्धिमान् लोकांच्या गुणांचें योग्य परीक्षण होऊन, त्यांच्या गुणांप्रमाणें सरकारांत वजन, अब्रू आणि अधिकार वाढत जातो; व त्यामुळें विद्या व बुद्धिमत्ता यांचें महत्त्व लोकांस कळून त्याकडे त्यांचें चित्त साहजिक ओढ घेतें.

२. विद्या व बुद्धिमत्ता यांचें परीक्षण मुळींच होण्याची वहिवाट नसून, दरबारांत कोणाचा मान, अब्रू, व अधिकार वाढवावयाचा, याचा विचार बिलकुल होत नाहीं. आपले आप्त, सोयरे, मित्र व खुषमस्करे वगैऱ्यांकडे अत्यंत जबाबदारीचे अधिकार बेलाशक द्यावयाचे, व त्याबद्दल मनांत कोणत्याही प्रकारची शंका म्हणून बिलकुल बाळगावयाची नाहीं; हा देशी राजांचा व संस्थानिकांचा बाणा. बडोदें राज्यांत आलीकडे खंडेराव व मल्हारराव यांच्या कारकीर्दीपर्यंत बघितलें तरी हेंच दिसेल. हरिबादादा, लिंबाजी, भाऊ शिंदा, वगैरेंसारखे अक्षरशत्रु व " सही निशाणी नांगर " म्हणणारांसारखे केवळ अप्रबुद्ध लोक गायकवाडींत मोठेमोठे पगार खाऊन अत्यंत महत्वाचे अधिकार भोगीत होते, हें स्वतंत्रपणें बडोदें राज्याचेंच टिप्पण बघितलें तर समजून येईल. पुढें, इंग्रजीप्रमाणें सुधारणा करावयाची म्हटली तेव्हां, सर्व प्रकारच्या अधिकारांवर व दर्ज्यांवर योग्य लोकांच्या नेमणुका करण्याकरितां इंग्रजी अमलांत नांवाजलेल्या व शिक्षण घेतलेल्या लोकांस बोलावून न्यावें लागलें. कारण, घरीं स्वतःचा माल म्हणून कांहींच नव्हता !

३. लोकसत्ता उत्पन्न करण्याकडे सरकारचें विशेष धोरण असून, तदनुरूप जूरी, असेसर, कौन्सिलर वगैरेंच्या नेमणुका करण्याकडे फार लक्ष असतें; व लोकही, आपले हक्क व स्वातंत्र्य सरकारनें समजून त्याप्रमाणें वागावें म्हणून ठिकठिकाणीं सार्वजनिक सभा, लोकहितैषिणी सभा वगैरे नांवांनीं सर्व जातिधर्मांच्या लोकांच्या सभा व मंडळचा सरकारांत आपल्या वतीनें बोलण्यास उभ्या करून, व प्रसंगविशेषीं सरकारच्या चुका, हयगयी आणि न्यूनाधिक प्रकार असल्यास कळविण्यासाठीं,सिद्ध असतात.

३. लोकसत्तावृद्धीकडे धोरण व तत्संबंधाची कल्पनाही देशी राजांचे मनांत येत नाहीं. मग लोकांच्या मताची पर्वा कोण करितो? राजानें आपली सत्ता आपण घेऊन बसावें; त्या सत्तेंत दुसऱ्या कोणास म्हणून भाग देऊंच नये, असा त्यांचा फार जुनापुराणा ठराव आहे व तोच परंपरेनें त्या त्या राजकुलांत अव्याहतपणें चालत आलेला असतो. त्यामुळें राजाचें स्वातंत्र्य आणि मनस्वीपणा तसाच कायम राहून त्याचें सर्व काम गुप्तपणें चालतें. ह्याप्रमाणें एकाचें अनुकरण दुसरा करतो. परंतु लोककल्याणाचा व लोकस्वातंत्र्याचा मार्ग कोणी काढीत नाहीं, व रयतेमध्येंही तसें पाणी नाहीं. रयतेमध्यें तरी पाणी कोठून येणार ? 'राजा कालस्य कारणम्' ही म्हण त्यांच्या हाडीं खिळली असते. त्यामुळें त्यांच्यानें आपल्या राजापुढें चकार शब्द काढवत नाहिं. तेव्हां, तो जें करील ती पूर्व दिशा, असें मानलें जातें !

४. सरकारी अधिकाऱ्यांच्या कचेऱ्यांची व्यवस्था उत्तम रीतीनें लागलेली असते; म्हणून त्या त्या अधिकाऱ्यांचीं कामें सुयंत्र व नियमानें चालतात; कोणींही अर्जी केली कीं, तिचा जाब ठेवलेला. पहिल्यानें पोंचल्याचें उत्तर; आणि मागाहून तिच्या फैसल्याचें उत्तर, अशीं अर्जदारास मिळतात. आतां ह्यावरून इंग्रजींत म्हटलेल्या गोष्टीची न्यायानें दाद लागतेच असें जरी नाहीं तरी तेवढ्या व्यवस्थेनें इंग्रजींतील कारभार सुस्त व क्रियाशून्य दिसत नाहीं.

४. अशा तरतुदींचा मुळींच अभाव व त्यामुळें अधिकाऱ्यांचे कामांत मनस्वी घोटाळे असतात. कोणाची अर्जी गेली तर वर्षोगणती तिची दाद लागत नाहीं. सर्व कारभार सुस्त. अर्जदारानें स्वतः खेपा घालाव्या तरी त्याच्या म्हणण्याची कोणीही विचारपूस करीत नाहीं. या गोष्टींविषयीं देशी राजदरबारांची सर्वत्र मोठी ख्याति आहे. देशी राजांचे दरबारांत कोणालाच लौकर न्याय मिळावयाचा नाहीं. अतिशय महात्वाचे व जबाबदारीचे असे फौजदारी खटले आणि त्यांचे न्याय वर्षोंवर्ष तसेच पडून राहतात. पण त्यांच्याकडे राजदरबारचा कोणताही अधिकारी

ढुंकून पाहत नाहीं; आणि त्यांच्या ह्या रीतीच्या कारभारांनीं लोकांमध्येंही असा धीर व दम निरुपायानें आला असतो कीं, 'हें राजदरबारचें काम, आपल्या प्रारब्धानें दाद लागेल, तेव्हां लागेल' असें अर्जदार निराशेनें बोलत असतात.

५. लेखनस्वातंत्र्य फारच असल्यामुळें, लोकमताला सरकारांतून फार मान मिळतो. व जे जे नवीन नवीन अधिकारी येतात ते ते लोकस्वातंत्र्याचे अधिकाधिक भक्त असतात. लोकस्वातंत्र्याचा नेहमीं घोष करणारीं अशीं वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें व इतर शेंकडों ग्रंथ नेहमीं छापून प्रसिद्ध होत असतात; व यामुळें दिवसेंदिवस लोकांच्या स्वातंत्र्याच्या रुची अधिकाधिक दृढ व प्रस्फुरित होत चाललेल्या दिसतात.

५. अशा गोष्टींचें नांव देखील घेणें नको. लोकमताला कोणी विचारीत नाहीं व जो कोणी असलें लेखनस्वातंत्र्य भोगूं म्हणेल तो राजद्रोही ठरून, दरबाराकडून होणाऱ्या शासनास मात्र पात्र ठरेल! स्वातंत्र्योपदेशाचें जें मुख्य साधन वर्तमानपत्र तें काढण्याची परवानगी तर कधींच कोणताही राजा देणार नाहीं. हल्लींच बडोद्याकडे बघा: प्रस्तुतचे बडोद्याचे महाराज नवीन शिक्षणाचा संस्कार झालेले, नवीन इंग्रजी राज्यरीतीचें अनुकरण करणारे आणि इंग्रजी मुलखाप्रमाणें आपल्या प्रांतांत सुधारणा करूं इच्छिणारे असे आहेत ना? परंतु ते तरी कोठें लोकांना आपलें विचारस्वातंत्र्य भोगूं देण्याची इच्छा करीत आहेत? सर्वत्र मुख्याबहिऱ्यांचा कारभार पहिल्यापासून चालत आलेला, तसाच पुढेंही चालू ठेवण्याची आपलपोटी बुद्धि. एकटा राजा, व त्याची इच्छा जें करील तें प्रमाण!

६. कायदाकानू ह्यांचेकडे राज्यकर्तृत्व, कवाइती व योग्य लष्करी शिक्षण मिळालेल्या फौजेकडे राज्यरक्षण; आणि इस्पितळें, दवाखानें व डिस्पेन्सऱ्या हीं औषधालयें स्थापून त्यांजवर मोठमोठे जे चतुर व अनुभविक डाक्तर नेमिले असतात त्यांचेकडे राज्यांतील प्रजेचें आरोग्य; अशी महत्वाच्या कामाची वांटणी केलेली असते.

६. राजाच्या मर्जीकडे किंवा तदिच्छाधीन राज्यकर्तृत्व; विदेशीय माणसें, मानकरी, आप्तसोयरे व पदरची मंडळी ही राजरक्षण करणारी फौज; आणि घरोघर वैद्य. यामुळें लोकांच्या आरोग्याची जबाबदारी ज्याचे त्याचेवर. तिकडे राजाचें लक्ष कदापि जावयाचें नाहीं. वरील प्रकारची इंग्रजीपेक्षां अगदीं

व यामुळें तीं तीं कामें अबाधित व व्यवस्थेनें चालतात.

७. सर्व कांहीं लोकांकरितां आहे. सरकार म्हणजे, लोकांची इच्छा, त्यांचें हित, कल्याण आणि बरेपणा हीं अमलांत आणणारी कोणी श्रेष्ठ मंडळी. इतकेंच समजलें जातें. आणि, अमुक वस्तु सरकारी अशी म्हटली म्हणजे ती सर्व लोकांची आणि लोकोपयोगाकरितांच केलेली व राखून ठेवलेली, असें मानलें जातें. आणि असें मानलें व समजलें जावें म्हणून एकंदर सरकारी कामाकाजाला व वस्तुस्थितीला ‘ पब्लिक ’ ( लोकांचें ) असें विशेषण दिलेलें असतें. तेथें खाजगी म्हणून कांहीं एक नाहीं. जें काय आहे व असेल तें सर्व लोकांचें. त्यावर व्यक्तीचा अधिकार व हक्क नाहीं.

८. सर्वांनीं उद्योगी व रोजगार धंद्यांत गुंतलेलें असावें अशा प्रकारची राज्यव्यवस्था असल्यामुळें कोणीही रिकामा आढळावयाचा नाहीं. उद्योग-व्यवसायाशिवाय निर्वाह चालवणेंच संभाव्य नसतें; आणि याकरितां जो तो आपल्या पुढील व्यवस्थेवर धोरण ठेवून त्या त्या मानानें शिक्षणादिकांची तजवीज

वेगळी तऱ्हा असल्यामुळें, देशी राजांच्या कारभारांमध्यें क्षणभंगुरत्व विशेष आहे.

७. अशी गोष्ट देशी राज्यांत कदापि मानली जाणार नाहीं. दोन खातीं मुळींच नसून, त्यांतही खाजगी किंवा खानगी खातें म्हणजे, केवळ व्यक्तिविशेष राजाच्या हक्काची म्हणून कांहीं वेगळीच व्यवस्था केलेली असते. बाकी तरी, जें कांहीं राज्यांत म्हणून आहे तें सर्व राजाचेंच असें मानलें जातें. लोक म्हणजे कोणी नव्हेत. ते आपले करभार देण्याचे मालक. परंतु, त्या करभाराचा उपयोग आपणां-संबंधी व्यवस्था राखण्यांतच होतो का दुसऱ्या कोणीकडे त्याचा उधळपट्टीनें खर्च होतो, याबद्दल कोणीही तपास करणार नाहीं; व तसा कोणलाही अधिकार व हक्क पोहोंचत नाहीं ! अर्थात् राजा हाच काय तो सर्व धनैश्वर्याचा मालक. मग तो आपल्या अमलांतील लोकांचा धनी म्हणा, त्यांच्या बऱ्यावाईटाकडे पाहून योग्य व्यवस्था करूं इच्छिणारा उदार स्वभा-वाचा दाता म्हणा, अथवा तो आपल्या अमलांतील प्रजारूप गुलामांचा मालक म्हणा. सर्व कांहीं करणारा तो मालक व सर्व वस्तुमात्राचा तो धनी, असें समजावयाचें !

८. लोक बेफिकीर असतात. उद्योगधंद्यांवांचून रिकामे लोक फार. तथापि त्यांचा देशी राज्यामुळें निर्वाह चालतो. रोजगार व नौकऱ्याचाकऱ्या तरी मिळणार कोठून व कशा ? गुणांची पार-खच नाहीं. अमुक गुणाच्या मनुष्याकरितां अमुक काम नेमलेलें आहे, असा कांहींएक धरबंद नसल्यामुळें, तेथें गुणवत्वसंपा-

लावीत असतो.

दनाची कोणासच इच्छा, काळजी व फिकीर नाहीं. खावें, प्यावें आणि आयुष्याचे कसे तरी दिवस काढावे, अशी पशुवृत्ति फार आढळते !

९. हरएक कामदारास त्याचेवर त्याचे कामाचे संबंधानें विचारपूस करणारा कोणी तरी वरिष्ठ आहेच. व ह्याप्रमाणें शेवटच्या पायरीवर असणाऱ्या श्रेष्ठ सरकाराजवळून त्याच्या कामाचा हिशेब मागण्याचा लोकांस अधिकार असतो. यामुळें, जो तो आपलें काम लक्ष्य लावून बिनचूक होईल अशाविषयीं खबरदारी बाळगितो. तसेंच सरकारचें धोरण, लोकांनी अमुक कामाविषयीं तपशील व हिशेब मागितल्यास त्याबद्दलची सावधगिरी ठेवून अगोदरपासून आपल्या एकंदर कामाच्या हकीकतीचे वार्षिक रिपोर्टांत चोखपणा राखण्याकडे असून, त्याविषयीं तें फार काळजी बाळगीत असतें.

९. इंग्रजी कारभारासारखा चोखपणा आणि सावधगिरी तर कोणाही कामदारामध्यें असलेली दिसत नाहीं. कारण, त्यांना आपल्या वरिष्ठांचा कडक हुकूम आणि वचक नसल्यामुळें त्यांचा बेबंद आणि मनस्वी कारभार चालत असतो; आणि शेवटील पूर्णाधिकाराची पायरी म्हणजे खुद्द गादीवरील महाराज. ते तर स्वतंत्रतादेवीचे प्रत्यक्ष पुतळेच. त्यांना आपल्या कामाचा व कारभाराचा कोणालाच हिशेब आणि तपशील द्यावयाचा नसतो; व त्याबद्दल त्यांना कोणाचीही फिकीर बाळगावयाची नसते. तेव्हां, दिवाणी, फौजदारी व मुलकी या सर्व खात्यांतून ज्या अनास्था, बेपर्वाई आणि बेदादी चालू असतात त्या अतोनातच. इतकें मात्र आहे कीं, कांहीं राजकीय प्रकरण असून त्या संबंधाची चौकशी न केली तर खुद्द-इंग्रजसरकारच्या श्रेष्ठपणास कमीपणा येण्यासारखा कांहीं प्रकार असल्यास, त्याबद्दलची तपासणी व जाब मागण्यास इंग्रजसरकारच्या मार्फतीनें त्यांचा रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट म्हणून प्रत्येक संस्थानावर एक गोरा अधिकारी असतो, व तो त्याबद्दलचा काय तो खुलासा आणि तपसील विचारणारा असतो.

१०. इंग्रजी राज्याची रचना व त्या राज्यरचनेस कायदारज्जूनें केलेली जखडबंदी हीं अशीं कांहीं उत्तम असतात कीं,

१०. राज्याच्या स्वेच्छेनें कारभार चालत असल्यामुळें व त्यास कायम अशा कायद्यांचें बंधन नसल्यामुळें, देशी राज्य-

त्यांतून कोणाही अधिकाऱ्यास आपल्या मतानें आणि स्वेच्छेनें काडीभर इकडेतिकडे हालचाल करितां येत नाहीं. त्याचप्रमाणें ती राज्यरचना आणि कायदेकानू छापून प्रसिद्ध केल्यामुळें तें राज्यतंत्र आणि तो कारभारक्रम सर्व लोकांस समजण्याला मार्ग असतो. पुढील कामदार येतो तो मागील छापील वहिवाटीप्रमाणें (कायद्याप्रमाणें) आपला कारभार चालवितो. त्या वहिवाटींत यत्किंचित्‌ही फेरफार करण्याचा त्याला हक्क व मुखत्यारी नसते. सर्व कामदार सख्यभावानें आणि प्रेमानें एकमेकाशीं वर्तन ठेवितात. त्यांचें परस्परांचें अधिकारसंबंधानें कोणत्याही प्रकारचें वैर नसून, ते कधींही एकमेकांचा मत्सर करीत नसतात. एकमेकांच्या कामास मान देऊन, त्या परस्परांचा परस्परांनी अभिमान धरावा, अशी वहिवाट असलेली सर्वत्र दृष्टीस पडते. क्वचित् कोठें यामध्यें अपवादरूप भेद दिसला तर तो नेटिव कामदारांच्या आचरणांत दिसेल व तो तसा दिसला तर ती त्यांच्या बुद्धीची नीचता होय. बाकी इंग्रज कामदार एकमेकांकरिता जीव देतील. कधीं कोणी कोणाचा अपमान करणार नाही व आपल्या अगोदरच्यानें अमुक काम असें गैरशिस्त आणि चुकीचें केलें असें कोणी कोणास बोलणार नाहीं. कारण, तसें म्हणण्याचा अधिकार त्यांस कायद्यानें येत नाहीं. प्रत्येकावर त्याच्या कामाला पसंत किंवा नापसंत करणारा वरिष्ठ कामदार असतोच. परंतु समानाधिकाऱ्यानें आपल्या हुशारीचा आणि विद्वत्तेचा आपल्या बरोबरीच्या कामदाराशीं डौल मारणें हें कदापि कोणाला

काभारांत एकाच्या अमलांत अनेक फेरबदली होऊन जातात, यामुळें लोकांना कोणत्याही कारभारासंबंधांत संस्थानिकांच्या ठरावांचा व नियमांचा भरंवसा न येतां त्यांच्या जीवास स्वस्थता व बेफिकीरी राहत नाहीं. बरें, जे नियम किंवा ठराव होतील किंवा बदलतील ते छापून लोकांमध्यें त्यांची प्रसिद्धि करण्याचीही रीति आणि वहिवाट नसल्यामुळें त्या संबंधानें लोक अगदी अज्ञान व अजाण असतात. एतावता, देशी राज्यांतील कारभार म्हणजे केवळ तोंड बांधून बुक्क्यांच्या माराप्रमाणें असतो ! कोणालाही त्याबद्दल बोलतां येत नाहीं. आलीकडे, कोणी राजपुत्र अज्ञान असला तर इंग्रज सरकारच्या वतीनें तेथें कोणी हुशार व समंजस कारभारी किंवा दिवाण नेमून त्याच्या हातें सरकार इंग्रजींतल्याप्रमाणें सर्व व्यवस्था व बातबेत ठेवितें. परंतु पुढें राजपुत्र वयांत येऊन आपल्या मुखत्यारीनें राज्यभार चालवूं लागला कीं, पुनः सर्व गाडें फिरून पहिल्या जुन्या व स्वेच्छ कारभारावर त्याच्या कारकीर्दीचें धोरण जातें. सर्व कामदार एकमेकांविषयीं मत्सरी आणि निरभिमान असतात. जो तो आपल्या शहाणपणाचा दिमाख मिरवूं लागतो. मी काय तो शहाणा व मी करीन तेंच सुव्यवस्थित, असा त्याला मोठा गर्व असतो. कारण, त्याच्या शहाणपणाला मर्यादाच नसते; व तो करील तें त्याच्या मुखत्यारीवर असतें. ह्याप्रमाणें इंग्रजीपेक्षां देशी राज्यांतील कारकीर्दीमध्यें मोठी तफावत आहे. सर्व कामदार एकमेकांचा अपमान व घात करण्याविषयीं इतके उद्युक्त असतात कीं,

सहन होणार नाहीं.

११. हलकट, अविद्वान् आणि कार्यसाधु अशा लोकांना इंग्रजी कारभारांत थारा न मिळतां, त्यांचे निर्वाह अत्यंत कष्टतर व विवंचनेनें चालतात; आणि कदाचित् सरकारच्या नौकरींत असून जे हलकट व नीच स्वभावाचे असतील त्यांजकडे सरकारच्या मोठ्या हुद्याचीं आणि मुख्याधिकाऱ्यांचीं कामें कधींही देण्यात येत नाहीत.

१२. इंग्रज सरकारच्या कीर्तिवैभवाचा मत्सर करणारे जगावर किती देश आहेत व त्यांचा ससेमिरा त्यांच्या मागें नेहमीं असतांही ते आपल्या मुलखांत शांतता व व्यवस्था ठेवण्यास सर्वदा

ते त्या संबंधानें वाटतील तशीं नीच कामें करण्यास प्रवृत्त होतात. त्यांच्यामध्यें दुफळ्या तर इतक्या माजलेल्या असतात कीं, मार्जारमूषकवत् त्यांची स्थिति असते. परभूंनीं ब्राह्मणांस पाण्यांत पहावें. कऱ्हाड्यांनीं कोंकणस्थांचीं व्यगें शोधावीं, आणि एका मराठ्यानें दुसऱ्या मराठ्यास विघ्न आणावें. ह्याप्रमाणें एक का अनेक भेदभाव सर्व खात्यांतून व दर्ज्यांतून दृष्टीस पडतात. एकमेकांचा पक्ष घेऊन एकमेकांविषयीं अभिमान, प्रेम व बंधुत्व बाळगतील ही गोष्ट तर कधीं कोठेंही आढळावयाची नाहीं.ज्याचे त्याचे जातिजातीप्रमाणें निरनिराळे जथे व पक्ष दृष्टीस पडतात व ते मात्र आपापल्या जथ्यांतील मनुष्यांविषयी जपतात व काळजी बाळगतात. असा नीचतेचा व हीनतेचा प्रकार इंग्रजीमध्यें फारच क्वचित् आढळेल.

११. हलकट, अविद्वान् आणि कार्यसाधु अशा लोकांना देशी राज्यांत अवश्य आश्रय मिळावयाचा.व त्यांचा जसा तेथें डौल आणि मिजास असते तसा डौल आणि मिजास, सभ्य, सुशील, सद्वर्तनी आणि कर्तव्यनिरत अशा सात्विकवृत्तीच्या मनुष्याचे कांही एक तेज पडत नाहीं. सर्वत्र नीच लोकांचें प्राबल्य विशेष आणि तेच राजाचे मंत्री व प्रीतिपात्र होऊन बसतात; यामुळे शहाण्या लोकांचें मोल तेथें कोणीच जाणत नाही !

१२. कोणत्याही प्रकारचा व्याप, ताप व धाक किंवा धास्ती नसून, त्याबद्दलची सर्व जबाबदारी सार्वभौम इंग्रज सरकारनें आपल्या शिरावर घेतली असतां आपल्या शांत व निरुपद्रव अमलांत

तत्पर व सावध राहून आपल्या अमलाचें व वैभवाचें उत्तम रीतीनें रक्षण करितात. रयतेला अज्ञान न ठेवतां, ती दिवसेंदिवस पुढें पाऊल टाकीत जाऊन शहाणपणांत व उद्योगांत आपल्या बरोबरीला येऊन पोंचावी अशी इंग्रजसरकारची इच्छा असते. त्या सरकाराला केवळ आपली बडेजावी व्हावी एवढेंच अप्पलपोटेपणाचें कर्तव्य आहे असें वाटत नाहीं. अशी त्यांची बुद्धि उदार असते.

तशा स्थितींत असतांना ज्या लोकसुधारणेच्या व दुसऱ्या अनेक महत्वाच्या गोष्टी करावयाच्या, त्या देशी राजांकडून होत नाहींत. त्यांच्यावर काय तो रेसिडेंट किंवा पोलिटिकल एजंट पाहणीदार असतो; परंतु त्याच्या पाहणीचा लोकसुधारणांना व तशाच महत्वाच्या गोष्टींना कधींच प्रतिबंध नसतो. तथापि देशीराजांकडून तीं कर्तव्यें बजावलीं जात नाहींत. ज्ञानांत, पराक्रमांत व लौकिकांत आपले लोक पुढें पडावे हें त्यांचे ध्यानांतही नसतें. त्यांची स्वत:ची प्रतिष्ठा व मान राहिला म्हणजे तेवढ्यांत ते तृप्त असतात. आपल्या रयतेस उच्चता आणण्याइतकी त्यांची बुद्धि सुसंस्कृत आणि उंच प्रतीला पोंचलीच नाहीं.

१३. कड व पक्षपात या गोष्टींचें वारें इंग्रजी राज्यांत नसावयाचें असा मूळ सरकारचा हेतु आहे; व त्याप्रमाणेंच बहुतकरून अंमलबजावणी चालू आहे. सरकारांत कोणाची शिफारस चालावयाची नाहीं. व कोणाचा अपमान व्हावयाचा नाहीं. रीतीप्रमाणें विद्वान् व गुणी लोकांची बूज राखली जाऊन, अविद्वान् व अक्षरशत्रु यांना इंग्रजसरकारांत मुळींच थारा मिळत नाहीं. सर्वांचें म्हणणें ऐकून घ्यावयाचें, हा गुण तर इंग्रजसरकारचा फारच प्रशंसनीय आहे; आणि तें सर्वांचें म्हणणें कळविण्याचें काम वर्तमानपत्रें व अनेक सभा चोख रीतीनें आणि अत्यंत स्वतंत्रतेनें करीत आहेत. हा भाग इंग्रजीराज्यांत विशेष आहे. इंग्रजसरकारास कोणाचा पाश नाहीं. त्यांचें करणें म्हणजे विचारपूर्वक, गंभीरतेनें व शांतपणें

१३. कड व पक्षपात यांचें मूलबीज म्हटलें म्हणजे देशी राज्यांतच उत्पन्न होऊन तेथेंच त्याची लागवड होते; आणि हळू हळू त्याचे मोठेमोठे वृक्ष होऊन त्यांचे छायेखालींच सर्व देशी राज्यें वसलेली असतात ! शिफारशी आणि आपपरपणा समजणें, हें काय तें गुणपरीक्षण. त्या गुणपरीक्षणाप्रमाणें कोणाचा मान व बूज रहावयाची ती राहते. लोकांचें म्हणणें ऐकून घेण्याची कल्पनाच नाहीं. मग अत्यंत स्वातंत्र्य भोगणारीं वर्तमानपत्रें व उघड रीतीनें राज्यकारकीर्दीवर टीका किंवा विचार करणाऱ्या सभा, अशा लोकोपयुक्त आणि लोकस्वातंत्र्यवर्धक साधनांचें तर देशी राजे बीजच पडूं द्यावयाचे नाहींत. अशा गोष्टींना थारा देणें म्हणजे आपल्या राज्याचें व परंपरेच्या अधिकाराचें वाटोळें किंवा

करावयाचें असतें. त्याजवर आपस्वार्थी व मतलबी लोकांचें वजन किंवा दाब मुळींच नसून, जें व्हावयाचें तें यथान्याय मार्गानेंच होतें व तशा यथान्याय मार्गानें वागून मिळणारें यश तें सरकार भोगीत आहेच.

१४. विद्यावृद्धि, विद्याशाला, नानाप्रकारच्या सोई, शहरसुधारणा, म्युनिसिपल कमिटीकडील व्यवस्था, पुस्तकालयें (लायब्ररऱ्या), दवाखाने (हॉस्पिटलें) वगैरे गोष्टींकडे इंग्रज सरकारचें विशेष लक्ष असून, त्या गोष्टींची वारंवार पाहणी करण्यास सरकारनें त्या कामावर मोठेमोठे स्वकार्यनिरत पाहणीदार नेमिलेले असतात; व शिवाय, गव्हर्नरापर्यंतचे लहान मोठे अधिकारी वारंवार त्या सर्व गोष्टींवर व खात्यांवर आपली देखरेख ठेवीत असतात. यामुळें त्या त्या गोष्टी व तीं तीं खातीं सर्व सुयंत्र व लोकांना अत्यंत उपयोगी अशीं आपापल्या स्थितींत असतात.

नायनाट करण्यासारखेंच आहे असें ते समजतात. आपल्या शेजारीं किती चांगल्या रीतीनें इंग्रज सरकारचें राज्य चाललें आहे हें जाणून त्यांचें अंशतः देखील अनुकरण करण्याचें ज्ञान व इच्छा एतद्देशीय राजांमध्यें नाहीं. त्यांचे भोंवतीं जें स्वार्थी लोकांचें कडाळें असतें, ते स्वार्थी लोक राजाची भेट देखील होऊं देत नाहींत. तशी कोणाची भेट होऊं दिली तर राजाची बुद्धि फिरून, आपला आश्रय तुटून कदाचित् आपला घात होईल, अशी भीति त्या राजाच्या सभोंवतालच्या स्वार्थी लोकांस असतें; आणि यावरून ते राजेही इतक्या हलक्या कानाचे असतात कीं, त्यांस स्वतःचा विचार म्हणून नसतोच!

१४. ह्या गोष्टींचा देशी राज्यांत गंधही नसतो. आतां आलीकडे, इंग्रजसरकारच्याच नेटानें किंवा तसें करण्यास सरकारानें भाग पाडल्यामुळें ह्या देशी राजांनीं दवाखाने व शाळा स्थापन केल्या आहेत; व त्याकरिता भपकेदार इमारतीही बांधलेल्या असतात. परंतु हा सर्व प्रकार केवळ सरकारच्या समजुतीकरितां आणि इमारतींचा डौल दाखविण्याकरितांच त्यांजकडून होतो. त्या गोष्टींची त्यांना मनापासून हौस व इच्छा म्हणून मुळींच नसते विद्यादेवीला देशी राज्यें म्हणजे अज्ञात प्रदेश! तेथें ती गेली तर तिला पावलोपावलीं ठेंचा लागून, तिला आपला मार्ग काढण्यास सुचावयाचेंच नाहीं. यावरून, पुढें पुस्तकालयांचें नांवच घेणें नको. कोणत्याही राज्यांत तेथील राजानें हौसेनें मोठालीं पुस्तकालयें स्थापिलीं असून, त्याची पुस्तकवाचनाची अभिरुची वाढल्या

3129

१५. वसुलाचे जमाखर्च सरकारच्या मुख्य पार्लमेंट सभेला दाखवावे लागतात; त्यामुळें रयतेला त्याचे संबंधाने विचार करण्यास सांपडतें. आतां, त्यामुळें म्हणजे सर्व जमाखर्चाच्या बाबी व कलमें वाजवीच असतात असें नाहीं; तथापि, रयतेला विचार करण्याची व त्यामध्यें लक्ष घालण्याची फुरसद होते, हा विशेष गुण समजण्यासारखा आहे.

१६. परशत्रूंची भीति आणि रयतेच्या संरक्षणाचें जोखीम या गोष्टी इंग्रज सरकारच्या वाट्यास विशेष असल्यामुळें, त्याला लष्करी खात्याकडे विशेष धोरण ठेवावें लागून, तत्संबंधाचा खर्च त्याला फार सोसावा लागतो.

१७. इंग्रजांचे सर्वच कायदेकानू चांगले व रयतेला सुखावह आहेत

प्रमाणांत असलेली कोठेंही दृष्टीस पडावयाची नाहीं, आलीकडे राजांचीं मुलें कोठें इंग्रजी 'यस्' 'नो' शिकूं लागलीं आहेत. परंतु तो अभ्यासही म्हणण्यासारखा त्यांजकडून होत नसून, त्यांचें लक्ष सर्वदा आपल्या संपत्तिवैभवाकडे व तद्नुरूप डामडौल-आणि-विलासोपभोगांकडे असलेलेंच आढळतें. लोकांमध्यें ज्ञानप्रसार करण्यासाठीं त्यांना विद्यादान देण्याचें त्यांच्या स्वप्नांतहीं न येतां त्यांचें ध्यान मन नेहमीं माणिकमोत्यें आणि सोनें-चांदी यांचे अलंकार व दागिने यांचेकडे ओढलेलें राहतें.

१५. आपण वसूल कसकसा व किती घेतला, त्यापैकीं रयतेच्या सुखाकडे किती खर्च केला व स्वतःचे च्छानच्छोकीकडे काय खर्च झाला, हें रयतेस कळविणें हा आपला धर्म आणि कर्तव्य आहे, असें देशी राजांचे मनांत कधीं तरी येतें काय? त्यांस आपलें राज्य म्हणजे आपली वडिलोपार्जित मिरास आहे, तींत रयतेचा कांही संबंध नाहीं, असें वाटतें.

१६. अशा प्रकारचा अवाढव्य खर्च देशी राजांना करण्याचें कांहीं एक कारण नसून त्याकरितां इंग्रज सरकाराप्रमाणें कर्जें काढण्याचेही प्रसंग त्यांस येत नाहींत. परंतु या शांतिस्वास्थ्याचा फायदा आपल्या रयतेस देण्याकडे त्यांचे चित्त ओढत नाहीं हें स्वराज्यांतील रयतेचें दुर्दैव होय. ह्या शांतिस्वास्थ्यानें वांचलेलें द्रव्य लोकोपयोगीं पडावें; परंतु तसें न होतां तें भलत्याच कामांत खर्च होतें!

१७. देशी राज्यांत ठरींव कायदे असे मुळींच प्रसिद्ध नसतात. तथापि, इंग्रजींत

असें नाहीं. कांही कायदे चांगले आहेत व कित्येक कानू त्रासदायक आहेत.

जे वाईट व जुलमी कायदे असे मानिले व समजले जातात त्यांचें अनुकरण मात्र यथाप्रत होतें. स्टँपाचा कर जो इंग्रजी-राज्यांत फार जुलमाचा आहे, त्याची नक्कल बहुतेक देशी राजांनीं उचलली आहे. बाकी चांगल्या कायद्यांची नक्कल उचलण्याची जणूं काय त्यांस शपथच असते !

१८. कर, पट्ट्या, जकाती व दस्तुऱ्या वगैरे सरकारदेण्याचें बंड इंग्रजी-अमलांत रयतेला वाजवीपेक्षां फाजील सोसावें लागतें; व या संबंधानें रयतेला नाखुष ठेवणें हें इंग्रजी राज्याला मोठें दूषण आहे.

१८. देशी राज्यांत सरकारदेण्याचा जुलुम इंग्रजी राज्याइतका नसल्यामुळें, त्या कलमांत रयत फार सुखी असते; व हा देशी राज्यांतला गुण उलट इंग्रज सरकारानें अंशत: तरी घेण्यासारखा आहे.

१९. कलेक्टर, कमिशनर अथवा गव्हर्नर वगैरे अधिकाऱ्यांच्या स्वाऱ्या आपापल्या प्रांतांत फिरणें प्राप्त आहे व त्याप्रमाणें ते अधिकारी फिरावयास निघतात. परंतु त्यासंबंधानें त्यांच्या स्वारीचा लवाजमा अगदीं बेताचा असून, ते त्याबद्दलचा खर्च लोकांवर फारसा पडूं देत नाहींत. इंग्रजींत अधिकाऱ्यांचा साधेपणा फार असतो. डौल व भपका दाखविण्याकडे त्यांचें धोरण नसतें. यामुळें फाजील खर्च न होतां, लोकांवरही खर्चाचें ओझें फारसें लादलें जात नाहीं.

१९. देशी राज्यांच्या स्वाऱ्या आपल्या प्रांतांत फिरावयास निघाल्या म्हणजे त्यांचा लवाजमा फार मोठा असून, त्याबद्दलचा व्यर्थ खर्च फार होऊन लोकांस त्यापासून अतिशय त्रास भोगावा लागतो. राजे लोकांना साधेपणा तर माहितच नाहीं. भपका, डामडौल आणि लवाजमा यांशिवाय त्यांचें राज्यत्वच नाहीं असें त्यांस वाटतें. आणि लोकांची तरी अभिरुचि, त्याच प्रकारची झालेली दिसते. कोणाजवळही मोठा परिवार आणि पुष्कळ माणसेंकाणसें नौकरी-चाकरीस असल्याशिवाय त्यांची श्रीमंती व मोठेपणा दिसत नाहीं, अशी लोकांची समजूत आहे. व हे सर्व भिकार चाळे आहेत हें आतां सर्वांस कळूं लागलें आहे. परंतु त्यापासून कोणी परावृत्त होत नाहींत, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे !

२०. अनुभविक व वृद्ध यांचा मान जास्त असून, त्यांच्या नजरेखालीं तरुण

२०. परंपरेच्या व पिढीजाद अधिकाराची रीति सुरू असल्यामुळें, वृद्ध,

मंडळी त्यांच्या हुशारीप्रमाणें व अकले-प्रमाणें लहान मोठ्या अधिकारावर असते परंपरेनें अधिकार ठेवण्याची रीति इंग्रजी-मध्यें मुळींच नसल्यामुळें सर्व प्रकारचे कारभार हुशारीनें, नेटानें आणि व्यव-स्थितपणें चालतात. अज्ञान, अननुभूत आणि हूड अशा तरुण संततीकडे लोकांवर अम्मलबजावणी करण्याचे अधिकार न देण्याविषयीं सरकारचें विशेष धोरण असतें. त्याचप्रमाणें अक्कल हुशारी बघून त्या मानानेंच अधिकारदान होत असतें. 'बडे बापके बेटे' म्हणून तो शंखशिरोमणि असला तरी त्याजकडे एखादा अधिकार मिळेल ही आशा व्यर्थ आहे. गुण दाख-वून अधिकारमान मिळवावा, हें इंग्रजींतील मुख्य कलम. निर्गुणी व बेअकली अशा मोठ्या कुळांतल्याही संततीला इंग्रजींत कधीं कोणी पुसत नाहीं.

अनुभविक आणि विचारी असे अधिकारी खालीं राहून त्यांचे डोक्यावर तरुण, अननुभूत व हूड मुलें आपल्या वडिलांच्या मोठमोठ्या जबाबदारीचे अधिकारांवर हक्कानें येतात. यामुळें वृद्धांची बूज व मान न राहून रयतेचेंही कल्याण होत नाहीं. आणि त्यामुळें राज्यकारभारांत जितका शहाणपणा व अनुभव पाहिजे तितका शहाणपणा व अनुभव न येऊन, लोकस्थिति कधींही सुधारली जात नाहीं. वंशपरंपरेच्या व कुलपरंपरेच्या अधिकार-दानानें तर देशी राज्यांत अगदींच मातेरें करून टाकलें आहे! राजा परंपरेचा, किल्लेदार पिढीजाद, पारख, मुत्सद्दी, सर-दार, स्वार वगैरेंसुद्धां वंशपरंपरेचेच. यामुळें त्या त्या कामांतील गुणवृद्धीचें नांव देखील घेणें नको. सर्वत्र सुस्तपणा वा आळशीपणा भरलेला दिसतो. आणि खरेंच; कांहीं एक गुण किंवा पात्रता दाखविल्याशिवाय बिनबोभाट मोठमोठे अधिकार जर केवळ परंपरेनें आपल्याकडे येताहेत, तर त्यांनीं तरी आपल्या गुण-संपादनांत श्रम करावे कशाला? हें उघडच आहे.

२१. सर्वत्र बुद्धीचा विकास होऊन विचार आणि ज्ञान यांची दिवसेंदिवस वृद्धि आहे असें अनुभवास येतें. याचें दर्शक प्रतिवर्षी जो नवीन नवीन ग्रंथसंग्रह बाहेर पडत आहे तोच असून, तें इंग्रजी राज्यास मोठें भूषण आहे. विद्वान् ग्रंथकर्त्यांची इंग्रजीमध्यें मोठी मान्यता असून, त्यांना सरकार व सरकारची विद्याव्यसनी रयत यांजकडून यथाशक्त्या आश्रय व उत्तेजन मिळत असल्यामुळें ग्रंथकारांची संख्या प्रतिवर्षी जास्त जास्त वृद्धिंगत होत आहे.

२१. बुद्धीचा विकास होऊन विचार व ज्ञान यांची वृद्धि होण्यास अवकाश नसल्यामुळें व तिकडे देशी राजांचें बिलकुल दुर्लक्ष असल्यामुळे उभ्या वर्षांत एकही ग्रंथ त्यांच्या रयतेपैकीं कोणाकडून होत नाहीं. स्वत: राजे अल्पवयी व निर्बुद्ध असल्यामुळें आणि मनस्वीपणानें, विपरीत आचरणानें व स्वेच्छेनें चालण्याचीच त्यांना संवय अस-ल्यामुळें त्यांजकडून आपल्या रयतेमध्यें विद्याज्ञानप्रसाराची आणि तद्दर्शक नूतन

त्याचप्रमाणें बहुतेक लोकांचें लक्ष विद्याज्ञानप्रसाराकडे विशेषेंकरून गुंतल्यामुळें त्यांना इतर रिकामपणाचे उद्योगव्यवसाय करण्यास फावत नाहीं, हा तर मोठाच फायदा आहे.

ग्रंथवृद्धीकडे लक्ष देण्याची स्फूर्तिच त्यांस होत नाहीं. लोकांना स्वतः विद्याज्ञानप्राप्तीची इच्छा व्हावी, तर तसें करण्यास त्यांना सुचत नाहीं. कारण, तद्विषयक राजांचे औदासिन्यामुळें तसें करून त्यांना फायदा दिसत नाहीं; नेहमीं हांजी हांजी व महाराज महाराज करून असलें म्हणजे त्यांत जो त्यांस महाराजांकडून फायदा होतो तो, बुद्धिज्ञानाच्या विकासानें होण्याचें चिन्ह दिसत नाहीं. आणि यामुळें लोक आपले आयुष्याचा काळ कसा तरी आळशीपणांत आणि असदाचारादि दुर्वृत्तींत घालवितात !

२२. यंत्रादिकांचा भरणा इंग्रजी अमलांत फार होऊन लोकांमध्यें उद्योग व कौशल्य फार वाढत चाललेलें दिसतें. म्हणजे, ते उद्योग व्यवस्थितपणें चालावे अशी सरकारची व्यवस्था आणि उत्तेजन रयतेला मिळत असल्यामुळें, लोकांचेंही यांत्रिकवृद्धीकडे आणि अनेक कारखाने काढण्याकडे विशेष लक्ष आणि ओढ दिसते. व्यापारवृद्धि होऊन तिला सौरक्ष्य मिळण्याकडे सरकारचें विशेष धोरण असल्यामुळें सरकारानें तशा प्रकारचे कायदेकानू करून, कोणी कोणाचे कामांत आडवें येऊन, त्याचे व्यापारोद्योगास हरकत करूं नये असा बंदोबस्त केलेला आपण सर्वत्र पाहतों. तेणेंकरून देशाचें दिवसेंदिवस बऱ्याच अंशांनीं कल्याण होण्याचा संभव आहे. इंग्रजीवांचून अशा कृत्यांचा आणि उद्योगांचा संभव कमीच होता, असें निष्पक्षपातानें कोणीही कबूल करील.

२२. व्यापारोद्योगांचा अभाव हें तर देशी राज्यांचें मुख्य लक्षण ! तेथें यंत्रादिकांचा भरणा कोठचा ? आणि कलाकौशल्याची वृद्धि कोठची ? राजे व त्यांची प्रजा यांनीं आपल्याजवळ असेल त्यावर चैना व मौजा करून काल घालवावा, यापलीकडे त्यांस दुसरें कांहीं माहित नसतें. त्याचप्रमाणें कोणी कांहीं स्वतंत्रोद्योग करण्याचें मनांत आणलें तर त्या उद्योगाचें संरक्षणाची आशा देशी राज्यांत मुळींच नाहीं. हेव्यानें व मत्सरानें त्या उद्योगी मनुष्यास बहुत लोक हरकती व अडचणी आणण्यास प्रवृत्त होतील; परंतु त्यांना प्रतिबंध करण्यास देशी राजांचे कडक व आस्थेचे असे कायदे व ठराव नसल्यामुळें कोणासच यंत्रादि आणून कारखाने काढण्याची उमेद आणि हौस येत नाहीं. सारांश, ज्या गोष्टींत राज्याधिकारी पुरुषांनीं विशेष लक्ष घालून उत्तेजन दिलें पाहिजे, त्या गोष्टी सर्वथैव पडून राहून, त्या संबंधानें देशाला मोठें नुकसान सोसावें लागतें; परंतु त्याबद्दल

२३. अनेक प्रकारचे शोध आणि अनेक प्रकारचें ज्ञान यांजकडे लोकांचे लक्ष्य अतिशयच वेधलेलें दिसतें. प्राचीन शोध व तपास काढणारे ( आंटिक्वेरियन् ), भूगोलशोधक मंडळ्या ( जॉग्रफिकल सोसायटीज् ), सर्व ग्रंथसंपादक मंडळ्या ( एशियाटिक सोसायटीज् ) इत्यादि महाविद्वान् लोकांच्या सभा व परिषदें यांनीं इंग्रजी राज्याचें महत्व इतकें कांहीं वाढविलें आहे कीं, तें अवर्णनीय झालें आहे. आणि अशा लोकांकडून जें नवीन नवीन ज्ञान, जे नवीन नवीन शोध आणि जे अनेक इतिहास आपल्या देशांत सर्व भाषांमधून पसरत आहेत, त्या चांगुलपणाच्या यशाचें भोक्तृत्व इंग्रज सरकारच्या राज्यांशिवाय कोणाकडे हक्कानें जाऊं शकेल ? श्रुति, स्मृति व पुराणें जी लोकांस अज्ञात होतीं, त्यांचे दरोबस्त भराभर तर्जुमे होऊन, ते लोकांस स्वल्पांत मिळूं लागले व त्यांतील ज्ञान त्यांस अल्पायासानें मिळण्याच्या सोयी झाल्या. हे फायदे देशी राजांकडून होण्याचा संभव होता काय ?

२४. कर्ज काढण्याचा प्रसंग आला तर इंग्रज सरकार लक्षावधि किंवा

कधीं कोणी महात्मा देशी राजा विचार करीत नाहीं ! स्वदेश आणि त्याचें कल्याण याची कल्पना व व्याप्ति देशी राजांच्या मनांत कदापि यावयाचींच नाहींत !

२३. मोठमोठे उत्सव, लग्ने, कार्ये, मेजवान्या, शिकारी, तमाशे, आणि नाचगाणीं व बैठका यांचेशिवाय राजांना आणि त्यांचे कामदारांना दुसरें कांहीं सुचावयाचेंच नाहीं. रयतेचीं कामेंकाजें तरी, फावल्या वेळीं आणि रिकामपणीं करावींशी व पाहावींशीं वाटलीं तर त्याप्रमाणें व्हावयांचीं. सर्व काळ सर्व कामदार व अधिकारी यांची वेळ ह्मणजे राजेसाहेबांच्या खाजगी कामकारभारांतच जावयाची. सर्वांचें मुख्य काम म्हटलें ह्मणजे महाराजांना राजीखुषी आणि आनंदात ठेवावयाचें. लोक ओरडत बसले तरी त्यांस दाद मिळावयाची नाहीं ! सरकारी कामें एकीकडे ठेवून सुभे, सरसुभे, न्यायाधीश, वगैरे सर्व लहान मोठे कामदार आणि अधिकारी राजेसाहेबांचे खाजगीकडेच गुंग ! अशा स्थितींत इंग्रजींतल्याप्रमाणें नवे नवे शोध, तपास आणि नवें नवें ज्ञान व ग्रंथ यांचें नांव तरी कशाला ? इंग्रजी इतिहासलेखकांनी ह्या राजांच्या पूर्वजांचे इतिहास व वंशावळी लिहून ठेविल्या आहेत, त्या वाचण्याची ज्यांना पंचाईत, अशांचें ज्ञान किती असावें याचा अजमास कोणालाही सहज होण्यासारखा आहे. सारांश, शोध नको, तपास नको, इतिहास नको, किंवा कोणत्याही प्रकारची माहिती नको. कूपमंडूकाप्रमाणें स्थिति असते !

२४. सावकार लोकांमध्ये देशी राजांची मुळींच पत नाहीं व त्यांस कधीं

कोटयवधि रुपयांचीं खतें (नोटा) बाजारांत विकावयास पाठवितें कीं, अल्पावकाशांत तीं खतें (नोटा) विकलीं जाऊन सरकाराला लागेल तितकें कर्ज मिळतें. यावरून इंग्रज सरकाराची पत व अब्रू त्यांच्या अमलांत फार आहे असें सिद्ध होतें. सरकाराकडून काढलें गेलेल्या कर्जाचें किंवा सरकाराकडे ठेवलेल्या ठेवीचें व्याज चोखपणें, मागितलें तेव्हां देण्यांत येतें; किंवा तें व्याज घेतलें नाहीं तर तें पुनः मुद्दलांत धरून चक्रवाढ व्याजानें पैसा सावकारांचा सावकारांस किंवा ठेव ठेवणारांस देण्यांत येतो. या कामांतील सर्वांचे हिशेब चोख ठेवून, प्रति सहा महिन्यांनीं सावकारांस आणि ठेव ठेवणारांस त्यांचा हिशेब कळविण्यांत येतो. इतकी सुयंत्र व्यवस्था आणि येवढी पत व विश्वास इंग्रज सरकारच्या संबंधानें लोकांमध्यें आहे. ही साधारण गोष्ट नव्हे. आणि त्यांतूनही तें परदेशीय सरकार, ही गोष्ट विशेष लक्षांत धरावयाची.

कर्ज लागलें तर कोणीही त्यांच्या खतांपत्रांवर विश्वसून, त्यांस हातउसना पैसा देत नाहींत. सावकार लोकांस त्यांचे अनुभव येऊन चुकले आहेत कीं, ते आज खतेंपत्रें लिहून देऊन कर्जाऊ ऐवज घेतील आणि उद्यां तें देणें मुळींच नाकबूल जातील; आणि असें झालें म्हणजे काय करावयाचे ? पावसानें भिजविलें, निसर्ग्यानें पाडलें आणि राजानें लुटलें तर फिर्याद कोणापाशीं जावयाचें आहे ? असा विचार करून कोणीच सावकार देशी राजांचा विश्वास मानीत नाहींत व त्यांस कर्जे देत नाहींत. त्यांना आजपर्यंत ज्यांनीं ज्यांनीं कर्जे दिलीं तीं फेडण्याविषयींची आजपर्यंत किती खळखळ झाली असेल ती त्या त्या राजांच्या सावकारांस व त्यांसच माहीत असेल ! त्या सावकारांस त्यांजकडून घेतलेल्या कर्जाचें व्याजही मिळत नाहीं असे ते सावकार फसले गेले ! यामुळें त्यांची त्यांजवळ पत नाहीं ! ही सावकारी कर्जाचे संबंधाची गोष्ट झाली. मग लोक आपण होऊन अशा राजांजवळ आपली ठेव ठेवण्यास जातील, ही गोष्ट तर मुळींच बोलणें नको ! देशीं राजांची आपल्या रयतेमध्यें इतकी नापत असणें म्हणजे खेदाची गोष्ट नव्हे काय ?

२५. इंग्रज सरकारास सातसात आठआठ रुपये दरमहावर एतद्देशीय लढवय्ये इमानी शिपाई मिळतात; व अशा शिपायांकडूनच सरकारनें इकडील राज्यें काबीज करीत येऊन, आपलें राज्य आणि आपला अंमल इतका वाढवून दृढ पायावर बसविला आहे; यावरून एतद्देशीय लोकांची इंग्रज सरकारावर प्रीति असून, त्यांचें राज्य सर्वांस आवडतें व त्यांना

२५. नेटिव राजांना इमानीइतबारी व शूर शिपाई मिळत नाहींत. शिपाई तर हलके नोकर; तेव्हां त्यांची गोष्ट राहूं द्या; पण आश्रय देऊन लहानाचे मोठे केलेले आणि वैभवकोटींला चढविलेले असे पदरचे मोठमोठे सरदार शिलेदारही वेळेवर आपल्या राजांचा पक्ष सोडून इंग्रजांस मिळाले; व त्यांच्या आश्रयानें राहून आज आनंदांत व शांति-

त्यांजपासून सुख आहे, असें मानण्यास चिंता नाहीं. आपल्या नोकरीस असलेल्या लोकांचा अभिमान धरून त्यांचा योग्य रीतीनें मान ठेवण्याचा; व ते अशक्त व वृद्ध झाले असतां त्यांना बैठा पगार देऊन त्यांच्या पडत्या काळांत त्यांचा समाचार घ्यावयाचा; इत्यादि जीं नीतीचीं व भूतदयेचीं कलमें आहेत, त्यांप्रमाणें इंग्रज सरकार चालतें व आपल्या इमानी नौकराचें इमान जाणतें, हा इंग्रज सरकारचा प्रशंसनीय व अनुकरणीय गुण आहे; व हाच गुण सर्वांस त्यांचा पक्ष घेण्यास लावतो.

२६. इंग्रज सरकार जरी एवढें या देशांत राज्य करीत आहे व रयतेला निष्पक्षपातानें वागवीत आहे, तरी त्याचे अधिकारी लोकांचा देशाभिमान किती जाज्वल आणि प्रखर आहे तो सर्वांना माहीत आहेच. याविषयींचा विचार करण्यासारखा आहे. नेटिव लोक फितूर होऊन, दुसऱ्याला मिळून, आणि चहाडखोरपणा करून, आपला देश सावडून दुसऱ्याचें घर भरण्यास प्रवृत्त होतात; तसे इंग्रज लोक कधीं कोणास फितूर होऊन, त्यांनीं आपलें घर उघडून परक्याच्या स्वाधीन केलें, असें कधीं कोणीं कोठें तरी ऐकिलें असेल काय ? त्यांचें आपल्या देशबांधवांशीं आचरण, त्यांचें आपल्या स्त्रियांशीं वर्तन आणि त्यांचा न्यायाचा व स्वातंत्र्यपूर्ण कारभार, यांनीं त्यांचे लोक एकमेकांविषयीं मोठे अभिमानी

समाधानांत आपल्या आपल्या संस्थानचा स्वतंत्रतेनें कारभार पहात आहेत. तेव्हां असा विरुद्ध प्रकार एतद्देशीय राजांचे अमलांत कां असावा ? म्हैसूरवाले, निजाम व गायकवाड यांच्यासारखे देशी राज्यांचे मुख्य स्तंभरूप सरदार आणि अभिमानी पुरुष असे असतांना त्यांनीं आपल्या फौजा घेऊन इंग्रज सरकारला मदत केली व टिपूसुलतान व पेशवे या आपल्या देशी राजांस पादाहृत करून त्यांचीं राज्यें बुडविलीं; असें कां व्हावें ? याचा विचार केला म्हणजे इतकेंच समजावयाचें कीं, जिकडे न्याय व नीति त्या पक्षाचें लोक अवलंबन करितात. मग त्यांत पदरीं बेइमानीपणा येवो किंवा ती कृति अत्यंत निंद्य अशी अधमता समजली जावो. त्याविषयी लोक बेपर्वा असतात !

२६. सर्वत्र अन्याय, अनीति आणि आपमतलबीपणा यांचेंच राज्य सुरू झाल्यावर कोणी कोणाचा अभिमान धरावयाचा ? आणि देशाभिमानाचें खोटें ब्रीद धारण करून, कोणीं पुढें व्हावयाचें ? राजे, लोक आणि त्यांचे धर्मोपदेष्टे ब्राह्मण यांनीं आपापल्यापरी अनेक जुलूम; अनीतीचे आचार आणि कुधर्म यांचीं बंडें माजविलीं; स्त्रियांचे छल व त्यांचा अपमान, लोकांवर जबरदस्त्या, आणि विचारशून्यता व पठणपाठनक्रमाचा लोप, इत्यादि दुर्गुणांनीं सर्वांचाच देशाभिमान उडाला देशाभिमानाला तरी कांहीं तसें योग्य स्थळ पाहिजे. त्या स्थलाचा मुळींच अभाव झाला. तेव्हां अर्थात् परकीय राजाच्या सत्तेखालीं आणि छायाश्रमाखालीं जाणें सर्वांनाच प्राप्त व भाग झालें ! स्त्रीला जसें ब्राह्मणाच्या वंशांत

आणि हितेच्छु असतात.

२७. इंग्रजी राज्यांत विश्वासपात्रता फार असून, तिजविषयीं सर्व लोकांची खात्री आहे. कोणास कांहीं ठेव किंवा शिल्लक ठेवणें झाली तर ते मुंबईंत इंग्रज-सरकारच्या ताब्यांत आणून ठेवतात. खुद्द मल्हारराव गायकवाड यांनी आपला द्रव्यसंग्रह मुंबईसच ठेवला होता, तेव्हा इंग्रज सरकारच्या विश्वासपात्रतेची तोड कोणासही येणार नाहीं. सर्वांच्या जीववित्ताचें संरक्षण करणारा असा इंग्रजराजा विलक्षण इमानी पाहरेकरी आहे, असें लोक मोठ्या कौतुकानें बोलतात !

२८. सर्व देशचे इतिहास, सर्व प्रकारच्या माहित्या, आणि सर्वप्रकारचे शोध, यांचा दाखला इंग्रजींत मिळू शकतो. हिंदूचे वैदिक ग्रंथ शुद्ध रीतीनें लंडनास छापलेले मिळतात; होळकराचे वंशाचा इतिहास इंग्लंडच्या पुस्तकालयांत ठेवलेला आढळतो; व तो मालकम नांवाच्या एका साहेबानें केलेला समजतो ! याप्रमाणें सर्व प्रकारच्या विद्यावैभवाचा जसा इंग्रजांस शोक आहे तसा कोणासही नसेल.

जन्म घेणें आवडणार नाहीं त्याचप्रमाणें देशी राजांचेंच राज्य कायम राहून त्यांचे आश्रयाला आपण रहावें असें कोणीही इच्छिणार नाहीं. इतकी स्वराज्याविषयीं निरभिमानिता लोकांना उत्पन्न झालेली दिसते !

२७. देशी राज्यांची क्षणिक बुद्धि असून, ते फार हलक्या कानाचे असतात. तेव्हां, ते कोणा मत्सरी मनुष्याचा बुद्धिवाद ऐकून आपल्या द्रव्यसंग्रहाचा अपहार करतील व आपणास नागवतील, अशी पैसेवानांत मोठी भीति असते; आणि ह्मणूनच ते आपला पैसा इंग्रज सरकारचे अमलांत नेऊन ठेवतात. देशी राजांचे दिवाण व कारभारी हे आपली पुंजी बहुतकरून इंग्रज मुलखांतच नेऊन ठेवतात. कारण, त्यांना आपल्या महाराजांचा विश्वास नसतो. 'अव्यवस्थितचित्तानां प्रसादोऽपि भयंकरः' हें ते समजून असतात. नीति व विचार यांच्या अभावीं देशी राजे वाटेल त्यास लुटण्यास किंवा त्याचें सर्वस्व हिरावून घेण्यास कधींच कमी करीत नाहींत !

२८. पूर्वी जेथें एक वेळ भारता-सारखे विस्तीर्ण ऐतिहासिक ग्रंथ झाले त्या देशांत आलीकडे हा असा ऐतिहासिक ग्रंथसंबंधानें एवढा गाढांधकार कां पडला? हें समजत नाहीं. मुसलमानांमध्यें इतिहास-लेखनाची अभिरुचि असल्यामुळें त्यांणीं कांहीं इतिहास लिहिले. परंतु हिंदुलोक व त्यांचे राजे यांचा शेंकडो वर्षें मुक्यामुक्यानेंच कसा कारभार चालला, हें नकळे ! आपल्या वंशांत कोण पुरुष होऊन गेले व त्यांनीं काय काय कृत्यें केलीं, यांचें टिपण परक्या जातीच्या व

धर्मांच्या लोकांकडून आपल्याला मिळवावें लागतें, ही मोठी शरमेची व लाजिरवाणी गोष्ट आहे, असें कोणासही वाटत नाहीं !

२९. शिल्पकला, शिक्षण व सामाजिक सुधारणा यांचे विषयीं इंग्रजी राज्यांत नेहमीं घोष चाललेला असतो. आतां त्या घोषाप्रमाणें शिल्पकलाशिक्षणाची वृद्धि व्हावी तशी होत आहे; किंवा लोकांमध्यें झपाट्यानें सुधारणेचें पाऊल पुढें पडतें आहे असें जरी नाहीं, तथापि त्याविषयीं लोकांमध्यें चर्चा चालू असते व त्या चर्चेप्रमाणें आज नाहीं तरी कांहीं कालानें तिचा योग्य परिणाम होईल अशी खात्री आहे.

२९ देशी राज्यांत या गोष्टींची वार्ताच नाहीं. राजांना, आपल्या राज्यांत अनेक प्रकारचे कारखाने काढावे अथवा यंत्रें चालू करावीं, या गोष्टीची मुळींच हौस नसून, त्यांचे दिवस चैनीविलासांत आणि मौजामजतींत गेले म्हणजे त्यांच्या जन्मधारणेचे आणि राजकुलोत्पन्नतेचें सार्थक झालें असें ते समजतात किंवा मानतात ! त्याचप्रमाणें त्यांच्या पैशाचा अतोनात व्यय त्यांच्या त्या नाना ढंगांत होऊन जातो, त्याची त्यांस क्षितीही नसते. तेव्हां लोकांमध्यें तरी आपली सुधारणा करण्याची स्फूर्ति व्हावी कशी ? कारण, ' यथा राजा तथा प्रजा ' !

३०. इंग्रजीराज्यांत मोठा कमीपणा व दोष हा आहे कीं, सरकारचे गोरे अधिकारी हे एतद्देशीय लोकांपासून नेहमीं अलग असतात. तूप व पाणी हीं जशीं एक जीव कधींही होत नाहींत, तद्वत् नेटिव लोक आणि इंग्रज सरकारचे अधिकारी गोरे लोक हे सर्वदा विभक्त असतात.

३०. हा दोष एतद्देशीय राज्यांमध्यें दिसावयाचा नाहीं. राजा व प्रजा एकाच देशांतील असल्यामुळें तीं एकमेकांविषयीं उदासीन व निरभिमान नसतात. त्यांचें एकमेकांविषयीं प्रेम आणि सद्भाव असतो. देशी राजाच्या अधिकाऱ्यांकडून केवळ इंग्रजी अधिकाऱ्यांप्रमाणे कोळसा आणि खडू असा आपल्या रयतेमध्यें व आपल्यामध्यें भेद राखण्याची दुर्बद्धि नसते.

३१. बहुतेक सर्व मोठमोठे अधिकार इंग्रजांकडे दिले जातात. नेटिवांकडे मोठ्या पगाराच्या व अधिकाराच्या जागा देण्यांत येत नाहींत. पोलीस व रेव्हिन्यु या खात्यांत त्यांस फौजदार किंवा फार फार झालें तर इन्स्पेक्टर आणि मामलेदार यांचे पलीकडे जागा व अधिकार देण्यास

३१. प्रजा व रयत म्हणजे आपले जातभाईच असून, आपण एकाच धर्मांतले म्हणून एतद्देशीय राजे आपल्यांत आणि नेटिव रयतेंत प्रतारणा ठेवीत नाहींत. हिंदु, मुसलमान, किंवा पारशी यांजमध्यें या संबंधानें जें ऐक्य आणि अभेदबुद्धि आहे ती प्रशंसनीय आहे. निजाम-

सरकारचा जीव कासावीस होतो ! नेटिवांच्या अधिकाराची व कामाची जी सीमा ती युरोपियनांच्या अधिकाराची व कामाची सुरुवात ! युरोपियनाला साडे तीनशें रुपये पगार प्रारंभींच मिळूं लागतो. परंतु तितका पगार नेटिवाला मिळण्यास त्याच्या कारकीर्दीचे अखेरीचेच दिवस येऊन, तो पेन्शनाला येऊन पोंचतो ! हा विलक्षण पक्षपात आणि आपपर दृष्टि इंग्रजी अमदानींत अत्यंत दोषावह आहे. लष्करी खात्यांत तर मोठाल्या अधिकारांवर नेटिवांना नेमणें ह्मणजे जणूं काय त्या खात्यास विटाळ होतो, असें मानण्यांत येतें, ही फार खेदाची व असमाधानाची गोष्ट आहे! असा भेद इंग्रज सरकारच्या अनेक गुणांला मोठा कलंक आहे!

सरकारच्या जवळ विठ्ठल सुंदर नांवाचे गृहस्थ दिवाण होते; अकबराचे जवळ वीरबल (बीरबल) हा दिवाण होता. गायकवाडींत शेट दादाभाई नवरोजी हे दिवाण असून, हल्लीं काजी शाबुद्दीन हे दिवाण आहेत; याप्रमाणें मोठमोठ्या व जबाबदारीच्या अधिकारांवर आपल्या देशांतील विद्वान् व योग्य लोकांना नेमण्यात देशी राजांचा पक्षपात दिसत नाहीं. ह्याविषयीं देशी राजें निर्दोष व निष्कलंक आहेत.देशी राजांकडून ज्याप्रमाणें एतद्देशीय लोकांस मोठेमोठे अधिकार देण्यांत येतात, त्याचप्रमाणें त्यांच्या पगारांतही कपट होत नाहीं. पगार मोठाले देतात. बरें, नेटिव लोकांसच ते असे मोठाल्या पगाराचे व जबाबदारीचे अधिकार देतात असें नसून, युरोपियन लोकांसही ते तसेच मोठाले अधिकार व पगार देऊन त्यांचा समाचार घेतात. यामुळें नौकरीचाकरीच्या संबंधानें देशी राजांचे अमलांत पक्षपाताला जागा मिळत नाहीं. हा गुण एतद्देशीय राज्यांत फारच स्तुत्य व अनुकरणीय आहे.

३२. इंग्रजी अमलांतील आणखी मोठा दोष लोकांच्या अनुभवास असा येतो कीं, अत्यल्प कारणावरून व गैरवाकब गोऱ्या अधिकाऱ्यांचे रिपोर्टावरून पंचवीस पंचवीस वर्षें नौकऱ्या करून पेन्शनाला येऊन पोंचलेले अधिकारी फडाफड बर्तर्फ होतात व त्यांनी इतके दिवस इमानें इतबारें केलेली सरकारची नौकरी पाण्यांत जाते ! नवीं नवीं तरणीं पोरें विलायतेहून इकडे मोठाल्या अधिकारांवर येतात आणि तीं अत्यंत मनस्वीपणानें व अरेरावीनें आपला अम्मल चालवितात. त्यांना आपल्या हाताखालच्या

३२. न्यायनैष्ठुर्य आणि पक्षपात यांचेपासून देशी राज्यें अलग आहेत. तत्संबंधाचा दोष देशी राज्यांस लागत नाहीं, हें फार आनंदाने कबूल करावें लागते. मात्र राजद्रोहासारखीं भयंकर कृत्यें कोणाकडून उपस्थित होतील, किंवा त्या संबंधाने संशय उत्पन्न होऊन तद्विषयक पुरावा मिळेल तर बरीक देशी राज्यांत न्यायदेवतेचा क्रोध अनावर होऊन, त्या राजद्रोहाचे अपराध्यास फार कडक शासन मिळतें. यापेक्षां इतर कोणत्याही बाबतींत अविचाराचा व मनस्वीपणाचा न्याय देशी राजे व त्यांच्या हातांखालील अधिकारी

जुन्या व अनुभविक अधिकाऱ्यांशीं कशा रीतीनें वागावें हें बिलकुल न समजून, ते वाटेल तसे गैरशिस्त रिपोर्ट करून वरिष्ठांचें मन दूषित करितात व मग वरिष्ठही त्याजबद्दलचा सारासार विचार न करितां जातिवर्णाभिमानानें त्या जुन्या फार दिवसांच्या एतद्देशीय अधिकाऱ्यास एकदम बर्तर्फी देतात ! याजबद्दलचीं उदाहरणें शेंकडों आहेत; व तीं अल्पाधिकारापासून तों मोठाल्या अधिकारापर्यंत सारखीं आहेत. अल्पकारणावरून सरकारची मर्जी घाण होते. इतकी जहाल प्रकृति नौकर लोकांस अत्यंत भीतिदायक असून, अशा सरकारची नौकरी करणें म्हणजे केवळ सुळावरची पोळीच वाटते ! नाना मोरोजींना पेन्शन कोणत्या रीतीने देण्यांत आलें हें सर्वांस माहित आहेच. खानदेश, नाशिक, नगर, व शेवटी सातारा, या जिल्ह्यांत मामलत्याचे कामावर असलेले २७ वर्षांचे जुने नौकर रा. सा. नरसिंगअय्या संगाप्पा किंवा तसेच नारायणराव पर्वते व यांच्यासारखे अधिकारी लोक यःकश्चित् सांशयिक कारणावरून नौकरीला व पेन्शनाला मुकले ! ह्या गोष्टी व यांचेसारख्याच दुसऱ्या शतशः गोष्टी इंग्रज सरकारच्या राजनीतीस बट्टा लावितात ! बरें, सरकारचें हें न्यायनैष्ठुर्य काळ्यागोऱ्यांविषयीं सारखेंच अनुभवास येतें तर एक असो; परंतु तसें होत नाहीं. युरोपियन मनुष्यावर कसाही अधमपणाचा, नीचतेचा व घोर अपराधाचा आरोप आला असला तरी तो त्यांतून सुटावयाचाच; किंवा झाली तर अल्पस्वल्प शिक्षा देऊन त्यास सोडून द्यावयाचें ! असा मूर्तिमंत पक्षपात आणि भेदबुद्धि दिसते, ही साधारण कानाडोळा लोक होऊं देत नाहींत. ह्या गोष्टीबद्दल देशी राजांचा अभिमानच बाळगला पाहिजे. त्यांना इंग्रज सरकारासारखा काळा गोरा भेद ठेवण्याचें कारण पडत नसून, जो न्याय होणार तो सर्वांना मान्य असा होतो. इंग्रजी राज्याप्रमाणें इंग्रजी आरोप्यांचे रक्षणाविषयीं इंग्रजी न्याय तत्पर असतो, तसा देशी राजांचा न्याय त्यांच्या रयतेंतील आरोप्यांचे संरक्षणाविषयी निष्पक्षपातानें तत्पर असतो. यःकश्चित् संशयावरून व भलत्यासलत्या रिपोर्टावरून आपल्या राज्यांतील चाकरनौकरांस अन्नान्नगतीला लावावयाचें, असें अधमपणाचें व निंद्य कर्म देशी राज्यांत सहसा होत नाहीं. आणि त्यांत, पुष्कळ दिवस ज्यांनी राजसेवा केली असेल त्यांचेविषयीं तर देशी राजे फारच अभिमानी असून, त्यांच्या कुटुंबांचा परंपरेनें समाचार घेण्याची त्यांची रीति फारच ममत्व व दयालुता दर्शक आहे. या संबधाने इंग्रजींतील कायदा फारच विलक्षण आहे. मोठमोठे अधिकारी मेले तरी त्यांचे पश्चात् त्यांच्या कुटुंबीयांचा समाचार घेण्याचें कलम इंग्रज सरकारचें भाराभर कायद्यांत मिळावयाचें नाहीं. इंग्रजांची जोंपर्यंत नौकरी होत असेल तोंपर्यंत किंवा पुढें जीवंत असेपर्यंत सरकारकडून पगार व पेन्शन मिळावयाचें; परंतु त्या नौकराचे प्राणोत्क्रमण झालें कीं, त्याचा पगार बंद व पेन्शनही बंद ! यामुळें असा प्रकार पाहण्यांत येतो कीं, जे मोठमोठे अधिकारी आपल्या अस्तित्वांत गाड्याघोड्यांवरून फिरतात तींच गाड्याघोडीं ते मृत झाले कीं; त्यांच्या दहा दिवसांतच तबेल्यांबाहेर विकण्याकरितां निघतात !

करण्याची गोष्ट नाहीं आहे. इंग्रजी राज्यांत न्यायदेवतेकडे इतका पक्षपात लागू व्हावा ही फार दुःखाची गोष्ट आहे ! एकाच तराजूतून किंवा कांटयांतून न्याय जोखण्यांत इतका सरसनिरसपणा कोणासही अभिमत होणार नाहीं.

व पुढें त्यांच्या कुटुंबात दुर्दैवानें कोणी मिळविता नसला म्हणजे मग तर त्यांना फांके मारण्याचीच वेळ येते ! तसा प्रकार देशी राजांचे कारकीर्दीत आढळावयाचा नाहीं. असा कोणी अधिकारी मेला तरी त्याचे कुटुंबीयांचा समाचार देशी राजे आस्थापूर्वक घेतात व त्यांचे बंधु किंवा पुत्र यांस त्यांचे जागीं समजून त्यांचा राजदरबारच्या नौकरीवर हक्क आहे, असें ते समजतात. यामुळें लोकांस आपल्या चाकरीनौकरीची इंग्रजीतल्याप्रमाणें अशाश्वति न वाटतां खानदानीच्या कुटुंबात सहसा आपत्ति व खाण्यापिण्याची भ्रांति पडण्यासारखे दुष्ट प्रसंग येत नाहींत, ही मोठ्या संतोषाची व समाधानाची गोष्ट आहे. आणि याचप्रमाणें न्यायाच्या काटयांतून एकाला एका मापानें न्याय द्यावयाचा व त्याच काटयांतून दुसऱ्याला दुसरा न्याय द्यावयाचा असा भेदभाव आणि पक्षपात सहसा होत नाहीं. यामुळें देशी राज्यास लोक माना डोलावतात व त्याचें अनुकरण इंग्रजसरकारानें करावें असें सर्व जन इच्छितात.

३३. इंग्रजी कारकीर्द कायद्यानें बांधल्याचा गुण वर दर्शविला आहेच; परंतु त्या गुणाचे पोटांत दुर्गुणही फार वसत आहेत. इंग्रजी कायद्यांत दिवसेंदिवस दुष्टत्व जास्त येऊन, प्रजा, फार पीडित होत चालली आहे असें ऐकूं येतें ! अनेक प्रकारच्या सरकारदेण्यांनीं रयत अगदीं त्रासून गेल्याचा बोभाट जिकडेतिकडे ऐकूं येतो ! लोकांच्या उत्पन्नाचे मानानें त्यांजवर सरकार देणें फार लादलें जाणें व त्यामुळें रयतेला त्रासविणें हा इंग्रजी राज्याच्या चांगुलपणाला कमीपणा आहे!

३३. इंग्रजी कारकीर्दीतल्याप्रमाणें देशी राज्यांत, कायद्याच्या बंधामुळें होणारे गैरफायदे वर दर्शविले आहेतच. तथापि, तिकडे त्यामुळें एक फायदा आहे तो हा कीं, लोकांना इंग्रजी अमलांतल्या लोकांप्रमाणें कायद्यापासून होणाऱ्या जुलमाचा त्रास आणि पीडा हीं सोसावीं लागत नाहींत. त्याचप्रमाणें रयतेला भारभूत असें सरकार देणें द्यावें लागत नसल्यामुळें रयत आबाद व सुखी असते. तिची आपल्या राजाविषयी इंग्रजसरकारचे रयतेच्या कुरकुरीप्रमाणें कुरकुर आणि तक्रार नसते.

३४. असें म्हणतात कीं, इंग्रजींत परीक्षांचा सुकाळ, कोडतांची माळ, रोजगारांची वाळ, आणि पैशाचा दुकाळ! ही गोष्ट, विचार करून पाहिली असतां कांहीं खोटी नाहीं. परीक्षांच्या नादीं लागल्या–शिवाय गत्यंतर नाहीं; आणि त्यामुळें नवीन शिक्षित तरुण अल्पायु होऊन पटापट मरत असल्याचीं उदाहरणें शेकडों व हजारों आपले दृष्टीपुढें नेहमी येतात! भांडाभांडी आणि दायविभाग यांच्या संबंधाचे कज्जे व दावे सुरू झाले कीं, त्या वादांत पिढयांच्यापिढया गुजरून जावयाच्या, आणि दाव्याची सबंध रकम सरकारच्या कोडतांचे पदरीं पडावयाची! म्हणजे मग वाद भांडणारांनीं सरकारी ठरावांचे कागद हातीं घेऊन कोरडें ठणठणीत घरीं जावें! जों जों परीक्षा जास्त वाढत चालल्या आहेत, तों तो नौकऱ्या आणि रोजगारांची तूट पडत चालली आहे! आणि जिकडेतिकडे परदेश भरल्यामुळें पैशाला जसें खोरें लावून लोक निर्धूत आणि निःसत्व झाले आहेत! इंग्रजी–राज्यात बाहेर दिसणाऱ्या भपक्यास रयतेची अंतस्थ स्थिति फार लाजिरवाणी आहे असें लोक म्हणतात!

३४. नेटिव राजे व संस्थानिक यांचे राज्यांत व अमलांत या चारही गोष्टींचें अस्तित्व नसल्यामुळें लोक सुखी आहेत असें म्हणावें लागतें. अभ्यासाच्या आणि परीक्षांच्या कांचामुळें तरुण लोक अकालीं मरत नाहींत. दिवाणी फौजदारी कज्जांचे व दाव्यांचे संबंधानें अवाढव्य खर्च पक्षकारांस करावे लागत नसल्यामुळें, पक्षकारांस इंग्रजींतल्याप्रमाणें कोरडया हातांनी सरकारी ठरावांचीं दप्तर व पुडकीं खाकेंत मारूनच केवळ घरीं जावें लागत नाही, नोकऱ्याचाकऱ्या मिळावयाच्या तितक्यांना मिळतात व त्या संबंधानें लोकांचे राजांवर दोष येत नाहींत; आणि देशी राज्य असल्यामुळें लोकांजवळ पैसा राहतो. याचें कारण उघड आहे कीं, इंग्रजलोकांचा रोजगारधंद्याचा पैसा जसा त्यांचे देशांत सर्व जातो, तसा देशीराज्यांतील रोजगारीं व नौकर लोकांचा पैसा परदेशांत न जातां त्याच राज्यांत मुरतो याचप्रमाणें खुद्द राजांचे अवाढव्य चैनविलासांचे तरी खर्च त्यांच्या त्यांच्या मुलखांतच राहून, तो सर्व पैसा देशी राज्यांत फिरता व खेळता राहतो; यामुळें लोकांजवळ पैसा राहून, इंग्रजीतल्याप्रमाणें मुलूख कंगाल आणि भिकारी होत नाहीं. मुलूख कंगाल भिकारी नसल्यामुळें लोक इंग्रजी रयतेपेक्षां सुखी व निष्काळजी असतात; आणि लोक सुखी व निष्काळजी असल्यामुळें आरोग्य आणि आयुष्य हीं इग्रजी अमलांतील मुलखापेक्षां जास्त प्रमाणांत असतात.

३५. इंग्रजी अमलात परीक्षांचीं बंडे आणि वयाच्या इयत्ता यांनीं रोजगार–धंद्याला मोठा अडथळा घालून ठेविला आहे! किमानपक्ष म्याट्रिक्युलेशन परीक्षा

३५. नेटिव राज्यांत, परभाषा–भ्यासानें तरुण मंडळीस आपल्या मानसिक व शारीरिक शक्ति क्षीण करण्याचा जुलमी प्रकार बिलकुल नसून, नौकरीच्या

तरी झाली पाहिजे म्हणजे वकीलीची परीक्षा देऊन, प्रतिष्ठितसा व किफायतीचा धंदा करण्याची उमेद असते. सरकारी नौकऱ्याचाकऱ्या तरी या परीक्षांच्या कमी जास्त प्रमाणांवरच अवलंबून असून, त्याही वयाच्या पंचवीस वर्षांचे आंतच धरिल्या पाहिजेत ! जज्ज व कलेक्टर वगैरेंसारख्या मोठाल्या हुद्यांच्या नौकऱ्या मिळविण्याची इच्छा असली तर त्याबद्दलची जी सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा द्यावी लागते ती १९ वर्षांच्या आंत विलायतेस जाऊन द्यावी लागते ! त्याशिवाय त्या हुद्यांच्या जागा मिळण्याची आशा नाहीं ! अशा या जुलमामुळें परभाषेचा अभ्यास करून करून तरुण मंडळीला आपलें आयुष्य क्षीण करावें लागतें.सरकारी नौकरी करणें म्हणजे त्याला इंग्रजी चांगलें समजले पाहिजे; व इंग्रजी मजकूर जुळून लिहितां आला पाहिजे. इंग्रजी अक्षर चांगलें पाहिजे. जिकडेतिकडे इंग्रजीशिवाय बात बोला–वयाची सोय नाहीं ! यामुळें नेटीव लोक त्याही भाषेचा उत्तम अभ्यास करून, इंग्रजांच्या बरोबरीनें त्यांचीं विद्वत्तेची जेवढीं कामें तेवढीं ते हुशारीनें व शहाण-पणानें करितात. नेटीव लोक इंग्रजींत मोठमोठे ग्रंथ लिहितात, कविता करितात, वर्तमानपत्रें चालवितात; आणि मोठ–मोठ्या कोर्टांतून व सभांतून इंग्रजी भाषेंत सुंदर सुंदर व अस्खलित व्याख्यानें देतात. असा नेटिवांवर इंग्रज सरकारानें मोठ्या कष्टांचा आणि त्रासदायक बोजा लादला आहे! येऊन जाऊन इंग्रजी भाषेंत सरका-रच्या नोकरींतील व अमलांतील लोक प्रवीण व निष्णात झाले म्हणजे झालें; मग त्यांना स्वभाषेचें ज्ञान संबंधानेंही वयाची इयत्ता राजदरबारीं पहात नाहींत, हें मोठें सुख आहे. इंग्रजी अमलांत सर्व गोष्टींमध्ये काळ्या गोऱ्यांचा भेदाभेद आणि पक्षपात-त्यांना नोकऱ्याचाकऱ्या व हुद्दे देण्यामध्यें पक्ष-पात, न्यायांत पक्षपात, पगार देण्यांत पक्षपात, आणि त्यांना वागवून घेण्यांत पक्षपात येणेंप्रमाणें जिकडेतिकडे पक्षपात दिसतो ! तसा पक्षपात नेटिव राजांचे अमलांत होत नाहीं. इंग्रजी अमलांस जसे आज सात हजारांवर गोरे लोक अनेक प्रकारच्या हुद्यांवर व कामांवर आहेत; मोठमोठें लढवय्ये सरदार, न्यायाधीश, वकील, वगैरे अनेक धंद्यांचे आणि रोजगारांचे लोक आपलीं कामें चाल–वितात; त्याचप्रमाणें नेटिव राज्यांतही गोरे लोक नौकरीधंद्यावर नाहींत असें नाहीं. त्या सर्वांस जर एतद्देशीय भाषांतून इकडील लोकांचे बरोबरीनें भाषाविषयक परीक्षा दिल्या–शिवाय नौकऱ्या द्यावयाच्या नाहींत; असा ठराव केला, तर किती जण टिकाव धरून राहतील ? व नेटीव लोक जसे इंग्रजांच्या बरोबरीनें त्यांच्या भाषेशीं परिचित होऊन तिजमध्यें नैपुण्य मिळ–वितात, त्याप्रमाणें हिंदुस्थानांत आज जे इंग्रज लोक आहेत त्यांपैकीं शेंकडा किती लोक नेटिवांच्या बरोबरीनें एतद्देशीय भाषेंत तयारी दाखवितील ? एकही साहेब नेटिवाप्रमाणें आपली प्रवीणता दाखविण्यास समर्थ होणार नाहीं. अशी स्थिती असतां इंग्रज सरकार नेटिवांस बळजोरीनें आपली भाषा शिकण्यास भाग पाडतें, या त्याच्या करण्यास नेटिव राजे लाजवितात, ही गोष्ट कांहीं

व त्यांतील ग्रंथावलोकन कांहीं नसलें तरी त्याबद्दल चिंता व फिकीर नाहीं, असा चमत्कारिक प्रकार झाला आहे !

सामान्य नाहीं ! हिंदुस्थान देशांत अंमल करावयाचा आणि त्याबद्दलचें सर्व दप्तर व लेख इंग्रजीमध्यें ठेवावयाचे, हा एक द्राविडी प्राणायामच नव्हे काय ? अशा प्रकारचा जुलूम नेटिव राजांकडून आपल्या नौकर साहेबावर झाल्यास तो साहेब कितीसा तग धरील बरें !

( गुजराथ देशाचा इतिहास )

## २१

# लांच

इंग्रज लोक हल्लीं हिंदुस्थानांत राज्य करितात. हे सामान्यत: इकडील लोकांपेक्षां शहाणे विद्वान, ज्ञानी, माहितगार व निष्कपटी आहेत. परंतु शेंकडा पांच या सुमारानें त्यांत वाईटही असतात. तसेंच, जे चांगले आहेत ते तरी सर्व कामें करूं शकत नाहींत. कारण एकटा मनुष्य, त्यास दोन हात. तेव्हां त्यानें कितीहि काम केलें तरी तें थोडेंच करील आणि त्याचे पाठीस डोळे नसतात. याजमुळें त्यांचे हाताखालचे लोक चांगलें सज्जन असल्याखेरीज सर्व कामें चांगलीं चालणार नाहींत. व इकडील लोक लबाड म्हणून जरी प्रसिद्ध आहेत, तरी ते इंग्रजांस राजकीय कारणास्तव आणि अडचणीमुळें पुष्कळ ठेवावे लागतात. या लोकांची वर्तणूक फार वाईट म्हणून लोकांचे फार नाश होतात दिवसानुदिवस त्यांवर भरंवसा कमी राहतो.

हिंदु लोक लांच खातात, याचा संशय नाहीं. कंपनी सरकारचे चाकरांत हजारांत लांच न खाणारा व ईश्वरास भिऊन चालणारा क्वचित असतो. बाकी सर्व शिपायापासून प्रिन्सिपाल सदर अमीनपर्यंत शपथेचा व्यभिचार करितात. याचें कारण असें कीं, या लोकांस ज्ञान आणि धर्म नाहीं हें एक; आणि दुसरें इंग्रज लोकांस हिंदु लोकांची परीक्षा

करितां येत नाहीं. याजमुळें कोणत्याही कामावर यथायोग्य गुणाने योजना होत नाहीं. हिंदु लोक जरी मूर्ख आहेत, तरी त्यांत निवड केली, तर चांगले शहाणे व ईश्वरास भिणारे असे कांहीं काहीं सांपडतील; परंतु सरसकट नेमणुका करितात; याजमुळें वाईट लोक पुष्कळ अधिकारावर येतात. जर असा ठराव केला कीं, इंग्रजी विद्या शिकलेले लोकांस कामावर नेमावें, तर लांचाचा कांहीं बदोबस्त होईल, मोठे शास्त्री जरी असले, तरी त्यांचाही उपयोग नाहीं. कारण मी एका शास्त्र्यास प्रश्न केला कीं, ' लांच घ्यावा किंवा नाहीं ? ' त्यानें सांगितले कीं लांच खाणें हा न्यायाधिशाचा धर्म आहे. परंतु खरा असेल त्याजपासून घ्यावा असें शास्त्र आहे. ' तेव्हां हिंदु लोकांचे शास्त्राचा या गोष्टीस कांहीं प्रतिबंध नाहीं. फक्त कायदा मात्र प्रतिबंध करतो; परंतु कायदा चुकविण्याचें सोपें आहे. जा पुरुषांचे मनांत ईश्वराज्ञेचा निर्धार नाहीं त्यास कायदा दिला तरी तो लांच खाल्ल्यांवांचून रहाणार नाहीं, तेव्हा हिंदु लोकांचें मनच फिरलें पाहिजे. ही गोष्ट वाईट, असें त्यास पक्के समजल्यावांचून लांचाचा प्रतिबंध होणार नाहीं.

जरी इंग्रजांनीं भगीरथ प्रयत्न केला, तरी हे लोक अडून अडून लांच खातात हें जगप्रसिद्ध आहे. आणि वास्तविक पाहिलें, तर जो मनुष्य मुनसफाचें काम करितो, तो वेतनाइतका खर्च ठेवून पांच वर्षात दहा हजार रुपये जवळ करितो. तसेंच शिरस्तेदार आपले सर्व वेतनाइतका किंबहुना जास्तीच खर्च करून सालात पांच हजार रुपये जवळ करितात. तसाच नाझरही सालाचे पांच हजार जवळ मिळवितो. सामान्य कारकूनही दहा वर्षे काम करितो, तर तो दोन हजार रुपये जवळ करितो. तसेच चपराशी पगाराचे दुप्पट मिळवितात. फौजदार व मामलेदारही याजप्रमाणें; जर बारीक शोध केला तर ही सर्व बातमी लागते आणि जरी जड्ज किंवा कलेक्टरसाहेब प्रमुख असतात; तरी त्यांचा इलाज चालत नाहीं. पहा ! एक मनुष्यानें हुकूमनामा बजावण्यास नेला, तर पहिल्यानें शिरस्ते-दाराचें आर्जव करावें लागतें. त्याशिवाय साहेब कांहीं करीत नाहीं. तेव्हां लोक त्यांची पूजा करून नंतर हुकूम घेतात. तो बार करणार कारकून याजवळ देतात. तेव्हां शिरस्तेदार व कारकून एका मताचेच सिद्ध साधक असतात. ते त्यास तसदीं देत नाहीं कीं, अमक्याचें काम जरूर करावें. जेव्हां त्या कारकुनास चार आणे द्यावे तेव्हां तो बार करून मालका-जवळ देतो. मग मालक नाझराकडे जातो. तेव्हां नाझर म्हणतो कीं, ' आतां मजजवळ शिपाई नाहीं, जा, पाहिजे तर साहेबास सांगा. '

तेव्हां सावकार तर एक वेळ खर्च करून साहेबाकडून आला असतां, तो पुनः जाईल तर दाद लागणार नाहीं. आणि जर नाझरावर फिर्याद करील तर साहेब म्हणतो कीं, " अरे, अमलदारावर हा फिर्याद करितो! त्याची शपथ घ्या आणि बसवून ठेवा. " अशी त्याची तिकडे शोभा होते. तेव्हां कांहीं खर्च पडेल तो करावा हें ठीक असें समजून नाझराची मूठ भरतो. नंतर सर्वांची पंचोपचार पूजा करून शेवटीं शिपाई जप्तीस मिळतो. तो मिळाला कीं म्हणतो, 'दादा', रामराम. आपणाकडे नेमणूक झाली. देवानें केलें, असें कूळ मिळालें म्हणजे आपल्यास काय कमी? ' आठचार आणे त्यास

द्यावे, तेव्हां तो बरोबर काम करतो. नाहीं तर कुळाकडे जाऊन अगोदर बातमी लावून माल पळवितो. पुढें माल जप्त केला, तो लिलांव होईपर्यंत याचप्रमाणें खर्च पडतो. शेवटीं रुपये आले म्हणजे तरी लवकर पदरीं पडत नाहींत. नाझर म्हणतो, 'जाऊं द्या. या पहिल्या तारखेस.' तेव्हां उत्तरपूजा करावी लागते. शेवटीं पन्नास रुपयांचा दावा असला तर चाळीस रुपये खर्च होतो. मग त्या सावकारानें म्हणावें, अरे, रुपये नाहीं आले तर नाहीं, बुडाले तर बुडाले; परंतु कूळ पैसा देत नव्हतें, त्याची तर खोड मोडली?' एवढा मात्र आनंद मानून बसतात.

तेव्हां या रीतीनें रयतेची किती खराबी होईल बरें? या प्रकारें इंग्रजांचा दरबारांत न्याय चालला आहे. छापी कागद, वकील, मुनसफ लूट करतात. हुकूमनामा झाला, तरी सदरीं लिहिल्याप्रमाणे व्यवस्था होते. कित्येक लोक असे आहेत कीं, शंभर रुपयांची फिर्याद करितात. तींत चारशें रुपये खर्च करितात व शिवाय आर्जवें व नित्य खेपा, आपला रोजगारधंदा सोडून कज्जाचें पाठीस लागतात. याजमुळें बेजार झाले आहेत, असा अनर्थ सरकारी कामदार करितात. या तऱ्हेनें पैसा काढून आपला नफा करितात, रयतेची दया किंवा ईश्वराचें भय किंवा धर्माचा प्रतिबंध किंवा मनाची लज्जा किंवा परलोकाची काळजी किंवा अब्रू हें कांहीं एक मनांत आणीत नाहींत. तेव्हां व्यापार आणि व्यवहार व देणेंघेणें कसें नीट चालेल? इंग्रज तर या गोष्टीस वाकब असे थोडेच आहेत? कांहीं कांहीं पुरते आहेत; परंतु त्यांचा तरी उपाय चालत नाहीं.

यास एवढाच उपाय आहे कीं, चांगले लोक पाहून अधिकारावर ठेवावे. अधिकारावर ठेवणें याची फार चौकशी करून लोकांची निवड करावी व त्यांचे गुणांचा विचार करावा. आणि लांच न खाणारे आणि इंग्रजी जाणणारे आहेत व जे फार विद्वान् आणि विचारशील आहेत त्यास ठेवावे; तरच त्यांचा बंदोबस्त होईल; नाहीं तर कदापि होणार नाहीं. मोठा शहाणा साहेब असला; तरी काय करतील? मराठी अर्जी असली तरी ती वाचावयाला शिरस्तेदार पाहिजे. हुकूमनामा बजावण्यास नाझर पाहिजे. शिपाई, कारकून पाहिजेत. अव्वल कज्जे फैसला करण्यास मुनसफ पाहिजेत. त्याशिवाय चालणार नाहीं परंतु त्यांची वाईट वर्तणूक असली तरी साहेब काय करतील ?

हल्लीं लोकांस असें वाटतें कीं, इंग्रजांचा रोजगार करून पैशास जय नाहीं व बरकत नाहीं. म्हणजे उघड लांच घेतां येत नाहीं; परंतु वास्तविक पाहिलें तर बरकत असेल कशी ? " हपापाचा माल गपापा जातो, " अशी म्हण आहे. हे लोक शपथ खाऊन पैसा मिळवितात. तो पैसा राहील कसा ? त्यांनींच शिक्षा पावून तुरुंगांत शृंखळाबंधनांत असावें ही त्यांची योग्यता असते, परंतु कित्येक लोकांची ही अप्रतिष्ठा चुकते, हेंच त्यांचें पुण्य म्हणावें. त्यांचें कल्याण होईल कसें ? जरी कोणी म्हणवितो कीं, मीं पन्नास वर्षे व चाळीस वर्षें व तीस वर्षें व वीस वर्षें चाकरी केली; माझी सरकारनें प्रतिष्ठा वाढवावी; पण त्यांनीं आपल्या मनांत विचार करुन पाहिला तर समजेल कीं, कोणत्या धर्मानें

आम्हीं चाकरी केली ? सरकारास फसविलें. रयतेस लुटलें. लबाडचा केल्या. त्यांत कोणाचें मीं चांगलें केलें ? जास शिक्षा होते, तो तुरुंगांत जातो. जे रहातात ते म्हणतात कीं, आमची योग्यता हीच आहे; परंतु चालेल तितके दिवस करून घ्या. पुढें काय होईल तें पाहूं ! असेंही लोक म्हणतात, परंतु त्यांची वास्तविक योग्यता पहिली, तर जे लांचाकरिता तुरुंगांत आहेत, त्या कैदींची योग्यता आणि जे कोर्टांत मोठे अब्रूचे लोक म्हणून बसून न्याय करितात, अंमलदारी करितात, त्यांची योग्यता यांत काय अंतर आहे ? जा दिवशीं सांपडतील त्या दिवशीं यांची ही गति तीच होणार. याजमुळें सरकारी अंमलदाराची योग्यताही लोकांत नसते. ते कामावर असतात, याजमुळें चार लोकांस त्यांजवळ जाणें जरूर पडते; परंतु त्यांची योग्यता प्रसिद्ध असते.

जरी हिंदु लोक हुशार आहेत, तरी या दुर्गुणानें त्यांची माती झाली व अब्रू गेली. याची कोण लाज बाळगीत नाहीं. कामावरून गेले म्हणजे त्यांचेकडे कोणी पहात देखील नाहीं. कारण कीं त्यांची योग्यता सर्वांस ठाऊक असते. जर पुरुषास खरीं प्रतिष्ठा असली. तर ती त्याची चाकरी गेल्याने कमी होत नाहीं व द्रव्य आलें गेलें, तरी त्यानें त्याची अब्रू कमी होत नाहीं. ती शाश्वत अब्रू; परंतु हे लबाड लोक जी अब्रू मिळवितात, ती मुलाम्या–सारखी; ही टिकावयाची नाहीं जें लोक लांच देतात, ते तरी मूर्खच असतात. जर सर्वांनीं कट केला कीं, सरकारचे अंमलदारास लाच द्यावयाचा नाहीं, तर त्यांची खोड जाईल; पण असे चांगले कट करण्यापुरतें शहाणपण जर या लोकांत असतें, तर मग राज्य कां जातें बरें ?

हे लोक फार मूर्ख आहेत. याजमुळें असे प्रकार यांजमध्यें आहेत व इंग्रज तर पक्के लोक आहेत. ते म्हणतात कीं, आपआपल्यांत हे लोक लुटून खातील. तर आमचें काय गेलें ? आमची तितकी चांगलेपणाची प्रशंसा वाढेल. हेंही खरें कीं, साहेबलोकांस लोक चांगले म्हणतात व नेटीव कामगारास बहुधा वाईट म्हणतात; परंतु आतां सुधारलेले लोक व सुशिक्षित सरसावत चालले आहे. ते इंग्रजांची बरोबरी करतील, यात संशय नाहीं.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. ३२/२२ ऑक्टोबर १८४८ )

# वेळेचा व्यर्थ खर्च

आपले लोक वेळेची किंमत समजत नाहींत. वास्तविक म्हटलें तर मनुष्यास ईश्वरी दत्त आयुष्य हेंच धन आहे, जे या धनाचा अविचारानें व्यय करितात, ते उपाशी मरतात आणि जे या विचारानें व्यय करितात, ते स्वच्छपणानें सुख भोगितात.

सांप्रत हिंदु लोकांस अशी खोड आहे कीं, वेळ व्यर्थ घालवावा. आमचे पाहण्यांत असे लोक आले आहेत कीं, आपले घरून उठून लोकांचे घरीं जावें आणि त्यांचा व आपला वेळ गोष्टींत घालवावा. त्यांचे रिकामे गोष्टीवर सर्व ध्यान असतें. जेवणदेखील ते विसरून गोष्टी सांगत बसतात. बरें, गोष्टी सांगतात त्या तरी उपयोगी, विचाराच्या व ज्ञानवृद्धि व्हावी अशा प्रकारच्या असाव्या, तर तेंही नाहीं. मनुष्य उत्तम प्रकारचें भाषण करील तर त्यास व श्रोत्यांस ज्ञान होईल. परंतु हिंदु लोकांमध्यें जे गोष्टी सांगणारे आहेत त्यांचा वेळ शहाणपणाचे गोष्टींत जात नाहीं. व्यर्थ मूर्खपणाच्या गोष्टींत जातो. त्याचा कांही उपयोग नाहीं. बहुधा भट लोकांच्या जेवणाच्या गोष्टी. हें आम्हीं फार खाल्लें, थोडें खाल्लें, यजमानानें असें वाढलें, इत्यादि मूर्खपणाच्या आणि अधाशीपणाच्या गोष्टी सांगत बसतात. त्यांचा मुख्य विषय बोलण्याचा काय तो जेवण हा असतो.

त्याचप्रमाणें कुळंबी लोक व मराठे सरदार वगैरे आपल्या बढाईच्या गोष्टी सांगतात. काम कांहीं करीत नाहींत. त्याचप्रमाणें गृहस्थ लोकांत कोणी निद्रेनें कोणी दुर्व्यसनाने काळ काढितात. खाणें, पिणें, लेणें याहून दुसरा सुखाचा अनुभव कांहीं त्यांस नसतो. माझे पहाण्यांत लक्षावधी लोक आले आहेत. त्यांस पुसलें तर ते म्हणतात, आम्ही कांही करीत नाहीं. सरकारांतून इनाम आहे, तेवढ्यावर निर्वाह करून घरीं सुखरूप असतों.' त्यांचे आयुष्यांचा हिशेब जर त्यास पुसला तर जन्मापासून मरणापर्यंत त्यांचे आयुष्यांत अशी एकही गोष्ट सांपडावयाची नाहीं कीं, ती कागदावर लिहिण्यास योग्य व ऐकण्यास योग्य. अशा रीतीनें ते काळ घालवितात. भटही असेच असतात. जर त्यांस म्हटलें कीं, तुम्ही काय करीत असतां, तर ते म्हणतील कीं, स्नानसंध्या करून गंगातीरीं स्वस्थ असतों, मोंगलांकडून इनाम आहे, तितक्यावर चरितार्थ चालतो. तसेंच मराठे लोकांस पुसलें तरी ते म्हणतात कीं, साताऱ्च्या राजाचे पदरीं असतों, काम कांहीं नाहीं; पंक्तीचें ताट, मानकऱ्यांमध्यें असामी व महाराजांबरोबर फिरावें, असे लोक मोठ्या राजधानींत आढळतात.

जेथें हिंदु लोकांचे राज्य आहे, तेथें सर्वत्र न्यायाचा अंधकार असतो; एवढेंच नाहीं, परंतु विद्येचा व विचाराचाही असतो. बाहेर होतें काय व जातें काय, याचा कांहीं

विचार नसतो. ज्याचें त्याचें ज्ञान आपलेपुरतें व आपले घरापुरतें असतें. त्यांस दुसरें कांहीं ठाऊक नसतें. कोणी म्हणतील कीं, थोर लोकांच्या पदरीं भिक्षुक, भट, शास्त्री, पंडित असतात. परंतु ते लोक निरुपयोगीं असतात. शास्त्री जे आहेत, त्यांस मागील हजारों वर्षांचे ग्रंथ उलटतांनाच पुरें होतें, कारण संस्कृत भाषेचे कुलपांत ते असतात. तेव्हां प्रथम तें कुलूप उघडावयास म्हणजे भाषा शिकण्यास पांच दहा वर्षे लागतात. मग पुढें कांहीं ज्ञान व्हावें, तो लोक ' शास्त्रीबोवा ' असें म्हणूं लागतात. मग अंगावर शालजोडी घेऊन मिरवतांनाच पुरेसें होतें. मग विद्या कशाची ? अलीकडे पांच हजार वर्षांत झालें काय, याचा पत्ता कोणास नाहींच. शास्त्री, पुराणिक द्वापारयुगापर्यंत गोष्टी सांगू शकतात. परंतु पुढें अलीकडील अनेक देशांचें वर्तमान, व नवीन कला व विद्या वगैरे उत्पन्न झाल्या आहेत याविषयीं खबर नसते. जे संस्कृतांत देश लिहिलेच नाहींत ते आतां आहेत. त्याचें वर्तमान त्यांस ठाऊक नाहीं.

हल्लींचे सरकारची व्यवस्था ठाऊक असल्यास उपयोग अधिक पडेल. परंतु हें ते समजत नाहींत. तस्मात् शास्त्री यांचें ज्ञान अपुर्तें आहे, जसें घरात पन्नास असामी वृद्ध, जांस जाग्यावरून उठवत नाहीं असे आहेत, तर त्या लोकांचा उपयोग काय ? कांहीं तरुण यामध्यें असतील तरच त्यांचा निभाव लागेल. आणि अलीकडील इतिहास व विद्या जाणून मग प्राचीन राजांचे इतिहास ठाऊक असले तर चांगलेंच आहे. परंतु अलीकडील सोडून मागील राजांच्या कथा जन्मपर्यंत वाचल्या तरी उपयोग काय ? मागील युगांत मनुष्यें ताडभर उंच होतीं व दहा हजार वर्षें जगत होतीं आणि सोन्याची भूमि होती, अशा गोष्टी खऱ्या असोत–नसोत, परंतु त्यांचा मुळींच कांहीं उपयोग नाहीं, यांत संशय नाही. भागवताचीं हजार पारायणें केलीं व रामायण नित्य वाचलें, तरी हिंदुस्थानांत इंग्रज कसे आले, हें समजणार नाहीं. तसें जन्मपर्यंत जुन्या गोष्टी सांगितल्या आणि सांप्रतचे विचार केले नाहींत तर त्याचा उपयोग काय ?

परंतु हे शास्त्री व भट संपूर्ण हिंदु लोक अजून मागल्या गोष्टींचे भरांत आहेत. त्यांस अजून सांप्रतचें कांहीं सुचत नाहीं. याजमुळें कित्येक लोक पोरासारखे बोलतात कीं, विलायत बेट लहान, दोन चार कोसांचें आहे. कोणी म्हणतो टोपकर हे पाण्यांतले रहाणारे ! कोणी म्हणतो, रूमशामचें राज्य मोठें. कोणी म्हणतो, सात लाख घोडे तेथें आहेत, कोणी म्हणतो, पंधरा लाख पायदळ तेथें आहे. कोणी म्हणतो, कंपनी सरकार बायको आहे. अशा नाना प्रकारच्या गैर माहितीच्या गोष्टी सांगतात. इंग्रजांस राज्य करूं लागल्यास दोनशे वर्षे झालीं आणि या लोकांचा डोकीवरचे केस देखील त्यांनीं मोजले. परंतु या लोकांस त्यांचे डोळेही ठाऊक नाहीत, हा केवढा चमत्कार ! भट लोक हे तर या पृथ्वीवर जन्मास आले, व न आले सारखेच आहेत. यांचा कांहींच उपयोग नाहीं. अन्नास मात्र खर्च, लोकांस उपद्रव, भीक मागणें, व्यर्थ वेळ घालविणें, हीच त्यांची वृत्ति. कोणी कांही करील, तर यांचा कर त्यावर आहेच. यांचा कांहींच उपयोग लोकांस नाहीं. परंतु याचा सन्मान ठेवणारे गृहस्थ पुष्कळ आहेत. येणेंकरून द्रव्याचा व्यर्थ व्यय

होऊन विद्याशून्य लोकांचा प्रतिपाल होतो आणि मूर्खपणा वाढतो. या लोकांस कांहीं तरी काम शिकविलें तर बरें.

ब्राह्मण लोक शिंपी वगैरे यांचा रोजगार करतील तर अन्नानें पोट भरतील. भिक्षुकी करावी आणि निर्लज्जपणानें दुसऱ्याचे दारीं उभें रहावें, त्यापेक्षां धंदा करून वेळ आणि आपली शक्ति उपयोगास लावून पोटें भरावीं तें बरें नाहीं काय ? हे लोक जर आपले आयुष्याची किंमत करतील आणि व्यर्थ दिवस घालविणार नाहींत, तर यांचें फार कल्याण होईल.

(लोकहितवादीकृत निबंधसंग्रह । पत्र क्र. ३४ । १२ नोव्हेंबर १८४८)

३९

## ब्राह्मण लोकांचा स्वभाव

हिंदु लोकांमध्यें निर्लज्जपणा हें एक त्यांच्या दुःखास मोठें कारण आहे. पहा, एक जण लाच खातो व त्यास सरकारांतून शासन होऊन त्याची धिंड काढितात, हें पाहून लोकांस दहशत पडावी; परंतु तें कांहीं नाहीं. जें त्याचे कामावर बसतात, ते लागलीच लाच खाऊं लागतात. तसेंच इतर सर्व गोष्टींमध्यें दुर्गुणास लोक भीत नाहींत.

यांचें कारण असें कीं, या लोकांमध्यें छापखाने व वर्तमानपत्रें वगैरे फार नाहींत; याजमुळें त्यांस निर्लज्जपणाचें भय वाटत नाहीं. छापखान्यामध्यें जितके अधिक ग्रंथ छापतात, तितकी लोकांची सुधारणा होते; कारण कोणीं कांहीं अपराध केला तर तो छापला जातो, आणि प्रसिद्धीस येतो; याजमुळें त्यास असें भय प्राप्त होतें कीं, माझी अपकीर्ति सर्व जगांत होईल; आणि माझे स्नेही, मित्र परदेशांत आहेत, त्यांसही कळेल. आणि माझे मागें ही लिहिलेली गोष्ट राहून अपकीर्ति मागें राहील. या भयाने लोक अपराध किंवा वाईट कामें करीत नाहींत. आणि जरी यद्यपि ज्याची अपकीर्ति छापणारांनीं लिहिली, त्याणें स्वतः मूर्खपणानें वाईट कामें सोडलीं नाहींत; तत्रापि त्याची फजिती होऊन त्याचे वंशांतले पुढचे लोक आणि इतर लोक हे सावध होतात कीं, अमक्याने वाईट काम केलें, त्याची अपकीर्ति जहाली. तेव्हां आपण केलें तर तसेंच होईल

नाहींत. एणेंकरून छापखाना हें लोकांस मोठें बंधारण आहे. तसेंच लोकही शहाणे होतात व त्यांस कोठें काय होते, हें कळतें आणि सावध राहतात.

जर छापखाना व डाक हिंदुस्थानांत असती, तर परके लोक हिंदुस्थानांत सुलभपणे आले, तसे आले नसते; परंतु या लोकांचे दुर्भाग्य. तेणेंकरून छापखान्याचा फायदा त्यांस कळत नाहीं. व जे ब्राह्मण प्राचीन समुजतीचे अद्यापि पुष्कळ आहेत, त्यांस असें वाटतें कीं, छापखान्याचा काय उपयोग आहे ? बुकांत पैका घालून काय फळ ? पृथ्वीवरच्या बातम्या ठेवून आम्हांस काय करावयाचें आहे. आपले घरांतलें आपण पाहावें. आपल्यास मोठ्या गोष्टी कशास पाहिजेत ? अशा ते रांडगोष्टी सांगतात.

असे हे हिंदु लोक शिथिल आणि मूर्ख, म्हणून या दशेस आले. जर पेशव्यांचे अमलांत इंग्रज मोठे आहेत व त्यांची काय अवस्था आहे, हें लोकांस कळलें असतें, तर राज्य न घालवते; परंतु पोटार्थी भट, त्यांनीं गोड खाण्याशिवाय दुसरे कांहीं मनांत आणलेंच नाही. गोड खाण्यांस मिळालें, म्हणजे सर्व ब्राह्मण एकत्र डोंगळ्याप्रमाणें जमतात व मग त्यांचे अवधान फार लागतें. कोठें मुक्तद्वार किंवा ब्राह्मण-संतर्पण उत्साह आहे, अशी वार्ता आली कीं, ब्राह्मण मोठ्या हौसेनें तेथें जमतात. दुसरी कांहीं राज्य–कारभाराची किंवा ज्ञानवृद्धिसाठीं सभा असेल, तर हालणार नाहींत ? तात्पर्य, या जातीची नजर जेवण आणि दक्षणा याहून पलीकडे जात नाहीं व याहून दुसरा मोठा कारभार पृथ्वीवर आहे, असें या जातीस वाटत नाहीं.

एकास लाथ मारली तर दुसरा ' कां ' म्हणावयाचा नाहीं. इतके तर हे भित्रे, रांडचे, व निर्बल आहेत. यांचेमध्यें साहस, धैर्य, खरेपणा हीं प्रायशः नाहींत. साहस म्हणजे मोठें कार्य डोकीवर घेणें धैर्य, म्हणजे आपल्या वर किंवा दुसऱ्यावर जुलूम कोणी करील, तर न सोसणें आणि खरेपणा म्हणजे लबाडीचे व्यापारांत न शिरणें. यांपैकी एकही गुण यांजमध्यें नाहीं. जनावरासारखे हे मूर्ख आहेत, जशा शेतांत पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली, म्हणजे त्या भरकन् उडून जातात, तसे हे ब्राह्मणलोक आहेत. यांची पंगत करावयास मात्र चांगली; परंतु दुसरा कांहीं उपयोग नाहीं. आणि सांप्रत पहा कीं, पेशव्यांचें राज्य गेलें, हें वाईट जहालें, असें जे ब्राह्मण लोक म्हणतात, ते एवढ्याच कारणानें म्हणतात कीं, त्यांस खावयास मिळत नाहीं. ब्राह्मण लोक इतके दुर्बुद्धि आहेत कीं, त्यांस खावयास द्या व मग कांहीं करा, चिंता नाही. पोटास घालावें आणि पायपोस मारावें, त्यांस लज्जा वाटणार नाहीं. आणि त्यांची म्हण अशी आहे कीं, पोटावर मारूं नका पाठीवर मारा, म्हणजे जेवावयास घाला मग कांहीं करा. याप्रमाणें फक्त जेवणाची मात्र काळजी. पोटाचा विचार ब्राह्मण लोकांस पहिल्यानें आहे; मग पाठीमागून सर्व. परंतु बहुधा तेवढा बंदोबस्त असला म्हणजे ते उजवे किंवा डावे बाजूस पहावयाचे नाहींत, हें आम्हीं लिहिलेच आहे.

याविषयीं कोणास खोटें वाटेल तर त्याने स्वदेशीय राजधानींतील लोकाकडे पहावें आणि त्यास पुसावे कीं, ' इंग्रज हिंदुस्थानांत कोठें कोठें राज्य करितात ? ' ते म्हणतील,

कीं, ' छी ! इंग्रज कोठें आहेत ? आमचे संस्थानांत तो एक ताम्रमुखी मात्र असतो. ' याचप्रमाणें पेशवाईत अवस्था होती. पुण्यांत वकील होता, तेवढी गोष्ट मात्र दरबारांतील वागणारे यांस माहीत. इतर लोकांस तेंही माहित नवतें. कोणी सुखी असेल तर त्यांनीं प्रवास करावा असें नाहीं. परंतु ग्रंथद्वारें किंवा वर्तमानपत्रद्वारें त्यांस वर्तमान तरी माहीत असावें !

एखादे गांवडे कुलकर्ण्यास पुसा कीं, कलेक्टरसाहेब यांची नेमणूक कोण करितो, त्यांस पगार काय आणि गवरनरसाहेब कोण आहेत व कोठून आले ? तर त्यांच्यानें कांहीं सांगावणार नाहीं. जा शहरामध्यें कांहीं गोष्ट आहे तीच गोष्ट त्या शहरात ठाऊक नसते. पुण्यामध्ये शाळा आहे, लायब्ररी आहे व छापखाना आहे. हीच गोष्ट पांचशे रुपये महिना पगार किंवा पेनशन खाणारास पुसा, म्हणजे ठाऊक नाही, असें तो म्हणेल. कारण कीं, हिंदु लोक शोध करण्यांत फार आळशी आहेत. कोणी कोणी शोध करणारे आहेत. परंतु लोकांच्या घरच्या गोष्टी व चहाडचा एवढे मात्र ते मनास आणतात. दुसऱ्या उपयोगी गोष्टी कांहीं मनास आणीत नाहींत. व थोर आहेत ते जेवतात आणि निजतात. अशी त्यांची अवस्था आहे.

मागें सांगतात कीं, दिल्लीचे बादशहानें, मिरची तिखट आहे किंवा कसें हें पुसलें होतें; व सूर्य हा पदार्थ काय आहे, हा प्रश्न पुसला होता. तद्वत् हल्लींही ऐकण्यात आहे कीं, कर्नाटकांतील सरदारांपैकीं एकानें पोलिटिकल एजंटास विचारलें कीं, तुम्ही समुद्र पाहिला आहे किंवा नाहीं ? व आणखी एक वेळ असा प्रश्न केला कीं, ' कृष्णातीरी घाट आहे तो पाण्यानें वहात कां नाहीं ? ' तेव्हां एक हुषार जवळ होता, त्याणें सांगितलें कीं, 'महाराज, पाण्यानें घाट वाहून जातो, परंतु आमच्याजवळ हत्ती आहेत, त्यांजकडून पुनः ओढून आणून जाग्यावर ठेवतों. तेव्हां त्या मूर्खाची समजूत पडली. अशा किती एक अज्ञानपणाच्या गोष्टी ऐकण्यांत आहेत. त्यांचें वर्णन करून उपयोग काय? परंतु असें आहे तरी जास खावयास मिळतें त्यास जरी फाशी द्यावयास काढलें तरी वाचणें किंवा ज्ञान शिकणें, ही गोष्ट त्याच्यानें व्हावयाची नाहीं.

या लोकांच्या इतक्या समजुती आकुंचित जहाल्या आहेत कीं, ते वर्तमानकाळचा विचार करितात,उद्याची काळजी करीत नाहींत.लाच खाल्ला म्हणून एकाची धिंड निघाली, काय चिंता आहे? आपण मिळेल तोंपर्यंत पैसा खाऊं; जा दिवशीं काळ फिरेल त्या दिवशीं पहातच आहोंत. याप्रमाणें काळास दूषण देतात; पण आपण कर्में कोणतीं करतों, याचा विचार करीत नाहींत. आणि इतकें निर्लज्जपणास दुसरें कारण असे आहे कीं लोक शहाणे नाहींत. कुळंबी, ते अडाणी कुळंबी; व ब्राह्मण तर शतपट मूर्ख आहेत. तेव्हां जो वाईट काम करतो, त्यास असें वाटत नाहीं कीं, मला हे लोक वाईट म्हणतील. आणि वास्तविक पाहिलें तर जे लोक वाईट कामें करतात, त्यांची निंदा पाठीमागें लोक पुष्कळ करितात; परंतु भित्रे आहेत, त्यांजमुळें त्याचे तोंडावर होत नाहीं. व त्याचा त्याग करून सर्वांनीं हलका मानणें व त्याचा लोकांत हरतऱ्हेनें पाणउत्तारा करणें, हें धैर्य लोकांस नाही.

जी गोष्ट घडते ती सहज घडते; परंतु प्रयत्नपूर्वक कांहीं घडत नाहीं. वाईटास वाईट म्हणावें व शाहाण्यास शहाणें, हें शहाणपण लोकांस नसल्यामुळें लोकही पाहिजे तशी वर्तणूक करितात. खोटें बोलणें व लबाडी करणें हें तर त्यांचे अंगीं पडलें आहे. त्याचा विधिनिषेध ते जाणतच नाहींत. लबाडी ही लज्जेची गोष्ट ही लोकांमध्यें समजूत नाहीं; असे हे लोक मूर्ख आहेज. जर त्यांस कांहीं गोष्ट सांगितली तर तिचा अर्थ कळत नाहीं व न्याय करतां येत नाहीं. असे लोक अज्ञानांत आहेत.

( लोकहितवादीकत निबंधसंग्रह / पत्र क्र. ४८ / १८ फेब्रुवारी १८४९ )

## ३२

# सरदार लोक

दक्षिणेंतील सरदार लोक, याविषयीं कोणास कांहीं मजकूर ठाऊक नसेल म्हणून मी त्यांचे अवस्थेचें व समजुतीचें थोडें वर्णन करतो. पेशवाईंत हे सर्वजण बाजीरावास कंटाळून इंग्रजांकडे मिळाले. यांस अशी आशा होती कीं, पेशव्यांचे पदरीं राहून आम्हांस खावयास मिळतें, परंतु चाकरी करावी लागत्ये; तेव्हां आतां इंग्रजांच्या पक्षांत मिळालें म्हणजे खावयास फुकट मिळेल व आमची जहागीर वगैरे सरंजाम सर्व आम्हांकडे चालतील, आणि घरीं बसून राहूं. हे ब्राह्मण लोक भटबुद्धि, यांस हा मोठा फायदा वाटला कीं, चाकरी केल्याशिवाय आम्हांस इंग्रज खावयास देतात, मग पेशव्यांची ताबेदारी कशास पाहिजे ? हा विचार करून त्यांनी इंग्रजांचे बंदोबस्त कबूल केले व पुढें आतां कायद्याप्रमाणें जप्त होऊ लागले, तेव्हां त्यांस असें वाटतें कीं, अरे हें काय? आम्ही केलें काय? आणि झालें काय ? त्यांचे मुखांत आतां दुसरी गोष्ट नाहीं.

सरदार लोकांजवळ बसलें म्हणजे प्रथम पेनशनाची गोष्ट. आता जप्ती जहाली, कसें करावें? इंग्रजांचें राज्य फार वाईट. कारण आमचा सरंजाम गेला. कोणी म्हणतो माझें पेनशन गेलें! आम्हास पहिलें वाटत होतें कीं, पुस्त दर पुस्त चालवतील; परंतु आतां कायदे फार वाईट निघाले. आतां सरदार लोकांस दुसरी काळजी नाहीं. फक्त तेवढ्या गोष्टी बोलत असतात. कोणी आहेत त्यांस मुलें नाहींत. कोणी परघरांतील

मुलें आणून दत्तक बसविली आहेत. किती एक बाजीरावाचे समयांतील आहेत; किती एक जुने आहेत, पण आतां त्यांचे वारस आहेत, ते कांही शहाणे नाहींत व नेहमीं अर्जा करितात कीं, दत्तकास आमचा सरंजाम चालवावा. आम्हांस दत्तक घेण्याची परवानगी असावी; आणि आमच्या गांवचा फौजदारी आणि दिवाणी अमल आम्हांकडे असावा; आणि वसुलास आम्हांस मदत द्यावी. म्हणजे रयतेस बुडवून पैसा घेउन खर्च पाहिजे तसा करूं; परंतु इतके सरदार आहेत यांपैकीं एक जणास आणून पाहिलें कीं, हा गृहस्थ कोणत्या उपयोगी पडेल? तर मला वाटतें कीं, या पृथ्वीवर कोणतेंही काम त्याचे लायक सांपडावयाचें नाहीं.

कारण कीं पंचवीस वर्षांपासून त्याचे वृद्धापकाळास आरंभ होतो; आणि क्षयरोगातें व्याप्त होऊन तो जिवंत मात्र राहिलेला असतो. किती एक इतके अशक्त आहेत कीं, त्यांस घोड्यावर बसून दहा पावले जाववत नाहीं. किती एकांस चाळीसावे वर्षीं दुसरे लोक धरावयास लागतात, स्वतः लिहिणें, पुसणें तर कोणासही येत नाहीं. सर्वांस वकील व कारभारी पाहिजेत. जांस वकील कारभारी नाहींत, त्यांणीं दरबारांत जाण्याचे दिवशीं एकादा मजूरदार करून तरी बरोबर नेला पाहिजे. यजमानास बोलावयाचें माहीत नाहीं. मग कारकून यानें यजमानास बरोबर नेऊन येथें बसा म्हणून सांगावे. यजमानास स्वतां कांहीं ज्ञान नाहीं. मग कारकुनांनीं त्या मूर्ख यजमानास जसा पिसें लावून कावळा करतात, तसा करून एजंटास भेटवावा; हे आमके म्हणून सांगावें; परंतु खासे पाहिले तर नंदी किंवा शुद्ध नर्मदेतले बाण. लिहिता येत नाहीं. बोलता येत नाहीं. वेड्यासारखे दिसतात. त्यांस दिवाणजींनीं आपले पोटाकरतां सजवून दरबारांत आणावें. महाराजांस उठा म्हणून देखील सांगितले पाहिजे, तेव्हांच ते उठावयाचे, नाहीं तर उठावें केव्हां हेंही ठाऊक नाहीं. मग घरीं येऊन म्हणावें, ' वाहवा ! आज दरबारांत गेलों होतों, फार श्रम झाले. ' कारकुनानें पोटार्थाकरिता पुढें यावें आणि म्हणावें कीं, ' महाराज, आज साहेब फार खुष होता. आपल्यापाशीं फार बोलला. इतकें कोणापाशीं बोलत नाहीं. ' मग यजमानांनीं म्हणावें ' वा, आमचा दिवाणजी हुशार आहे. ' याप्रमाणें यांची अवस्था आहे.

सरकारास या लोकांशीं राजकारणार्थ सलूख राखण्याची जरूर आहे, म्हणून मात्र या लोकांचा मानपान ते करितात. नाहीं. तर या लोकांसारखे अप्रयोजक कोणी नाहींत; यांचे हातून कोणतेंही काम व्हावयाचें नाहीं. घरात व्यवस्था पाहिली तर दरबारापेक्षां अधिक. वाण्याची उचापत आणि सराफाचें कर्ज, त्यास व्याज शेंकडा २५ रुपये. ज खत कारकून लिहून आणील त्याजवर सही करतात. एखादे दिवशीं मेले म्हणजे सर्व सरकारांत जप्त होतें व सावकार बुडतात.

याप्रमाणें हे कारकून लोक व दिवाणजी यजमानास फसवितात. त्यांचे वडिलांनी मिळविलें असतें, तें सर्व चोरांचे हातीं जातें. एके दिवशीं मेजवानी करावी, सरकारचे कामगारांस जेवावयास बोलवावें, आणि यजमानास सांगावें कीं, " महाराज, आपलें सर्व

काम दरबारांत असतें, तेथें साहेब लोकास काय समजतें ? सर्व कामगारांचे हातीं; याजकरितां त्यांचे आर्जव संपादन केले पाहिजेत. " मग यजमानानें पुसावें कीं, ते आपल्या घरीं येतील काय ?

' होय महाराज, मी प्रयत्न करितों. मी दरबारची मंडळी अशी वश ठेवली आहे कीं, आपले कृपेनें आपले सेवकावर ते सर्व लोभ करितात. '

याप्रमाणें गोष्टी सांगून छमछमाट करावे.

' महाराज, कामगार असें म्हणतात, कीं, दोन हजार रुपये पाहिजेत. '

त्यांपैकीं एक हजार आपले घरीं व एक हजार कामगारांचे घरीं टाकून सरासरी यजमानास लुटून खातात. किती एक कामगार सरदारांचे येथें देव्हाऱ्यातील देवाप्रमाणें पूजन करण्यास योग्य असतात. यजमानास कारकुनानें सांगितलें कीं, महाराज, आपण यांस साष्टांग नमस्कार घातला पाहिजे. म्हणजे यजमान उठले !

याप्रमाणें कामगार व कारकून हे लोक सरदारांस बुडवितात. यांचे घरचे वाद वाढवितात. स्त्रियांचें व पुरुषांचेंही वितुष्ट पाडितात. म्हणजे आपलें पोट भरतें. व पैसा उधळावयास सांपडतो. यजमान मूर्ख त्यास आईपासून फितवितात, बापाशी वितुष्ट करवितात व स्त्रियांसही बिघडवितात. याप्रमाणें दुर्गुणी करतात. आणि त्यांस वीस वर्षे झालीं नाहींत, तो रोगिष्ट व दुर्गुणी करून त्यांचे घरावर पन्नास जप्त्या एकामागून एक बसवून ठेवितात. मग यजमान भीतींत पडतों. यास असें वाटतें कीं माझा कारभारी माहितगार आहे, त्यास सोडावें तर वाईट; अशा अडचणींत तो सांपडला म्हणजे त्याची मालमिळकत खातात. मग जे काय नेमून देतील तें खावें आणि बसावें. याप्रमाणे सरदार लोकांची अव्यवस्था आहे. त्यांस उजाडल्या मावळल्याची खबर नाहीं व योग्यता कांहीं नाहीं. व्यापाराच्या कामांत उपयोगी नाहीं. विद्वान् नाहींत. चाकरीं करण्यास बळकट नाहींत. सरासरी जिवंत मात्र असतात.

परंतु असे हे लोक जे जिवंत रहातात, त्यांचें जिणें फार वाईट आणि लज्जेचें आहे. मला वाटतें कीं, यांनीं आतां सरंजामाची आणि पेनशनाची आशा सोडावी. आपले सुधारणुकीकडे लागावें. शहाणपण शिकावें, मुलांस तयार करावें त्यांची लवकर लग्ने करूं नयेत, त्यांस चांगलें हुशार करावें, दत्तक घेऊं नये. दत्तक घेण्याचें कारण, तो आपलें श्राद्ध-पक्ष करील, हें लोकांस मुख्य वाटतें; पण हा मूर्खपणा आहे. जर अजून सरदार लोकांनीं सावधगिरी केली तर ते माणसांत येतील. मराठी ग्रंथ वाचून शोध करावे. आजपर्यंत जहालें तें जहालें. आपला मूर्खपणा पदरीं घ्यावा. अजून तरी बंदोबस्त करून कारकुनास घालवावें. तंटे करूं नयेत. वाद सांगूं नये. म्हणजे कामगारांचे आर्जव नकोत, आणि अब्रूनें रहावें; यांत शोभा आहे. नाहीं तर आणखी फजितीस कारण होईल.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. ४९ / २५ फेब्रुवारी १८४९ )

३३

# युरोपखंडांत प्रवास

जो चार देशाचें पाणी प्याला तो कोठेंही ठकला जाणार नाहीं, ही म्हण आमचे लोकांत प्रसिध्ध आहे. त्याप्रमाणें पहातां,जे खेडयांत राहाणारे शेतकरी लोक आणि त्यांचेच बंधू जे भाडे वगैरे कामाच्या कारणानें देशोदेशीं फिरतात, ह्या परपस्परांमधील भेद पाहातां देश फिरणारा हुशार असतो हें बहुधांचे लक्षांत आलें असेल, यांत संशय नाहीं. आतां खेडयांतील लोकापेक्षां शहरातील लोक हुशार असतात, व शहरांतील लोकांपेक्षां राजधानींतील लोक हुशार असतात असें दिसण्यांत येतें. यावरून असें दिसतें कीं, जेथें अनेक विद्वान,अनेक वर्तमानपत्रें, निरनिराळ्या देशांशीं व्यापाराची घडामोड, निरनिराळ्या विषयांवर होणाऱ्या अनेक सभा, राजकीय कारभार इत्यादि गोष्टी भरभराटीनें चालू आहेत अशा ठिकाणीं रहाणाऱ्या साधारण लोकांस सहाजीक ज्ञान प्राप्त होऊन सदसद्विचारी होतात. मग जे विद्वान आहेत ते सर्व प्रकारें चांगले होतील यांत संशय नाहीं.

इंग्लिश लोकांचे आपले देशांत राज्य होण्याचे पूर्वीं येथील कायदे, विद्या, कला–कौशल्य, रीतिभाती, देशाभिमान, राजा म्हणजे काय, पृथ्वी कशी व केवढी आहे, पुस्तकें सर्व लोकांस थोडया किमतींत मिळण्याचा प्रकार, मनुष्याचें कर्तृत्वकर्म, राजकीय कामांत दक्षता, समुद्रांतून परदेशांत जाणें इत्यादि गोष्टींविषयींचे ज्ञान कसें होतें व हल्लीं त्यांत किती अंतर पडलें आहे, हें मुंबईसारख्या मोठया शहरांत जे लोक येऊन जातात त्यांचे पूर्णपणें ध्यानांत येतें. आतां मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादि शहरांत युरोपियन लोकांच्या सहवासामुळे जे अमूल्य कारखाने, यंत्रें, कलाकौशल्य, वगैरे दृष्टीस पडतें तें त्यांच्या देशाशीं ताडून पाहिलें असतां कांहींच नाहीं असें आपल्यासही अनुमान होतें. व तिकडून जे लोक जाऊन आले तेही सांगतात.

जे लोक मुंबईस येऊन टंकसाळ, गिरण्या, गोदी, सुताचे कारखाने, बंदरावरील माल, मोठमोठाल्या इमारती, इत्यादी अनुपम कृत्यें पहातात, ते आश्चर्यभरीत होऊन ही विश्वकर्म्याचीच नगरी आहे कीं काय असें म्हणू लागतात; तर यापेक्षां शतपट आनंद होण्यासारखीं जीं युरोप देशांतील शहरें, तीं पाहणें कितीं सुखकारक व हितावह आहे हें साहजिक मनांत येईल. निरनिराळे देश पाहणें हें एक ज्ञानी होण्याचें मुख्य साधनच आहे. तर्कज्ञानी झाले असतां अनेक लोक ज्ञानी होतील. अशा लोकांनीं ही गोष्ट मनावर घेतली पाहिजे. असे लोक कोण म्हणाला तर आमचे देशांतील राजे,

संस्थानी (क), जाहागीरदार व श्रीमान, ह्या लोकांनीं मनावर घेतल्याखेरीज युरोपखंडांतील प्रवासाचा प्रघात पडून आपल्या देशाचें कल्याण व्हावयाचें नाहीं. कारण या गोष्टीस हजारों रुपये खर्च होईल, तो करण्यास त्यांच्याशिवाय दुसरे समर्थ नाहींत. हल्लीं आमचे लोकांत असा प्रकार आहे कीं, ज्यांस स्वदेशाच्या फायद्याच्या गोष्टी दिसतात ते दरिद्री आहेत. व जे श्रीमान आहेत त्यांस त्या गोष्टीचा वासही नाहीं, युरोपखंडांतील लोकांकडे पाहिलें असतां असें दिसतें कीं, जे संपत्तिमान असतात ते मोठे विद्वान व शाहाणे होतात. त्याचप्रमाणें राजाही पूर्वी शाळेंतील विद्याभ्यास संपऊन निरनिराळे सुधारलेल्या देशांत फिरतो. तेणेंकरून त्यास आपला देश म्हणजे काय, प्रजेचा आपला संबंध कशा प्रकारचा आहे, आपलें कर्तव्यकर्म काय वगैरे गोष्टी साहजीक कळून येतात. राणीचा वडील पुत्र ज्यास प्रीन्स आफ वेल्स असें म्हणतात, तो आमेरिका वगैरे देश फिरून नुकताच विलायतेस गेला हें आम्हीं आपल्या पत्रीं लिहिलेंच होतें.

तर देशांतर करणें हें ज्ञानवृध्धी होण्यास हेतुभूत असून त्याजपासून जिवास विलक्षण समाधान व आनंदही होतो. तर आमचे राजे, जाहागीरदार वगैरे लोक, ही गोष्ट मनावर घेतील तर त्यांचें हीत होऊन प्रजेचें कल्याण होईल. मनुष्य घरीं बसेल तर त्यास निरनिराळ्या सुखदायक व कल्याणकारक वस्तु जगांत आहेत, हें समजावयाचें नाहीं. मग त्या आपणास असाव्या अशी इच्छा तरी कोठून होणार ? सर्वांस अनुभव आहेच कीं, आपण बाहेर गेलों आणि चांगली वस्तु दृष्टीस पडली तर ती आपणांस असावी असें वाटतें. अगर कोणी घरीं आणली तरीही तसें वाटतें. याचप्रमाणें युरोपासारिख्या सुधारलेल्या खंडांत गेलें असतां तिकडील विद्या, कलाकौशल्य, मोठमोठालीं तारवें व बंदरें, सर्व पृथ्वीवरील देशांशीं व्यापार, निरनिराळे अवाढव्य व आणि चित्तवेधक कारखाने, कधीं जन्मांत पाहिले नाहीं असे विलक्षण पदार्थ, ह्या सर्व गोष्टी पाहून आमच्या राजांच्या मनांत त्या सर्व गोष्टींची माहिती करून घेण्याची इच्छा उत्पन्न होईल. मग अर्थातच ते त्या गोष्टी आपल्या देशांत चालू होण्याविषयीं यत्न करतील, यांत संशय नाहीं. हल्लीं ते जो आनंद म्हणून मानितात तो या आनंदापेक्षां फारच कमी आहे, असें त्यांचें चित्तास वाटूं लागेल. आतांच जर ते मुंबईसारख्या शहरांत आले आणि येथील मोठमोठाल्या व्यापाऱ्यांचे वाडे, त्यांतील सामान व सभोंवतील बाग वगैरे पाहातील तर आपला राजवाडा ह्या गरीब व्यापाऱ्यांपुढें तुच्छ आहे असें त्यास वाटेल. याचें कारण काय हें पाहिलें, तर त्यांच्या राजवाड्यांस ह्या व्यापाऱ्यांचे वाड्यांपेक्षां दसपट अधिक खर्च झाला असेल. परंतु बांधण्याचें व रचनेचें सौंदर्य नसून पदार्थही तसे नसतात. तर आमच्या राजादिकांनीं मुंबईसारखीं शहरें पाहून विलायतेस जाण्याचा प्रचार घालावा. तेथें आपल्या लोकांकरितां एक मोठा वाडा बांधून ठेवावा. असें केल्यानें तेथील सरकाराशीं अधीक सलगी पडून आपलें कल्याण होण्यास मोठा मार्ग होईल. या गोष्टीनें त्यांचें स्वतःचें कल्याण होऊन हल्लींपेक्षां शतपट अधिक सुख होईल. मग अर्थातच प्रजेचें

कल्याण केल्यासारखें होऊन ती त्यांचे गुण गावूं लागेल. विषय लांबला म्हणून पुरें करितों. परंतु पुढें लौकरच या गोष्टीकडे आम्ही आणखी वळूं.

(लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. ११७ / २५ ऑगस्ट १८६२)

३४

## हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाहीं?

हिंदुस्थान हा मोठा विस्तीर्ण देश आहे, परंतु याचा प्राचीन इतिहास कोणीं कधींच लिहिला नाहीं. ही एक मोठी चमत्कारिक गोष्ट आहे व याचीं कारणें सांगण्यास मोठीं अवघड आहेत. मूळ वेदांपासून प्राकृत कवितेपर्यंत हजारों ग्रंथ आहेत. परंतु इतिहासाचा ग्रंथ त्यांत नाहीं. तसेंच खरी काळगणना, खरा भुगोल, खरा इतिहास यांची व हिंदु लोकांची मुळींच ओळख नाहीं. लोक अविद्वान् असल्यामुळें ही गोष्ट फार थोडे लोकांचे लक्षांत वागते. परंतु ही खरी आहे यांत संशय नाहीं. वेदाचीं पुस्तकें पाहिलीं तर त्यांत यज्ञयागाच्या व कांहीं राजांच्या गोष्टी आहेत व त्याच ग्रंथाचें "उपब्रुव्हण" (पुनरावृत्ती) पुराणें आहेत. म्हणजे वेदांतील कथा अधिक तपशीलवार पुराणांत लिहिल्या आहेत व पुराणेंही बहुतकरून मतवादी लोकांनी आपलीं आपलीं दैवतें प्रसिद्ध करण्याकरितां लिहिली आहेत. म्हणजे कांही स्मार्तांनी, कांहीं वैष्णवांनी, कांहीं शाक्तांनीं, असीं लिहिलीं. व पुराणें म्हणजे जुन्या कथा, परंतु त्याविषयीं विचार पाहूं गेलें तर त्या सर्व ग्रंथांचे दोन हेतु दिसतात. एक ब्राह्मणांचें महात्म वाढविणें व दुसरें लोकांस गम्मत करणें. या धोरणानें सर्व पुराणें लिहिलीं असें त्यांचे प्रतिपृष्ठांत प्रमाण आहे व असंभाव्य किती लिहावें याचा तर लिहिणारांनी अंतपारच ठेविला नाहीं. त्यांनीं तापी नदीस सूर्याची कन्या आणि यमाची बहीण म्हटलें. सातपुड्या डोंगरास अगस्तीऋषीचा शिष्य केला. हिमालयापासून समुद्रापर्यंत जी विस्तीर्ण गंगा ती एका ब्राह्मणाचे मांडीत दडपिली. त्याचप्रमाणें सर्व सागर एकाचे आचमनास दिला. रामाची सर्व फौज वानरांची कल्पिली. तेव्हां अज्ञानी लोक जरी हें सर्व खरें मानतील, तरी विचारी लोक यास केवळ इतिहास असें म्हणणार नाहींत. शिवाय कोणती गोष्ट कधीं व कोठें झालीं, याचा ठिकाण नाहीं व शंभर गोष्टी खोट्या तर त्यांत

एकादी खरी व तिजबद्दल निश्चय होणें कठीण, तेव्हां त्या ग्रंथांचा इतिहासरूपानें उपयोग होऊं शकत नाहीं.

आतां रामायण जें आहें तें काव्यांत धरलें आहे व भारतास आणि हरिवंशास मात्र इतिहास समजतात. तरी त्यांतदेखील अशक्य गोष्टी बहुत आल्या आहेत; याजमुळें तेही ग्रंथ केवळ इतिहास म्हणतां येत नाहींत. अस्त्रांच्या लढाया, मंत्रविद्या, स्वर्गास जाऊन क्षणांत ऐरावत आणणें, आणि स्वर्गापर्यंत बाणांचा जिना करणें यास खरा इतिहास कोणी म्हणणार नाहीं. जे लोक अगदीं वेडावले आणि ज्यांचे खरें काय म्हणावें, खोटें काय म्हणावें याचीं स्फूर्ती राहिली नाहीं व ज्यांचें विचारांचें बीज अगदीं जळून गेलें ते मात्र अशा गोष्टी खऱ्या म्हणत असतील तर म्हणोत. आतां न्याय, वेदांत वगैरे शास्त्रांचें ग्रंथ पाहिले तर त्यांत ईश्वर आहे किंवा नाहीं, सृष्टी कोणी निर्माण केली व या सर्वांचीं मूळतत्त्वें किती, इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें देण्यासाठीं बहुत यत्न केले आहेत व कल्पनेचे वृक्ष फार मोठे वाढविले आहेत. त्यांत कांहीं इतिहास नाहींच. आतां काव्य, नाटकें, प्रबंध, सूत्रें, आन्हिकें, इत्यादि ग्रंथांत पाहिलें तरी इतिहास नाहींच.

याजमुळें मुसलमान लोक येण्यापूर्वी या देशांत व यांतील अनेक प्रांतांत म्हणजे दक्षिणेंत, गुजराथेंत, कर्नाटकांत, बंगाल्यांत वगैरे प्रांतीं काय होतें, राजे कोण होते, त्यांणीं केलें काय ? याचा ठिकाण नाहीं. आतां त्यांनी डोंगर कोरले, किल्ले बांधिले, देवळें, बांधलीं व शास्त्रें लिहिलीं, त्यांचे ताम्रपट शिक्के सांपडतात व त्यांच्या राजधान्यांचीं शहरें आहेत, याजवरून मोठाले राजवंश झाले होते असें दिसतें. परंतु त्यांचा इतिहास कांहींच राहिला नाहीं. याजमुळें मुसलमानांचे पाठीमागें या देशांत व्यवस्था कशी होती, तिचा ठिकाण लागत नाहीं. मुसलमान जेव्हा इकडे आले तेव्हां त्यांणीं मात्र आपण काय केलें व कोणतीं राज्यें घेतलीं, हें लिहून ठेविलें. याप्रमाणें फेरिष्टा, अबू फजल इत्यादी इतिहास लिहिणारे झाले, त्यांणीं मोंगलांची सर्व कारकीर्द वर्णन केली आहे. पुढें इंग्लिश लोकांचें येणें झालें, त्यांणींही हिंदुस्थानचे इतिहास बहुत लिहिले. परंतु हे सर्व इतिहास आलिकडचे म्हणजे एक हजार वर्षांचे आहेत. या एक हजार वर्षांपूर्वी या देशांत हिंदवी राज्यें कशीं होतीं, त्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. राम, कृष्ण बौध्ध, यांच्या थोडच्या थोडच्या गोष्टी आहेत; परंतु इतर राजांचा ठिकाण नाहीं. तेव्हा असें इतिहासाचें शून्य असण्याचें कारण काय ? हा प्रश्न साहजिक उद्भवतो. अस्तु.

आमचे समजुतीप्रमाणें आम्हांस कांहीं कारणें दिसतात तीं अशीं – प्रथम तर असें दिसतें, कीं, इतिहासापासून उपयोग आहे व खरा इतिहास लिहावा ही गोष्ट हिंदु लोकांस कळलीच नाहीं व हिंदुलोकांचे शाहाणपण इतक्या स्थितीवर आलें नाहीं आणि मुसलमान इतिहासकर्ते यांच्याविषयीं असेंच लिहितात कीं, हे लोक अगदीं अज्ञानी होते. यांस जिंकण्यास आम्हांस उशीर लागला नाहीं. उत्तर भागांत कांहीं शाहाणपण होतें, परंतु दक्षिणेंत उत्तरोत्तर अगदीं रानवट अवस्थेंत हिंदु लोक होते.

दुसरें कारण असें कीं, या देशांत अनेक भाषा चालत, याजमुळें लोकांची फारशी मिसळ होत नवती. कोकणांतील लोक कोकणांत व बंगाल्यांतील बंगाल्यांत असें हजारों वर्षेंपर्यंत वेगळेपणानें लोक राहिले. तेव्हां एकमेकांचा इतिहास लिहिण्याची त्यांस गरज पडली नाहीं. तिसरें कारण असें आहे कीं, हिंदु लोक निवृत्तीमार्गांत लक्ष ठेवणारे फार आहेत. त्यांस कांही ग्रंथ लिहिणें झालें तर त्यांत परमार्थ दिसला पाहिजे. त्यांनी या जगाची स्थिती वर्णन करण्यांत तादृश लाभ नाहीं असें मानून धर्मसंबंधीं कर्मकांडांचे ग्रंथ मात्र लिहिले. परंतु ऐहिक स्थितीवर लक्ष दिलें नाहीं. पुढें आलीकडे प्राकृत कवी तुकाराम, मोरोपंत, अच्युतराव मोडक, वगैरे जे झाले, त्यांनीं तरी धर्मसंबंधी, ईश्वराचे स्तुतिप्रकरणीं व ज्या कथा पवित्र मानल्या होत्या त्या प्रकरणीं मात्र ग्रंथ लिहून काढण्यांत जन्म घालविला. तसेंच रंगनाथ, रामदास, जयराम वगैरे बहुत ग्रंथकर्ते शिवाजीचे वेळेस होते. परंतु त्यांनींही मराठी राज्याचा इतिहास लिहिला नाहीं. पेशव्यांचें राज्य कमकसर शंभर वर्षे चाललें, परंतु पेशव्यांची किंवा त्यांचे पदरचे सरदार शिंदे, होळकर, पटवर्धन, विंचूरकर राजेबाहादर यांची बखर कोणी लिहिली नाहीं. पुरुषप्राधान्य ग्रंथ लिहिणें हें हलकें काम असें लोकांस वाटत होतें यास्तव जो तो कांहींतरी देवाचे ग्रंथ करी. याजमुळें मनुष्यांचे इतिहास लिहिले गेले नाहींत. मोरोपंतांनीं १०८ रामायणें केलीं, परंतु पेशव्यांचे राज्यावर कांहीं कविता केली नाहीं. यांचें कारण ती मेहेनत व्यर्थ जाते, असें त्यांस वाटत होते.

चौथें कारण असें कीं, मुसलमानी राज्य सातशे वर्षे चाललें. त्यांत बहुत ग्रंथांचा नाश झाला. हिंदुलोकांची मती अगदीं फिरली. त्यांच्या सर्व चाली बदलल्या व ग्रंथ करण्याचें काम अगदीं बुडालें. पांचवें कारण असें कीं, जी काय विद्या ती ब्राह्मणांचे हातीं होती. लिहिणें, वाचणें, कविता करणें हें सर्व ब्राह्मणांकडे आणि ते तर भिक्षुक, राजाश्रयानें पोट भरणारे. याजकरितां त्यांनीं खरा इतिहास निर्भयपणाने व भीड न धरतां लिहिला नाही. जें लिहिलें तें कोणी राजाची तारीफ व्हावी व त्यास बरें वाटावें या हेतूनें भलतेंभलतें लिहिलें. शालिवाहन पैठणचा राजा, याचे सर्व हत्ती घोडे मातीचे होते व ते अमृतानें जीवंत केले, इत्यादि अपूर्व व अशक्य गोष्टी लिहून स्तुती करून ठेविली आहे व त्यांत आपला थोरपणा जितका दडपेल तितका दडपला आहे. साहावें कारण, या देशांत नेहमीं वाद, तंटे व दंगे होत राहिले. कधी स्वस्थता नसे, याजमुळे खरे ग्रथाची वृद्धी झाली नाहीं. सातवें कारण असें कीं, मुसलमान येण्याचे पूर्वीं ग्रंथ लिहिण्याजोगें कांहीं झालेंच नाहीं. साधारण गोष्टी तर इतिहासांत लिहिण्याचे उपयोगी नाहींत. राजे जेवीत होते व निजत होते. या लिहिण्यात कांहीं शिक्षा नाहीं व उपयोग नाहीं. तेव्हां मोठें कांहीं झालेंच नाहीं; मग लिहावें तरी काय ? या कारणानें इतिहासाचे ग्रंथ झाले नाहींत.

आठवें कारण असें आहे कीं, जुन्या लोकांस अघटित वर्णन केलें तरच मौज वाटे व खरें वर्णन केलें तर त्यांत मौज नाहीं, अशी त्यांची समजूत होती. याचा दाखला इतर

देशांतर्हा आहे. जितके पृथ्वीवर देश आहेत, त्या सर्व देशांचे प्राचीन इतिहास आहेत ते किती एक पुराणांसारखेच आहेत. खरा इतिहास लिहिण्याची गोडी लोकांस आलीकडे लागली. प्राचीन काळी समजूत नवती, असें दिसतें. इराण देश मोठा विख्यात आहे; परंतु त्याचा इतिहास शाहानामा म्हणून साठ हजार श्लोकांचा फिरदुसी कवीनें लिहिला आहे. त्यांतही आघटित गोष्टी पुष्कळ लिहिल्या आहेत, कोणा देशाचा इतिहास हजार वर्षांचा आहे व कोणा देशाचा पंधराशें वर्षांचा आहे. त्याचे पाठीमागें कांहींएक नाहीं. नववें कारण असें आहे कीं, संस्कृत भाषा बुडाली. नंतर ग्रंथ करण्याचें काम थकलें आणि जुने ग्रंथ होते त्याजवरून नकला व भाषांतरें करण्याचें काम चालू राहिलें. नवीन ग्रंथ करावा असें कोणास सामर्थ्यही राहिलें नाहीं व पूर्वी आपले वडील भारतासारखे ग्रंथकर्ते झाले, त्यांचे वंशांतील सामर्थ्यहीन आपण, ग्रंथ कशाचे करावे? असें त्यांस वाटून त्यांनीं ग्रंथ करण्याचें काम बंद पाडिलें. कालिदास वगैरे यांणीं मौजेचे ग्रंथ म्हणजे काव्यें, नाटकें रचिलीं तींपण जुन्या ग्रंथांचेंच धोरणानें केलीं आहेत. नवीन ग्रंथ कोणी केला नाहीं. कमळाकर वगैरे यांणीं ग्रंथ केले ते तरी धर्मशास्त्राचे जुने ग्रंथ पाहून त्यांजवरून जुळवाजुळव केलेले आहेत. त्यांत नवीन कांहीं नाहीं. प्राकृत ग्रंथ झाले ते तरी सर्व याच प्रकारचे. त्यांत नवीन कांहीं नाहीं. संस्कृत भाषा बुडाली. नंतर लागलीच जैनधर्म उत्पन्न झाला. तो तर कितीएक दिवस चालला. त्या धर्माचे सर्व ग्रंथ बोबडे संस्कृत म्हणजे मागधी भाषेंत आहेत. पुढें ग्रंथ करण्याचें कामच थकलें. हेंही कारण इतिहास न होण्याचें आहे.

याप्रमाणें आम्ही हीं नऊ कारणें जरी सांगितलीं तरी हिंदुस्थानाचा प्राचीन इतिहास कां नाहीं, पृच्छेचें पूर्ण समाधान होईल असें नाहीं. परंतु तात्पर्य इतकेंच कीं, खरा इतिहास लिहिण्याचे योग्यतेस हिंदुलोक आलेच नव्हते. याजकरिता शिकंदर या देशांत आला. यवनाचें राज्य पूर्वी या देशांत होतें. पुढें मुसलमान आले. त्यांणीं राज्य केलें; इत्यादि गोष्टी परराष्ट्राचे इतिहासावरून घ्याव्या लागतात. स्वदेशीय लोकांनीं कोणाच्याविषयीं कांहीं लिहिलें नाही. तसेंच कांहीं चिन्हें दृष्टीस पडतात. त्यांजवरून अनुमानें करावीं लागतात व कितीएक शोधक लोक भाटांचे ग्रंथ, प्रबंध वगैरे आहेत, त्याजवरून यत्न करितात. परंतु त्यांजवरून तुटका इतिहास समजतो; संपूर्ण समजण्यास कांहीं आधार नाहीं व मुसलमानांचा अमल बसेपर्यंत खरा इतिहास काहीं नाहीं, असेंच म्हणणें योग्य आहे.

वास्तविक म्हटलें तर या देशांत चोहोंकडे शेंकडो राजे असतील. त्यांच्या नगऱ्या असतील. त्यांचे देश, शिक्के, करभार घेण्याचे दस्तूर, वगैरे परोपरीचे असतील. यांत संशय नाहीं. परंतु त्या सर्वांवर अगदीं पडदा पडला आहे. त्या वेळचीं जुनीं शहरें उज्जनी पैठण, महेश्वर, इत्यादि व त्यांणीं डोंगर कोरून ठेविले आहेत व किल्ले बांधले आहेत ते पाहून मात्र लोक आश्चर्य पावतात कीं, हें कोणी केलें असावें. परंतु तें करणाराचें नांव गांव व त्यावरील लिपीचें देखील स्मरण आतां राहिलें नाहीं. कोठें कोठें झालेले लेख ताम्रपट वगैरे आहेत. त्यांजवरून राजांची फक्त नांवे मात्र कळतात; परंतु येवढें कळून

उपयोग काय ? तेव्हां हें राष्ट्र कसें वृध्धी पावलें, त्या राजांनीं कशी वर्तणूक केली, कोणास जिंकलें, व रयतेचें पाळग्रहण कसें केलें, हें समजण्यास कांहीं आधार नाहीं. जागोजाग ऋषींचे आश्रम व देवांचीं स्थानें आहेत, अशा दंतकथा राहिल्या आहेत व ब्राह्मण आपलीं गोत्रें, सूत्रें शाखा सांगतात, परंतु त्याविषयीं कोणास कांहीं खरें ठाऊक नाहीं आणि जें ठाऊक आहे तें इतिहासाचे वर्गांत येत नाहीं. म्हणून त्यास बडबडकथा इतकें मात्र म्हणतां येतें. तेव्हां आतां खरें इतिहासाचे ग्रंथांस आणि या देशाचे ऊर्जितास एकदाच आरंभ झाला आहे हें खरें आहे. आतां पुढील इतिहासांत ईश्वर या देशांचें भूषण करो असें आम्ही ईश्वराजवळ मागतों.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह/पत्र क्र. १२८/२२ जानुआरी १८६५ )

३५

# महाराष्ट्र भाषा

महाराष्ट्र देश हा उत्तर आणि दक्षिण हिंदुस्थान यांचेमध्यें आहे. यांत गोंडवण, वराड, खानदेश, पुणें, देश, वाई देश, मिरज प्रांत, कोकण, बालेघाट वगैरे प्रांत आहेत. या देशास लागलेल्या भाषा कानडी, तैलंगी, हिंदवी, गुजराथी ह्या आहेत. यामध्यें बहुतकरून मराठी भाषा सारखीच बोलतात. परंतु प्रांतभेदानें कांहीं शब्दांच्या व मनुष्यांच्या सज-ढबीचा वेगळेपणा आहे. म्हणजे साताराचा मनुष्य किंवा कोकणचा मनुष्य नगरास ओळखला जाईल, व नगरचा कोकणांत ओळखला जाईल. आपलें वडिलांस जे पदार्थ दिसले आणि ज्या कल्पना झाल्या त्यांस, त्यांणीं जीं नांवें दिलीं त्या नांवांचा जो समुदाय, ती भाषा होय. पाहा, आपण ज्यास वेडा म्हणतों. त्यास कानडे लोक हूंचा म्हणतात. व गुजराथी गांज म्हणतात. आणि हिंदुस्थानांत दिवाणा म्हणतात. तेव्हां एकच पदार्थास जीं हीं अनेक नांवें दिलीं यांस आधार इतकाच दिसतो कीं, त्यांचे त्यांचे पूर्वज तसें म्हणत आले व आतां हे पूर्वजांचे संकेत त्यांचे त्यांचे वंशांत चालले, तेच वंश वृद्धिंगत होऊन देश झाले आहेत व राष्ट्रें झालीं आहेत. म्हणून तेच ते संकेत अधार करून लोक त्या त्या राष्ट्रांत ती ती भाषा बोलतात. व पुढें जों जों लोकांचे व्यवहार वाढत जातात, व इतर राष्ट्रांचें मिश्रीकरण होतें, तों तों एकमेकांचे शब्द उसने घेतले जाऊन भाषेची वृधी

होते. अज्ञानी स्थितींत जे लोक असतात, त्यांची भाषाही फार थोडीच असते. कारण त्यांचा व्यवहारच थोडा. डांगणांतील कोळी किंवा भिल्ल यांची सारी भाषा हजार पांचशें शब्दांत होते. कारण एक भाकर म्हटली म्हणजे त्यांच्या जेवणाचा सर्व जिल्हा आटपला. फार झालें तर दुसरें कोरड्यास म्हणजे पराकाष्ठा झाली. त्यांस घीवर, मोतीचूर, अनारसे हे मुळींच ठाऊक नाहींत; म्हणून त्यांस त्या प्रकरणांतील शब्दही ठाऊक नाहींत. त्याचप्रमाणें पटकूर म्हणजे बिछाना व पांघुरण, बिछाईत मग त्यांत सर्व वस्त्रवर्ग आला. पीतांबर, शालू, मच्छरदानी, चंद्रकळा त्यांस ठाऊक नसतात. याचप्रमाणें सर्व शब्दांचा संक्षेप होतो. सारांश इतकाच कीं, जों जों अधिक पदार्थ उपभोगूं लागतात व अधिक कल्पना करूं लागतात, तों तों अधिक शब्दांची योजना होते.

-परराष्ट्रांतील लोक येऊन मिसळ झाली, म्हणजे त्यांचे शब्द मिसळतात. मराठी भाषेची व्यवस्था मुळापासून पाहिली तर असें दिसतें कीं, महार लोकांचें मूळचें हें राष्ट्र होतें, व त्यासाठीं त्यास महारराष्ट्र असें नांव आहे. व हल्लींचे उच्चारांत मधील रचा लोप होत असतो. दंतकथा आहे कीं, हा घडशांचा मुल्लुक आहे. तें काय असेल तें असो. परंतु इतकें खरें कीं, महार लोक या देशांतील प्राचीन व मूळचे वतनदार आहेत. हरएक गावांत पाहिलें तर, महारांचें वतन मुख्य व पहिल्या ओळीचें असें मानलेलें आहे. व वतनावांचून बहुतेक कोठें महार सांपडणार नाहीं. त्यांस अतिशूद्र असेंही म्हणतात. 'अति' शब्दाचा अर्थ पलीकडले असाही होतो. तेंव्हां या देशांत शूद्र स्थापन होण्यापूर्वींचे हे लोक आहेत, असें दिसतें. या महार लोकांस प्रथम शूद्रांनीं जिंकून आपले गांव वसविले, आणि महारांस गावाबाहेर ठेविलें. तथापि त्यांचा संबंध गांवासीं राहिलाच. आतां हे शूद्र दक्षिणेकडून आले किंवा उत्तरेकडून आले, याचा ठिकाण नाहीं. तत्रापि उत्तरेकडून आले असावे असें अनुमान होतें. यांणीं पूर्णपणें महारांस जिंकिल्यावर त्यांचे पाठीमागून आर्य लोक या देशांत शिरले. आर्य म्हणजे ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, या त्रिवर्णाचे लोक. हे तीन वर्ण एका राष्ट्राचे होते, असें प्राचीन ग्रंथावरून सिध्ध होतें. म्हणजे भट, शिपाई आणि शेतकरी हा पुट्टा एक आणि या त्रिवर्णाचे अधिकारही एकसारखे. व प्राचीन काळीं त्यांच्या परस्पर सोयरिकाही होत होत्या, असें दिसतें. या आर्यांची भाषा संस्कृत होती, व हे पहिल्या महारांपेक्षां व दुसरे शुद्रांपेक्षां फार शहाणे होते. दर गांवीं पाहिलें तर पाटील व देशमूख शूद्र असतो; व त्याचे जोडीस कुळकरणी व देशपांड्या ब्राम्हण असतो. म्हणजे भागून जे आले ते पहिल्याचे हाताखालीं राहिले. तसेंच कोणी ग्रामउपाध्ये होऊन राहिले. परंतु त्यांस ग्रामाचें व प्रांताचें अधिपत्य मिळालें नाहीं. ते शूद्राकडे राहिलें व शूद्रांचे हे उपयोगीं पडूं लागले. आणि लिहिणारे विद्वान म्हणून यांस त्यांनीं आपली प्रधानकी दिली. आतां या देशांत मुळीं गांव कधीं वसलें हें पुरातन ग्रंथांवरून पाहिलें तर मनुवंशांतील जो ध्रुव त्याचा पणतू पृथुराजा याचे कारकीर्दीत ग्राम झाले, असे लेख आहेत.

प्राक्पृथोरिह नैवेषां पुरग्रामादि कल्पना ॥
यथासुख वसंति स्म तत्र तत्राकुतोभयाः ॥ १ ॥
भूमंडलमिदं वैन्यः प्रायश्चक्रे समं विभुः ।
ग्रामान् पुरः पतनानि दुर्गाणि विविधानि च ॥
घोषान् व्रजान् सशिबिरान् आकरान्खेटसर्वटान् ॥

--भागवत, स्कं. ४, अ. १८.

अशा दंतकथा आहेत कीं, पृथुराजाच्या कारकीर्दीत गांव, वाड्या, महाल, किल्ले वगैरे झाले. तेव्हां ही बहुत दिवसांची गोष्ट असावी. त्याचे पाठीमागील शूद्र त्यांचा इतिहास कांहीं राहिला नाहीं व त्यांचेही पलीकडील महार. तेव्हां त्यांचा तर मुळींच कांहीं नाहीं. हल्लीं गांवाबाहेर ते राहातात इतकें मात्र दिसतें. याप्रमाणें आर्यांची स्थापना झाल्यावर त्यांनीं शूद्रास चौथा वर्ण ठरवून आपलें राष्ट्रांत सामील करून घेतलें; इतकेंच नाहीं, पण त्यांची दैवतें वगैरे जीं या मुलूखांत लोकांमध्यें मानलीं जात होतीं; तींपण आपलें धर्मांत सामील करून घेतलीं. भवानी, खंडोबा, यलंमा, बहिरी, म्हसोबा, वेताळ हीं सर्व शूद्र दैवतें वगैरे आर्यांनीं आपल्यास ओढून घेऊन, त्यांचीं महात्में व कथा रचल्या. त्यांस श्रुती, स्मृती, सूत्रें यांत मुळींच स्थल नाहीं. पहिले शूद्र भूतपिशाच्य वगैरे देवाचे भजणारे होते, असें दिसतें. कारण त्यांचा मूळचा धर्म आर्यांनीं सुधारला आहे. तरी त्यांचे रेडे, जत्रा व गांवचे वेगवेगळे देव हे अद्याप कायम आहेत. व गांवचे शूद्र लोक तें आपलें भजन चालवितात. ब्राह्मणांचे कोणते पुस्तकांत जत्रा नाहींत; तरी शूद्र लोक केल्यावांचून राहात नाहींत. ब्राम्हणांचें पुस्तकांत जानाई, बहिरी, विरोबा हीं नाहींत. तरी गांवांत ते रयतेला देव आहेतच. त्याचप्रमाणें शूद्राच्या कितीएक क्रिया वेगळ्या आहेत. त्याचप्रमाणें महारांच्याही आहेत. बारीक शोध करणाऱ्यांचे लक्षांत या गोष्टी सहज येण्यासारख्या आहेत. महार लोक जे होते ते फक्त रानचे जनावरांचें व आपले वडिलांचें भजन करणारे होतें. म्हणजे वाघोबा हाच त्यांचा देव. आपले वडिलांची मूर्ती करून किंवा पुरल्या ठिकाणीं दगड मांडून त्यास ते भजतात. अतिशय अज्ञानी लोकांस याहून दुसरें भजन काय असावें ? तसेंच मेले मनुष्याची क्रिया म्हणजे त्यांची इतकी समजूत आहे कीं, जो मेला त्यास खावयास कोण देणार नाहीं. याजकरितां मेल्यास पुरल्याठिकाणीं ते जोंधळे नेवून ठेवतात, पानसुपारी ठेवतात, पाणी ठेवितात, कांहीं सुपें टोपली असा संसार नेऊन ठेवितात, पदरीं पैसे बांधितात आणि तितक्यानें त्यांची सामोग्री असें समजतात. आतां आर्यांचें पंचतत्त्वांचें भजन, पिंडोदक क्रिया, संस्कार इत्यादि प्रकारचा धर्म, शूद्रांच्या धर्मापेक्षां बरा होता; म्हणून तो कित्येकांशीं शूद्रांनीं घेतला. या प्रमाणें मिसळ झाली. तेव्हां अर्थातच मूळची महारी भाषा जी होती, तिजवर मुलामे होऊन संस्कृताची जिल्हई झाली. आतां मराठी कोश कोणी पाहिला तर शब्दांवर खुणा केल्या आहेत. त्यांत मूळचे मराठी शब्द किती व त्यांत संस्कृत मिसळ किती झाली आहे, हे सहज लक्षांत येईल

अस्तु. त्यानंतर कितीएक कालपर्यंत आर्य व शूद्र यांचा एकवटपणा होऊन राहिला. तेव्हां वेदांचें कर्म कृषी तें त्यांनीं शूद्राचे ठाईं स्थापून फक्त व्यापार मात्र आपणाकडे ठेविला. मूळची रीती अशी नाहीं. कारण गीतेंत,

**"कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्मस्वभावजं."** [ १८-४४ ]

असें सांगितलें आहे. पुढें शूद्रांनीं माहारांस जसें दास केलें तसें आर्यांनीं शूद्रांस दास केलें. व त्यानंतर मुसलमान आणि फिरंगी हे या देशांत शिरले. त्यामुळें त्यांचेंही कितीएक शब्द या भाषेंत आले. या प्रमाणें हें राष्ट्र अनेक राष्ट्रांस मिसळले जाऊन ही भाषा त्यांचे त्यांचे शब्दांचें मिश्रण होऊन चालू झालेली आहे.

हजार वर्षांचें पूर्वीं ही भाषा वेगळे प्रकारची होती. तेव्हां हीस मागधी असें म्हणत. या भाषेंत जैनांचीं पुस्तकें आहेत. व माहाराष्ट्र देशांत प्राचीन जैन बहुत आहेत व जैनांची देवळेंही पुष्कळ आहेत. या नंतर हेमाडपंतांचे कारकीर्दीस पिशाच्यलिपी चालू झाली; म्हणजे बाळबोध बंद होऊन मोडी निघाली. पुढें ज्ञानेश्वर, मुकुंदराज यांचें कवितेंत जी भाषा सांपडते त्या प्रकारची चालू झाली. व त्याआलीकडे मोरोपंतांपर्यंत संस्कृताचे आधारानें ही भाषा सुधारली. व दरबारी भाषा फारशी आणि आरबीचे जोरानें सुधारली.

या भाषेस व्याकरण नवतें तें आलीकडे झालें व इंग्रजी अमलांत या भाषेची सुधारणा बरीच झाली व हींतही नवीन ग्रंथ होत आहेत. आजपर्यंत जे ग्रंथ झाले ते संस्कृताचे आधारानें झालें. जे जे कवी झाले त्यांणीं भारताचा, रामायणाचा आधार धरून ग्रंथ केले व आतां इंग्रजी ग्रंथांचा आधार धरून नवीन पध्धतीचे ग्रंथ झाले व होत आहेत. आणि आतां सर्व उद्योगांनी या भाषेची भरतीच होत चालली आहे. व हींत वर्तमानपत्रें व मासीक पुस्तकें वगैरे चालू झालीं आहेत. याजमुळें अनेक विषय इजमध्यें वादांत येतात. तेव्हां हें एक भाषा सुधारण्यास मोठेंच कारण आहे. परंतु मराठी ग्रंथ अद्याप फार आहेत, असें नाहीं. हरएक राष्ट्राची ज्ञानाची गणती त्या राष्ट्रांतील ग्रंथांचे सामोग्रीवरून करतां येते. जसें इंग्रजी भाषेंत अनंत ग्रंथ आहेत, त्या प्रमाणें इंग्रजांचें शाहाणपणही आहे. संस्कृत भाषेंत ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें हिंदुलोकांचें शाहाणपण आहे. फारशी भाषेंत ग्रंथ आहेत, त्याप्रमाणें इराणचे लोक शाहाणें आहेत. व त्याचप्रमाणें मराठी भाषेंत जितके ग्रंथ आहेत, तितकेच मराठे शाहाणें आहेत. तेव्हां ग्रंथसमुदाय वाढविणें, हें लोकांचे शाहाणपण वाढविणें असें आहे. आणि भाषेंत ज्ञानवृध्धीकर ग्रंथ असावे हेंच भाषेस व राष्ट्रास भूषण आहे. ज्या लोकांत ग्रंथ नाहींत, त्यांस आपण आडाणी म्हणतों. महार वगैरे जुने लोक यांस ग्रंथ नाहींत; याजमुळें ते अज्ञानांत गणिले आहेत. ब्राम्हणांजवळ ग्रंथ आहेत; म्हणून त्यांस आर्य म्हणजे श्रेष्ठ म्हटलें आहे. तेव्हां आपलें भाषेंत याहून अधीक चांगले ग्रंथ जों जों होतील तों तों आपणा महाराष्ट्र जनांस अधिक श्रेष्ठपणा येईल. हें आजचे भाषणांतील

रहस्य लक्षांत ठेऊन भाषा सुधारण्याचे कामीं जी साह्यता होईल ती आपण करावी हें एक आपलें कर्तव्यकर्म आहे.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. १३८ / ४ डिसेंबर १८६४ )

३८

# शत्रूंस शरण जाऊन कुलास बाटविणें कालत्रयीही होणें नाहीं !

**प्रतापसिंगाचें राज्यारोहण आणि त्याचा पुढील उद्योग**

प्रतापसिंग उदेपूरच्या गादीवर बसला व त्या गादीचा त्याजकडे सर्वांशी हक्क होता. त्याचें कुळ म्हणजे मेवाडांत सुप्रसिद्ध होतें; त्यामुळे त्या कुळाचें वैभव व सामर्थ्य यथापूर्व कायम राहून त्याजकडून मेवाडचें सौभाग्य रक्षण व्हावें असें सर्व इच्छित होते. पण काल अनुकूल असल्याशिवाय कोणतीही सिद्धि किंवा यश मिळत नाहीं हा सर्वत्र अनुभव आहे. प्रतापसिंग गादीवर बसला खरा. परंतु त्याच्या खजिन्यांत द्रव्य मुळींच नव्हतें व तें कसें मिळवावें यालाही कांहीं युक्ती नव्हती. कारण, त्याच्या पूर्वजांनी द्रव्योत्पत्तीचीं साधनें व जागा सर्व गमावून या स्थितीस राजकुल आणून सोडिलें होतें अशी जरी स्थिती होती तरी प्रतापसिंगाची उमेद, आशा आणि इभ्रत फार मोठी होती. तो ज्या कीर्त्तिमान् कुळांत जन्मला होता त्या कुळाच्या नांवलौकिकाप्रमाणेंच तो गुणशीलानें युक्त होता. त्याणें प्रथमतः चितोड स्वाधीन करून आपलें गेलेलें नांव व यश पुनः मिळवावयाचें म्हणजे आपल्याला पुढील विशेष कृत्यें करण्यासहीं सामर्थ्य येईल, असा विचार केला. आणि त्याप्रमाणें बेत ठरवून त्याणें ताबडतोब चितोडावरील स्वारीची तयारी केली. परंतु या उतावळीमध्यें त्याणें आपल्या शत्रूचें बळ व सामर्थ्य यांचा कांहीं एक अजमास बघितला नाहीं व ही स्वारी करण्यांत आपल्याला प्रतिकूल काय काय गोष्टी आहेत हेंही पाहिलें नाहीं.

प्रतापसिगाला आपल्या पूर्वजांच्या बखरी व इतिहास वाचण्याची फार गोडी असून त्यांत त्यांच्या नाना पराक्रमाचीं कृत्यें तो हम्मेषा वाचीत असे, व त्याचप्रमाणें पूर्वजांचे गुणानुवाद आणि पराक्रमशालित्व भाटांच्या मुखांनीं त्याच्या कानावर नेहमीं पडत असल्यामुळें, त्याणें जेव्हा वरील चितोडच्या स्वारीचा बेत केला तेव्हां तर त्याची अशी खात्री झाली कीं, हल्लींच्या प्रसंगीं मला या स्वारींत खास यशप्राप्ती होईल. तो म्हणाला, आजपर्यंत दैव प्रतिकूल होतें; परंतु आतां आपण जर श्रम केले तर तें अनुकूल होणार नाहीं म्हणून कशावरून? प्रतापसिगाचा हा विचार कांहीं वावगा नव्हता. श्रमावांचून प्रारब्ध पंगू आहे ही गोष्ट कांहीं खोटी नाहीं. परंतु नुस्त्या श्रमांनीं तरी काय होणार आहे ? त्या श्रमांना बाहेरच्या उपांगांची सिद्धता पाहिजे. त्या उपांगांची जेव्हां सिद्धता नाहीं असे त्यांस कळलें तेव्हां त्याचें हृदय दुःखपूरित होऊन त्याला मनस्वी क्लेश झाले. त्याला ही मोठी आशा होती कीं, मी मेवाडचें पूर्वस्वातंत्र्य त्यास पुनः मिळवून देईन. परंतु त्याची ती आशा, ती महत्वाकांक्षा आणि ते बेत पुढें सर्व फसून त्यांत तो स्वतः फशीं पडल्यासारखा झाला. आजपर्यंत या राजकुलाशीं ज्या ठाकुरांचा स्नेहसंबंध असून ज्यांजकडून वखतावर यथाशक्ति साह्य मिळत असे ते मारवाड, अंभेर, विकानीर, आणि बुंदी येथील सुद्धां सर्व राजे फितून त्याचा शत्रु जो अकबर त्यांस मिळाले. आणि मोंगलांचा तर हा दस्तूर होता कीं, दुस्मानाकडील जे मदतगार असतील त्यांजमध्यें फूट पाडली म्हणजे काम झालें. त्याप्रमाणें, त्यांणी अगोदरपासूनच वरील राजांस आपलेकडे वळवून ठेविलें होतें. प्रतापसिंगाला हें कपटजाल कांहीं एक माहित नव्हतें. त्याला सर्वप्रकारें असा भरंवसा होता कीं, आपण बेत ठरवून गोष्ट काढल्याबरोबर आपल्या पूर्वापार साह्यकर्त्या राजांची कुमक मिळेलच. पण त्या भरंवशाप्रमाणें त्याला कांहींच अनुभव आला नाहीं; इतकेंच नाहीं तर त्याचा खुद्द संगराजी ह्मणून एक भाऊ होता तो देखील या वेळीं फितूर होऊन प्रतिपक्षाकडे मिळाला. या फितुरीमुळें संगराजी ● याला मोंगलांनीं चितोडच्या गादीवर बसविलें व त्याच्या पूर्वजांचें राणा हें नांव त्याजकडे कायम केलें.

## प्रतापसिंगाचा कृतनिश्चय

इतक्या गोष्टी झाल्या तरी प्रतापसिंग हा बिलकुल डगला नाहीं त्याचा चितोड काबीज करण्याचा बेत फसल्यामुळें तर त्याची दुःस्थिती व तज्जन्य दुःखें जास्त दुणावलीं.

● संगराजी याजकडे कंदाहार प्रांतही होता. तेथें जो त्याचा वंश वाढला त्यांच्यातून पुरुषांस संगरावत असें म्हणत असून त्यांजकडे तो प्रांत, अंभेरचा शिवाजीजयसिंग याणें, घेईपर्यंत होता. शिवाजीजयसिंग हा मोंगलांचे ताब्यांतील एका प्रांताचा सुभेदार होता. व त्याच्या कुटुंबांतील मनुष्यांशीं संगरावत वंशीय लोक विवाहसंबंध करण्यास नाखुष असल्यामुळें शिवाजीजयसिंगास राग येऊन त्याणें त्यांस कंदाहार येथून हुसकून लाविलें. जहांगीर बादशाहाचा मोठा पराक्रमी व लढवय्या सरदार जो मोहबतखान तो वरील संगरावतांपैकींच एक असून त्याणें हिंदुधर्म टाकून मुसलमानी धर्म स्वीकारिला होता. या संगरावतांनीं मध्य हिंदुस्थानांत उमरी भदोरा, गणेशगंज, दिगडोळी वगैरे लहान संस्थानें स्थापिलीं होतीं. हीं इंग्रजांपेक्षां शिंद्याच्या सरदारांस विशेष माहित होतीं.

तरी त्याणें सुमारें पंचवीस वर्षेंपर्यंत याप्रमाणेंच असहाय व निराधार असें एकटें राहून मोंगलांशीं बांकून दिवस काढिले. इतक्या दिवसांत त्याला नाना प्रकारचीं संकटें व हाल भोगावे लागले. कधीं कधीं तो उघड मैदानांत शत्रूंशीं सामना करून त्यांत त्यांचा नाश करी, व कधीं कधीं त्यालाच डोंगरांतून व आडरानांतून वनफळांवर निर्वाह करीत जीव व कुटुंब घेऊन लपत फिरावें लागे. या पळण्यामध्यें त्याचा पुत्र उमराव, जो पुढें त्याच्या सर्व वैभवाचा मालक आणि शत्रूंचा सूड उगविणारा कुलदीपक झाला तो, लहान बालक असून त्याला घेऊन, क्रूर व हिंस्र पशूंच्या वसतिस्थानांतून व त्यांच्याच तोडीचे भिल्ल वगैरे रानटीं लोकांसह जंगलांतून प्रतापराण्याला फिरावें लागे. अकबर त्याला ह्मणे, तूं मला शरण ये ह्मणजे मी तुला तुझें राज्य वगैरे सर्व परत देतों. परंतु त्याचा, अभिमान फारच जाज्वल असे कीं, मी बाप्पारावळाचा वंशज असून शत्रूला शरण जाऊन त्याजपुढें मान वाकवूं आणि माझ्या परम अभिमानशाली रजपूतकुळास बाटवूं, ही गोष्ट तर कालत्रयीं होणार नाहीं. या वेळीं मोंगलांनीं मोठेमोठे प्रांत व संस्थाने देऊन, त्या लोभानें पुष्कळ रजपूत राजांच्या मुलीं आपल्या वंशात केल्या. व त्याचप्रमाणें प्रतापराण्याच्या सिसोदिया वंशालाही मोठें राज्य देऊन मिंधें करण्याचा मोंगल बादशाहाचा प्रयत्न चालला होता. परंतु प्रतापसिंगाने तशा प्रकारचें नीच कृत्य करून ऐश्वर्यसुख भोगणें रौरववासापेक्षांही अतिशय निंद्य मानिलें होतें.

## त्याची धीरगंभीरता

मनुष्याची परीक्षा संकटकालींच होते. यातना, हाल, कष्ट व विपत्ति भोगूनही जो प्रतापसिंग धैर्य व उमेद न सोडतां सागरासारखा गंभीर आणि पर्वतासारखा स्थिर राहिला, त्याचा लौकिक त्या काळीं मेवाडांतील प्रत्येक पर्वतगुहेंत व थडींत जणूं काय प्रतिध्वनि करीत होता. त्याची धीरगंभीरता प्रत्येक रजपुताच्या अंतःकरणांत प्रतिबिंबित होऊन, त्यांचें त्यांनाच असें वाटूं लागावें कीं, अशा संकटग्रस्त व दुःखभाक् राजाला आपण साह्य करावें. कोणी लहान लहान राजे त्याला यथासामर्थ्य साह्य करीत. प्रतापाचे सुखत्याग, धैर्य आणि त्याचा स्वकुलाविषयीं अद्वितीय अभिमान यांची वर्णने मेवाड प्रांतांत सर्व राजकुळांतून गातात व तीं गातांना त्याच्या पराक्रमाचे त्यांस स्मरण होऊन सद्गदितपणें ते अश्रुपात करितात ! ●

---

● याविषयीं हा इतिहास लिहिणारा टॉड साहेब हा खुद्द असें लिहितो कीं, " मी इतिहाससंशोधनार्थ फिरत असतां व रजपुतांच्या वीर्यपराक्रमाचीं ठिकाणें बघत असतां, अनेक डोंगर व किल्ले चढलों; पुष्कळ नद्या नाले ओलांडून गेलों; आणि कित्येक मैदानें हिंडलो. हीं सर्व स्थलें जणूं काय प्रतापसिंगाच्या व तत्पूर्वजांच्या प्रतापशाली राज्यकारकीर्दीचे प्रवेशामागून प्रवेश आणि देखाव्यामागून देखावे दाखविणारीं नाटकगृहेंच आहेत असें मला भासलें. या फिरण्यांत मी जयमल्ल व पट्टा यांचे वंशजांना भेटून त्यांच्या पूर्वजांच्या हकीकती विचारीत पुसीत होतों व तेव्हां कित्येक वेळां ते त्या हकीकतींचीं गीतें म्हणून दाखवीत असतां त्यांच्या डोळ्यांतून गहिंवर येऊन टिपें निघालेलीं मीं पाहिलीं आहेत! "

प्रतापराण्याला अशा दुःखसंकटकालीं ज्यांणीं साह्य केलें त्यांजवर प्रतापाच्या पूर्वजांचें उपकार होते. आलीकडे या राणेवंशाला अपयश आणि दारिद्र्य यांणीं घेरिल्यामुळें या साह्यकर्त्यांनीं आपला इमानीपणा राखिला हें त्यांस मोठें भूषण होय. राणा गतवैभव व दरिद्री झाला म्हणून त्याला सोडून त्याजविषयीं ते निरभिमान झाले नाहींत हा त्यांचा थोरपणा प्रशंसनीय होय यांत संशय नाहीं. प्रतापराण्याचा सावत्र भाऊ जयमल्ल याचे मुलगे आपल्या चुलत्याला साह्य करण्याकरितां आपला रक्तपात करण्याला देखील सिद्ध होते. त्याचप्रमाणें साळुंब्रा येथील चोंडावंशीय पट्टाराजाचे मुलगेही आपली स्वामीभक्ति आणि इमानीपणा जागविण्यास पुढें झाले होते. यामुळें आणि प्रतापाच्या प्रतापशाली वर्तनामुळें वर लिहिल्याप्रमाणें देलवाडा वगैरे ठिकाणचे आणखी कित्येक लहान लहान ठाकूर व राजे त्याच्याबरोबर समरांगणीं पडण्याकरितां आपखुषीनें व अनाहूत येऊन प्रतापसिंगाला मिळाले. या साह्यकर्त्यांमध्यें देलवाडचा ठाकूर तर आपला उजवा हात आहे असें प्रताप राणा ह्मणत असे.

## प्रतापाची उदासीनता आणि विलाससुखत्याग

चितोडच्या राज्यासनावरून उदेपूरचे राणे पदभ्रष्ट झाल्यापासून चितोड नगरीला वैधव्य आलें होतें, असें त्या वेळच्या भाटांनीं म्हटलें आहे. हें वैधव्य घालवून त्या नगरीचें स्वामित्व आपले वंशाकडे आणण्याचा प्रतापसिंगाचा निश्चय झाला होता व तो निश्चय शेवटास जाईपर्यंत कोणत्याही प्रकारचें विलाससुख भोगावयाचें नाहीं असा त्याणें पण केला होता : त्याणें सोन्यारूप्याचीं ताटें वाटचा यांतून खाणेंपिणें वर्ज्य करून पत्रावळी व द्रोण यांच्यांतून भोजन करीत जावें; त्याणें बिछान्यावर निजणें सोडून गवताच्या आसनावर शयन करावें; व त्याचप्रमाणें त्याणें एखाद्या तपस्व्याप्रमाणें दाढी वाढविली होती. ह्या त्याच्या विदेहीपणाच्या खाजगी खुणा व चिन्हें झालीं. पण त्याणें आपला हा वैभवसंपादनाचा निश्चय सर्वश्रुत करण्याकरितां, सर्व प्रसिद्ध समारंभातून व सेनेमध्ये नौबदी व नगारे वाजविण्याची चाल होती ती मुळींच बंद केली. प्रतापसिंगाचा हा विदेहीपणा मेवाडच्या राजघराण्यांत अजूनही अंशतः तरी चालू आहे. ते डोकीचे केश व दाढी तर वाढवितातच. परंतु जरी ते सोन्यारुप्याच्या पात्रांतून खाणेंपिणें चालवितात व बिछान्यांवर निजतात तरी धातुपात्रांच्या खालीं पानें व बिछान्यांखालीं गवत घालीत असतात. इतका त्यांणीं नियम अजून पाळिला आहे.

प्रतापसिंग नेहमीं असें म्हणत असे कीं, 'संगराण्याचे मागून उदेसिंग झाला नसता तर मोंगलांचें येवढे प्राबल्य वाढलें नसतें व राजस्थानांत त्यांचा अम्मल झाला नसता.' तरी जीं राज्यें पूर्वीं अगदीं जर्जर झालीं होतीं तीं या शतकांत सावरून सजीव होऊं लागलीं होतीं. गंगा व यमुना या दोन्ही नद्यांच्या मधील प्रांतांत हळूहळू कांहीं विशेष महत्वाच्या गोष्टी घडून येऊं लागल्या. त्याचप्रमाणें अंमेर आणि मारवाड येथील राजांनीं वर डोकीं उचलून गतवैभव मिळविण्यास कमरा बांधिल्या. त्यांत मारवाडच्या राजानें तर दिल्ली येथील शिरशाहाचा पराभव केल्यामुळें तो बराच प्रबळ झाला. आणि याच–

प्रमाणें चंबळानदीच्या दोन्ही तीरचे बरेच संस्थानिक ठाकूर जोरवान् होऊं लागले होते. ह्याप्रमाणें चोहोंकडून अगदीं सिद्धता होती. ह्या सर्व राजमंडळास एक कोणी पराक्रमी पुरुष पुढारी पाहिजे होता, ह्मणजे मुसलमानांच्या हातांत गेलेलें चितोढचें राजछत्र तेव्हांच काबीज करण्यास उशीर नव्हता. आणि अशा प्रकारचा पराक्रमी व शूर पुरुष त्या वेळीं त्या सर्वांच्या सुदैवानें संगराणा मिळाला होता. संगराण्याची कुलीनता आणि शौर्य हीं हिमालयापासून रामेश्वरापर्यंत सर्वमान्य होतीं असा योग्य पुरुष पुरोगामी मिळाल्यावर सर्व राजांनीं व ठाकुरांनीं आपआपलीं राज्यें व मुलूख काबीज करण्याकरितां मनोभावें-करून संगराण्यास साह्य केलें होतें. व तेंच साह्य त्यांजकडून, मध्यंतरी उदेसिंगासारखा भीरू व पळपट्या राजा झाला नसता किंवा अकबरासारखा पराक्रमी बादशाहा त्या कालीं त्यांच्या दुस्मानांत नसता तर, संगाचा नातू जो प्रतापसिंग यालाही मिळून, रजपुतांचा राज्यदीप पुनरपि उज्ज्वलित झाला असता. परंतु त्या दोन्ही गोष्टी अनिष्ट झाल्यामुळें त्या राजांस व ठाकुरांस तितका दम न राहून ते मेवाडच्या राण्यास साह्य करण्याविषयीं अगदीं उदासीन झाले होते. उदेसिंगाच्या भीरुपणामुळें आणि अकबराच्या पराक्रमानें त्यांस राण्याला कोणत्याही प्रकारची मदत करण्याची उमेद राहिली नव्हती. ह्याप्रमाणें प्रतापसिंग हा केवळ असहाय असा, आपल्या राज्यप्राप्तीची महत्वाकांक्षा धरून, होतील ते प्रयत्न हळूहळू करीत होता.

## त्याची लढाईची सिद्धता

प्रतापानें पुढें कांही दूरदर्शी व अनुभविक अशा कित्येक राजांच्या व संस्थानिकांच्या मदतीनें व मसलतीनें, आपल्या पुढील हेतुसिद्धीस साधनीभूत अशा कांहीं व्यवस्था चालविल्या. त्याणें कोणीं किती व कशा प्रकारें साह्य करावें याबद्दलचे नियम ठरवून टाकिले; आणि सरदारांना व आश्रितांना नव्यानव्या जाहगिरी व इनामें देऊन त्यांस उत्तेजन दिलें कीं, त्यामुळें त्यांना हुरूप येऊन स्वामिकार्यार्थ झटून पडण्याची त्यांस उमेद यावी. प्रतापसिंग हा या वेळीं कुमळमेर येथें राहत होता, व तेंच त्याच्या राज्याचें राजधानीचे शहर झालें होतें. ह्मणून त्याणें त्या शहरास तेथील किल्ल्यास आणि गोगुंडा वगैरे इतर किल्ल्यास तट वगैरे घालून व त्यांजवर गडकरी ठेवून चांगला बंदोबस्त केला. त्याचप्रमाणें त्याणें सपाटीचा मुलूख ओसाडच ठेवून आपली सर्व रयत डोंगरी प्रांतांत राहण्यास पाठवून दिली. ह्याप्रमाणें त्याणें बनास व बेरीस या दोन नद्यांच्या उभय तटांवरील सर्व पिकाऊ मुलूख बेचिराक ( निर्मनुष्य-दिवा लावण्यास कोणी नाहीं असा) करून ठेविला होता.

प्रतापसिंगानें येणेंप्रमाणें जो बंदोबस्त व व्यवस्था चालविली होती त्या संबंधानें केलेल्या ठरावांस किंवा हुकुमांस जो कोणी मोडील अथवा अमान्य करील त्यास त्याणें फार कडक शासन ठेविलें होतें. व ह्याप्रमाणें त्याणें कित्येकांस त्यांच्या बेहुकमतीबद्दल अशीं कडक शासनेंही केलीं; अशाविषयीं अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. आपण केलेली

व्यवस्था व लावून दिलेलीं कामें बरोबर रीतीनें लोक करीत आहेत किंवा नाहींत हें पाहण्याकरितां तो स्वत: कांहीं घोडेस्वार बरोबर घेऊन आपल्या बंदोबस्ताच्या ठिकाणीं फिरत असे. अशा प्रकारच्या व्यवस्थेनें तो सर्व प्रांत शत्रूला वैराण दिसू लागला. जेथें मोठमोठीं धान्यांचीं शेतें उगवावयाची तेथें जिकडे तिकडे गवताचें रान माजलें; ज्या राजमार्गांवरून नेहमीं लोकांची व रथघोडयांची दाटी असावयाची तेथें बाभूळ वगैरे कांटेरी झुडपांची दाटी झाली; आणि जेथें मोठमोठीं राजमंदिरें व धनिकांची गृहें होतीं तेथें सर्वत्र क्रूर व हिंसक अशा वनपशूंची वस्ती झाली. या वेळीं सुरतेस जो विलायती माल येत असे तो व्यापाराकरितां व बादशहाकडे दिल्लीस जात असे. तो माल जाण्याचा रस्ता मेवाडांतूनच असल्यामुळें प्रतापानें मध्येंच तो माल लुटून न्यावा व तो व्यापार बंद पाडावा, असा क्रम चालविला होता.

## अकबराची तयारी व त्याला रजपुतांची मदत

येणेंप्रमाणें प्रतापसिंगाची व्यवस्था व धामधूम चालली असतां अकबरानें रजपुतांशीं लढाई देण्याची तयारी चालविली. त्याणें दिल्लीहून आपलें सैन्य उठवून त्याचा अजमीरास मुख्य गोट केला. त्या वेळीं अजमीर हें त्याच्या राज्यांतील २२ सुभ्यांपैकीं एक सुभा होतें. त्यामुळें तेथें त्याचें बादशाही ठाणें व थोडी बहुत फौज असें पूर्वींपासून असेच. ह्या वेळीं अकबराला रजपूत राजांपैकीं चांगले चांगले राजे मिळाले होते. शिरशाहबरोबर मोठ्या शौर्यानें लढणारा मारवाडचा ठाकूर मालदेव जो हुमायूनाच्या दैवदुर्विलासांतही त्याला पकडण्याच्या विचारांत होता तो जयपूरच्या भगवानदासाप्रमाणेंच शेवटीं अकबराला मिळाला. आणि प्रतापसिंग गादीवर बसल्यानंतर दोन वर्षांनींच ह्मणजे इ० स० १५६९ या वर्षीं त्याणें आपला मुलगा उदेसिंग यास खंडणी देऊन अकबराकडे पाठविला. उदेसिंगाची व अकबराची नागोरास गांठ पडली. त्या वेळीं अकबर वर लिहिल्याप्रमाणें प्रतापाचा समाचार घेण्याकरितां आपली फौज घेऊन दिल्लीहून अजमीरास येण्याकरितां निघाला होता. याच वेळीं अकबरानें मंदोर येथील राबास राजा असा किताब व वरील मारवाडचा राजपुत्र उदेसिंग यास 'मोठा राजा' अशी पदवी दिली. त्याचप्रमाणें कन्नोजच्या राजाचे वंशजांस उजवीकडचा मान देण्याची सनद दिली. ह्याप्रमाणें त्या वेळीं आपल्याला रजपुतांची अनुकूलता मिळविण्याविषयीं जें जें करणें इष्ट व उचित वाटलें तें तें अकबरानें करण्यास हयगय केली नाहीं. व त्याप्रमाणें या नुस्त्या मानसन्मानालाच लुब्ध होणारे लब्धप्रतिष्ठ व जात्यभिमानशून्य असे अधम रजपूत राजे त्याला पुष्कळ मिळत चालले. त्यांतही मारवाडच्या राठोडानें तर आपला लोभीपणा आणि हलकट बुद्धि दाखविण्याची कमालच केली. त्याणें रजपूत जातीच्या अभिमानाला व वैभवाला अत्यंत अनुचित असें काम करण्याचा पाया घातला व त्या नीच कामाबद्दल जी त्याला देणगी आणि पदव्या मिळाल्या, त्यांबद्दल तो आपल्यास मोठें भूषण समजूं लागला. मारवाडच्या मालदेवानें अकबराशीं सख्य करण्याकरितां आपला पुत्र उदेसिंग यास देणगी व नजराणा देऊन पाठविल्याचें व त्याची व अकबराची नागोराजवळ गांठ पडल्याचें जें नुक्तेंच वर सांगितलें, त्या उदेसिंगानें

अकबराच्या चरणीं बापानें पाठविलेली खंडणी व नजर अर्पण करूनच नुस्तें 'सख्य' जोडिलें नाहीं; तर आपली कन्या जोधबाई ● ही उपवरा झाली होती ती अकबर बादशाहाचे मुलास देऊन 'सख्यसंबंध 'जोडिला! बादशाहाशीं केलेल्या या नव्या सोयरिकीबद्दल बादशाहानेंही त्याचे उपकार ठेविले नाहींत. या वधूदानानें उदेसिंग राठोड याचा बादशाहाचे दरबारीं सर्व रजपूत स्नेही राजांपेक्षां फार मोठा मानमरातब वाढला इतकेंच नव्हे; तर या अपूर्व महत्कृत्याबद्दल अकबर बादशाहानें आपल्या या रजपूत व्याह्यास पुढें लिहिलेला पंधरा लाखांचा मुलूख तोडून दिला :-- गोदवाड, ९ लाख; उज्जनप्रांत, २ लाख; देवलपूर, १॥ लाख; व बडनावर २॥ लाख. यामुळें मारवाडच्या राजाचें ( जोधपूरचें ) उत्पन्न दुप्पट वाढलें. याचप्रमाणें जयपूरवाल्यांनींही केलें. तेव्हां त्यांची हीं उदाहरणें बघून नंतर राजस्थानच्या इतर किरकोळ ठाकुरांनींही तोच मार्ग स्वीकारून, दिल्लीच्या तख्ताला शरणागत होऊन त्या दरबारीं ते पूर्वीपेक्षां अधिक वैभव व मान पावले. येणेंप्रमाणें रजपुतांसारख्या अभिमानी व शूर लोकांकडून नीच मानलेल्या व कट्टे दुस्मान झालेल्या मोंगल लोकांबरोबर बेटीव्यवहार सुरू व्हावा, या अघटित घटनेचें मुसलमानी इतिहास लेखकांस मोठें महत्व वाटून, त्यांणीं आपल्या ग्रंथांतून अशा मिश्र सोयरिकी करणाऱ्या रजपूत राजांस, " दिल्लीच्या बादशाहीचे एककालीन आधारस्तंभ व भूषणें " असें म्हटलें आहे. परंतु यांत आश्चर्य नाहीं.

रजपूत बांधवांच्या या नीचतम कृत्यांनीं प्रतापसिंगाचें अंत:करण अगदीं खवळून गेलें. या कृत्यांच्या योगानें त्यांचें प्रतापसिंगाशीं वैर वाढलें इतकेंच नव्हे, तर त्यांणीं आपल्या उच्च कुलांस कलंक लाविला. प्रतापाला आजपर्यंत एकटा अकबर हा मोंगलच दुस्मान होता; परंतु आतां तर त्याचे जातभाई देखील त्याच्या शत्रुमालिकेंत आल्यामुळें त्याची तद्विषयक काळजी व चिंता जास्त वाढावी हें साहजिकच होतें. परंतु तो त्याबद्दल बिलकुल गडबडला नाहीं. बहुतकरून प्रत्येक रजपूत ठाकूर आपली बहीण, मुलगी किंवा आप्तस्वकीयांतली एखादी वधू मुसलमानी घराण्यांत देऊन दिल्ली दरबारचा अंकित व सरदार झाला होता. इतकेंच नव्हे; तर किती एक रजपूत ठाकुरांनीं स्वधर्मत्याग करून मुसलमानी धर्मही स्वीकारिला. नाहीं ह्मणायला बुंदीचा ठाकूर मात्र या कलंका-पासून दूर राहिला होता. ह्याप्रमाणें जों जों रजपुतांचा निंद्य प्रकार प्रतापसिंग पाही, तों तों त्याचा निश्चय आणि मोंगलांशीं शत्रुत्व हीं वाढत चाललीं. त्याणें मुसलमानांबरोबर कन्याव्यवहार ठेवणाऱ्या एकंदर रजपूत कुळांशीं, निष्कलंक राहिलेल्या कोणाही रजपुतानें सोयरगत करूं नये, असा सक्त हुकूम केला. मात्र दिल्ली, पट्टण, मारवाड आणि धार येथील फार जुनीं कुळें, ज्यांणी वरील निंदाचरणापासून आपलीं कुळें बचावलीं त्यांशीं सोयरगत ठेवावी असें ठरविलें. प्रतापसिंगानें जो हा ठराव केला तो त्याच्या अस्तित्वापर्यंत

● ही अकबरपौत्र शहाजहान याची आई असून, तिची सुंदर व भव्य कबर आग्र्याजवळ सिकंदरा नांवाच्या गांवीं अकबराच्या कबरेजवळच आहे.

तर चाललाच. परंतु त्याचे पश्चात् दिल्लीचें तख्त बुडेपर्यंतही तो नियम अव्याहत चालून जयपूर–जोधपूरच्या घराण्यांशीं मेवाडच्या राणेवंशियांनीं मुळींच सोयरसंबंध ठेविला नाही.

## बेटी व्यवहाराविषयीं इतर रजपुतांचें राण्याशीं बोलणें

वरील दोन्हीं घराण्यांतले बखतसिंग व जयसिंग हे पूर्ववतच दिल्ली दरबारांत मोठे प्रतिष्ठित व श्रीमान् सरदार होते; व राणेवंशीय अगदीं गरीब व गतवैभव असे राजे झाले होते, परंतु त्यांणीं त्यांशीं सोयरसंबंध अगदीं बंद ठेविल्यामुळें त्या दोन्ही घराण्यांस अपमान वाटून त्यांणीं राणेवंशियांबरोबर, आमच्याशीं सोयरसंबंध ठेवा, ह्मणून विनंतिपत्रें पाठविलीं. ते अस्सल कागद उदेपूरच्या दफ्तरांत अजून आहेत. त्यांत त्यांणीं असें विनम्रपणें म्हटलें आहे कीं, " आम्हाला शुद्ध करून घ्या" " आमचें पुनः उपनयन करून आह्माला पुनर्जन्म द्या " " आह्माला रजपूत बनवा " इत्यादि. याप्रमाणें त्या घराण्यांस मोठा पश्चात्ताप झाला. परंतु त्यांच्या ह्या विनवण्या पहिलीं शंभर वर्षेपर्यंत तर मुळींच कोणीं ऐकिल्या नाहींत. पुढें राणेवंशीयांनीं त्यांचें ह्मणणें कबूल केलें. तें तरी अशा अटींवर कीं, त्यांणीं पुनरपि आपल्या मुली, बहिणी किंवा इतर रजपूतकन्या मुसलमानांस देऊं नयेत; व उदेपूरच्या वंशातल्या मुली ज्यांस दिल्या जातील त्या मुलींचेच पुत्र त्या त्या गादीचे वारस होतील– मग ते मुलगे अज्ञान असोत किंवा कसेही असोत. पुढें दिल्लीची बादशाही आटोपल्यावर तर रजपूत कुळांकडून हे नियम अनायासेंच निर्वेधपणे पाळले गेले.

## मुसलमानांशी संबंध ठेवणाऱ्या रजपुतांशीं सिसोदियांचें वर्तन

उदेपूरच्या राणेवंशाचा ( सिसोदियांचा ) अभिमान आणि पावित्र्य यांचा लौकिक आणि वजन रजपूत लोकांत किती होते याविषयींचीं एक गोष्ट येथें प्रसंगोपात सांगितल्यास वावगी होणार नाहीं;

अंभेरचा राजा मानसिंग हा या काळीं फार प्रसिद्ध होता.तो महापराक्रमी असून त्याचे वेळेपासूनच त्याच्या प्रांताला ऊर्जितावस्था प्राप्त झाली असें म्हणतात. अंभेर (जयपूर)चा राजा भगवानदास–मानसिंगाचा बाप–याचे वेळेस बाबरानें रजपुतांच्या मुली मोंगलांस करण्याचा प्रचार पाडिला व त्याप्रमाणें भगवान याणें आपली मुलगी प्रथमतः शहाजादा (युवराज) हुमायून यास दिली होती. तेव्हा अर्थात् मानसिंग हा अकबराचा मामा होत होता. जयपूरचे राजे पहिल्यापासूनच चांगले पराक्रमी असल्यामुळें त्यांजपासूनच या सोयरिकीनें मोंगल बादशाहीचें फार कल्याण झालें. मानसिंग हा बुद्धिमान् आणि धाडसी असल्यामुळें दिल्ली दरबारांत असलेल्या पराक्रमी सरदारांमध्ये तो श्रेष्ठ होता. अकबराला जो कांहीं जय मिळून त्याच्या कीर्तीचा डिंडिम वाजतो आहे त्याचें अर्धे श्रेय त्याचा मामा

मानसिंग याच्या शौर्यपराक्रमाकडे आहे. मानसिंगानें दिल्लीच्या बादशाहीकरितां पश्चिमेस काबूल आणि पूर्वेस ब्रह्मदेशांतील अराकान, इतका प्रांत जिंकून बादशाहीकडे दिला. ● हा जो त्याणें येवढा जय मिळविला या कामांत त्याणें केवळ आपल्याच फौजेकडून काम केलें. मुसलमानी फौज मुळींच घेतली नाहीं. † अकबराला रजपूत राजांचें मन कसें वळवावें व त्यांचे अभिमान काय असतात हें पूर्णपणें माहित होतें, व त्याप्रमाणें तो त्यांशी

---

● राजा मानसिंग हा अकबराचा विजय प्रसृत करण्याकरितां याप्रमाणें मुलुखगिरीला निघाला असतां सिंधु नदीच्या [ अटक नदीच्या ] जवळ येऊन पोहोंचला. हिंदु लोकांस अटक नदीच्या पलीकडे जाण्याविषयीं धर्मशास्त्राचा प्रतिबंध असल्यामुळें मानसिंग तेंथेंच थांबला, त्याच्यानें धर्मशास्त्रोल्लंघन करून अटक नदीचें उल्लंघन करवेना. व ह्या मजकुराचें त्याणें अकबरास पत्र लिहिलें. तेव्हां अकबरानें त्याला जें उत्तर पाठविलें त्यांत त्याणें हा पुढील दोहरा लिहून त्याच्या शंकेचें समाधान केलें-

**सब हैं भूम गोपालकी, उसमें अटक कहां ?**
**जिसका मनमें अटक है, सो ही अटक रहा !**

हें समाधान पाहून मानसिंगानें आपला दिग्विजय पुढें चालवून पूर्ण केला. अशी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.

† केवळ आपलीच एकजातीची फौज बाळगून तिजकडून विजय संपादन करणें हा अभिमान कांहीं सामान्य नाहीं. मानसिंगाचा असाच अभिमान होता असें दिसतें. तरी, फौज एकजातीची असली तरच विजय होतो आणि एक जातीची नसली तर होत नाहीं असें कांहीं नाहीं. फौजेकडून जयापजय होणें हें मुख्यत्वें करून तिच्या मुख्य सरदारावर अवलंबून आहे. फौजेचा पुढारी चांगला धोरणी, युक्तिवान्, अनुभविक आणि शूर असला म्हणजे त्याची आज्ञा, फौज जीवांत जीव आहे, तोंपर्यंत तर कांहीं सहसा व्यर्थ दवडीत नाहीं. दक्षिणेंत शिवाजी महाराजांनीं जो पराक्रम केला तोही असाच एकजातीच्या मराठी फौजेकडून केला. परंतु पराक्रम किंवा जय हा फौजेच्या एकजातीवरच नसून तिजवरील मुख्याच्या नैपुण्यावर आणि युद्धकौशल्यावर मुख्यत्वें अवलंबून असतो ही गोष्ट सर्वदा लक्ष्यांत ठेविली पाहिजे. हल्लींच बघितलें तर इंग्रज सरकारची जी फौज आहे ती एकाच जातीची नसून तिजमध्यें अठरापगड जातींचे लोकांचा समावेश आहे. म्हणून त्यांच्या पराक्रमांत कांही कुचराई किंवा कपट आहे असें नाहीं. त्यांचे जनरल असें हुशार असतात कीं, अशा नानाजातियुक्त सैन्याला, काबूल, मिसर, इराण, माल्टा वगैरे कोठेंही दूर दूरच्या ठिकाणीं नेलें तरी त्यांजकडून व्हावयाचें तें शौर्य तें गाजवितातच. फौजेवरील सरदार जर लेचापेचा आणि कमकुवत असला तर मग मात्र तिची भंबेरी उडून जावयाची हा सिद्धांत होय.

त्यांचें मन खुष राहील असें वर्तन करीत असे. त्यामुळें रजपूत राजे ह्मणजे त्याचे अगदीं अभिमानी व कैवारी मित्र व चाकर झाले होते.

राजा मानसिंग हा एके वेळीं दिल्लीच्या बादशाहाचे वतीनें दक्षिणेंतील सोलापूर प्रांत काबीज करून परत हिंदुस्थानांत चालला असतां, कुमळमेर येथें प्रतापसिंग होता ह्मणून त्याचे भेटीकरितां त्याणें तेथें मुक्काम केला. राजा मानसिंग आपल्या भेटीकरितां येथें आला आहे असें ऐकतांच प्रतापसिंग त्याला उदेसागर नांवाच्या तलावा–पर्यंत सामोरा येऊन त्याणें त्याचा करावयाचा त्या रीतीनें मोठा मानसन्मान केला; आणि त्याला एक मेजवानी दिली. मेंजवानीची सर्व तयारी होऊन पात्रें वाढिलीं व राजा मानसिंग याला भोजनास बोलावणें पाठविलें. त्याप्रमाणें तो आला. परंतु प्रतापसिंग मुद्दाम आपला मुलगा उमराव याला मानसिंगाचे तर्तुदीस ठेवून आपण कपाळ दुखतें ह्मणून त्या समारंभास गेला नाहीं. मानसिंगानें राणा कां आला नाहीं ? ह्मणून उमराव यास विचारितां त्याणें, राणे साहेबाची प्रकृति स्वस्थ नसून कपाळ दुखतें आहे, असें सांगितलें. त्यावर मानसिंग म्हणाला, राणे साहेबांची प्रकृति अस्वस्थ कां आहे व त्यांणीं कपाळ दुखण्याचें कां निमित्त केलें हें मी समजलों परंतु ज्याकरितां त्यांणीं असें मिष केलें ती गोष्ट कांहीं आतां परत येत नाहीं. ते जर येथें येत नाहींत तर आमचे बरोबर कोण जेवणार? त्यावर राण्याकडून उत्तर आलें कीं, तुम्हीं त्याबद्दल राग मानूं नये, माझ्यानें या प्रसंगास येववत नाहीं. यावरही आणखी कांहीं प्रश्नोत्तरें परस्परांमध्यें फिरलीं; व शेवटीं प्रतापसिगराण्यानें साफ सांगून पाठविलें कीं, ज्या रजपुतानें आपली बहीण मोंगलास दिली तो त्या यवनाबरोबरही जेवला असेलच. तेव्हा अशा भ्रष्ट रजपुताचे बरोबर बसून भोजन करणें मला प्रशस्त वाटत नाहीं. हें अपमानकारक उत्तर ऐकून मानसिंग तसाच पुढें आलेल्या अन्नाला नमस्कार करून पात्राला स्पर्श न करितां उठला. इतक्यांत राणा तेथें आला. त्यास पाहून मानसिंग त्याला म्हणाला, आम्ही आपल्या बहिणी मोंगलास दिल्या याचें कारण तुमचें राज्य निर्वेधपणें कायम राहावें म्हणून. तो आणखी म्हणाला कीं, अशा प्रकारच्या कृत्यानें आमचा मान तर गेलाच आहे, परंतु तुमचा मान तरी रहावा म्हणून आम्ही झटत आहोंत; असें असून जर तुम्हाला आमच्याविषयीं वैषम्य वाटत असेल तर तुमच्या स्थितीलाही धोका येऊन तुमचें या देशांत पाऊलही राहावयाचें नाहीं; त्याचें प्रायश्चित्त तुम्हास भोगावें लागेल. त्यावर राण्यानें उत्तर दिलें, बरें आहे; तसा प्रसंग आल्यास पाहून घेऊ. हें उत्तर ऐकिल्याबरोबर मानसिंग रिकिबींत पाय ठेवून घोडयावर स्वार झाला; आणि राण्याकडे वळून म्हणाला, मी तुझा हा मान खालीं करीन तरच नांवाचा मान होईन. त्यावर पुनः राण्यानें उत्तर केलें, फार चांगलें; मला त्यांतच आनंद आहे. परंतु जेव्हां आमचा मान खालीं करावयास तुम्ही याल तेव्हां आपल्या भाच्यास घेऊन या ह्मणजे झालें. ह्याप्रमाणें मानसिंग मोठ्या रागानें तेथून निघून गेला. परंतु त्याबद्दल प्रतापानें मुळींच फिकीर बाळगिली नाहीं. राजा मानसिंग निघून गेल्यावर जेथें त्याजकरितां पात्रें वगैरे मांडिलीं होतीं, ती जागा सर्व झाडून सारवून

पवित्र केली. त्याचप्रमाणें त्या मेजवानीच्या संबंधाचीं सर्व पात्रें व भांडींकुंडीं धुऊन टाकविलीं; आणि सर्वांनीं, मानसिंगच्या संसर्गदोषजन्यपातकापासून मुक्त व्हावें म्हणून सचैल स्नानें करून व सर्वत्र गंगोदक शिंपडून शुद्धता केली.

## मानसिंगाच्या अपमानाचा सूड घेण्याची तयारी

हा झालेला सर्व प्रकार दिल्ली येथें अकबर बादशाहास कळून त्याला मोठा राग आला. राजा मानसिंगाचा प्रतापसिंगानें जो अपमान केला तो केवळ माझाच अपमान केला असें त्यास वाटून, आजपर्यंत जें आपण समजत होतों कीं, राजपुतांचा पीळ आणि अभिमान मोडला, तें खोटें आहे, असें त्याला कळून आलें. नंतर त्याणें प्रतापाशीं युद्ध करण्याची तयारी करून कूच केलें. पुढें ही लढाई हाळदीघांट येथें झाली. तिजमध्यें प्रतापाची जी कीर्ति झाली ती, जोपर्यंत मेवाडांत सिसोदिया या कुळींचे राजे आहेत तोंपर्यंत सारखी राहील व कोणताही भाट त्या कीर्तिचें वर्णन करण्यास कधींही चुकणार नाहीं ह्या लढाईत खुद्द अकबर नव्हता; तर त्याचा मुलगा युवराज सेलीम हा असून, तो राजा मानसिंग याचे अनुसंधानानें चालत असे या सैन्याबरोबर सागरजीचा बाटलेला मुलगा मोहबतखान हाही होता. प्रतापाकडे वीस हजार सैन्य अकबराचे मुलाबरोबर झुंजण्यास सिद्ध असून, त्यास डोंगरांचा व जंगलांचा आश्रय चांगला होता.

## प्रतापसिंगाची युद्धार्थ सिद्धता

बादशाही फौज मुलखांत शिरून हळदीघांटाकडे वळली आणि राण्याची फौज कुमळमेर येथून निघून पश्चिमेच्या अंगास ऋखभनाथकडे फिरली. ऋखभनाथाचें ● खोरें ह्मणजे प्रचंड डोंगर व नद्या यांणीं वेष्टित असून फार अडचणीचें आहे. या खोऱ्यामध्यें शिरण्याच्या बाऱ्या फारच अरुंद, एक गाडी चालेल इतक्या रुंदीच्या, असून त्या बाऱ्यांचे दोहों बाजूंस मोठमोठे उंच उंच खडक आहेत. कुमळमेरपासून ऋखभनाथ हें स्थान उत्तर-दक्षिण ४० कोस लांब आहे. ह्या सर्व गोष्टींमुळें कुमळमेर हें ठाणें साहजिकच चोहोंकडून पक्क्या बंदोबस्ताचें झालें होतें. त्यांतही राण्यानें आपले कडवे रजपूत लोक खालीं व वर उंच खडकांवर असे चोहोंकडे ठेविले असून त्यांना त्या प्रांतांतले मूळचे रहिवाशी जे भिल्ल लोक ते आपल्या जुन्या आयुधांसह तीरकमठे घेऊन मोठमोठे दगड शत्रूंवर ढकलण्याकरितां बरोबर घेऊन साह्यार्थ सिद्ध होते.

---

● ऋखभनाथ हें स्थान ऋखभदेव किंवा ऋषभदेव या नांवानें गुजराथेंत प्रसिद्ध आहे. अमदाबादेपासून आमनगर व ईडर४ कोस आहे; तेथून वीस कोसांवर अगदी झाडींत सामळाजी ह्मणून स्थान आहे; त्यापुढें केशरीनाथ म्हणून श्रावकांचें एक क्षेत्र असून त्यापुढें ऋषभदेव हें स्थान झाडींत व डोंगरी प्रदेशांत आहे. अमदाबादेपासून ऋषभदेवाला जाण्याचा हा मार्ग आहे.

**त्याचे व सेलिमाचें युद्ध**

प्रतापसिंगाला या समयीं बरेच रजपूत लोक येऊन मिळाले होते. त्यामुळें त्यास विशेष अवसान आलें. त्याणें आपलें किरमिजी रंगाचें निशाण आपल्या सैन्याचे पुरोभागीं उभें केलें होतें व त्याचे लोक निकरानें लढण्यास सिद्ध होते. हा सर्व लढाईचा योग मूळ मानसिंगानें आणिला; त्या अर्थी मानसिंग हा मुख्यत्वें करून प्रतापाचा द्वेष्टा झाला होता परंतु कसा झाला तरी तो आपला रजपूत आहे ह्मणून त्याचा प्रथमतः सूड घेण्यापूर्वी प्रतापानें सेलिमावर मुख्यत्वेंकरून शस्त्र धरिलें. त्याणें त्याचे सर्व लोक तोडून टाकून नीट त्याचे हत्तीवर चाल केली. सेलीम हा हत्तीवरील हौद्यांत बसला होता. त्याला मारण्याकरितां प्रताप आपल्या कृष्णवर्ण चित्तक नांवाच्या अश्वावर बसून हत्तीवर धांवला. नंतर भाल्याच्या वारांनीं त्याणें सेलिमाच्या मागील व पुढील तैनातीच्या लोकांस हत्तीवरून हाणून खालीं पाडिलें; आणि त्याच्या घोडयानें लगेच पुढील दोन्ही पाय हत्तीवर दिल्याबरोबर सेलिमावर प्रतापानें भाल्याचा वार केला परंतु तो भाला हौद्यावरच लागून सेलीम बचावला. त्या हौद्याला बाहेरून लोखंडी पत्रे लाविले होते, त्यामुळें हौद्यांत भाला शिरला नाहीं. येणेंप्रमाणें सेलीम मोठे मुष्किलीनें वांचला. नाहीं तर याच वेळीं तो प्रतापाच्या हातानें समरभूमीवर पडावयाचा होता. प्रतापाच्या एकंदर शौर्यवीर्याचे प्रसंगीं त्याच्या वरील आवडत्या घोडयानें जीं कामें केलीं तीं त्याच्या बखरींत फार चांगल्या रीतीनें वर्णिलीं आहेत. त्या घोडयानें अनेक प्रसंगीं आपल्या यजमानास मोठमोठ्या संकटांतून वांचविलें होतें. अस्तु. प्रतापानें पहिल्यानें हत्तीवरील महावत व सेलिमाचे इतर तैनातदार यांस मारून पाडिल्यामुळें हत्तीला आवरणारा सेलिमाजवळ कोणीच नव्हता व यामुळें तो हत्ती तुफान होऊन रणभूमीमध्यें अनावर झाला. व तेणेंकरून त्याच वेळीं प्रतापाच्या हातानें जो सेलीम मरणार होता तो अनायासेंच वांचला. ह्या वेळीं सेलीमाची अशी दशा पाहून त्याच्या संरक्षणास त्याचे मोंगल लोक धांवले व प्रतापाच्या विजयास हात लावण्याकरितां मेवाडदेशचे अभिमानी रजपूत प्रतापाचे साह्यार्थ त्याचे मागें पुढें झाले. ह्या वेळीं प्रतापसिंगाला सात जखमा–तीन भाल्याच्या, एक गोळीची आणि तीन तलवारीच्या–झाल्या. होत्या ह्या समयीं दोहों फौजांची मोठीच लढाई झाली. प्रतापसिंगाचे मस्तकावर नेहमीं राजछत्र असे, त्या खुणेवर सेलिमाचे फौजेनें त्याला वेढा दिला. त्यांतून तो तीन वेळां सुटून गेला. तरी शेवटीं त्याचे पाठीस शत्रूची फौज लागलीच. परंतु त्याचा घोडा उत्कृष्ट होता म्हणून तो निभावला. एकदां तर शत्रुसैन्यानें त्याला अगदींच गांठिलें होतें, आणि पुढें बघतो तों ओढा होता. तेव्हां त्याणें घोडयाला अम्मळ दाबिलें; त्यासरसा घोडा उडी मारून ओढयाचे पार गेला. तेव्हां अर्थात् शत्रूचे लोक तितकेच थबकले, असे प्रसंग तर प्रतापाला वारंवार आले होते व अनेक संकटांतून तो आपल्या घोडयामळेंच बचावला होता. त्या घोडयाला जखमाही पुष्कळ लागल्या होत्या, त्यामुळेंच त्याच्यानें टिकाव धरवेना आणि अकबराच्या फौजेनें तर त्याचा अगदीं पिच्छा पकडला होता.

### प्रतापसिंगाचें पलायन व त्याजवरील संकटें

एकदां तो असाच एकाकी आपल्या वरील घोड्यावर बसून शत्रूच्या लोकांस चुकवीत आड वाटेनें फिरत असतां त्याच्या मागें मोंगल पठाण लागले. त्या दिवशीं सारा दिवसभर प्रताप घोड्यावरच असून घोडा एकसारखा दवडत होता; आणि वर लिहिल्याप्रमाणें तर शत्रू पाठीवर येऊन ठेपले. त्यांना हुलकावीत हुलकावीत प्रतापसिंग आपला बचाव करण्यास बघत होता. परंतु घोडा अगदीं श्रमून गेला. त्याच्यानें पाऊल उचलेना. अनेक ओढे नाले विलक्षण आणीबाणीच्या प्रसंगीं कुदून गेल्यानें तो घोडा फारच श्रांत झाला होता. इतक्यांत मागून त्याच्या देशभाषेंत कोणी, " अरे, निळ्या घोड्यावरच्या स्वारा ! भिऊं नकोस; " असें मोठ्यानें ओरडून बोलल्याचें त्याणें ऐकिलें. त्याबरोबर त्याला धीर येऊन त्याणें मागें उलटून बघितलें तों–आश्चर्याची गोष्ट ही कीं, तो त्याला धीर देणारा त्याचा फितूर झालेला भाऊ होता असें त्याला दिसलें !

( उदेपूरचा इतिहास )

३७

## पृथ्वीराजाचा इतिहास

कयमाषाच्या मृत्यूनें उदासलेल्या मनाचें सांत्वन करण्याकरितां म्हणून पृथ्वीराज शिकारीस निघाला व त्यांत सुदैवानें शहाबुद्दीन गोरीवर त्यांस जय मिळून त्याची कीर्ति वाढली. पुढें त्यास असें समजलें कीं, कन्नोजची राजकन्या संयोगता ईणें आपल्यालाच वरण्याचा निश्चय केला आहे. तेव्हां तिचें हरण करण्याकरितां कन्नोजावर स्वारी करण्याचा त्याणें निश्चय केला. परंतु कन्नोजच्या राजाचें बल फार मोठें असून त्याजपुढें आपला टिकाव लागणार नाहीं असें त्यास वाटून, 'ह्याला काय उपाय करावा?' ह्मणून त्याणें आपल्या सर्व सामंतमंडळीची सभा भरवून त्यांस प्रश्न केला. तेव्हां त्यांचीही निराशाच दिसली. तरी त्यांणीं राजास सांगितलें की, आपल्याला काहीं जयचंदाची संपत्ति व ऐश्वर्य हरण करून आणण्याची इच्छा नाहीं. त्याच्या यज्ञास विघ्न आणावयाचें होतें त्याप्रमाणें आणून यज्ञ बंद पाडिला. आतां, त्याची कन्या हरण करावयाची तर श्रीकृष्णानें जसें रुक्मिणीहरणाचे वेळीं कपट केलें असें कपट

करून तिचें हरण करावें ह्मणजे झालें. त्यांत घातपात, रक्तस्राव, किंवा मनुष्यहानि वगैरे काहीं एक नसून इच्छित हेतु पूर्ण होण्यास सुलभ मार्ग आहे. नंतर असें ठरलें कीं, चंदानें बरोबर लष्कर घेऊन कन्नोजास जे अवरूदार चारण आणि ब्राह्मण यज्ञसमारंभार्थ जमले आहेत त्यांच्या भेटीस जावे. त्यांजबरोबर पृथ्वीराज व सामंत यांणीं गुप्तरूपें ( वेषांतरानें ) चंदाच्या तैनातीतलीं माणसें म्हणून जावें आणि कनोजास डेरा देऊन तेथें कांहीं दिवस मुक्काम करावा. मग पुढें जसें साधेल तसें करितां येईल. याप्रमाणें ठरून चंदाबरोबर अकरा हजार फौज व वेषांतराचे नौकर अशी मंडळी दिल्लीहून निघाली. ते यमुना नदी उतरून पैलतीरास गेले तों त्यांस अनेक अपशकुन झाले. परंतु पृथ्वीराज हा ' अर्थं साधयामि वा देहं पातयामि ' असा किंवा ' शेंडी तुटो किंवा पारंबी तुटो' अशा दृढ निश्चयाचा असल्यामुळें त्याणें ते अपशकुन वगैरे कांहीं एक न जुमानतां सर्व मंडळी कन्नोजास दाखल झाली.

### कनोज दरबारात चंद व पृथ्वीराज यांचे गमन

सर्व लष्कर शहराबाहेर उतरवून चंदकवि व त्याजबरोबर त्याचा पाण्याचा चंबु घेणारा सेवक म्हणून पृथ्वीराज असे दोघे जयचंदाचे दरबारास जाण्याकरितां निघाले. दरबारच्या दाराशीं गेल्यावर द्वारपालास, आंतमध्यें राजाला चंदभाट तुमच्या घरीं यज्ञ आहे म्हणून आशीर्वाद देण्याकरितां आला आहे, असा निरोप घेऊन जा ह्मणून सांगितलें. व त्याप्रमाणें द्वारपालानें जयचंद राजाकडे निरोप पोंचविला. नंतर राजानें बहुसन्मानपुर:सर चंदभाटास दरबारांत बोलावून घेतलें. चंदानें दरबारांत गेल्याबरोबर राजास आशीर्वाद देऊन त्याच्या ऐश्वर्याचें वर्णन केलें :--

### ( भुजंगी छंद ).

**जहां आसनं सूर उठ्ठे सनाहं, जिनेक्षत्रिवंशं किए एक राहं,**
**जिने धर्नि दिक्पाल धर्धर विखण्डं, धरे नृप्पछत्रं दुती कन्‌कदण्डं,**
**जिने हेम पर्वत्तसे सब्ब ठाहे, जिने एक दिन् अठ्ठ सुल्‌तान साहे;**
**बरं जंपियो सच्च जो चन्द चण्डं, सुते थप्पियो जाय तिहूंत पण्डं;**
**जिने दच्छिनं देश अप्पो विचारे, तठे ऊतर्यो तुर्तबन्धं पहारे;**
**जहां कर्नडां हाल दुब्बानबेध्यो, जिने संधिचालूकके चार खेंद्यो.**
**जहां तीन दिन् जुद्ध भिर्‌भूमिडंडं, तहां तोरि तोलंग गोवालकुंडं;**
**जिने छंडिओ बन्धि इक् गुन्डजीरा. ग्रहे लीध वैरागरे श्रब्बहीरा.**
**जहां गज्जने सूर साहाब साही, तिने मोकल्यो सेव निसुरत भाई;**
**जहां छोडि बीभीषणे जो मरोरे, तहां रोसके सोस दर्या हिलारे.**
**जिने बन्धि खुरसान् किया मीर बन्दा, सुतो राव राठोर् बिजेपाल-**
**नंदा; इते बंश छत्रीश आवे हकारे, तहां ईक चव्हान् पृथवीराज टारे.**

भावार्थ :– ज्याचे सिंहासनाभोंवतें शूर पुरुष बसले आहेत; सर्व क्षत्रियवंश ज्याणें एक मार्गावर आणिले; ज्याणें पृथ्वीं व दिक्पाल यांचें दर्शन केलें; मोठमोठे राजे ज्यास सुवर्ण करभार देतात; ज्याच्या ताब्यांत सुवर्णपर्वत आहेत; ज्याणें एका दिवसांत आठ सुलतान धरिले; तिहूंटा ( तिबेटा ) पर्यंत ज्याणें आपला ताबा बसविला; ज्याणें विंध्याचळाच्या खालींही दक्षिणदेश जिंकिला; चालुक्यराजास शासन केलें; कानडाप्रांत जिंकिला; तैलंगण व गोवळकोंडें घेतलें; हिऱ्याच्या खाणी ताब्यांत घेतल्या; गजपति शहाबुद्दिन याचे तर्फे त्याचा भाऊ निमुरतखान आला होता त्यास पकडलें; समुद्रपार जरी लंकाद्वीप आहे तरी तेथील बिभीषणराजाचा अम्मल काढला; आणि ज्याणें मीर खुरासानास कैद केलें; असा जो तूं विजयपाळराजाचा पुत्र जयचन्द त्या तुझ्या पाचारणानें छत्तीसही कुळांतले राजे तुझ्याजवळ संमेलित झाले ! –परंतु त्यांत पृथ्वीराज चव्हाण मात्र आला नाहीं.

## जयचंदाकडून चंदभाटाचा उपहास

वरील सहा श्लोकांच्या तेवीस चरणांपर्यंत चन्दानें जयचन्दाचें करावें तसें वर्णन केलें व तें करीत असतां तेवीस चरणपर्यंत जयचन्दराजास मोठा संतोष वाटून चंदकवीची उत्कृष्ट संभावना करून देण्याची त्याला परम इच्छा झाली होती. परंतु शेवटचा चोविसावा चरण ह्मणून त्याच्या सर्व ऐश्वर्याची जी चन्दाने व्यर्थता दाखविली, तेणेंकरून तो फार खजिल होऊन त्याला क्रोध आला. आणि तो मोठ्या संतापानें बोलला कीं, विधात्यानें तुह्मा भाटांस जें वंशपरंपरा दारिद्र्यग्रस्त राखिलें आहे तें दारिद्र्य तुमच्या या अशा गुणांवरून कोण आणि केव्हां दूर करूं शकणार आहे ? यावर राजा त्यास आणखी जें कवितेंत ह्मणाला त्याचा भावार्थ असा कीं, घोडे, हत्ती, सुवर्ण व रत्नें यांचा पाऊस राजा पाडूं शकेल; परंतु भिकाऱ्याचे डोकीवर अवदशेचें छत्र असल्यामुळें त्या पावसाचा एक थेंब तरी त्याचे अंगावर कोठून येईल ? हंसाला मौक्तिकें मिळालीं नाहींत, सिंहाला मत्त करींद्रगंडस्थल विदारण्यास सांपडलें नाहीं आणि तरुण स्त्रीपुरुषांस एकमेकांचें अदर्शन झालें, ह्मणजे ते सर्व दुर्बल व निरुत्साह होतात व तें योग्यच आहे; परंतु बरदाई ॐ [चंदा] ! आषाढ महिन्यांतल्या शिळंधारीच्या पर्जन्यवृष्टीमध्यें कोणी तुझ्या खांद्यावर नांगर देऊन तुझ्याकडून जमिनीची नांगरणी पेरणी केली नाहीं कांहीं नाहीं. मग तूं इतका दुबळा होऊन याचना करण्यास काय ह्मणून आलास ? हें नवल आहे !

## त्यांची उत्तरें – प्रत्युत्तरें

यावर चंदानेंही समर्पक उत्तर दिलें. याचा भावार्थ हा कीं, दिल्लीच्या राजानें ( पृथ्वीराजानें ) बहुत राजांस पादाहत केल्यामुळें त्यांणीं दांतीं तृण धरिलें. ह्याप्रमाणें

ॐ बरदी किंवा बरदाई, हें चंदकवीचें उपनांव असून ' बरदी ' याचा श्लेष काढून 'बळदिया' म्हणजे 'बैल' असें जयचन्दानें चंदाला ह्मटलें आणि ज्याअर्थी बैल ह्मटलें त्याअर्थी त्यास नांगरास जुंपलें पाहिजे. तसें कांहीं नसता तूं येवढा बुभुक्षित होऊन रोडावलास कां? असें जयचंद चंदाला लावून बोलला !

तृण धरितां धरितां सर्व दिल्ली प्रांतांतल्या जंगलांतील गवत नाहींसें झालें. व ज्याअर्थी तूं मला ' बळदिया ' (बैल) असें म्हटलेंस, त्या अर्थी बैलांस गवत खावयास पाहिजे त्याचा तर दुष्काळ झाला, त्यामुळें मी रोडावलों !

हें उत्तर ऐकून जयचन्द चंदाला ह्मणाला. पण, हे बळदिया ( बरदाई ) ! तुला अजून कोणीं बडविलें नाहीं. कोणीं तुझ्या पाठीवर गोणी लादली नाहीं. तुला कोणी गोवारी मिळाला नाहीं, तुझ्या नाकांत कोणीं वेसण अडकविली नाहीं; तुला विहिरीवर कोणीं मोटेला जुंपला नाहीं, लढाईतही गाडे ओढण्यास तुला कोणीं लाविलें नाहीं, जनरथाला जुंपूनही सारथ्यानें तुझी शेंपटी मुरगाळली नाहीं, अथवा भर पावसाळ्यांतील चिखलट जमिनीची नांगरणी करण्यास तुझ्या खांद्यावर कोणीं नांगरही लादला नाहीं. तेव्हां तुला दुर्बल होण्याचें प्रयोजन काय ?

यावर पुनः चंदानें उत्तर केलें; जयचन्दा ! ऐक. मला बडविणें, पाठीवर गोणी लादणें, मला गुराखी मिळणें व तशीच नाकांत वेसण अडकविणें ह्या गोष्टी मला कशा सहन होतील? विहिरीवरील मोटेला तरी मी काय ह्मणून जुंपला जाऊं? एकावरच इतकीं कामें लादूं लागल्यास त्याच्यानें काय होणार आहे? परंतु, हत्ती घोड्यांच्या गर्दीत यजमानाबरोबर कित्येक शत्रूंचा पाडाव केला व पृथ्वीराजाच्या पराक्रमवर्षावाच्या शिळधारेखालीं दुस्मानांच्या हृदयरूप शेतावर नांगर फिरविण्याचें मात्र काम मीं केलें; आणि त्यांणीं तर बिचाऱ्यांनी दांतीं तृण धरून सर्व गवत खलास करून टाकिलें. तेव्हां ह्या नांगर फिरविण्याच्या श्रमानें आणि तृणदौर्भिक्ष्यानें मी ( बरदीया–बळदीया–बैल. ) बुभुक्षित आणि दुबळा झालों! प्रथम नागोर येथें शहाबुद्दीन गोरीच्या मुस्क्या बांधिल्या, त्यावेळीं त्याणें कांहीं तृण खाल्ले; गुजराथचा राजा भोळा भीमदेव याचा पराभव झाल्यावर त्याणें दांतीं तृण धरून धरून कांहीं कुरणांचा फन्ना उडविला; मोंगल लोकांचा पाडाव करून त्यांस अंकित केल्यामुळें त्यांणींही राहिलेलें गवत खाल्लें; व हें सर्व गवत मूळासुद्धांच खाऊन टाकिल्यामुळें त्यास पुनः नवीन पालवी फुटली नाहीं. ह्याप्रमाणें सामंतनाथ ( पृथ्वीराज ) याणें युद्धांत बहुत शत्रूंची मानखंडना करून त्यांजकडून दांतीं तृण धरविलें व यामुळें गवताचा दुष्काळ पडून मी दुर्बळ झालों !

### जयचंद चंदाचा सत्कार करितो

ह्याप्रमाणें चंदकवीची निर्भीडता, कल्पकता, आणि हजरजबाबीपणा पाहून, जयचंद जरी मनांत रुष्ट झाला होता तरी चंदाचे हे गुण पाहून तो फार खुष झाला. नंतर त्याणें त्याचा मोठा आदरसत्कार करून त्याला अनेक प्रकारचीं उपायनें दिलीं. पुढें बोलतां बोलतां तो त्याला ह्मणाला:–चंदा! तुझ्यासारखे बुद्धिमान् चतुर असे दूरदृष्टि मसलतगार पृथ्वीराजाजवळ असतां त्याणें आह्मांशीं वैर कां धरिलें आहे ? माझा पिता आणि पृथ्वीराजाचा बाप अनंगपाळ ( वस्तुतः आजा–मातामह ) यांचा परस्पर किती स्नेह असून त्यांना एकमेकांविषयीं किती अभिमान असे हें कांहीं तुम्हां कोणांस माहित नाहीं असें नाहीं.

सोमेश्वराचे लग्नाच्या वेळेस अनंगपाळाला आह्मीं किती द्रव्यसाह्य केलें, व अनंगपाळानें पृथ्वीराजाला दत्तक घेतलें तेव्हां जर तसें करण्यास आह्मीं हरकत घेतली असती तर ती सहज अंमलांत आली असती. परंतु अनंगपाळ हा आमचा मांडलिक असून स्वराज्यनिष्ठ आणि स्नेही ह्मणून आह्मीं त्यास तसल्या प्रकारची कांहींही हरकत आणिली नाहीं ह्या सर्व गोष्टी तुह्मां दिल्लीवाल्यांस माहित असतां व सर्व हिंदुमुसलमान माझे आज्ञांकित असून, त्याप्रमाणें त्यांस मीं पाचारण करून हा राजसूययज्ञ सुरू केला असतां, तुह्मी त्या प्रसंगीं माझ्या पाचारणास मान तर दिला नाहींच; परंतु उलट माझ्या भावास मारून यज्ञास विघ्न मात्र आणिलें. यावरून मी असें खचित समजतों कीं, हिंदुधर्माचा ऱ्हासकाल समीप आला असून त्याप्रमाणें अधर्मप्रवृत्तीस तुह्मीच मूळ कारण झालां. तर ह्याजबद्दल तुह्माला कांहींच वाटूं नये काय ?

चंदभाट ह्मणाला :— आम्हीं केलें ही अधर्मप्रवृत्ति होय हा जो आपला समज आहे ही केवळ चूक असून आह्मीं जें केले तें धर्मन्यायानें अगदीं बरोबर केलें. आपला आणि अनंगपाळराजांचा जसा परिचय आणि स्नेह होता तशीच पृथ्वीराजही आपल्याविषयीं पूज्यबुद्धि बाळगितात व होईल तितकी आपली सेवा करणें त्यांस अभिमत आहे. याविषयीं सत्यता दाखविण्याचें कारण नाहींच. कन्नोजावर जेव्हा शहाबुद्दीन गोरी चालून आला तेव्हां पृथ्वीराजानें साह्य केलें नसतें तर आपलें राज्य कन्नोजास राहतें किंवा आपण दक्षिणेकडे दिग्विजय करण्यास गेलां होतां तेव्हां तिकडेच आपल्याला राहावें लागतें, याविषयीं आपणच विचार करावा. आमची तर खात्री आहे कीं, आपला पराजय होऊन कन्नोजचें आधिपत्य शहाबुद्दीनाकडेच गेलें असतें. तेव्हां पृथ्वीराजानें ही जी आपली सेवा चाकरी केली ही आपण जाणतां काय ? परंतु, आपण कलियुगांत वर्ज्य जो यज्ञ तो करण्यास प्रारंभ केला हें कांही पृथ्वीराजास बरोबर वाटलें नाहीं. कारण, —

**अश्वमेधो गवालंभं संन्यासः पलपैत्रिकं ।**
**देवरेण सुतोत्पत्तिः कलौ पंच विवर्जयेत् ॥**

**भावार्थ** : " अश्वमेध, गोवध, संन्यास, मांसश्राद्ध आणि दीराकडून पुत्रोत्पत्ति हीं पांच कलियुगांत वर्ज आहेत." अशी धर्मशास्त्राची आज्ञा असतां ती तुह्मीं न मानतां यज्ञारंभ केला हें पृथ्वीराजास न आवडून त्याला ह्या प्रसंगानें आपल्यास हरकत करावी लागली.

नंतर जयचंदानें चंदाला विचारिले कीं, शहाबुद्दीन गोरीची कन्नोजावर जेव्हां स्वारी आली तेव्हां मी तर दक्षिणेकडे दिग्विजयास गेलों होतों; त्यामुळें इकडे काय काय हकीकत झाली व पृथ्वीराजाने मजकरितां काय काय परिश्रम केले तें मला मुळींच माहित नाहीं. तर तो सर्व बनाव कसाकसा घडून आला हें मला तूं सविस्तर सांग.

## चंदभाट गोरीच्या पराभवाची हकीकत जयचंदास सांगतो

त्यावर चंदानें ती सर्व हकीकत सांगण्यास प्रारंभ केला. तो ह्मणाला : कितीएक दिवसांपासून गोरीची नजर हिंदुस्थानावर होती हें माहित आहेच. त्याणें कितीएक वेळ

पृथ्वीराजावर स्वाऱ्या करून त्यास त्रास दिला होता; परंतु तितक्याही वेळ पृथ्वीराजाकडून त्याचा पराभव झाला अद्यापिही त्याचे हेर नगरांत फिरत आहेत! आपली स्वारी दक्षिणेकडे दिग्विजयास गेली आहे अशी खबर त्यास लागतांच तो कन्नोज घेण्याचे हेतूनें मोठी तयारी करून आला. तों रस्त्यांतच कुंडिनपूरचा राजा रायसिंग वाघेल हा त्यास झप्दिशीं आडवा होऊन त्यांची झटापट झाली. पण त्यात कमकीर्त वाघेल हा मारला जाऊन तुर्क लोकांचाच जय झाला. त्यामुळें तर त्याला अधिकच स्फुरण येऊन त्याणें पुढें नयरपूर लुटिलें. ह्यावेळीं पृथ्वीराज नागोर येथें आणि कयमाष खटुपुर येथें होता. त्यांस गोरीचा इकडील दांडगावा कळल्यावर त्यांना असें वाटलें कीं, आपण (जयचंद) घरीं नसून यवनांनी एकदां कन्नोज घेतलें ह्मणजे हिंदूंचें तेज व ऐश्वर्य कमी झालेंच समजावें. ह्मणून ते दोघे एकत्र होऊन गोरीवर चालून आले. त्यांत त्यांणीं गोरीचा सर्वांशांनी पराभव करून त्याचे सर्व हेतु व्यर्थ केले. या लढाईत गोरीकडील आठ हजार पठाण पडले व शाहा हा अन्नपाण्यावांचून एकटाच पळून जात असतां त्याला चंदपुंडीर याणें पकडिलें. व त्याजपासून आठ हजार घोडे खंडणी घेऊन त्याला सोडून दिलें.

जयचंदानें ही हकीकत ऐकून ह्मटलें कीं, एकूण पृथ्वीराजाची तूं तर बरीच तारीफ केलीस. परतु माझ्या या कचेरींत हे जे मुकुट धारण करून राजे बसले आहेत त्यांत पृथ्वीराजासारखा कोणी सांपडेल किंवा नाहीं?

### चंद पृथ्वीराजाची तारीफ करितो

तेव्हां चंद उंच हात करून, मागें पृथ्वीराज वेषांतरानें त्याचा सेवक ह्मणून उभा असतां त्याजकडे खालीं वर हात करून ह्मणाला, " बत्तीस लक्षणांनीं युक्त, छत्तीस वर्षे आणि सहा महिने इतकें ज्याचें वय आहे, दुर्जनांचा शास्ता, ज्याला शत्रू खंडणी देऊन मुक्त होतात, कोणी शरण येऊन ज्याची पादसेवा करितात, अशा प्रकारचा सर्व गुणपंडित व ज्याला सर्व हिंदू लोक पूज्य मानितात, असा चतुर चव्हाण कुलोत्पन्न जो पृथ्वीराज तो आहे!" असें ह्मणून त्याणें मागें उभा राहिलेल्या सेवकवेषी पृथ्वीराजाकडे हात केला. इतकेंच नव्हे तर आणखी वारंवार त्याजकडे हात करून म्हणाला : पृथ्वीराज हा गोकुळांत श्रीकृष्ण किंवा पांडवांत भीम अथवा रावणासारखा अभिमानी आणि रामचंद्रासारखा पराक्रमी आहे !

चंदानें जयचन्दाला फसविण्याकरितां पृथ्वीराजास सेवकवेष देऊन आपल्याबरोबर नेलें होतें. परंतु त्याच्या बोलण्याच्या व हातांच्या झोंकावरून जयचन्दाला संशय उत्पन्न झाला. तो मोठा चाणाक्ष असल्यामुळें त्याला वाटलें कीं, चंदाचे मागें जो पाण्याचा चंबू घेऊन उभा आहे तो वास्तविक सेवक नसून वेषधारी सेवक आहे. असें मनात आणून त्याणें त्या चंबूवाल्याकडे बघितलें; तों त्याच्या डोळ्यांचें तेज पाहून जयचन्द समजलाच. त्यावेळीं जसे दोन सिंह एका ठिकाणी भेटावें आणि त्यास स्फुरण यावें त्याप्रमाणें त्या सभेत त्या दोघांची स्थिति झाली. जयचन्दानें तर असेंही मनांत आणिलें कीं, या सेवकाला

एकदम कैद करावा. परंतु पुनः त्याणें असा विचार केला कीं, मला हा पृथ्वीराज आहे असें वाटतें आणि तो नसून खराच सेवक आहे असें ठरले, म्हणणे जगांत आपलें हंसें आणि दुष्कीर्ति मात्र होईल कीं, जयचन्दाच्यानें पृथ्वीराजास ओळखवलें नाहीं. तेव्हां आतां या सेवकाला ओळखण्याची काय युक्ति करावी? असा विचार करीत असतां त्याला अशी कल्पना सुचली कीं, पृथ्वीराजाला पूर्णपणें ओळखणारी आपले जवळ कर्नाटकी दासी, जी पूर्वी पृथ्वीराजाचे आश्रयाला होती, ती आहे. तिजकडून याची परीक्षा पहावी. कारण, तिला सर्व जगांतील पुरुष म्हणजे केवळ स्त्रियांप्रमाणें वाटतात. परंतु पुरुष काय तो एक पृथ्वीराजच आहे व त्यालाच लाजून ती डोक्यावर पदर घेते, अशी तिची ख्याति आहे. ह्याप्रमाणें विचार करून त्याणें कर्नाटकी दासीला सभेंत बोलावून आणिली.

## पृथ्वीराजाला ओळखून काढण्याचा प्रयत्न

तिणें सभेंत आल्यावर दुरूनच पृथ्वीराजाला पाहिलें आणि पटकन् डोक्यावर पदर घेतला. हें चन्दानें पाहिल्याबरोबर कर्नाटकी दासीला त्याणें नेत्रसंकेतानें सुचविलें कीं, आह्मीं येथें कांहीं कपटानें आलों आहोंत. हा कपटस्फोट झाला तर आमच्या जीवावरच बेतेल. शिवाय त्याणें त्यांत असेंही सुचविलें कीं, तुझ्यामुळें कयमाषप्रधानाची तशी अवस्था झाली, तीच तूं येथेंही आमच्या प्राणावर संकट आणण्यास कारण होतेस हें बरोबर नाहीं. चन्दाचा नेत्रसंकेत, कर्नाटकी चाणाक्ष असल्यामुळें तिणें ताबडतोब ओळखून डोकीवर घेतलेला पदर पुनः काढून टाकिला. त्यावरून जयचन्दाला संशय उत्पन्न झाला कीं, हें काय आहे ? ईनें पहिल्यानें पदर सरसावून घेतला कां आणि आतां पुनः काढिला कां ? यावरून काय समजावें ? तेव्हां त्याणें याबद्दलची खात्री करून घेण्याकरितां तिला पुसिलें कीं, " तूं पहिल्यानें डोकीवर पदर घेतलास कां आणि मागाहून काढून टाकलास कां ? तूं तर पृथ्वीराजाचे समोर मात्र पदर घेतेस असा तुझा नियम आहे. मग तुला पहिल्यानें सभेंत आल्याबरोबर येथें पृथ्वीराज असलेला दिसला काय ? " राजाचा हा प्रश्न ऐकिल्याबरोबर कर्नाटकीनें न घाबरतां स्त्रीचरित्राचें कौशल्य लढवून राजाचें समाधान केलें, ती म्हणाली, " आपण म्हणालां ती गोष्ट खरी. मी पृथ्वीराजाशिवाय कोणाचे समोर पदर घेत नाहीं. परंतु पृथ्वीराज आणि चन्द हे दोघेही एकांशभूत, मित्र आणि एक जीवाचे असल्यामुळें, पृथ्वीराजाला जो मान मी देते तसाच चन्दालाही अंशतः द्यावा असें मला वाटून, पहिल्यानें मीं पदर घेतला आणि मग काढून टाकिला ! "

कर्नाटकीच्या तोंडातून हें उत्तर निघेपर्यंत त्या सभेंस नवरसही वास करीत होते असें चन्दानें आपल्या रास्यांत वर्णन केलें आहे :--

**भय अद्‌भुत कमधज्ज, हास्य चहुवान उपन्नो;**<br>
**करुना दिसी संभरीय, चंदवर रुद्र निपन्नो;**<br>
**बीभत्स कायर मनह, वीर भट सुभट विराजें;**<br>
**गोख बाल तहां जंखि, द्रिग्ग शृंगार सुसाजे;**

**उपजि भयानक दिखि अरि, लोह लहर बज्जन दुसर;**
**मंगाइ पान पहु पंगने, दीन चंद मन शांति कर;**

भावार्थ – पृथ्वीराज सेवकवेषानें आला हा जयचन्दास अद्‌भुतरस; कर्नाटकींचें स्त्रीचातुर्य बघून पृथ्वीराज वगैरेंस हास्यरस; कित्येक सभासदांस असें वाटलें कीं, येवढा पृथ्वीराज वीरशिरोमणि, पण येथें पराक्रमहीन असा राजाचे हातांत सांपडणार म्हणून करुणारस; चन्दानें तामसीवृत्तीचें जयचन्दास सडेतोड उत्तर दिलें हा रुद्ररस; जयचन्दानें चन्दास दिलेलीं विशेषणें हा बीभत्सरस; शूरांचे दंड स्फुरण पावूं लागले हा वीररस; पडद्याच्या आड राजकन्या संयोगता शृंगारयुक्त चेष्टांनी हा सर्व देखावा बघत होती तो शृंगाररस; कित्येकांना आतां काय प्रसंग येईल कोण जाणे अशी भीति वाटली तो भयानकरस, आणि शेवटीं राजानें वेत्रवतीकडून पानपट्टी खाल्ल्यावर चन्दानें राजाची आज्ञा घेऊन चंबुवाल्या सेवकासह सभेंतून निर्वेधपणें प्रयाण केल्यामुळें सर्वांस वाटलेली शांति हा शांतिरस.

( पृथ्वीराजाचा इतिहास )

३८

# अंगारे, मंत्र, तंत्र वगैरे या लोकांची ढोंगें होत!

---

अंगारे, मंत्र, तंत्र, उपदेश, पुत्रप्राप्ती, रोगदूरीकरण. वगैरे या लोकांची ढोंगे होत हें जाणिलें पाहिजे. स्वच्छास्त्र व सदाचार यांचा प्रसार झाला पाहिजे. इत्यादि गोष्टींच्या प्रभावानें दारिद्र्य नष्ट होईल.याशिवाय वर ज्या गोष्टींकडे आज अविचारानें पैसा खर्चिला जातो म्हणून लिहिले आहे तिकडे बंद होऊन जिकडे खर्चिला जात नाहीं म्हणून दर्शविलें आहे तिकडे खर्चिला जावा. म्हणजे तेणेंकरून संपत्तीचा व्यर्थ व्यय न होता केलेला खर्च व त्यावर आणखी त्यांचें गुणीकरण होऊन देशांतली संपत्ति चिरस्थायी होईल. येणेंकरून आज जे आपण हताश, हतसंपत्, हतगर्व, नष्टैक्य आणि नष्टप्रभ झालों आहों त्या आपणांस महत्व, कीर्ति, उत्साह,सदभिमान आणि महत्वाकांक्षा पूर्णपणें वरतील व पूर्ववत् आपला दिगंती लौकिक होईल.

चांगलीं चांगली शास्त्रें, सदाचार व सद्रीती हीं चालू करावयाचें जें मुख्य कर्तव्य तें भुलून पाखंडप्रसार आणि मनसोक्त आचार यांचा विस्तार करण्याकडेसच अविचारी आणि विषयलोलुप लोकांची प्रवृत्ति झाली. शास्त्रें, आचार, रीतीभाती यांजमध्यें पुष्कळ फेरफार व सुधारणा कर्तव्य होत्या त्या एकीकडे राहून भलभलते ग्रंथ लिहिण्यांतच त्यांणीं आपली बुद्धि आणि आयुष्य घालविलें. देशामध्यें अनन्याचार, यातना, कष्ट व दुखें हीं कशीं वाढू लागलीं आहेत व त्यांचा प्रतिकार कसा करावयाचा इकडे कोणाचेंच लक्ष्य लागलें नाहीं. बालविवाहाचे नियम, विधवांच्या यातना, परदेशगमननिषेध, कूपमंडूकता, मिथ्याग्रह वगैरे जे धर्मशास्त्रांचे परिणाम अनुभवास येत त्यांजपासून परावर्तन करण्यात नवीन शास्त्र ग्रंथ तयार करणें व काल व देश यांजकडे बघून पूर्वीच्या ग्रंथांत सुधारणा करणें हे महत्वाचे विषय तसेच एकीकडे राहिले व त्यांजकडे सर्वांशांनीं दुर्लक्ष्य केलें हा मोठा प्रमाद झाला. जोंपर्यंत विचारवंत लोक असून विचारीपणा जागृत होता तोपर्यंत कालदेशमन्वंतराप्रमाणें विधीचे निषेध आणि निषेधांचे विधी करण्यास लोक समर्थ होते. परंतु विचाराचा अस्त झाल्यापासून लोक मूर्ख व आग्रही निघून त्याप्रमाणें विधिनिषेधांच्या दुरुस्ती करण्याचें काम तसेंच निव्वळ पडून राहिलें. असें कां व्हावें हें कळत नाहीं. देशाचें व लोकांचें नष्टचर्य ओढवलें त्याप्रमाणें दुर्बुद्धि व मौर्ख्य आपल्या लोकांच्या पदरीं येण्यास कारण झालें. येवढें ह्मणून समाधान केल्याशिवाय गत्यंतर नाहीं. परंतु हा नष्टचर्याचा काल दिवसानुदिवस जात जाईल अशी आशा आहे. पूर्वीच्या लोकांच्या वरील चुका आतां सुशिक्षणप्रसृतीनें दृष्टिगोचर होत चालल्यामुळें अल्पावकाशांतच त्यांची सुधारणा होईल.

वर लिहिल्याप्रमाणें मंत्र, तंत्र आणि यंत्र इत्यादि कल्पित व मिथ्या भ्रमांची वृद्धि करणारें प्रकार अनेक बाष्कळ ग्रंथकारांनीं लिहून ठेवून, त्यांच्या आधारें ब्राह्मण, बोवा, व जती वगैरे लोकांनीं सर्व देशास भूल घातलीं व सर्व लोक बावळे करून त्यांस वेड लाविलें आहे. द्रव्य हरण करण्यास या ढोंगी लोकांना असले ग्रंथ फार साह्यकारी झाले. ते लोक त्रिकोण, पंचकोण, षट्कोण, नवत्रिकोण, अष्टकमल, षोडशकमल, श्रीयंत्र, इत्यादी यंत्रें काढून त्यांना निरनिराळीं नांवें देतात. आणि त्यांची कोणी जनावरांचें रक्तानें, कोणी गोरोचनानें व कोणी केशरादि सुगंधि द्रव्यांनीं पूजा करितात; कोणी स्मशानांत जाऊन किंवा होमहवनेंकरून हीं यंत्रें भूर्जपत्रावर लिहितात; आणि अशा प्रकारच्या यंत्रसाधनानें मनुष्यें मरून जातात, उडून जातात, सेना पलायन करिते, मोक्षपदप्राप्ती होते, इत्यादि गप्पा सांगून भोळ्या व अविचारी लोकांस भुरळ पाडून त्यांची श्रद्धा असल्या कृत्यांवर मांत्रिक लोक बसवितात व हे आचार त्या अज्ञान लोकांच्या आश्रयानें निर्वेधपणें चालतात.ह्या ढोंगांचा प्रचार सर्वत्र आढळतो. बायका, वाणी, बकाल, राजे व सरदार वगैरे अज्ञान लोकांचा वर्ग बघितला ह्मणजे त्यांच्या गळ्यांत, दंडावर, मणगटास वगैरे असलीं यंत्रें, भारलेले ताईत, गंडे व पेट्या बहुतकरून बांधलेल्या पाहण्यांत येतात. आणि असलीं साधनें व यंत्र किंवा मंत्र साध्य करण्याच्या खटपटींत व तपासांत ते नेहमीं असतात. परंतु त्यांस असें समजत नाहीं कीं, ही सर्व अविद्या आणि कपट आहे.

त्याचप्रमाणें, पूर्वी जे मोठे मोठे विद्वान् पुरुष होऊन गेले त्यांचे नांवांवर अनेक खोटे नाटे ग्रंथ ठग व अपस्वार्थी लोकांनीं प्रसिद्ध करून ढवळयादिवसां फसविण्याचा बाजार मांडिला व भोळया लोकांस भुरळ पाडून त्यांजकडून आपला कार्यभाग साधून घेतला. तत्वतः या सर्व मांत्रिक व तांत्रिक कर्मांत कांहीं एक सत्य नाहीं हें सिद्ध असतां, बावा, जती, मंत्री, पंचाक्षरी, मंत्रशास्त्री वगैरे लोकांच्या मंडळया ठिकठिकाणीं अडाणी लोकांस फसविण्यास आणि बुचाडण्यास आपल्या सोंगाढोंगांचा पसारा मांडून बसलेल्या आढळतात. त्यांचीं सोंगें ढोंगें ओळखण्यास उशीर लागत नाहीं. त्यांच्यांतील बहुतेक लोक कपाळास भस्म, शेंदूर किंवा कुंकुमांचे मोठमोठे पट्टे लावून आपल्यास फार पवित्र व साधू समजतात. अशांच्या नादीं लागून फसणें ह्मणजे केवळ बावळेपणा आणि आत्महितशत्रुत्व होय. त्यांची कपटें आणि दांभिक आचरणें समजून त्यांच्या संसर्गापासून दूर रहावें हेंच विचारी मनुष्याचें काम आहे.

ज्यांच्या पूर्वजांनीं तर्क, व्याकरण, औषधीविद्या, ज्योतिष, गणित इत्यादि महान महान् विद्यांचे आणि शास्त्रांचे शोध लाविले, व त्यांचें अध्ययनाध्यापन करवून जगामध्यें त्यांचा प्रसार केला, व ज्यांणीं केवळ सत्यशोधनांतच आपलीं आयुष्यें घालविलीं, त्यांचे वंशांत असे असन्मार्गवर्ती, ढोंगी व सोंगाडयें लोक निघून लोकांच्या भाविकपणाचा आणि अज्ञानाचा फायदा करून घेण्यांत आपलें कर्तव्य समजतात, ही मोठया शरमेची गोष्ट आहे. सद्विद्या व सच्छास्त्र यांच्या शोधनार्थ व वृद्धयर्थ आपल्या आर्यपूर्वजांनीं जे परिश्रम केले त्यांजबद्दल त्यांस उचित असा सन्मान आपल्या पूर्वजांकडून मिळाला आहे व अजूनही त्यांजबद्दल आपली पूज्य बुद्धि असावी हें योग्य आहे. परंतु त्यांचे वंशांत वर लिहिलेले कुलकलंक असे सोंगीढोंगी व धुतारे लोक निर्माण होऊन त्यांच्या संबंधाची पूज्यता व आदरबुद्धि घालविण्यासारखीं नीचतम कृत्यें करण्यास प्रवृत्त झाले; ही किती दुःखाची गोष्ट आहे बरें? असें होणें चांगलें नाहीं.

या धूर्त व ठग लोकांचा अहोरात्र धंदा ह्मणजे हरयुक्तीनें आणि हरकसबानें लोकांस कसें फसवावें या विचारांत आपल्यास बुडवून घेण्याचाच असतो, असें बहुतांस समजलें आहे. परंतु जसजसा अविद्यारूप अंधकाराचा सद्विद्याप्रखररश्मितेजोराशीकडून नाश होत जाईल, तसतसा हा ढोंगांचा व धूर्तपणाचा बाजार मावळत जाऊन लोकांमध्यें सदसद्विवेक आणि सारासार विचार हीं प्रसृत होत जातील अशी खात्री आहे. आणि असें झालें ह्मणजे, आज जो या ढोंगधत्तूऱ्यांस सन्मान मिळत आहे तो आपोआपच घटत जाईल. शहाणपणानें आतांपासूनच या गाढांधांत लोळणाऱ्या व सर्फ लुबाडणाऱ्या मांत्रिकादि लोकांस ओळखून त्यांच्या संसर्गापासून अलिप्त राहण्यास लोकांनीं शिकलें पाहिजे, व त्याही लोकांस त्यांचे नाना ढंग टाकून खऱ्या पंथाला लागण्याविषयीं शिकविलें पाहिजे. विद्याशिक्षण-प्रसारानें हीं फसविण्याचीं आणि नाडण्याची बंडें दिवसें दिवस जास्त वाढण्याची तरी निदान भीति नाहीं असें वाटतें व तशा लोकांस आतां असेंच सांगावयाचें कीं, बाबांनो,आतां तरी तुह्मी काल देश वर्तमान बघून त्याप्रमाणें आपलें आचरण ठेवा व आपला निर्वाह

करा. आपण अमार्गाला जाऊन त्याबरोबर दुसऱ्यालाही अमार्गी ओढून ईश्वराच्या घरीं पातकी आणि सरकारच्या दरबारीं अपराधी कां होतां ? याचें फल लोकांमध्यें फजिती आणि संसाराची दुर्दशा या व्यतिरिक्त काहींही मिळावयाचें नाहीं, हें पूर्णपणे लक्ष्यांत ठेवावें. आपली व आपल्या देशाची उन्नति कोणत्या विद्या कलांनी होऊन इतर सुधारलेल्या देशांशीं आपली बरोबरी होईल याचें चिंतन करा. विचारभ्रष्ट होऊन भलभलतीं कृत्यें करूं नका. तसा काल आतां राहिला नाहीं.

( आगमप्रकाश )

३९

# ऐतिहासिक गोष्टी

ज्ञान हें सर्व सन्मानाचें, पराक्रमाचें, बलाचें व ऐश्वर्याचें मूळ आहे. त्याचा जेथें अभाव तेथें सर्वथैव ग्लानि दृष्टीस पडते. हत्तीस त्याचा यःकश्चित् महावत अंकुशानें टोंचितो, गुरांचे मोठमोठे कळप आठ वर्षांचे पोर वळवून आणितें. व मारवाडी कुळंब्यांस छळीतच असतो; हे सर्व प्रकार अज्ञानजन्य होत. ही या देशाची ग्लानि दूर होऊन ज्ञानाची वृद्धि होणें अवश्य आहे. त्याशिवाय दुसरा उपाय नाहीं.

प्राचीन काळच्या गोष्टी माहीत असल्यानें चातुर्य वाढतें, आणि संभाषणांस साहित्याचा भरणा होऊन तें ज्ञानबोधक व मनोरंजक होतें. व अशा गोष्टींचा संग्रह केल्यानें त्याही नष्ट न होतां पूर्वीचा इतिहास माहीत होतो.

मोंगलाई व मराठे कारकीर्दीतील गोष्टी लोकांत प्रसिद्ध आहेत, त्यांचें टिपण करून ठेविले होतें; यावरून काहीं जुनी माहितगारी समजण्यांत येईल. प्राचीनकालच्या गोष्टींपासून त्या कालचे स्थितीचें स्मरण राहातें, व हल्लींचें व त्यां कालचें अनुमान करितां येतें; सत्पुरुषांचे उदाहरणावरून सदाचाराविषयी धैर्य येतें, व दुष्ट पुरुषांचे उदाहरणांवरून दुराचाराचा तिरस्कार होतो; हा एक प्राचीनकालचे इतिहासापासून फायदा आहे. याकरितां या गोष्टी प्रसिद्ध केल्या आहेत.

## ढोंगी लोक

भाकितें सांगणारे देव व देवऋषी पुष्कळ प्रसिद्ध आहेत; मंत्र व अनुष्ठानें करणारे ढोंगीही पुष्कळ आहेत; व भूतप्रेतांची बाधा काढणारे पंचाक्षरी, भगत व जाणते ही मंडळीही बहुत आहे. शिवाय किमया करणारे असतात ते तांबें कथील यांचें सोनें रुपें करतों असें ह्मणून फसवितात. त्याचप्रमाणें भूमीत पुरलेले द्रव्य काढून देणारेही पुष्कळ आहेत. अहमदाबादेंत जार्डिन साहेबांच्या विधवा मडमेला एक बाई तिचे विहिरींतून द्रव्याच्या घागरी काढतें असें ह्मणून तिजकडून हजार रुपये खाऊन गेली. पुढे तीस दीड वर्षांची शिक्षाही झाली. असेंच मुहूर्त, शकुन, व ग्रहबाधा सांगणारेही भोळ्या लोकांस भुरळ घालतात. कितीएक तर गुरुमंत्र देऊन लोकांपासून द्रव्य काढतात; कितीएक मांत्रिक असतात ते दृष्टीचा, उसर्णाचा, मूठ मारण्याचा, घुसळणीचा, गुरांचें दूध उडविण्याचा वगैरेंचे अंगारे देऊन व मंत्र जपून लोकांस भ्रम घालून पैसा घेतात. संतती देणारे फकीर, पीर व बीर प्रसन्न करणारे अवलिया व ताईत, पेटचा देणारे बोवा हे तर सर्वत्र प्रसिद्धच आहेत, आणि शिंक पाहणें व पाल किंवा दिवा पडला तर त्याजवरून भविष्य काढणें वगैरे प्रकारची भुरळ घालणारी मंडळीही दुनयेंत ठिकठिकाणीं बहुत असून त्यांच्यापासून फारच सावध राहिलें पाहिजे. कोणी बाण व शालिग्राम गिळून व कोणी कांच खाऊन सिद्धाई दाखवितात. व कोणी रफई साहेबाचे चेले ह्मणवितात. परंतु या सर्व गोष्टींस अनुभव, तर्क, पंचेंद्रियें आणि विचार हीं साक्षी देत नाहींत. शिवाय ही कामेंही गुप्त चालवितात व त्यांस रात्र व भोळीं माणसें असलीं ह्मणजे तर फसविण्यास चांगलेंच फावतें.

ह्याप्रमाणेंच किती एक गोष्टींविषयीं पाहिलें असतां फक्त त्यांच्या नावांच्या शब्दावरून अर्थाचे अनर्थ झालेले दृष्टीस पडतात. शाबरी विद्या व तसेंच इंद्रजाल ह्मणून जादूचे व अनेक चमत्कारांचे ग्रंथ असून त्यांविषयींच्या बहुत आख्या सर्व लोकांत पसरल्या आहेत. शाबरी विद्येवरूनच गुजराथेंत असणाऱ्या साबरमती नामक नदीचे नांवांत 'साबर' हीं अक्षरं असल्यामुळे लोकांनीं असें ठरविलें कीं, शाबरी मंत्रानें ही नदी उत्पन्न झाली ! व असा भ्रम बहुतांस आहे ! ! परंतु वस्तुत: पाहिलें असतां पर्जन्यादि कारणांनीं नद्या उत्पन्न होतात. याचप्रमाणें याही दोन नद्या मिळून एक साबर–मती नदी झाली आहे. त्यांत एकीचें नांव साबर व दुसरीचें नांव मती. हीं दोन्ही नांवे मुळा–मुठा नदींच्या नांवाप्रमाणें एकत्र होऊन चालतात. याचप्रमाणें तित्तिर ह्मणून एक वैशंपायनाच्या शिष्याचें नांव होतें तो जी शाखा पढला तीस तैत्तिरीय शाखा असें ह्मणतात. तित्तिर हें एका पक्ष्याचेंही नांव आहे. त्याजवरून तित्तिरपक्ष्यांनीं ती शाखा गिळिली, वगैरे बाष्कळ गोष्टी प्रसिद्ध झाल्या ! रोम ह्मणून पूर्वी एक मोठी बादशाही तक्ताची जागा होती. परंतु 'रोम' या शब्दाचा अर्थ 'केश' असाही होतो व इतक्यावरूनच गाईचे केश पडून त्यांचीं माणसें होऊन त्यांनीं शहर वसविलें आणि त्याचें नांव रोम ठेविलें, अशी कल्पना केली ! नाग ह्मणून एक जात असून त्यांचीं नागपूर वगैरे शहरें होतीं. परंतु 'नाग'

शब्दाचा अर्थ ' सर्प ' हो होतो, व इतक्यावरूनच नागकन्या ह्मणजे सापाच्या कन्या आणि त्यांशीं मनुष्यांचीं लग्नें झालीं, वगैरें कथा उत्पन्न झाल्या ! मावळांत ताप आला ह्मणजे कागदाचा ताव जाळतात आणि म्हणतात कीं, ताव जाळून टाकला ह्मणजे ताप जाईल ! ही फक्त नांवांवरून भ्रांति झाली अशा अनेकार्थी नांवांवरून अनेक भ्रांती उत्पन्न होऊन अर्थाचे अनर्थ झाले आहेत !

● ● ●

## नाना फडणवीस

नाना फडणवीस यांची दिनचर्या चमत्कारिक असे. यांचे पंक्तीस दहा पात्रांहून अधिक मनुष्यें नसत. घरीं कधींही माणसांची दाटी नसे. कोणाची अक्षत आली तर देवडीवर कारकून असेल त्यानें बाहेरच्या बाहेर घ्यावी व यादीवर नांव टिपून ठेवून त्यांचे घरीं पोषाख पोंचवावा. उजाडल्यापासून मध्यरात्रीपर्यंत नानांस काम असे. दहा वाजतां फडावर जात, तेथें चार वाजेपर्यंत कालक्रमण करून नंतर बेलबागेत संध्यादि कर्मे करून घरीं जाऊन, सात वाजल्यापासून राजकारणीं व बातमीचीं कामें पाहात. व विश्वासु कारकुनांकडून जाबसाली पत्रांची रवानगी करवीत नंतर ते निजत. साठ वर्षांत त्यांचें कधीं कपाळ दुखलें नाहीं, व त्यांचे तोंडांतून कधी व्यर्थ शब्द निघाला नाहीं. हंसणें किंवा विनोद हीं त्यांस ठाऊक नसत. कामापुरतें बोलत. सर्व राज्याचा कारभार पाहून प्रत्येक कागदावर तारीख घालून मखलाशी देणें द्यावें. शिवाय, घरीं दोनशें चारशें जाबसालीं पत्रें नित्य लिहीत. सर्व प्रकारच्या खबरा त्यांस असत. शिल्लक व खर्चाचा मेळ चांगला ठेवीत. याजकरितां सवाई माधवरावांचे जन्मापासून त्यांचे अंगावर मोठाल्या अशा चार मसलती आल्या. एक दादासाहेबांची, दुसरी इंग्रजांची, तिसरी तोतयाची व चौथी निजामअल्लीची. परंतु या चोहोंतून ते पूर्णपणें विजयी झाले. सर्वांचा एकत्रपणा राखण्याचा व सर्वांची परवर्षी करण्याचा यांजमध्यें मोठा गुण होता. यांची इभ्रत मोठी असे. यांची चिठी गेली तर कोणी मानावयाचा नाहीं असें व्हावयाचेंच नाहीं. तशीच त्यांची जरब फार असून सलगीचा व्यापार कोणाशीं नसे. स्वारीस दहा माणसें असत व वस्त्रप्रावरणानें ते साधे असत.

● ● ●

दोन कोट चौसष्ट लाख रुपये चौथाईबद्दल निजामअल्लीकडे पेशव्यांचें येणे निघालें, तें मागण्याविषयीं नाना फडणविसांनीं गोविंदराव काळे यांस लिहिलें. परंतु तें मशीरूलमुल्क कबूल करीना आणि दरबारात उद्दामपणानें बोलला कीं, नाना फडणविसासच येथें हिशेब समजावयास घेऊन या असें सांगितल्यामुळें त्यांच्यात वेबनाव झाला.नानांनीं सांगितलें कीं तुह्माकडून जें येणें आहे तें घेईन तरच सोडीन तेव्हां मशीर हा फौज जमा करून पुण्यावर निघाला. ही खबर पहिल्यापासूनच नानांस माहीत होती त्यांनीही इकडे सर्व शिलेदार, सरदार, पथकवाले, पागेदार व किल्लेदार वगैरे या सर्वांस आपआपले स्वार घेऊन जलद अमुक अमुक मुक्कामीं यावें म्हणून नित्य हजारों चिठ्या रवाना कराव्या. पुण्यापासून पन्नास कोसांवर खर्डे म्हणून गांव आहे, त्या गावाचे सुमारास निजाम हा

चाळीस हजार फौज घेऊन आला होता. त्याजबरोबर फ्रेंच लोकांची बारा हजार कवाइती फौज होती व कांहीं तोफा असून दिवाण मशीरुलमुल्क हाही होता. पुण्याहून नाना व सवाई माधवराव हे पुण्यास असलेल्या दहा हजार फौजेनिशीं बाहेर निघाले. तेव्हां निजामाचा अकबरनवीस त्यास नित्य खबर पाठवी कीं, येथें फौज वगैरे कांहीं नाहीं. ब्राह्मण लोकांचा मात्र जमाव आहे. परंतु ते नित्य तीनदां तीनदां सोंवळ्या ओंवळ्याचीं धोतरें वाळत घालतात व तीनदां तीनदां नेसतात, अशी त्यांची स्थिति आहे. तों तों निजामास असें वाटलें कीं, पूर्वीं उदगीर, राक्षसभुवन व तांदूळजें येथील लढाईत माझा पराभव झाला, परंतु आज मराठ्यांस जिंकण्यास मला कांहीं हरकत नाहीं. व लौकरच पुणेंही हस्तगत होईल. परंतु नानांची रचना अशी कांहीं चमत्कारिक होती कीं, त्यांस दरमुक्कामास फौज येऊन मिळूं लागली होळकराची फौज आली, शिंद्याची फौज आली, पटवर्धन आले, निंबाळकर आले, पानसे आले, प्रतिनिधी आले, रास्ते आले, ह्याप्रमाणें नगरास जाईतोंपर्यंत त्यांजबरोबर एकंदर लाख फौजेचा बेत जमला. सर्व मराठे मंडळ – शिंदे, होळकर, भोसले, गायकवाड, पटवर्धन, विंचूरकर, प्रतिनिधी, सचीव, निंबाळकर, घाडगे, चव्हाण, डफळे, पवार, थोरात, पाटणकर, फडके, रास्ते, पानसे, राजे बाहादर, जाधव, सोमवंशी, इत्यादि तमाम, पानपतावर जमले होते तसे नगरावर जमले. दाणा, वैरण, मोदीखाना, वगैरे सर्व सरंजाम वाटेनें जिकडे तिकडे पुष्कळ भरला होता. लांकडें, कडबा, यासही कांहीं तोटा नव्हता असा बेत ठेविला होता पुढें कड्याहून खड्र्याजवळ स्वारी पोहोंचली. तेथें दोन्ही फौजांचा मुक्काम झाला. नंतर नानांकडून अखेरचीं बोलणी होण्याविषयीं निरोप गेले. परंतु मशिरानें सांगितलें कीं, आह्मी तुमचें ह्मणणें कांहीं कबूल करीत नाहीं. तुमची आमची लढाई व्हावी, दुसरें आम्ही कांहीं इच्छीत नाहीं. तेव्हां दौलतराव शिंदे यांचे बक्षी नारायणराव हे तेथें होते, त्यांजकडे तोफखाना व पलटणें होतीं. त्यांनीं सांगितलें कीं, पहिली लढाई आह्माकडे असूं द्यावी; मग त्यांत आह्माकडून कसर झाल्यास मागाहून बाकीची कुमक तयार ठेवावी. तेव्हां नानांनीं सांगितलें कीं, ठीक आहे. आणि त्याप्रमाणें त्यांनीं पुढें तोफा व पलटणें पाठविलीं त्यांच्या भडिमारांतच निजामाचे सर्व स्वार घाबरून खड्र्याच्या गढींत शिरले तेव्हां शिंद्यानें बाहेरून तोफा लावून त्यांस घेरा दिला. इतक्यांत पन्नास हत्तींवर निजामअल्लीकडील जनानखाना होता तो बाहेरच राहिला; तेव्हां शिंद्याचे लोक ते हत्ती घेरून नानाफडणविसांचे तंबूजवळ घेऊन आले. आणि सांगू लागले कीं, निजामअल्लीचा सर्व जनानखाना धरून आणिला आहे. तेव्हां नानांनीं रागें भरून सांगितलें कीं ही निजामअल्लीशीं लढाई आहे, त्यांचें बायकांशीं नाहीं. आणि शत्रू जरी अडचणींत सांपडला तरी त्याची तुह्मीं अमर्यादा करूं नये. तर बरोबर चार भले लोक देऊन निजामअल्लीकडे हा जनानखाना पोहोंचवून द्यावा. आणि श्रीमंतांचा निरोप सांगावा कीं, लढाईचे घाईत हत्ती बाहेर राहिले त्यांस संभाळून कांहीं एक तसदी न देतां आपणाकडे पोहोंचविण्यास हुकूम झाला आहे. त्याप्रमाणें चार सरदार बरोबर जाऊन त्यांनीं खड्र्याचे गढीत तो सर्व जनानखाना पोहोंचवून दिला. तेव्हां हा थोरपणा पाहून निजामअल्ली म्हणाला कीं, वाहवा रे नाना !

दुस्मान तर खरा, पण केवळ दाणा आहे; दुस्मानी व्हावी तर अशी थोरांशींच व्हावी. असें बोलून त्यानें आपलें कलमदान व शिक्के नानांकडे रवाना करून दिले आणि सांगितले की, आपणास पाहिजे तसे करून त्यांजवर शिक्के करावे, माझी कांहीएक हरकत नाहीं; मी आपला थोरपणा पाहून फार उपकारी झालों. ते शिक्के व कलमदान नानांजवळ आलें तेव्हां त्यांनी असें उत्तर सांगून पाठविलें कीं, शिक्के पाठविले तरीं आम्ही एक पैसाही जास्त घेणार नाहीं. आमचें जें मागणे आहे तें आज दहा वर्षांपासून तुम्हांला माहीत आहेत, त्याबाहेर आमचें कांहीं म्हणणें नाहीं. असें जाणून आपणच तहाची यादी करावी. आमचें मागणें इतकेंच कीं, जे रुपये येणें आहेत त्यांची फेड होईपर्यंत मशीर यास ओलीस द्यावें लागेल, व तो, फैसला होईपर्यंत पुण्यास राहील. हें फडणीसांचे बोलणें निजामअल्लीस सर्व ठीक वाटलें, परंतु ओलीस देण्याची गोष्ट फार कठीण वाटली. तरी, शेवटीं त्याला ती कबूल करावी लागली. आणि मशीर नानांबरोबर पुण्यास येऊन खजिन्याचे बागेंत राहिला.

या खडर्याचे लढाईबद्दल एके ठिकाणीं हा पुढील श्लोक आढळला आहे –

**केला हल्ला सवाई प्रभुनिजकटकें यातऱ्हें मार दिल्हा**
**तेव्हां किल्ला परांडा जवळहि असतां जाहला दूर पल्ला ॥**
**नाहीं गल्ला न पाणी यवन तळमळी ‘ या नबी यार अल्ला !**
**बोले सल्ला करोजी अबहि गनिमको चाहिसो देव जिल्हा ! ! ’**

● ● ●

विष्णु महादेव गद्रे यांचा मुलगा गणपतराव यानें लग्न केले त्यांत शालजोड्यांच्या पायघड्या घातल्या. हें वर्तमान नानांस कळतांच त्यांनीं गद्र्यांपासून तीन लाख रुपये दंड घेतला. नानाफडणविसांपर्यंत असें होतें कीं, कोणींही रीतीबाहेर चालूं नये. वस्त्र, पात्र, सर्व बेतानें घ्यावें. ज्यांस जो मान मिळेल तोच त्यानें चालवावा. सरकारांतून कोणींही मान मिळाल्यावांचून चौघडा, नगारा, पालखी, चोपदार, मशाल, अबदागीर, वगैरे वागवूं नये. राव असें श्रीमंतांवांचून कोणास म्हणत नसत. व वाडा हा शब्द सरकारचे वाड्यास मात्र म्हणत, असे नियम असत. गद्रे हे गपचुप यांचे गुमास्ते होते. त्यांनीं त्यांस तीन लाख रुपये बक्षीस देऊन वेगळें दुकान करण्यास सांगितलें, तेव्हांपासून ते पृथक् झाले. यांचे घरीं खर्चही मोठे असत. कोणाचा दरसाल दोन लाख व कोणाचा तीन लाख, अशा प्रमाणानें असे. घरीं स्वार, आरबांचे पाहारे, वगैरे मोठें वैभव असे. त्याचप्रमाणें पालख्या, मेणे, वगैरे मौल्यवान सरंजामही असत.

● ● ●

### पेशवाईतील वैद्यकी

आतांसारखी पेशवे कारकीर्दीत इस्पितळे नव्हतीं. तरी मोठे लोक वैद्यांचा संग्रह करीत, व त्यांजकडून मोठीं मोठीं रसायनें, तेलें, व चूर्णें वगैरे तयार करवीत; आणि त्यांचे

येथें जे मागावयास येतील त्यांस तीं देत. त्याचप्रमाणें वैद्यांस, त्या रोग्यांस पाहावयास सांगत. सोलापुरकर जोशी यांची बाजीरावानें जप्ति केली, तेव्हां त्यांचे घरीं तीन लाख रुपयांच्या मात्रा वगैरे वैद्यकीचे पदार्थ सांपडले ! त्याचप्रमाणें रास्ते यांचे घरीं कारीचे अडीचशें खल सुरू असत, आणि मोठालीं रसायनें तयार ठेवीत. तसेच, बळवंतराव नागनाथ, वगैरे सद्‌गृहस्थांचे घरीं ही वैद्यकीचे छंद मोठें असत. यांच्या घरचीं औषधें–लोह, अभ्रक, हेमगर्भ, रससिंदूर, वसंत वगैरे लोक अद्याप घेत आहेत. या प्रमाणें औषधें आतां कोणी तयार करीत नाहीं व तितकें कोणांत सामर्थ्यही नाहीं.

• • •

## माधवपंडित आणि हेमाडपंत

विद्यारण्य शास्त्री, ज्यांनीं पंचदशी वगैरे वेदांताचे ग्रंथ केले, ते पूर्वी विजयनगरच्या राजाचे दिवाण होते. त्यांचें पूर्वाश्रमींचें नांव माधव असें होतें. या माधवांची, आणि हेमाडपंत म्हणजे हेमाद्री हे दौलताबाद म्हणजे देवगिरी येथील माधव राजे होते त्यांचे दिवाण, अशा उभयतां दिवाणांची पैज पडली होती कीं, जास्ती ग्रंथ कोण करतो. एक माधव झाला म्हणजे एक हेमाद्री होई. या प्रमाणें प्रत्येकानें बारा बारा ग्रंथ केले. कालमाधव, निदानमाधव इत्यादि माधवाचे व त्याचप्रमाणें हेमाद्रीचेही ग्रंथ आहेत. हे उभयतां दिवाण पौरुष ग्रंथांत बहुत प्रसिद्ध आहेत. शिवाय यांनीं इमारती वगैरे बहुत बांधल्या आहेत. त्रिंबकास गोदावरीचा घांट, सिन्नराजवळचें देऊळ, वगैरे अशीं हेमाडपंती कामें बहुत प्रसिद्ध आहेत. त्यांस चुना वगैरे न लावतां एकावर एक दगड रचून तीं केलेलीं असतात. त्यांस कर्णखिळीची कळाही म्हणतात. राजाची मदत फार असे म्हणून अशीं कामें करण्यास त्यांस अडचण नसे. पुढें त्यांनीं वेदाचें भाष्य करावयास आरंभ केला. तेव्हां माधवाचा वडील भाऊ सायनाचार्य म्हणून होता, त्यानें त्यास म्हटलें कीं, माधवा! तूं जे ग्रंथ करतोस त्यांजवर आपलेंच नांव घालतोस; माझें नांव राहूं नये असें तुझे मनांत आहे कीं काय? तेव्हां माधवानें सांगितलें कीं, आजपासून जे ग्रंथ होतील त्यांजवर तुमचें नांव घालीत जाईन. त्याजवरून सायनाचें वेदभाष्य असें म्हणतात. हे ग्रंथ, वैदिकमार्गप्रवर्त्तक जो वीरबुक राजा होता त्याचे कारकीर्दीत झाले आहेत. पूर्वीची ग्रंथ प्रसिद्ध करण्याची रीति अशी असे कीं, ज्या राजाचे घरीं ग्रंथ होत, त्यानें लेखक बसवून पांचशें किंवा हजार प्रती कराव्या आणि क्षेत्रोंक्षेत्रीं ब्राह्मण समुदाय पाहून त्यांस वांटून द्याव्या ह्या प्रमाणें ग्रंथ प्रसिद्ध होत. त्यांस ते ग्रंथ विकावयाचे, त्याजकरितां दुकान घालावयाचें अथवा त्याचे विक्रीचा हिशेब ठेवावयाचें माहीत नसे. या प्रमाणेंच महाभाष्यादि व भारतादि पर्वतप्राय ग्रंथ तयार झाले आहेत !

## बाजीरावाची दिनचर्या

बाजीरावाची दिनचर्या चमत्कारिक होती व तीच त्याचें राज्य बुडण्यास कारण झाली. ती अशी: तो शनवारचे वाड्यांत कधीं राहात नसे. कारण, कांहीं लोकांनीं त्याचे मनांत अशी जबरदस्त भीति भरविली होती कीं,नारायणराव मारले ते तेंथें समंध होऊन

फिरत असतात! व याजकरितां त्याणें तो वाडा, अगदीं वर्ज केला होता. बाजीराव याचीं, बुधवारवाडा, शुक्रवारवाडा, फुलशहर म्हणजे फुलगांव वगैरे स्थलें प्रसिद्ध आहेत. फुलशहर हा तर पुण्याचा मकरपुराच होता ! शिवाय कोथरुडचा वाडा, पाषाणचा वाडा व पर्वती अशीं पांच सहा ठिकाणें होतीं. वाडयांत दोन तीनशें बायका नित्य न्हावयास येत असत. त्यांनीं सकाळीं न्हावयाचा समारंभ करावा, तो प्रहर दिवसपर्यंत चाले! नंतर जेवावयाची तयारी झाल्यावर इच्छेस येईल त्या वाडयांत बाजीरावाची स्वारी जात असे पंक्तिभोजनाचे समयीं सर्वकाळ बायका जवळ बसलेल्या असावयाच्या. आश्रित लोकांनीं चार चार पांच पांच लग्नें करून घरीं एक बायको ठेवावी आणि सरकार वाडयांत बाकीच्या बायका पाठवाव्या! आणि याजकरितांच अन्याबा राहतेकर वगैरे यांनीं जास्ती लग्नें केलीं होती! जो गृहस्थ वाडयांत बायको पाठविणार नाहीं त्याजवर श्रीमंतांची इतराजी व्हावयाची! याजमुळें अब्रूदार गृहस्थांनीं वाडयांत जाण्याचें सोडिलें, इतकेंच नाहीं, तर पुणें देखील सोडिलें. सर्व अब्रूदार तितके ह्या दुष्ट कृत्यास नाराजी होते; आणि गैर अब्रूदार तितके या कृत्यांत सामील होते. बायकांनीं सर्व कारभार करावा; व उलटा नवऱ्यावरच त्यांचा हुकूम असे! त्यांनीं आपल्या नवऱ्यांकरितां श्रीमंतांस सांगून त्यांस मामलती, कमाविशी वगैरे द्याव्या!! त्यांजवर नवऱ्याचा हुकूम इतकाच कीं, वाडयांत राहा आणि सरकारची मर्जी खूष करा!!! बयाताई दातारीण, शिता शेंडीं, काशी दीक्षितीण, उमा फडकीण, ताई पेठीण, या प्रकारच्या सुमारें दोन चारशें उनाड बायकांचा थवा नेहमीं वाडयांत भरलेला असे. तितक्यांचे शृंगार, दागिने आणि सोंगटया वगैरे गोंधळ चालून त्यांत श्रीमंतांनीं काळ काढावा ! शिष्ये, पाणके, वगैरेंशीं व्यभिचाराची त्यास सदर परवानगी असे ! त्यांत कितीएक स्त्रिया बहुत देखण्या, रूपवान, ज्वान, थट्टेखोर व बोलक्या असत. या प्रमाणें रावबाजीच्या कारकीर्दीत सर्व गृहस्थांचीं घरें खराब झालीं ! जेवून उठले म्हणजे पर्वतीस वगैरे दर्शनास आल्यावर शास्त्री, पंडित व भट यांची कचेरी होत असे. त्यांपैकीं कोणीं म्हणावें बाजी हा कृष्णावतार आहे ! कोणीं म्हणावें, शिवाचा अवतार प्रगटला आहे ! वर्षांतून सहा महिने खालीं जावयाचे. कोपरगाव ही पूर्वी बाजीच्या कैदेची जागा होती तेथें, पंढरपूर, नासिक इतके ठिकाणीं बाजीरावाची स्वारी वर्षास जावयाची. प्रमाणें ह्यांत सहा महिन्यांचा काळ जात असे. एकंदर राज्यकारभाराच्या नांवानें शून्य ! फार तर काय ? पण दौत लेखणीही वाडयांत मिळावयाची नाहीं ! ज्याला काम असेल त्याला भेट व्हावयाची नाहीं. बायकांचे हातून सर्व कारभार चालावयाचा. माणकेश्वर व चिंतो वामन यांचे घरीं जाऊन मक्त्याने मामलती वगैरे घ्याव्या. त्यांत सरकारास पैसा मात्र पुष्कळ भरावा लागे. सर्व खर्चात जेवणाचा खर्च काय तो मोठा. ब्राह्मणांस संतुष्ट करण्याकरितां मोठाली दानें देत. फौज फांटा, पागा, हुजुरात, सरदार, मुत्सद्दी वगैरे यांस पैसा मिळावयाचा नाहीं. याप्रमाणें स्थिती होती ! सर्व सरदारांशीं द्वेष असे. कारण ते नाना फडणविसाचे कारकीर्दीतील व सवाई माधवरावाचे पक्षांतील होते. तरी, असे बाजीरावाची तारीफ करणारे व त्यास कृष्णावतार म्हणणारेही बहुत होते. जसे मल्हाररावाचे मित्र पुष्कळ होते, तसे याचेही होते. तो पळाला तरी त्याची मार्गप्रतीक्षा करणारे व त्याजकरितां रडणारे बहुत होतेच ! कोणी पागोटीं

घालण्याचीं सोडलीं; कोणी त्याच्या पत्रिका दाखवीत फिरत असत; व असा प्रभु होणार नाहीं; त्याची गोष्ट काय सांगावी ? तो केवळ कृष्णावतार होता; तो पुन्हां लौकरच येईल; या भ्रांतींत काळ काढीत होते !! याचप्रमाणें गाइकवाड मल्हाररावाचे मित्र व लखनौच्या वाजिदअल्लीचे मित्र बहुत आहेत. तस्मात् लोक बुद्धिहीन झाले यांत संशय नाहीं. या गोकुळांतील बायका किती एक ब्रह्मावर्तास गेल्या व कांहीं पुण्यांत आपापल्या घरीं राहिल्या.

४०

# पंडित स्वामी श्रीमद्दयानंदसरस्वती

**विपदि धैर्यमथाऽभ्युदये क्षमा सदसि वाक्पटुता युधि विक्रम : ।।**
**यशसि चाऽभिरुचिर्व्यसनं श्रुतौ प्रकृतिसिद्धमिदं हि महात्मना ।। •**

**भर्तृहरि**

ह्या महात्म्या पुरुषाविषयीं आज आह्मी चार शब्द लिहिणार आहोंत. सत्पुरुषांचीं चरित्रें लिहिण्याचा महाजनसंप्रदाय आहे; त्याचेंच अनुकरण आह्मी करीत आहों. आतां, प्रस्तुत स्थलीं जें स्वामीजींचें चरित्र लिहावयाचें, त्यांत ते कोणत्या कुलांत जन्मलें, त्यांची बालयौवनोत्तरवयांतील कृत्यें, त्यांचे प्रवास, इत्यादींचीं वर्णनें करण्याचा आमचा हेतु नाहीं. तर त्यांच्या सद्गुणप्रभावाचें यत्किंचित् लेखन करून त्यांचा सद्धेतु काय होता, त्या विषयीं त्यांचे काय काय उद्योग चालले होते, त्यामध्यें त्यांस कसकसें यश मिळत चाललें, व त्यांचे आपल्या पूज्य देशाच्या उन्नतीविषयीं कितीं प्रकारांनीं परिश्रम चालले होते, इत्यादि तांत्रिक गोष्टींचें थोडक्यांत वर्णन करावयाचें आहे. पंडित स्वामी दयानंदजींचे समग्र चरित्र लिहिल्यास तो एक मोठाच विस्तृत ग्रंथ होणार आहे. परंतु तसें समग्र

---

• संकटकालीं धैर्य, भरभराटीत दया, सभेंत वक्तृत्व, समरांगणांत शौर्य, कीर्ति संपादनाची हौस आणि वेदाभ्यासाचा छंद इतके गुण महात्म्यांचे ठायीं प्रकृतिसिद्धच असतात!

चरित्र लिहिण्यासारखी आमच्याजवळ सिद्धता नसून स्थल व काल पांचेंही आमच्याजवळ असावें तसें वैपुल्य नाहीं. याकरितां वर लिहिल्याप्रमाणें आह्मी त्यांचे विषयीं तांत्रिक वर्णन लिहून त्या सत्पुरुषाची किंचित् सेवा करणार आहोंत.

दयानंदजींचें समग्र चरित्र लिहावयाचें ह्मटल्यास त्यांत त्यांच्या प्रवासाचा आणि त्यांमधून स्थलोंस्थलीं धर्माचारादि नाना विषयांवर त्यांजकडून झालेल्या वादविवादांचाच इतिहास फार मोठा होणार आहे. पैकीं, त्यांच्या जन्मापासून तों त्यांणीं संन्यासग्रहण केल्यापर्यंतचें आत्मचरित्र त्याणींच स्वतः लिहून प्रसिद्ध केलें आहे व ठिकठिकाणीं जी त्यांणीं व्याख्यानमाला दिली त्यांतील आत्मवृत्तकथन हाही एक विषय असून त्या व्याख्यानमालेबरोबर तें आत्मवृत्तकथनही अनेक भाषांतून प्रसिद्ध झालें आहे. तेव्हां त्याचीच येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नसून वर लिहिल्याप्रमाणें त्यांच्या चरित्रांतील मुख्य मुख्य व विशेष महत्त्वाच्या आणि सर्वांना वंद्य, ग्राह्य व अनुकरणीय अशा कित्येक गोष्टींचेंच येथें विवेचन करण्याचा आमचा इरादा आहे.

दयानंदस्वामीसारखीं मनुष्यें या देशाचे दुर्भाग्यानें फारच थोडीं होतात व त्यांच्या सारखीं जीं कोणी विरल मनुष्यरत्नें जन्मतात त्यांस आयुर्मर्यादा फारच थोडी होते, हें आपल्या देशाचें अत्यंत दुर्दैव होय. आधीं चांगलीं मनुष्यें व चांगल्या वस्तु मिळणें दुष्प्राप असून मिळाल्या तर त्या चिरकाल लाभणें याला दैवानुकूल्यच पाहिजे. परंतु तसें दैवानुकूल्य आपल्या भाग्यहीन देशास नाहीं असें आजपर्यंतच्या अनुभवावरून सिद्ध होत आहे. काय चोहोंकडून आपल्या भारतवर्षास वनवास व विपत्ति भोगाव्या लागत आहेत ! त्याच्या वाटयास कांहींएक अनुकूल भाग येऊं नये असें त्याचें खडतर प्रारब्ध आहे काय? शूर, वीर, वक्ते, पंडित, ज्ञाते, तत्वज्ञ, कुशल कारागीर, शिल्पज्ञ, देशैकनिष्ठ, उद्योगी, कष्टाळू, श्रमसाहक, धार्मिक, उदार, सदाचारी, निरभिलाषी, निगर्वी आणि प्रसंगानुरोधी अशीं मनुष्यें देशांत पाहिजेत तितकीं असल्यावर मग देशाचा भाग्योदय तो दुसरा कोणता?

स्वामी दयानंदजींमध्ये वरील कित्येक गुणांचें एक समयावच्छेदेकरून वास्तव्य असल्यामुळें तो पुरुष अद्वितीय होता असें ह्मणावें लागतें. वक्तृत्व, पांडित्य, ज्ञानवत्व, देशकल्याणैकनिष्ठा, उद्योगिता, श्रमसाहकता, धार्मिकता, औदार्य,सदाचार, निरभिलाषिता, निगर्विता आणि प्रसंगानुवर्तित्व हे गुण स्वामीजींमध्यें पूर्ण वसत होते. व या गुणांचा उच्चार त्यांचे मृत्यूनंतर देशी व विदेशी सर्व पत्रकर्त्यांनीं आणि मासिकादि पुस्तककर्त्यांनीं आपापल्या लेखांतून केला आहेच. तेव्हां तद्विषयक पुनर्लेखनाची आवश्यकता नाही. आम्हीं वर जें एक त्यांस विशेषण दिलें आहे तेवढयामध्यें त्यांच्या सर्व गुणांचा अंतर्भाव योग्य प्रकारें व निर्मत्सरतेनें होईल असें आह्मास वाटतें. तें विशेषण 'अद्वितीय' हें होय. दयानंदजींच्या अस्तित्वांत त्यांणीं या 'अद्वितीयत्वा'चा पूर्ण उपभोग घेतला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. दयानंदजींचें धैर्य, गांभीर्य, मनोत्साह आणि तद्नुरुप नैरालस्यानें वर्त्तन हीं अपूर्व होतीं.असें पुत्ररत्न ज्या मातेच्या उदरीं जन्मलें तिची कूस धन्य होय आणि

उपदेशाचा ठसा यांणीं बहुत लोकांस स्वामीजींच्या अनुज्ञेकडे ओढून त्यांस त्यांचे अगदीं भक्त बनविलें. आतां स्वामीजींच्या संबंधाची ही लोकभक्ति या पुढेंही अशीच अव्याहत चालेल असें नाहीं, तथापि दयानंदजींचें विद्यावैभव आणि त्यांचे संतत प्रयत्न यांचा जो यत्किंचित् शेष त्यांचे पश्चात् या भूतलावर राहिला आहे तो तरी निदान अजरामर राहील अशी आशा आहे.

दयानंदजींचा थोरपणा आणि त्यांचे विषयींची पूज्यता लोकांमध्यें कां असावी याचें कारण पाहिलें असतां केवळ त्यांच्या गुणशीलाचें हें फल आहे, असें सहज समजेल. मनुष्याला जगामध्यें प्रसिद्धीस येण्यास व लोकांकडून वाहवा ह्मणवून आपल्या ठिकाणीं लोकांचें प्रेम जोडून घेण्यास अनेक साधनें किंवा उपकरणें असतात. स्वत: थोर व श्रीमंत कुलांत जन्मलें पाहिजें किंवा विद्वान पित्याचे पुत्र जन्मलें पाहिजे; अपूर्व व अद्वितीय गुण पराक्रमानीं युक्त असलें पाहिजे; किंवा त्या अपूर्व गुणपराक्रमानुरूप जगांत कांहीं हालचाल आणि ढवळाढवळ केली पाहिजें,ह्मणजे लोकांचें आपल्याकडे लक्ष्य लागून आपण जगप्रसिद्ध होऊं. आजपर्यंत जे जे प्रसिद्ध पुरुष होऊन गेले ते वरील सदरांतील कोणत्या तरी एका गुणामुळेंच प्रसिद्ध झाले असतील, यांत संशय नाहीं. वरील गुणांपैकीं शेवटच्या गुणांनीं प्रसिद्ध होणें हें अत्यंत प्रशंसनीय होय. व त्याप्रमाणेंच श्रीमद्दयानन्दसरस्वतीस्वामी हे गुण-पराक्रमी असून तदनुरूप त्यांणीं धर्मसंबंधी गोष्टींत फार मोठी हालचाल केल्यामुळें, आर्य लोकांच्या धर्माब्धीत मोठी ढवळाढवळ होऊन, सर्व आबालवृद्धांस तो पुरुष ज्ञात झाला. वैदिक धर्मातील सत्यशोधनाचा महाप्रयत्न स्वामीदयानंदजो सारखा अलीकडील काळांत कोणाकडून झाला असेल असें वाटत नाहीं. व यामुळें त्यांजकडून वैदिकव्यासंग जितका झाला होता तितका इतर कोणाकडूनही झाला नाहीं. वेदांवर अनेकांकडून अनेक दोष येत व त्यामध्यें अनेक चुकीची स्थळें आहेत असा लोकांमध्यें वाद चाले. परंतु त्या सर्व दोषस्थलांचें स्वच्छीकरण करण्याकरितां स्वामीजींनीं फार मोठा व अपूर्व प्रयत्न सुरू केला. तो कोणता ह्मणाल तर, त्यांचें ' वेदभाष्य ' हा होय. दयानंदस्वामींच्या या वेदभाष्याची प्रसिद्धि सर्व हिंदुस्थानांत–दक्षिणेकडे कन्याकुमारीपासून तों उत्तरेकडे हिमाद्रीपर्यंत आणि पश्चिमेकडे अटकेपासून तों पूर्वेकडे ब्रह्मदेशापर्यंत – चारही दिशांस झाली होती. हें भाष्य आह्मीं वर ह्मटल्याप्रमाणें खरोखरच ' अपूर्व ' असून तें हिंदुस्थानी भाषेंत निघत होतें. यामुळें, तें सर्व लोकांस वाचण्यास सांपडून त्याचा सर्वांस खरा लाभ होत असे. या भाष्याची भूमिकाही मोठी आहे व त्यांत वेदभाष्याचें प्रयोजन सिद्ध केलें आहे. परंतु हा एवढा मोठा प्रयत्न स्वामीजींच्या अकालीं मृत्यूने तसाच मध्यें पडून राहिला ! त्याचे आतां फिरून उत्थापन होण्याची आशा नाहीं !

स्वामीजींची तर्कशक्ति आणि योजकता ह्या अद्वितीय होत्या असें त्यांच्या उपदेशपर व्याख्यानांवरूनच अनेकांस कळून आलेंच आहे व त्याविषयीं त्यांचें पश्चात् त्यांचे ग्रंथ तर साक्ष देण्यास सिद्ध आहेतच. त्यांणीं वेदार्थाची फोड जितक्या उत्तम व बालबोध रीतीनें केली तितकी आजपर्यंत कोणाकडूनही झाली नाही असें ह्मणणें, आमच्या मतानें, साहस

होणार नाहीं. त्यांच्या वेदार्थपटुत्वामुळें त्यांजपुढें कोणत्याही धर्ममताचा महापंडित आला तरी तो लटपटून जाई व त्यांचें ह्मणून स्वामीजींच्या प्रखर विद्या तेजापुढें यत्किंचितही विद्वत्वकिरण चमकूं नये, अशी त्याची गाळण होऊन जाई. आह्मी ह्मणतो ही अत्युक्ति नाहीं. दयानंदजींची विलक्षण विद्वत्ता आणि तदनुरूप त्यांची निःस्पृहता, या देवतांच्या जोडीनें तो पुरुष इतका कांही वीरशिरोमणि बनलेला असे कीं त्याचा पाडाव करण्यास कसाही महारथी पंडित सभांगणीं प्राप्त झाला तरी स्वामीजींच्या तोंडून 'भो पंडिताः' निघाले कीं; त्यांची सर्व षड्शास्त्रायुद्धें लटकीं पडत! यांत ह्मणजे स्वामीजी हे सामनेवाल्यांशी औद्धत्यानें व घरसोडगिरीनें वागत आणि त्यांजशीं भाषण करण्यास पुढें सरसावलेले शास्त्री, वैदिक व पंडित हे गरीब व थापडवाईक असत ह्मणून त्यांची गाळण होऊन ते पराभूत होत, असा कांहीं अर्थ नाहीं. तर स्वामीजींच्या पुढें त्यांच्या विलक्षण पांडित्यामुळें त्यांची जिव्हाच चालूं नये असा कांहीं योग घडून यावा! स्वामीजींचा तर्क, त्यांची बुद्धि आणि त्यांच्या प्रतिपादनाची किंवा वादाची शैली हीं बघून प्रतिपक्षी अगदीं गांगरून जात. तें बुद्धिवैभव, तें तार्किक्य आणि ती वादशैली इतर पंडितांमध्यें मुळींच नसल्यामुळें त्यांची मति स्तंभवत् होई. असे प्रसंग आह्मीं अनेक ठिकाणीं पाहिले असून, त्याचवेळीं दयानंदजींच्या अद्वितीयत्वाबद्दल आमची बालंबाल खात्री झाली होती.

असा गुणशाली, व विद्वच्छिरोमणी पुरुष असल्यावर मग लोकांमध्यें त्याच्या कीर्तिसुगंधाचा परिमल दरवळून लोक त्याला मोहित होतील यांत आश्चर्य तें कसलें? परंतु यांत दुःखाची गोष्ट हीच कीं, दयानंदजींचें हें वैभव आणि ही गुणवत्ता त्यांच्या अस्तित्वांत लोकांनीं ओळखावी तशी ओळखली नाहीं व त्याप्रमाणें त्या महापुरुषाला लोकांकडून जसा सार्वत्रिक सन्मान आणि आदर मिळायला पाहिजे होता तसा मिळाला नाहीं. फार प्राचीनकाळापासून हा अनुभव आलाच आहे कीं, सत्पुरुषांची योग्यता त्यांच्या जीवमान-काळीं लोकांस समजत नाहीं व त्यामुळें त्यांजकडून त्या सत्पुरुषांचें जसें चीज व्हावें तसें होत नाहीं. परंतु मागाहून लोकांना आपोआपच त्यांजविषयीं यथार्थ ज्ञान होऊन ते पश्चात्तापपूर्वक त्या महापुरुषांच्या सत्कीर्तीस भजूं लागतात. याजबद्दल आजपर्यंत सहस्त्रशः उदाहरणें देतां येतील. तेव्हां तद्नुरुपच दयानंदजींविषयींही जें लोकांचें औदासिन्य होतें त्याजबद्दल अपूर्वता वाटणार नाहीं. असे भाग्यशाली सत्पुरुष या जगती-तलावर फारच फारच थोडे होऊन गेले असतील कीं, त्यांच्या अस्तित्वांत सर्व लोकांकडून त्यांस एकसारखाच मान मिळत गेला असेल. यावरून, दयानंदस्वामीजींच्या संबंधानें कोठें कोठें लोकांनीं जो अंशतः आपला निरभिमान व तिऱ्हाईतपणा दाखविला त्याजबद्दल फारशी खंती बाळगण्याचें कारण नाहीं. दयानंदजींच्या गुणशीलाची योग्य पारख होऊन त्याला आर्यावर्त्त पण्यागारांत सर्वत्र सारखी किंमत जरी आली नाहीं तरी, त्या गुणशीलाचे पारखी आतां निघून त्याला पूर्वीपेक्षां फार जास्त किंमत येईल अशी आमची खात्री आहे.

दयानंदसरस्वतीस्वामी यांचे आचरण यावज्जीव अत्यंत निर्मल आणि योगिकवृत्तीचे

असे. त्यांचें कडकडीत ब्रह्मचर्य आणि तदनुरूप त्यांचें तपस्तेज हीं फार प्रशंसनीय व पूज्य असत. संसार सुखावर निव्वळ पाणी सोडून परोपकारबुद्धीनें सत्धर्म स्थापनार्थ ज्याणें आपल्याला काया, वाचा, मनें करून वाहून घेतलें होतें व जो लोकापवाद, लोकनिंदा आणि लोकाघात सोसून निष्पक्षपातानें आणि निर्गवितेनें गृहीत स्वकर्मालाच अनुसरला होता, त्याचा दृढनिश्चय, त्याचें धैर्यबल आणि त्याची स्वदेशोत्कर्षेच्छा हीं ह्मणजे कांहीं वेगळीं सांगायला पाहिजेत असें नाहीं. असा पुरूष या देशांमध्यें आलीकडील काळांत हाच एक होऊन गेला. नाहीं म्हणायला हे गुण अंशतः प्रसिद्ध विष्णुबावा ब्रह्मचारी याजमध्येंही होते व तसेंच त्यांचें आचरणही असे. परंतु दयानंदस्वामीजींप्रमाणें त्यांजमध्यें असावी तशी जाडी व अपूर्व विद्वत्ता नव्हती. असे पुरुष निर्माण होण्याला फार काल आणि मोठा पुण्यसमुदाय लागतो. त्याविना अशा सत्पुरुषांचें आणि तपोनिधींचें जन्म देशामध्यें होणें नाहीं. तेव्हां, दयानंदजींच्या संबंधाचें देव्हारें माजविण्यास कारण त्यांची स्वतःची योग्यताच तशी होती.

जे साधु, तत्वज्ञ, मतसंस्थापक अथवा धर्मोपदेशक होऊन गेले त्यांचा त्यांच्या अस्तित्वांत जरी छल झाला तरी त्यांचे पश्चात् लोक त्याचीं भक्ति व पूजन करतात.; त्याचप्रमाणें त्या सत्पुरुषांची देशकल्याणाकडे आणि जातिबांधवांच्या ऊर्जितावस्थेकडे किती प्रवृत्ति होती व त्यांणीं त्या कामाकडे आपल्यास किती वाहून घेतलें होतें याचेंही ज्ञान त्या मेहनती पुरुषांच्या पश्चातच व्हावयाचें; असा अनुभव आहे. दयानंदजींना रात्रंदिवस आपल्या भारतवर्षीय आर्य जनांची ऐहिक व पारमार्थिक सुखप्राप्तीनें उन्नति कशी होईल या गोष्टीची विवंचना असून, त्याविषयीं युक्तिप्रयुक्तींचा आणि सद्धर्माचा उपदेश करण्याचा अत्यन्त हव्यास असे. धर्मविषयक गोष्टींत कोणाच्या शंकाप्रतिशंका आल्या असतां त्यांचीं समाधानें आणि प्रतीकार ते इतक्या योग्यरीतीनें आणि युक्तीनें करीत कीं, तशी रीति युक्ती फारच थोड्यांस साधेल; व हेंच त्यांच्या अद्वितीय बुद्धिमत्तेचे मुख्य लक्षण होय. हिंदु-धर्मातील स्वामीजींच्या, म्हणण्याप्रमाणें आर्यधर्मातील कित्येक गोष्टी, आचार व रूढी ज्या घोटाळयाच्या शंकेच्या व वादग्रस्त आहेत, व ज्यांची समाधानें व ज्याचें उलगडे मोठमोठ्या पंडितांच्यानें झाले नाहींत किंवा होत नाहींत ते दयानन्दसरस्वतींनीं फार उत्तम रीतीनें आणि युक्तीनें केले आहेत. ते त्यांच्या व्याख्यानमालांतून प्रसिद्ध आहेतच.श्रीमद्‌भागवतांतून वगैरे श्रीकृष्णावतारीं अधर्म –व–अनीतिरूप लीला भगवंताकडून घडल्या, वगैरेंचीं वर्णने केलेलीं असून तें श्रीकृष्णासारख्या अवतारी ईश्वरांश पुरुषास मोठें लांछन आहे, असें कोणी स्वामीजींच्या जवळ बोललें ह्मणजे त्यांचें ते असें युक्तीनें समाधान करीत कीं, हीं सर्व दूषणें किंवा लांछनें त्या भद्र पुरुषास लागत नाहींत. कारण, श्रीकृष्ण हा साधारण मनुष्य नव्हता. तो योगेश्वर, विचारी, आणि ज्ञानसंपन्न असल्यामुळें त्याजकडून अशा निंद्य गोष्टी घडल्या असें म्हणणें व त्यांचीं वर्णनें करणें हा सर्व कवींचा दोष आहे. ग्रंथकार कवींनीं वाटेल तशीं वर्णनें आपल्या ग्रंथांतून ठोकून दिलीं म्हणून तीं त्या सत्पुरुषाविषयीं खरीं होत. असें कदापि मानतां उपयोगी नाहीं कारण श्रीकृष्ण हा महाज्ञानी होता, हें त्याच्या भगवद्‌गीतारूप उपदेशावरून सहजच कळत आहे.

स्वामीजींना वेदांतील यज्ञयागादि कर्मांच्या अप्रयोजकतेविषयीं जर कोणीं आशंकारूप प्रश्न केला, तर ते त्यांच्या संयुक्ततेबद्दल असें सांगत कीं, वातावरण निर्दोष आणि शुद्ध करण्याकरितां याज्ञिक कर्मे आवश्य आहेत आणि म्हणून तीं वेदांनीं सांगितलीं आहेत. याचप्रमाणें वेदांत यज्ञकर्मसंबंधी पशुबलींची हिंसारूढीं वर्णिली आहे. ह्मणून ज्यांची शंका असे, त्यावर त्यांचें सांगणें असें होतें कीं, वेदांत हिंसा नाहीं. वेदाचा अर्थ मात्र यथार्थ केला पाहिजे. वेदांनीं पशूंचें पालन लिहिलें आहे. मारण सांगितलें नाहीं. ही गोष्ट त्यांच्या भाष्यभूमिकेंत पाहावी, व पशूंचे बलिहि द्यावयाचे नाहींत. याविषयीं त्यांचा 'गोकरुणानिधि' नामक एक ग्रंथ प्रसिद्ध असून, गोवधाची व पशुहिंसेची जी दुष्ट चाल जिकडे तिकडे अप्रतिबद्ध आहे ती फार घातुक आणि अहितकर आहे व याचा सरकारानें सत्वर बंदोबस्त करावा ह्मणून एक मोठा अर्ज तयार करून त्यावर लक्षावधि लोकांच्या सह्या घेण्याचे काम स्वामीजींनीं चालविलें होतें. व या कामांत सर्व राजे रजवाडे यांस विनंतिपूर्वक सूचना करून त्यांच्या मदतीनें तो अर्ज सरकारांत धाडून गोवधाला प्रतिबंध करण्याचा स्वामीजींचा हेतु होता. त्याप्रमाणें मुंबई येथून एक लक्ष सही घेऊन पुढें इतर ठिकाणच्या सह्या मिळविण्याचें काम चाललेंच होतें; परंतु हें काम उत्पादकांचे हातानें शेवटास जाण्यासारखा योग नव्हता म्हणून स्वामीजींस आयुर्मान कमी होऊन तो हेतु तसाच अतृप्त राहिला.

येथपर्यंत स्वामी हे कोणत्या प्रकारचे मनुष्यरत्न होते याविषयीं अल्प विवेचन झालें. आतां यांचे संबंधाच्या प्रतिपक्ष्यांचे म्हणण्याचा थोडक्यांत विचार करून हे प्रकरण आटोपूं. इकडील आक्षेपकांत दोन तीन गृहस्थ मुख्य असून त्यांतही निबंधमालाकार हे त्यांजमध्यें धुरीण होते. प्रोफेसर भांडारकर वगैरेंचे आक्षेप आणि आशंका नुसत्या तोंडातोंडी वाग्विवादांतच निघाल्या होत्या, व त्यांचे दयानंदजींच्या संबंधानें जें मत झालें असेल तें त्यांचे जवळच राहिलें असावें. त्याचा त्यांणीं बाहेर कोठेंही उल्लेख केला असेल असें वाटत नाहीं. कै. वा. विष्णुशास्त्रीपंडित यांणीं दयानंदजींच्या पहिल्या भेटीच्या संबंधानें इंदुप्रकाशांत एकदां विरुद्ध लेख लिहिला होता. परंतु पुढें त्यांना दयानंदजींची विद्वत्ता आणि तपोबल समजून पुनः त्यांणीं त्यांजविषयीं कधींही अवाक्षर काढिलें नाहीं, इतकेंच नाहीं; तर त्यांच्या तोंडून आम्हीं स्वामीजींची अनेक वेळां स्तुति ऐकिली होती. याशिवाय त्यांच्या इंदुप्रकाशांत पुढें अमदाबाद वगैरे ठिकाणचीं स्वामीजींच्या स्तुतीची आणि लौकिकांचीं अनेक पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांजवरून त्यांचा दयानंदजींविषयीं अनुकूल समज झाला होता असें समजण्यास सबल कारण आहे. ज्याचेविषयीं आपला समज प्रतिकूल आहे त्याच्या स्तुतिस्तोत्याचे विस्तृत लेख आपल्या पत्रांत महिनोंगणती एकसारखे प्रसिद्ध करील अशा उदार प्रकृतीचा पत्रकार आम्हाला वाटतें कोणीही नसेल; व त्याचप्रमाणें कै. वा. विष्णुशास्त्रीपंडितही असावे असा आमचा समज आहे. आणि ज्या अर्थी त्यांणीं वर लिहिल्याप्रमाणें आपल्या इंदुप्रकाश पत्रांत स्वामीजींचा कित्येक महिनेपर्यंत गौरव प्रसिद्ध केला व त्यांच्या आमच्या भाषणांतही त्यांणीं स्वामीजींविषयीं आपली

पूज्यबुद्धी दाखविली त्या अर्थी दयानंदजींच्या विरुद्ध असलेल्या आक्षेपकांतून त्यांचें नांव मुळींच काढून टाकावें हें बरें दिसतें.

दयानंदजींच्या पहिल्या भेटींत लोकांचा कसा काय समज होत असे, व पुढें तो समज कसा पालटत जावा याचें यथार्थ वर्णन ठाणें येथील ' सूर्योदया 'त स्वामीजींच्या संबंधाचा जो मृत्युलेख प्रसिद्ध झाला होता व जो अंशतः आम्हीं या लेखाचे शेवटीं ' स्वामीजींच्या संबंधानें वर्तमानपत्रांचे लेख ' या सदराखालीं स्वतंत्रपणें घेतलेल्या मजकुरांत एक उतारा घेतला आहे त्यावरून समजेल. त्या लेखाप्रमाणेंच कै. वा. विष्णुशास्त्रीपंडित यांचा स्वामीजींविषयीं प्रथमतः समज होऊन वर लिहिल्याप्रमाणें त्यांजकडून एकवार प्रतिकूल लेख लिहिला गेला. परंतु पुढें ते सर्व समज चुकीचे समजून त्यांचें स्वामीजींच्या संबंधानें उज्जल मत झालें, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय, यात संशय नाहीं. समजदार आणि विचारी पुरुषाचीं हीच लक्षणें आहेत कीं, ते एकवार जो आपला भ्रष्ट अभिप्राय आणि दूषित मत झालें असेल तेंच धरून न बसतां, त्यांच्या अभिप्रायांत आणि मतांत सदसद्विचारपूर्वक पालट होतो. त्या प्रकारचे कै. वा. विष्णुशास्त्रीपंडित हे समजदार आणि विचारी पुरुष होते असें ह्मणण्यास कांही हरकत नाही.

एतावता दयानंदजींच्या महाराष्ट्रीय आक्षेपक प्रसिद्ध लोकांपैकीं आतां एक कै. वा. विष्णुशास्त्री चिपळूणकर ह्मणजे, माजी निबंधमालेचे कर्ते, हे मात्र राहिले. यांचा दयानंदजींवर शेवटपर्यंत अत्यंत कटाक्ष होता असें त्यांच्या वारंवार प्रसिद्ध झालेल्या दुष्टोद्गारपूर्वक लेखांवरून समजण्यांस हरकत नाहीं. चिपळूणकर हे आज अस्तित्वांत नाहींत, तेव्हां त्यांचे पश्चात त्यांच्या लेखांवर टीका करण्याचा आमचा बिलकुल इरादा नाहीं. हें आह्मी येथें उघडपणें सांगतों. आमच्या या म्हणण्याचें प्रत्यक्ष प्रमाण आम्ही आपल्या वाचकांस येथें इतकेंच कळवून ठेवितों कीं चिपळूणकर यांणीं खुद्द आमच्या लेखांवर अत्यंत श्रमपूर्वक सुमारे दीड वर्षपर्यंत जी समालोचना लिहिली ती जरी सर्वांशी आमच्या मताला प्रतिकूल असून तिच्यावर उलट उत्तरें लिहिण्यास आम्ही असमर्थ आहो असें नाहीं तरीं, हें काम, ईश्वरकृपें ज्या विचारी व विद्वान लोकांस आमच्या व चिपळूणकर यांच्या लेखांतील सत्यासत्यविवेचनाची शक्ति व बुद्धि आहे त्यांजकडेच सोंपविणें आम्हास प्रशस्त दिसतें.

दयानंदजींच्या संबंधानें चिपळूणकरांनीं घेतलेल्या आक्षेपांविषयीं आणि केलेल्या अनिर्वाच्य निंदेविषयीं आम्ही उदासीन अथवा तिऱ्हाईत राहावें हें आह्मास प्रशस्त दिसत नाही टीकाकार आणि टीकाविषयक हे दोघेही पुरुष आज पंचत्वाला मिळून त्यात उभयतांच्या कीर्ती आणि लेख हेच कायते आतां अवशिष्ट राहिले आहेत. तेव्हां त्या उभयतांच्या लेखांचे संबंधाने अनुकूल प्रतिकूल अभिप्राय आणि टीका लिहिण्यास सर्वांना एक सारखाच अधिकार आहे व त्याप्रमाणें त्या अधिकाराचा थोडासा भोगवटा आह्मी ही घेण्याची वाचकांकडून परवानगी घेतों.

पण्डितस्वामी दयानंदसरस्वती हे इ० स० १८७५ च्या जून जुलै महिन्यांत येथें येऊन गेले व त्यांची येथें सुमारे पंध्रा सोळा व्याख्यानें झालीं, असें वाटतें. त्यांतील कित्येक व्याख्यानें त्याच वेळीं कोणीं उद्योगी पुरुषांनीं प्रसिद्ध केलीं आहेत. स्वामीजींचें वक्तृत्व कोणत्या प्रकारचें होतें हें वर सांगितलेच आहे. त्यांचा येथें विद्वान व ज्ञात्या गृहस्थमंडळीकडून मोठा सन्मान झाला. लोक मोठ्या प्रेमानें त्यांचीं व्याख्यानें आणि उपदेश श्रवण करण्यास जात. स्वामीजींना जो संमान मिळावयाचा तो बहुश: विद्वान व समंजस अशा उदारप्रकृतीच्या गृहस्थांकडूनच. मात्सर्यदोषान्वित शास्त्री, पंडित व भिक्षुक यांजकडून स्वामीजींस मान व आदर मिळण्याची आशाच नव्हती. ह्या प्रमाणें त्यांची येथें मोठी वाहवा झाली. त्यांचें निर्भीड, स्पष्ट आणि किंतुविरहित भाषण सर्वांना अत्यंत प्रिय व्हावें व त्यांचे व्याख्यान ऐकण्यास श्रोतृजनांची अगदीं झिंबड उडावी. ● ह्याप्रमाणें स्वामीजींचा काल येथें फार चांगल्या प्रकारें गेला व पुणेंकर विद्वान् गृहस्थांनीं त्यांचा फार योग्यप्रकारें परामर्ष घेतला. पण हें मत्सरी व हलकट बुद्धीच्या भिक्षुकांस आणि गृहस्थांस न आवडून त्यांणीं स्वामीजींचा फजिता करण्याचा निश्चय केला. एके दिवशीं स्वामीजींवर भक्ति व प्रेम ठेवणाऱ्या लोकांनीं स्वामीजींस हत्तीवरून गांवांत मिरवीत आणिलें. तो संधि बघून येथील कित्येक चटोर व दांडग्या लोकांनी स्वामीजींच्या वरघोड्याबरोबरच एका गाढवास श्रृंगारून त्याचीही मिरवणूक काढिली! व पुढें फारच दांडगाई माजून शेवटीं पोलिसाची मदत आणून ती बंद करावी लागली; वगैरे गोष्टी त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून व खुद्द निबंधमालाकारांनीं आपल्या मालेच्या २३ व्या अंकात विस्तारेंकरून प्रसिद्ध केल्या आहेत. अस्तु; अशा गोष्टी आणि त्याही पुण्यासारख्या विद्यापीठ नगरांत होणें ही, परकीयांस देखील अत्यंत खेदाची बातमी होय. मग ज्यांणीं दयानंदजींना मुद्दाम आमंत्रण करून आपल्या पुण्य नगरांत आणिलें त्यांना हा दुष्ट प्रसंग बघून किती वाईट वाटलें असेल याची कल्पना वाचकांस सहज होईल. आपल्या घरीं सत्कारपूर्वक बोलाविलेल्या पाहुण्याचा असा अपमान व्हावा व त्यांच्या विद्यातपोबलाला अगदीं हीनत्व आणण्याचा मूर्ख लोकांनी प्रयत्न करावा, हें पाहणें कोणासही सहन व्हावयाचें नाहीं. असो, पुढें पुणेंकरांचे ह्या दांडगेपणाच्या व अत्यंत सोरट गिरीच्या कामाबद्दल व्हावयाचें त्याप्रमाणें अंशत: शासन होऊन त्यांना प्रायश्चित्तही मिळालें. तेव्हां तद्विषयक कांही अवशिष्ट भाग आतां राहिला नाही.

---

● 'हिंदक्लब' मध्ये गेल्या जुलै महिन्यांत मोठी झटापट चालली होती. एक दिवस स्वामींचें व्याख्यान आणि दुसरे दिवशी वरील रेवरेंडबोवांचें ( रेव. नीळकंठशास्त्री गोरे यांचें). त्यांत मौज काय होई कीं, स्वामींच्या वेळेस दिवाणखान्यांत जाण्याला रीघ नसे. आणि रेवरेंडशास्त्रीबोवांच्या वेळेस एकेका श्रोत्यानें बरोबर हातरूण आणून प्रभु येशूचें ध्यान करण्याचें मनांत आणलें असतें तरी हवी तितकी जागा होती! आणि ह्यातरुणाची गरजही खरीच ! माहे नोव्हेंबर १८७५. निबंधमाला, अंक २३.

परंतु ह्या सर्व अनिष्ट गोष्टींबद्दल आमच्या निबंधमालाकारांस यत्किंचित्ही विषाद किंवा खेद वाटला नाहीं, ही फार आश्चर्याची आणि दुःखाची गोष्ट होय. मालाकारांना आपल्या मालेमध्यें 'वक्तृत्व' या निबंधांत वक्त्यांचे मालिकेंत श्रीमद्दयानंदजींना निरुपायानें गोंवण्याचा प्रसंग आला व ही गोष्ट निखालस त्यांचे मताविरुद्ध होती, असें त्यांणीं स्वामीजींविषयीं जो एकंदर आपला अभिप्राय दर्शविला आहे, त्यावरुन खास अनुमान होतें. स्वामीजींच्या गुणावगुणांचें किंवा मतभेदाचें पृथःकरण करण्याचें मालाकारांस सामर्थ्य नव्हतें अथवा तसे करणें त्यांस इष्ट वाटलें नसावें. कारण, तसें केलें असतें तर कदाचित् त्यांचे अंगावरच मसलत आली असती ! ज्या विद्वान् पुरुषाची येथें सव्वा डझनावर व्याख्यानें झालीं, तीं सर्व ऐकून त्या व्याख्यात्यामध्यें मालाकारांस ' दुधाची चरवी ' रिचविण्यापेक्षां कांहींच गुण दिसला नाहीं, ही किती सखेदाश्चर्याची गोष्ट आहे ! अथवा, त्यांत आश्चर्य तें कसलें ? मत्सर आणि पोक्त विचाराचा अभाव या दोन दुष्ट गुणांनीं तरुण मालाकारांचे न्यायदृष्टीवर झांपड घालून त्यांच्या गुणावगुणविवेचक सद्बुद्धीस अत्यंत मांद्य आणिलें होतें. त्यामुळें त्यांस स्वामी दयानंदजींमध्यें गुणलेशसुद्धां आढळला नाहीं ! स्वामीजींचा वरघोडा मिरवला त्यावरोवर पुण्याच्या असंभावित आणि कुटाळ लोकांनीं गाढवाचा छबिना काढून सभ्य लोकांमध्यें आपलें हंसें करून घेतलें; यापेक्षां जास्त कांहीं झालें नाहीं. परंतु त्यांत अत्यंत खेदाची गोष्ट ही होय कीं, त्या असंभावितलोकांमध्यें आमचे जवान मालाकारही मिळून त्यांणीं आपल्या सोरट सवं-गड्यांची पाठ थोपटली व झाली ही गोष्ट अत्यंत इष्ट झाली, अशा प्रकारचा गौरव आपल्या पुस्तकांत प्रसिद्ध करून जन्माचा आपल्या सुंदर लेखांस कालिमा लाविला, ही गोष्ट चांगली नाहीं. हा कालिमा मालाकार जर स्वामीजींच्या देहावसान समयीं जीवमान असते, व स्वामीजींची जी आलीकडे पांच सात वर्षांत सर्वत्र कीर्ती पसरून सहस्रावधी लोक त्यांच्या भजनीं लागले होते, तें त्यांणीं पाहिलें असतें तर त्यावरून तरी त्यांचीं पूर्वीचीं स्वामीजींविषयींचीं सर्व कुत्सित मतें दरोबस्त फिरून मालाकारांनींच स्वतः त्यांचें गुणानुवाद गाइले असते, अशी आमची खात्री आहे. परंतु दुःखाची गोष्ट ही झाली कीं, मालाकारांस आयुर्मान थोडें होऊन ते स्वामीजींच्या अगोदरच तीन वर्षे निष्करुण काळाचें दाढेंत पडले, यास निरुपाय झाला! बाकी, मालाकारांस स्वामीजींच्या मतावर आणि त्यांणीं केलेल्या ग्रंथांवर शांतपणें विचार करण्यास अवकाश झाला नाहीं व त्यांणीं स्वामीजींविषयीं आपला अभिप्राय देण्याची फार घाई केली. ह्यामुळें त्यांच्या हातून दयानंदजींविषयीं निंदापर लेख लिहिला जाऊन तोच काय तो त्यांच्या मागें कायम राहिला, ह्याबद्दल वाईट वाटतें, दयानंदजींची जी पुण्यांतील मूर्ख लोकांनीं निंदा केली आणि मालाकारांनी त्यांचा जो उपहास केला त्या निंदेला आणि त्या उपहासाला स्वामीजी हे किती अंशांनीं पात्र होते याचा विचार आमचे वाचक करतीलच. सारांश, दयानंदसरस्वतींच्या महाराष्ट्रीय आक्षेपकांपैकी जे चिपळूणकर हे प्रमुख होते ह्मणून म्हटलें आहे, त्यांचे आक्षेप आणि त्यांच्या आक्षेपांप्रमाणे त्यांचे लेख हे किती सदोष आणि कुत्सित, मात्सर्यप्रपूरित व बालिश होते याचें थोडक्यांत स्पष्टीकरण केलें. मनुष्य अभिमानाला पेटून त्याजकडून

कधीं कधीं किती अश्लाघ्य वर्तन घडतें त्याचें प्रत्यक्ष उदाहरण आमच्या मराठी लेखकांत ह्या प्रसिद्ध मालाकारांचें आहे.

तेव्हां, कोणताही लेख आणि कोणताही आक्षेप प्रसिद्ध करणें तो विचारपूर्वक लिहिला असतां त्यापासून एखाद्या विषयीं लोकांचे भ्रष्ट मत आणि प्रतिकूल अभिप्राय होण्याची भीती नसते. व हे सर्व धोरण लेखकांनीं लक्षांत वागविलें पाहिजे. दयानंदजींची निंदा आणि उपहास पुणेंकरांनीं आणि त्यांचे बांधव मालाकार यांणीं केला, तथापि सर्व भारतवर्ष आणि त्यातील लेखक, कांहीं पुणेकर आणि मालाकार यांच्याप्रमाणेंच असंभावित आणि कुत्सित नाहींत. जगामध्यें गुणावगुण परीक्षणांचें आज अनावर्षण होऊन त्याचा सर्वत्र दुष्काळ पडला आहे अशी ही कांहीं गोष्ट नाहीं. पुण्यांतील लोकांनीं आपल्या अश्लील वत्तर्नानें स्वामीजींचा अपमान आणि दुर्लौकिक करण्याची खटपट केली, परंतु सर्व आर्यावर्त्त पुण्यासारखें अश्लीलवर्ती झालेलें नाहीं. गांव आहे तेथें ह्यारवाडा आहे. चार सभ्य लोक असले तर तेथें दहा असभ्य लोक असतात, असा सर्वत्र प्रकार दिसतो. परंतु त्यांत खेदाची गोष्ट हीच कीं, मालाकारांसारखे जे सभ्य म्हणून ह्मटले जातात तेच कधीं कधीं दुराग्रहाला पेटून असभ्यांचे दोस्त होतात व त्यांच्या बरोबर त्यांच्याच सारखे निंद्य कर्म करितात हे फार वाईट ! स्वामीजींची व्हावयाची त्याप्रकारेंकरून सर्वत्र बडेजाव होऊन त्यांच्या अस्तित्वांत व ते मृत्यूपावल्यावरही त्यांना मिळावा तसा लोकांकडून फार मोठा संमान मिळाला व त्यांच्या विद्वत्तेचें, सद्‌गुणांचें आणि तपोनिष्ठतेचें सार्थक झालें, असें मानण्यास हरकत नाहीं. गजेंद्रारूढ चक्रवर्ती राजाची स्वारी नगरवीथींतून चालली असतां गजेंद्राचा मोर्चा फिरला ह्मणजे ग्रामसिंहांची त्याचे मागें पुष्कळ ओरड चालते; तद्वत् या सद्‌गुरु स्वामीजींवर या जगावरील कित्येक ग्रामसिंह भोंकले किंवा त्यांणीं त्यांच्या कुचेष्टा केल्या तरी गंभीरवृत्तीचा दिग्गज डगमगणारा नव्हता व त्याप्रमाणें तो कोठेंच डगमगलानाही आह्मीं वर एके ठिकाणीं लिहिल्याप्रमाणें साधु तुकारामबोवा यांचा छल करण्यास जसा रामभट वाघोलकर हा चांडालवृत्तीचा ब्रह्मपुरुष झाला होता, तसे छलवादी स्वामीजींचा छल करण्यास पुणेकर अथवा मालाकार यांच्यामध्यें निविष्ट झाले होते, असें ह्मणावें लागतें! तसें नसतें तर त्यांस स्वामीजींविषयीं इतकें अप्रेम आणि अभक्ति झाली नसती. स्वामीजींस अनुकूल असणारी सर्व भारतभूमि एकीकडे आणि त्यांची निंदा व उपहास करणारें पुण्यनगर आणि त्यांत अधिवास करणारे मालाकार हे एकीकडे, ही जोड जमावी तरी कशी? तेव्हां या जोडीत कोणी तरी नाठाळ खटचाळ असावें हें खचित; व तो भाग बहुमतानें आमच्या पुण्यनगराकडे आणि कै. वा. मालाकारांकडे येतो; हें पाहून त्यांजविषयीं वात्सल्य बाळगणाऱ्या त्यांच्या मित्रांतून कोणास बरें वाईट वाटणार नाहीं? अस्तु 'गतं न शोचामि कृतं न मन्ये !' झाल्या गोष्टीस उपाय नाहीं! पुढें तरी आपण ह्या गोष्टी लक्षांत वागवून त्याप्रमाणें सदसद्विचारपूर्वक आणि दूरवर दृष्टी पोचवून वर्तनक्रम ठेवावा, हाच या सर्व भूत गोष्टींचा भावार्थ आहे. इतके सांगून आह्मी पुढें चलतों.

स्वामी दयानंदसरस्वती यांचें चरित्र व त्यांची कीर्ति ऐकून अमेरिका खंडांतीलही कित्येक लोक त्यांच्या भजनीं लागले. व त्यांतील कांहीं लोक इकडे हिंदुस्थानांत येऊन त्यांणीं स्वामीजींची फारच सेवा चालविली. हे लोक कोणते तें आमच्या वाचकांस माहित असेलच. हे लोक ह्मणजे, हल्लीं हिंदुस्थानांत जी 'थिओसाफिकल सोसायटी' म्हणून प्रसिद्ध आहे, ती मंडळी होय. या मंडळींचें 'थिओसाफिस्ट' ह्मणून एक पुस्तक प्रतिमासीं प्रसिद्ध होत असतें. त्या पुस्तकांतून दयानंदजींची कीर्ति आणि त्यांचे विद्वत्त्वादिगुण अवघ्या जगाला महशूर झाले आहेत ! स्वामीजींच्या कीर्तिप्रसाराला वरील मासिक पुस्तक पुष्कळ अंशांनीं कारण होऊन फार लांबलांबच्या लोकांकडून स्वामीजींविषयीं चौकशा आणि खुलासे चालले. सत्धर्मपंथस्थापकांत सातासमुद्रापलीकडे आणि पाताळांतसुद्धां ज्याचा यशोदुंदुभि दुमदुमून राहिला आणि तेथें ज्याची कीर्तिपताका सदोदित फडफडत राहिली, असा अद्वितीय व अपूर्व महापुरुष स्वामीदयानंदसरस्वती हाच एक होऊन गेला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आतां, वरील 'थिओसाफिकल' मंडळीचा आणि स्वामीजींचा पुढें थोडासा मतविरोध झाला.तरी त्या मंडळीची स्वामीजींविषयींची पूज्यता नष्ट झाली नव्हती असें त्यांनी आपल्या पुस्तकांत स्वामीजींचा जो विस्तारपूर्वक मृत्युलेख लिहिला आहे त्यावरून समजण्यास हरकत नाहीं. याप्रमाणे या सत्पुरुषास सर्व जातींच्या व सर्व धर्मांच्या लोकांकडून फार मोठा सन्मान मिळाला व त्या सन्मानास तो महापुरुष सर्वांशी पात्र होता यात संशय नाहीं.

स्वामीजींनीं जो ग्रंथसमूह लिहून ठेविला आहे व त्यांणीं जीं आपलीं मते प्रसिद्ध केलीं आहेत त्यांचें चीज त्यांचे पश्चात् आतां काय व्हावयाचें असेल तें होईल. परंतु अल्पावकाशात त्यांच्यानें जितके करवलें तितकें त्यांणीं केलें व तें आतां त्यांणीं आपल्या अनुयायी सच्छिष्याचे स्वाधीन केले आहे. त्याचा ते जसा सदुपयोग किंवा दुरुपयोग करतील तसा होणार आहे. छत्रपति शिवाजी महाराजांनीं दुष्ट यवनांचें पारिपत्य करून गोब्राह्मण प्रतिपालनास सुयंत्र राज्यकारभाराची योग्य व्यवस्था केली होती, परंतु शिवाजींचे मागून ज्यांचे हातात ती व्यवस्था आली त्याच्या वर्तनाप्रमाणें तिचा परिणाम झाला. त्याचप्रमाणें स्वामीजींनीं जी व्यवस्था केली आहे तिचा परिणामही तिच्या वहिवाटदारांप्रमाणें आणि कारभाऱ्यांप्रमाणे होणार आहे. त्या वहिवाटदारांची आणि कारभाऱ्यांची जशी योग्यता, निष्ठा, स्वामीजींविषयीं प्रेम निश्चयदार्ढ्य व आस्था असेल त्याप्रमाणें सर्व गोष्टी अनुकूल किंवा प्रतिकूल घडणार आहेत. स्वामीजींनी सत्य धर्माची स्थापना• करून ठिकठिकाणीं 'आर्यसमाज' नांवाच्या मंडळ्या त्या धर्माचा प्रसार करण्यास ह्मणून मदतगार ह्मणून नेमून ठेविलेल्या आहेत. त्यांच्या साह्यानें जें स्वामीजींचें निर्मल यश व त्यांचा सद्धेतु तो अप्रतिबद्ध रीतीनें जगामध्यें आपलें उत्तमरूप दाखवील, किंवा त्यांचें असाह्य झालें तर तें सद्यश व तो सद्धेतु तसाच पडून राहील ! त्याची जबाबदारी आतां स्वामीजींवर नसून ती त्यांणीं नेमिलेल्या वरील मदतगार वहिवाटदारांवर आणि कारभाऱ्यांवर आहे. तसेंच बाजारांतील दुकानांत उत्तम व शेलक्या मालाचा ढिगारा पडला आहे. परंतु त्याचा खप होऊन तो लोकोपयोगास येणें हें गांवातील

लोकांच्या ऐपतीप्रमाणें होणार आहे. उंची माल खपण्यास लोकांमध्यें सधनता लागते. कंगाल व नादार लोक असले तर त्यांच्यामध्यें त्या मालाची विक्री होणार नाहीं. कारण, ते भिकारी त्या उंची जिनसांकडे पाहण्यास देखील भितात. तद्वत् स्वामीजींचें सद्धर्मत्व लोकांच्या पुढें पडलें आहे. त्यांच्या सदसद्बुद्धीप्रमाणें धर्मतत्त्वाला ग्राहक मिळून तत्त्व काढणाऱ्या सत्पुरूषाचा सद्धेतु सफल होईल किंवा विफल राहील. ह्या सर्व गोष्टींचे श्रेय किंवा दु:श्रेय दयानंदसरस्वतींचे मागें राहिलेल्या लोकांकडे आहे.

आतां कांहीं स्वामीजी हे आपल्या परिश्रमवृक्षाला कशीं काय फलें आलीं आहेत हें बघायला या मृत्युलोकीं यावयाचे नाहींत. तेव्हां त्यांना आता त्याबद्दलचें सुख नाहीं आणि दु:खही नाहीं त्यांणीं लाविलेला अमृतवृक्ष लोकांच्या हयगईनें अथवा हेळसांडीने कोमेजून, वठून किंवा कर्पून गेला तरी त्यांना त्याबद्दल दु:ख वाटावयाचे नाहीं. आणि लोकांनी पुन: आस्थापूर्वक त्याची जोपासना केली, त्याला काळजीनें वेळच्यावेळीं त्याचें जें जीवन असेल त्याणें सिंचन केलें व त्याला जो कालांतरानें फलभार येईल त्याचा अविभाज्य उपभोग घेतला तरी त्यात त्यांना प्रत्यक्ष कांही सुखलाभही व्हावयाचा नाहीं. त्यांणीं लावलेल्या सद्धर्मरूप छायावृक्षाची काळजी घेऊन त्याची शुश्रूषा ठेविली तर ती आपणा ऐहिक मर्त्यांसच विशेष उपयोगाची होणार आहे. यांपेक्षा कांहीं जास्त सांगण्याची आवश्यकता नाही.

(लोकहितवादी / जाने. – फेब्रु. १८८४ )

४१

# शतपत्रांचा इत्यर्थ

मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयीं कांहीं सुचवितों.

आज दोन वर्षे लोकांस त्यांची स्थिति, रीती कशी आहे ती अगदीं भीड न धरितां उघड करून सुचविली. त्यांत एखादे अक्षर अधिकउणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर त्याणीं क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे की, जो कोणी या पत्रांचे अवलोकन करील आणि विचार करून पाहील, त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीनें कोणाची मजुरी पत्करिली नाही; कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाहीं. कोणाचे सांगण्यावरून किंवा शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केलें नाहीं. लाभावर किंवा द्रव्यावर नजर ठेवून कीर्ति व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके श्रम जे केले ते

लोकांस त्यांची वास्तविक स्थिति कशी आहे ती कळावी. त्यांणीं सुधारावें, त्यांस इहलोकी सुखवृद्धि व्हावी, परलोकांचे साधन घडावें, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकी कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावे; किंवा नाहींसे व्हावे,इतक्याच हेतूने मी यथामतीनें व स्वइच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत व जितके लिहिलें आहे तितकें अक्षरशः खरें खरें निवडून, विचार करून काळजीनें लिहिलें आहे. हें सर्व लोकांस नजर आहे.

हें लिखित शतक कोणी बाळबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखितासारखें वाचनास दिलें तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाहीं. पाहिजे त्याणीं हीं पत्रे छापून प्रगट करावीं. किती एक प्राचीन काळचे लोकांस किती एक लोकहितवादीचीं मतें विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील, परंतु हा त्यांचा मिथ्या भास आहे; कारण कीं, त्यांत हिंदुधर्मास कांही विपरीत नाहीं. फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयीं विचार केला तर खात्री होईल. यापुढें कांही दिवसांनीं लोकहितवादी दुसऱ्या शतकास आरंभ करील; परंतु ही गोष्ट ईश्वराचे स्वाधीन आहे. मला वारंवार इतकेंच लोकांस सुचवावयाचें कीं, मीं काहीं व्यर्थ, मिथ्या किंवा असत्य, लिहिलें नाहीं. जें लिहिले तें यथार्थ आहे, असें मला तर खचित वाटतें. जे सारासार विचार करणारे, व ज्यांचीं मनें पंडितांसारखी कुत्सित नसून विस्तीर्ण झालीं आहेत त्यांस हें समजेल.

माझी सर्व जनांस एवढीच विनंती आहे कीं, तुम्ही सर्व जण विचार करण्यास लागा, वाचावयास लागा, नवीन ग्रंथ व वर्तमानपत्रें वाचा व तुमचे शेजारीं काय होत आहे याचा विचार करा. इंग्रजांमध्यें किती एक चांगले गुण आहेत व ते तुम्हांस प्राप्त व्हावे म्हणून ईश्वरानें त्यांची तुमची संगत घातली आहे हें लक्षांत आणा. सारासार पहा, परंपरा आंधळ्याची माळ लावली म्हणून तीच चालवूं नका, धर्मशील ईश्वरतत्पर व्हा. या गुणांवांचून सर्व व्यर्थ आहे. सत्य बोला, दुष्ट वासना सोडा, धर्मसुधारणा करा, म्हणजे धर्म टाकू नका, परंतु त्याचा अर्थ घ्यावयाचा तसा काळ पाहून घ्या. व ईश्वरासंबंधी व जगासंबंधी ज्ञान सर्व लोकांत वृद्धिगत करा. आळस सोडा, तुमच्यामध्यें वास्तविक बुद्धिमान् असेल त्यास पुढारी करा, त्याचे अनुमतानें चाला. सर्व लोकांची जूट असूं द्या, आपसांत फूट नसावी हें ध्यानांत वागवा. विद्या अधिक होऊन तुमचें पाऊल पुढें पडूं द्या. सर्व देशाची काळजी प्रत्येक जणानें करावी. राज्य कसें चाललें आहे व राजा कोण, त्याची वर्तणूक कशी हें पहात जा. माहितगार व्हा.

तुमच्या प्राचीन काळच्या विद्या, ग्रंथ, तर्क व कल्पना यांचे शंभरपट आतां चांगल्या विद्या व अधिक कल्पना निघालेल्या आहेत, त्या सर्व पहा. तुमचे संपत्तीवर तुम्ही लक्ष देऊन आळसांत राहूं नका. भट व पंडित हे केवळ मूर्ख हें पक्कें समजा. खरी नीति कोणती तें पहा. पैसा खाऊ नका, रांडबाजी करूं नका, प्रपंच, संसार भलाईनें करा,

आपले शत्रूसदेखील वाईट इच्छूं नका, शरीरानें व मनानेंदेखील पाप करूं नका, प्राणिमात्रावर दया करा, अपराध क्षमा होतील तितके करा, परंतु क्षमा न करण्याचा प्रसंग येईल तेथे क्षमा करूं नका, एकमेकांवर प्रीति करा, नित्य उठून ईश्वराचें भजन व प्रातःकाळीं चिंतन करीत जा, त्याजवळ क्षमा मागा, आपले हातून पापें व अपराध बहुत घडतात, त्यांची क्षमा भगवंताशिवाय करणार समर्थ कोणी नाही. ढोंग, सोंग करूं नका, लबाडी सर्वदा ईश्वरास दिसती, यास्तव कदापि करूं नका. कोणचेंही पाप करूं नये, तें फार वाईट, इहलोकी क्षणभर सुख वाटेल, परंतु त्याचा झाडा द्यावा लागेल. मारावयाचें आहे, हें नित्य मनांत आणा.

तुम्ही आपले मुलांची काळजी करून त्यांस शहाणीं करा, व सर्व लोकांची काळजी करा, नित्य कांहीं तरी सर्व देशाचें कल्याण केल्याशिवाय एक दिवस जाऊं देऊं नका, मुख्य ईश्वरभजन करण्याचा मार्गच आहे कीं, कोणास दुःख देऊं नये, व सर्व लोकांचे हित करावें, स्वदेशाचें हित इच्छावें, आणि परदेशाची हानि इच्छावी असें नाहीं. परंतु सांप्रत आपले लोक फार वाईट अवस्थेंत आहेत, सबब फार खबरदारी ठेवली कीं, या लोकांचें कल्याण होईल, तुम्ही आपल्यास योग्य करा, अब्रू वाढवा. पैका मिळाला तर अब्रू वाढते, असें नाहीं. अब्रू, खरेपणा व निर्मळपणा यांपासून उत्पन्न होते.

विद्या केली तर त्याप्रमाणें वागणूक पाहिजे. नाहीं तर विद्या व्यर्थ आहे, विद्येचें सार्थक रोजगार नव्हे. ज्यास विद्येचा अर्थ ठाऊक नाहीं, ते असें म्हणतात. परंतु फक्त पोटच भरणारी विद्या नव्हे, ती मजुरी आहे. विद्या म्हणजे ज्ञान, जेणेंकरून मनुष्य निर्मळ होतो, विचारी होतो, समर्थ होतो; उनाड जे लोक आहेत ते विद्येचें तात्पर्य द्रव्य मिळविण्याचें असें समजतात, परंतु विद्येपासून द्रव्यलाभही होतो,व दुसरे अनेक लाभ होतात.

याप्रमाणें तात्पर्य मीं निरूपण केलें. याप्रमाणें सर्वांनीं चालावें आणि असें होण्यास माझे श्रम कांहीं उपयोगी पडले असें दृष्टोत्पत्तींत आल्यास माझे श्रम परिहार होतील. माझें मागणें सर्व लोकांस आहे कीं, मीं जें लिहिलें आहे त्याचा विचार करून पहा. तुमच्या चांगल्यावांचून त्या लिहिण्याचा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें म्हणून मी झटतों व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यांत तुम्हांस रागरोष येईल हें मीं मनांत आणलें नाहीं. कारण कीं, माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझे अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मीं जें लिहिलें आहे, त्याचा तुम्ही विचार करावा. कारण कीं, जाणें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो, हें तरी मनन करावें. अस्तु. तुमची आमची गांठ आज दोन वर्षें सतत होती याचा मला मोठा आनंद सर्व काळ वाटेल. सर्वांनीं कृपा लोभ असो द्यावा, हे विनंती.

( लोकहितवादीकृत निबंधसंग्रह / पत्र क्र. १०० )

■ टीपा

**टीप : ' निवडक लोकहितवादी ' मधील खाली निर्देशिलेल्या निबंधांविषयी :**

✡ हिंदु लोकांचा आळशी स्वभाव ✡ इंग्रजी विद्या ✡ संस्कृत विद्या ✡ नवीन ग्रंथांची आवश्यकता ✡ शिमग्याचा दुराचार ✡ वैराग्य ✡ मानास पात्र व दानास पात्र ✡ निरुद्योगीपणाच्या चाली ✡ धर्मसुधारणा ✡ स्त्रियांची स्थिती ✡ पुर्नविवाह ✡ पुर्नविवाह ✡ आर्जवीपणा व डौलीपणा ✡ हिंदु लोकांचा व्यापार ✡ राज्यसुधारणा ✡ हिंदुस्थानच्या पराधीनतेची कारणे ✡ इंग्रजी राज्यापासून लाभ ✡ इंग्रजी राज्यापासून फळ ✡ लाच ✡ वेळेचा व्यर्थ खर्च ✡ ब्राह्मण लोकांचा स्वभाव ✡ सरदार लोक.

✡ विद्वान कोणास म्हणावें ? ✡ ग्रंथ ✡ युरोपखंडात प्रवास ✡ हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास कां नाही ? ✡ महाराष्ट्र भाषा.

हे निबंध म्हणजे ' लोकहितवादीकृत निबंधसंग्रहा ' तील पत्रे होत. हा ग्रंथ १८६६ साली अहमदनगर येथे प्रसिद्ध झाला. त्यामधील आरंभीची १०८ पत्रे संपादून ती लोकहितवादींची ' शतपत्रे ' या नावाने प्रकाशित झाली. त्यामुळे ' शतपत्रे ' हा लोकहितवादींचा ( 'निबंधसंग्रहा'शिवाय )स्वतंत्र ग्रंथ असा समज होऊन बसलेला दिसतो. वास्तविक ' शतपत्रे ' हा ' निबंधसंग्रहा ' चाच भाग होय. म्हणून 'निवडक लोकहितवादी' मधील उपरोक्त निबंधांच्या अखेरीस लोकहितवादींच्या मूळ ग्रंथाचा उल्लेख करताना तो 'शतपत्रे' असा न करता ' लोकहितवादीकृत निबंधसंग्रह ' असा केला आहे.

' निबंधसंग्रहा ' तील पहिली १०८ पत्रे इ. स. १८४८ ते १८५० या कालावधीत ' प्रभाकरा 'तून प्रसिद्ध झाली. पहिले पत्र दि. १९ मार्च, १८४८ रोजी प्रसिद्ध झाले. पुढे ' प्रभाकरा ' तूनच पत्रांच्या दुसऱ्या शतकास प्रारंभ करण्याचा लोकहितवादींचा मनोदय होता. पण तसे घडू शकले नाही. उर्वरित लेखन त्यांनी ' इंदुप्रकाश ' आणि ' वृत्तवैभव ' यांमधून प्रकाशित केले. ही नियतकालिकेही लोकहितवादींच्या प्रेरणेतूनच निघाली होती. 'लोकहितवादीकृत निबंधसंग्रहा'तील एकूण निबंधांची संख्या १९५ इतकी आहे.

अखिल मराठी माणसाला उद्देशून लोकहितवादींनी हे निबंधलेखन केले आहे. या लेखनाला पत्रांचे रूप देण्यात लोकहितवादींचा समाजाबद्दलचा जिव्हाळाच प्रकट होतो. जनमानसाला ' अहो लोकांनो ! ' ही घातलेली साद या जिव्हाळ्याचा प्रत्यय देते. विद्या, धर्मकारण, समाजकारण, अर्थकारण, राज्यकारण यांविषयींच्या तत्कालीन अनेकविध प्रश्नांचा ऊहापोह लोकहितवादींनी या निबंधांमधून केला आहे. आपले राज्य आणि वैभव गेले ते कोणत्या कारणांमुळे याची मीमांसा करून देशाच्या अभ्युदयासाठी वेगवेगळ्या दिशांनी कोणत्या प्रयत्नांची आवश्यकता आहे, ते लोकहितवादी येथे सांगतात.

त्यांच्या मते ज्ञान हे देशाच्या अभ्युदयाचे मूल अधिष्ठान आहे. म्हणून ज्ञानप्राप्ती, ज्ञानसाधना आणि ज्ञानप्रसार यांवर ते विशेष भर देतात. 'ज्ञान'प्राप्ती होताच समाजाची जीवनदृष्टीच मुळात बदलेल असे त्यांना वाटते. ते म्हणतात, " मनूचे वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेही असो, ब्रह्मदेवाचे का असेना; ' बुद्धीरेव बलीयसी ' असे आहे . . . . . शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धी चालवा. विचार करून पाहा. घातक वचनांवर हरताळ लावा. " तर्कशुद्ध विचार, साधार पण परखड प्रतिपादन आणि समाजाविषयीची आंतरिक तळमळ या गुणविशेषांनी हे निबंध भरलेले आहेत. समाजजीवनाच्या सर्व अंगोपांगांविषयीची सखोल माहिती देऊन त्यांविषयी व्यासंगपूर्ण मीमांसा लोकहितवादींनी वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी करावी,हे लक्षणीयच म्हणायला हवे.

नवसमाजरचनेच्या दृष्टीने 'शतपत्रां'चे मोल मोठेच आहे. म्हणूनच 'सुबोधपत्रिके'तून आणि डॉ. आंबेडकरांच्या 'बहिष्कृत भारता'तून ती पुन्हा प्रसिद्ध केली गेलीत.

## १. हिंदु लोकांचा आळशी स्वभाव

**पूर्वी इंग्रज लोक रूमचे बादशहाचे अंमलात होते, त्या वेळेस हे फार दरिद्री व हल्लीं हिंदु लोक दिसतात त्याहूनही मूर्ख होते.**

पाचव्या शतकापर्यंत (इ. स. पू. ५५ ते इ. स. ४१०) इंग्लंडवर रोमन लोकांची सत्ता होती. या काळात इंग्रज लोक दरिद्री व असंस्कृत होते.

**हिंदुस्थानांतील लोक दोन हजार वर्षांपूर्वी मोठे पराक्रमी होते, त्यांची अवस्था काय झाली आहे ?**

✲ प्राचीन भारतीय जीवनदृष्टीचा प्रातिनिधिक ग्रंथ म्हणजे महाभारत. प्रवृत्तिधर्माची उपासना हे महाभारताचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य. ऐहिक उत्कर्ष हा त्यामधील महत्त्वाचा विचार असून संपत्ती, सामर्थ्य, दीर्घ उद्योग यांचे महत्त्व महाभारतात पानापानावर सांगितलेले आहे.

✲ प्राचीन भारतीय जीवनातील ऐहिक उत्कर्षाच्या साक्षी किती तरी मिळतात. भारतातील सुग्रास आणि विलासी भोजने, वस्त्रप्रावरणे, अलंकार यांची प्रसिद्धी पश्चिमी राष्ट्रांत पोहोचल्याचे त्या काळी भारतातून निर्यात केले जाणारे मसाल्याचे पदार्थ, सुगंधी द्रव्ये, तलम वस्त्रे आणि मौल्यवान हिरे यांविषयीच्या माहितीवरून स्पष्ट होते. युद्धात हत्तींचा वापर करण्याची पद्धती ग्रीकांनी भारतीयांपासून उचलली. वैद्यक, ज्योतिष, आणि तत्त्वज्ञान या विषयांवरील ग्रीक आणि अन्य देशांतील ग्रंथांसोबत भारतीय ग्रंथांचाही समावेश Sassanid king Shapur I ( इ. स. २४१–२७२ ) याने केल्याचे पारशी

लोकांतील परंपरागत माहितीवरून दिसते. सांख्यदर्शन आणि पायथागोरसचे दर्शन यांमधील साम्य सर विल्यम जोन्स याने दाखविलेच आहे.सांख्यदर्शनावरून पायथागोरसने आपले दर्शन उभारले असण्याची शक्यताही काही अभ्यासक वर्तवितात.

( R. C. Mujumdar : The History and Culture of the Indian People, Vol. II ( The Age of Imperial Unity ), Third Edn. Bombay, 1960 / page 629. )

✿ माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टनसारख्या भारतात बरीच वर्षे राहिलेल्या आणि भारतीय जीवनाचा जवळून अभ्यास केलेल्या परकीय राज्यकर्त्याने काढलेले उद्गार प्राचीन भारतीय समाजजीवनाची यथार्थ कल्पना देऊ शकतात. प्राचीन भारताचा आणि समाजजीवनाचा ' a highly cultivated country ', ' peaceful and flourishing community' अशा शब्दांत गौरव करून माऊंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन म्हणतो, ' It might be easier to compare them with the Greeks, as painted by Homer, who was nearly contemporary with the compilation of the code ; and however inferior in spirit and energy, as well as in elegance, to that heoric race, yet, on contrasting their law and forms of administration, the state of the arts of life, and the general spirit of order and obedience to the laws, the eastern nation seems clearly to have been in the more advanced stage of society. Their internal institutions were less rude; their conduct to their enemies more humane; their general learning was much more considerable; and in the knowledge of the being and nature of God, they were already in possession of a light which was but faintly perceived even by the loftiest intellects in the best days of Athens.'

( Mount Stuart Elphinstone : History of India,
Allahabad, 1966 / Page 47-48.)

या कालखंडाची प्राचीनता लक्षात घेता तत्कालीन ग्रंथ, कलाकृती, परकीय प्रवाशांनी लिहून ठेवलेली माहिती यांमधून मिळणाऱ्या संदर्भांच्या आधारेच प्राचीन भारतीय संस्कृती आणि लोकजीवन यांविषयी काही अंदाज बांधणे शक्य आहे.

**परंतु लिहिणें व वाचणें हें विद्येचें द्वार मात्र आहे, विद्या नव्हे. विद्या पुढेंच आहे.**

✿ केवळ अक्षरज्ञान किंवा शब्दज्ञान घेऊन थांबणे लोकहितवादींना मंजूर नाही. शब्दज्ञानापाशीच घोटाळत राहिल्याने आपला पराभव झाला. शब्दज्ञानापासून प्रारंभ करून भिन्न भिन्न भौतिक शास्त्रांच्या ज्ञानापर्यंतचा अभ्यास आणि विकास त्यांना अभिप्रेत आहे.

या अगोदरच्या काळात भौतिक शास्त्रे एतद्देशीयांच्या ध्यानीमनीदेखील नव्हती. या अवस्थेबद्दल 'पुणें शहराचे वर्णन' कार म्हणतात, 'सन १८३३ ह्या सालीं सरकारी इंग्रेजी व मराठी शाळेंत भूगोल, खगोल, सिद्धपदार्थविज्ञान इत्यादी विषय शिकवूं लागले. ह्याचे अगोदर पुण्यांतील लोकांस त्यांच्या ज्योतिषांत भास्कराचार्यानें केलेले जें खगोलाचे सिद्धान्त ते मात्र माहीत होते. तेहि सर्वांस माहित नव्हते, जेवढे जोशी तेवढ्यांसच माहित होते. भूगोलाविषयीं तर पुराणांतील कहाण्या म्हणजे पृथ्वी शेषाच्या मस्तकावर आहे. नऊ खंडें सप्तसमुद्र आहेत येवढी काय ती माहिती होती. सिद्धपदार्थविज्ञान म्हणजे काय विद्या आहे, ही तर मुळींच माहित नव्हती.' ( ना. वि. जोशी : पुणें शहराचें वर्णन, आवृत्ती दुसरी, मुंबई, १९७१ / पृ. ७९ )

महाराष्ट्रातील शिक्षणप्रसाराचा हा उदयकाल होता. शाळा सुरू केल्या जात होत्या आणि अभ्यासक्रम आखले जात होते. बाळशास्त्री जांभेकरांनी 'कॉलेज स्कूल' या संस्थेचे इतिवृत्त कॉलेज कौन्सिलकडे दि. २५ जानेवारी, १८४० रोजी सादर केले. त्यामधील इयत्तांचे अभ्यासक्रम पाहू जाता तत्कालीन संदर्भात लोकहितवादींच्या उपरोक्त विधानावर चांगला प्रकाश पडतो.

'The College School was founded on the 1st of April 1838; when out of a great number of candidates, 83 passed the necessary examination in their native languages, and were admitted as pupils on the establishments. These were devided into 4 classes as follows :

1st or Lowest Class, 39 boys; Spelling and Reading. Translation or Blair's Reading Exercises into Marathee, Grammar, Elements of Arithmetic and Writing.

2nd Class, 32; Æsop's Fables, and viva voce translations from Marathee into English and viva voce. Grammar, Wilson's Idiometric Exercises, Writing, Geography, and fractional Arithmetic.

3rd Class, 4; Goldsmith's Geography, History of England, Written translations, Prefixes and Affixes, and Algebra.

4th Class, 8; History and Geography of India, Euclid 1st three books, Written translations etc.

These studies have been pursued in the different classes with little alteration upto the present time.

(Memoirs and Writings of Acharya Bal Shastri Jambhekar (1812-1846), Vol. III, Pune. 1950/page 431)

✿ इंग्रजांच्या सहवासात आल्यानंतर एतद्देशीय नवशिक्षितांना विद्येचे सामर्थ्य जाणवले, आणि त्यांनी विद्येच्या महत्त्व–प्रतिपादनाला प्रारंभ केला. या विषयावर स्वतंत्र

लेख लिहून बाळशास्त्री जांभेकर त्यात म्हणतात, 'विलायतेतील लोकांमध्ये विद्येचा प्रसार झाला त्यामुळे त्या देशास किती श्रेष्ठपणा प्राप्त झाला याचाच आम्ही विचार करून पाहूं. विलायतेंतील जा चमत्कारिक यंत्रांनीं द्रव्य मिळविण्यास उपाय बहुत झाले आहेत, त्या यंत्रांस मूळ कळाकौशल्यांची वृद्धि, विलायतेसारिखे लहान आणि दूर देशचे लोकांनी येऊन विलायतेपेक्षें ही मनुष्यांचे संपत्तीविषयीं चांगले हें राज्य घेतलें, आणि रक्षण केलें, हें सामर्थ्य त्यांस विद्येनें आलें नव्हें ?--- विलायत देश या देशापेक्षें, आणि दुसरे बहुत देशांपेक्षें श्रेष्ठता पावला आहे, याचें कारण विद्येचें सामर्थ्य नव्हे काय?'

('विद्या हेंच बळ आहे' / 'दर्पण', दि.२४ ऑगस्ट, १८३२)

**सामान्यतः इंग्रज लोक इकडे आले, म्हणजे स्वर्गाहून इंद्र खाली आल्याप्रमाणे लोकांस वाटून, त्यांजविषयीं भय उत्पन्न होते. असा हिंदु लोकांचा गरीब स्वभाव ; यामुळें हे हतवीर्य झाले आहेत. . . .**

**परमुलखाचे लोक येऊन हिंदु लोकांचें हातचें हिसकावून घेऊन खातात व मानेवर जोखड ठेवून राज्य करितात; पण हें इतके सहन करून आहेत.**

✿ इंग्रजी राज्य आल्यानंतर एतद्देशीयांच्या मनात 'क्षमातळीं इंग्लिशासारखा प्रभु नाहीं दुसरा। घ्या सुख आतां दुःखे पहिलीं सर्व तुम्ही विसरा ' (परशुरामपंत तात्या गोडबोले ) ही जशी भावना वसत होती तशी इंग्रजांविषयी भयाचीही भावना होती. 'ज्ञानप्रकाश 'च्या अग्रलेखातील एतद्देशीय हिंदू लोकांविषयीचा पुढील उल्लेख लोकहितवादींच्या विधानाला पुष्टी देणाराच आहे.

'जर कोणी राष्ट्र घेण्यास उभा राहिला तर कुत्रीं पुच्छ आखडून जशी शरणागत होतात, किंवा व्याघ्रापुढे गाय जशी मान निमूट खाली करिते तशी शत्रूच्या स्वाधीन राष्ट्र व आपण होतात. '

( 'ज्ञानप्रकाश ' / १९ जुलै, १८५५ )

## २. इंग्रजी विद्या

**पुणें शहरांत प्रथम १८३२ सालीं इंग्रजी शाळा घातली, तेव्हां लोकांची अशी समजूत होती कीं, इंग्रजांचा स्पर्श झाला तर स्नान करावें व इंग्रजांची भाषा शिकली तर ब्राह्मणपणा जातो.**

✿ एल्फिन्स्टनसारख्या उदारमनस्क राज्यकर्त्याच्या प्रेरणेने महाराष्ट्रातले शैक्षणिक जीवन आकार घेऊ लागले. त्या अगोदरही शिक्षणसंस्था सुरू करण्याचे काही उपक्रम ( अर्थात इंग्रजांकडूनच ) मुंबईत झाले. मुंबई बेट इंग्रजांच्या ताब्यात आल्यानंतर पहिली शाळा रेव्हरंड रिचर्ड कोब यांनी फोर्टात १७१८ च्या सप्टेंबरात सुरू केली.

धर्मादाय शाळा असे तिचे स्वरूप असून 'educating poor (European) children in the Christian religion.' चा हे तिचे ध्येय होते. पुढे याच संस्थेचा विस्तार होऊन मुंबई राज्यातील गरीब विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी 'बॉम्बे एज्युकेशन सोसायटी' (इ. स. १८१५) स्थापन झाली.

एल्फिन्स्टनच्या प्रेरणेने इ. स. १८२७ त बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीची स्थापना झाली. ( पुढे १८४० त ही संस्था बोर्ड ऑफ् एज्युकेशनमध्ये विलीन झाली. ) या संस्थेचा पहिला अध्यक्ष माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन हा होता; आणि कॅप्टन जॉर्ज जर्व्हिस व श्री. सदाशिव काशिनाथ छत्रे हे सेक्रेटरी होते. या संस्थेची पहिली इंग्रजी शाळा मुंबईला १८२५ त निघाली आणि पुण्यास त्याच संस्थेने १८३२ त पहिली इंग्रजी शाळा सुरू केली. ( या इंग्रजी शाळेचे स्वागत बाळशास्त्री जांभेकर यांनी दि. २१ सप्तेंबर १८३२ च्या 'दर्पण' मध्ये केले आहे. )

( Bombey City Gazetteer, vol III, Bombay, 1910 / p, 100-101 )

✡ इंग्रजी शाळेत गेलो किंवा इंग्रजी भाषा शिकलो म्हणजे आपला धर्म जातो, आपण बाटतो हा समज या काळात रूढ होता. खुद्द लोकहितवादींच्या शिक्षणालादेखील याची झळ बसली होती. इंग्रजी शाळेतून आल्यानंतर त्यांना वाड्यातील मागच्या विहिरीवर सचैल स्नान करून घरात जावे लागे. इंग्रजीचा अभ्यासही या विहिरीतील कोनाड्यात बसून त्यांनी केला.

वरील समज बळावण्यास ख्रिस्ती मिशनरींचे उद्योगही कारणीभूत होते. चर्च मिशनरी सोसायटीने १८३५ साली रॉबर्ट कॉटन मनी यांच्या स्मरणार्थ काढलेल्या अँग्लो व्हर्नाक्युलर शाळेसंबंधीचा पुढील उल्लेख या संदर्भात पाहाण्यासारखा आहे. 'The schools of the society steadily advanced up to the year 1840, when the consequence of the baptism of two pupils, the number of the rolls suffered a sudden and considerable reduction ; but the effect of this action was temporary.'

(Bombay City Gazetteer, vol III, Bombay, 1910 / p. 102)

रा. ब. दादोबा पांडुरंग आत्मचरित्रात म्हणतात, 'सन १८२५ च्या दोन तीन वर्षांपूर्वी कांपावर सोसाइटीचे स्कुल बांधून तयार झालें. ती नवीच सरकारी मोठी शाळा म्हणोन जिकडे तिकडे गाजलें. त्या शाळेवर Jervis साहेब होते; व त्यांच्या मदतीस सदाशिव काशीनाथ छत्र्ये हे होते. त्यावेळेस एक दोन वर्षेपर्यन्त सर्व मुंबईंत लोक अशी कल्पना आपल्या मनांत करूं लागले कीं आमच्या मुलांस शिकविण्याचें सरकारास इतकें काय अगत्य आहे. तेव्हां या धूर्त इंग्रेज सरकाराचा यांत कांहीतरी मतलब असावा, तो म्हणजे आमच्या मुलांस हुशार करून त्यांस पुढें बाटवावें, असा सर्वांचा तर्क धावत होता; म्हणोन ते आपली मुलें त्या मोठ्या शाळेंत पाठविण्यांत मोठा संशय घेत होते. आमच्या तीर्थरूपांच्याहि मनांत लोकांनीं तो संशय पुष्कळ घातला; – – –'

(रावबहादूर दादोबा पांडुरंग आत्मचरित्र / पृ. २६, २७ )

**फारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिगत झाली म्हणजे हिंदु लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाही.**

✿ इंग्रजी विद्या आणि पाश्चात्य विज्ञान यांचा अभ्यास केल्यावर एतद्देशीय लोक आपल्या देशाचे गतवैभव व स्वातंत्र्य पुन्हा प्राप्त करू शकतील असा लोकहितवादींचा विश्वास होता. १८५३ मध्ये भारतासंबंधींच्या सिलेक्ट कमिटीसमोर ज्या साक्षी झाल्या त्यांमधून एतद्देशीयांना शिक्षण देणे म्हणजे त्यांना disloyal करणे असा सूर प्रकट होत होता. या कमिटीसमोर दि. ४ ऑगस्ट, १८५३ रोजी मेजर एम. जे. रोलॉंडसन ( मद्रासच्या 'कमांडर इन् चीफ' च्या हाताखाली सतरा वर्षे काम केलेला पार्शियनचा दुभाषा आणि मद्रास राज्यातील शिक्षण खात्याचा सेक्रेटरी ) याने इंग्रजी विद्येच्या एतद्देशीयांवरील प्रभावाचा बरोबर अंदाज बांधलेला होता. आपल्या साक्षीत तो म्हणतो, 'My impression is this, that as the native of India gains an insight into the history of British India, and into the history of Europe generally, an idea is conveyed to his mind that it is something monstrous that a country like India should be possessed by a handful of foreigners and hence there naturally almost springs up a desire in his mind to be instrumental in setting that country free from this foreign dominance and there being no counteracting principle, nor any sense of the duty of obdience, the natural result is a feeling of disaffection to the British Government.'

( B. D. Basu : Education in India Under the Rule of the East India Company, Calcutta / p. 142 )

### ३. विद्वान कोणास म्हणावे ?

**आम्हांस असें वाटतें कीं, सांप्रत काळीं वर्तमानपत्राइतकें ज्ञान होण्याचें दुसरें मोठें साधन नाहीं. तें वाचून त्यांतील विषय कितीकांस समजतात, हें ज्यांचें त्यांणीं पाहिलें तर विद्वान कोण, अविद्वान कोण, हें समजेल.**

✿ लौकिक जीवनाची प्रगती आणि तीसाठी लौकिक विद्यांचे ज्ञान व त्यांचा जोमाने अभ्यास ही काळाची गरज एतद्देशीय नवशिक्षितांनी जाणली होती. इंग्रजांच्या सहवासाने वृत्तपत्र या माध्यमाचे सामर्थ्यही त्यांच्या लक्षात आले होते. म्हणून सर्वसामान्य माणसाच्या जीवनधारणांच्या कक्षा रुंदावण्यासाठी वृत्तपत्रांचे महत्त्व लोकहितवादी प्रतिपादितात. 'दर्पण' या मराठीतील पहिल्या वृत्तपत्रातही बाळशास्त्री जांभेकरांनी वृत्तपत्राच्या उपयुक्ततेवर आणि या माध्यमाच्या सामर्थ्यावर बोट ठेवले आहे. पाहा –

'जा देशांतून आमचे सांप्रतचे शककर्ते एथे आले, त्या देशांत ते एथे आल्याचे पूर्वी फार दिवसांपासून या आश्चर्यकारक छापयंत्राची कृत्यें चालू होती. त्यांपासून

मनुष्यांचे मनांतील अज्ञानरूप अंधकार जाऊन त्यावर ज्ञानरूप प्रकाश पडला. या सज्ञानदशेस येण्याचे साधनांमध्ये इतर सर्व देशांपेक्षें युरोप देश वरचढ आहे. नियतकालिक लेखांपासून जे स्वार्थ होतात, ते आम्हांस सांप्रतचे राजांचे द्वारें माहित झाले. जा जा देशांमध्यें अशे लेखांचा प्रचार झाला आहे, तेथें तेथे लोकांचे आंतर व्यवहारामध्यें तसेच बाह्य व्यवहारांमध्ये शाश्वत हित झाले आहे. यांपासून बहुत वेळ विद्यांची वृद्धि झाली आहे. लोकांमध्ये नीति रूपास झाली आहे.'

( दर्पण / दि. ६ ज्यानुआरी, १८६२ )

## ४. ग्रंथ

**पेशव्यांचें एवढें राज्य झालें व त्यांत लक्षावधी ब्राह्मण पोसले गेले, परंतु पेशव्यांची बखर त्यांतून कोणी एका पुरुषानें तरी लिहिली काय ? नाहीं. तें काम ग्रांट साहेबांनी चार वर्षे सातार्‍यास रसिडेन्ट असतां केलें.**

✲ आपल्या भाषेतील ज्ञान वाढावे, अधिकाधिक ग्रंथसंपदा निर्माण व्हावी अशी आंतरिक इच्छा; आणि अजूनही या दिशेने फारसे प्रयत्न होत नाहीत म्हणून वाटणारा विषाद लोकहितवादींच्या मनात घर करून आहे. आपण फक्त ऐषारामात दिवस घालविलेत याबद्दल वाटणार्‍या सात्त्विक संतापापोटी लोकहितवादींकडून निवेदनाच्या ओघात अनवधानाने (क्वचित) चुकीची विधाने होतात. त्यातलाच हा प्रकार. पाणिपतची बखर, भाऊसाहेबाची बखर आणि पेशव्याची बखर या पेशवेकालावरील महत्त्वाच्या बखरी. यांपैकी पहिल्या दोन बखरींचा लेखनकाल इ. स. १७६२ हा असून तिसरी बखर इ. स. १८१७ त लिहिली गेली. ग्रांट डफ यांनी History of Manathas हा ग्रंथ इ. स. १८२६ त लिहिला असून कॅप्टन डेव्हिस केपन याने बाबा साने यांच्या मदतीने त्याचे भाषांतर केले. तीच 'मराठ्यांची बखर' होय.

## ५. नवीन ग्रंथांची आवश्यकता

**जर कोणी म्हटले कीं, मी ग्रंथ करण्यावर पोट भरीन, तर त्यास कांही मिळावयाचें नही. व कोणी शास्त्री, पंडित, भटे जरी मूर्ख शिरोमणी असली, तरी त्यास चार रुपये देतील परंतु ग्रंथकर्ता, वर्तमानपत्र छापणारा व छापखाना घालणारा विचारशीलही असला, तरी त्यांस कोणी पैसा देणार नाहीत व त्याचा माल अगदी घेणार नाहीत शिवाय त्यास मूर्ख म्हणतील.**

✲ एका ग्रंथ प्रकाशकाने दिलेली पुढील जाहिरात तत्कालीन समाजाच्या ग्रंथविषयक वृत्तीचे दर्शन घडविते.

> 'माझ्या घरांतील दागिने विकून हें पुस्तक छापलें आहे. आतां मजजवळ जाहिरात व कमिशनसाठी पैसा उरला नाहीं; म्हणून १ रुपयाचें हें पुस्तक मी १२ आण्यांत देत आहे. तरी वाचकहो, तुम्हीच या पुस्तकाचे प्रचारक होऊन याच्या प्रती खपवाव्या व मला मुक्त करावे.' – दाभोळकर.

(डॉ. अनंत हरि लिमये : मराठी प्रकाशनांचे स्वरूप, पुणे, १९७२/ पृ. २२२ वरून उद्धृत)

## ६. भ्रांतिनिरास

प्रस्तुत उतारा हा 'स्वाध्याय' (१८८०) मधील असून लोकहितवादींच्या विचारांचे वैशिष्ट्यपूर्ण दर्शन घडविणारा हा ग्रंथ आहे. समाज आणि धर्म या विषयांचा अनेक अंगांनी लोकहितवादी येथे विचार करतात. आर्यसंस्कृती एके काळी उत्कर्षाला पोचलेली होती. पण सातत्यपूर्ण अभ्यासाच्या अभावी आम्ही आज परागत झालो. म्हणून ' सदसद्विचारी ऋषींच्या आज्ञा आपण पालन करून विद्या, धैर्य, तेज, बल व शौर्य यांहीकरून कीर्ति शिखरारूढ व्हावे' आणि भारतीय समाजाने पुन्हा एकदा आपल्या वैभवाचे दिवस पाहावेत, असे लोकहितवादींना वाटते.

स्वाध्याय म्हणजे आपले हितचिंतन. ते प्रापंचिक आणि पारमार्थिक अशा दोन प्रकारचे असते. लौकिक उन्नतीसाठी स्व–परदेशाचा इतिहास, धर्म, विद्या, कला, भाषा व राज्यस्थिती या सर्वांचा अभ्यास आवश्यक असतो. आर्य लोकांच्या शास्त्रांत स्वाध्याय करावा असे म्हटले असून कर्म नित्य आहे, ते केलेच पाहिजे असे प्रतिपादन आहे. मात्र पारंपरिक पद्धतीने आलेले ज्ञान तसेच स्वीकारू नये, त्याची चिकित्सा करावी, अशी सूचनाही लोकहितवादी देतात.– ' अनेक तऱ्हेचे स्वपरदेशीय ज्ञान आणि पुरातन व सांप्रत माहिती ही ग्रहण करून ती लोकांस प्राप्त होण्याची साधने वाढवावीं आणि नूतन विचारांत जे काही न्यायास, नीतीस व सत्यास अनुसरून असेल तेच धैर्य करून स्वीकारावे आणि स्वार्थबुद्धी सोडून द्यावी. '

आर्य संस्कृतीच्या जिज्ञासूंस उपयुक्त ठरेल अशा पद्धतीने ऋग्वेद, सामवेद, यजुर्वेद, अथर्ववेद यांच्या संहिता; ब्राह्मणे, मंत्रविनियोग, आरण्यके, उपनिषदे, धर्मशास्त्रे, पुराणे आदींची माहिती 'स्वाध्याया'त दिली आहे. त्यासोबत बालविवाह, विधवाविवाह,केशवपन, नवीन तर्क आणि विद्या यांसंबंधीची आपली मतेही लोकहितवादींनी मांडली आहेत. त्यावरून लोकहितवादींच्या विशुद्ध ज्ञानोपासनेची, दीर्घोद्योगाची आणि आर्यसंस्कृतीविषयक अभिमानाची कल्पना येते. जुन्या विद्या आणि कलांच्या पुनरागमनाचा मंत्र देताना लोकहितवादींच्या मनात कोणत्या जाणिवा होत्या, हे पुढील उताऱ्यांवरून स्पष्ट होईल.

' प्रीतिजन्य पदार्थ असला म्हणजे तो आपणच सर्वांचे अंतःकरण आपलेकडे ओढून घेतो. तद्वत देशामध्ये प्रीत्युत्पादक चालीरीती उत्पन्न झाल्या म्हणजे लोक सहजच देशप्रीति

व देशाभिमान बाळगतील. अमेरिकेंतील लोकांस किंवा इंग्लंडांतील लोकांस आपल्या देशावर प्रीति करा म्हणून सांगावें लागत नसून त्यांस असें वाटतें कीं आपल्या देशासारखा उत्कृष्ट देश दुसरा कोणताही नाही. शिवाय त्यांस असें वाटतें कीं आमचे संस्कार चांगले, आमचे कायदे चांगले, आमच्या शाळा चांगल्या व आमच्या रीतिभाती चांगल्या; व ह्यांमुळें त्यांस सहजच देशप्रीति उत्पन्न होते. परंतु आमच्या देशांतून स्वदेशप्रीतीचें व पूर्वजांच्या अभिमानाचे बीजच नाहीसें झाले आहे. ' ––– ( स्वाध्याय / पृ. ६ )

' अनेक लोकांनीं अनेक प्रकारच्या चालीरूढींनीं देशांत सर्वत्र अव्यवस्था करून टाकल्यामुळे पहिले देशप्रीतिरूप माधुर्य नष्ट झालें; तेव्हां तें पुन: सर्वत्र व्यवस्थित आचार व रूढी चालल्याशिवाय येण्याची आशा नाहीं. जेथे स्त्रियांचे हाल व अपेष्टा यांणीं परिपूर्ण देश झाला आहे – निर्दयपणे केशवपन करणें व त्यांस वैधव्यदु:खानलाच्या खाईत होरपळत टाकणें इत्यादि परमदयाशून्यत्वाचे प्रकार चालू आहेत व जेथे ब्राह्मणांच्या यथार्थ कृत्यांनीं त्यांची निंदा होते अशा देशावर प्रीति करा असें सांगणेंही निरर्थक आहे. '

( स्वाध्याय / पृ. ५ )

✲ ✲ ✲

**प्राचीन विद्यांतून कितीही प्राविण्य मिळविलें तरी या नवीन ज्ञानाची तोड जास्तच असून त्या प्राविण्यापेक्षां हें प्राविण्य जास्त महत्वाचें व हितप्रद आहे. जुन्या पायावर नवी इमारत बांधणे म्हणजे महाप्रयासाचे अनिश्चित आहे. प्रथम जुन्या लोकांचे मिथ्याभिमान सुटून आज शेंकडों वर्षांपासून परंपरेने जीं त्यांच्या कोमल अंत:करणावर भ्रांतीचीं पुटें बसलीं आहत तीं निघणें म्हणजे परम कष्टतर झालें आहे.**

✲ प्राचीन विद्यांपेक्षा नवीन शास्त्रीय ज्ञानाची गरज आमच्याकडील नव–विद्वानांना भासू लागली. प्राचीन विद्यांचे अधिष्ठान बहुतांश परमार्थपर होते. आता लौकिकाचे, भौतिकाचे अधिष्ठान असणाऱ्या इंग्रजी विद्येचा अभ्यास लोकहितवादींना आवश्यक वाटत होता. भौतिक उन्नती ही काळाची गरज होती. लोकहितवादींअगोदर बाळशास्त्री जांभेकरांनी भौतिक विद्यांच्या उपासनेची आवश्यकता प्रतिपादन केली. ही नवी दृष्टी स्वीकारून ' आपली मनें चांगले मार्गास लावणे हे जितके लोकांचे स्वाधीन आहे तितके राजाचे नाहीं, हें आमचे लोकांनीं ध्यानांत धरावें, आणि हें दुसरें लक्षांत ठेवावें कीं, जांस विद्या संपादन करावयाची आहे, त्यांणी जर आपले मनांतील द्वेषबुध्दि घालविली नाहीं तर त्यांचा उद्योग फुकट जाईल. ' असा इशाराही दिला. ' वाफयंत्राच्या वृत्तांतापासून मनांत आलेल्या गोष्टी ' या लेखात बाळशास्त्री म्हणतात,

' आमचे गेले कागदांत वाफयंत्राचा वृत्तांत लिहिला होता त्यांवरून या गोष्टी आमचें मनांत आल्या. तो वृत्तांत नव्यानेंच जा आमचे लोकांनीं पाहिला असेल त्यांस बहुत आश्चर्य झालें असेल. तसेंच ऊन पाण्यासारिखें लहान कारणापासून वाफयंत्रांत इतकी

शक्ति येत्ये हें पाहून चमत्कार वाटावयास राहिला नसेल. परंतु जा अनेक युक्तींनी ती शक्ति उपयोगी कामाकडे लावितां येत्ये त्या युक्ति जर त्यांस कळल्या तर त्यांस केवढें मोठें आश्चर्य होईल बरें ? त्यांची मनें आश्चर्यांत निमग्न होतील आणि अशी कामें जाणीं शोधलीं त्या पश्चिम देशचे लोकांचे बुध्दींत व जांस उघडून सांगितली असतां समजायासही कठीण पडतात त्या पूर्वेकडील लोकांचे बुध्दींत इतकें अंतर आहे.'

( दर्पण / २ मार्च, १८३२ )

## ८. शिमग्याचा दुराचार

✲ होळीचा सण अथवा शिमगा हा आमच्याकडील सणांमधील विकृत चालीचा परिपाक होता. त्यातील अमंगळता, अभद्रपणा; आणि बीभत्स उक्ती व कृती हा त्या काळातील नवविचारांच्या तरुणांत चर्चेचा विषय झाला होता. ख्रिस्ती धर्मप्रचारकांनीही या चालीवर टीकेची झोड उठविली होती. एतद्देशीयांमध्येही या विषयाची चर्चा चालू होती. केवळ या सणानिमित्तच नव्हे, तर अन्य वेळीही चालणारे ' हिंदुस्थानांतील नाच–तमाशे हा गुलामगिरीचा एक प्रकार ' असल्याची जाणीव बाळशास्त्र्यांनी पंधरा-सोळा वर्षांपूर्वीच करून दिली होती. ( दर्पण / १४ सप्टेंबर, १८३२ ). शिमग्याच्या सणातील अभद्र गोष्टींविषयी प्रतिबंधात्मक विचार सांगणारे एक पुस्तकही ख्रिस्ती मंडळींनी या सुमारास प्रसिद्ध केले होते. (ज्ञानोदय / १६ एप्रिल, १८४९). या विषयावर ग्रंथलेखन–स्पर्धाही घेतल्याचे १५ मे, १८४८ च्या ' ज्ञानोदया'तील जाहिरातीवरून स्पष्ट होते. लोकांनी या विषयाचा गंभीरपणे विचार करावा म्हणून बक्षिसपात्र ठरलेला ग्रंथ ' ज्ञानोदया'त छापून प्रसिद्ध केला गेला. ता. १५ मार्च, १८४९ च्या ' ज्ञानोदया'त प्रसिद्ध झालेल्या ग्रंथातील पुढील उतारा पाहा.

' लहान थोर गरीब व मातबर असे सर्व लोक या सणांत बहुत व्यर्थ कर्ज करितात. नाच, तमाशा बैठक करणें, पानसुपारी मेवामिठाई खाणें, दारू पिणें, यांत बहुत रुपये उडवितात. आणि कोणी कोणी असे आहेत कीं जर या प्रसंगी आपणांजवळ कांहीं खर्चावयास नसलें तर दुसऱ्यांपासून उसनें घेत कित्येक दुसऱ्या लोकांच्या घरचें कांहीं सामान चोरून त्याचा पैसा या कामास लावितात. आणि ज्यांस असें करितां येत नाहीं ते आपल्या घरची भांडीकुंडी किंवा आपल्या बायकोचे दागिने वगैरे विकून नाचतमाशे वगैरेंमध्यें उडवितात. याप्रमाणें सर्व लोक हरयेक प्रकारें चार पैसे काढून शिमग्याचा सण साजरा करितात आणि चार दिवस मोठी खुशाली करितात. पण ते दिवस होऊन गेल्यावर जे पैकेवाले आहेत ते हळहळ करितात कीं आपले पैसे फुकट गेले --- जे गरीब असतात ते असा खेद करितात कीं जर ते चार पैसे शिमग्यांत उडविले नसते तर आम्हीं उपाशी कशाला मरतो ! आणि घरी सावकाराचे तगादे कशाला बसते ! परंतु जरी सर्व लोक

शिमगा होऊन गेल्यावर थोडे दिवसपर्यंत असा खेद करितात तरी दुसऱ्या शिमग्यांत त्याप्रमाणे खर्च केल्यावाचून कोणी राहत नाही. '

✿ ' प्रभाकर ' पत्राने तर १ मार्च १८४६ च्या अंकात या विषयावर ' हिंदूंचा फाल्गुन मास चालू झाला ' हा अग्रलेखच लिहिला होता. ' चैत्रापासोन माघापर्यंत मुलें जो सुनीतीचा अभ्यास करितात तो त्या फाल्गुनात फुकट जातो ' अशी संपादकांची तक्रार असून या कामात सरकारने लक्ष घालून लोकांनी शास्त्राबाहेर जाऊ नये यासाठी बंदोबस्त राखावा, अशीही सूचना केली आहे.

✿ होळीच्या वेळी पुण्यातल्या रस्त्यावर जे रसिकतेचे (!) प्रदर्शन होई त्यावर अखेर सरकारने बंदी घातली. त्यामुळे एतद्देशीयांमधील सुजाणांना बरे वाटले. होळीतल्या ' रंगा ' चा विपरीत परिणाम होऊन पुण्यातल्या तरूणांची मने कोणत्या दिशेने वाहू लागली होती याचा अदमास पुढील उताऱ्यावरून बांधता येतो.

' सन १८५० ह्या सालीं तमाशे रस्त्यांत होणें सरकारानें बंद केलें ही गोष्ट फारच चांगली झाली. रस्त्यांत तमाशे होत येणेंकरून सुज्ञ लोकांस फारच त्रास होत असे. लोक फार बेताल होत. त्यांतून मुलें तर फारच बिघडत असत. रोज रात्रीं तमाशा पाहण्यास जावें, व तेथें यथेष्ट पाहिजेल तें बोलावें व पाहिजेल तें करावें. असी रात्र काढून उजाडण्याच्या सुमारास घरीं येऊन स्वस्थ निजत. येणेंकरून त्यांच्या अभ्यासास केवढी अडचण पडे हें तर सांगावयासच नको. इतकें सांगतों कीं पुण्यांत असे कित्येक तमाशांचे भक्त होते कीं तमाशा पाहिल्यावांचून रात्र जाऊं द्यायचीच नाहीं. देवांवरील तुळशीपत्र वाहणें चुकलें तरी चिंता नव्हती, पण तमाशा पाहिलाच पाहिजे.

तमाशे रस्त्यांत होत हें तर एक शहरांतील मुलांस व अज्ञानी लोकांस दुर्व्यसनी होण्यास उमेदवारी करण्याचे हपिसच होतें. '

( ना. वि. जोशी : पुणे वर्णन, आवृत्ती दुसरी, पुणे, १९७१ / पृ. १२० ).

## १३. कलियुग

लोकहितवादींनी मुंबईच्या आर्यसमाजात दिलेल्या व्याख्यानाचे सार म्हणजे 'कलियुग' (१८७७) ही पुस्तिका. पुराणांत कृत, त्रेता, द्वापर आणि कली असा युगांचा क्रम असून कलियुग म्हणजे अनाचाराचे आणि दुःखाचे युग असा त्याचा उल्लेख आहे. कलियुगासंबंधी रूढ असलेल्या भ्रांत कल्पनांचा परामर्श लोकहितवादींनी येथे घेतला असून प्रयत्नपूर्वक प्रगती करण्याचा संदेश समाजाला दिला आहे. पूर्वीचा काळ फार चांगला होता, आता फार वाईट काळ आला असून तेच कलियुग होय; परागती, अपकर्ष हाच कलियुगाचा धर्म अशी समजूत हिंदू लोकांच्या हाडीमासी खिळून राहिल्याने त्याचा समाजजीवनावर

विपरीत परिणाम झाला आहे. या परिणामाची लोकांना जाणीव करून देऊन कलियुगाच्या भ्रामक समजुतीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न लोकहितवादींनी या पुस्तिकेत केला आहे. कली म्हणजे दुसरे तिसरे काही नसून मूर्खपणा व अन्याय, असे ते स्पष्ट करतात. जातिभेद, भजनपूजन, कर्मकांड यांमुळे समाजाची अधोगती झाल्याचे सांगून त्यावर टीका करतात; दंभ आणि अज्ञान यांचा निषेध करून ज्ञानोपासनेची आवश्यकता प्रतिपादन करतात.

## १५ पुनर्विवाह

**अरे परकी लोक यांणीं जर तुमच्या कन्या रस्त्यातून जातांना पाहिल्या, तर त्यांची अवस्था पाहून अंतःकरण चरचरा भाजतें आणि दया उत्पन्न होते . . .**

✰ हिंदू विधवांविषयी परकीयांच्या भावना व्यक्त करणारा 'ज्ञानोदया'तील पुढील मजकूर पाहा.

'पण हिंदु लोकांतील विधवांची स्थिति दुसऱ्या सर्व लोकांतील विधवांच्यापेक्षा अगदीं निराळी आहे. त्या सर्वांच्यापेक्षा हिची स्थिती सहस्त्रपट दुःसह आहे. कारण यांस इच्छा असल्यास दुसरा पति करण्याची मोकळीक आहे तसी हिला नाहीं. शिवाय पतिविरहावरून व दुसरा पति करण्याची मोकळीक नसल्यावरून होणाऱ्या दुःखांखेरीज त्यांस, अणखी दुःखें बहुत आहेत. हिंदु लोकांचा समज असा पडला कीं, विधवा स्त्री म्हटली म्हणजे सर्वोपरी वाईट, तिचा भ्रतार गत झाला हा तिचा दोष. ती फुटक्या कपाळाची; तिच्या पूर्वजन्मींच्या पापांमुळें तिला या जन्मीं वैधव्य प्राप्त झालें. सबब ती द्वाड. तिचें तोंड पाहू नये . . . . या कारणास्तव सर्व तिचा धिक्कार करितात. तेव्हां त्या बापडीला दिवाभिताप्रमाणें आपलें तोंड लपवावें लागतें.'

( ज्ञानोदय / १ ऑगस्ट, १८६५ )

✰ रघुनाथ जनार्दन भांडारकर व नर्मदाबाई (पुणे/ दि. ८ मार्च, १८६०), बाळाजी रघुनाथ व रंगूबाई (अहमदनगर/ दि.१९ जुलै, १८६१) रघुनाथ बाबाजी नवरंगे व वेणुबाई (पुणे/ दि. ६ मे, १८६७) यांसारखे काही पुनर्विवाह महाराष्ट्रात होऊ लागले आणि टीकाविषय झाल्याने गाजलेही. पुरोगामित्वाच्या दिशेने टाकलेले हे छोटे पाऊल होते. असे असले तरी. बहुतांश विधवांची स्थिती व त्यांच्याकडे पाहाण्याची एकंदर समाजाची दृष्टी यांत फारसा फरक पडलेला नव्हता. ही स्थिती पुढेही बराच काळ होती. विधवांच्या करूणाजनक स्थितीविषयी आगरकर म्हणतात,

' आमच्या गतभर्तृकांची स्थिती याहूनही शोचनीय आहे. त्यांच्या पदराला चोळीचेंसुध्दां पाठबळ नाहीं. त्याने दगा दिला कीं त्या उघड्या पडल्याच ! शिवाय

गतभर्तृकांच्या पदरास त्यांचें डोकें झाकून ठेवण्याचें आणखी एक फाजील काम असतें! या संबंधानें त्या हतभाग्य स्त्रिया एकसारख्या काचणींत असतात, असें म्हटलें तरी चालेल. आपल्या अंगाचा पाहिजे तो भाग उघडा पडला तरी हरकत नाहीं, पण आपलें डोकें मात्र उघडें पडतां कामा नये, कारण तें उघडें पडलें असतां आपल्या छलकांचा निर्दयपणा व आपल्या धर्मांचा अधमपणा उघडा पडेल अशी भीती त्यांच्या मनांत सर्वकाळ वागत असते. यामुळे अडचणींच्या वेळीं अशा स्त्रियांच्या पाठी दिसतात पण डोकी कधीही दिसत नाहीत.'

( म. मा. आळतेकर (सं) : संपूर्ण आगरकर, भाग दुसरा/ पृ. २१५)

## १६. पुनर्विवाह

**मनूचें वचन असो, याज्ञवल्क्याचे असो, कोणाचेंही, असो, ब्रह्मदेवाचें कां असेना; " बुद्धिरेव बलीयसी ' असें आहे. त्यापेक्षां तुम्हीं जें उघड पहातां त्यांचा बंदोबस्त शास्त्रांत नाहीं, म्हणून करीत नाहीं हें योग्य नाहीं. शास्त्रास एकीकडे ठेवा, आपली बुद्धि चालवा, विचार करून पहा.**

धर्म आणि शास्त्रे अखेर व्यक्तीच्या आणि समाजाच्या विकासासाठी व उन्नतीसाठी असतात याचे भान लोकहितवादींनी प्रत्यही ठेवले. म्हणूनच कालबाह्य झालेली वचने मग ती मनूची, याज्ञल्क्याची वा साक्षात ब्रह्मदेवाची का असेनात, बुद्धीच्या कसोटीवर घासून पाहाणे त्यांना आवश्यक वाटते. सनातनी मंडळींनी हे भान न ठेवल्यामुळे विधवा-पुनर्विवाहाच्या प्रश्नाची मोठीच परवड झाली. पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेचा वाद हे त्यातलेच एक पर्व.

पांडुरंग विनायक करमरकर व वेणूबाई ( दि. १५ जून, १८६९ ) आणि मोरोबा कान्होबा विजयकर व सुमित्राबाई (दि. २२ मार्च, १८७० ) हे पुनर्विवाह फारच गाजले. त्यांच्याविरुद्ध सनातन्यांची प्रतिक्रिया विलक्षण तीव्र होती. इतकी की, मोरोबा कान्होबा ( हे न्यायाधीश होते ) आणि सुमित्राबाई यांना अखेर आत्महत्या ( दि. १८ फेब्रुवारी, १८७१ ) करावी लागली. या सुमारास विधवापुनर्विवाहाच्या सशास्त्रतेविषयीची चर्चा पुढे आली. हिंदुधर्मशास्त्रातील मतांचा शोध घेणे आवश्यक वाटू लागले. त्यासाठी बडोद्याचे महाराज श्रीमंत खंडेराव गायकवाड यांनी पुनर्विवाहाचा पुरस्कार करणाऱ्या मंडळींचा आणि बडोदे दरबारातील शास्त्रीमंडळींचा एक वादविवाद १८६९ च्या नाताळात निश्चित केला. वादाकरिता विष्णुशास्त्री पंडित, वामन आबाजी मोडक, वि. त्रि. गोळे, वा. ना. कोल्हटकर आदी पंधराजण बडोद्यास गेले. त्यांत लोकहितवादींचा पुढाकार होता. पण वादात जो हरेल त्याला शिक्षा व्हावी अशी मागणी बडोदेकर शास्त्र्यांनी केल्यामुळे हा वाद बारगळला.

या अगोदरपासूनच विठोबा अण्णा दप्तरदार पुनर्विवाहाच्या निषेधार्थ प्रचार करीत होते, तर विष्णुशास्त्री पंडित पुनर्विवाहाच्या पुरस्कारार्थ व्याख्याने देत होते. पुण्यात त्यांची उत्तर–प्रत्युत्तरादाखल अशी व्याख्याने झडली. अखेर पुनर्विवाहाच्या सशास्त्रतेच्या निर्णयार्थ शंकराचार्यांच्या उपस्थितीत वाद करण्याचे ठरले. हा वाद पुण्यास २८ मार्च ते ५ एप्रिल, १८७० असा नऊ दिवस चालला. वादाचा निर्णय सुधारकांना प्रतिकूल असा लागल्याने विधवापुनर्विवाहाची समस्या अधिकच बिकट बनली.

(अधिक तपशीलासाठी पाहा : विधवाविवाह चळवळ : १८००–१९०० : डॉ. स. गं. मालशे, नंदा आपटे, मुंबई,१९७८/पृ. ४८ ते ५५.)

## १९. निर्भयपणाविषयीं

लोकहितवादींच्या ‘ लक्ष्मीज्ञान ’ ( १८४९ ) या ग्रंथातील काही भाग येथे घेतला आहे. ‘ लक्ष्मीज्ञान ’ हा लोकहितवादींच्या लेखनाच्या प्रारंभकालातील ग्रंथ. क्लिफ्ट-साहेबाच्या Political Economy या ग्रंथाच्या आधाराने प्रस्तुत ग्रंथ लिहिलेला असून ज्ञान, उद्योगाचे विभाग, क्रयविक्रय, भांडवल, निर्भयपणा, किंमत; धारा, नफा व मजुरी अशा प्रकरणांच्याद्वारा ‘ लक्ष्मी ’ विषयक ज्ञान येथे विशद केले आहे. ‘ लक्ष्मीज्ञाना ’ तील गोष्टी हिंदुस्थानास लावून पाहिल्या असता काय वाटते ? ’ याविषयीही लोकहित-वादी ग्रंथात चर्चा करतात. ‘ लक्ष्मी म्हणजे काय व तिची उत्पत्ती, वृद्धी व तिची वाटणी लोकामध्ये कशी होत्ये ’ हे ते तपशीलाने मांडतात, कारण ही लक्ष्मीज्ञानाची ( अर्थशास्त्रीय ) दृष्टी समाजाला देणे तत्कालीन संदर्भात महत्त्वाचे होते. मात्र विद्या वाढवून यत्नाची कास धरल्याशिवाय चांगली स्थिती येणार नाही हा त्यांच्या विवेचनाचा पाया आहे; कारण ‘ उद्योग, विद्या, सुनीती हे लक्ष्मीस आणणारे आहेत. म्हणून त्यांची वृध्दी होईल ते यत्न करावे. खरेपणा वाढला पाहिजे. बुध्दी सुधारली पाहिजे, भाषा सुधारली पाहिजे, यावर लोकहितवादी भर देतात. ही व्यंगे नीट होतील तेव्हाच आपल्या देशातील लोक लक्ष्मीवान होतील अशी सूचनाही लोकहितवादींनी येथे आवर्जून केली आहे.

## २० ' द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदुलोकांपेक्षां अधिक आहे. '

‘ द्रव्य मिळविण्याचा आवेश त्यांस हिंदुलोकांपेक्षां अधिक आहे ’ आणि ‘ हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणें ’ हे दोन्ही उतारे ‘ हिंदुस्थान देशास दरिद्र येण्याची कारणें’ ( १८७६ ) या लोकहितवादींच्या अर्थशास्त्रीय ग्रंथातील आहेत. दादाभाई नवरोजी यांच्या Poverty in India या निबंधावर तो आधारित आहे. ‘ हिंदुस्थानास दरिद्रता येण्याची कारणें आणि त्याचा परिहार व व्यापाराविषयी विचार 'या शीर्षकाखाली १८७६ त ‘ इंदुप्रकाशा ’ तून लोकहितवादींनी आठ प्रकरणे प्रसिद्ध केली. या लेखांना संकलित

रूप मिळावे अशी लोकांनी मागणी केल्यावरून हा ग्रंथ तयार झाला. इंग्रजी राज्यापासून बहुत लाभ आहेत म्हणून त्याचे जसे समर्थन लोकहितवादींनी केले तसे इंग्रजी राज्यात आपला देश निर्धन होत चालल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. इंग्रजी राजवटीत हिंदुस्थानचे मोठ्या प्रमाणात आर्थिक शोषण होत असून देश दिवसेंदिवसे कसा कंगाल होत चालला आहे याबद्दलची वस्तुस्थिती ते या प्रबंधात सांगतात व तिची मीमांसाही करतात. इग्रजांच्या हिंदुस्थानविषयक अर्थनीतीचे स्वरूप परखडपणे मांडण्याचा त्यांचा हा प्रयत्न महत्त्वपूर्ण म्हटला पाहिजे. कमी उत्पादन यांत्रिकीकरण न झाल्यामुळे यंत्रावर चालणाऱ्या उद्योगांची अल्प संख्या, या कारणांसोबतच भारतीय लोकांची प्रारब्धवादी वृत्ती, धर्मविषयक कोत्या कल्पनांमुळे समुद्रपर्यटन व परदेशगमनास आलेली बंदी याही दोषांवर लोकहितवादी बोट ठेवतात. प्रखर आत्मविश्वास आणि त्यातून प्रकट होणारा आशावाद हा लोकहितवादींच्या व्यक्तिमत्त्वाचा खास विशेष. त्याच्या बळावर प्राप्त झालेल्या आर्थिक संकटातून पार पडण्याचा मार्गही या प्रबंधात ते सुचवितात.

पृ. ५९ / टाफक्यास्ट : हा शब्द बहुधा हाफ क्यास्ट ( हाफ कास्ट Half caste half breed – उदा. अँग्लो इंडियन : ) असा असावा.

## २४. इंग्रजी राज्यापासून लाभ

**इंग्रज लोकांनीं हिंदु लोकांस स्थितीवर आणण्याचा बहुत यत्न चालविला आहे व देशांत स्वस्थता केली आहे.**

हिंदुस्थानातील निरनिराळ्या भागांत प्रचलित असलेल्या विचित्र आणि अमानुष चालीरीती इंग्रज सरकारने वेगवेगळ्या उपायांनी बंद केल्या. बंद केलेल्या या चालीरीतींची यादी The Life of John Wilson या ग्रंथात (पृ.३५२) डॉ. जॉर्ज स्मिथ यांनी दिली आहे. त्यांपैकी काही चाली अशा: (१) सती, (२) जिवंत पुरणे, (३) मुले गंगेच्या प्रवाहात फेकून देणे, (४) जाडेजा रजपूत जमातीतील लहान मुलींना ठार मारणे, (५) देवापुढे दिलेले नरबळी, (६) जगन्नाथाच्या यात्रेत रथाखाली पडून जीव देणे, (७) देवासाठी उंच कड्यावरून उडी टाकून जीव देणे, (८) गळ टोचून घेणे, (९) जीभ तोडणे, (१०) बायकांची नाके कापणे, (११) शेतात वंशपरंपरेने काम करणारे गुलाम ठेवणे, (१२)अस्पृश्यांना हीन वागणूक देणे.

सतीबंदीचा कायदा ता. ४ डिसेंबर, १८२९ रोजी पास झाला.

(डॉ. रा. शं वाळिंबे: महाराष्ट्राची सामाजिक पुनर्घटना, भाग १, पुणे, १९६२/पृष्ठे १२९ व १३२–१३३ वरून उध्दृत)

## २६. उद्देश

प्रस्तुतचे लेखन म्हणजे 'लोकहितवादी' या नियतकालिकाच्या पहिल्या अंकातील प्रास्ताविक होय. यापूर्वी बरेचसे ग्रंथलेखन केले असले तरी देशबांधवांचे यत्किंचित तरी हित व्हावे या भावनेने आपले कलम पुढेही पूर्ववत चालू ठेवण्याचा लोकहितवादींचा मानस होता. म्हणून आक्टोबर १८८२ पासून त्यांनी 'लोकहितवादी' हे मासिक सुरू केले. आबालवृद्ध जिज्ञासू स्त्रीपुरुषांच्या उपयोगार्थ हे मासिक होते. पूर्वीचे ग्रंथज्ञान व समजुती ही गतार्थ झाल्याचे पटवून देऊन प्रगतीकडे नेणाऱ्या नवीन ज्ञानासाठी समाजाला या मासिकाद्वारे लोकहितवादी आवाहन करू इच्छित होते. पहिल्या अंकात ते म्हणतात, 'उपयुक्त ज्ञान चोहीकडे प्रसिद्ध करण्यासाठी जी राज्ये आज पुढे आहेत त्यांच्या तोडीचे ग्रंथ आपल्या लोकांत प्रसिद्ध झाले पाहिजेत, या उद्देशानेच प्रस्तुतचे मासिक प्रसिद्ध करण्याचा हेतू धारण केला आहे.'

'या पुस्तकातून ऐतिहासिक, व्यावहारिक, सांसारिक, सामाजिक, धार्मिक, वैद्यकीय, राजकीय, नीतीचे, सदाचाराचे, देशस्थितीच्या संबंधाचे, लोकसुधारणेचे वगैरे नाना विषय अवकाशानुरूप प्रसिद्ध करण्यात येतील. याचप्रमाणे नवीन पुस्तकांचे परीक्षण व चांगल्या निबंधांची किंवा ग्रंथांची प्रसिद्धि यांजकडेही कधीं कधीं थोडी थोडी जागा देण्याचा आमचा उद्देश आहे.' अशी या मासिकाच्या स्वरूपाची ओळख ते करून देतात. 'लोकहित-वादी' च्या वर्ष १ / अंक २ पासून 'उदेपूरचा इतिहास' आणि वर्ष २ / अंक २-३ पासून 'गुजराथ देशाचा इतिहास' हे दोन ग्रंथ क्रमशः प्रकाशित होत राहिले. 'लोकहित वादी' मासिक तीन वर्षे चालले. जून १८८५ मध्ये त्याचा प्रकाशित झालेला अंक हा शेवटचाच.

याशिवाय 'लोकहितवादी' या नावाचे एक त्रैमासिकही एप्रिल १८८३ पासून लोकहितवादींनी सुरू केले होते. पण ते अल्पजीवी ठरले.

✡ टीप : 'उद्देश' या निबंधाच्या अखेरीस मूळ ग्रंथाचे नाव 'ग्रामरचना' असे चुकीने छापले गेले आहे. ते 'लोकहितवादी' मासिक/वर्ष १, अंक १, आक्टोबर १८८२, असे वाचावे.

## २७. कोणाच्या पाठी पडावें असें एकही स्थल राहिले नाहीं.

लोकहितवादींच्या मनोभूमिकेतील स्थित्यंतराची साक्ष 'ग्रामरचने'तील (१८८३) या उताऱ्यातून मिळते. 'शतपत्रां'त लोकहितवादींनी इंग्रजी राज्याचे मुक्तकंठाने स्वागत केले. पण देशातल्या दारिद्र्याला आणि महाग झालेल्या न्यायाला इंग्रजी राजनीतीच कारणीभूत आहे, हे आयुष्याच्या अखेरच्या काळात लक्षात आले तेव्हा, लोकहितवादी

इंग्रजी राज्याचे टीकाकार बनले. 'ग्रामरचना' या ग्रंथातून त्यांच्या या विचारपालटाचे प्रत्यंतर येते. शेतीची व्यवस्था (शेतसारे इ.), न्यायदान (न्याय मिळण्यात येणाऱ्या अडचणी), आणि कारभाराची यंत्रणा या तीन अंगांच्या अनुषंगाने महाराष्ट्राच्या ग्रामजीवनातील स्थितिगतीचे दर्शन लोकहितवादी येथे घडवितात. जबर सरकारी शेतसारे आणि अनियंत्रित सावकारी यांमुळे शेतकऱ्यांची कशी गांजणूक झाली आहे, याचे वर्णन करून या परिस्थितीची कारणमीमांसाही ते करतात.

शेतकऱ्यांच्या दुरवस्थेला अन्याय्य शेतसारे कारण असल्याचे लोकहितवादींनी म्हटले आहे. या बाबतीत मुसलमान राज्यकर्त्यांनीही केला नसेल एवढा अन्याय इंग्रजी राज्यकर्त्यांनी केला. शेतकऱ्याच्या उत्पन्नाचे मान लक्षात घेऊन शेताचे धारे ठरवावयाचे असतात. पण इंग्रजी राज्यकर्त्यांनी ते मनमानेल त्या पद्धतीने ठरविले. शेतकऱ्याच्या पिळवणुकीचे स्वरूप स्पष्ट करताना लोकहितवादी म्हणतात, 'जमिनीपासून उत्पन्न होणार एक रुपया, सरकार घेणार आठ आणे, या सरकारी धाऱ्यांशिवाय शेतकऱ्यांस लोकल फंड, स्टँप, रजिस्टर ( नोंदणी ) वगैरे संबंधाने पुष्कळ खर्च सोसावा लागतो, सारांश, शेतीच्या कामात त्यांस बरकत म्हणून राहिली नाही.' ( ग्रामरचना / पृ. ५१ )

देशाच्या दारिद्र्याला आणि शेतकऱ्यांच्या हीन स्थितीला सरकार इतकीच रयतही जबाबदार असल्याचे प्रतिपादन लोकहितवादींनी 'ग्राम रचने'च्या अखेरीस केले आहे. म्हणून त्या दोघांनाही लोकहितवादी सुधारणेचे उपाय सुचवितात. सरकारने एतद्देशीयांना मोठमोठ्या पगाराचे रोजगार द्यावेत; लोकांचे धंदे अखंड व भरभराटीने चालण्यासाठी उत्तेजन द्यावे ; शेताचे धारे कमी आणि कायमचे असावेत; अदालतीचे न्यायासंबंधाचे जबरे कर कमी व्हावेत अशी अपेक्षा ते सरकारकडून ठेवतात. त्याचप्रमाणे मोठ्या पगाराच्या अधिकाराच्या नेमणुकीसाठी एतद्देशीयांनीही विद्वत्ता, नीती आणि पात्रता अंगी बाणवावी ; एकमत्याने मोठमोठे उद्योग सुरू करून परदेशी व्यापारी व कारखानदार यांच्याशी टक्कर द्यावी; जबर धाऱ्यांविषयी सरकारकडे तक्रारी नेऊन आपल्या उत्पन्नाचे व सरकारी देण्याचे मान सरकारच्या कानावर घालावे; आपसातले कज्जे व भांडणे कमी करावीत अशी सूचना करतात. असे केल्यास 'देश दारिद्र्यग्रस्त झाला इत्यादि ज्या चोहोंकडून आरोळ्या होत आहेत त्या सर्व बंद होतील' असे लोकहितवादींना वाटते.

**त्याला कोर्ट म्हणजे पैशाची उधळपट्टी आणि धूळधाण करणारी अशी कालिकादेवीच्या बलिदानाची महावेदीच वाटते ! यामध्यें लक्षावधी रुपये घातले तरी स्वाहा होऊन न्याय मिळतच असतो ! काय हीं पैसा पिळून काढण्याचीं विलक्षण यंत्रें सरकारानें लावून दिलीं आहेत !**

✱ कोर्टकज्जांत होणारी सामान्य माणसाची नागवणूक हा तत्कालीन परिस्थितीचा

एक रूढ भागच बनला होता. धार्मिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय प्रश्नांइतकी तीव्रता या प्रश्नाला आली नसली, तरी तत्कालीन समाजमनातली ती एक मोठीच बोच होती, एवढे मात्र खरे. ' हल्लींच्या कोडतांत जाणें ' म्हणजे चारचौघांपुढें आपली फजिती मांडून भिकेस लागणें होय. जो न्याय मागूं लागतो तो भीक मागूं जातो ' असा लोकांचा पक्का समज झाला होता. त्यामुळे लोकजागृतीच्या दृष्टीने ही समस्या नाटकाचाही विषय बनू पाहात होती. न्यायाच्या अशा विचित्र गर्तेत आपले देशबांधव पडत आहेत हे पाहून मालवणच्या दिनकर गोविंद वझे यांनी १८८४ साली ' कलहपरिणामादर्श अर्थात् दिवाणी कोर्टापासून परिणाम ' हे नाटक लिहिले. नाटककार प्रस्तावनेत म्हणतो, ' मद्देशबांधव दिवाणी न्यायाच्या नादाने कसे रसातळास मिळत आहेत, त्यांस मोहक व कपटपट्टभाषणांनी कज्जेदलाल लोक कसे न्यायाच्या मागे लावित असतात, साधेभोळे लोक त्यांच्या कपटी भाषणाने कसे फसले जातात, शेवटी त्यांची कशी स्थिती होते, हल्लींचे सुधारणेचे स्तंभ किंवा पुढारी म्हणून नांवाजले जाणाऱ्या लोकांचे आचरण कसे असते, ते आपल्या नादीं लागलेल्या गरीब लोकांशीं कसे वागतात, सरकारी अंमलदाराचे प्रजेशीं व राजाशीं कसें वर्तन असतें, इत्यादी बऱ्याच उपयुक्त गोष्टींचे केवळ दिग्दर्शन केलें आहे. ' ( कलहपरिणामादर्श / प्र. पृ. १-२ ) लोकहितवादींनी निवेदिलेल्या वस्तुस्थितीचे रंग किती गडद होते, याची वझे यांच्या वरील उद्‌गारांवरून कल्पना येते.

**हल्लीं शेतकरी गरीब, अन्नाला महाग आणि संसार हाकण्यास असमर्थ झाले असतात. सरकारचे कर, सारे व धारे अतिशय जबर असून ते भरण्याचे दीन कुळंब्यांना मोठे संकट पडतें.**

✿ महात्मा जोतीराव फुले यांनीही याच विषयावर आणि याच वर्षी ( १८८३ ) ' शेतकऱ्याचा असूड ' लिहावा ही एक लक्षणीय घटना म्हटली पाहिजे. एकोणिसाव्या शतकातील दोन थोर विचारवंतांच्या चिंतनाचा आणि चिंतेचा विषय बनण्याइतपत शेतकऱ्याची स्थिती बिकट बनली होती, असे यावरून म्हणता येते. महात्मा फुले यांनी शेतकऱ्याच्या हलाखीचे विदारक चित्र रंगवून त्याच्या दारिद्र्याची तितकीच भेदक अशी मीमांसा केली आणि त्यावरील उपाय सूक्ष्म तपशीलात जाऊन सुचविले. म. फुले यांनी चित्रित केलेल्या शेतकऱ्याच्या अवनत स्थितिचित्राचा हा एक भाग पाहा –

' शिवाय आमच्या सरकारनें धूर्त ब्राह्मण कामगारांस हातीं धरून त्यांच्या मदतीनें दर तीस वर्षांनीं अज्ञानी भेकड शेतकऱ्यांच्या शेतीचा पैमाष करुन त्यांजवर मन मानेल तसे शेतसारे वाढवूं लागल्यानें शेतकऱ्यांची हिंमत खचून त्यांच्यानें त्यांच्या शेताची मशागत होईना, यास्तव कोटयावधि शेतकऱ्यांस पोटभर भाकर व अंगभर वस्त्र मिळेनासें झालें. यावरून शेतकरी जसजसे शक्तिहीन होऊं लागले तसतशा त्यांच्यांत महामारीच्या आजाराच्या सांथी येऊ लागल्यामुळें दरवर्षी हजारों शेतकरी मरूं लागले.तशांत दुष्काळाच्या अंमलांत अन्नावांचून लक्षावधि शेतकऱ्यांचा खप होऊन यमपुरीस गेले. '

ग्रा. क्र. .....
२०२ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)



(डॉ. स. ग. मालशे, डॉ. धनंजय कीर (सं.) : महात्मा फुले. : समग्र वाङ्मय, मुंबई १९६९ / पृ. २४७ )

## २८. राज्यतुलना

भारतीय समाजाची इतिहासाबद्दलची अनास्था लोकहितवादी पाहात होते. इतर देशांविषयी तर सोडाच पण आपल्याच देशातल्या निरनिराळ्या प्रांतांविषयीदेखील लोक उदासीन होते. एकाच देशात आणि एकाच संस्कृतिपरंपरेत राहूनही वेगवेगळ्या प्रांतांतल्या लोकांना एकमेकांची माहिती नसावी यापरते दुर्दैव ते कोणते ? या उदासीनतेमुळे ‘ दुसरे अज्ञानी असलेले लोक स्वपराक्रमाने कीर्तिमंदिराची एकेक पायरी दिवसेंदिवस चढून वर चाललेले आहेत, आणि भारतवर्षीय श्रेष्ठ, विद्वान व अहंमान्य असे आमचे लोक त्या कीर्तिमंदिरापासून च्युत होत आहेत ’ ( पृथ्वीराज चव्हाण यांचा इतिहास / पृ. ५–६ ) असे लाजिरवाणे दृश्य पाहाणे भाग होते. ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातल्या विविध प्रांतांच्या इतिहासाचे लेखन करणे लोकहितवादींना आवश्यक वाटले. भरतखंडपर्व ( हिंदुस्थानचा संक्षिप्त इतिहास, १८५१ ), पाणिपतची लढाई ( काशीराज पंडित याच्या फारसी ग्रंथाच्या इंग्रजी भाषांतराचा तर्जुमा, १८७७) , हिंदुस्थानच्या इतिहासाचा पूर्वार्ध ( ग्लीगच्या The History of the British Empire in India चा अनुवाद १८७८ ), गुजराथ देशाचा इतिहास (१८५५), लंकेचा इतिहास (१८८८), सुराष्ट्र देशाचा ससाक्ष इतिहास (गुजराथीवरून अनुवादित, १८९१), उदेपूरचा इतिहास (कर्नल टॉड्च्या Annals of Rajasthan चा अनुवाद, १८९३ ) हे त्यांचे इतिहासलेखन.

इतिहास हा लोकहितवादींच्या आवडीचा आणि अध्ययन-चिंतनाचा विषय. इतिहासाच्या वाचनातून–अभ्यासातून देशाच्या भिन्न भिन्न प्रांतांतील धर्मकारण, अर्थकारण, राजकारण यांच्या परिचयाने मराठी माणूस बहुश्रुत व्हावा, प्राचीन भारतीय समाजरचनेचे स्वरूप त्याला कळावे, त्यांतून आपल्या संस्कृतीचे संदर्भ त्याने जाणून घ्यावेत, पूर्वजांच्या शूरत्वाच्या कृत्यांतून पराक्रमाच्या प्रेरणा घ्याव्यात, आपल्या प्रगती–परागतीतले अंतर तपासून लौकिक उन्नतीच्या दिशेने वाटचाल करावी आणि राष्ट्रीय मानसाची जडणघडण होत अस्मितेचे पोषण व्हावे, असे लोकहितवादींना वाटते.

लोकहितवादींनी लिहिलेले काही इतिहासविषयक ग्रंथ अनुवादित स्वरूपाचे आहेत, काही त्या प्रदेशातील राजकारण आणि लढाया यांचे स्थूल वर्णन करणारे आहेत, तर ‘ पृथ्वीराजाच्या इतिहासा ’ सारखे काही काव्यग्रंथावर आधारित असे आहेत. लोकहितवादींची भूमिका तटस्थ वृत्तीने संशोधनात्मक लेखन करणाऱ्या इतिहासकाराची नाही. त्या घटनांमागील समाजमन, ज्यामुळे ते संस्कारित झाले आहे ते सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय संदर्भ शोधून हे पूर्वसंचित आपल्या पद्धतीने मांडून

लोकमानसाला प्रेरणा देणाऱ्या विचारवंताची आहे. लोकहितवादींच्या इतिहासविषयक ग्रंथांचा अभ्यास करताना त्यांची ही भूमिका लक्षात घ्यायला हवी.

'गुजराथ देशाचा इतिहास' ( १८८८ ) हा ग्रंथ लोकहितवादींनी काही गुजराथी व इंग्रजी ग्रंथांच्या आधारे लिहिला. इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या अखेरीपासून सयाजीराव महाराजांच्या कारकीर्दीपर्यंतची माहिती त्यात आली आहे. गुजराथेतील धर्म, संस्कृती, चालीरीती यासंबंधीची माहिती लोकहितवादी येथे शैलीदार भाषेत देतात.

इंग्रजी राज्याची भारतात सर्वत्र पकड बसल्यानंतर त्याच्या राज्यकारभाराचे अनुकरण सर्वत्र होऊ लागले. यावरून त्यात खचितच काही अपूर्वाई असली पाहिजे, असे लोकहितवादींना वाटते. त्या अनुषंगाने देशाच्या इतर संस्थानांतील राज्यकारभाराची पद्धती आणि इंग्रजांची राज्यपद्धती यांमधील फरक त्यांना शोधावासा वाटतो. म्हणून 'गुजराथ देशाचा इतिहास' च्या अखेरीस 'राज्यतुलना' हे एक स्वतंत्र परिशिष्ट लोकहितवादींनी जोडले आहे. देशी संस्थाने व इंग्रजी राज्य यांमधील राज्यपद्धतींचे स्वरूप यांची तुलना ते करतात. तीमधून या राज्यपद्धतींचे प्रजेच्या मनावर, सामाजिक जीवनावर, आर्थिक क्षेत्रावर काय परिणाम होतात याचीही मीमांसा ते करतात. इंग्रजी राज्यपद्धती बरीच प्रगत, लोकांच्या स्वातंत्र्याकडे लक्ष देणारी, आणि प्रजेला संतुष्ट राखून तिच्यावर आपला काबू ठेवणारी कशी आहे हे स्पष्ट करून लोकहितवादी तिचा पुरस्कार करतात. अर्थात् इंग्रजी राज्यपद्धतीतील वाढीव शेतसारा, त्रासदायक कर, नेटिव्ह लोकांसंबंधीची आकसाची भावना आदी ठळक वैगुण्यांचाही विस्तृत उल्लेख करायला ते चुकत नाहीत. तरीदेखील अन्याय, पक्षपात, सनातनीपणा, लोकशिक्षणाविषयी उदासीनता इत्यादींनी युक्त एतद्देशीय संस्थानांतील राज्यपद्धतीपेक्षा उदारमतवादी आणि शिस्तबद्ध अशी इंग्रजी राज्यपद्धतीच अखेर लाभदायक, असे लोकहितवादींचे मत आहे.

## ३६. शत्रूंस शरण जाऊन कुलास बाटविणें कालत्रयीही होणें नाही !

आपल्या कुलाचे वैभव आणि प्रतिष्ठा अबाधित ठेवून मेवाडच्या राज्याचे रक्षण करावे अशा निष्ठेने आणि व्रतस्थ वृत्तीने, प्रतिकूल परिस्थितीतही यवनांना शरण न जाता, एकटेपणाने लढत राहाणाऱ्या महाराणा प्रतापसिंहाचे चरित्र हा लोकहितवादींच्या आदराचा विषय आहे. उदात्त जीवनमूल्ये समोर ठेवून जगणाऱ्या एका धीरोदात्ताचे हे चरित्र आपल्या समाजापुढे ठेवण्यासाठी त्यांनी 'उदेपूरचा इतिहास' (१८९३) हा ग्रंथ लिहिला. प्रतापसिंहाची धीरगंभीर वृत्ती, कृतनिश्चयासाठी त्याने केलेला विलाससुखांचा त्याग, स्वकुलाचे पावित्र्य जपण्यासाठी मूठभर सैन्यासह त्याने दिलेली निकराची झुंज; आणि अत्यंत जखमी अवस्थेत एकाकी पडून त्याचे निघून जाणे या घटनांचे वर्णन लोकहितवादी विलक्षण समरसतेने करतात. त्यामुळे त्यांच्या अन्य प्रकारच्या लेखनापेक्षा हे इतिहास-विषयक लेखन उत्कट बनले आहे.

'उदेपूरचा इतिहास' हा ग्रंथ कर्नल टॉड्च्या Annals of Rajasthan या ग्रंथाचा अनुवाद असून प्रथम तो 'लोकहितवादी' मासिकातून (१८८२) क्रमश: प्रकाशित झाला.

उजवीकडचा मान देण्याची सनद : दरबारात उजव्या बाजूस बसवून अधिक विश्वास प्रकट करण्याची आणि प्रतिष्ठा वाढविण्याची रीत पूर्वी होती.

## ३७. पृथ्वीराजाचा इतिहास

'पृथ्वीराज चव्हाण याचा इतिहास' (१८८३) असे शीर्षक देऊन लोकहितवादींनी पृथ्वीराजाचे चरित्र लिहिले आहे. चंद बरदाई नामक चारण कवीच्या 'पृथ्वीराज रासा' या काव्याच्या आधारे आत्माराम केशवजी द्विवेदी यांनी गुजराथीतून हा इतिहास संक्षेपाने लिहिला. लोकहितवादींनी त्याचे मराठीत रूपांतर केले. ते १८८३ साली 'लोकहितवादी' मासिकातून क्रमशः प्रकाशित झाले. लोकांच्या मनात विचारांचे बीज पेरीत त्यांचा स्वदेशाभिमान जागृत करणे हा या ग्रंथलेखनामागील लोकहितवादींचा उद्देश आहे.

मूळात 'पृथ्वीराज रासा' हे काव्य आहे आणि तेही एका भाटाने लिहिलेले. त्यामुळे त्यात कलात्मकतेचा आविष्कार आणि कर्तृत्वाचे गुणगान यांचे प्राबल्य असणे स्वाभाविकच म्हणायला हवे. शास्त्रपूत दृष्टीचा अभाव असणारा असा हा ग्रंथ लोकहितवादींनी चरित्रासाठी आधार म्हणून का निवडावा असा प्रश्न निर्माण होतो. पण आठशे वर्षापूर्वीची माहिती देणारी अन्य साधने उपलब्ध नसल्याने लोकहितवादींना या ग्रंथाच्या आधाराशिवाय पर्याय राहात नाही. शिवाय लोकहितवादींची भूमिका वस्तुनिष्ठ, रूक्ष पद्धतीने इतिहासलेखन करणाऱ्याची नाही. तत्कालीन जीवन, संस्कृती, लोकमानस यांत त्यांना अधिक रस आहे. 'रासा' मधून हा शोध घेत त्यांनी पृथ्वीराजाचे चरित्र लिहिले. त्यामुळे तत्कालीन आख्यायिका आणि कहाण्याही त्यामध्ये स्वाभाविकपणेच येत राहिल्या.

## ३८. 'अंगारे, मंत्र, तंत्र वगैरे या लोकांची ढोंगे होत !

लोकहितवादींच्या अन्य लेखनापेक्षा 'आगमप्रकाश' (१८८४) चे स्वरूप वेगळे आहे. धर्माच्या नावाखाली चालणाऱ्या अनाचारावरील ते टीकास्त्र आहे. लोकहितवादींच्या धर्मसुधारणाविषयक बलवत्तर प्रेरणेचा, त्यांच्या प्रगाढ व्यासंगाचा आणि परखड टीका–वृत्तीचा हा आविष्कार म्हणावा लागेल. तंत्रमार्गाची माहिती देऊन त्याचे विपरीत आणि विदारक स्वरूप या ग्रंथात लोकहितवादींनी उघड करून दाखविले आहे. 'निगमप्रकाश' आणि 'आगमप्रकाश' असे दोन ग्रंथ त्यांनी प्रथम गुजराथीत (१८७४) लिहिले. त्यांपैकी 'आगमप्रकाश' चा मराठी अनुवाद १८८४ मध्ये प्रसिद्ध केला.

लोकांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन काही पंथीय आपल्या नीतिबाह्य, विकृत आचरणाभोवती, धर्माज्ञेचे धर्मशास्त्राचे वलय निर्माण करून अनैतिक, लंपट आचार-विचार समाजात रुजविण्याचा प्रयत्न करीत होते. मंत्रतंत्र, जारणमारण, वशीकरण, स्तंभन आदी तंत्रमार्ग ; शाक्तमार्ग, घटकंचुकी यांसारखे वाममार्गीय संप्रदाय यांमुळे अनैतिकता, बीभत्स आणि घृणास्पद आचार समाजात रूढ होण्याची भीती होती. हे सर्व वामाचार शिव-प्रणीत आहेत, असे वलय त्याभोवती निर्माण केले गेले होते, त्यामुळे तर सर्व प्रकारच्या वामाचारांना धर्मप्रतिष्ठा मिळू पाहात होती.या उपासनांसाठी अगस्तिसहिता, कामकलाकेलिविलास, कौलीरहस्य, बालाविलासतंत्र, योगिनीजालशंबर, लिंगतंत्र, षट्चक्रभेदन यांसारखे बरेच ग्रंथ लिहिले गेले.

अशा या पंथाचे तत्त्वज्ञान आणि आचार समाजाला अध:पतनाकडे नेणारे होते. हा धोका ओळखून, समाजाचे मानसिक आरोग्य सुरक्षित राहावे व धर्मविचाराकडे पाहाण्याची त्याची दृष्टी शास्त्रशुद्ध व्हावी म्हणून लोकहितवादींनी ' आगमप्रकाश ' चा लेखनप्रपंच केला. या ग्रंथातून त्यांनी ' आगम ' मार्गावर ( निगम : वैदिक मार्ग. यात स्मृती, शास्त्रे, पुराणे, महाभारत, रामायण यांसारखे ग्रंथ येतात. निगमाच्या विरूद्ध असणारा मार्ग तो आगममार्ग. वाममार्गाच्या ग्रंथांस आगम अशी संज्ञा आहे. ) हल्ला चढविला. ' आगमप्रकाशा ' त शाक्तांचे विधी, क्रियाकर्मे यांबद्दलचे विवेचन ' शाक्त ' ग्रंथांतील उतारे देऊन लोकहितवादींनी केले आहे. पंडित, संन्यासी, व परमहंस म्हणून समजल्या जाणाऱ्या काही लोकांचे प्रत्यक्षातले आचरण कसे होते, ते लोकहितवादी स्पष्ट करतात. शिव, पार्वती, कार्तिकेय आणि भैरव यांचे संवाद किंवा त्यांच्या उक्ती यांनी हे तंत्रमार्गीय ग्रंथ भरलेले असून त्यांतील ( हीन ) विचारांना ईश्वरी वचनांचे महत्त्व आणलेले आहे. त्यांपैकी 'कित्येक वाचनांचा अर्थ समजून घेणेही अत्यंत निर्लज्जतेचे काम' म्हणावे लागेल. असल्या हीन उक्तींना आणि कृतींना ग्रंथरूप देण्याचे काम ब्राह्मणांच्या विद्वत्तेशिवाय झालेले नाही, असे लोकहितवादींना ठामपणे वाटते.

( आगमप्र काश / पृ.२३५)

दुष्ट रूढी आणि धर्माच्या नावाखाली चालणारे अनाचार, त्यांना दिली जाणारी प्रतिष्ठा या गोष्टींचे, त्यामागील विकृत व दांभिक वृत्तीचे उच्चाटन करण्याचे महत्त्वाचे कार्य लोकहितवादींनी ' आगमप्रकाश ' द्वारा केले. असे असूनही ' आगमप्रकाश ' च्या निमित्ताने त्यांच्यावर पुढीलप्रमाणे व्हावयाची ती टीका झालीच. उदा. ' दुसरे उत्तमोत्तम ग्रंथ सोडून गोपाळरावांनी हाच ग्रंथ (आगमप्रकाश) निरूपणास का घेतला हे सांगता येणे कठिण आहे. कदाचित या मिषाने जुन्या समाजास चावे घेणे त्यास सोईस्कर वाटले असावे व तसे त्यांनी शेवटी शेवटी घेतलेही आहेत. '

( ल. रा. पांगारकर / मुमुक्षू/जुलै, १९२८)

## ३९ ऐतिहसिक गोष्टी

हिंदुस्थानातल्या काही प्रांतांचे इतिहास लिहूनदेखील स्वतंत्रपणाने ऐतिहासिक गोष्टींच्या लेखनाची आवश्यकता लोकहितवादींना वाटते. सर्वसामान्य माणसाला ऐतिहासिक गोष्टी ऐकवून बहुश्रुत आणि विचारप्रवृत्त करावे याच एका हेतूने त्यांनी ऐतिहासिक गोष्टींचे तीन भाग (अनुक्रमे १८७७, १८७८ व १८८० मध्ये)प्रसिध्द केले.' प्राचीन काळच्या गोष्टींपासून त्या काळच्या स्थितीचे स्मरण राहाते. व हल्लीचे व त्या काळचे अनुमान करता येते व सत्पुरुषांचे उदाहरणांवरुन सदाचाराविषयीं धैर्य येते व दुष्ट पुरुषांचे उदाहरणांवरून दुराचाराचा तिरस्कार होतो' अशी लोकहितवादींची मनोधारणा आहे. शिवाय मोठाले ग्रंथ वाचायला ज्यांना अवकाश सापडला नाही अशांच्या जिज्ञासेचे सारांशरुप ऐतिहासिक गोष्टींनी तर्पण होईल, तर काही महत्वाकांक्षी अभ्यासक विस्तारपूर्वक अगणाऱ्या मूळ हकीकतीचा शोध घेतील. एकूण, समाजाच्या ज्ञानवृध्दीचा हा प्रयत्न आहे. अज्ञान आणि आळस यांमुळे देश अज्ञानव्यापी झाला आणि परदेशातील ज्ञान कोटयावधी रुपये खर्चून उसने घेण्याची पाळी आली. ही स्थिती पालटण्यासाठी ज्ञान आवश्यक आहे. 'ऐतिहासिक गोष्टी' ऐकवून समाजाच्या सामान्य ज्ञानाच्या कक्षा रुंद कराव्यात, हा लोकहितवादींचा खरा हेतू.

मोगलाई व मराठे यांच्या कारकीर्दींतील प्रसिद्ध गोष्टींचे टिपण लोकहितवादींनी करून ठेवले होते. इतिहासकाळातील मार्मिक घटना, महत्वाच्या व्यक्ती आणि त्यांच्या स्वभावाचे तितकेच लक्षणीय विशेष, त्यांची कर्तबगारी, सामान्यांमधले असामान्यत्व (तर कधी असामान्यांमधील सामान्यत्वही), तत्कालीन रीतिरिवाज, सांस्कृतिक विशेष असे जे जे महत्वाचे आणि सांगण्याजोगे वाटले त्यांचे चित्र 'ऐतिहासिक गोष्टीं' मधून लोकहितवादींनी रेखाटले. 'पेशव्यांची राज्यरीती', 'थोरांचे स्वभाव', 'परदेशगमन', 'विधवांचे पुर्नविवाह व तारखा', 'निरनिराळ्या लोकांच्या नमस्कार करण्याच्या पद्धती, 'तांदुळाच्या जाती', 'होळकरांची तसवीर', 'दिवाणी अदालतीचा देखावा', 'ठिकठिकाणचे पुजारी', 'मालकमसाहेब व जगन्नाथ शंकरशेट यांचे संभाषण' इ. विषयांवरून 'ऐतिहासिक गोष्टीं'ची व्याप्ती लक्षात येईल. 'ऐतिहासिक गोष्टीं'च्या निघालेल्या दोन दोन-तीन तीन आवृत्त्या हा त्यांच्या लोकप्रियतेचाच पुरावा होय.

पृ. १६२ / पौरुष ग्रंथ : वेदेतर वाङमय. लौकिक व्यक्तींनी लौकिक विषयांवर लिहिलेले ग्रंथ. (अपौरुष ग्रंथ : वेदादी ग्रंथ)

## ४०. पंडित स्वामी श्रीमद्दयानंदसरस्वती

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या विचारांनी आणि कार्याने प्रभावित होऊन लोक-हितवादी आर्यसमाजाशी अधिक संबध्द झालेत. मुंबईला आर्यसमाजात लोकहितवादींची व्याख्यानेही होत. स्वामी दयानंदांनी त्यांना आर्यसमाजाचे विश्वस्त म्हणून नेमले होते.

तथाकथित साधु-संन्याशांविषयी लोकहितवादींचे मत किती प्रतिकूल होते हे सर्वश्रुत आहे. पण स्वामी दयानंद त्यांपैकी नव्हते. त्यांनी आपल्या प्रभावी वाणीने वेदविद्येची महती गाऊन तिला उर्जितावस्था आणण्याचा प्रयत्न केला. देशोन्नतीच्या या प्रयत्नांमुळे लोकहितवादींना त्यांच्याविषयी आदर वाटतो आणि त्यामधूनच ते स्वामीजींच्या चरित्रलेखनाकडे वळतात. त्यांनी हे चरित्र 'लोकहितवादी' मासिकातून १८८४ साली (वर्ष २, अंक ४-५/जाने.फेब्रु. १८८४) प्रसिद्ध केले.

प्रस्तुत चरित्रात व्यक्तिजीवनवर्णनापेक्षा स्वामी दयानंदांच्या धर्मकार्याचा हेतू, त्याचे स्वरुप आणि त्यांच्या देशकार्यांची महती विशद करण्यावर लोकहितवादींचा भर आहे. वेद हे सर्वांनी अभ्यासावेत. वेदांतील मौलिक विचारांवर प्रत्येकाचा अधिकार आहे, हे मत स्वामीजींनी आग्रहाने मांडल्यामुळे त्यांच्याबद्दल लोकहितवादींना विशेष आदर वाटतो, पण याच कारणामुळे महाराष्ट्रातील सनातन्यांचा स्वामी दयानंदांवर रोष झाला. चिपळूणकरांनीही त्यांच्यावर टीका केली. अशा परिस्थितीत लोकमताचे किंवा विचारवंतांचे दडपण न मानता, स्वामी दयानंदांचे देशोन्नतीचे कार्य समोर ठेवून लोकहितवादी हे चरित्र लिहितात. त्यामुळे नेहमी परखड आणि विवेकी राहाणारी त्यांची लेखणी या चरित्रात स्वामी दयानंदांच्या अतिरिक्त गौरवाकडे वळली आहे.

REFBK-0024721